# बुद्धलीला


## धर्मानंद कोसंबी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

धर्मानंद कोसंबी



धर्मानंद कोसंबी

अनुक्रमणिका

# बुध्दलीलासारसंग्रह

हे पुस्तक
पाली ग्रंथाच्या आधारे

## कै. प्रा. धर्मानंद कोसंबी

यांनी लिहिले

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** : १९१४

**प्रकाशक** : मनोरंजन ग्रंथप्रसारक मंडळी,
गिरगाव, मुंबई - ४.

**द्वितीयावृत्ती** : १९७७ : शके १८९८
**तृतीयावृत्ती** : २००७

**प्रकाशक** : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर (पूर्व), मुंबई – ४०० ०१४.

**© प्रकाशकाधीन**

**मुद्रक** : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे

**किंमत** : रुपये ८५/-

अनुक्रमणिका

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासंबुद्धस्स ।

बुद्धं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

सब्बपापस्स अकरणं ।
कुसलस्स उपसंपदा ।
सचित्तपरियोदपनं
एतं बुद्धान सासनं ॥

अनुक्रमणिका

# डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचा अभिप्राय

कोणत्याहि पुरुषाच्या नांवानें प्रवृत्तींत आलेल्या धर्माचें खरें स्वरूप समजण्यास त्या पुरुषाचें चरित्र, त्यानें केलेले धर्मसंस्थापनेचे उद्योग व व्यवस्था, आणि त्यानें केलेले उपदेश, यांचें ज्ञान झालें पाहिजे. बुद्धाच्या नांवानें चाललेला जो धर्म, त्याचें अशा प्रकारचें ज्ञान महाराष्ट्रीयजनांस व्हावें ह्मणून पुढील ग्रंथ बुद्धशास्त्रसंपन्न धर्मानंद कोसंबी यांनीं रचला आहे. बौद्धधर्म आणि ब्राह्मणीधर्म यांचेंहि, प्राण्यांस पुष्कळ जन्म घ्यावे लागतात, असें मत आहे; त्यास अनुसरून पंडित कोसंबी यांनीं बुद्धपदाप्रत पावलेल्या सिद्धार्थाचें अनेक पूर्व जन्मांचेंहि वृत्त, बुद्धचरित्र हा जो त्यांच्या पुढील ग्रंथाचा अंश, त्यांत अंतर्भूत केलें आहे. मिळून या ग्रंथाचे तीन भाग झाले आहेत. आतां हें जें कोणत्याहि धर्माचें ज्ञान, त्यास त्या धर्ममार्गांत प्रचलित ग्रंथाचा आधार असला पाहिजे. या तत्वांस अनुसरून पंडित कोसंबी यांनीं त्रिपिटक ह्मणून पालिभाषेमध्यें जो ग्रंथराशि आहे त्याच्या आधारें हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाच्या पहिल्या भागांत बुद्धपद प्राप्त होण्याची योग्यता संपादन करण्याकरितां पूर्वजन्मीं कोणकोणत्या सद्गुणांची पारमिता ह्मणजे पारंगतता भावी बुद्धानें संपादन केली, त्याचें वर्णन आहे. तत्संबधी कोसंबी यानीं दिलेल्या कथा मनोवेधक आणि उपदेशप्रचुर आहेत. दुसऱ्या भागांतीलहि अंतिम जन्माचें चरित रम्य आहे. तिसऱ्या भागांतील सूत्रपिटकामधून घेतलेले शुद्धोपदेश आणि विशेषतः वादविवादद्वारा उपपादित केलेले सिद्धांत उपयुक्त आणि मनोरंजक आहेत. या समग्र ग्रंथाच्या योगें बुद्धधर्माची माहिती मराठी वाचकांस साधार व चांगली होईल, आणि तेणेंकरून बौद्धधर्मासंबंधी लोकांमध्यें जें अज्ञान आहे तें निरस्त होईल, आणि त्या धर्मांतील ग्राह्य असा जो पुष्कळ अंश आहे तो लोकांत सद्धर्मवृद्धीस कारणीभूत होईल. यास्तव हा ग्रंथ सर्वांस आदरणीय आणि संग्राह्य आहे.

कोणत्याहि धर्माचे प्रवर्तक आणि तत्संबंधाने प्रसिद्धीस आलेले साधुपुरुष, यांनीं केलेल्या अद्भुत चमत्कारांविषयीं कथा त्यांच्या अनुयायांत प्रचलित असतात, आणि धर्मग्रंथांतहि त्यांचा उल्लेख असतो; त्यांचा सर्वथा परित्याग करितां नये. कां कीं, त्यांत कधींकधीं तथ्याचा अंश असतो; आणि तो नसला तरी त्या कथांच्या योगें अनुयायीवर्गाच्या मनाची स्थिति, आणि ज्या कालीं त्या कथा प्रवृत्तींत आल्या त्या काळच्या चालीरीति, यांचें ज्ञान होण्यास त्या फार उपयोगी असतात. भगवान् बुद्धासंबंधाच्या अशा कांहीं अद्भुत गोष्टींचा तथ्यांश काढण्याविषयीं पंडित कोसंबी यांनीं पूर्वी छापिलेल्या ‘बुद्ध’ धर्म आणि संघ’ नांवाच्या ग्रंथामध्यें यत्न केला आहे. परंतु विवेचक बुद्धीनें तथ्यांश काढणें हें वाचणारांवरती सोंपविलें पाहिजे, आणि तें वाचणारास साध्य व्हावें ह्मणून त्या सांग कथा त्यांच्यापुढें ठेविल्या पाहिजेत. तसें पंडित कोसंबी यांनीं या नवीन ग्रंथांत केलें आहे. जर या अद्भुत गोष्टी सर्वथा सत्य आहेत असें कोसंबी यानीं प्रतिपादित केलें असतें, तर हें पुस्तक, तत्संबंधाने सदोष झालें असतें; पण तसें पंडित कोसंबी यानीं केलें नाहीं, ह्मणून अलीकडील विवेचकबुद्धिसंपन्न पंडितांनींहि आक्षेप घ्यावा असा प्रकार या ग्रंथामध्यें कांहींच दिसत नाहीं.

**रामकृष्ण गोपाळ भांडारकर**

अनुक्रमणिका

# डॉ. पांडुरंग दामोदर गुणे, एम्. ए., पीएच. डी. यांचा अभिप्राय

रा. धर्मानंद कोसंबी यांचें ‘बुद्धलीलासारसंग्रह’ पुस्तक मीं पाहिलें. यांत बुद्धाच्या लीला मूळ पालिग्रंथांच्या आधारें लिहिल्या गेल्या असून, त्या, पालिभाषेची ज्यांनां ओळख नाहीं त्यांनां, तींत लिहिल्या गेलेल्या वाङ्मयाची अंशतः आणि साररूपानें माहिती देतील. पहिल्या भागांत बुद्धाविषयीं नानातऱ्हेच्या प्रचलित कथा जशाच्या तशाच दिल्या आहेत; दुसऱ्या भागांत बुद्धाचें चरित्र दिलें असून तिसऱ्यांत मुख्य गोष्ट ह्मणजे बुद्धाचा उपदेश दिला आहे. रा. कोसंबी पालिभाषेच्या अगदीं हृदयांत शिरून तेथें रममाण झालेले असल्यामुळें, बुद्धाविषयीं माहितीचें सार तींतून काढण्यास तेच योग्य होत. बुद्धाच्या कथा, जन्म, आणि परिनिर्वाण वगैरे जशा आहेत तशाच – स्वतः कांहीं टीका अगर विवेचन न करतां – महाराष्ट्रवाचकांपुढें ठेवण्याचा तेवढा त्यांचा संकल्प होता, आणि त्यांनीं प्रस्तावनेंत तसें स्पष्ट सांगितलेंच आहे. आणि या गोष्टीविषयीं योग्य चिकित्सा करण्याचें त्यांनीं वाचकांकडे सोंपविलें आहे.

बुद्धाविषयीं आमच्या लोकांनां बुद्धाच्या नांवापलीकडे, व तो ‘निरीश्वरवादी होता’ या पलीकडे फारशी माहिती नसते. अशा सर्वांनां प्रस्तुत पुस्तकाची चांगली मदत होईल, व बुद्धाच्या अनुयायांची त्याच्याविषयीं काय कल्पना होती, त्याचा उपदेश कसा होता, वगैरे चांगल्या प्रकारे कळेल. तेव्हां रा. कोसंबी यांचें हें पुस्तक एकंदरींत संग्रहणीय आणि वाचनीयं आहे.

**पां. दा. गुणे**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

प्रस्तावना .......... १३

**भाग पहिला : बोधिसत्वाच्या कथा** .......... २१

सुमेधकथा .......... २१

वेस्संतर जातक .......... २३

मघाची गोष्ट .......... २९

चुल्लबोधिजातक. .......... ३३

महाजनकजातक .......... ३५

महौषधाची गोष्ट .......... ४१

तेमियजातक .......... ५३

सुतसोमजातक .......... ५८

**भाग दुसरा बुद्धचरित्र** .......... ७१

जन्म आणि बालपण .......... ७१

महाभिनिष्क्रमण .......... ७६

तपश्चर्या .......... ८३

माराशीं युद्ध .......... ८९

बुद्धपदाचा लाभ आणि पहिला धर्मोपदेश .......... ९३

काशी आणि उरुवेला येथील कामगिरी .......... ९८

राजगृहाला आगमन .......... १०३

शुद्धोदनराजाची भेट .......... १०६

सुदत्त ऊर्फ अनाथपिंडिक श्रेष्ठी. .......... १०८

विशाखा मिगारमाता. .......... १११

देवदत्त .......... ११५

मागन्दिया ब्राह्मणकन्या .......... १२१

सुंदरी परिव्राजिका .......... १२२

महाप्रजापति गौतमी .......... १२३

आणि भिक्षुणीसंघाची स्थापना .......... १२३

विडूडभ (विदुर्दभ) .......... १२४

उपसंहार .......... १२६

**भाग तिसरा बुद्धाचा : उपदेश आणि परिनिर्वाण** .......... १२९

गृहस्थाचीं कर्तव्यें .......... १२९

धार्मिक व अधार्मिक चर्या .......... १३१

आर्य उपोसथ [१८२ पानावरील टीप पहा.] ........ १३३
आर्यश्रावकानें सात पापकर्मे वर्ज्य केलीं पाहिजेत ........ १३४
सात प्रकारची भार्या ........ १३६
चित्ताचेंच रक्षण केलें पाहिजे ........ १३६
सात धनें ........ १३७
पांच गोष्टींचें सतत चिंतन करावें ........ १३८
गेल्याचा शोक वृथा! ........ १३८
बुद्धीचीं पांच आवरणें ........ १३९
बोध्यंगांची भावना ........ १४०
सत्कर्माचें प्रत्यक्ष फळ ........ १४०
विचार करून विश्वास ठेवा ........ १४२
आश्वलायन ब्राह्मणकुमार व ब्राह्मणवर्णाची थोरवी ........ १४३
मनुष्यांतील जातिभेद नैसर्गिक आहेत काय? ........ १४७
चांडाळ कसा होतो? ........ १४८
त्रैविद्य ब्राह्मण आणि ब्रह्मसायुज्यता ........ १४९
यज्ञयाग ........ १५३
शेतकरी भारद्वाज ........ १५६
खोटें न बोलण्याविषयीं राहुलाला उपदेश ........ १५८
भिक्षूनें कधींहि रागावतां कामा नये ........ १५९
चार स्मृत्युपस्थानें (जागृतीचीं साधनें) ........ १६२
विषयांची गोडी, विषयांपासून दुःख ........ १६४
आणि त्यांपासून मुक्तता ........ १६४
सारग्रहण केलें पाहिजे ........ १६६
माराचें कुरण ........ १६७
सुखाचा दिवस ........ १६७
मालुंक्यपुत्राची दृष्टि ........ १६८
वत्सगोत्र परिव्राजक ........ १६९
अंधांचें हस्तिवर्णन ........ १७०
अंगुलिमाल दरोडेखोर ........ १७१
शेतकरी कोणत्या शेतांत प्रथम बीं पेरील? ........ १७४
सिंह सेनापति ........ १७५
पसेनदिकोसल राजाला उपदेश ........ १७७

राजा अजातशत्रु आणि श्रामण्याच्या फलाविषयीं प्रश्न ................................................... १७९
परिनिर्वाण ........................................................................................................ १८३

अनुक्रमणिका

## ज्या पालि कथांच्या किंवा सुत्तांच्या आधारें हा ग्रंथ लिहिला त्यांची यादी

### भाग पहिला

१ निदानकथा [जातकअट्ठकथा]
२ वेस्सन्तर-जातक [५४७ फॉस्बोलची एडिशन]
३ कुलावक-जातक [३१]
४ चुल्लबोधि-जातक [४४३]
५ महाजनक-जातक [५३९]
६ उम्मग्ग-जातक [५४६]
७ तेमिय-जातक [५३८]
८ महासुतसोम-जातक [५३७]

### भाग दुसरा

१ निदानकथा [जातक अट्ठकथा]
२ निदानकथा [जातक अट्ठकथा]
३ निदानकथा, सुत्तनिपात, अरियपरियेसनसुत्त, मज्झिमनिकाय, व विसुद्धिमग्ग
४ निदानकथा आणि पधानसुत्त [सुत्तनिपान]
५-७ महावग्ग.
८ निदाकथा [जातक अट्ठकथा]
९ चुल्लवग्ग
१० धम्मपदअट्ठकथा
११ चुल्लवग्ग
१२ धम्मपदअट्ठकथा
१३ उदानवग्ग आणि धम्मपदअट्ठकथा
१४ चुल्लवग्ग
१५ धम्मपदअट्ठकथा

### भाग तिसरा

१ सिगालोवादसुत्त [दीघनिकाय, वग्ग ३]
२ सालेय्यकसुत्त [मज्झिमनिकाय, पण्णासक १, वग्ग ५]
३ उपोसथसुत्त [अंगुत्तरनिकाय, तिकनिपात, पण्णासक २, वग्ग २]
४ वेळुद्वारेय्यकसुत्त [संयुत्तनिकाय, सोतापत्तिसंयुत्त, वग्ग १]
५ भरियासुत्त [अंगुत्तर. सत्तनिपात, वग्ग ६]
६ कूटसूत [अंगत्तर. तिकनिपात, पण्णासक ३, वग्ग १]
७ धनसुत्त [अंगुत्तर. सत्तनिपात, वग्ग १]
८ ठानसुत्त [अंगुत्तर. पंचकनिपात, पण्णासक १, वग्ग १]
९ कोसलसुत्त [अंगुत्तर. पंचकनिपात, पण्णासक १, वग्ग ५]
१० संगारवसुत्त [संयुत्त. बोज्झंगसंयुत्त, वग्ग ६]
११ अग्गिसुत्त [संयुत्त. बोज्झंगसंयुत्त, वग्ग ६]
१२ अपण्णकसुत्त [मज्झिम. पण्णासक २, वग्ग १]
१३ कालामसुत्त [अंगुत्तर. तिकनिपात, पण्णासक २, वग्ग २]

अनुक्रमणिका

१४ अस्सलायनसुत्त [मज्झिम. पण्णासक २, वग्ग ५]
१५ वासेट्ठसुत्त [मज्झिम. पण्णासक २, वग्ग ५, आणि सुत्तनिपात वग्ग ३]
१६ वसलसुत्त [सुत्तनिपात. वग्ग १]
१७ तेविज्जसुत्त [दीघ. वग्ग १]
१८ कूटदन्तसुत्त [दीघ. वग्ग १]
१९ कसिभारद्वाजसुत्त [सुत्तनिपात. वग्ग १]
२० अक्कोसक-भारद्वाजसुत्त [संयुत्त. ब्राम्हणसंयुत्त वग्ग १]
२१ अंबलट्ठिक – राहुलोवादसुत्त [मज्झिम. पण्णासक २, वग्ग २]
२२ ककचूपमसुत्त [मज्झिम. पण्णासक १, वग्ग ३]
२३ सतिपट्ठानसुत्त [मज्झिम. पण्णासक १, वग्ग १]
२४ महादुक्खक्खन्धसुत्त [मज्झिम-पण्णासक १, वग्ग २]
२५ महासारोपमसुत्त [मज्झिम-पण्णासक १, वग्ग ३]
२६ निवापसुत्त [मज्झिम-पण्णासक १, वग्ग ३]
२७ भद्देकरत्तसुत्त [मज्झिम-पण्णा ०३, वग्ग ४]
२८ चूलमालुंक्यपुत्तसुत्त [मज्झिम-पण्णासक २, वग्ग १]
२९ वच्छगोत्तसुत्त [अब्याकतसंयुत्त]
३० तित्थियसुत्त [उदान-वग्ग ६]
३२ अंगुलिमालसुत्त [मज्झिम-पण्णा ०२, वग्ग ४]
३२ असिबंधकपुत्तसुत्त [गामणिसंयुत्त]
३३ सीहसुत [अंगुत्तर-अट्ठनिपात, पण्णा ०१, वग्ग २]
३४ कोसलसंयुत्त [वेंचे]
३५ सामत्र्त्रफलसुत्त [दीघ-वग्ग १]
३६ महापरिनिब्बानसुत्त [दीघ-वग्ग २]

# प्रस्तावना

**पा**लिवाङ्मयांतील त्रिपिटक या मुख्य ग्रंथाचे सुत्त, विनय आणि अभिधम्म असे तीन भाग आहेत. सुत्तपिटकांत बुद्धाचा आणि त्याच्या प्रमुख शिष्यांचा उपदेश व धर्मपर संवाद संग्रहित केला आहे; विनयपिटकांत भिक्षूंच्या आचारविचारांचा व तत्संबंधीं कथांचा विस्तारानें उल्लेख आहे; आणि अभिधम्मपिटकांत बौद्धधर्माच्या मुख्य तत्त्वांचा त्या कालच्या तात्त्विकपद्धतीनें विचार केला आहे. अभिधम्म पिटकांत प्रत्यक्ष बुद्धानें उपदेशिलेला भाग मुळींच नाहीं असें झटलें असतां चालेल, व सुत्त आणि विनय पिटक यांतून देखील बुद्धाच्या शिष्यांनी रचलेले बरेच भाग आहेत; तथापि प्राधान्येंकरून बुद्धाचा उपदेश किंवा आज्ञा यांचाच या ग्रंथांत संग्रह झाला असल्यामुळें यांतील मजकुराला कात्यायनासारख्या पालिव्याकरणकारांनीं 'बुद्धवचन' असेंच म्हटलें आहे. अर्थात्, ज्याला बुद्धासंबंधानें विस्तृत माहिती मिळवावयाची असेल, त्यानें जवळजवळ सगळ्या त्रिपिटकाचें अवलोकन करणें योग्य आणि आवश्यक आहे.

याशिवाय पालिवाङ्मयांत बुद्धघोषासारख्या आचार्यांनी लिहिलेल्या अट्ठकथा त्रिपिटकाच्या खालोखाल महत्त्वाच्या आहेत. त्रिपिटकाच्या अर्थासहित कथा ह्मणून यांनां अट्ठकथा असें ह्मणतात. एकाद्या वाक्याचें किंवा श्लोकाचें विशेष महत्त्व असल्यास त्याचा अर्थ देऊन शिवाय त्यासंबंधानें प्रचलित असलेली एकादी कथा दिलेली या अट्ठकथांतून आढळते. यांपैकीं पुष्कळशा कथा अर्थात्च दन्तकथा आहेत. तथापि कांहींचें महत्त्व फार असल्यामुळें बुद्धाच्या चरित्राला पोषक अशा पुष्कळ गोष्टी या अट्ठकथांवरून घेतां येण्यासारख्या आहेत.

पण या सर्व वाङ्मयाचें मराठींत रूपांतर करण्याचा अवाढव्य प्रयत्न आरंभिणें सांप्रतच्या परिस्थितींत शक्य नसल्यामुळें, त्रिपिटक आणि त्याच्या अट्ठकथा यांपैकीं जो मजकूर मला बुद्धाच्या चरित्रासंबंधानें विशेष महत्त्वाचा वाटला, तो संग्रहित करून **'बुद्धलीलासारसंग्रह'** या नांवानें महाराष्ट्रीय वाचकांसमोर मांडण्याचा हा मीं अल्प प्रयत्न केला आहे. यांत माझ्या पदरचें विशेष कांहीं नाहीं. केवळ 'त्रिपिटक' आणि 'अट्ठकथा' यांतील उपयुक्त कथानकांचें सार काढून तें यथामति योग्य ठिकाणीं घातलें आहे. मघाच्या गोष्टीचा मात्र थोडासा विस्तार केला आहे.

पहिल्या भागांतील आठ गोष्टी जातकअट्ठकथेवरून घेतल्या आहेत. दुसऱ्या भागांतील पंधरा गोष्टींपैकीं १–४ जातक अट्ठकथेवरून घेतल्या असून १०, १२, १३ आणि १५ या धम्मपदअट्ठकथेवरून घेतल्या आहेत. बाकीच्या सर्व विनयग्रंथांवरून (महावग्ग आणि चुल्लवग्ग यांवरून) घेतल्या आहेत. तेरावी गोष्ट सुत्तपिटकांतील उदानवग्ग या प्रकरणांतहि सांपडते. पहिलीं चार प्रकरणें जरी जातकअट्ठकथेवरून घेतलीं आहेत, तरी मधुनमधून सुत्तपिटकांतील कांहीं सुत्तांच्या आधारानें त्यांत फेरफार करण्यांत आला आहे. १२९–१३० पानांवरील पांच मानसिक शक्तींसंबंधानें जें विवेचन आलें आहे, तें विशुद्धिमार्गाच्या आधारानें केलें आहे. शेवटला उपसंहार तेवढा मात्र मीं स्वतंत्रपणे लिहिला आहे. तिसऱ्या भागांतील सर्व मजकूर सुत्तपिटकावरून घेतला आहे. या प्रस्तावनेच्या शेवटीं दिलेल्या यादीवरून कोणता मजकूर कोणत्या सुत्ताच्या आधारानें घेतला आहे, तें स्पष्ट कळून येईल.

बुद्धचरित्राच्या रूपानें पालिवाङ्मयाचें दिग्दर्शन करण्याचा उद्देश असल्यामुळें या ग्रंथांतील गोष्टींची मीं ऐतिहासिक दृष्ट्या छाननी केली नाहीं. डॉ. ओल्डेनबर्ग यांच्या 'बुद्धचरित्रा'च्या किंवा प्रसिद्ध फ्रेंच

अनुक्रमणिका

ग्रंथकार रेनाँ यांच्या 'ख्रिस्तचरित्रा'च्या धर्तीवर हा ग्रंथ लिहिला नाहीं, आणि ह्मणूनच याला 'बुद्धचरित्र' हें नांव न देतां **'बुद्धलीलासारसंग्रह'** असें पौराणिक पद्धतीचें नांव दिलें आहे. या ग्रंथाच्या योगें बौद्धांच्या मूळ ग्रंथासंबंधानें आमच्या सुशिक्षित वर्गांत देखील आढळून येणाऱ्या कित्येक भ्रामक समजुती [सरकारनें नेमलेल्या व्हर्न्याक्युलर टेक्स्ट बुक रिव्हिजनसारख्या विद्वन्मंडलामध्यें देखील बौद्धधर्मासंबंधानें किती भ्रामक समजूत आहे, हें पहावयाचें असल्यास मराठी सातव्या पुस्तकांतील **'बौद्ध धर्म व त्याचे पुरस्कर्ते'** हा धडा वाचावा. त्यावरून असा भास होतो, कीं, 'सद्धर्म पुंडरीक' हाच कायतो बौद्धांचा पवित्र ग्रंथ असावा; परंतु 'सद्धर्म-पुंडरीक' हा मूल ग्रंथ नसून महायान पंथाच्या लोकांनीं लिहिलेला एक ग्रंथ आहे. प्रो. मॅक्स-मुल्लर यांचे गुरु प्रसिद्ध फ्रेंच पंडित बर्नुफ (Burnouf) यांनीं 'सद्धर्मपुंडरीकाचे'चें बऱ्याच वर्षांपूर्वी फ्रेंच भाषेंत भाषांतर केलें असल्यामुळें तोच ग्रंथ बौद्धांचा पवित्र ग्रंथ असावा, अशी बुकटेक्स्ट कमिटीची चुकीची समजूत झाली असावी.] अंशतः तरी नष्ट होतील, अशी आशा बाळगणें अप्रस्तुत होणार नाहीं.

या पुस्तकांतील टीपांतून ज्या कांहीं पालिगाथा छापण्यांत आल्या आहेत, त्यांत क्वचित् अशुद्धें राहिलीं आहेत. पालिविद्यार्थ्यांनां हे दोष सहज कळून येण्यासारखे असून मराठी वाचकांनां त्यांच्या शुद्धिकरणापासून विशेष फायदा होईलसें वाटत नसल्यामुळें शुद्धिपत्र देण्याचा प्रयत्न केला नाहीं, याबद्दल सुज्ञ वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

आरण्यक कुटी,
पुणें, ता. १० मार्च, १९१४

**ध. कोसंबी**

अनुक्रमणिका

# प्रस्तावना

***बो**धिसत्व धर्मानंद कोसंबी यांची जन्मशताब्दी गतवर्षी (१९७६) पूर्ण झाली*

*त्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने धर्मानंदांची, मराठीतील एखादे वगळून, सर्व पुस्तके पुन्हा प्रसिद्ध करण्याचा संकल्प केला आहे. या संकल्पाप्रमाणे 'बुद्धलीलासारसंग्रह' हे पुस्तक प्रसिद्ध करण्यास आम्हांस आनंद व धन्यता वाटते.*

*ज्ञानमय तपश्चर्या धर्मानंदांनी अखंडपणे केली. या तपश्चर्येतून जी ग्रंथसंपदा निर्माण झाली, त्यातील हे एक उत्कृष्ट पुस्तक आहे. फेब्रुवारी १९१० मध्ये सयाजीराव महाराजांच्या सांगण्यावरून बडोदे येथे बौद्ध धर्मावर धर्मानंद कोसंबी यांनी जी व्याख्याने दिली, त्यांचे पुस्तक लगेच 'बुद्ध, धर्म आणि संघ' या नावाने प्रसिद्ध करण्यात आले. नंतर १९१४ साली 'बुद्धलीलासारसंग्रह' हे प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध झाले. कोसंबी गुजरात विद्यापीठात अध्यापन करीत होते, तेव्हा 'समाधिमार्ग' (१९२५) व 'बौद्ध संघाचा परिचय' (१९२६) ही पुस्तके प्रसिद्ध झाली. त्यानंतर वाराणशी येथील काशी विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम करीत असता त्यांचे 'हिंदी संस्कृति आणि अहिंसा' (१९३५) या पुस्तकाचे प्रकाशन झाले. 'विसुद्धिमग्ग' या पाली भाषेतील पुस्तकाचे संशोधनपूर्वक पाठ निश्चित करुन त्यांचे संस्करण 'भारतीय विद्याभवन' (मुंबई) या संस्थेने नागरी लिपीत प्रसिद्ध केले. त्यानंतर धर्मानंदांनी संस्कृत व पाली भाषेतील आणि त्याचप्रमाणे मागधी अथवा अर्धमागधी भाषेतील बौद्ध व जैन साहित्याचे मंथन करून 'भगवान बुद्ध' हा ग्रंथ (१९४०) नागपूर येथील नवभारत ग्रंथमालेत प्रसिद्ध केला. धर्मानंदांनी वरील ग्रंथसंपत्ती निर्माण करीत असता १९२४ साली १८७६ पासून १९२३ पर्यंतचा म्हणजे पूर्वायुष्याचा वृत्तांत 'निवेदन' या शीर्षकाखाली प्रसिद्ध केला. आपल्या उत्तरायुष्याचा वृत्तांतही त्यांनी मुंबईच्या 'प्रकाश' या नियतकालिकात 'खुलासा' या सदराखाली लिहून क्रमशः प्रसिद्ध केला. गतवर्षी त्यांचे 'निवेदन' हे आत्मचरित्र आणि त्यांचे समग्र चरित्र, श्री. ज. स. सुखठणकर यांनी लिहिलेले, मुंबई येथील 'धि गोवा हिंदु असोसिएशन' या संस्थेने प्रसिद्ध केले आहे.*

*बुद्धावर व बौद्ध धर्मावर धर्मानंदांची नितांत श्रद्धा होती; परंतु ही श्रद्धा डोळस होती. या श्रद्धेमुळेच अगणित हालअपेष्टा सोसून परदेशात राहून त्यांनी बौद्ध धर्माचे व साहित्याचे अध्ययन केले. भगवान बुद्ध व बुद्ध धर्म २,६०० वर्षांपूर्वी भारतात अवतरला. इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत हा धर्म भारतात नांदत होता आणि पहिल्या दीड हजार वर्षात या धर्माने अर्ध्या जगावर प्रभाव गाजविला. नवव्या शतकापासून भारतातून या धर्माची पिछेहाट होत गेली आणि भारताच्या ईशान्य कोपऱ्यात व काही हिमालयीन प्रदेशातच तो मुमुर्षू स्थितीत अवनत अवशेषांच्या स्वरुपात शिल्लक राहिला होता. १८९० पर्यंत भारतात या धर्माचा एकही विद्वान नव्हता. धर्मानंदांनी बौद्ध धर्माच्या अध्ययनार्थ निष्कांचन स्थितीत गृहत्याग केला; भारताच्या कानाकोपऱ्यात व सर्वत्र पर्यटन केले आणि अखेरीस श्रीलंकेत त्यांना या धर्माचे पंडित भेटले. कोलंबो शहराजवळ असलेल्या 'विद्योदय विद्यालय' नावाच्या विहारात भिक्षुधर्माने राहून त्यांनी महास्थविर सुमंगलाचार्य यांच्या हाताखाली पाली ग्रंथांचा अभ्यास केला. नंतर ते ब्रह्मदेशात गेले. तेथील विहारात राहून ध्यानमार्गाचा अभ्यास केला. तेथील पंडितांच्या चरणापाशी बसून बौद्ध साहित्याचे पाठ घेऊन अध्ययन केले. परिनिष्ठित पंडित बनून परत आले व भारतातून परागंदा झालेल्या बौद्ध धर्माच्या महाविद्येची प्रतिष्ठापना केली. त्यानंतर, भारतामध्ये बौद्ध विद्येच्या अध्ययनाला व संशोधनाला उजळा मिळाला. धर्मानंदांच्या अध्यापकत्वाच्या कारकिर्दीत बौद्ध धर्माचे व पाली भाषेचे पुष्कळ विद्वान तयार झाले. कै. चिं. वै. राजवाडे डॉ. पु. वि. बापट, कै. चिंतामणराव जोशी, प्रा. ना. के. भागवत इत्यादी मंडळी त्यांच्या*

*शिष्यमालिकेतील चमकदार रत्ने होत. धर्मानंदांनी कलकत्ता विद्यापीठात प्रथम अध्यापकाची जागा पतकरली. तेथे ते फार वेळ राहिले नाहीत. महाराष्ट्रात बौद्ध विद्येचा प्रसार करण्याची उत्कट इच्छा झाल्यामुळे त्यांनी श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांची गाठ घेऊन लहानशी शिष्यवृत्ती मिळविली व महाराष्ट्रात अध्यापन सुरू केले. मुंबई विद्यापीठात पाली भाषेचा प्रवेश करविला. अमेरिका, रशिया इत्यादी देशांतील विद्वानांची आणि विद्यापीठांची आमंत्रणे तरीही सारखी येत होती व त्याप्रमाणे ते तिकडे जाऊन काही महिने वा एखादे वर्ष राहून पुन्हा स्वदेशी परत येत असत. महाराष्ट्रात व गुजरातमध्ये ते दीर्घकाल राहिले. पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्यांनी सहा वर्षे प्राध्यापकाचे काम केले. परदेशात असताना विशेषतः अमेरिकेत असताना समाजसत्तावादाचे अध्ययन केले. समाजसत्तावादाची उद्दिष्टे मान्य केली. मार्क्सवाद हा समाजसत्तावादाचा एक श्रेष्ठ आधार होय; परंतु मार्क्सवादातील हिंसात्मक क्रांतिवाद त्यांना मान्य झाला नाही. मार्क्सवादाचा मानवतावाद मात्र त्यांनी आत्मसात केला. त्यांनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, 'जगातील श्रमजीवी वर्गाने प्रेमाचा मार्ग स्वीकारल्याशिवाय मनुष्यकृत मनुष्यहत्या बंद होणार नाही; परंतु देशाभिमानाने उन्मत्त झालेल्यांना तो सापडणार कसा?' भगवान बुद्ध व जैन तीर्थकर आणि त्याचप्रमाणे गांधीवाद यांच्या योगाने त्यांचे चित्त पूर्ण भारावून गेले होते. त्यांमुळे ते असे म्हणत की, 'राष्ट्रद्वेषाच्या आणि वर्णद्वेषाच्या रोगातून पार पडण्याला याच्याशिवाय दुसरा मार्ग कोणताही असू शकत नाही.'*

*आधुनिक ऐतिहासिक दृष्टी आणि संशोधन पद्धती त्यांनी पूर्ण आत्मसात केली होती, त्यामुळे बुद्धचरित्र व बौद्ध धर्म यात वास्तविक सार काय आहे व असार काय आहे, याचा त्यांनी तपशीलवार पूर्ण निवाडा केला होता. बुद्धचरित्रामध्ये अनेक काल्पनिक व पौराणिक कथांची भर पाली व संस्कृत बौद्ध वाङमयात वारंवार पडत गेली. त्यामुळे भगवान बुद्ध हा मानव व्यक्ती म्हणून कोणी होऊन गेला की नाही, किंवा ती केवळ कल्पित कथा आहे, असा प्रश्न अनेक पश्चिमी संशोधकांनी निर्माण केला होता. संशयनिवारणार्थ इतिहाससंशोधकांनी भारतात बुद्धाच्या जन्मस्थानाच्या उत्खननांच्या द्वारे शोध चालविला व शोध लागला. बुद्धचरित्रातील वास्तव चरित्र भाग कोणता व कल्पित भाग कोणता याबद्दलचा निर्णय धर्मानंदांनी फार चांगल्या रीतीने केला. बुद्धपिता शुद्धोदन हा एक स्वतंत्र राजा होता असे पाली व बौद्ध वाङ्मयात वारंवार लिहिलेले सापडते. या सर्व वाङ्मयाचा झाडा घेऊन धर्मानंदांनी पुराव्यानिशी असे ठरविले की, बुद्धपिता शुद्धोदन हा स्वतंत्र राजा नव्हता तर एक संपन्न शेतकरी होता. बुद्धाचे गोत्रनाम यांचाही त्यांनी उलगडा करुन 'सिद्धार्थ' किंवा 'गौतम' ही नावे निश्चित केली आणि सूर्य किंवा आदित्य हे गोत्र होय, असा निर्णय दिला. बुद्धाची माता मायादेवी ही वनात उभी असतानाच प्रसूत झाली, हेही ठरविले. राहूल या पुत्राच्या जन्मानंतर बुद्धाने गृहत्याग सात दिवसांत केला, हीही गोष्ट अमान्य केली. राहूलची माता पहिल्या सात दिवसांतच निवर्तली; राहूलच्या बालपणी काही वर्षे बुद्धाने गृहत्याग केला नव्हता, असेही त्यांनी दाखवून दिले. बुद्ध किंवा सिद्धार्थ हा गृहत्याग करण्याच्या पूर्वीच समाधिमार्ग शिकला होता, गृहत्याग केल्यानंतर नव्हे. गृहत्यागाच्या अगोदर राजा शुद्धोदनाने त्याच्याकरिता अनेक प्रासाद बांधून त्याला जगातील शोकास्पद घटना दिसू नयेत आणि तो अनेक रमणींच्या सहवासात विलासात रमावा, अशी अवस्था त्या प्रासादांमध्ये केली होती, हीही गोष्ट नाशाबीत केली. सिद्धार्थाला छन्न सारथ्याने रथातून अनेक वेळा प्रासादातून बाहेर फिरावयास नेले, तेव्हा सिद्धार्थाला रोगी, जराजर्जर व्यक्ती, प्रेत आणि संन्यासी भिक्षू यांचे दर्शन झाले; त्यामुळे त्याला प्रपंचाबद्दल वैराग्य उत्पन्न झाले आणि त्यामुळे त्याने कायमचा गृहत्याग केला, हीही अत्यंत सुप्रसिद्ध कथा कल्पित कथा आहे हे धर्मानंदांनी आपल्या परिशीलनाने अनेक प्रमाणे दाखवून सिद्ध केले आहे यासंबंधी 'भगवान बुद्ध' या पुस्तकात धर्मानंद म्हणतात: "निदानकथेत ललितविस्तारात आणि बुद्धचरितकाव्यांमध्ये या प्रसंगाची रसभरित वर्णने आढळतात; आणि*

*त्यांचा बौद्ध चित्रकलेवर चांगला परिणाम झाला आहे; परंतु त्यांच्यात तथ्य मुळीच नाही; किंवा फारच थोडे असावे असे वाटते. कां की, प्राचीनतर सूक्तांतून ह्या असंभाव्य दंतकथेला मुळीच आधार सापडत नाही.*

*"अरिय परियेसन सुतात स्वतः भगवान बुद्धाने आपल्या गृहत्यागसमयाची हकिगत दिली आहे, ती अशीः 'भिक्षू हो, असा विचार करीत असता काही काळाने, जरी मी त्या वेळी तरुण होतो, माझा एकही केस पिकला नव्हता, मी भर ज्वानीत होतो आणि माझे आईबाप मला परवानगी देत नव्हते, डोळ्यांतून निघणाऱ्या अश्रुप्रवाहाने त्यांची मुखे भिजली होती, ते सारखे रडत होते, तरी मी शिरोमुंडन करून, काषायवस्त्रांनी देह आच्छादून घरातून बाहेर पडलो.*

*"हाच उतारा जसाच्या तसाच महासच्चक सुतात सापडतो. यावरून बोधिसत्व घरच्या माणसांना कळू न देता छन्नासह (अश्व) कथकावर स्वार होऊन पळून गेला, हे म्हणणे साफ चुकीचे आहे असे दिसते. बोधिसत्वाची खुद्द आई मायादेवी सातव्या दिवशी जरी निवर्तली असली, तरी त्याचे पालन महाप्रजापती गोतमीने स्वतःच्या मुलाप्रमाणेच केले; अर्थात वरील उताऱ्यात तिलाच बुद्ध भगवंताने आई म्हटले असले पाहिजे. शुद्धोदनाला व गोतमीला तो परिव्राजक होणार हे पुष्कळ दिवसांपासून माहीत होते, आणि त्यांच्या इच्छेविरुद्ध व त्यांच्या समक्षच त्याने प्रव्रज्या घेतली हे या उताऱ्यावरून स्पष्ट होते." ('भगवान बुद्ध', तिसरे मुद्रण, पृ. ६४.)*

*भारतामध्ये इ. स. पूर्व सहाव्या शतकापासून बौद्ध क्रांतीला प्रारंभ झाला आणि ती भारतभर पसरून तिने अर्धे जग व्यापले, अशा प्रकारची वैचारिक शक्ती काय होती, याचे सुंदर व भव्य दर्शन धर्मानंदांच्या पुस्तकांमध्ये होते; विशेषतः त्यांच्या 'भगवान बुद्ध' आणि प्रस्तुतचे 'बुद्धलीलासारसंग्रह' या दोन पुस्तकांमध्ये होते. सिद्धार्थाला वैराग्य प्राप्त झाले आणि त्याने तारुण्यात गृहत्याग केला याची कारणमामांसा या दोन पुस्तकांचे वाचन केले असता उत्कृष्ट रीतीने सापडते. त्या वेळच्या राजकीय व सामाजिक अराजकतेतील दुरवस्थेमुळे तो चिंताक्रांत झाला होता, ही गोष्ट लक्षात येते. बुद्धाच्या वेळी भारतामध्ये शेकडो लहानलहान राज्ये होती. त्यांपैकी महत्त्वाची सोळा राज्ये उत्तर भारतात होती. राजे संधी सापडताच एकमेकांच्या राज्यांवर आक्रमणे करीत. महत्वाच्या राज्यांना अंकित असलेली लहानमोठी गणराज्ये सतत आपसात भांडत होती. बुद्ध ज्या गणराज्यात होता, ते गणराज्य अंकित होते. बुद्धाचा शाक्य गण व शेजारचा कोलिय गण यांच्यात सतत विग्रह चालू होता. राजांची राज्ये किंवा गणराज्ये यांच्यामध्ये केव्हा विग्रह सुरू होईल, रक्तपात होईल, याचा नियम नसे. अशा स्थितीत बुद्धाचे मन चिंताग्रस्त होऊन मानव जातीच्या भवितव्याबद्दल शंकाकुल बनले. प्रपंच हा दुःखमय आहे, याचा सतत प्रत्यय येत होता. परंतु या कालखंडात किंवा या युगात भारतीय संस्कृती ही प्रगल्भ दशेस आली होती, पारमार्थिक व ऐहिक विचारांची शास्त्रे व संप्रदाय निर्माण झाले होते. उपनिषदातील आध्यात्मिक विचार प्रौढ दशेस आला होता. बौद्ध साहित्यात पारमार्थिक विचारांच्या साठ संप्रदायांचा उल्लेख सापडतो; परंतु त्यातील सहांचे स्वरूप नीट कळते. हे सर्व संप्रदाय वैश्विक तत्त्वज्ञान आणि मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान याबद्दलच्या मतभेदांनी भरलेले होते. यांच्यामध्ये वैदिक आर्यांचा संप्रदाय आणि वेदपूर्वकालापासून चालत आलेला श्रमणसंप्रदाय यांचा प्रभाव तुल्यबल होता. वैदिक आर्यांचे यज्ञयागादी कर्मकांड हे ऐहिक आणि पारलौकिक सुखाचा व श्रेयाचा मार्ग म्हणून मान्य झाला होता. त्याचप्रमाणे श्रमणांचा तपश्चर्येचा मार्गही आपले प्राचीन अधिष्ठान बळकट करून बसला होता. वैदिक मार्ग हा एका अर्थाने भोगवादी व प्रवृत्तीमार्गी होता, तर श्रमणमार्ग हा आत्यंतिक तपश्चर्येचा निवृत्तीपर मार्ग होता. वरील अनेक संप्रदायांमध्ये परलोक व परमेश्वर न मानणारे काही भौतिकवादी संप्रदाय होते. काही संप्रदाय केवल नियतिवादी होते. त्यांचे मत असे होते की, माणसाचे*

अनुक्रमणिका

*कर्तृत्व हा भ्रम आहे. परिस्थितीची व विश्वाची दृढ व अपरिवर्तनीय बंधने अशी आहेत की, त्यामुळे माणसाला स्वतःचे चांगलेवाईट भवितव्य घडविणे अशक्य आहे. धर्म व अधर्म, नीती व अनीती यासंबंधी विवेक करून निश्चितपणे धर्म व नीती यांचा मार्ग अनुसरणे, हे माणसाच्या हाती नाही; मनुष्य भवितव्यतेच्या अधीन आहे.*

*भगवान बुद्धाने या वैचारिक आणि व्यावहारिक अराजकेतून निश्चित मार्ग काढला व दाखविला. त्यास 'मध्यम मार्ग' किंवा 'मध्यमा प्रतिपद' असे म्हटले आहे. राजांच्या आणि गणांच्या निरंतर चालू असलेल्या विग्रहांमुळे वा संग्रामांमुळे समाज, विशेषतः बहुजनसमाज अशांत व विपद्‌ग्रस्त होता. त्याकरिता भगवान बुद्धाने दहा पारमितांचा व चार आर्यसत्यांचा उपदेश केला. दहा पारमिता म्हणजे दान, शील, नैष्कर्म्य, प्रज्ञा, वीर्य, क्षांती, सत्य, अधिष्ठान, मैत्री आणि उपेक्षा ह्या होत. 'बुद्धलीलासारसंग्रहा'त बोधिसत्त्वाच्या पारमितासाधनेच्या आठ कथा प्रथम सांगितल्या आहेत. या ग्रंथाचे मुख्य तीन भाग असून पहिला भाग म्हणजे या आठ कथा होत. ही दहा पारमिता म्हणजे माणसांनी साध्य करावयाचे दहा अंतिम नैतिक आदर्श होत. प्राचीन काळापासून आजपर्यंत झालेल्या नीतिशास्त्रांमध्ये या आदर्शांचे स्वयंपूर्णत्व केवळ भगवान बुद्धानेच सांगितले. बुद्ध धर्मातील एका संप्रदायात परमेश्वर म्हणजे पारमिताच होय, असा विचार कालांतराने रूढ झाला. पारमिता म्हणजे मानवाचे नैतिक जीवनाचे अंतिम स्वरूप होय. बुद्ध व तीर्थंकर यांनी उपदेशिलेल्या अहिंसा या परमधर्माचा विधायक स्वरूपातला निष्कर्ष म्हणजे पारमिता होत. विशेषतः मैत्री पारमितेला बुद्धाने स्वतःच्या उपदेशात केंद्रस्थानी ठेवलेले आहे. या मैत्री पारमितेचा म्हणजे विश्वव्यापी प्रेमतत्त्वाचा प्रभाव पडून बुद्धाच्या हयातीतच राजा अजातशत्रू, पसेनदिराजा, सिंह सेनापती, वैदिक ब्राम्हणांचे समुदाय, तपस्वी संप्रदाय बुद्धाकडे व बुद्धानुयायांकडे आकर्षिले गेले. बुद्धानंतर दोनशे वर्षांच्या कालावधीत भारतात मौर्य साम्राज्य स्थापित झाले आणि त्यातील श्रेष्ठ मौर्य सम्राट अशोक हा बुद्ध धर्माच्या आदेशाने भारला गेला व त्याने बुद्ध धर्माच्या प्रसाराला वेग आणला व याचे कारण विश्वव्यापी मैत्रीचा संदेश होय.*

*ईश्वर, आत्मा, परलोक, मरणोत्तर गती, पुनर्जन्म, जगाच्या उत्पतिस्थितिलयाचा कार्यकारणभाव इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह भारतात बुद्धाच्या काळी शिगेस पोहोचला होता. परलोक, पुनर्जन्म, ईश्वर, आत्मा इत्यादी गोष्टींवर विश्वास न ठेवणारे भौतिकवादी पंडितही त्या वेळी भारतात होते. अनेक आस्तिक व नास्तिक दर्शने वा तत्त्वज्ञाने उदयास येत होती. या प्रश्नांचा अंतिम नैतिक तत्त्वांशी संबंध जोडण्याचे प्रयत्न चालू होते. बुद्धाने असे सांगितले की ईश्वर, आत्मा, परलोक, मरणोत्तर गती यासंबंधीची तत्त्वे निश्चित होवोत न होवोत; अहिंसा, विश्वव्यापी मैत्री, विश्वव्यापी करुणा आणि सत्य त्याचप्रमाणे सत्याचे ज्ञान अथवा प्रज्ञा हीच मानवाची अंतिम उद्दिष्टे होत. वरील प्रश्न निश्चितपणे निकालात निघण्यासारखे नाहीत; ते अनिर्णीतच राहातात. नैतिक आदर्श हे मात्र मानवी दुःखाचा परिहार करण्याची निश्चित साधने होत; तीच निश्चित साध्ये होत. हा बुद्धाचा नैतिक बुद्धिवाद नित्य अबाधित राहाणारा आहे. आजच्या सुधारलेल्या जगाला तर जवळच ठेवलेल्या विनाशातून वाचविणारा आहे. आत्मविषयक व विश्वविषयक तत्त्वज्ञानांच्या संघर्षातून बुद्धाने नैतिक तत्त्वज्ञान वेगळे काढले, ही बुद्धाची जगाला निखालस श्रेष्ठ देणगी आहे. या संदर्भात बुद्धाचे अनेक संवाद मार्गदर्शक ठरतात. त्या संवादांपैकी बुद्धाचा शिष्य मालुंक्यपुत्र नावाचा भिक्षू आणि स्वतः भगवान यांचा संवाद लक्षात ठेवण्यासारखा आहे. ('बुद्धलीलासारसंग्रह', द्वितीयावृत्ती, पृष्ठे २६८-२६९.)*

*"बुद्धगुरू श्रावस्तीमध्ये अनाथपीडिकाच्या आरामात राहात असता मालुंक्यपुत्र नावाचा भिक्षू त्याजपाशी आला आणि त्याला नमस्कार करून एका बाजूला आसनावर बसला. नंतर मालुंक्यपुत्र*

अनुक्रमणिका

*भगवंताला म्हणाला, 'भदंत, एकांतात बसलो असता माझ्या मनांत असा विचार आला की, हे जग शाश्वत आहे की अशाश्वत आहे? शरीर आणि आत्मा एक आहेत की भिन्न आहेत? मरणोत्तर तथागताला पुनर्जन्म आहे किंवा नाही? इत्यादी मुद्द्यांचे भगवंताने विवरण केले नाही. तेव्हा मी आपणांजवळ येऊन या मुद्दयांसंबंधाने प्रश्न विचारीन. जर आपणांला या मुद्दयांचा निकाल लावता येईल, तरच मी आपला शिष्य होईन. जर आपणांला या गोष्टी माहीत नसतील, तर त्या माहीत नाहीत असे म्हणणे हा सरळ मार्ग होय!'*

*बुद्ध म्हणाला, 'मालुंक्यपुत्र, तू माझा शिष्य होशील तर या मुद्दयांचे स्पष्टीकरण करून सांगेन, असे मी तुला कधी सांगितले होते काय?'*

*'नाही भदंत', मालुंक्यपुत्राने उत्तर दिले.*

*'बरे, तू तरी मला म्हणालास काय, की जर मला तुम्ही या सर्व मुद्दयांचे स्पष्टीकरण करून सांगाल, तरच मी तुमच्या भिक्षुसंघात येईन?'*

*'नाही भदंत', मालुंक्यपुत्र म्हणाला.*

*बुद्ध म्हणाला, 'तर मग आता हे मुद्दे स्पष्ट करून सांगितल्याशिवाय मी तुमचा शिष्य होणार नाही, या म्हणण्यात अर्थ कोणता?'*

*'मालुंक्यपुत्र, एखाद्या मनुष्याच्या अंगामध्ये बाणाचे विषारी शल्य शिरून तो तळमळत असता त्याचे आप्त-इष्ट शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्याला बोलावून आणतील; परंतु तो रोगी त्या वैद्याला म्हणेल की, 'हा बाण कोणी मारला? तो ब्राम्हण होता की क्षत्रिय होता, वैश्य होता की क्षूद्र होता, काळा होता की गोरा होता, त्याचे धनुष्य कोणत्या प्रकारचे होते, धनुष्याची दोरी कशाची होती इत्यादी सर्व गोष्टी जोपर्यंत तुम्ही मला समजावून देणार नाही, तोपर्यंत मी या शस्त्राला हात लावू देणार नाही. मालुंक्यपुत्र, अशा प्रसंगी त्या माणसाला या सर्व गोष्टी न समजताच मरण येईल. त्याचप्रमाणे जो असा हट्ट धरील की, मला हे जग शाश्वत आहे की अशाश्वत आहे इत्यादी सर्व मुद्दे समजल्यावाचून मी ब्रम्हचर्याचा अभ्यास करणार नाही. तर त्याला हे मुद्दे समजल्यावाचून मरण येईल.'*

*'हे मालुंक्यपुत्र, जग शाश्वत आहे किंवा अशाश्वत आहे, अशी दृष्टी असली आणि असा विश्वास असला, तथापि धार्मिक आचरणाला त्यापासून मदत होईल असे नाही. हे जग शाश्वत आहे असा विश्वास ठेविला, तरी जरा, मरण, शोक, परिदेवन यांजपासून मुक्तता होत आहे, असे नाही. त्याप्रमाणे शरीर आणि आत्मा एक आहे, शरीर आणि आत्मा भिन्न आहे, मरणोत्तर तथागताचा पुनर्जन्म होतो, मरणोत्तर तथागताचा पुनर्जन्म होत नाही इत्यादी गोष्टींवर विश्वास ठेविला काय किंवा न ठेविला काय, जाती (जन्म), जरा, मरण, शोक, परिदेवन (चिंता) आहेतच आहेत! म्हणून हे मालुंक्यपुत्र, जग शाश्वत आहे, इत्यादी गोष्टींचे विवरण करण्याच्या भरीला मी पडलो नाही. का की, या गोष्टींच्या वादविवादाने ब्रह्मचर्याला कोणत्याही प्रकारे स्थैर्य येण्याचा संभव नाही. अशा वादाने वैराग्य उत्पन्न होणार नाही, पापाचा निरोध व्हावयाचा नाही, शांती, प्रज्ञा, संबोध आणि निर्वाण यांचा लाभ व्हावयाचा नाही.*

*'पण मालुंक्यपुत्र, हे दुःख आहे, हा दुःखाचा समुदय आहे, हा दुःखाचा निरोध आहे, आणि हा दुःखनिरोधाचा मार्ग आहे, हे मी स्पष्ट करून दाखविले आहे, का की, ही चार आर्यसत्ये ब्रह्मचर्याला स्थैर्य आणणारी आहेत. यांजमुळे वैराग्य येते, पापाचा निरोध होतो, शांतीचा, प्रज्ञेचा, संबोधाचा आणि निर्वाणाचा*

अनुक्रमणिका

*लाभ होतो, म्हणून हे मालुंक्यपुत्र ज्या गोष्टींची मी चर्चा केली नाही त्या गोष्टींची चर्चा करू नका, व ज्या गोष्टींचे मी स्पष्टीकरण केले आहे त्या गोष्टी स्पष्टीकरणाला योग्य आहेत असे समजा.'*

*बुद्धगुरू असे बोलल्यावर मालुंक्यपुत्राने त्याच्या भाषणाचे अभिनंदन केले."*
*धर्मानंद कोसंबी यांनी बहुतेक सर्वच लेखन मोकळ्या सरळ अस्सल मराठीत केले आहे. परंतु ह्या संदर्भात असे सांगावेसे वाटते, की अलीकडे गेल्या २०-२५ वर्षांत मराठी शैलीतील साधी अर्थवाहकता कमी होत चालली आहे. विशेषतः ललित साहित्यातील शैली नटवी, पसरट व गुंतागुंतीची बनत आहे. कवितांमध्ये याचा प्रत्यय अधिक येतो. प्रसन्नंता, अर्थवाहकता हा दोष ठरेल की काय अशी भीती वाटत आहे. गूढ वा अव्यक्त अर्थ असलेली शैली साहित्य पदवीला भूषवू लागली आहे. याचे एक कारण असे की, विचार आणि प्रत्ययशीलता अर्थाला सरळ पोचेनाशी झाली आहेत. धर्मानंदांची लेखनशैली या अवनतीपासून वाचवील, अशी आशा वाटते.*

वाई, दिनांक २ फेब्रुवारी १९७७ **लक्ष्मणशास्त्री जोशी**

अनुक्रमणिका

# बुद्धलीलासारसंग्रह

## भाग पहिला : बोधिसत्वाच्या कथा

[१]

### सुमेधकथा

लाखों वर्षांपूर्वी या जम्बुद्वीपामध्यें अमर नांवाच्या संपन्न नगरात सुमेध नांवाचा एक कोट्यधीश ब्राम्हण राहत असे. तो जरी थोर कुलामध्यें जन्मला होता, तरी आयत्या पिठावर रेघा ओढणाऱ्या आळशी मनुष्याप्रमाणें त्यानें आपलें तारुण्य व्यर्थ न घालवितां वेद आणि शास्त्रें यांमध्यें पारंगतता संपादिली होती. सुमेध ब्राम्हणाला कोणत्याही प्रकारें प्रपंचामध्यें कमतरता नव्हती. वडिलोपार्जित धनदौलतीचा तो उपभोग घेत होता; आणि विद्वत्तेसंबंधानें सर्व लोकांत त्याची ख्याति झाली होती. तथापि जन्म, जरा, व्याधि इत्यादि नैसर्गिक दुःखांच्या चिंतनानें संसारामध्यें त्याचें चित्त रमेनासें झालें. "माझ्या संपत्तीपैकी माझ्याबरोबर येणारें काय आहे? माझी कीर्ति माझ्याबरोबर येईल काय?" इत्यादि विचारांनीं सुमेधाच्या मनामध्यें काहूर माजवून दिलें. तेव्हां तो आपणाशींच उद्गरला "या अत्यंत दुःखकारक प्रपंचापासून मुक्त अशी एक सुखकारक अवस्था असलीच पाहिजे, कीं, ज्या स्थितीप्रत गेला असतां प्राणी जन्म, जरा आणि मरण यांपासून मुक्त होईल."

याप्रमाणें विचार करून सुमेधानें मुक्तीचा मार्ग शोधण्याचा निश्चय केला.

त्या काळच्या वहिवाटीप्रमाणें सुमेधानें आपली सर्व मालमत्ता याचकांनां वांटून दिली, व तो हिमालयपर्वतावर निघून गेला. तेथें धम्मक नांवाच्या एका टेंकडीवर त्यानें आपली पर्णशाला बांधून त्या पर्णशालेजवळ एक सुदर चक्रम [चंक्रम ह्मणजे चालण्याची जागा. बौद्धभिक्षु विहारामध्यें एकाप्रतेनें इकडून तिकडे फिरण्यासाठी जी जागा तयार करितात, तिला चंक्रम असें ह्मणतात. जमीन खालींवर असणें, मधुनमधून झाडी असणें, आसपास जंगल असणें, आकुंचितता, आणि अत्यंत विशालता हे चंक्रमाचे पांच दोष होत. सुमेध तापसाच्या चंक्रमांत हे दोष नव्हते; ह्मणून त्याला सुंदर चंक्रम असें ह्मटलें आहे.] केला. या ठिकाणीं कांहीं काळ घालविल्यावर सुमेधतापसाचें वैराग्य इतके तीव्र झालें, कीं, त्याला या पर्णकुटिकेचा देखील कंटाळा आला. तो त्या पर्णकुटिकेचा त्याग करून एका झाडाखालीं राहूं लागला, व कंद—मूल—फलादिकांच्या आहारावर उपजीविका करून त्यानें खडतर तपश्चर्या आरंभिली. वैराग्याच्या आणि अभ्यासाच्या जोरावर सुमेधपंडितानें योगाच्या सर्व पायऱ्या आक्रमण केल्या. तो समाधिसुखामध्यें निमग्न होऊन गेला.

त्या समयीं जम्बुद्वीपामध्यें दीपंकर नांवाचा बुद्ध उत्पन्न झाला. तो जिकडेतिकडे आपल्या धर्माचा प्रसार करूं लागला. ध्यानसुखामध्यें गढून गेल्यामुळें सुमेधाला हिमालयपर्वतावर दीपंकरबुद्धाच्या धर्माची वार्तादेखील ऐकूं आली नाहीं. एके दिवशीं योगबलानें आकाशांतून संचार करीत असतां हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या रम्मनगरामधील लोक अत्यंत उत्सुकतेनें जिकडेतिकडे रस्ते साफ करीत असलेले, आणि ध्वजपताकादिकांनीं सर्व नगर सुशोभित करीत असलेले त्यानें पाहिले. तेव्हां त्याला मोठें कौतुक वाटून तो आकाशांतून खालीं उतरला, आणि एवढी तयारी कशासाठीं चालली आहे याची त्यानें चौकशी केली. त्या लोकांपैकीं एकजण ह्मणाला "वः! तापसमहाराज, तुम्ही या प्रदेशांत रहात असून दीपंकरबुद्धांची तुह्माला माहिती नसावी, हें मोठें विचित्र होय! दीपंकरबुद्ध आपल्या भिक्षुवर्गासह आमच्या शहराच्या नजीक येऊन ठेपले आहेत, व आज दुपारीं भिक्षाग्रहण करण्यासाठीं ते या शहरांत येणार आहेत. त्यांचा बहुमान करण्यासाठीं ही सर्व तयारी चालली आहे."

अनुक्रमणिका

हें ऐकून सुमेध ह्मणांला “या जगतामध्यें बुद्ध हा शब्द देखील ऐकूं येणें कठिण आहे! मग प्रत्यक्ष बुद्धाचें दर्शन होणें किती कठिण आहे, हें सांगावयालाच नको! जन हो, तुह्मी हा जो रस्ता साफ करीत आहां, त्यापैकीं कांहीं भाग माझ्या स्वाधीन करा. मीहि बुद्धाच्या सेवेचा वांटेकरी होऊं इच्छितों.”

तेव्हां त्या लोकांनीं साफ करण्यासाठीं कांहीं जागा सुमेधाला नेमून दिली.

सुमेधाला नेमून दिलेली सर्व जागा परिशुद्ध झाली होती. परंतु रस्त्यावर एका लहानशा डबक्यामध्यें चिखल सांचला होता. तें डबकें भरून काढण्यांत सुमेधतापस गुंतला असतांच भगवान् दीपंकरबुद्ध त्या ठिकाणीं आपल्या भिक्षुसंघासहवर्तमान उपवनांतून येते झाले. आतां तें डबकें भरून काढण्यास मुळींच अवकाश राहिला नाहीं. तेव्हां सुमेध बुद्धांच्या पायाला चिखल लागूं नये या उद्देशानें त्या डबक्यावर पालथा पडला. इतक्यांत दीपंकर भगवान् त्याच्या डोक्याजवळ येऊन उभे राहिले, आणि आपल्या भिक्षुसंघाकडे वळून ह्मणाले “भिक्षु हो! येथें पालथा पडलेल्या या तापसाला तुह्मी पाहत आहां काय? लाखों वर्षांनंतर कपिलवस्तुनगरींत शुद्धोदनराजाच्या मायादेवी नांवाच्या राणीच्या उदरीं जन्म घेऊन मोठ्या प्रयत्नानें बुद्धत्व संपादून हा लक्षावधि लोकांचा उद्धार करणार आहे. मोग्गलान व सारिपुत्त हे दोघे त्याचे अग्रशिष्य होतील, आणि त्याच्या भिक्षुणीसंघांत खेमा व उप्पलवण्णा या दोन भिक्षुणी मुख्य होतील.”

हें बुद्धवाक्य ऐकून तेथें जमलेल्या मनुष्यांनां आणि देवतांनां अत्यंत आनंद झाला.

दीपंकरबुद्ध कांहीं अंतरावर गेल्यावर सुमेधतापस उठून मांडीवर मांडी घालून बसला, व आपणाशींच ह्मणाला “भगवान् बुद्धांनीं भविष्यत्कालीं मी बुद्ध होणार, असे भविष्य कथन केलें आहें. तथापि बुद्धत्व हें सामान्य मनुष्याला साध्य होण्यासारखें नाही. अनेक जन्मांमध्ये लोकहितासाठीं परमावधीचा प्रयत्न केला, तरच बुद्धत्व प्राप्त होईल. परंतु आत्मपरहित साधणारे परमोत्कृष्ट असे कोणते गुण असावे बरें?” सूक्ष्म विचाराअंतीं सुमेधपंडिताला सर्वलोकहितकारक असे खालीं दिलेले दहा [या दहा गुणांला पालिग्रंथामध्यें ‘पारमिता’ असें ह्मणतात.] गुण आढळले.

| | |
|---|---|
| १ दान | ६ क्षांती |
| २ शील | ७ सत्य |
| ३ नैष्कर्म्य | ८ अधिष्ठान |
| ४ प्रज्ञा | ९ मैत्री |
| ५ वीर्य | १० उपेक्षा |

सुमेध ह्मणाला “मला जर बुद्धत्व प्राप्त व्हावयाचें आहे, तर मीं या दहा पारमितांचा अभ्यास केला पाहिजे. पण तो एका जन्मांत साध्य होईल काय? नाहीं, अनेक जन्मांच्या अभ्यासानेंच या दहा पारमिता मला साध्य होतील. परंतु इतर लाभापेक्षां बुद्धत्वच मला प्रिय असल्यामुळें यापुढें मी प्रतिजन्मी पारमितांचाच अभ्यास करीन!”

सुमेधतापसानें ज्या वेळीं बुद्धत्व संपादण्याचा दृढ निश्चय केला, त्या वेळेपासून त्याला बोधिसत्व (भावि बुद्ध) ही संज्ञा प्राप्त झाली. बोधित्सवाच्या अनेक जन्मांतील सत्कृत्यांच्या गोष्टी जातक ग्रंथामध्यें

अनुक्रमणिका

वर्णिल्या आहेत. त्या सर्वांचा येथें उल्लेख देखील करणें शक्य नाहीं. तथापि बोधिसत्वानें दानादि पारमितांचा अभ्यास कसा केला, याचें दिग्दर्शन करण्यासाठीं त्यांपैकीं कांहीं गोष्टी येथें देतों.

[२]
## वेस्संतर जातक

सुमेधपंडित ध्यानधारणादिकांत काल घालवून इहलोकींचें कर्तव्य संपल्यावर त्यानें देहविसर्जन केलें. तदनंतर निरनिराळ्या योनींमध्यें अनेक जन्म घेऊन एकदां तो शिबिराजवंशांत जन्मला.

शिबिदेशाच्या राजधानींत संजय नांवाचा राजा राज्य करीत होता. तो प्रजापालनांत इतका दक्ष होता, कीं, सर्व लोक त्याला आपल्या पित्याप्रमाणें मान देत असत. त्याला एक सर्वगुणसंपन्न पुत्र झाला. त्याचें नांव वेस्संतर असें ठेवण्यांत आलें. हाच आमचा बोधिसत्व होता. वेस्संतरानें अल्पवयांतच सर्व विद्यांचें आणि कलांचें ज्ञान संपादून आपल्या पित्याची आणि राष्ट्राची मर्जी संपादन केली. तेव्हां संजय राजानें आपल्या अमात्यांच्या सल्ल्यानें त्याला युवराजपदावर स्थापिलें. वेस्संतर आपल्या संपत्तीचा दानधर्मामध्यें उपयोग करूं लागला. दानधर्म हेंच त्याचें व्यसन होऊन बसलें. अल्पावकाशांतच त्याच्या दानशौर्याची वार्ता चोहींकडे पसरली.

त्या काळीं कलिंगदेशामध्ये भयंकर दुष्काळ पडला. पिण्याचें पाणी देखील मिळण्याची मारामार झाली. जिकडेतिकडे चोऱ्यांचा आणि रोगांचा सुळसुळाट झाला. तेव्हां तेथील राजानें दुष्काळनिवारणाचा उपाय काय, याचा विचार चालविला. त्याला त्याच्या अमात्यांनीं अशी सल्ला दिली, कीं, शिबीच्या राज्यांत जो श्वेतवर्ण हत्ती आहे, त्याला या राष्ट्रामध्यें आणिलें असतां पाऊस पडून सर्वत्र सुभिक्ष होईल. त्याप्रमाणें राजानें आपल्या पदरच्या कांहीं ब्राम्हणांनां शिबि देशांत जाऊन संधि साधून वेस्संतरापाशीं त्या हत्तीची याचना करावी अशी विनंति केली. राजाज्ञेप्रमाणें ते ब्राम्हण शिबीच्या राजधानीप्रत येऊन वेस्संतरानें देशोदेशींच्या याचकवर्गासाठीं बांधिलेल्या धर्मशाळेमध्यें उतरले.

एके दिवशीं वेस्संतर त्या श्वेत हस्तीवर बसून नगरप्रदक्षिणा करीत होता. त्या समयीं त्या ब्राम्हणांनीं आपलें अंग धुळीनें माखून व आपला उजवा हात पुढें करून ‘वेस्संतराचा जयजयकार असो!’ असें ह्मटलें. वेस्संतरानें माहुताला हत्ती उभा करण्यास हुकूम केला व ब्राम्हणांना काय पाहिजे आहे असा प्रश्न केला.

ब्राह्मण म्हणाले “आह्मांला दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची गरज नाहीं. हा एवढा हत्ती द्या ह्मणजे झालें.”

वेस्संतर ताबडतोब हत्तीवरून खालीं उतरला व सर्व अलंकारासहवर्तमान त्या हत्तीला ब्राम्हणांच्या हवालीं करून तेथल्या तेथें त्यानें त्यांच्या हातावर पाणी सोडिलें.

वाळलेल्या अरण्यांत वायुवेगानें पसरणाऱ्या तीव्र दावानलाप्रमाणें ही वार्ता शिबीच्या राजधानींत पसरली. शिबीच्या सरदारांपासून तहत शेतकऱ्यांपर्यंत सर्व मनुष्यांनां अत्यंत दुःख झालें. इतकेंच नव्हे, तर राजकुमाराचा त्यांनां अतिशय संताप आला. त्याच वेळीं लोकांचा समुदाय राजांगणामध्यें जमला, व त्यांच्या पुढाऱ्यांनीं संजयराजाच्या कानावर युवराजाचा अपराध घातला. तो संतप्त जनसमुदाय पाहून राजा घाबरून

अनुक्रमणिका

गेला. तथापि आपण गलितधैर्य झाल्याचें न दर्शवितां जमसमूहाकडे वळून तो ह्मणाला “तुह्मीं किती सांगितलें, तरी मी माझ्या प्रिय पुत्राचा वध करण्यास तयार नाहीं.”

तेव्हां ते ह्मणाले “आह्मी वेस्संतराचा वध करण्याची विनंति करण्यासाठीं येथें जमलों नाहीं; परंतु ज्याअर्थी त्यानें आमच्या राष्ट्राचें शुभचिन्ह — श्वेतवर्ण हस्ती कोणाच्याहि सल्ल्यावांचून आपल्याच मतानें दान देऊन टाकला, त्याअर्थी त्याला आजच्या आज राजधानींतून घालवून दिलें पाहिजे. त्यानें आमच्या देशांतून जाऊन वंक नांवाच्या पर्वतावर तपश्चर्या करावी.”

संजयराजानें पुत्राला वनांतरीं पाठविण्याचें आश्वासन देऊन लोकसमूहाला आपापल्या घरीं जाण्यास हुकूम केला, व आपल्या मुख्य हुजऱ्याला बोलावून तो ह्मणाला “तूं आतांच्या आतां वेस्संतराकडे जा, व शिबीची इच्छा काय आहे हें त्याला कळव.”

क्षत्ता (मुख्य हुजऱ्या) वेस्संतराच्या महालामध्यें गेला व ह्मणाला “वेस्संतरमहाराज, तुमच्या मोठ्या अपराधानें सर्व शिबि संक्षुब्ध होऊन तुह्मी या क्षणाला राजधानींतून निघून जावें, असें ह्मणत आहेत, आणि संजयराजाला त्यांचें ह्मणणें कबूल करावें लागत आहे.”

हें बोलत असतां क्षत्त्याचा कंठ दाटून येऊन त्याच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. वेस्संतर शांत चित्तानें क्षत्त्याला ह्मणाला “असा माझा कोणता अपराध आहे बरें, कीं, ज्याच्यायोगानें शिबि माझ्यावर इतके रागावले आहेत?”

क्षत्ता ह्मणाला “आजपर्यंत तुह्मीं जो दानधर्म केलात, त्यामुळें प्रजेची तुमच्यावर इतराजी न होता भक्ति वाढत गेली; परंतु जेव्हां तुह्मीं श्वेतगजाला याचकांनां देऊन टाकलें, तेव्हां त्यांच्या मनांतील तुमच्याविषयींची पूज्यबुद्धि चंडकोपानें ग्रासून टाकिली. तेव्हां आतां आपण तापसवेष स्वीकारून या राज्यांतून निघून जावें हें बरें.”

हें ऐकून वेस्संतरानें तपोवनांत जाण्याची सिद्धता केली.

एकदोन दिवसांत वेस्संतरानें आपली संपत्ति गरिबांनां वांटून दिली, आणि वंकपर्वतावर जाण्यासाठीं आपल्या मातापितरांची आज्ञा घेऊन तो आपल्या प्रियपत्नीच्या महालांत गेला. मद्दीला आपला पति वनांतरीं जाणार हें वर्तमान आगाऊच समजलें होतें, व त्यामुळें ती अत्यंत खिन्न झाली होती. वेस्संतराला पाहिल्याबरोबर तिचा शोक तिला आवरेनासा झाला. वेस्संतर ह्मणाला “मद्दी, शिबीचा निश्चय तुला समजला आहे काय?”

“होय महाराज!” असें शोकाकुल स्वरानें मद्दीनें उत्तर दिल्यावर तो ह्मणाला “प्रिये, तूं शोक करूं नकोस. तुझ्या वडिलांकडून मिळालेली संपत्ति व मजकडून तुला देण्यांत आलेली संपत्ति या सर्व संपत्तीचा तूं दानधर्मांत विनियोग कर. जालिकुमार व कण्हाजिनाकुमारी यांचें तूं उत्तम रीतीनें परिपालन करिशील, याबद्दल मला शंका नाहीं. या आमच्या आवडत्या मुलांवर लक्ष्य देऊन तूं माझ्या विरहानें होणारा शोक विसरून जा.”

अनुक्रमणिका

मद्दी ह्मणाली "महाराज, हा कांहीं पत्नीचा धर्म नव्हे. जेथें पति तेथेंच पत्नीनें रहावें, असें धर्म सांगतो. तेव्हां ज्या मार्गानें आपण जाल, त्याच मार्गानें मीहि जाईन. आपल्यासहवर्तमान रहात असतां मला मृत्यु आला तर मला मोठा आनंद होईल; परंतु आपला विरह होऊन जगणें मला मृत्यूहूनहि दुःखद होईल! मला वनवासानें त्रास होईल अशी आपण शंकादेखील मनामध्यें आणूं नका. जालिकुमार व कण्हाजिनाकुमारी तपोवनामध्यें आमच्या चित्ताचें रंजन करतील, आणि आमच्या सहवासामुळें अरण्यवासाचा आपल्याला कंटाळा न येतां आपले दिवस सुखांत जातील, व आपली तपश्चर्या सफल होईल!"

मद्दीच्या आग्रहावरून वेस्संतरानें तिला व आपल्या दोन्ही मुलांनां बरोबर घेतलें. संजय राजानें आपल्या मुलाला, सुनेला व नातवांनां तपोवनांत पोहोंचविण्यासाठीं रथ दिला; परंतु रस्त्यामध्यें वेस्संतराला याचकांनीं गांठून तोहि त्याच्यापासून घेतला. तेव्हां वेस्संतराने जालीला कडेवर घेतलें आणि मद्दीनें कण्णाजिनेला कडेवर घेतलें, व उभयतांनीं पायांनींच पुढील मार्ग आक्रमण केला. वंकपर्वतावर पोहोंचल्यावर वेस्संतरानें आपणासाठीं एका रम्य स्थलीं सुंदर पर्णकुटी बांधली, आणि त्या ठिकाणीं तो आपल्या कुटुंबासहवर्तमान राहूं लागला.

त्या काळीं कलिंगदेशामध्यें जूजक नांवाच्या ब्राम्हणानें भिक्षुकी वृत्तीवर शंभर कार्षापण मिळवून ते एका ओळखीच्या ब्राह्मणाच्या हवालीं केले व तो देशांतराला गेला. पुढें पुष्कळ वर्षेपर्यंत त्याचा पत्ता नव्हता. तेव्हां ज्याच्याजवळ त्याची ठेव होती, त्या गृहस्थानें ती सर्व आपत्कालांत खर्चून टाकिली. इतक्यांत जूजक येऊन आपली ठेव मागूं लागला; परंतु ठेव देण्याचें सामर्थ्य त्या गृहस्थाच्या अंगीं नसल्यामुळें तिच्याऐवजीं त्याची एक तरुण मुलगी जूजकाला देण्याचें ठरलें. त्याप्रमाणें जूजकाचें त्या मुलीबरोबर लग्न झाल्यावर तो तिला घेऊन गांवीं गेला. जूजक जरी ह्मातारा होता, तरी त्याच्या तरुण पत्नीला तो प्रिय होता. ती त्याची मोठ्या आदरानें सेवा करीत असे. तें पाहून गांवांतील सर्व लोक आपल्या बायकांनां ह्मणत असत कीं, "पहा, जूजक इतका ह्मातारा आणि कुरूप असून देखील त्याची बायको त्याच्या सेवेंत तत्पर असते. ती कधीं त्याजवर रागावत नाहीं. नाहीं तर तुह्मी! एवढें तेवढें कांहीं कमी पडलें, कीं, आपल्या नवऱ्यांवर संतापतां. नवऱ्यांशीं भांडल्यावांचून तुमचा एक तरी दिवस जातो काय? त्या जूजकाच्या तरुण बायकोची तुह्मांला लाजच वाटावयाला पाहिजे!"

गांवांतील बायकांनां जूजकाची बायको अमित्रतापना आपली शत्रु आहे असें वाटावयाला लागलें, तर त्यांत नवल कसलें? त्यांनीं अमित्रतापनेला तेथून हांकून देण्याचा कट उभारला. जेव्हां अमित्रतापना पाण्यासाठी नदीवर येत असे, तेव्हां ज्या त्या बाईनें तिला ह्मणावें "कायग बाई! इचीं आईबापें मोठीं क्रूर असलीं पाहिजेत. नाहींतर त्यानीं हिला जूजकासारख्या ह्मातार्‍याला कशाला विकलें असतें?"

बिचाऱ्या अमित्रतापनेनें आपल्या आईबापांची निंदा किती तरी सहन करावी? एके दिवशी नदीवरून रडतरडत ती घरीं आली, आणि जूजकाला ह्मणाली "मला जर तुह्मी एक दास आणि एक दासी आणून द्याल, तरच मी तुमच्या घरीं राहीन; नाहींतर मी आपल्या माहेरीं निघून जाईन."

गरीब बिचारा जूजक आपल्या तरुण पत्नीच्या दरडावणीनें फार घाबरला. तो ह्मणाला "मी गरीब ब्राह्मण; शास्त्रादिकांचेंहि ज्ञान मला नाहीं; तेव्हां तुझ्यासाठीं दास आणि दासी विकत आणणें मला कसें शक्य

आहे? पण तूं कांहीं काळजी करूं नकोस. उद्यांपासून मीच नदीवर पाणी आणण्यासाठीं जाईन. ह्मणजे तुझ्या वडिलांची निंदा ऐकण्याचा प्रसंग तुला येणार नाहीं."

अमित्रतापना ह्मणाली "तुह्माला नदीवर पाठवून मी घरीं बसलें, तर आह्मां दोघांनां गांवांतील सर्व लोक हंसतील, व जे आजवर माझी पतिव्रता ह्मणून स्तुति करीत आले, तेच मी पतीला कामाला लावतें व स्वतः स्वस्थ बसतें, अशी माझी निंदा करतील! आतां आपण गरीब आहों, हें मला कबूल आहे; तथापि निराश होण्याचें कांहीं कारण नाहीं. वेस्संतरराजाची ख्याति तुह्मीं ऐकलीच असेल. सध्यां तो आपल्या दोन मुलांसहवर्तमान वंकपर्वतावर पर्णकुटीमध्यें रहात आहे. तेथें जाऊन तुह्मी त्याच्याजवळ याचना केली असतां तो आपलीं दोन्ही मुलें तुह्माला देईल. त्यांनां तुह्मी दास आणि दासी करून माझ्या हवालीं करा, ह्मणजे झालें."

जूजकानें पुष्कळ आढेवेढे घेतले; परंतु तरुण पत्नीच्या हुकुमापुढें बिचाऱ्या वृद्ध जूजकाला आपली मान वांकवावी लागली. पाठीला शिदोरी बांधून व हातांत दंडकाष्ठ घेऊन जूजकानें वंकपर्वताचा रस्ता धरला. पर्वताच्या सन्निध आल्यावर अरण्यामध्यें त्याला एक व्याध भेटला. त्याच्याशीं त्यानें वेस्संतराच्या आश्रमाची चौकशी केली. तेव्हां तो व्याध चवताळून जूजकाला ह्मणाला "तुझ्यासारख्या दुष्ट ब्राम्हणांनीं वेस्संतराला राज्यभ्रष्ट करून तपोवनाला पाठविलें. आतां पुनः त्याच्याशीं कशाची याचना करणार आहेस?"

जूजक चपापला, व ह्मणाला "मला कशाचीही याचना करावयाची नाहीं. संजयराजानें आपल्या मुलाच्या समाचारासाठी मला पाठविलें आहे. वेस्संतराचा कुशलसमाचार विचारून तो त्याच्या बापाला कळविणें एवढेंच माझें काम आहे."

तेव्हां तो व्याध संतुष्ट झाला व जूजकाचें आदरातिथ्य करून वेस्संतराच्या आश्रमाकडे जाणारा जवळचा रस्ता त्यानें त्याला दाखविला.

मद्दीदेवी आपल्या पतीला फलमूलादिक आणण्यासाठी जाऊं देत नसे. सकाळच्या प्रहरीं आपण स्वतः जाऊन ती फलमूलादिक आहाराच्या वस्तु आणीत असे. वेस्संतर आश्रमांतच राहून आपल्या मुलांचा संभाळ करी. मद्दीदेवी अरण्यांत गेली असतां जूजक वेस्संतराच्या आश्रमांत आला. वेस्संतरानें त्याचें योग्य आदरातिथ्य केलें, व इतक्या दूर येण्याचें कारण विचारलें.

जूजक ह्मणाला "महाराज! आपल्या शुभ्र कीर्तीनें मला येथवर आणिलें आहे. मी वृद्ध ब्राम्हण. माझ्या तरुण पत्नीच्या मदतीला कुटुंबांत दुसरें माणूस नाहीं. तेव्हां तिचा आग्रह पडला, कीं, एक दास व एक दासी आणा. पण मी पडलों गरीब ब्राह्मण. दास आणि दासी विकत घेण्याला पैसे आणावे कोठून? तेव्हां आपल्यापाशीं धांव घेतली. आपण जर आपला हा मुलगा व मुलगी मला द्याल, तर माझें ह्मातारपण सुखांत जाईल. आपण मोठे दानशूर आहां, तेव्हां माझ्यावर एवढा उपकार करण्यास डगमगणार नाहीं, अशी खात्री आहे."

वेस्संतर ह्मणाला "माझीं हीं दोन्ही मुलें आतांच्या आतांच मी तुह्माला देतों; परंतु त्यांची आई येईपर्यंत तुह्मीं येथें थांबावें, अशी माझी विनंति आहे."

अनुक्रमणिका

जूजक ह्मणाला “ ‘स्त्रीबुद्धिः प्रलयं गतः!’ बायका ह्मटल्या ह्मणजे दानधर्माला विघ्न करणाऱ्या पहिल्या प्रतीच्या. तेव्हां आपल्या पत्नीची वाट न पाहतां या क्षणींच या मुलांनां मला येथून घेऊन जाऊं द्या.”

वेस्संतर ह्मणाला “जशी आपली मर्जी. तथापि आणखी एक विनंति केल्यांवाचून माझ्यानें राहवत नाहीं. आपण या मुलांनां घेऊन माझ्या वडिलांजवळ जा. ते तुह्मांला अनेक दासदासी व पुष्कळ संपत्ति देऊन या मुलांनां तुह्मांपासून विकत घेतील. यांत तुमचा मोठा फायदा होईल.”

जूजक ह्मणाला “आपण मला सिंहाच्या तोंडांत माझें डोकें घालण्यास सांगत आहां! या मुलांनां घेऊन मी जर आपल्या वडिलांच्या राज्यांत गेलों, तर मला उत्तम बक्षीस ह्मटलें ह्मणजे कारागृहवास किंवा देहांतशासन हेंच मिळेल! तेव्हां मला आपल्या पित्याच्या राज्यांत जाण्याचा आग्रह करूं नका. या मुलांनां माझ्या गृहिणीच्या स्वाधीन, करून मला एकदांचा तिच्या तोंडांतून मोकळा होऊं द्या!”

यावर वेस्संतर कांहीं बोलला नाहीं. मुलांनां घेऊन जाण्यास ब्राह्मण अत्यंत उत्सुक झाला होता. परंतु जालि व कण्हाजिना यांनीं आपल्या पित्याबरोबर चाललेला ब्राह्मणाचा संवाद ऐकून आश्रमाजवळील जंगलांत दडी दिली. तेव्हां जूजक वेस्संतराला ह्मणाला “आपलीं मुलें कोठें आहेत? मी नेईन या भयानें लपविलींत कीं काय?”

जूजकाला उत्तर न देतां वेस्संतर आश्रमाबाहेर आला, आणि मोठ्या गंभीर स्वरानें ह्मणाला “मुलांनों! तुमच्या पित्याचें वचन सत्य करणें सर्वस्वीं तुमच्या हातांत आहे. अशीं लपून बसूं नका. तुमचें हें कृत्य आमच्या थोर क्षत्रिय कुलाला शोभण्यासारखें नाहीं!”

तेव्हां तीं दोन्ही मुलें जंगलांतून बाहेर आलीं, व आपल्या पित्यासमोर उभीं राहिलीं. वेस्संतरानें त्यांनां ब्राह्मणाच्या हवालीं करून त्याच्या हातावर पाणी सोडलें. त्याच्या कमंडलूंतील पाणी ब्राह्मणाच्या हातावर मोठ्या कष्टानें पडलें; पण तें डोळ्यांतून आपोआप वहात होतें!

मुलें पुनः पळून जातील, या भीतीनें जूजकानें एका वल्लीनें त्यांचे हात बांधले, व आपल्या दंडकाष्टानें तो त्यांनां बडवीत नेऊं लागला. तेव्हां कण्हाजिना आपल्या बापाला ह्मणाली “बाबा, बाबा, ब्राह्मण मोठे क्षमाशील असतात असें आह्मी ऐकतों; पण हा मोठा क्रूर आहे! हा ब्राह्मणवेषधारी राक्षस असावा! बाबा, हा आह्मांला खाण्यासाठीं नेत आहे, तेव्हां तुह्मी आह्मांला याला देऊं नका!”

जालिकुमार ह्मणाला “हा ब्राह्मण दंडकाष्टानें मारतो, याजबद्दल मला खेद वाटत नाहीं; परंतु आईला पाहिल्यावांचून जावें लागत आहे, याजबद्दल मला अत्यंत दुःख होतें.”

वेस्संतर आपल्या मुलांचें भाषण ऐकत होता, तथापि त्यांनां कांहीं एक उत्तर न देतां काष्ठवत् तटस्थ राहिला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या, हेंच काय तें त्याच्या जीवंतपणाचें चिन्ह होतें.

जूजक मुलांनां घेऊन गेल्यावर सायंकाळीं मद्दीदेवी फलमूलें घेऊन आश्रमाकडे वळली. त्या दिवशीं वाघानें रस्ता अडविल्यामुळें तिला उशीर झाला. आश्रमांत मुलें नाहींत हें पाहून, मुलें कोठें गेलीं, असा तिनें पतीला प्रश्न केला. वेस्संतरानें आपलें मौनव्रत सोडलें नाहीं, तेव्हां तिनें आक्रोश करीतकरीत आसपासच्या

अरण्यांत पुष्कळ शोध केला; पण व्यर्थ! वेस्संतरानें आणि मद्दीनें ती रात्र शोकांत घालविली. वेस्संतराचा शोक आंतल्याआंत चालला होता; परंतु मद्दीच्या विलापानें अरण्यवासी पशुपक्ष्यांचें देखील हृदय कंप पावलें!

दुसऱ्या दिवशीं सकाळी वेस्संतर मद्दीला ह्मणाला “मद्दी, तूं मुलांबद्दल शोक करूं नकोस. तुझीं मुलें खुशाल आहेत. काल येथें एक याचक ब्राह्मण आला, व त्यानें त्यांची याचना केली; तेव्हां मी त्या ब्राह्मणाला त्यांचें दान केलें. तूं माझ्या या कृत्याला अनुमोदन दे. व पुण्याची वांटेकरीण हो!”

मद्दी ह्मणाली “आपण मुलांचें दान केलें, याबद्दल मला बिलकूल वाईट वाटत नाहीं. आपण जें केलें, त्याला माझी पूर्ण अनुमति आहे; परंतु ही गोष्ट आपण मला कालच कां सांगितली नाहीं?”

वेस्संतर ह्मणाला “मद्दी, ही गोष्ट जर मीं तुला काल सांगितली असती, तर मुलांचें दान केल्याबद्दल तुला अत्यंत वाईट वाटलें असतें, व तूं पुण्यभागिनी झाली नसतीस.”

यावर मद्दीदेवी कांहीं बोलली नाहीं.

वेस्संतरबोद्धिसत्वाचें हें दानशौर्य पाहून इंद्राला मोठी भीति वाटली, कीं, एकाद्या वेळेस हा आपल्या पतिव्रता पत्नीचें देखील दान करील. तेव्हां तापसवेष घेऊन इंद्र वेस्संतराच्या आश्रमांत आला व वेस्संतराला ह्मणाला “आपणाजवळ आतां कांहीं राहिलें नाहीं; तथापि ही एवढी गुणवती स्त्री आहे. तिचें मला दान कराल, तर मी मोठा आभारी होईन!”

वेस्संतरानें तत्क्षणींच तापसवेषधारी इंद्राच्या हातावर पाणी सोडलें! इंद्रानें तापसवेष टाकून आपलें स्वरूप प्रकट केलें व तो वेस्संतराला ह्मणाला “महाराज, आतां ही वस्तु-मद्दीदेवी-माझी झाली. परंतु ठेव या नात्यानें मी ती तुमच्याजवळ ठेवीत आहें. तिचें तुम्ही पूर्ववत् परिपालन करावें. मात्र ही वस्तु दुसऱ्याला देण्याचा अधिकार तुह्माला राहिला नाहीं.”

याप्रमाणें भाषण करून आणि वेस्संतराला वर देऊन इंद्र स्वर्गलोकीं निघून गेला.

जूजकब्राह्मण वेस्संतराच्या मुलाला घेऊन जात असतां वाट चुकून शिबीच्या राज्यांत शिरला. तेव्हां एका राजपुरुषानें वेस्संतराच्या मुलांनां ओळखिलें, व त्या ब्राह्मणाला पकडून मुलांसह त्याला संजयराजासमोर नेऊन उभें केलें. संजयराजानें, हीं मुलें तुह्मांला कशीं मिळालीं, असा प्रश्न केला असतां जूजकानें घडलेला सर्व वृत्तांत निवेदित केला. संजयराजानें त्याजवर न रागावतां पुष्कळ नोकरचाकर आणि धन देऊन त्याची बोळवण केली. आपल्या मुलाला वनांतराला पाठविल्याबद्दल राजाला अत्यंत पश्चाताप झाला. शिबिराष्ट्रवासी लोकांनां देखील सच्छील वेस्संतराला अरण्यवासाचीं दुःखें भोगावयाला लावल्याबद्दल अनुताप होत चालला होता. संजयराजानें शिबीच्या पुढाऱ्यांची सभा बोलवून वेस्संतराला परत आणण्याचा ठराव केला, व आपल्या प्रधानासह वंकपर्वतावर जाऊन त्यानें मुलाला आणि सुनेला घरीं आणिलें. शिबीच्या संमतीनें वेस्संतराची पुनः युवराजाच्या जागीं नेमणूक करण्यांत आली.

अनुक्रमणिका

याप्रमाणें वेस्संतरबोधिसत्वानें आपल्या आवडत्या मुलांचें व पत्नीचें दान करून दानपारमितेचा अभ्यास केला.

## [३]
## मघाची गोष्ट

आतां बोधिसत्वानें शीलपारमितेची पूर्तता कशी केली, याचें एक उदाहरण सांगतों.

हजारों वर्षांपूर्वी आमचा बोधिसत्व मगधदेशामध्यें मचल नांवाच्या गांवांत एका शेतकऱ्याच्या कुटुंबांत जन्मला. त्याचें नांव त्याच्या आईबापांनीं मघ असें ठेविलें होतें. मघ जेव्हां वयांत आला, तेव्हां आपल्या गांवांतील लोकांचा आपस्वार्थीपणा पाहून त्याचें मन फार कळवळलें. त्यानें आपल्या गांवांतील रस्ते साफ करावे, घाण असेल ती नेऊन बाहेर टाकावी, पिण्याच्या पाण्यांत घाणेरडें पाणी जाऊं नये ह्मणून विहिरीला कठडा बांधावा, व अशीच इतर लोकोपयोगी कामें करावीं; परंतु त्याच्या या कृत्यांचें चीज न होतां गांवांतील लोक त्याला दोष लावीत असत. ते चावडीवर किंवा दारूच्या दुकानांत जमले असतां ह्मणत "काय हो! हा वेडा पोरगा मघ! आपलीं घरचीं कामें सोडून चालला रिकाम्या उठाठेवी करावयाला! एकट्याच्यानें कधीं सगळ्या गांवाचें हित झालें आहे काय? आपण भले कीं आपला उद्योग भला, असें वागावयाचें टाकून गांवाचें कल्याण करावयाला लागला आहे! काय करावयाचें आपल्याला सर्व गांव घेऊन? मघाला आपल्या मूर्खपणाचा कधींना कधीं पश्चाताप करावा लागेल!"

मघाची जरी उघडउघड निंदा होत होती, इतकेंच नव्हे, त्याचे आप्तइष्ट देखील त्याच्या विरुद्ध होते, तरी त्यानें आपलें कर्तव्य सोडिलें नाहीं. मघानें एके दिवशीं एकादा रस्ता साफ करावा व दुसऱ्या दिवशीं आसपासच्या घरांतील बायकांनीं केरकचरा तेथें टाकावा. एकाद्या वयोवृद्ध गृहस्थानें, ही घाण कशाला करतां, असें म्हटलें असतां त्या ह्मणत "अहो, तुह्माला काय याचें? तो मेला मघ आहेना? तो येईल आणि करील साफ!"

मघानें पुनः दोनचार दिवसांनीं यावें, आणि ती जागा साफ करावी. मघाच्या या आत्मसंयमनाचा परिणाम जुन्या पिढीवर कांहींएक झाला नाहीं; परंतु मघ हा चांगल्या मार्गाला लागला नसेल कशावरून? अशी एकदोन तरुणांना शंका येऊं लागली. मघ आपल्या घरच्या कामांत कांहीं व्यत्यय येऊं देत नसे. घरचें शेतीचें काम आटपून राहिलेला वेळ तो जनसेवेंत घालवीत असे; गांवांतील इतर लोक फुरसतीच्या वेळीं दारूच्या गुत्त्यांत किंवा चावडीवर जमून गप्पा मारण्यांत आपला वेळ घालवीत असत. इतकेंच नव्हे, तर दारूच्या व्यसनानें त्यांचीं घरचीं कामें देखील नीट होत नसत. शिवाय मारामारीमध्यें आणि फिर्यादी-अर्यादीमध्यें त्यांच्या वेळाचा अपव्यय होत असे, तो निराळाच.

वर निर्दिष्ट केलेल्या दोन तरुणांमध्यें एके दिवशीं पुढील संवाद झाला. पहिला तरुण ह्मणाला "कायरे, गांवांतील सर्व लोक तर या मघाला दोष देतात. परंतु मला वाटतें, कीं, आमच्या गांवांत जर कोणी चांगला माणूस असेल तर तो मघच! मघाला मीं कधीं दारूच्या गुत्त्यावर किंवा चावडींत पाहिलें नाहीं; कधीं कोणाशीं तो तंटेबखेडे करीत नाहीं; त्याच्या घरामध्यें तर मूर्तिमंत शांति वास करीत आहे. अशा तरुणाला आमचे लोक मूर्ख समजतात, हें आश्चर्य नव्हे काय? मला तर वाटतें, कीं, आह्मांला गुरु करावयाचा असेल, तर तपोवनांत गुरूला शोधण्यासाठीं न जातां यालाच गुरु करावें हें चांगलें."

अनुक्रमणिका

यावर दुसरा ह्मणाला “चल — आतांच्या आतांच आपण मघाजवळ जाऊं. तो या वेळीं कांहींतरी लोकसेवेचें कृत्य करीत असेल.”

याप्रमाणें संभाषण झाल्यावर ते दोघे तरुण, मघ एके ठिकाणीं काम करीत होता तेथें गेले, आणि मघाला ह्मणाले “आजपर्यंत आह्मीं तुझी उपेक्षा केली, याजबद्दल आह्मांला अत्यंत दुःख होत आहे. अभाग्याला आपल्या घरीं असलेला ठेवा जसा माहीत नसावा, तसेच तुझे सद्गुण तूं आमच्याजवळ असतांना देखील आह्मांला माहीत झाले नाहींत. आजपासून आह्मी तुझे शिष्य होऊन तुझें अनुकरण करून सत्कृत्यांत काल घालविण्याचा निश्चय केला आहे.”

मघ ह्मणाला “मित्रांनों! सदाचरणानें कालाचा सद्व्यय करण्याची तुमची मनीषा वाखाणण्याजोगी आहे, परंतु यासाठीं तुह्मी माझें शिष्यत्व पत्करण्याची आवश्यकता नाहीं. माझ्यासारखे मर्त्य नाशवंत आहेत, हें तुह्मी जाणतच आहां. तेव्हां अशा क्षणभंगुर प्राण्याचें शिष्यत्व न पत्करितां आह्मीं सर्वांनीं धर्माचें शिष्यत्व पत्करावें, हें बरें. कारण धर्म शाश्वत आहे; तो अनादि आहे; त्याला आपल्यापासून कोणीहि दूर करूं शकत नाहीं.”

ते तरुण ह्मणाले “पण धर्माधर्माचें ज्ञान आपल्यासारख्या संतांवांचून आमच्यासारख्या अज्ञजनांनां व्हावें कसें?”

मघ ह्मणाला “धर्म गंभीर आहे. त्याचें सर्वस्वीं ज्ञान होणें आमच्यासारख्या प्रापंचिक जनांला शक्य नाहीं. तथापि एक गोष्ट खरी आहे, कीं, त्या धर्माची उभारणी शीलाच्या पायावर झाली आहे. अर्थात् शीलावांचून धर्मप्राप्ति होणार नाहीं.”

तरुण ह्मणाले “शील म्हणजे काय?”

“कुमार्गापासून निवृत्ति व सत्कर्मामध्यें प्रवृत्ति याला साधुलोक शील ह्मणतात. प्राण्याचा घात न करणें, चोरी न करणें, व्यभिचार न करणें, असत्य भाषण न करणें, आणि मादक पदार्थांचें सेवन न करणें, हे पांच नियम एकनिष्ठेनें पाळले असतां आह्मी कुकर्मापासून मुक्त होऊं, व परोपकारादि सत्कृत्यांमध्यें आमच्या कालाचा उपयोग आह्मांला करतां येईल.”

तरुण ह्मणाले “आजपासून हे पांच नियम आह्मी मोठ्या श्रद्धेनें पाळूं, व गृहकृत्यें करून राहिलेला काळ सत्कर्मांत घालवूं.”

अशा रीतीनें हळुहळू मघाला तीस अनुयायी मिळाले. त्या सर्वांनीं मिळून रोगी लोकांसाठी व अनाथअपंग लोकांसाठीं एक धर्मशाळा स्थापन केली, आसपासच्या गांवचे रस्ते साफ केले, लहानसान पूल बांधले, तलाव खोदले आणि अशींच इतर लोकोपयोगाचीं कामें केलीं. याशिवाय ते आपल्या परगण्यांतील लोकांनां पंचशीलाचा उपदेश करीत असत. या त्यांच्या कृत्यांचा सगळ्या परगण्यावर असा परिणाम झाला, कीं, तेथींल लोक कांहीं अपवाद खेरीजकरून सदाचारी बनले. दारूच्या पिठेवाल्यांनां आपलीं दुकानें बंद करावीं लागलीं, व तेथल्या ग्रामभोजकाला (न्याय आणि वसुलीकामगाराला) दंडाच्या रूपानें बरीच मोठी प्राप्ति होत असे, ती होईनाशी झाली.

अनुक्रमणिका

या परगण्यांतील लोकांमध्यें पूर्वी इतकीं भांडणें होत असत, कीं, त्यांचा निकाल करीत असतां ग्रामभोजकाला जेवण्याला सुद्धां फुरसत मिळत नव्हती; पण आतां ग्रामभोजकानें सारा दिवस तक्क्याशीं टेंकून जांभया देत बसावें, व कचेरीची वेळ संपल्यावर घरीं जावें, असा प्रकार सुरू झाला. ग्रामभोजकानें आपल्या परगण्यांतील लोकांमध्यें इतकें स्थित्यंतर कसें झालें, याची चौकशी करतां, मघ आणि त्याचे तीस अनुयायी यांनीं ही सगळी क्रांति घडवून आणिली असल्याचें त्याला आढळून आलें. तेव्हां या तिसांचीहि या प्रदेशांतून उचलबांगडी केल्याशिवाय हे लोक पूर्वस्थितीवर येणार नाहींत, असा विचार करून कांहीं जरूरीच्या कामासाठीं आपण मगधदेशाच्या राजाची भेट घेण्यास जातों, असें आपल्या हाताखालच्या लोकांनां सांगून त्यानें एकदम राजधानीचा रस्ता धरला.

मगधदेशाचा त्या काळचा राजा मोठा चैनी असे. त्याची भेट होणें फार कठिण असे. तथापि ग्रामभोजकानें आपल्याबरोबर आणलेला मोठा नजराणा राजाला देऊन मोठ्या प्रयत्नानें त्याची एकदांची भेट घेतली. राजानें ग्रामभोजकाच्या आगमनाचें कारण विचारल्यावर तो ह्मणाला “महाराज, काय सांगावें! आमच्या प्रदेशांत तीस दरोडेखोर आणि त्यांचा नायक मघ यांनीं फारच कहर करून सोडला आहे. सारे लोक गांव सोडून पळत आहेत, व या दरोडेखोरांच्या भीतीनें आमच्या प्रदेशांत दुसरे लोक येत नाहींत. याप्रमाणें व्यापार–धंदा, शेती वगैरे सर्व कामें बंद पडलीं आहेत. यापुढें आपणाला आमच्या परगण्यांतच नव्हे, पण आसपासच्या सर्व प्रांतांत देखील कर वसूल करतां येणार नाहीं.!”

राजा अतिशय संतापून ह्मणाला “ही गोष्ट तुह्मीं मला कळविलीत हें उत्तम झालें. तुमच्याबरोबर मी कांहीं फौज देतों. तिच्या साहाय्यानें तुह्मी त्या दरोडेखोरांनां पकडून घेऊन या.”

ग्रामभोजकानें आपल्या परगण्यांत जाऊन मघाला व त्याच्या साथीदारांनां पकडलें. त्यांनी कोणत्याहि प्रकारें ग्रामभोजकाचा प्रतिकार केला नाहीं. “तुह्मांला पकडण्यासाठीं राजाचा हुकूम आहे,” असें ह्मटल्याबरोबर ते आपण होऊन स्वाधीन झाले. ग्रामभोजकानें त्यांच्या हातापायांत बेड्या घालून त्यांनां पकडून आणल्याची वर्दी राजाला दिली. त्या वेळीं राजा अंतःपुरांत होता. त्याला दरोडेखोरांनां पहाण्यास सवड नव्हती. त्यानें तेथूनच हुकूम सोडला, कीं “दरोडेखोरांनां राजांगणांत पालथे पाडून त्यांच्या अंगावरून हत्ती चालवावा!”

राजाच्या हुकुमाप्रमाणें मघाच्या आणि त्याच्या साथीदारांच्या मुसक्या बांधून त्यांनां पालथें पाडण्यांत आलें, व हस्तिशाळेंतून एक मदोन्मत्त हत्ती त्यांच्यावर सोडण्यास सज्ज करण्यांत आला.

मघ आपल्या अनुयायांनां ह्मणाला “मित्र हो, आजपर्यंत आपण सदाचरणांत काळ घालविला आहे. आतां आपणांपैकीं कांहीजणांनां असें वाटण्याचा संभव आहे, कीं, सदाचरणानेंच मनुष्य सुखी होतो असें नाहीं; आह्मीं आमचें आयुष्य सत्कर्मामध्यें घालविलें असतां आमच्यावर हें संकट कसें ओढवलें? पण मित्र हो, या समयीं असला विचार देखील तुमच्या मनाला शिवूं देऊं नका. इहलोकींचे व्यवहार जरी न्यायाचे नसले, तरी परलोकीं आमच्या कर्माचें यथायोग्य फल आह्मांला मिळणार आहे. या लोकीं एकादा लबाड मनुष्य पुष्कळ संपत्ति मिळवितो, दुसरा एकादा सत्पुरुष आजन्म दारिद्र्यामध्यें लोळत असतो. तेव्हां इहलोकींच्या व्यवहारामध्यें माणसाला यथायोग्य न्याय मिळत नाहीं, हें उघड आहे. परंतु आमच्या कर्मांनीं आह्मी इतके बद्ध झालों आहोंत, कीं, त्यांजपासून परलोकीं आमची सुटका होणें अत्यंत अशक्य आहे. तेव्हां आमचीं कर्मेंच आमचे रक्षक (पोलीस), व आमचीं कर्मेंच आमचे न्यायाधीश होतील, हें पक्कें लक्ष्यांत ठेवा.

आतां तुमच्या मनाला वाईट वाटत असतां जर तुह्मांला मरण आलें, तर त्याचा परिणाम अत्यंत अनिष्ट होणार आहे. कां, कीं, मनुष्याच्या मनाला तळमळ लागून मरण आलें असतां पुनर्जन्मामध्यें तो हीन योनीत जन्म पावतो, असें ऋषिमुनींचें वचन आहे. ह्मणून या प्रसंगी तुमची मैत्री—भावना दृढ करा. जसें तुमचें लोकांवर प्रेम होतें, त्याचप्रमाणें तें तुमच्याविरुद्ध फिर्याद करणाऱ्या ग्रामभोजकावर, तुह्मांला मारण्याचा हुकूम देणाऱ्या राजावर व तुह्माला मारण्यास प्रवृत्त झालेल्या या हत्तीवर असूं द्या. शत्रु, मित्र, उदासीन आणि आत्मा हा भेद सोडून सर्वांवर सारखी मैत्री असूं द्या. एका देहाचे जसे भिन्न अवयव असतात, तसेच आह्मी एका विश्वाचे अवयव आहोंत, ही समजूत ढळूं देऊं नका. आजपर्यंत केलेल्या सत्कृत्यांचें तुह्मी या प्रसंगीं सिंहावलोकन करा!"

मघाच्या वचनाप्रमाणें त्या सर्वांनीं त्या हत्तीवर, राजावर आणि ग्रामभोजकावर मैत्रीची भावना केली. त्यांच्या देहाला जरी हे प्राणी अपाय करणारे होते, तरी त्यांच्या प्रेमभरित अंतःकरणाला ते हितकर्तेच वाटूं लागले. हा ग्रामभोजक, हा राजा आणि हा हत्ती हे आह्मांला या नश्वर जगांतून मुक्त करीत आहेत, तेव्हां यांनां आह्मी आमचे शत्रु कसें म्हणावें? असें ते ह्मणूं लागले!

हत्ती हा प्राणी मोठा बुद्धिमान् असतो. त्याला मनुष्यापेक्षांदेखील दुसऱ्या प्राण्याचें अंतःकरण अधिक ओळखतां येतें. जेव्हां मघाला आणि त्याच्या साथीदारांनां मारण्यासाठीं माहुतानें हत्ती पुढें आणिला, तेव्हां मोठ्यानें किंकाळी फोडून तो एकदम मागें सरला. कांहीं केल्या तो त्यांच्या अंगावरून जाईना! पुनः दुसरा, तिसरा, असे दोनचार भिन्नभिन्न हत्ती आणण्यांत आले; पण ते सर्व माहुताच्या अंकुशाला न जुमानतां किंकाळी फोडून मागें हटले. कोणत्याहि हत्तीपासून मघाला आणि त्याच्या साथीदारांनां उपद्रव पोंचला नाहीं!

हें वर्तमान राजाला समजतांच तो ह्मणाला "या लोकांनां हत्तीचा मंत्र माहीत असला पाहिजे, किंवा यांच्याजवळ कांहीं औषध असलें पाहिजे, की, ज्याच्यायोगें हत्ती यांच्याजवळ जाण्यास धजत नाहीं."

राजाच्या आज्ञेवरून बोधिसत्वाला व त्याच्या साथीदारांनां शिपायांनीं राजासमोर नेऊन उभें केलें. राजानें त्यांच्यापाशीं औषध आहे कीं काय, हें पाहण्यासाठीं त्यांची झडती घेवविली. परंतु कांहीं सांपडलें नाहीं. तेव्हा राजा त्यांनां ह्मणाला "तुह्मांला हत्तीचा मंत्र माहीत असला पाहिजे. नाहींतर हत्ती तुमच्या अंगावरून चालून जात नाहीं हें कसें?"

बोधिसत्व ह्मणाला "महाराज, आमचा मंत्र ह्मटला, ह्मणजे आजपर्यंत आह्मी एकनिष्ठेनें शीलाचें पालन करीत आलों आहों, जाणूनबुजून आह्मीं कोणत्याहि प्राण्याचा घात केला नाहीं; दुसऱ्याच्या वस्तूंचा आह्मीं अपहार केला नाहीं; परस्त्रियेला आह्मी मातेसमान मानतों; असत्य भाषण आह्मीं कधींहि केलें नाहीं; आणि मद्यादि मादक पदार्थांपासून आह्मी अलिप्त राहिलों आहों. याशिवाय आपल्या लोकांची सेवा आह्मी यथामति करीत आलों आहों. आमच्यावर एकाएकीं जेव्हां हा प्रसंग आला, तेव्हां मीं माझ्या मित्रांनां बजावलें, कीं, आह्मांला पकडणाऱ्या ग्रामभोजकावर, मारण्याचा हुकूम देणाऱ्या महाराजांवर व मारणाऱ्या हत्तीवर आपण सर्वांनी मैत्रीची भावना करावी, कोणत्याहि प्रकारें द्वेष आमच्या मनाला शिवतां कामा नये. आमच्या या शीलाचा आणि मैत्रीचा प्रभाव हाच काय तो आमचा मंत्र होय!"

अनुक्रमणिका

राजानें आपले दूत पाठवून मघाच्या गांवाची व आसपासच्या प्रांताची खरी स्थिति काय आहे, याची चौकशी केली, तेव्हां त्याला आढळून आलें, कीं, बोधिसत्व व त्याचे साथीदार यांनीं त्या प्रांताची उत्तम सुधारणा केली आहे; तेथले लोक फारच सुखी असून परस्परांशीं ते अत्यंत प्रेमानें वागत आहेत. चोऱ्या, मारामाऱ्या, फिर्यादीअर्यादी वगैरे गोष्टी त्या प्रांतांतून नामशेष झाल्या आहेत; तेव्हां राजानें त्या खोटी फिर्याद करणाऱ्या ग्रामभोजकाला धरून एकदम फांशीं देण्याचा हुकूम केला, आणि त्याच्या जागी मघाला नेमण्यांत आलें. तेव्हां बोधिसत्व राजाजवळ जाऊन त्यानें ग्रामभोजकाला माफी देण्याची विनवणी केली. तो ह्मणाला "महाराज! हा ग्रामभोजक नसता, तर आह्मांला आपल्या दर्शनाचा योग आला नसता. आमच्या शीलाला आणि मैत्रीला कसोटीला लावून पहाण्याची यानें संधि आणून दिली, ह्मणून हा आह्मांला प्रिय आहे. तेव्हां महाराजांनी याला जीवदान द्यावें, अशी आमची नम्र विनंति आहे."

बोधिसत्वाच्या विनंतीला मान देऊन राजानें ग्रामभोजकाला सोडून दिलें.

बोधिसत्वानें त्या जन्माची इतिकर्तव्यें संपल्यावर देहविसर्जन केलें, व देवलोकीं तो देवांचा राजा झाला. एके दिवशीं देवांचें आणि दैत्यांचें युद्ध चाललें असतां त्यांत बोधिसत्वाचा पराभव होऊन तो देवांच्या राजधानीकडे आपल्या रथांतून आकाशमार्गानें पळत सुटला. समुद्र किनाऱ्यावर सांवरीच्या झाडांवर लहानसान पक्ष्यांचीं पुष्कळ घरटीं होतीं. बोधिसत्वाचा रथ वेगानें चालला असतां त्याच्या वाऱ्यानें तीं झाडें मोडून समुद्रांत पडूं लागलीं, व त्यांवरील घरट्यांतील पांखरांच्या पिलांचा एकच कलकलाट सुरू झाला. तेव्हां बोधिसत्व (इंद्र) मातलि सारथ्याला ह्मणाला "हे मातलि, आमच्या वेगानें हीं झाडें उपटलीं जाऊन समुद्रामध्यें पडत आहेत; व त्यामुळें पक्ष्यांच्या पिलांचा संहार होत आहे. असुरांनी माझे प्राण घेतले तरी हरकत नाहीं, तूं रथ मागें फिरव."

मातलि सारथ्यानें इंद्राच्या हुकुमाप्रमाणें रथ मागें फिरविला. तेव्हां दैत्यांनां इंद्राच्या मदतीला आणखी देव आले असावे असें वाटून ते दशदिशा पळत सुटले. याप्रमाणें असुरांचा पराजय झाला, व देवांचा जय झाला.

बोधिसत्वानें मघाच्या जन्मामध्यें शीलपारमितेची आणि मैत्रिपारमितेची पूर्तता केली, हें या वर्णनावरून सहज समजण्यासारखें आहे. आणखीहि अनेक जन्मांमध्यें बोधिसत्वानें शीलपारमितेचा आणि मैत्रिपारमितेचा अभ्यास केला; विस्तारभयास्तव त्या सर्व कथांचे वर्णन येथें देतां येत नाहीं.

[४]

## चुल्लबोधिजातक.

अतीत कालाच्या ठायीं काशीराष्ट्रामध्यें बोधिसत्व एका ब्राह्मणकुलांत जन्मला. चुल्लबोधि असें त्याचें नामकरण करण्यांत आलें. बोधिसत्व लहानपणापासूनच विरक्त होता, तथापि आईबापांच्या आग्रहास्तव त्यानें लग्न केलें. त्याची पत्नीदेखील अत्यंत सुशील होती. जरी त्यांचें लग्न झालें होतें, तरी त्यांनी आपल्या ब्रह्मचर्याचा भंग होऊं दिला नाहीं. पुढें जेव्हां बोधिसत्वाचे आईबाप निर्वतले, तेव्हां तो आपल्या प्रिय पत्नीला ह्मणाला "भद्रे, आमच्या पूर्वजांची ही अपार संपत्ति तूं घे, व दानादि पुण्यकर्मे करून या घरामध्यें सुखानें कालक्रमणा कर. मला गृहस्थाश्रमाचा वीट आला आहे. मी परिव्राजकवेषानें हिमालयावर वास करूं इच्छीत आहें."

अनुक्रमणिका

त्याची पत्नी ह्मणाली “आर्यपुत्र! पुरुषांनींच प्रव्रज्या वेष धारण करावा, स्त्रियांनीं करूं नये, असा नियम आहे काय?”

बोधिसत्व ह्मणाला “असा कांहीं नियम नाहीं. तथापि तूं थोर कुलामध्यें जन्मलेली सुकुमार स्त्री आहेस; तुझ्यानें अरण्यवासाचीं दुःखें सहन करवणार नाहींत. ह्मणून मी ह्मणतों, कीं, तूं या घरामध्येंच राहून दानादि पुण्यकर्मे करावीं.”

बोधिसत्वानें आपल्या भार्येला आपल्याबरोबर न येण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला, परंतु त्या सत्त्वशील स्त्रीनें भावी दुःखाला न जुमानतां तापसवेष स्वीकारून आपल्या पतीचा मार्ग धरला. ती दोघें हिमालयपर्वतावर जाऊन कांहीं काळ राहिलीं. त्या काळीं तापस लोकांचा असा एक परिपाठ असे, कीं, कांहीं काळ फलमूलांचें भक्षण करून अरण्यांत वास केल्यावर ते खारट आणि आंबट पदार्थांचें सेवन करण्यासाठी लोकवस्तीच्या ठिकाणीं येत असत, व कांही काळ त्या पदार्थांचे सेवन करून पुनः अरण्यांत प्रवेश करीत. या वहिवाटीला अनुसरून बोधिसत्व एकदां आपल्या भार्येसह काशीराष्ट्रामध्यें संचार करीत होता. तो फिरत फिरत वाराणसी नगराला आला. तेथें बोधिसत्व राजाच्या एका उद्यानामध्यें राहिला.

एके दिवशीं राजा उद्यानक्रीडेसाठीं तेथें आला असतां त्यानें एका वृक्षाखालीं बोधिसत्वाला व जवळच दुसऱ्या एका वृक्षाखालीं त्याच्या पत्नीला पाहिलें. तिचें सुंदर रूप पाहून राजा मोहित झाला, आणि बोधिसत्वाजवळ येऊन ह्मणाला “भो तापस! या स्त्रीचें आणि तुझें नातें काय आहे?”

बोधिसत्व ह्मणाला “ही माझी धर्मपत्नी आहे.”

राजा ह्मणाला “काय हो हा वेडेपणा! तुह्मी तुमच्या या सुस्वरूप भार्येला बरोबर घेऊन फिरत आहां, याला काय म्हणावें? अहो समजा, यदाकदाचित् तुह्माला जर कोणी शत्रु उद्भवला, तर तुह्मी काय करणार? तुह्मी पडलां तपस्वी; तुमच्याकडून तुमच्या शत्रूचा प्रतिकार होईल काय?”

बोधिसत्व ह्मणाला “मला शत्रू उद्भवेल, परंतु तो माझ्या हातून सुटणार नाहीं. महामेघ जसा धुळीला जेथल्या तेथेंच दाबून टाकितो, तद्वत् मी माझ्या शत्रूला जागच्याजागीं गार करून टाकीन!”

हें बोधिसत्वाचें भाषण ऐकून राजा अत्यंत क्रोधायमान झाला आणि आपल्या सेवकांनां ह्मणाला “अरे, इकडे या आणि या स्त्रीला धरून माझ्या अंतःपुरांत नेऊन ठेवा. हा बुवा मोठा ढोंगी दिसतो. मी आपल्या शत्रूचा संहार करीन, यंव करीन आणि त्यंव करीन, अशा यानें वल्गना चालविल्या आहेत. आपल्या बायकोला बरोबर घेऊन हिंडण्यास याला लाज वाटत नाहीं. याच्या तपाचें माहात्म्य तरी काय आहे तें मलां पाहूं द्या!”

राजसेवकांनीं बोधिसत्वाच्या पत्नीला, तिच्या आक्रोशाला न जुमानतां धरून राजाच्या अंतःपुरांत नेलें. राजानें तिची पुष्कळ विनवणी करून पाहिली, परंतु तिचें मन तो वळवूं शकला नाहीं. तेव्हां राजानें विचार केला, कीं, या तापसीला आपल्या अंतःपुरांत ठेवण्यांत अर्थ नाहीं. इच्यावर बलात्कार केल्यास आपली प्रजा आपणावर क्षुब्ध होईल. शिवाय, इचा पति खराखराच तपस्वी नसेल कशावरून?

राजाच्या अंतःकरणांतून विकाराचे ढग हळुहळू नष्ट झाले, व विवेकसूर्याचा प्रकाश तेथें पडूं लागला. त्याला आपण केलेल्या कृत्याची लाज वाटूं लागली, आणि आपलें कृत्य उघडकीला येऊं न देण्याविषयीं तो प्रयत्न करूं लागला. तो आपल्या परिवारासह उद्यानामध्यें जेथें बोधिसत्व शांतपणें आपली कंथा शिवीत बसला होता, तेथें गेला आणि त्याला ह्मणाला "भो तापस! तूं मोठमोठाल्या गोष्टी सांगितल्यास. तूं ह्मणालास, कीं, मला शत्रु उद्भवेल, परंतु तो माझ्या हातून सुटणार नाहीं; पण मीं जेव्हां तुझ्या स्त्रीला उचलून नेलें, तेव्हां तुझ्यानें माझें कांहीं एक करवलें नाहीं; आणि आतां तूं तोंड खालीं घालून कंथा शिवीत स्वस्थ बसला आहेस!"

बोधिसत्व ह्मणाला "महाराज, मीं कांहीं वृथा वल्गना केली नाहीं. मला जो शत्रु उद्भवला होता तो माझ्या हातून सुटला नाहीं. महामेघ जसा धुळीला दडपून टाकतो तसें मीं त्याला तेथल्या तेथें दडपून टाकलें."

राजा ह्मणाला "असा तुझा शत्रु कोणता बरें?"

बोधिसत्व ह्मणाला "जो उद्भवला असतां मनुष्य यथार्थतया पाहूं शकत नाहीं, जो उपस्थित झाला असतां आपल्या हितशत्रूंनां आनंद होतो, मनुष्य आपलें हित जाणत नाहीं, परलोकाची चाड रहात नाहीं, त्या क्रोधरूपी शत्रूनें आपण माझ्या पत्नीला ओढून नेत असतां माझ्यावर हल्ला केला; परंतु क्षांतीच्या बलानें मीं त्याचा तत्क्षणींच नाश केला! त्या क्रोधरिपूचा मला थोडादेखील उपद्रव झाला नाहीं!"

बोधिसत्वाचें हें भाषण ऐकून राजाला अत्यंत आनंद झाला आणि त्यानें आपल्या अपराधाबद्दल बोधिसत्वाची नम्रपणे क्षमा मागितली. पुढें त्याच उद्यानामध्यें त्या दोघांनां रहाण्यासाठीं राजानें एक सुंदर आश्रम बांधून दिला.

याप्रमाणें चुल्लबोधि तापसाच्या जन्मामध्यें बोधिसत्वानें क्षांतिपारमितेचा अभ्यास करून आत्मपरहित साधिलें.

[५]

## महाजनकजातक

प्राचीन काळीं विदेहराष्ट्राच्या मिथिला नामक राजधानींत महाजनक राजा राज्य करीत असे. त्याला अरिष्टजनक आणि पौलजनक हे दोन पुत्र होते. महाजनकाच्या मरणानंतर अरिष्टजनकाला गादी मिळाली, व आपल्या धाकट्या भावाला त्यानें युवराज केलें. युवराजाचें आणि प्रधानमंडळाचें कांहीं कारणांमुळें पटेनासें झालें. तेव्हां त्यांनीं युवराजाचें व राजाचें वैमनस्य आणण्याचा एक कट रचला. राजाची त्यांनीं अशी समजूत करून दिली, कीं, राजाला मारून युवराज गादी बळकावूं पहात आहे. अरिष्टजनकाचा स्वभाव उतावळा असल्यामुळें, आणि त्याला खोल विचार करण्याची सवय नसल्यामुळें, प्रधानांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून त्यानें पौलजनकाच्या पायामध्यें बेड्या ठोकून त्याला अंधारकोठडींत कोंडून ठेविलें.

अनुक्रमणिका

पौलजनक तुरुंगांतून मोठ्या युक्तीनें सुटून पळाला, व त्यानें जंगलाचा आश्रय केला. तेथल्या लोकांनां वश करून घेऊन त्यानें राजाच्या विरुद्ध मोठें बंड उभारलें. आसपासचा मुलूख काबीज करून आपलें सैन्य वाढवीत वाढवीत त्यानें खुद्द मिथिला नगरीवर स्वारी केली. अरिष्टजनक आपल्या भावाला शासन करण्यासाठीं स्वतः रणांगणावर गेला; परंतु तो या लढाईंत पौलजनकाच्या योद्धयांकडून मारला गेला. हें वर्तमान तेव्हांच सर्व शहरांत पसरलें. अरिष्टजनकाची पट्टराणी गरोदर होती. पौलजनक आपल्या भावाचा सूड उगविण्यासाठीं आपणाला ठार मारील, असें वाटून तिनें पौलजनक राजा होण्यापूर्वीच कोठेंतरी पळून जाण्याचा बेत केला; परंतु तिला आपल्या दासीजनांचा देखील भरंवसा वाटेना. तेव्हां तिनें कोणत्याहि माणसाला नकळत आपले दागदागिने एका टोपलींत भरून त्यावर तांदूळ पसरले, आणि स्वतः जुनेंपुराणें लुगडें नेसून हीनवेषानें ती मिथिलेंतून बाहेर पडली. लोक नुकत्याच झालेल्या राजक्रांतीच्या गडबडींत असल्यामुळें तिला कोणीं ओळखिलें नाहीं.

नगराच्या बाहेर निघाल्यावर तिला एक गाडीवान भेटला. त्याच्या गाडींत बसून ती चंपानगराला गेली. तेथें एका नामांकित औदिच्य ब्राह्मणाची तिनें गांठ घेऊन सर्व वर्तमान त्याला विदित केलें. त्यानें ही आपली बहीण आहे असें लोकांनां सांगून तिचें आपल्या खऱ्या बहिणीप्रमाणेंच पालन केलें. नवमास पूर्ण झाल्यावर तिला एक मुलगा झाला. त्याला त्याच्या आज्याचें महाजनक हेंच नांव ठेवण्यांत आलें. त्या ब्राम्हणानें त्याला वेदांमध्यें आणि इतर शास्त्रांमध्यें पारंगत केलें. महाजनक आपल्या सोबत्यांबरोबर खेळत असतां त्याला हिणवण्यासाठीं ते म्हणत असत, कीं, ‘हा विधवापुत्र मोठा दांडगा आहे!’ महाजनकाला आपला बाप कोण हें ठाऊक नव्हतें. एके दिवशीं आपल्या आईजवळ जाऊन आपल्या बापाचें नांव सांगण्यासाठीं त्यानें अतिशय हट्ट धरला. तिनें त्याला खरी गोष्ट सांगितली. तेव्हांपासून विधवापुत्र म्हटलें असतां तो आपल्या सोबत्यांवर चिडत नसे; परंतु आपण मिथिलेचें तक्त कधींना कधीं काबीज करूं, अशी तीव्र महत्त्वाकांक्षा त्याच्या मनामध्यें एकसारखी वृद्धिंगत होत गेली.

महाजनक वयांत आल्यावर आपल्या आईला म्हणाला “आई, माझ्या वडिलांची गादी मिळविण्यासाठीं मी उत्कंठित झालों आहें. तुझ्यापाशीं बरोबर आणिलेलें कांहीं जडजवाहीर असेल, तर तें मला दे. तें विकून त्या भांडवलावर मी पुष्कळ पैसा कमवीन, व मोठें सैन्य जमवून माझ्या चुलत्यापासून माझ्या पित्याचें राज्य मी परत घेईन.”

राणीनें आपल्याबरोबर आणिलेल्या दागिन्यांपैकीं कांहीं दागिने बोधिसत्वाच्या (महाजनकाच्या) स्वाधीन केले. बोधिसत्व, ते विकून जे पैसे आले ते घेऊन, कांहीं व्यापारी सुवर्णभूमीला (ब्रह्मदेशाला) व्यापारासाठीं जात असत, त्यांजबरोबर एका जहाजावर चढला. जहाज एक आठवडा सुखरूप चाललें होतें. परंतु एका आठवड्यानंतर भयंकर तुफान होऊन तें फुटलें, व त्यांतून भराभर पाणी आंत शिरूं लागलें. त्या प्रसंगीं सर्व उतारूंची आरडाओरड सुरू झाली. परंतु बोधिसत्वानें आपलें धैर्य ढळूं दिलें नाहीं. तो जहाजाच्या कोठींत शिरला, व तेथें असलेल्या पदार्थांतून साखर व तूप हे पदार्थ घेऊन ते त्यानें पोटभर खाल्ले; (तूप खाल्लें असतां मनुष्याला समुद्राच्या पाण्यांत पुष्कळ दिवस उपाशी रहातां येतें, अशी समजूत होती.) आणि तेलानें आपलीं वस्त्रें भिजवून तीं त्यानें दृढ परिधान केलीं. जेंव्हा जहाज बुडण्याच्या बेतांत आलें, तेव्हां बोधिसत्व डोलकाठीवर जाऊन बसला. जहाज बुडाल्यावर त्यांतील लोकांवर समुद्रांतील मोठमोठ्या माशांच्या झुंडीनें हल्ला केला. आपल्या बरोबरीचे उतारू माशांच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत, हें पाहून बोधिसत्वानें डोलकाठीच्या मस्तकावरून दूर उडी फेंकली. त्याच्या त्या उडीच्या आवाजासरशीं

माशांचा कळप भिऊन जिकडेतिकडे पळत सुटला. बोधिसत्वाच्या हाताला जहाजाची एक फळी लागली. तिच्या आश्रयानें आपले प्राण वांचविण्यासाठीं तो समुद्रांत पोहूं लागला.

बोधिसत्व एक आठवडापर्यंत पाण्यावर तरंगत होता. त्या काळीं मणिमेखला नांवाच्या देवतेची देवांनीं समुद्ररक्षणाच्या कामावर योजना केली होती. परंतु कांहीं कारणामुळें एक आठवडा ही देवता आपल्या कामावर हजर राहूं शकली नाहीं. एका आठवड्यानंतर एकाएकीं तिला आपल्या कर्तव्याची आठवण होऊन ती घाईघाईनें ज्या ठिकाणीं महाजनक होता, तेथें आली. महाजनक एकसारखा पोंहत होता, तें पाहून तिला मोठा अचंबा वाटला, व ती त्याला ह्मणाली "या समुद्रामध्यें किनारा कोणत्या बाजूला आहे, हें ठाऊक नसतां तूं पोंहण्याची ही एवढी खटपट चालविली आहेस, तिचा अर्थ काय?"

महाजनक तिच्याकडे वळून ह्मणाला "प्रयत्न करणें हें मनुष्याचे कर्तव्य आहे, असें जाणून, हे देवते! या समुद्रामध्यें तीराची माहिती नसतां देखील मी रात्रंदिवस पोंहत आहें."

देवता ह्मणाली "परंतु या गंभीर समुद्रामध्यें तुझा प्रयत्न व्यर्थ आहे. तूं किनाऱ्याला पोहोंचल्याशिवायच मरशील!"

बोधिसत्व ह्मणाला "कांहीं कां असेना. जो आपलें कर्तव्य करतो, तो आपल्या आप्तांच्या आणि पितरांच्या ऋणांतून मुक्त होतो, आणि त्याजवर पश्चात्ताप करण्याची पाळी येत नाहीं."

देवता ह्मणाली "परंतु ज्या कर्मापासून फलाची उत्पत्ति न होतां त्रास मात्र होणार आहे, नव्हे, मरण येणार आहे, तें कर्म करण्यांत काय अर्थ?"

बोधिसत्व ह्मणाला "आपला प्रयत्न यद्यपि तडीला जाण्याचा संभव नसला, तथापि होतां होईल तों आपल्या प्राणांचें रक्षण करणें हें आपलें कर्तव्य होय. लोकस्वभावच असा आहे, कीं, मनुष्याचीं सर्व कामें तडीला जातातच असें नाहीं. शेती, व्यापार वगैरे सर्व कृत्यांमध्यें मनुष्य सर्वदा यशस्वी होतोच असें नाहीं. आतां माझ्या प्रयत्नासंबंधी ह्मणशील, तर हें एक त्याचें प्रत्यक्ष फळ आहे, कीं, माझ्या बरोबरीचे इतर लोक पाण्यांत बुडून मेले असतां मी तुझ्यासारख्या महानुभाव देवतेचें दर्शन घेण्यास जगलों आहें! ह्मणून हे देवते! मी यथाशक्ति प्रयत्न करण्याचें कधींहि सोडून देणार नाहीं. या समुद्राच्या पार जाण्याची खटपट करून मी माझें पौरुष प्रगट करीन."

बोधिसत्वाचें हें दृढनिश्चयाचें भाषण ऐकून देवता प्रसन्न झाली, व तिनें बोधिसत्वाला त्याच्या इच्छेप्रमाणें मिथिला नगरीला नेऊन पोहोंचविलें.

ज्या दिवशीं बोधिसत्व सुवर्णभूमीस जाण्याला निघाला, त्याच दिवशीं पौलजनक मरण पावला. त्याला सीवली नांवाची एकुलती एक कन्या होती. पौलजनकाची अशी इच्छा होती, कीं, ती ज्या पुरुषाला वरील त्यालाच आपल्यामागून राजा करावें. परंतु तिचें मन वळविण्यास कोणीहि समर्थ झाला नाहीं. राज्यांतील मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं तिची मर्जी संपादण्यासाठीं पुष्कळ उपाय केले; परंतु ते सर्व व्यर्थ झाले. एकादा अधिकारी तिची मर्जी संपादन करण्यासाठीं राजवाड्यांत आला असतां ती त्याला "तूं माझें पादसंवाहन करशील, तर मी तुजवर प्रसन्न होईन," असे ह्मणे, आणि त्यानें त्या विधीला आरंभ

केल्याबरोबर “तुझ्या अंगीं कांहींच दम नाहीं, तूं अगदीं लाचार आहेस; तूं राजा होण्यास योग्य नाहींस,” असें ह्मणून त्याला लाथेनें झिडकारून राजवाड्यांतून हांकून देत असे.

राजाशिवाय राज्यव्यवस्था नीट चालेनाशी झाली, तेव्हां सीवलीच्या अनुमतीशिवाय कोणाला तरी राजा निवडावें, असा नागरिकांनीं निश्चय केला. निरनिराळे पण लावून ते पण जो जिंकील त्याला राज्यपद द्यावें, असें ठरलें. परंतु ते पण जिंकणारा कोणी माणूस सांपडला नाहीं. आतां राजा कोणाला करावें, अशी सर्व लोकांनां मोठी चिंता उत्पन्न झाली. तेव्हां राजाचा वृद्ध पुरोहित लोकांनां ह्मणाला “तुह्मी काळजी करूं नका. आह्मी एक मंगल रथ तयार करूं, व त्या रथाला मंगल अश्व जोडून त्याला मोकळा सोडूं. तो ज्या ठिकाणी जाऊन उभा राहील, त्या ठिकाणीं आह्मांला राज्यपदाला योग्य असा मनुष्य सांपडेल.”

ही पुरोहिताची कल्पना सर्व लोकांनां पसंत पडली. त्याप्रमाणें त्यांनीं रथ तयार केला, व त्याला चार श्यामकर्ण अश्व जोडून तो मोकळा सोडला. त्याच्या मागोमाग पुरोहित, राजाचे प्रधान वगैरे नागरिक जन व मोठी फौज निघाली.

नगराला प्रदक्षिणा करून तो रथ थेट राजाच्या उद्यानांत शिरला. त्या वेळीं महाजनक तेथील मंगल शिलेवर निजला होता. तो रथ तेथें जाऊन त्या शिलेला प्रदक्षिणा करून तेथेंच उभा राहिला. पुरोहितानें तेथें निजलेल्या बोधिसत्वाला पाहिलें, व तो आपल्या लोकांनां ह्मणाला “गृहस्थ हो, हा जर सत्पुरुष असेल तर गांभीर्यानें वागेल; नसेल, तर आह्मांला घाबरून इतस्ततः पळत सुटेल. एकदम सर्व वाद्यें वाजतील अशी व्यवस्था करा. आह्मी या मनुष्याची परीक्षा करूं.”

पुरोहिताचें भाषण ऐकून मुख्य प्रधानानें बरोबर असलेल्या वादकांनां एकदम सर्व वाद्यें वाजविण्याचा हुकूम केला. त्या वाद्यांचा एवढा मोठा घोष झाला, कीं, सामान्य मनुष्य असता, तर निःसंशय गांगरून गेला असता; परंतु बोधिसत्वानें डोक्यावरील पांघरूण काढून या मोठ्या जनसमूहाकडे एकवार पाहिलें व उजव्या कुशीवरून डाव्या कुशीवर वळून पुनः डोळे मिटले. पुरोहितानें जवळ जाऊन हळूच त्याचे पाय उघडून पाहिले. त्याच्या पायांवरील लक्षणें पाहून पुरोहित आपल्या लोकांनां ह्मणाला “गृहस्थ हो! हा सामान्य मनुष्य नव्हे. हा सार्वभौम पदाला देखील योग्य आहे!”

बोधिसत्व उठून बसला, आणि सभोंवती जमलेल्या लोकांनां उद्देशून ह्मणाला “तुह्मी माझ्याभोंवतीं कां जमलां आहां?”

पुरोहित ह्मणाला “आह्मी मिथिलेचे नागरिक आहोंत. आमचा राजा पौलजनक परलोकवासी झाला. त्याच्या जागीं दुसऱ्या राजाची निवड करण्यासाठीं आह्मी निघालों आहों. आमचा मंगल रथ येथें येऊन उभा राहिला; तेव्हां आह्मां सर्वांची मनीषा अशी आहे, कीं, आपण या देशाचें राज्यपद स्वीकारावें.”

बोधिसत्व ह्मणाला “तुमच्या इच्छेला मान देण्यास मी तयार आहें.”

तेव्हां लोकांनीं तेथेंच त्याला अभिषेक केला, व मोठ्या समारंभानें त्याजसहवर्तमान नगरामध्यें प्रवेश केला.

अनुक्रमणिका

सीवली राजकुमारीनें महाजनकाला दोनतीनदां बोलावणें पाठविलें. परंतु महाजनकानें जरूरीच्या कामांत गुंतल्याचें मिष करून तो तिच्या वाड्यामध्यें गेला नाहीं. शेवटीं तिच्या अत्याग्रहामुळें तो तिला भेटावयाला गेला. त्याचें धीरोदात्त वर्तन पाहून सीवली त्याजवर अतिशय प्रसन्न झाली. कांहीं कालानें सीवलीचें महाजनकाबरोबर लग्न झालें. त्यांनां दीर्घायु नांवाचा एक पुत्र झाला. तो वयांत आल्यावर महाजनकानें त्याला युवराजपद दिलें. जनकराजानें आपल्या प्रधानमंडळाच्या साहाय्यानें राज्यकारभार इतका उत्तम चालविला होता, कीं, आसपासच्या प्रजाहितदक्ष राजेलोकांनां जनकराजा गुरूप्रमाणें होऊन राहिला. जनकाच्या राज्यांतीलच नव्हत, परंतु इतर राज्यांतील देखील अनेक विद्वान् भाविक लोक जनकराजाची कीर्ति ऐकून त्याची भेट घेण्यास मिथिलेला येत असत.

एके दिवशीं जनकराजा उद्यानक्रीडेला चालला असतां त्यानें फलभारानें विनम्र झालेला एक आम्रवृक्ष पाहिला. राजाला त्याचें एक फळ खाण्याची इच्छा झाली, व त्यानें एका सेवकाला एक पिकलेला आंबा तोडून आणण्यास आज्ञा केली. सेवकानें तोडून आणलेला आंबा राजाला फारच आवडला, आणि त्या झाडाला वाखाणून तो पुढें गेला. राजाला या झाडाचें फळ आवडलें असें समजल्याबरोबर लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्यावर पडल्या. व त्यांनीं तेथें एक देखील फळ राहूं दिलें नाहीं. जनकराजानें उद्यानांतून परत येतांना पुनः त्या वृक्षाकडे पाहिलें. पण त्याला त्यावर एकदेखील फळ आढळलें नाहीं! इतक्यांत असा फरक कां झाला, असें जनकानें आपल्या लोकांनां विचारिलें. तेव्हां त्यांनीं सांगितलें, कीं, महाराजांनीं या झाडाची वाखाणणी केल्यामुळें लोकांनीं त्याचीं कच्चीं फळें देखील तोडून खाल्लीं! राजाला त्या झाडाची स्थिति पाहून उद्वेग उत्पन्न झाला. तो आपणाशींच ह्मणाला “अरेरे! काय ही संपत्तीची क्षणभंगुरता! मी जात असतांना हा वृक्ष फलांनीं संपन्न होता; पण आतां पहातों तों त्याजवर एकदेखील फळ दिसत नाहीं! इहलोकींच्या धनदौलतीची ही अशी स्थिति आहे! एकादा मनुष्य मोठ्या श्रमानें शीत, उष्ण, वारा इत्यादिकांनां सहन करून धन मिळवितो; परंतु अल्पकालांतच तें त्याच्यापासून चोर किंवा अन्यायी राजे हरण करतात. बरें, आमची राजसंपत्ति तरी दृढ आहे काय? माझ्या पित्यानें आपल्या भावालादेखील हा राजसंपत्तीला विघ्न करील या भीतीनें कारागृहांत टाकिलें. परंतु तोच माझ्या बापाच्या मरणाला कारण झाला. अशी ही राज्यलक्ष्मी चंचल असतां मी तिला केवळ वश होऊन राहिलों आहें!”

जनकराजा उद्यानांतून आपल्या राजधानीला गेला; परंतु त्याला राजवाड्यांतील सर्व सुखें तुच्छ वाटूं लागलीं. त्यानें दोन नोकरांशिवाय इतरांनां आपल्या महालांत येण्याची मनाई केली, व एकांतामध्यें तो परमार्थाचें चिंतन करूं लागला. तीन महिने या रीतीनें घालविल्यावर एके दिवशीं तो आपणाशींच ह्मणाला “आपल्या प्रजाजनांच्या उपयोगीं न पडतां त्यांचें अन्न मात्र मी खात आहें. या राजवाड्यांतील कारागृहवासामुळें माझ्या मनाला सुख कसें होईल? हिमालय पर्वतावर जाऊन पुण्यवान् ऋषिमुनींच्या आश्रमामध्यें राहण्याचा सुदिन कधीं उगवेल?”

राजाची अरण्यवासाची उत्कंठा इतकी वृद्धिंगत झाली, कीं, एके दिवशीं काषायवस्त्रें परिधान करून तो राजवाड्यांतून बाहेर पडला, व जवळच्या एका उद्यानांत जाऊन एका झाडाखालीं राहिला.

सीवलीदेवीला राजानें संन्यास घेतला हें ऐकून अत्यंत दुःख झालें. आपल्या दासीगणासहवर्तमान तो बसला होता तेथें जाऊन तिनें त्याची नाना रीतींनीं विनवणी केली; परंतु ती रतिभर देखील राजाचें मन वळवूं शकली नाहीं. तेव्हां तिनें राजाचें मन वळविण्याची एक युक्ति योजिली. आपल्या नोकरांनां पाठवून मिथिलेंतील मोडक्यातोडक्या घरांनां तिनें आग लावण्यास सांगितलें, आणि तीं घरें जळत असतां ती

अनुक्रमणिका

राजाला ह्मणाली “महाराज, आपण ज्या मिथिलेची अभिवृद्धि केली, तिची आपण तेथून निघाल्याबरोबर कशी दुर्दशा चालली आहे ती पहा! तुमची ही आवडती नगरी अराजक झाल्यामुळें तिचा अग्नीनें नाश होत आहे! तुह्मी कमावलेल्या सर्व धनाचा या अग्निप्रलयामध्यें नाश होईल; ह्मणून महाराज, लवकर मागें फिरून या नगरीचें रक्षण करा!”

राजा ह्मणाला “देवी, आतां पूर्वीचा जनक राहिला नाहीं. माझ्या मनानें पूर्ण वैराग्य धारण केलें आहे. सर्व मिथिला जरी जळून भस्म झाली, तरी माझें हें नवीन धन नष्ट होणार नाहीं!”

तेव्हां सीवलीनें राजाला वळविण्याचा दुसरा एक उपाय शोधून काढला. कांहीं लोकांनां सर्व शहरांत जिकडेतिकडे पळापळ करण्यास सांगितलें. कांहीं लोकांच्या अंगावर लाक्षारस ओतून, जणूं काय त्यांच्या अंगावर रक्तच वाहत आहे, असा देखावा उत्पन्न केला, व त्या लोकांनां राजाजवळ नेऊन ती राजाला ह्मणाली “महाराज, ज्या प्रजेचें तुह्मीं पुत्रवत् पालन केलें, त्या प्रजेची ही विपत्ति पहा! आपल्या मिथिला नगरींत सध्या बंडखोर शिरले आहेत, व त्यांनीं या लोकांवर प्रहार केल्यामुळें त्यांची ही स्थिति झाली आहे. हे पहा – तिकडे कांहीं लोक बंडखोरांनीं अतिशय मारल्यामुळें कण्हत पडले आहेत; दुसरे कांहीं नागरिक त्या बाजूला चहूंकडे पळत सुटले आहेत. ह्मणून हे दयाळु महाराज, आपण मागें फिरा, व या लोकांचें रक्षण करा!”

जनक ह्मणाला “मिथिलेचें रक्षण करण्याचें मिथिलेंतील तरुण लोकांनां मी शिक्षण दिलें आहे, तेव्हां अशा वेळी बंडखोरांचें ते दमन करतीलच; पण ते जर इतक्या अल्पावधींतच नामर्द बनले असतील, तर त्यांच्या शहराचें रक्षण मी एकटा कसें करूं शकेन?”

सीवलीदेवीनें आणि मिथिलेच्या नागरिकांनीं जनकराजाला मागें फिरविण्यासाठी त्याच्या पुष्कळ विनवण्या केल्या, परंतु त्याचा निश्चय ढळला नाहीं. तो ह्मणाला “मित्र हो! तुमचें माझ्यावर एवढें प्रेम आहे हे योग्यच आहे. कां कीं, राज्याभिषेक झाल्या दिवसापासून आजपर्यंत मी सतत तुमच्या हितासाठीं झटलों आहें. माझ्या कारकीर्दीत तरुण पिढीला मी अशा प्रकारचें शिक्षण दिलें आहे, कीं, विदेहराष्ट्र आजला सर्व बाबतींत पुढें आहे. विदेहाची नवीन पिढी शत्रूपासून आपलें रक्षण करण्यास समर्थ आहे. आतां माझें कर्तव्य कांहीं राहिलें नाहीं. माझें हें उत्तरवय धर्मचिंतनांत घालविणें मला अत्यंत इष्ट आहे. सामान्य-जनाप्रमाणें धनाची आणि राजसत्तेची तृष्णा न सोडतां मिथिलेच्या राजाला मरण आलें, तर त्यांत तुमचा काय फायदा होणार आहे? परंतु उत्तरवय धर्मचिंतनाकडे लावावें व तृष्णेचा समूळ उच्छेद करीत असतां मरण यावें, असें मीं उदाहरण घालून दिलें असतां वृद्ध आणि तरुण पिढीमध्यें धनाच्या आणि सत्तेच्या तृष्णेनें जे कलह माजतात ते बंद पडतील, व सर्व जनांची इहलोकींची संसारयात्रा सुखावह होईल; तेव्हां तुह्मी आतां माझ्या मागें न लागतां, दीर्घायूला राज्यपद देऊन एकमतानें राज्यकारभार चालवा.” असें सांगून जनकराजानें आपल्या लोकांनां मागें फिरविलें व हिमालयाचा मार्ग धरला.

या जन्मामध्यें मोठ्या शौर्यानें समुद्र तरून जाऊन, व तदनंतर आपल्या प्रजेचें मोठ्या दक्षतेनें कल्याण करून, बोधिसत्वानें वीर्यपारमितेचा अभ्यास केला. पुढें राज्याचा त्याग करून, व उतार वयांतील लोकांना वैराग्याचें उदाहरण घालून देऊन, नैष्कर्म्यपारमितेचा अभ्यास केला. सीवलीनें मिथिला जळत आहे, मिथिलेंतील लोकांनां बंडखोर लुबाडीत आहेत, असें सांगितलें असतांहि आपली सात्विक उपेक्षा ढळूं न देतां बोधिसत्वानें उपेक्षापारमितेचा अभ्यास केला. याच जन्मामध्यें नव्हे, तर आणखी अनेक जन्मांमध्यें

बोधिसत्वानें या पारमितांचा अभ्यास केला. आतां बोधिसत्वानें प्रज्ञापारंवितेचा अभ्यास कसा केला, याचें एक उदाहरण सांगतों.

[६]

## महौषधाची गोष्ट

मिथिलानगरीमध्यें एका कालीं वैदेह नांवाचा राजा राज्य करीत होता. सेनक, पुक्कुस, काविंद, आणि देविंद हे चार त्याचे विद्वान् अमात्य होते. एके दिवशीं राजाला असें स्वप्न पडलें, कीं, “राजांगणामध्ये चार मोठालीं अग्निकुंडें प्रज्वलित झालीं आहेत, इतक्यांत तेथें एक काजव्याएवढी ठिणगी उत्पन्न झाली व ती वाढत जाऊन तिनें त्या चारहि अग्निकुंडांनां ग्रासून टाकलें.”

प्रातःकालीं जेव्हां अमात्य राजाच्या दर्शनाला आले, तेव्हां राजा त्यांनां ह्मणाला “रात्रीं मला चांगली झोंप आली नाहीं. मीं एक भयंकर स्वप्न पाहिलें.”

सेनकानें राजाला कोणतें स्वप्न पडलें, अशी पृच्छा केल्यावर राजानें तें त्याला सांगितलें. तेव्हां सेनक ह्मणाला “महाराज, घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. या स्वप्नाचा अर्थ चांगला आहे. आजला जे आह्मी चार अमात्य या राजभवनामध्यें आपल्या बुद्धितेजानें प्रकाशत आहों, तेथें अप्रसिद्ध कुळांतील एक मनुष्य पुढें येईल, व तो आपल्या बुद्धिप्रभावानें आह्मां सर्वांनां मागें टाकील, असें आपल्या या स्वप्नावरून भविष्य करतां येतें.”

मिथिलेपासून कांहीं अंतरावर प्राचीनयवमध्यक नांवाचें एक लहानसें शहर होतें. तेथें श्रीवर्धन नांवाचा एक सुशील गृहस्थ रहात होता. ज्या दिवशीं वैदेह राजाला वरील स्वप्न पडलें, त्याच दिवशीं श्रीवर्धनाची साध्वी स्त्री गर्भवती झाली. नवमास पूर्ण झाल्यावर तिला एक सुस्वरूप पुत्र झाला. हाच आमचा बोधिसत्व होय. नामकरणाच्या दिवशीं या मुलाचें नांव ‘महौषध’ असें ठेवण्यांत आलें. महौषध जेव्हां वयांत आला, तेव्हां आपल्या बुद्धिबलानें शहरांतील सर्व तरुण मुलांचा तो पुढारी बनला.

एके दिवशीं शेंकडों मुलांबरोबर तो क्रीडामंडलामध्यें खेळत असतां एकाएकीं पावसाची मोठी सर आली, व सर्व मुलांचे कपडे भिजून चिंब झाले. बोधिसत्व ह्मणाला “गडे हो, पाऊस पडत असतां खेळण्यासाठीं आह्मी एक क्रीडाशाळा बांधूं या. तुह्मी तुमच्या वडिलांकडून प्रत्येकीं एकएक कार्षापण [कार्षापण हें एक नाणें होतें.] आणा.”

मुलांनीं बोधिसत्वाच्या सांगण्याप्रमाणें वर्गणी गोळा करून त्याच्या स्वाधीन केली. महौषधानें शहरांतील मुख्य सुताराला बोलावून आणून एक उत्तम शाला तयार करण्यास सांगितलें. परंतु त्या सुतारानें केलेला नकाशा महौषधाला पसंत पडला नाहीं. त्यानें स्वतः नकाशा तयार करून व स्वतः देखरेख करून त्या सुतारामार्फत एक उत्तम शाळा बांधिली. या शाळेच्या एका टोंकाला, पाऊस पडला असतां खेळण्याची सोय केली होती. परंतु प्रमुख विभागांतून निरनिराळ्या गरजू लोकांची सोय करण्यांत आली होती. एक भाग पान्थस्थ लोकासाठीं राखून ठेवण्यांत आला होता; दुसऱ्या एका भागामध्यें गरीब स्त्रियांसाठीं प्रसूतिगृह तयार केलें होतें; तिसऱ्या ठिकाणीं धर्मोपदेशगृह बांधिलें होतें, व त्याला जोडून एक न्यायसभा केली होती.

अनुक्रमणिका

बोधिसत्वानें बांधलेल्या या अपूर्व शाळेमुळें त्याची कीर्ति त्या नगरांत व आसपासच्या गांवांत पसरली. ती शाळा पहाण्यासाठी दूरदूरचे लोक मुद्दाम येऊं लागले. लवकरच बोधिसत्वानें आणखी वर्गणी जमवून आपल्या शाळेजवळ एक सुंदर तलाव बांधला.

एके दिवशीं बोधिसत्व आपल्या सोबत्यांसहवर्तमान शाळेजवळ खेळत असतां दोघे शेतकरी एका बैलाच्या जोडीसंबंधान भांडत चालले होते. त्यांनां बोधिसत्वानें बोलावून आणिलें व तुह्मी कशासाठीं भांडतां, असा प्रश्न केला. तेव्हां त्यांतील एकजण ह्मणाला "हे पंडित, मी तुझ्या तलावाचें पाणी पिऊन व बैलाला पाणी पाजून एका झाडाखालीं विश्रांति घेत पडलों होतों. माझे हे बैल जवळच चरत होते. इतक्यांत माझा डोळा लागला, व हे बैल मला न कळत जंगलात शिरले. तेथें या मनुष्यानें त्यांनां पकडलें, व आतां हा हे बैल आपलेच आहेत असें ह्मणत आहे!"

दुसरा ह्मणाला "हे पंडित, तूं या मनुष्यावर बिलकूल विश्वास ठेवूं नकोस. हा मोठा लबाड आहे. मी माझ्या घरचे हे बैल घेऊन बाजारांत विकावयाला जात असतां हा मनुष्य वाटेंत भेटला, व हे बैल आपले आहेत असा तंटा करूं लागला."

बोधिसत्व ह्मणाला "मीं दिलेला न्याय तुम्हांला पसंत पडेल काय?"

त्या दोघांनीं बोधिसत्वानें दिलेला निवाडा मान्य करण्याचें कबूल केलें. तेव्हां बोधिसत्वानें एकाला तेथें ठेवून दुसऱ्याला दुसऱ्या ठिकाणीं नेऊन ठेविलें. व तेथें जमलेल्या सर्व लोकांसमक्ष पुनः एकवार सर्व हकीगत विचारून घेतली. त्या मनुष्यानेंहि आपण हे बैल बाजारांत विकण्यासाठी घेऊन जात होतों, इत्यादि पूर्ववत् सांगितलें. तेव्हां त्याला बोधिसत्वानें असा प्रश्न केला, कीं, "या बैलांनां तूं आज काय चारलें आहेस?"

तो म्हणाला "मी यांनां तिळांची पेंड आणि तांदुळांची कांजी चारली आहे."

बोधिसत्वानें तेथें जमलेल्या सर्व मंडळीला त्याचें म्हणणें नीट ध्यानांत ठेवण्यास सांगून त्याला तेथून अन्य ठिकाणीं नेवविलें, आणि त्याच्या प्रतिपक्ष्याला तेथें आणिलें. त्यानें आपण झाडाखालीं निजलों असतां बैल जंगलांत पळून गेले, इत्यादि हकिगत सांगितल्यावर बोधिसत्व त्याला म्हणाला "पण तूं आज या जनावरांनां काय काय चारिलें आहेस?"

तो ह्मणाला "मी यांनां दुसरें काय चारणार? सकाळपासून ते केवळ जंगलांतील गवत खाऊन आहेत."

बोधिसत्वानें सभास्थानांतील लोकांनां त्याचें हें ह्मणणें नीट लक्ष्यांत घेण्यास सांगितलें; आणि प्रियंगु वल्लीचीं पानें आणवून बारीक कुटून त्यांचें पाणी त्या बैलांनां पाजिलें. त्यायोगें बैलांनीं थोडक्या अवकाशांत मलोत्सर्ग केला. पण शेणामध्यें तिळांच्या पेंडीचा अंशदेखील दिसून आला नाहीं. तेव्हां बोधिसत्व त्या दोघांनांहि तेथें आणवून ह्मणाला "जो गृहस्थ आपण निजलों असतां बैल जंगलांत शिरले असें ह्मणतो, तो या बैलांचा खरा मालक आहे, व जो आपण तिळांची पेंड चारली असें ह्मणतो, तो तोतया आहे."

अनुक्रमणिका

बोधिसत्वानें दिलेला न्याय सभागृहांतील सर्व लोकांनां पसंत पडला. तोतयानें आपला गुन्हा कबूल केला. पुनरपि असलें दुष्कृत्य न करण्याविषयीं त्याला बोधिसत्वानें बजावून सांगितलें, व बैल खऱ्या मालकाच्या हवालीं केले. तेव्हां तेथें जमलेले सर्व लोक बोधिसत्वाच्या बुद्धिमत्तेची तारीफ करीत आपापल्या घरी निघून गेले.

एके दिवशी एक स्त्री आपल्या मुलाला घेऊन महौषधाच्या तलावावर अंग धुण्यास आली मुलाला कांठावर ठेवून अंग धुण्यासाठी ती खालीं उतरली असतां एक यक्षिणी तेथें येऊन तिला ह्मणाली "कायग, हा तुझा मुलगा आहे काय? हा किती तरी गोजिरवाणा दिसतो! याला मी थोडे दूध पाजूं काय?"

मुलाची आई ह्मणाली "कांहीं हरकत नाहीं."

यक्षिणीनें त्या मुलाला पाजून व क्षणभर खेळवून त्याला घेऊन ती जाऊं लागली. तेव्हां तिचें व त्या मुलाच्या आईचें भांडण जुंपलें. तेथें जमलेल्या लोकांनीं त्या दोघींनां मुलासहवर्तमान बोधिसत्वासमोर आणून उभें केलें.

बोधिसत्व ह्मणाला "माझा निवाडा तुह्मी कबूल कराल काय?"

त्यांनी 'होय' असें उत्तर दिल्यावर तो ह्मणाला "तुम्ही दोघीजणी या मुलाच्या हाताला व पायाला धरून ओढा. जी या मुलाला ओढून नेऊं शकेल, ती याची खरी आई."

त्या दोघी त्या मुलाला ओढूं लागल्या, तोंच तें मूल मोठमोठ्यानें रडूं लागलें. त्याच्या खऱ्या आईनें त्याला तेव्हांच सोडून दिलें, आणि एका बाजूला जाऊन ती करुण स्वरानें रुदन करूं लागली. परंतु यक्षिणीच्या तोंडावर आपला जय झाल्याबद्दल हास्य दिसत होतें.

बोधिसत्व ह्मणाला "सभ्य हो, मुलाला सोडून देऊन बाजूला रडत असलेली ही स्त्री मुलाची खरी आई आहे. आपल्या मुलाच्या रडण्यानें तिचें अंतःकरण कळवळलें, व तिनें त्याला ताबडतोब सोडून दिलें; परंतु यक्षिणीच्या चेहऱ्यावर तिला मुलाबद्दल वाईट वाटल्याचें काहीच चिन्ह दिसत नाहीं."

सभागृहांतील लोकांनां बोधिसत्वानें दिलेला न्याय पसंत पडला. यक्षिणीनें आपला गुन्हा कबूल केला, व मुलाला त्याच्या आईच्या स्वाधीन करून ती लाजेनें तोंड खालीं करून तेथून निघून गेली.

बोधिसत्वाच्या चातुर्याची कीर्ति वैदेह राजाच्या कानांपर्यंत कधींच पोहोंचली होती. आपल्या दरबारांत त्याची योजना करण्याचा विचार राजानें अनेकदां मनांत आणिला, परंतु या कामीं अमात्यांची त्याला संमति न मिळाल्यामुळें राजाला तो बेत अमलांत आणतां आला नाहीं. तथापि राजा वारंवार बोधिसत्वाचा समाचार घेत असे. निरनिराळ्या उपायांनीं त्यानें बोधिसत्वाचें चातुर्य कसोटीला लावून पाहिलें; आणि जेव्हां त्याची खात्री झाली, तेव्हां आपल्या अमात्यांची मसलत न घेतां बोधिसत्वाच्या आईबापांच्या संमतीनें त्यानें बोधिसत्वाला आपल्या वाड्यांत आणून ठेविलें.

अनुक्रमणिका

बोधिसत्व तरुण असल्यामुळें राजाच्या दरबारांत त्याचें एकदम तेज पडलें नाहीं. तथापि आपल्या बुद्धिबलावर क्रमशः त्यानें सर्व अमात्यांत पहिली जागा पटकाविली. अर्थात् राजाचे चारहि अमात्य त्याचा अतिशय मत्सर करूं लागले. त्यांनीं बोधिसत्वाला हाणून पाडण्यास पुष्कळ प्रयत्न केले; परंतु बोधिसत्वानें आपल्या चातुर्यानें त्यांच्या प्रयत्नांला यश येऊं दिलें नाहीं.

त्या कालीं पांचालदेशामध्यें चूलनिब्रम्हदत्त नांवाचा राजा राज्य करीत होता. केवट्ट नांवाचा ब्राम्हण त्याचा मुख्य प्रधान होता. केवट्टाच्या सल्ल्यान ब्रम्हदत्तानें सर्व भरतखंडाचें एकछत्री राज्य संपादण्याचा निश्चय केला. त्यानें आपल्या सैन्यासहवर्तमान लहानसान देश पादाक्रांत केले, अनेक राजांनां आपले मांडलिक केलें, व आपली आज्ञा न मानणाऱ्या राजांनां पदच्युत करून त्यांची गादी आपल्या हुकुमात वागणाऱ्या त्यांच्या आप्तांनां दिली.

ब्रम्हदत्तानें एवढी घडामोड केली, तथापि विदेहाच्या राज्यावर स्वारी करण्याचें साहस केलें नाहीं. परंतु मिथिला हस्तगत केल्यांवाचून इतर राजे त्याला सर्वथैव शरण जाण्यास तयार नव्हते. तेव्हां त्यानें मोठी फौज गोळा करून विदेह राष्ट्रावर हल्ला केला.

वैदेह राजाच्या अंगीं आपल्या शत्रूचा पराभव करण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्यानें आपल्या प्रधानांनां बोलावून पुढें काय करावें, यासंबंधानें मसलत विचारली. सर्वांचें म्हणणें असें पडलें, कीं, ब्रम्हदत्तापुढें आपलें कांहीं एक चालावयाचें नाहीं; परंतु बोधिसत्वानें राजाला धीर दिला. तो म्हणाला “महाराज, आपण घाबरूं नये. चूलनिब्रम्हदत्त लवकरच आमच्या राज्यांतून पळून जाईल!”

हें ऐकून राजानें सर्व भार बोधिसत्वावर टाकिला.

बोधिसत्वानें मिथिलेमध्यें कडेकोट बंदोबस्त चालविला. शहरांतील सर्व लोकांनां तीनचार वर्षे पुरेल एवढी सामग्री निरनिराळ्या कोठारांतून सांठविली; मिथिलेभोंवतीं जो तट होता त्याची दुरुस्ती केली; आणि जागोजागीं शहराच्या रक्षणासाठीं निवडक फौज ठेविली.

ब्रम्हदत्तानें विदेहाचीं लहानसान गांवें काबीज करण्याच्या नादाला न लागतां एकदम मिथिलेवर स्वारी केली, व मिथिलेला वेढा दिला. केवट्टाचें असें म्हणणें होतें, कीं, मिथिलेंतील लोकांशीं लढाई करून आपल्या फौजेचा नाश करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. शहरांतील धान्यसंचय संपल्याबरोबर ते आपोआप आपल्या हातीं येतील. तेव्हां ब्रम्हदत्ताचें सर्व सैन्य मिथिलेच्या आसपास तळ देऊन बसलें. बरेच महिने गेले, परंतु मिथिलेंतील अन्नसामग्री संपण्याचें चिन्ह दिसेना.

ब्रम्हदत्तानें तीन वर्षेपर्यंत वेढा दिला असता, तरी मिथिलेंतील लोकांवर उपाशी मरण्याची पाळी आली नसती; परंतु वैदेह राजाला ब्रम्हदत्ताच्या धास्तीमुळें झोंप येईनाशी झाली. बोधिसत्वाला बोलावून आणून तो म्हणाला “हे पंडित, तूं माझ्या शहराचा चांगला बंदोबस्त केलास, याबद्दल मला फार आनंद होत आहे. परंतु या ब्रम्हदत्ताच्या समुद्रासारख्या सेनेकडे नजर फेंकिली असता माझ्या छातींत धडकीच भरते. मला आतांशा झोंप कशी ती मुळींच येत नाहीं.”

अनुक्रमणिका

बोधिसत्व म्हणाला "महाराज, ब्रम्हदत्ताला येथून हांकून लावण्याच्याच प्रयत्नांत मी आहें. पण प्रयत्नाला यश येण्यास कांहीं काळ लागतो. झाडाचें बीं पेरून दुसऱ्याच दिवशीं फळाची अपेक्षा करणें योग्य नाहीं. माझ्या प्रयत्नांला लवकरच यश येईल, अशी माझी खात्री आहे. तोपर्यंत आपण न डगमगतां निश्चिंत असावें."

अनुकेवट्ट नांवाचा महौषधाचा एक मित्र होता. तो नगराच्या प्राकारावरून मेवामिठाई ब्रम्हदत्ताच्या लोकांजवळ फेंकीत असे, व त्यांनां म्हणे, कीं, तुम्ही इतक्यांत वेढा उठवूं नका. वैदेह राजा त्या मूर्ख महौषधासहवर्तमान लवकरच तुम्हांला शरण येईल! शहरांतील दाणागोटा संपत आला आहे!"

अनुकेवट्टाचें हें भाषण एके दिवशीं वैदेह राजाच्या शिपायांनी ऐकिलें. त्यांनीं त्याला धरून महौषधासमोर नेलें. महौषधानें त्याची धिंड काढून त्याला शहरांतून हांकून लावण्याचा हुकुम केला. त्याप्रमाणें त्याचे सात पाट काढण्यांत येऊन त्याला शहारांतून हांकून देण्यांत आलें. तो ब्रम्हदत्तराजाच्या शिपायांजवळ जाऊन म्हणाला "तुम्हांला मदत केल्याचें हें फळ आहे. त्या दुष्ट शेतकऱ्याच्या पोरानें – महौषधानें – माझी ही कोण दुर्दशा केली आहे पहा!"

ब्रम्हदत्ताच्या शिपायांनीं त्याला आपल्या राजाजवळ नेलें. त्याची सर्व हकीगत ऐकून घेतल्यावर ब्रम्हदत्त मोठ्या आनंदानें म्हणाला "महौषधानें तुझी अशी फजिती केल्याबद्दल वाईट वाटूं देऊं नकोस. मी तुला माझ्या राज्यांत मोठ्या पदवीला चढवीन. तूं माझ्याजवळ रहा."

ब्रम्हदत्तराजाचा अनुकेवट्टावर हळुहळू पूर्ण विश्वास बसला.

इकडे बोधिसत्वानें राजाच्या कोठारांतील निवडक वस्त्रें आणि अलंकार काढून त्यावर आपला शिक्का मारला, व तीं ब्रम्हदत्ताच्या सैन्यांत विकावयाला पाठविलीं. तीं पाहून ब्रम्हदत्ताच्या सरदारांनां व मानकऱ्यांनां अत्यंत लोभ सुटला. ते बोधिसत्वानें पाठविलेल्या व्यापाऱ्यांनां ह्मणाले "तुह्मीं हे जिन्नस येथें विकण्यासाठीं कां आणिले आहेत?"

व्यापारी ह्मणाले "मिथिलेमध्यें सध्या उपासमार चालली आहे. तेथें यांतील एकादें वस्त्र किंवा एकादा दागिना दिला, तरी एका दिवसाला एकट्या माणसाला पुरेल एवढी अन्नसामग्री मिळावयाची नाहीं. तुह्मी तुमच्या राजाला नकळत थोडेंसें धान्य मिथिलेमध्यें नेण्यास परवानगी द्याल, तर आह्मी हे सर्व जिन्नस तुह्मांला देऊन टाकूं."

ब्रह्मदत्ताच्या मानकऱ्यांनीं आणि सरदारांनीं असा विचार केला, कीं, "एवढे अमोलिक जिन्नस आह्मांला देऊन यांनी दोन दिवसांला पुरेल एवढी बेगमी शहरांत नेली असतां आमच्या राजाचें त्यापासून कांहींच अहित होण्यासारखें नाहीं. फार झालें, तर आम्हांला दोन दिवस जास्त लागतील. आणखी दोन दिवस वेढा देऊन बसलों, ह्मणजे हे लोक आपोआपच शरण येतील." तेव्हां थोडेंसें धान्य मोबदला देऊन त्या व्यापाऱ्यांपासून त्यांनीं ते जिन्नस खरेदी केले, व सर्वांनीं आपापसांत वांटून घेतले.

ब्रह्मदत्तराजा एके दिवशीं एकांतांत अनुकेवट्टाला ह्मणाला "मिथिलेमध्यें अन्न मिळण्याची पंचाईत पडली आहे, असें तुह्मी ह्मणतां, परंतु तुमचा तो शेतकऱ्याचा पोर अद्यापि कां शरण येत नाहीं?"

अनुकेवट्ट ह्मणाला “माझ्या कानावर एक अत्यंत उद्वेगजनक बातमी आली आहे. मिथिलेंतील लोक अद्यापि शरण येत नाहींत, हें पाहून ती बातमी खरी असावी, अशी मला बळकट शंका येते. आपण ज्या सरदारांचा एवढा गौरव करीत आहां, तेच सरदार महौषधाकडून अमोलिक वस्त्रें आणि अलंकार बक्षिसादाखल घेऊन मिथिला शहरांत आपणाला न कळत धान्य जाऊं देत आहेत! आपल्या या सैन्यांत महौषधाकडून लांच खाल्ला नाहीं, असा एकदेखील अधिकारी नसावा. नाहीतर मिथिलेंतील लोकांनां बाहेरची अन्नसामग्री कशी मिळाली, हें आपणाला कधींच समजलें असतें.”

ब्रह्मदत्त ह्मणाला “हे अनुकेवट्ट! तूच काय तो माझा हितकर्ता आहेस, असें दिसतें. आतां माझे सरदार व मानकरी फितूर झाले आहेत, याची परीक्षा कशी करतां येईल हें सांग.”

अनुकेवट्ट ह्मणाला “हें काम फार सोपें आहे. आपण उद्यां एक दरबार भरवा, व तेथें सर्व मानकऱ्यांनां व सरदारांनां बोलावून आणा. त्यांपैकीं कित्येकांच्या अंगावर महौषधानें दिलेलीं वस्त्रें व अलंकार दिसून आले, तर खात्रीनें समजा, कीं, हे लोक महौषधाला वश झाले आहेत.”

अनुकेवट्टाची युक्ति ब्रह्मदत्ताला फारच पसंत पडली. त्यानें दुसऱ्या दिवशीं एक मोठा दरबार भरवून सरदारदरकदार वगैरे लोकांनां आपापले उत्तमोत्तम वस्त्रालंकार घालून तेथें येण्यास हुकुम केला. सरदारांनीं व मानकऱ्यांनीं नुकतेच विकत घेतलेले कपडे अंगावर घातले व ते त्या दरबाराला गेले. ब्रह्मदत्तराजाचें सर्व लक्ष्य त्यांच्या त्या कपड्यांकडे व दागिन्यांकडे लागलें होतें. प्रत्येक सरदाराच्या आणि मानकऱ्याच्या अंगावर पूर्वी कधीं न पाहिलेले वस्त्रालंकार त्यानें या दिवशी पाहिले. एवढेंच नव्हे, तर पुष्कळ वस्त्रांवर आणि अलंकारांवर महौषधाचा शिक्का त्याच्या पहाण्यांत आला. तेव्हां त्याच्या मनाची खात्री झाली, कीं, महौषधानें मोठमोठाली बक्षिसें देऊन सैन्यांतील सर्व अधिकाऱ्यांनां फितूर केलें आहे. अनुकेवट्टाच्या ह्मणण्याची प्रतीति आल्यामुळें त्यावर ब्रह्मदत्ताचा पूर्ण विश्वास बसला.

एके दिवशीं अनुकेवट्ट घाबऱ्याघाबऱ्या ब्रह्मदत्तापाशीं येऊन ह्मणाला “महाराज! आपण येथून आजच्या आज पळून जा कसे! आपल्या सरदारांनी आणि मानकऱ्यांनी असा एक गुप्त कट केला आहे, कीं, उद्यां सकाळीं आपणाला पकडून महौषधाच्या स्वाधीन करावयाचें, आणि एकदां आपण त्या शेतकऱ्याच्या पोराच्या ताब्यांत गेलां, ह्मणजे आपल्या जीविताची आशा करावयालाच नको!”

हें वर्तमान ऐकून ब्रम्हदत्तराजा गडबडून गेला. पुढें काय करावें, हेंच त्याला समजेना. तो अनुकेवट्टाला ह्मणाला “या संकटांतून पार पाडणारा तुझ्यावांचून मला दुसरा कोणी नाहीं.”

अनुकेवट्ट ह्मणाला “महाराज, तुह्मी असे घाबरूं नका. तुमच्या सरदारांनीं आणि मानकऱ्यांनीं केलेल्या कटाची बातमी तुह्माला समजली आहे, असें तुमच्या साशंक चर्येवरून त्यांनां दिसून आल्यास ते तुह्माला आजच्या आज पकडून महौषधाच्या स्वाधीन करतील. ह्मणून आजचा दिवस तुह्मी मोठ्या गांभीर्यानें वागलें पाहिजे. आज रात्रीं आपणाला येथून पळून जातां येईल, अशी मी व्यवस्था करतों.”

अनुकेवट्टानें कोणाला न कळत आपल्या विश्वासू शिपायाकडून त्या रात्रीं दोन उत्तम घोडे तयार करविले, व मध्यरात्रीच्या सुमाराला तो ब्रह्मदत्ताजवळ जाऊन त्याला ह्मणाला “महाराज, येथून निघून

अनुक्रमणिका

जाण्याची हीच वेळ आहे. पलीकडील आंबराईंत दोन घोडे तयार आहेत. तेथपर्यंत कोणाला चाहूल न दाखवितां आह्मी चालत जाऊं, व तेथें त्या घोड्यांवर स्वार होऊन पळून जाऊं."

तेव्हां ब्रह्मदत्त आणि अनुकेवट्ट त्या घोड्यांवर स्वार होऊन कोणाला नकळत तेथून पळून गेले.

कांहीं अंतरावर गेल्यावर अनुकेवट्ट ह्मणाला "महाराज, त्या दुष्ट शेतकऱ्याच्या पोराची मला बळकट शंका येते. त्याचे हेर रात्रंदिवस आपल्या सैन्यामध्यें घिरट्या घालीत आहेत. आपण दोघे पळून गेलों, हें वर्तमान त्याला इतक्यांत समजलेंच असेल, व आमच्या मागोमाग तो आह्मांला पकडण्यासाठीं घोडेस्वार पाठवील. माझ्या जीविताची मला पर्वा नाहीं; परंतु आपणाला जर त्यांनीं पकडलें, तर मीं आपणाला वांचविण्यासाठीं केलेली ही सर्व खटपट व्यर्थ जाणार आहे. ह्मणून मी असें ह्मणतों, कीं, आपण मागें न पहातां थेट आपल्या राजधानीचा रस्ता धरावा. मी येथेंच उभा रहातों, आणि आह्मांला पकडण्यासाठी घोडेस्वार आले असतां त्यांनां कांहींतरी थाप देऊन भलत्याच मार्गाला लावतों. मला ते पकडून नेतील, यांत शंका नाहीं. परंतु माझ्याबद्दल आपण काळजी करूं नका. मी त्या शेतकऱ्याच्या पोराला ओळखून आहें. त्यानें जरी मला पकडलें, तरी युक्तिप्रयुक्तीनें त्याच्या हातून निसटून लवकरच मी आपल्या दर्शनाला येईन."

ब्रह्मदत्ताला यावेळीं आपलेच प्राण वांचविण्याची पंचाईत पडली होती. तो अनुकेवट्टाची काळजी वागवीत कशाचा बसतो? त्यानें अनुकेवट्टाला तेथेंच सोडून पांचालदेशचा रस्ता धरला! अनुकेवट्ट तेथूनच मागें फिरला, आणि सकाळ होण्याच्या आधीं ब्रह्मदत्त पळून गेल्याची वार्ता त्यानें महौषधाला कळविली.

महौषधानें आपल्या निवडक सैन्यासहवर्तमान पहांटेला अकस्मात् ब्रह्मदत्ताच्या सैन्यावर घाला घातला. ब्रह्मदत्ताच्या सैन्यांत जिकडेतिकडे मोठी गडबड उडून गेली. सरदार आणि मानकरी राजाच्या वसतिस्थानाकडे धांवले; परंतु तेथें राजा पळून गेल्याची बातमी अनुकेवट्टानें अगोदरच पसरून ठेविली होती. ती बातमी समजल्याबरोबर जो तो अव्यवस्थितपणें पळूं लागला. ब्रह्मदत्ताच्या सैन्याचा पूर्ण पराजय झाला. महौषधानें जय मिळविला, एवढेंच नव्हे, तर ब्रह्मदत्ताच्या पळून गेलेल्या सैन्यानें टाकून दिलेलीं शस्त्रास्त्रें, वस्त्रें, भूषणें हीं सर्व मिळविलीं. बोधिसत्वाच्या चातुर्याची वैदेहराजाने मोठी तारीफ करून सर्व नागरिकांसमोर त्याचा बहुमान केला.

ब्रह्मदत्त व त्याचें सैन्य पांचालदेशाला पळून गेल्यावर जो तो ब्रह्मदत्ताच्या पराजयाचें कारण शोधूं लागला; परंतु ब्रह्मदत्त आपण कां पळालों, हें सांगण्यास तयार नसल्यामुळें तें कोणालाहि समजलें नाहीं. ब्रह्मदत्त मात्र मनांतल्यामनांत फार ओशाळला. अनुकेवट्ट हा महौषधाचा हेर होता, याबद्दल हळुहळू त्याची खात्री होत गेली. गेलेलें यश परत मिळविण्यासाठीं आपल्या केवट्टब्राम्हणाशीं एकांतांत तो अनेक मसलती करूं लागला. शेवटीं केवट्टानें व त्यानें वैदेहराजाला आपल्या हस्तगत करण्याची एक नवी युक्ति शोधून काढिली.

ब्रह्मदत्ताला एक सुस्वरूप कन्या होती. ती तारुण्यांत आल्यामुळें लवकरच तिचा विवाह करण्याचा बेत ठरला होता. ब्रह्मदत्तानें आपल्या राज्यांतील नामांकित कवींनां बोलावून तिच्या सौंदर्यावर कविता करविल्या, व भाटांकडून त्या देशोदेशीं फैलाविल्या. तदनंतर त्यानें केवट्ट ब्राम्हणाबरोबर वैदेहराजाला

निरोप पाठविला, कीं, “माझी एकुलती एक कन्या तुह्माला देऊन तुमच्याशीं कायमचें सख्य करण्याची माझी उत्कट इच्छा आहे.”

केवट्टब्राम्हणानें मोठमोठाले नजराणे वैदेहराजाला देऊन त्याच्या दरबारामध्यें आपल्या राजाचा निरोप त्याला निवेदित केला. वैदेहराजानें आपल्या अमात्यांची या कामीं सल्ला घेतली. त्याच्या जुन्या प्रधानांनीं असा संबंध घडून येणें इष्ट आहे, असें सांगितलें; परंतु बोधिसत्व ह्मणाला “महाराज, आपल्या कन्येचें आमिष लावून ब्रह्मदत्त आपल्याला भूलवूं पहात आहे. आपण जर त्याला भुललां, तर मासा जसा गळाला लागून नाश पावतो, तसे आपण नाश पावाल. आपण ब्रह्मदत्ताचीं गोडगोड भाषणें ऐकून जर पांचालदेशाला जाल, तर आपल्या हातानें आपला नाश करून घ्याल!”

वैदेहाला बोधिसत्वाचें भाषण ऐकून अत्यंत संताप आला आणि तो ह्मणाला “असल्या नाजुक कामीं मीं तुझ्यासारख्या नांगऱ्याची सल्ला विचारली, हा माझाच मूर्खपणा होय. या बाबतींत माझे जुने प्रधान जशी मला सल्ला देऊं शकतील, तसा तूं देऊं शकणार नाहींस, हें मला पूर्वीच माहीत असावयाला पाहिजे होतें! मोठमोठ्या कुलांशीं संबंध जोडून आणणें, हीं कामें हीनकुळांत जन्मलेल्या माणसाला कशीं साधतील?”

वैदेह आपल्या नोकरांकडे वळून ह्मणाला “अरे, या मूर्ख महौषधाला गचांडी देऊन येथून हांकून द्या. मला रूपवती स्त्रीचा लाभ घडत असतां त्याला हा आपल्या मूर्खपणानें अंतराय करूं पहात आहे!”

महौषधानें वारा कोठून वहात आहे, हें ताडलें. आपला धनी कामांध झाला आहे व त्याला या वेळी सदसद्विवेक राहिला नाहीं, असें जाणून तो तेथें एक क्षणभर देखील राहिला नाहीं. आपण तेथें राहिलों, तर बोलल्याप्रमाणें राजा आपणाला गचांडी देऊन काढील, हें तो जाणून होता. ह्मणून मुकाट्यानें राजवाड्यांतून निघून तो आपल्या पित्याच्या घरीं गेला.

इकडे वैदेहराजानें केवट्टब्राह्मणाला आपण ब्रह्मदत्ताच्या कन्येशीं विवाह करूं, असें अभिवचन दिलें. मात्र विवाहाला मुहूर्त कोणता, तें उत्तम ज्योतिष्यांच्या सल्ल्यानें ठरवून मागाहून कळवितों, असें सांगितलें.

केवट्टानें माघारें जाऊन सर्व वृत्तांत ब्रह्मदत्ताला निवेदन केला. आपल्या मसलतीच्या बीजाला पालवी फुटत आहे, हें पाहून ब्रह्मदत्ताला अत्यंत हर्ष झाला.

महौषध जरी राजापासून दूर गेला होता, तरी रात्रंदिवस आपल्या धन्याच्या हिताची काळजी त्याला लागली होती. आपला धनी कामांध होऊन ब्रम्हदत्ताच्या पाशांत पडूं पहात आहे, याबद्दल त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्यानें राजाला निरोप पाठविला, कीं, “ब्रम्हदत्ताच्या कन्येबरोबर विवाह करण्याचा राजेसाहेबांचा जर निश्चयच ठरला असेल, तर घाई न करतां विवाहविधि जरा लांबणीवर टाकावा. मी पांचाल देशाच्या राजधानीला जाऊन विदेहाच्या राजाला योग्य असें एक निवासस्थान तयार करतों. हें स्थान तयार झाल्यावर आमच्या महाराजांनी तेथें यावें. असें केलें असतां आमच्या देशाची अब्रू राहील.”

वैदेहराजाला महौषधाला घालवून दिल्याबद्दल अत्यंत दुःख झालें होतें. संकटसमयीं महौषधाचा कसा उपयोग होतो, हें तो विसरला नव्हता. महौषधानें आपल्याबरोबर पांचालदेशास यावें, अशी त्याची

अनुक्रमणिका

उत्कट इच्छा होती. तेव्हां महौषधाच्या या निरोपानें त्याला अत्यंत आनंद झाला, आणि त्यानें महौषधाला बोलावून आणून पांचालदेशाला जाऊन आपल्या गमनाची सर्व सिद्धता करण्यास आज्ञा केली.

महौषध राजाच्या हुकमाप्रमाणें आपले निवडक लोक बरोबर घेऊन पांचालदेशास गेला. जातांना वाटेंत एकेका योजनाच्या अंतरावर त्यानें चौक्या बसविल्या. या चौक्यांवर कांहीं घोडेस्वार व हत्ती ठेवण्यांत आले होते. पांचालांची राजधानी गंगेच्या कांठीं होती. महौषधानें आपल्या राजाला उतरण्यासाठीं घरें बांधण्यास लागणारें लांकूडसामान वगैरे आणण्याच्या मिषानें गंगेमध्यें तीनशें होड्या सज्ज ठेविल्या.

हा सगळा बंदोबस्त केल्यावर तो मोठ्या लव्याजम्यासह ब्रम्हदत्तराजापाशीं गेला, आणि त्याला म्हणाला “महाराज, माझ्या धन्यांनीं मला येथें पाठविलें आहे. आपल्या कन्येबरोबर विवाह करण्यासाठीं ते येथें येणार आहेत; परंतु त्यापूर्वी त्यांच्या दर्ज्याला साजेल, असें एक निवासस्थान तयार करण्यासाठीं मला त्यांनीं पाठविलें आहे. आपण जर परवानगी द्याल, तर विलंब न करतां मी या कामाला लागतों.”

ब्रह्मदत्ताला वैदेहराजा आपल्या राज्यांत येतो, हें वर्तमान ऐकून अत्यंत हर्ष झाला, व तो महौषधाला ह्मणाला “वैदेहराजानें तुह्माला पुढें पाठविलें, हें फारच उत्तम केलें. तुमच्यासारखा हुषार मनुष्य विरळा. तुह्मी आपल्या राजाची यथायोग्य व्यवस्था लावाल, अशी माझी खात्री आहे. माझ्याहि तर्फे तुमच्या राजाचें अभिनंदन करण्यासाठीं मी तुह्मालाच प्रतिनिधि नेमतों. त्याचा योग्य मान ठेवण्यासाठी जी कांहीं मदत लागेल, ती देण्यास मी तयार आहें.”

महौषध ह्मणाला “महाराज, सध्यां मला दुसऱ्या कशाचीहि गरज नाहीं. आमच्या वैदेहराजाच्या वसतिस्थानासठीं तेवढी सोईवार जागा द्या ह्मणजे झालें. गवंडी, मजूर वगैरे सर्व लोक मी मजबरोबर आणिले आहेत. जंगलांतून लांकडें आणण्यासाठीं आमच्या होड्या गंगानदींत फिरत आहेत. आह्मांला जरूर लागली, तर तेवढ्या विटा मात्र आपल्या लोकांकडून पुरविण्यांत याव्या.”

ब्रह्मदत्तानें महौषधाला जेवढ्या विटा लागतील, तेवढ्या पुरविण्याचा ताबडतोब हुकूम केला, व योग्य वाटेल ती जागा निवडण्यास महौषधाला परवानगी दिली. महौषधानें गंगेच्या आणि ब्रह्मदत्ताच्या प्रासादाच्या दरम्यान एक जागा पसंत करून तेथें आपल्या राजासाठीं व त्याच्याबरोबर येणाऱ्या इतर लोकांसाठीं घरें बांधण्यास सुरुवात केली. प्रथमतः महौषधानें आपण पसंत केलेल्या जागेसभोंवतीं तट बांधला, व नंतर आंतील घरें तयार केलीं. हें काम पुरें झाल्यावर त्यानें राजाला निरोप पाठविला, व त्याप्रमाणें वैदेहराजा आपल्या प्रधानांसहवर्तमान मोठ्या लवाजम्यानिशीं पांचालांच्या राजधानीला येऊन दाखल झाला.

ब्रह्मदत्तानें वैदेहराजाचा आदरसत्कार चांगला केला. चांगल्या मुहूर्तावर विवाहविधि उरकून घेण्याचा बेत ठरला. दोन दिवस ब्रह्मदत्ताचा पाहुणचार घेत वैदेहराजा महौषधानें बांधिलेल्या भवनामध्यें मोठ्या चैनीनें रहात होता. परंतु तिसऱ्या दिवशीं रात्रीं आपल्या वाड्याला ब्रह्मदत्ताच्या सैन्यानें एकाएकीं वेढा दिल्याचें त्याला आढळून आलें. ती समुद्रासारखी अफाट सेना पाहून वैदेहराजाचें धैर्य गळालें. ब्रह्मदत्तराजानें फसवून आपणाला येथें आणलें, हें त्याच्या आतां लक्ष्यांत आलें. या संकटांतून मुक्त कसें होतां येईल, हें त्याला समजेना. त्यानें आपल्या मंत्र्यांनां ताबडतोब बोलावून यांतून पार पडण्याचा उपाय शोधून काढण्यास सांगितलें.

अनुक्रमणिका

त्यांतील एकजण ह्मणाला "महाराज, या सैन्याबरोबर युद्ध करून आमच्या मूठभर लोकांचा निभाव कधींहि लागावयाचा नाहीं. तेव्हां आपण हीं घरें पेटवून त्यांत जळून मरावें, हें बरें. जर का आम्ही ब्रह्मदत्ताच्या हातीं सांपडलों, तर तो आह्मांला हाल हाल करून ठार मारील!"

दुसरा ह्मणाला "महाराज, आगींत जळून मरण्यापेक्षां आपण एकामेकांला मारून मरूं."

तिसरा ह्मणाला "महाराज, आपण सर्व एकदम विष पिऊं."

चौथा ह्मणाला "महाराज, या प्रसंगीं आमच्यासारख्यांनां संकटांतून पार पडण्याची कोणतीच युक्ति सुचावयाची नाहीं. आम्ही सर्वजण महौषधाला शरण जाऊं. कांहीं उपाय असल्यास तो त्यालाच सुचेल."

राजा आपल्या चारहि अमात्यांसहवर्तमान महौषध होता त्या ठिकाणीं गेला, व त्याला ह्मणाला "महौषध! तूं मोठा बुद्धिमान् आहेस. कितीहि बिकट प्रसंग आला तरी तुझें धैर्य खचत नाहीं. आमच्यावर हा अचानक घाला आला आहे. यांतून पार पाडण्यास तुझ्यावांचून दुसरा कोणी समर्थ नाहीं."

महौषध ह्मणाला "मी पडलों नांगऱ्याचा पोर! असल्या मोठमोठाल्या गोष्टी मला कसच्या समजतात! माझ्यासारख्या मूर्खाला तुह्मी गचांडी देऊन घालवून न देतां आपल्या सेवेंत ठेविलें हेंच मोठें आश्चर्य!"

वैदेह ह्मणाला "महौषध! झालेली गोष्ट होऊन गेली. शहाणे लोक मागील कर्मे स्मरून वाद करीत बसत नाहींत. मी तुला कांहीं बोललों असेन, तुझा उपमर्द केला असेल, परंतु त्याचा सूड उगविण्याची ही वेळ नव्हे! सकाळ होण्याच्या आधीं ब्रह्मदत्त आह्मां सर्वांचा नाश करणार आहे! तेव्हां प्रथमतः आह्मांला या संकटांतून पार पाड, व मग तुला तोडून बोलल्याबद्दल जी काय आमची छिःथू करावयाचा असेल, ती कर."

महौषध ह्मणाला "महाराज, आपला सूड उगविण्याची किंवा छिःथू करण्याची माझी इच्छा नाहीं; परंतु मनुष्याचीं मागील कर्मे इतकीं बिकट असतात, कीं, स्मरण करा किंवा न करा, त्याचें फळ हें यावयाचेंच! आपण जे या ब्रह्मदत्ताच्या मुलीवर लुब्ध झालां, त्याचें फळ भोगल्याशिवाय यांतून मुक्त कसे व्हाल?"

राजा व त्याचे चारहि प्रधान विचारमूढ होऊन पोरांसारखे रडूं लागले. महौषधाला आपल्या धन्याची कींव आली. तो ह्मणाला "महाराज, संकटसमयीं असा शोक करणें आपल्यासारख्या राजकुलांत उत्पन्न झालेल्या क्षत्रियांनां उचित नाहीं, आपण जर धीर धराल, तर सर्वांनां थोडक्याच वेळांत मी या संकटांतून पार पाडितों."

महौषधानें आपल्या नोकरांनां जमिनीखालून तयार केलेल्या बोगद्याचें दार उघडण्यास हुकूम केला. त्यानें ब्रह्मदत्तराजाची आपल्या धन्याला फसविण्याची युक्ति जाणून या निवासस्थानापासून दोन बोगदे तयार केले होते. मोठा बोगदा गंगेच्या कांठापर्यंत नेला होता, व लहान बोगदा ब्रह्मदत्ताच्या राजवाड्याच्या आंत नेऊन माडीवर जाणाऱ्या जिन्याखालीं सोडला होता.

अनुक्रमणिका

ब्रह्मदत्तानें आपल्या वसतिस्थानाला वेढा दिला, हें जेव्हां महौषधाला समजलें, तेव्हां त्यानें आपले गुप्त हेर ताबडतोब राजवाड्यांत पाठविले. ते धाकट्या बोगद्यांतून राजवाड्यांत शिरले, व महौषधानें शिकवून ठेविल्याप्रमाणें त्यांनीं एकच गडबड सुरू केली. ब्रह्मदत्ताची आई, बायको, वैदेह राजाला देऊं केलेली मुलगी व एकुलता एक मुलगा एवढीं माणसें राजवाड्यांत होतीं. महौषधाच्या हेरांनीं केलेल्या गडबडीनें जागीं होऊन तीं एकत्र जमलीं. तेव्हां ते हेर ब्रह्मदत्ताच्या आईला ह्मणाले "महाराणीसाहेब, तुह्मी तुमच्या सुनेला आणि नातवंडांनां घेऊन आतांच्या आतां येथून निघालें पाहिजे. आमच्या राजाला (ब्रह्मदत्ताला) वैदेहराजानें पकडलें आहे. आमचे लोक जरी पुष्कळ होते, तथापि महौषधाच्या शूर शिपायांनीं एकाएकीं घाला घालून राजाला पकडून नेलें. आतां त्यानें तुह्मा सर्वांनां पकडण्यासाठीं आपले शिपायी इकडे पाठविले आहेत. तेव्हां आतां पळाचाहि विलंब न लावतां आमच्याबरोबर चला. आह्मी तुह्मांला गुप्त मार्गानें दुसऱ्या ठिकाणीं घेऊन जातों."

महौषधाचे हेर ब्रह्मदत्ताचे नोकर आहेत, असें वाटून ब्रह्मदत्ताची आई आपल्या सुनेला व नातवंडांनां घेऊन त्यांजबरोबर निघाली. त्यानीं त्या सर्वांनां लहान बोगद्यांतून मोठ्या बोगद्यांत आणून तेथून महौषधाच्या हुकमाप्रमाणें गंगेच्या कांठीं बोगद्याच्या आंतच ठेविलें.

इकडे महौषधानें आपल्या धन्याला व त्याच्या चारहि जुन्या प्रधानांला बोगद्यांत उतरविलें व तो त्यांनां ह्मणाला "मी जो चार-पांच महिने येथें येऊन बसलों होतों, तो गमतीखातर बसलों होतों, असें तुह्मांला वाटतें काय? मिथिलेस असतांनाच मला ब्रह्मदत्ताची युक्ति समजली होती. तुह्मां सर्वांनां तो सांपळ्यांत धरणार, हें मी जाणून होतों, आणि ह्मणूनच गेल्या चार महिन्यांत येथें येऊन मी ही अविश्रांत मेहनत केली. ही पळून जाण्याची चोरवाट आहे, असें समजून वांकतवांकत जाऊं नका. या बोगद्यांतून घोड्यावर बसून देखील तुह्मांला सहज जातां येण्यासारखें आहे."

बोधिसत्वाच्या चातुर्याचें त्या सर्वांनां अत्यंत आश्चर्य वाटलें. महौषध केवळ राजनीतींतच निपुण होता, असें नव्हे; तर तो कलाकौशल्यांतहि अत्यंत निपुण होता. या उन्मार्गाची (बोगद्याची) त्यानें जी रचना केली होती, ती शिल्पकलानिष्णात मनुष्यांनांदेखील करतां आली असती कीं नाहीं, याची शंकाच आहे. या बोगद्याला आंतून चुन्याचा गिलावा करून दोन्ही बाजूंला सुंदर चित्रें काढिलीं होतीं; अंतराअंतरावर सुगंधि तेलाचे दिवे लावण्यांत आले होते; जमिनीला काश्मीरी पाषाणांची फरसबंदी केली होती व तीवर सुंदर गालीचे पसरले होते; मधुनमधून फळें वगैरे जिन्नस मांडून ठेवण्यांत आले होते; आणि सुवासिक पुष्पमालांनीं त्या बोगद्याचा वरचा भाग अलंकृत केला होता.

राजा आणि त्याचे प्रधान ही शोभा पहाण्यांतच गर्क होऊन गेले. तेव्हां बोधिसत्व त्यांनां म्हणाला "आतां बोगद्यांत आपणांला फार वेळ घालवितां यावयाचा नाहीं. आपणांला येथून लवकर निघालें पाहिजे."

त्या सर्व मंडळीला घेऊन महौषध गंगेच्या कांठीं आला, व तेथें ठेविलेल्या ब्रम्हदत्तराजाच्या कुटुंबाला आपल्या राजाच्या हवालीं करून तो म्हणाला "महाराज, ही ब्रम्हदत्तराजाची आई, ही आपल्या आजीसमान होय. ही ब्रम्हदत्तराजाची पत्नी, ही आपली भावी सासू होय. हिचें आपण मातृवत् पालन करावें, ही ब्रम्हदत्ताची एकुलती एक कन्या व आपली भावी पत्नी होय; इच्याशीं आपण सुमुहूर्तावर विवाह करा. हा तिचा भाऊ, याचें आपण आपल्या भावाप्रमाणें रक्षण करा. या होड्या आपल्यासाठीं तयार ठेवण्यांत आल्या आहेत. माझे शूर होडीवाले आपल्याला याच रात्रीं विदेहदेशाला घेऊन जातील. तेथून पुढें मिथिलेपर्यंत

प्रत्येक योजनावर चौक्या स्थापून घोडे आणि हत्ती ठेवण्यांत आले आहेत. त्यांच्या साहाय्यानें आपल्याला अत्यंत त्वरेनें मिथिलेला जातां येईल. आपण मिथिलेला पोहोंचल्याचें वर्तमान माझे दूत मला ताबडतोब कळवितील."

वैदेह ह्मणाला "परंतु ज्या तूं आह्मांला संकटांतून सोडविलेंस, त्या तुला आह्मीं येथें सोडून जावें कसें? तेव्हां तूंहि आमच्याबरोबर चल."

महौषध ह्मणाला "असें करणें मला योग्य नाहीं. आमच्या सैन्याला मागें टाकून मी एकटा जाऊं इच्छीत नाहीं. आपण माझी काळजी करूं नका. ब्रह्मदत्ताच्या सैन्यापासून आमच्या सर्व मनुष्यांची मोकळीक करून त्यांनां बरोबर घेऊन लवकरच मी आपल्या दर्शनाला येईन."

असें ह्मणून महौषधानें आपल्या धन्याचा निरोप घेतला, आणि तो माघारा फिरला.

वैदेहराजानें आपले प्रधान आणि ब्रह्मदत्ताचें कुटुंब यांसहवर्तमान महौषधानें तयार ठेवलेल्या नौकेंत बसून मिथिलेचा मार्ग धरला.

इकडे ब्रह्मदत्त वैदेहाच्या वाड्याजवळ येऊन ठेपला, आणि सकाळ झाल्याबरोबर वाड्यांत शिरून वैदेहराजाला आणि त्याच्या प्रधानांला जीवंत पकडून आणण्याचा त्यानें आपल्या लोकांनां हुकूम केला. महौषध पहांटेस उठला व स्नान वगैरे करून माडीवरील दालनांत येऊन बसला. ब्रह्मदत्तराजानें केलेला हुकूम ऐकून तो गच्चीवर येऊन ब्रह्मदत्ताला ह्मणाला "महाराज, आपली ही वल्गना व्यर्थ आहे! आपण आपलें धनुष्यबाण खालीं ठेवा. आपल्या कवचाचेंहि येथें कांहीं प्रयोजन नाहीं!"

ब्रह्मदत्त ह्मणाला "तुझा चेहरा प्रसन्न दिसतो, आणि तूं हंसतहंसत बोलत आहेस. कदाचित् मरणापूर्वी मनुष्याची ही स्थिति होत असावी!"

बोधिसत्व ह्मणाला "महाराज, आपली गर्जना व्यर्थ आहे! वैदेहराजा रात्रीच गंगा उतरून आपल्या देशाला चालता झाला आहे. आपण त्वरा केली, तरी त्याचा पाठलाग करणें आपल्याला शक्य नाहीं."

ब्रह्मदत्त अत्यंत क्रोधायमान होऊन आपल्या लोकांनां ह्मणाला "प्रथमतः याला पकडून याचे हातपाय आणि नाककान कापून टाका. याच लबाडानें वैदेहराजाला येथून पळवून लाविलें."

महौषध ह्मणाला "आपण जर हातपाय कापून माझे हाल केले, तर वैदेहराजा आपल्या कुटुंबाचे असेच हाल करील! प्रथमतः आपण राजवाड्यांत जाऊन तेथें आपली मंडळी आहे कीं नाही पहा. मी त्यांनां रात्रींच वैदेहराजाच्या स्वाधीन केलें आहे!"

ब्रह्मदत्ताला महौषधाच्या भाषणाचें अत्यंत आश्चर्य वाटलें. आह्मीं यांनां चारी बाजूंनी वेढलें असतां माझें कुटुंब याच्या हातीं गेलें कसें? तथापि महौषधाचें भाषण अगदींच खोटें ह्मणतां येईना. कांकीं, महौषध मोठा धोरणी माणूस, तो आपल्या बुद्धीच्या जोरावर सामान्य मनुष्याला अत्यंत विलक्षण भासणाऱ्या गोष्टीदेखील घडवून आणूं शकेल! ह्मणून ब्रह्मदत्तानें आपले दूत राजवाड्यांतील वर्तमान आणण्यासाठीं

पाठविले. त्यांनीं बातमी आणिली, कीं, राजाच्या कुटुंबांतील चारहि माणसें घाबऱ्याघाबऱ्या रात्रींच राजवाड्यांतून निघून गेलीं.

हें वर्तमान ऐकून ब्रह्मदत्ताचा क्रोध जागच्या जागींच निवाला. त्यानें आपलें धनुष्यबाण खालीं ठेवलें, आणि तो महौषधाला ह्मणाला “तुझ्या चातुर्याविषयीं मला कधींहि शंका आली नाहीं. पण राजवाड्यांतील माझी मंडळी तुझ्या हातीं कशी लागली, हें मला सांग.”

बोधिसत्वानें माडीवरून खालीं उतरून ब्रह्मदत्ताला आपण केलेल्या बोगद्यामध्यें नेलें, व तेथील सर्व शोभा त्याला दाखवून तो ह्मणाला “महाराज, आज दोनतीन महिने सतत खपून वैदेहराजाला आणि आपल्या कुटुंबाला सुरक्षितपणें निघून जाण्यासाठीं हा मार्ग मीं तयार केला आहे.”

ब्रह्मदत्ताला बोधिसत्वाच्या धोरणाचेंच नव्हे, तर शिल्पकलाविज्ञानाचेंहि अत्यंत आश्चर्य वाटलें! त्यानें दोन्ही उन्मार्ग तपासून पाहिले, व त्यांतील रचना पाहून आश्चर्यचकित होऊन तो महौषधाला ह्मणाला “हे महौषध! तुला मी येथून जाऊं देणार नाहीं. तूं यापुढें माझ्याच जवळ राहिलें पाहिजे. मी तुला मुख्य प्रधानाची जागा देतों. तुझ्यासारखा चतुर माणूस पदरीं असणें हें राष्ट्राचें मोठें भाग्य होय!”

महौषध ह्मणाला “वैदेहराजा जीवंत असेपर्यंत मला दुसऱ्या राजाची सेवा करतां येणार नाहीं. कारण, त्याचें अन्न मी पुष्कळ दिवस खात आलों आहें. परंतु आपणाला कोणतीहि अडचण पडली असतां मी आपल्या मदतीला येत जाईन. आतां वैदेहाचे आणि आपलें नातें जडलेंच आहे; तेव्हां आमचा संबंध निकट होईल, व त्यामुळें विदेहांची आणि पांचालांची मैत्री वृद्धिंगत होत जाईल, अशी मी आशा करतों.”

ब्रम्हदत्तानें महौषधाला मोठी देणगी दिली, व मोठ्या लव्याजम्यानिशीं परत मिथिलेला पाठविलें. वैदेहराजानेंहि महौषधाचा बहुमान केला. महौषध सुखरूप आल्याबद्दल मिथिलेमध्यें सात दिवसपर्यंत मोठा उत्सव करण्यांत आला. याप्रमाणें वैदेह आणि ब्रम्हदत्त या दोन्ही राजांची मर्जी संपादून बोधिसत्वानें दोन्ही राष्ट्रांचें अपरिमित कल्याण केलें.

या जन्मांत लोकहितासाठीं आपल्या बुद्धीचा सद्वयय करून बोधिसत्वानें प्रज्ञापारमितेचा अभ्यास केला.

[७]

## तेमियजातक

प्राचीन कालीं वाराणसीनगरीमध्यें काशीराजा नांवाच राजा राज्य करीत होता. त्याच्या पट्टराणीला नवनवसांनीं पुत्रलाभ झाला, तेव्हां राजा अतिशय प्रसन्न होऊन त्यानें आपल्या पट्टराणीला – चंदादेवीला – वर मागण्यास सांगितलें. तिनें राजाचा वर स्वीकारला. परंतु जें कांहीं मागावयाचें तें त्याच वेळीं न मागतां, पुढें प्रसंग पडला, म्हणजे मागेन, असें सांगितलें. राजाला ही गोष्ट पसंत पडली.

तदनंतर राजानें आपल्या राज्यांतील ज्योतिषी ब्राम्हणांनां बोलावून आपल्या मुलाचें जातक वर्तविण्यास सांगितलें.

अनुक्रमणिका

ब्राम्हण आपलीं पंचांगें नीट तपासून राजाला म्हणाले "आपला हा पुत्र मोठा पुण्यशाली होणार आहे. हा चक्रवर्ती राजा होण्यास योग्य आहे. असा सर्वगुणसंपन्न पुत्र आपणाला लाभल्याबद्दल आम्हांला फार आनंद होत आहे."

राजानें संतुष्ट होऊन त्या ब्राम्हणांनां अनेक दानें दिलीं, व त्यांच्या सांगण्याप्रमाणें आपल्या पुत्राचें नांव तेमिय असें ठेविलें.

तेमिय लहान असतां राजसभेमध्यें आपल्या पित्याच्या मांडीवर खेळत असे. एके दिवशीं काशीराजानें आपल्या सिंहासनावर बसून चार माणसांनां भयंकर शिक्षा ठोठावल्या. तें पाहून तेमियकुमाराचें मन अत्यंत उद्विग्न झालें. तो आपल्याशींच ह्मणाला "हें सिंहासन ह्मणजे पापाची भूमिच होय. चोरानें लहानसान चोरी केली असतां त्याला सिंहासनावर बसून राजेलोक मोठा भयंकर दंड करितात, आणि आपण लोकांचे हितकर्ते आहों असें समजतात. परंतु पोटासाठीं लहानसान चोऱ्या करणाऱ्या माणसाचा न्याय करण्यास वज्रजडित सोन्याच्या सिंहासनावर बसणाऱ्या आणि मोठमोठाल्या राजवाड्यांत विहार करणाऱ्या राजाला अधिकार आहे काय? राष्ट्रांतील लोकांचें दारिद्र्य वाढण्याला राजाच्या या चैनीच कारणीभूत होत नाहींत काय? दारिद्र्यानें पीडित होऊन एकाद्यानें चोरी केली, तर त्याला दंड करण्याचा अधिकार राजाला किंवा राजघराण्यांतील मनुष्याला कसा पोहोंचतो?"

तेमियकुमाराला राजवाडा तुरुंगासारखा वाटूं लागला, व आपण येथून कधीं निसटून जाऊं असें त्याला झालें; परंतु आईबापांची आज्ञा मोडल्यावांचून या कारागृहांतून पार पडण्याचा उपाय त्याला सुचेना.

राजवाड्यामध्यें रहात असलेली देवता पूर्वजन्मीं तेमियकुमाराची आई होती. तेमिय कुमाराला दुःखानें पोळलेला पाहून तिला अत्यंत वाईट वाटलें; आणि ती त्याला ह्मणाली "कुमार! तूं इतका शोकाकूल कां दिसतोस?"

तेमियकुमारानें आपल्या शोकाचें कारण सांगितल्यावर ती ह्मणाली "तूं घाबरू नकोस. शहाणपणा न दाखवितां वेडेपणानें वागशील, तर तुझे आप्तइष्ट आपण होऊनच तुला येथून घालवून देतील."

तेमिय ह्मणाला "हे देवते! तुझ्या वचनावर विश्वास ठेवून मी त्याप्रमाणें वागतों. या राजवाड्यामध्यें तूंच काय ती माझी हितचिंतक आहेस."

तेव्हांपासून तेमिय कुमारानें वेड्याचें सोंग घेतलें. तो काय बोले, हें कोणालाच समजत नसे. नुसता 'हा हा हा' असा शब्द करावा; कधीं हातपाय आंखडल्यासारखें करून अंथरुणावर पडून रहावें; कांहींएक कारण नसतां ओरडावें; असा त्यानें क्रम चालविला. काशीराजाला आपल्या एकुलत्या एका मुलाविषयीं फार काळजी उत्पन्न झाली. आपल्या पदरच्या ज्योतिषी ब्राह्मणांनां त्यानें बोलावून मंत्र, तंत्र, होमहवनादि सर्व कांहीं करविलें; परंतु तेमियाची प्रकृति सुधारली नाहीं! उत्तम वैद्यांनां आणवून राजानें आपल्या मुलाला औषधोपचार करण्यास सांगितलें. पण वैद्यांनां तेमियाचा रोग कोणता, हेंच समजेना!

अशा स्थितींत कांहीं वर्षे घालविल्यावर तेमियाची बाल्यावस्था पूर्ण होऊन तो तारुण्यदशेंत आला. त्याच्या रूपांत कोणतेंहि व्यंग नव्हतें. तारुण्याच्या भरांत असल्यामुळें तो फारच तेजस्वी दिसत होता. परंतु

अनुक्रमणिका

त्याच्या वेडामुळें तो राजाला आवडेनासा होत चालला. तथापि राजानें त्याला बरा करण्याचे उपाय सोडून दिले नाहींत.

एके दिवशीं प्रधानमंडळापैकीं एकजण राजाला ह्मणाला "महाराज, आमच्या युवराजाचें वेड सुधारण्यासाठीं आह्मीं अनेक उपाय केले, पण त्यांनां यश आलें नाहीं. वैद्यांनीं, ज्योतिष्यांनीं व मांत्रिकांनींहि हात टेंकले! आतां मला एक नवीन उपाय सुचला आहे. युवराज तारुण्यांत आले असल्यामुळें त्यांच्या सन्निध पुष्कळशा सुंदर तरुण स्त्रिया ठेवण्यांत आल्या, तर कदाचित् त्यांच्या सहवासानें युवराजांचें वेड सुधारण्याचा संभव आहे."

राजानें ताबडतोब युवराजाच्या सेवेसाठीं पुष्कळशा तरुण रूपवती स्त्रियांची योजना केली.

तेमियानें इतर उपायांप्रमाणें या उपायालाहि दाद दिली नाही! त्या तरुण स्त्रियांनीं त्याच्याजवळ जाऊन शृंगाररसभरित मनोवेधक भाषणे करावींत, परंतु तेमियानें 'हाहा' 'हूहू' या पलीकडे दुसरा शब्दच उच्चारूं नये.

राजाला आपल्या मुलाची प्रकृति सुधारण्याची आतां आशा उरली नाहीं. त्यानें आपल्या ज्योतिषी ब्राम्हणांनां बोलावून आणलें आणि विचारलें, "ब्राह्मणहो! हा मुलगा जन्मला तेव्हां तुह्मीं असें भविष्य वर्तविलें, कीं, हा मोठा पुण्यशाली होणार आहे; परंतु पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें आह्मांला असें वाटूं लागलें आहे, कीं, हा मुलगा अगदींच जडमूढ आहे. असल्या या दगडाला राजवाड्यांत ठेवावें कीं न ठेवावें, याचीच मला शंका आहे!"

ब्राम्हण म्हणाले "महाराज, ज्योतिःशास्त्राला अवगत नाहीं अशी कोणतीहि गोष्ट नाहीं. प्राचीन आचार्यांनीं आपल्या दिव्य दृष्टीनें ज्योतिःशास्त्राचे सिद्धान्त बांधले आहेत. हा मुलगा वेडगळ होणार, हें आम्हाला पूर्वीच समजलें होतें! परंतु त्या वेळीं आपणाला तसें सांगितलें असतां पुत्रजन्मापासून होणाऱ्या आनंदाला आपण मुकाल, असें आम्हांला वाटलें. शिवाय, ग्रहांनां दानें वगैरे करून हा थोडासा सुधारेल अशी आम्हांला आशा वाटत होती. परंतु याचा ग्रहयोग असा विलक्षण आहे, कीं, ग्रहशांतीनें याची सुधारणा न होतां उलट हा बिघडत जात आहे! आतां आमचें आपणाला असें सांगणें आहे, कीं, या दुर्दैवी प्राण्याला आपण राजवाड्यांत ठेवूं नये. याला जर येथें ठेवला, तर आपल्या राज्यावर मोठें संकट येण्याचा संभव आहे!"

काशीराजानें ज्योतिषी ब्राम्हणांच्या आणि प्रधानमंडळाच्या सल्ल्यानें तेमिय कुमाराला अरण्यांत पाठवून तेथें गाडून टाकण्याचा बेत निश्चित केला.

हें वर्तमान चंदादेवीला समजलें, तेव्हां तिला अत्यंत शोक झाला! राजाचें मन वळविण्याचा प्रयत्न निष्फल झाल्यावर ती राजाला म्हणाली "मला आपण एक वर दिला आहे, तो मी या प्रसंगी मागून घेतें."

काशीराजाने घे असें म्हटल्यावर चंदादेवी म्हणाली "माझ्या मुलाला राज्य द्या."

काशीराजा ह्मणाला "तसें केलें असतां माझी प्रजा क्षोभेल. तेव्हां हा वर मला देतां येत नाहीं."

अनुक्रमणिका

चंदादेवीनें आपल्या मुलाला अनुक्रमें सात वर्षे, सात महिने, एक महिना तरी राज्य द्यावें, अशी प्रार्थना केली. पण राजाला तिचें ह्मणणें पसंत पडलें नाहीं. शेवटीं चंदादेवीनें तेमियाला सात दिवस तरी राज्य द्या, असा हट्ट धरला. राजानें तिच्या आग्रहास्तव, एक आठवडा तेमियाला राजा केलें आहे, असा जाहीरनामा लाविला.

चंदादेवीनें आपल्या मुलाला उचलवून हत्तीच्या अंबारींत बसविलें. पण तो बसतो कसचा! तो गोळ्यासारखा अंबारीमध्यें पडून राहिला. त्याला चंदादेवीनें सर्व नगरांतून मोठ्या लवाजम्यानिशीं फिरवून आणण्यास सांगितलें.

तेमिय सगळे सोहळे अनुभवीत होता. परंतु आपल्या वेडांत त्याने अंतर पडूं दिलें नाहीं.

सहा दिवस मुलाला राज्यसुखाची लालुच लावून पाहिल्यानंतर चंदादेवी त्याला ह्मणाली “तेमिय, उद्यां तुझी माझी ताटातूट होणार आहे. तुला दूर अरण्यांत नेऊन गाडून टाकण्याचा बेत ठरला आहे. आजपर्यंत मला असा भरंवसा होता, कीं, तुझें वेड खरें नाहीं. परंतु आतां माझी पूर्ण निराशा झाली आहे!”

तिनें इतका विलाप केला, कीं, तिच्या त्या शोकानें पाषाणाला देखील वाचा फुटली असती. परंतु तेमियाच्या वेडांत कांहींच अंतर पडलें नाहीं. तो जशाचा तसाच जडमूढ राहिला!

दुसऱ्या दिवशीं काशीराजानें सुनंद सारथ्याला बोलावून तेमियाला अमंगल रथांतून दूरच्या एका अरण्यांत नेऊन गाडून टाकण्याची आज्ञा केली.

त्याप्रमाणें सुनंदानें काळ्या रथाला काळे घोडे बांधून त्यांत तेमियाला घालून तो अरण्यांत गेला. तेथें तेमियाला रथांतच ठेवून सुनंद त्याला गाडण्यासाठीं एक खड्डा खणूं लागला.

तें पाहून तेमिय त्याला ह्मणाला “हे सारथी, तूं मोठ्या घाईघाईनें हा खड्डा कां खोदीत आहेस?”

सुनंद त्याजकडे वळून न पाहतां त्याला ह्मणाला “आमच्या राजाला एक मुका, बहिरा, जडमूढ असा पुत्र झाला आहे. त्याला या खड्ड्यांत घालून पुरून टाकण्यासाठीं राजानें माझ्या स्वाधीन केलें आहे.”

तें ऐकून तेमिय ह्मणाला “मी बहिरा नाहीं, मुका नाहीं, पांगळा नाहीं, किंवा जडमूढहि नाहीं! मला जर तूं या खड्ड्यांत गाडशील, तर तुझ्या हातून मोठा अनर्थ होईल! हातांतील कुदळ खालीं ठेवून जरा माझ्याकडे पहा! माझे पाय शाबूत आहेत, आणि माझें भाषण तूं ऐकतोच आहेस! तेव्हां मला या खड्ड्यांत घालून तूं अधर्माचरण करूं नकोस!”

सारथ्याला हें बोधिसत्वाचें भाषण ऐकून फारच अचंबा वाटला! राजाच्या प्रधानमंडळानें, वैद्यांनीं आणि ज्योतिषांनीं ज्याला जन्माचा जडमूढ ठरवून गाडण्यासाठीं आपल्या हवालीं केलें, त्याला एकाएकीं वाचा फुटली कशी? हा कांहींतरी अमानुष चमत्कार असावा, असें वाटून तो ह्मणाला “तूं या अरण्यांत वास करणारी देवता आहेस, किंवा गंधर्व आहेस, शक्र आहेस कीं कोण आहेस, हेंच मला समजत नाहीं!”

अनुक्रमणिका

बोधिसत्व ह्मणाला “मी दुसरा कोणी नसून ज्याच्यासाठीं तूं हा खड्डा खोदीत आहेस, तोच मी काशीराजाचा पुत्र आहें.”

सुनंद सारथ्याला बोधिसत्वाचें भाषण ऐकून अत्यंत आनंद झाला. तो ह्मणाला “तुझी वाणी इतकी गोड असतां तूं आपल्या आईबापांशीं एक शब्द देखील कां बोलला नाहींस?”

बोधिसत्व ह्मणाला “हे सारथी, माझे सांधे धरले होते ह्मणून मी लंगडा झालों नाहीं! माझें कर्णेंद्रिय नष्ट झालें होतें ह्मणून मी बहिरा झालों नाहीं! मला पडजीभ नव्हती ह्मणून मी मुका झालों नाहीं! परंतु पूर्वजन्मामध्यें मी एका देशाचा राजा होऊन वीस वर्षे राज्य केलें, व त्यामुळें ऐंशीं हजार वर्षे नरकांत पडलों! या गोष्टीची आठवण होऊन मला मागेंपुढें राज्यपद देतील या भीतीनें मी लुला नसतांच लुला झालों, बहिरा नसतांच बहिरा झालों, आणि मुका नसतांच मुका झालों! आतां माझ्या पित्यानें आपल्या खुषीनेंच मला वनांत टाकून दिलें आहें. आतां मी येथें तपश्चर्या करून सुखानें कालक्रमणा करीन!”

सारथी ह्मणाला, “हे राजपुत्र! तूं धन्य आहेस! तुझ्यासारखा थोर सत्पुरुष मीं जन्मांत पाहिला नाहीं. तुझ्या दृढनिश्चयाची कमाल आहे! तुझ्या सहवासांत काल घालविणें यासारखी दुसरी कोणतीहि गोष्ट मला प्रिय वाटत नाहीं. तेव्हां तापसवेष स्वीकारून तुझा शिष्य होण्याची मला परवानगी दे!”

बोधिसत्व ह्मणाला “जर तुला येथें रहावयाचे असेल, तर हा रथ परत करून राजाच्या ऋणांतून मुक्त होऊन ये.”

सारथी ह्मणाला “मी तुझ्या वचनाप्रमाणें वागण्यास तयार आहें. परंतु मी परत येईपर्यंत तूं येथेंच राहिलें पाहिजेस.”

बोधिसत्वानें तेथें राहण्याचें कबूल केल्यावर सारथी वाराणसीला गेला. तेथें त्याला प्रथमतः चंदादेवीनें पाहिलें. ती ह्मणाली “हे सारथी! माझ्या मुलाची वाट तूं काय केलीस? तो खड्ड्यांत घातला असतां ओरडला नाहीं काय? हातपाय हालवून आपणाला गाडूं नको अशी त्यानें खूण केली नाहीं काय?” हे शब्द उच्चारीत असतां चंदादेवीचा कंठ दाटून आला, आणि तिच्या डोळ्यावाटें एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या.

सारथी ह्मणाला “देवी! तुझा मुलगा बहिरा, लुला किंवा मुका नाहीं! केवळ आपणाला राज्यावर बसवितील, या भीतीनें त्यानें हें व्रत स्वीकारलें होतें.”

नंतर वनामध्यें घडलेला सर्व प्रकार त्यानें राजाला आणि राणीला निवेदन केला. राजानें ताबडतोब आपला रथ सज्ज करविला व चंदादेवीसहवर्तमान मोठ्या लवाजम्यानिशीं सुनंद सारथ्यानें दाखविलेल्या मार्गानें तो तेमिय होता तेथें गेला.

आपल्या पित्याला पाहून बोधिसत्व त्याला सामोरा गेला, आणि ह्मणाला “हे तात, आपलें आरोग्य चांगलें आहेना? आपली सर्व राज्यव्यवस्था नीट चालली आहेना?”

अनुक्रमणिका

काशीराजा ह्मणाला “आमचें सर्व कांहीं ठीक चाललें आहे.”

बोधिसत्व ह्मणाला “आपल्या आगमनानें मला फार आनंद झाला आहे!”

याप्रमाणें बोधिसत्वानें पित्याचें स्वागत केल्यावर राजा ह्मणाला “मुला, तूं दृढनिश्चयाची कमाल केली आहेस! आतां तूं पुनः राजपद स्वीकार. वनामध्यें तपश्चर्या करण्याचा हा माझा काल आहे, तुझा नव्हे. तूं तरुण आहेस. तेव्हां राज्यभार सहन करण्यास तूं सर्वथैव समर्थ आहेत.”

बोधिसत्व ह्मणाला “महाराज, आपण मला जरी सर्व राजसंपत्ति दिली, तरी पुढें येणाऱ्या भयप्रद जरामरणापासून माझा बचाव करूं शकाल काय? या नश्वर तारुण्यावर विश्वास ठेवून चैनीमध्यें दिवस घालविण्यास कोणता शहाणा तयार होईल?”

राजानें आणि चंदादेवीनें आपल्या मुलाला माघारें नेण्यासाठीं आपली शिकस्त केली, परंतु बोधिसत्वाचा दृढ निश्चय तिळमात्र ढळला नाहीं. त्यानें तेथें बांधिलेल्या पर्णकुटीमध्यें वास करून सर्व जन्म योगाभ्यासांत घालविला.

याप्रमाणें बोधिसत्वानें आपला निश्चय ढळूं न देतां अधिष्ठान पारंमितेचा अभ्यास केला.

[८]

## सुतसोमजातक

आमचा बोधिसत्व एके समयीं कुरुदेशांत इंद्रप्रस्थ नगरीमध्यें कौरव्य नांवाच्या राजाच्या पट्टराणीच्या पोटीं जन्मास आला. त्याचें नांव सुतसोम असें ठेवण्यांत आलें. तो वयांत आल्यावर कौरव्यराजानें त्याला तक्षशिला नगरीमध्यें शास्त्राध्ययनासाठीं पाठविलें.

त्याच वेळीं काशीच्या राजाचा मुलगा ब्रह्मदत्त विद्याभ्यासासाठीं तक्षशिलेला जाण्यास निघाला होता. मार्गामध्यें या दोघां राजकुमारांची एका धर्मशाळेंत गांठ पडली. परस्परांची परस्परांशीं ओळख झाल्यावर त्या उभयतांचें सख्य जमलें. तक्षशिलेपर्यंत त्यांनीं एकत्र प्रवास केला, व पुढें ते एकाच आचार्यगृहीं विद्याभ्याससाठीं राहिले.

बोधिसत्वाचा आचार्य अत्यंत प्रसिद्ध असल्यामुळें त्याच्यापाशीं आणखीहि पुष्कळ राजकुमार विद्याभ्यासासाठीं रहात असत. सुतसोमानें अल्पावकाशांतच त्या सर्वांमध्यें पहिलें स्थान मिळविलें. आचार्यानें त्याचें प्रावीण्य पाहून त्याला आपला साहाय्यकारी केलें. बोधिसत्व आपल्या सहाध्यायांनां मोठ्या कळकळीनें शिकवीत असे. तथापि त्या सर्वांमध्यें ब्रह्मदत्तावर त्याचें विशेष प्रेम होतें.

सुतसोमानें अभ्यास पुरा झाल्यावर गुरुदक्षिणा देऊन पितृगृहीं जाण्यास आचार्याचा निरोप घेतला. त्याच्याबरोबर इतर राजकुमारांनींहि आचार्याची योग्य बोळवण करून त्याची आज्ञा घेतली. ते सर्व बोधिसत्वाबरोबरच गृरुगृह सोडून निघाले. बोधिसत्वावर त्यांचें फार प्रेम होतें. ते त्याला आचार्याप्रमाणेंच मानीत असत. त्याला सोडून जात असतां त्यांनां फार वाईट वाटलें. ते ह्मणाले “सुतसोम! तूं जरी

अनुक्रमणिका

आमच्यापैकींच एकजण आहेस, तरी तुझ्या बुद्धिमत्तेमुळें आणि सद्गुणांमुळें तूं आह्मांला गुरूसारखा पूज्य आहेस. तेव्हां तुझ्या उपकृतींतून मुक्त होण्यासाठीं आह्मी तुला कांहीं तरी गुरुदक्षिणा देणें योग्य आहे."

सुतसोम ह्मणाला "गडे हो, मी कांहीं गरीब ब्राह्मण नाहीं. येथून गेल्यावर माझा पिता मला युवराज करणार आहे. अर्थात् संपत्तीच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारें मला कमतरता रहाणार नाहीं. परंतु माझ्या स्मरणासाठीं तुह्मी जर कांहीं देत असाल, तर मी तुमच्यापाशीं एकच गोष्ट मागतों."

ते सर्व राजकुमार एकदम ह्मणाले "अवश्यमेव माग! आमच्या हातून घडण्यासारखी सेवा करण्याला आह्मी तयार आहों."

बोधिसत्व ह्मणाला "तुह्मी आपापल्या राज्यांत गेल्यावर माझी आठवण ठेवण्यासाठीं उपोसथव्रत [दोन्ही अष्टमी, पौर्णिमा व कृष्णचतुर्दशी या चार दिवसांला उपोसथ दिन असें ह्मणतात. या दिवशीं जे पुरुष आणि ज्या स्त्रिया धर्मचिंतनांत काल घालवितात, त्यांनां अनुक्रमे उपासक आणि उपासिका असें ह्मणतात. उपासकानां आणि उपासिकांनां या दिवशीं पाळण्यासाठीं बुद्धांनीं आठ नियम घालून दिले आहेत. ते येणेंप्रमाणें:—

१ प्राणघात न करणें; २ चोरी न करणें; ३ अब्रह्मचर्य न करणें (ब्रह्मचारी राहणें); ४ खोटें न बोलणें; ५ मद्यादि मादक पदार्थांचें सेवन न करणें; ६ माध्यान्हानंतर न जेवणें; ७ मनोविकार उद्दीपित करणाऱ्या नृत्यगीतादि गोष्टी न पाहणें व गंधमाल्यादि (विलासाचे) पदार्थ धारण न करणें; ८ उंच आणि मोठ्या बिछान्यावर न निजणें.

हे आठ नियम पूर्वीच्या बुद्धांच्या काळींहि प्रचारांत होते, असें बौद्ध लोक मानितात.] पालन करा."

राजकुमारांनीं हें व्रत पाळण्याचें कबूल केलें, व बोधिसत्वाचा निरोप घेऊन ते आपापल्या राज्यांत गेले.

ब्रह्मदत्तकुमाराला त्याच्या पित्याच्या मरणानंतर राज्यपद मिळालें. तथापि बोधिसत्वाला दिलेल्या वचनाप्रमाणें तो उपोसथव्रत पाळीत असे. उपोसथाच्या दिवशीं आपल्या राजधानीमध्यें कोणत्याहि प्राण्याचा वध करूं नये, असा हुकूम त्यानें केला होता. परंतु राजवाड्यांतील सुखांत गढून गेल्यामुळें गुरुगृहीं जडलेला साधेपणा ब्रह्मदत्ताच्या अंगीं राहिला नाहीं. त्याला हळुहळू मांसभक्षणाची इतकी चटक लागली, कीं, उपोसथाच्या दिवशींदेखील त्याला मांसावांचून अन्न चालेना! रसक नांवाचा त्याचा एक मुख्य स्वयंपाकी होता, तो उपोसथाच्या पूर्वदिवशींच राजासाठी मांस विकत आणून ठेवीत असे व तें उपोसथाच्या दिवशीं शिजवून राजाला वाढीत असे.

एके दिवशीं रसकानें आणलेलें मांस राजाच्या पाळीव कुत्र्यानें खाऊन टाकलें. रसकाला उपोसथाच्या दिवशीं मांस कोठून आणावें याची पंचाईत पडली. मांस नसलें तर राजा अन्नग्रहण करणार नाहीं, आणि आपणाला मोठी शिक्षा ठोठावील, अशीहि त्याला भीति पडली. पुष्कळ विचाराअंतीं त्याला एक भयंकर युक्ति सुचली! उपोसथाच्या पूर्वदिवशीं एका लठ्ठ चोराला फांशीं देण्यांत येऊन त्याचें प्रेत स्मशानांत उघड्या जागीं फेंकण्यांत आलें होतें. रसकानें तेथें जाऊन त्याचें मांस आणून लपवून ठेविलें, व दुसऱ्या दिवशीं राजाला त्याचें उत्तम पक्वान्न बनवून घातलें!

अनुक्रमणिका

ब्रह्मदत्तराजा पूर्वजन्मीं मनुष्यमांसभक्षक यक्ष होता. त्यामुळें त्याला रसकानें तयार केलेलें मनुष्यमांसाचें पक्वान्न फारच आवडलें. तो रसकाला ह्मणाला "हे रसक! आजपर्यंत मीं अशा प्रकारचें मांस सेवन केलें नाहीं. हें कोणच्या प्राण्याचें मांस आहे, हें सांग."

रसक भयानें थरथर कांपूं लागला. त्याच्या तोंडांतून शब्द निघेना. तेव्हां ब्रह्मदत्त त्याला ह्मणाला "अरे, असा घाबरूं नकोस. जो कांहीं खरा प्रकार असेल, तो सांग. तुला मी अभयदान देत आहें."

राजाकडून अभय मिळाल्यावर रसकानें घडलेला खरा प्रकार राजाला सांगितला. तेव्हां राजा ह्मणाला "रसक, आजपासून तूं मला दुसरें कोणतेंहि मांस न वाढतां मनुष्यमांसच आणून घाल! परंतु राजा मनुष्यमांस सेवन करितो, हें वर्तमान मात्र कोणालाहि कळूं देऊं नकोस. जर का ही गोष्ट बाहेर फुटली, तर मी तुला देहान्तशासन करीन."

रसक ह्मणाला "महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्यास मी तयार आहें; परंतु रोज मनुष्यमांस आणावें कोठून?"

राजा ह्मणाला "अरे, तुरुंगामध्यें पुष्कळ कैद्यांनां फांशीं देण्यांत येत आहे. तेथून तूं मांस आणीत जा."

राजाच्या हुकुमाप्रमाणें रसक बंधनागारांतून कोणाला न कळत नरमांस घेऊन येत असे; परंतु तेथील गुन्हेगार लवकरच खलास झाले. राजाला तर नरमांसाची इतकी चट लागली होती, कीं, एक दिवस देखील तें न मिळाल्यास त्याचा जीव तळमळत असे.

एके दिवशीं रसक राजाला ह्मणाला "आतां यापुढें तुरुंगातून आपणाला रोजचें मांस मिळण्याचा संभव नाहीं. तेव्हां पुढें काय करावें?"

राजा ह्मणाला "रसक! एवढी काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. संध्याकाळीं चौघडा सुरू झाल्यावर तूं एकाद्या बारीकशा गल्लींत जाऊन दडून बैस, व तेथें एकादा लठ्ठ पुरुष किंवा स्त्री आढळली, ह्मणजे तिला मारून मांस घेऊन येत जा."

तेव्हांपासून रसकानें राजाज्ञेप्रमाणें रात्रीं माणसांनां मारून राजाची तृप्ति करण्याचा क्रम चालविला. परंतु रसकाच्या या कृत्यामुळें शहरांत एकच गडबड उडून गेली. कोणी ह्मणे 'गेल्या रात्रीं माझा भाऊ मारला गेला,' तर कोणी ह्मणे 'माझी बहीण मारली गेली!' कोणी ह्मणे 'एकादा वाघ शहरांत येत असावा,' तर दुसरा ह्मणे 'हें काम सिंहाचें असेल!' शेवटीं कांहीं विचारी गृहस्थांनीं रस्त्यांत सांपडलेलीं प्रेतें तपासून पाहिलीं, व त्यांच्या अंगावर आढळलेल्या जखमांवरून त्यांनीं असें अनुमान काढलें, कीं, हें काम वाघाचें किंवा सिंहाचें नसून कोणातरी नरमांसभक्षक चोराचेंच असलें पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं सर्व नागरिक राजवाड्यासमोर जमून त्यांनीं या चोराला पकडून ठार मारण्याविषयीं राजाला अर्ज केला.

अनुक्रमणिका

राजा ह्मणाला “मी चोराला कसा पकडूं शकेन? मी कांहीं नगररक्षणाचें काम करीत नाहीं!”

लोकांनां हें राजाचें भाषण ऐकून फार वाईट वाटलें. राजा आपल्या प्रजेची घ्यावी तशी काळजी घेत नाहीं, असें जो तो ह्मणूं लागला.

नंतर ते सर्व लोक कालहस्ती नांवाचा राजाचा सेनापति होता, त्याच्यापाशीं गेले, आणि त्यांनीं आपलें गाऱ्हाणें त्याच्यासमोर मांडिलें. त्यानें चोराचा ताबडतोब बंदोबस्त करण्यांत येईल, असें अभिवचन देऊन त्यांचें सांत्वन केलें. कालहस्ती मोठा करारी माणूस होता. त्यामुळें त्याच्या वचनानें नागरिकांनां धीर आला व ते आपापल्या घरीं निघून गेले.

कालहस्तीनें त्याच दिवशीं रात्रीं आपले गुप्त हेर सर्व शहरांमध्यें पसरविले. त्यांनीं रसकाला एका माणसाचा खून करून त्याचें मांस टोपलींत भरून जात असतां पकडलें, व ताबडतोब आपल्या धन्यासमोर नेऊन उभें केलें.

कालहस्ती ह्मणाला “अरे रसक! तूं राजाच्या मर्जीतला स्वयंपाकी असून हा प्रकार काय आरंभिला आहेस?”

रसक ह्मणाला “सेनापतिमहाराज, मी माझ्या पोटाची खळी भरण्यासाठी किंवा कुटुंबाचें पोषण करण्यासाठीं हें कर्म करीत नाहीं. सरकारस्वारींच्या हुकुमामुळें मला हें कर्म करावें लागत आहे. माझ्या धन्याला एक दिवसदेखील नरमांसावांचून अन्न चालत नाहीं!”

सेनापति ह्मणाला “रसक, उद्यां मी तुला घेऊन राजवाड्यांत जाईन. तेथें राजासमोर ही गोष्ट तूं सांगितली पाहिजेस.”

दुसऱ्या दिवशीं सकाळीं रसकाला घेऊन कालहस्ती राजवाड्यांत गेला, आणि राजाला ह्मणाला “महाराज, या रसकाला पाठवून आपण नगरवासी स्त्रीपुरुषांनां ठार मारावयाला लावतां, ही गोष्ट खरी आहे काय?”

राजा ह्मणाला “रसकानें जें कांहीं सांगितलें आहे, तें सत्य आहे. माझ्यासाठीं तो हें कर्म करीत असतो.”

राजा आपल्या स्वयंपाक्याला पाठवून लोकांचे खून करतो व त्यांचें मांस खातो, हें वर्तमान सकाळ होण्याच्या आधींच सर्व राजधानीभर पसरलें. सेनापति रसकाला घेऊन राजवाड्यांत आला, त्याच वेळी बाहेरच्या बाजूस, आपल्या राज्याचा बंदोबस्त काय करावा, याचा विचार करण्यासाठीं प्रमुख नागरिकांची मोठी सभा भरली होती. सेनापतीनें राजाला अनेक गोष्टी सांगून नरमांसापासून निवृत्त होण्यासाठी पुष्कळ उपदेश केला; परंतु राजाच्या अंतःकरणावर त्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं.

तो ह्मणाला “सेनापति, तूं दुसरी कोणतीहि गोष्ट सांगितलीस, तरी ती कबूल करण्यास मी तयार आहें; परंतु नरमांसापासून निवृत्त होणें प्राणान्तींहि माझ्याकडून व्हावयाचें नाहीं!”

अनुक्रमणिका

सेनापतीनें राजाचा निश्चय बाहेर जमलेल्या नागरिकांनां कळविला. तेव्हां ते ह्मणाले "सेनापतिमहाराज! या नरमांसभक्षक चोराचें मन वळविण्याची खटपट तुह्मी कां करितां? त्याला याच क्षणीं या राज्यांतून बाहेर घालवून द्या, नाहींतर त्याची येथें धडगत दिसत नाहीं!"

पुनः सेनापति राजाजवळ जाऊन ह्मणाला "महाराज, आपल्या या अमानुष कृत्यानें सर्व नागरिक अत्यंत क्षुब्ध झाले आहेत. आपल्याला नरमांस सोडून देणें शक्य नसेल, तर या राज्यांतून आपण याच क्षणीं निघून जावें हें बरें! आपण जर इतःपर येथें राहिलां, तर सर्व नागरिक मलादेखील अनावर होऊन येथल्यायेथेंच आपल्याला ठार करतील!"

ब्रह्मदत्त अतिशय घाबरला व सेनापतीला ह्मणाला "मी आतांच्या आतां येथून निघून जातों; परंतु माझ्या रसकाला मात्र मजबरोबर द्या. मला माझीं शस्त्रास्त्रें आणि माझा रसक मिळाला, ह्मणजे मला या राजवाड्यांतील दुसरी कोणतीहि संपत्ति नको आहे!"

सेनापतीनें त्याच दिवशीं राजाला आणि रसकाला त्यांच्या शस्त्रास्त्रांसहवर्तमान वाराणसी नगरांतून हांकून दिलें. ब्रह्मदत्त एका मोठ्या अरण्यांत शिरला, व तेथें त्यानें एका वडाच्या झाडाखालीं रहाण्यासाठीं जागा तयार केली. तें वडाचें झाड एवढें मोठें होतें, कीं, आपलें वसतिस्थान तयार करण्यासाठीं खालची जमीन साफसूफ करण्यापलीकडे ब्रह्मदत्ताला विशेष मेहनत करावी लागली नाहीं.

या झाडापासून कांहीं अंतरावर काशी देशांतून इतर देशांत जाणारा रस्ता होता. या रस्त्यानें वाटसरू व व्यापारी लोक प्रवास करीत असत. ब्रम्हदत्तानें एकाद्या झाडाच्याआड दडून बसावें, व त्या मार्गानें पांथस्त जावयाला लागले, ह्मणजे त्यांतील एकाद्या लठ्ठ माणसाला मारून किंवा जीवंत धरून आपल्या वडाकडे चालतें व्हावें, व तेथें रसकानें आपल्या धन्यानें आणलेली शिकार घेऊन पक्वान्न तयार करून धन्याला द्यावें, असा क्रम चालला होता.

ब्रह्मदत्ताची सगळ्या भरतखंडामध्यें 'मनुष्यभक्षक चोर' अशी प्रसिद्धि झाली. त्या मार्गानें जाण्यास वाटसरू व व्यापारी लोक भिऊं लागले. तथापि अरण्यांतून पार जाण्यास दुसरा सोईवार रस्ता नसल्यामुळें निरुपायानें जीवावर उदार होऊन लोक त्याच मार्गानें जात असत.

एके दिवशीं रस्त्यांत माणसाची शिकार न साधल्यामुळें ब्रह्मदत्तानें आपल्या रसकाला मारून त्याचेंच मांस खाल्लें, आणि तेंव्हांपासून तो एकटाच राहूं लागला.

एके दिवशीं एक धनाढ्य ब्राह्मण त्या रस्त्यानें जात होता. त्यानें आपल्या रक्षणासाठीं पुष्कळ पैसे देऊन बरोबर कांहीं शूर शिपाई घेतले होते. ब्रह्मदत्तानें त्याच्यावर एकदम झडप घातली! 'मी मनुष्यभक्षक चोर आहें,' असें जेव्हां तो ओरडला, तेव्हां ब्राह्मणाच्या शिपायांचें धाबें दाणाणून ते गर्भगळित झाले. ब्रह्मदत्त ब्राह्मणाला खांद्यावर टाकून आपल्या स्थानाकडे जाऊं लागला. मागाहून ते शूर शिपाई एकामेकांनां ह्मणूं लागले, कीं, "काय हो आमचा हा नामर्दपणा! आह्मी मोठमोठ्या लढाया मारलेले मनुष्य त्या एकट्या चोराला पाहून गांगरून गेलों, हें आश्चर्य नव्हे काय! चला आपण त्याचा पाठलाग करूं, आणि ब्राह्मणाला सोडवून आणूं." त्यांनीं ब्रह्मदत्ताचा पाठलाग केला. तो त्यांनां चुकविण्यासाठीं आडवाटेनें पळत असतां त्याच्या पायांत एक खदिराचा सुळका शिरला. तेव्हां त्यानें ब्राह्मणाला तेथेंच टाकून देऊन आपला जीव

कसाबसा वांचविला. शिंपायांनां ब्राह्मण सापडल्यावर चोराला पकडण्याची इच्छा राहिली नाहीं. ते ब्राह्मणाला घेऊन माघारे फिरले व आपल्या मार्गाला लागले.

इकडे ब्रह्मदत्त जंगलांतून लंगडतलंगडत आपल्या निवासस्थानाजवळ आला, आणि त्या वडावर राहणाऱ्या देवतेला त्यानें असा नवस केला, कीं, "जर माझी ही जखम लवकर बरी झाली, तर शंभर राजपुत्रांच्या रक्तानें तुला मी स्नान घालीन आणि मोठा नरयज्ञ करीन."

सात दिवसपर्यंत अंथरुणावर पडून राहण्याचा प्रसंग आल्यामुळें ब्रह्मदत्ताची जखम आपोआप बरी होत गेली; परंतु आतां देवतेच्या ऋणांतून कसें मुक्त व्हावें हें त्याला सुचेना!

एके दिवशीं तो आपल्या शिकारीसाठीं निघाला असतां त्याला एक यक्ष भेटला. हा त्याचा पूर्वजन्मींचा सोबती होता. ब्रह्मदत्तानें आपली गोष्ट त्या यक्षाला सांगितल्यावर तो ब्रह्मदत्ताला ह्मणाला "गड्यां, तूं माझा पूर्वजन्मींचा दोस्त आहेस. तूं माझ्याबरोबर येत असलास, तर चल. आपण दोघे एकाच ठिकाणीं राहूं."

ब्रह्मदत्त ह्मणाला "मी तुझ्याबरोबरच आलों असतों; परंतु माझा एक नवस आहे, तो फेडल्यावांचून मला येथून जातां येत नाहीं!"

यक्ष ह्मणाला "असा तुझा नवस तरी कोणता आहे?"

ब्रह्मदत्तानें घडलेली गोष्ट सांगितल्यावर यक्ष त्याला ह्मणाला "शंभर राजकुमारांनां धरून आणण्यासाठीं मीं तुला मदत केली असती; परंतु जरूरीच्या कामामुळें मला माझ्या निवासस्थानाकडे आजच्या आज गेलें पाहिजे. तथापि मी तुला एक मंत्र शिकवितों, त्या मंत्राच्या सामर्थ्यानें वाटेल त्या ठिकाणीं वायुवेगानें जातां येईल."

ब्रह्मदत्तानें तो मंत्र चांगला पाठ केला. तेव्हां यक्षानें त्याला आलिंगन देऊन त्याचा निरोप घेतला.

त्या दिवसापासून भरतखंडांतील राजकुमारांनां पकडून आणण्याचा ब्रह्मदत्ताने सपाटा चालविला. दिवसांतून पांचदहा राजकुमारांनां त्यानें पकडून आणावें, व त्यांच्या तळहाताला भोकें पाडून त्यांत दोरी घालून वडाच्या पारंब्यांनां बांधून टाकावें. याप्रमाणें एका आठवड्यांतच त्यानें शंभर राजकुमार त्या वडाच्या झाडाखाली जमविले. परंतु सुतसोम राजकुमाराला लहानपणांत केलेला उपकार स्मरून पकडून आणलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं त्यानें पकडून आणलेल्या राजकुमारांनां मारून महायज्ञ करण्याचा बेत केला. तेव्हां त्या वटवृक्षवासी देवतेवर मोठेंच संकट आलें. ती आपल्या मनाशींच ह्मणाली "या चोराच्या पायांत सुळका शिरला, तेव्हां हा कांही तरी बडबडत सुटला, कांहीं तरी नवस करूं लागला, असें मला वाटलें होतें. याची जखम आपोआप बरी झाली. असें असतां आज हा माझ्यासाठीं शंभर राजकुमारांनां मारून यज्ञ करण्यास सिध्द झाला आहे! या राजकुमारांच्या हत्येचें पाप माझ्यावर पडूं पहात आहे! पण याला या कर्मापासून निवृत्त करण्याचा मला उपाय सुचत नाहीं. मी प्रकट होऊन या वृक्षावर राहणारी देवता आहें असें सांगितलें,

अनुक्रमणिका

तरी देखील हा माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीं. आतां इंद्रलोकीं जाऊन ही गोष्ट इंद्राला कळविली असतां तो कदाचित् या चोराला या पापकर्मापासून निवृत्त करूं शकेल."

यांप्रमाणें विचार करून ती देवता एकदम इंद्रलोकांत गेली, आणि इंद्राची भेट घेऊन तिनें त्याला हें वर्तमान कळविलें. इंद्र तिला ह्मणाला "त्या चोराला क्रूर कर्मापासून परावृत्त करण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं. घोर पापांमुळें त्याची ज्ञानदृष्टि इतकी मंद झाली आहे, कीं, मला ओळखण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं राहिलें नाहीं. या पापमार्गापासून त्याला परावृत्त करण्याचा एकच उपाय मला सुचतो; तो हा, कीं, सुतसोम राजकुमाराची आणि त्याची गांठ घालून द्यावी. सुतसोम आपल्या शीलतेजानें त्याची पापबुद्धि जाळून टाकील, आणि पुण्यबुद्धि प्रकाशित करील."

इंद्राचें हें भाषण ऐकून देवता त्याच क्षणीं आपल्या जागीं आली, आणि भिक्षुवेषानें ब्रह्मदत्ताजवळ गेली. ब्रह्मदत्त आपली तलवार घेऊन तिला मारण्यास धांवला; परंतु तिचा पाठलाग त्याला करतां आला नाहीं. तेव्हां तो ह्मणाला "अरे, भिक्षु, मला भिऊन असा पळतोस कां? तूं जर खराखुरा संन्यासी आहेस, तर जीविताची तुला इतकी पर्वा नसावी!"

भिक्षुवेषधारिणी देवता ह्मणाली "अरे चोरा, मी पळत नसून स्थिरच आहें. परंतु तुझ्या त्या पापकर्मामुळें तूंच अस्थिर आहेस. जणूं काय तूं इतस्ततः धांवत आहेस!"

हें त्या भिक्षूचें भाषण ऐकून ब्रह्मदत्त जरा वरमला व ह्मणाला "मी जरी पापी आहें, तरी माझें वचन मी पाळीत आलों आहें. माझ्या देवतेला केलेल्या नवसाप्रमाणें उद्यां मी शंभर राजकुमारांनां मारून यज्ञ करणार आहें."

भिक्षु ह्मणाला "या बाबतींत देखील तूं लबाडी केली आहेस! देवतेला आपल्या प्रिय वस्तूचा बळी द्यावा अशी वहिवाट आहे. परंतु तुझ्या आवडत्या सुतसोमाला वगळून बाकी राजकुमारांनांच तूं बळी देत आहेस! या तुझ्या कृत्यानें तुझी देवता कधींहि प्रसन्न होणार नाहीं!"

असें बोलून देवता तेथेंच अंतर्धान पावली.

ब्रह्मदत्ताला त्या भिक्षूचें बोलणे खरें वाटलें. भिक्षुवेषानें आपली देवताच पुढें आली असावी, अशी त्याला शंका आली. तो आपणाशींच ह्मणाला "मी सुतसोमाला वगळलें हें ठिक केलें नाहीं. देवतांची तृप्ति करण्यासाठीं खरे भक्त आपल्या मुलाचा देखील बळी देत असतात! मग सुतसोमानें बाळपणांत माझ्यावर थोडाबहुत उपकार केला होता, ह्मणून त्याला बळी न देणें हें माझ्या देवतेला पसंत कसें पडेल?"

त्याच दिवशीं सुतसोमाला धरून आणण्याचा ब्रम्हदत्तानें विचार केला; परंतु राजवाड्यातून सुतसोमाला उचलून आणणे शक्य नव्हतें. आतां कोणती युक्ति योजावी, अशा विवंचनेंत ब्रह्मदत्त बसला असतांना त्याचें लक्ष्य आकाशांतील ताऱ्यांकडे गेलें. ज्योतिःशास्त्रांत त्याची बरीच गति असल्यामुळें आकाशांतील ताऱ्यांकडे पाहून दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुष्यनक्षत्राचा योग येणार आहे, हें त्याला समजलें. पुष्यनक्षत्राचा योग आला असतां राजे लोक आपल्या तलावावर किंवा नदीवर स्नानाला जात असत. ब्रह्मदत्तानें सुतसोमाला तलावांत स्नानाला उतरल्याबरोबर पकडून आणण्याचा बेत करून पहांटेस इंद्रप्रस्थनगराबाहेर सुतसोमानें आपणासाठीं बांधिलेल्या तलावांत एका कमलिनीखालीं तो दडून बसला.

अनुक्रमणिका

सुतसोम युवराज विद्येचा मोठा भक्त आहे, अशी कीर्ति ऐकून तक्षशिला नगरींतील एक ब्राह्मण प्राचीन काळीं कश्यप बुद्धानें ह्मटलेल्या चार गाथा (श्लोक) पाठ करून इंद्रप्रस्थ नगराला आला. तो पुष्यनक्षत्राच्या योगाच्या पूर्वदिवशीं इंद्रप्रस्थ नगराच्या जवळच्या गांवीं येऊन पोहोंचला. रात्र फार झाल्यामुळें आणि थकवा आल्यामुळें त्यानें असा विचार केला, कीं, आजची रात्र येथेंच मुक्काम करून उद्यां सकाळीं युवराजाच्या दर्शनाला जावें.

सुतसोम पुष्यनक्षत्राच्या योगाच्या वेळीं स्नानाला जात असतां वाटेंत या ब्राह्मणाची गांठ पडली. ब्राम्हणानें हात उभारून युवराजाला आशीर्वाद दिला. सुतसोम रथांतून खालीं उतरला, आणि ब्राह्मण कोठून कां आला, याची त्यानें विचारपूस केली.

ब्राह्मण ह्मणाला "महाराज, आपण विद्येचे मोठे भोक्ते आहां. अशी आपली कीर्ति ऐकून तक्षशिलेहून मी येथपर्यंत चालत आलों आहें. मीं मजबरोबर प्रत्येकीं शंभर कार्षापण किंमतीचे चार श्लोक आणिले आहेत, ते आपण ऐकून घ्यावे, व आपणाला पसंत पडल्यास मला योग्य बिदागी द्यावी."

सुतसोम ह्मणाला "मी आतां स्नानाला चाललों आहें. पुष्यनक्षत्राचा योग असतां स्नान करावें, असा शास्त्राचा नियम आहे. तेव्हां तुह्मी सध्यां मी परत येईपर्यंत सांगतों त्या ठिकाणी विश्रांति घ्यावी."

सुतसोमानें आपल्या एका हुजऱ्याला ब्राह्मणाबरोबर पाठवून त्याची एका उत्तम वाड्यांत सर्व व्यवस्था करविली.

सुतसोम आपल्या तलावाच्या कांठीं येऊन स्नानासाठीं तलावांत उतरल्याबरोबर त्याला नरभक्षकानें पकडलें. सुतसोमाला पाठीवर टाकून त्याच्या शरीररक्षकांची पर्वा न करितां नरभक्षक वायुवेगानें जाऊं लागला. कांहीं अंतरावर गेल्यावर सुतसोमाला खालीं ठेवून उभा राहिला असतां नरभक्षकानें सुतसोमाच्या डोळ्यांतून निघालेलीं आसवें पाहिलीं, आणि तो सुतसोमाला ह्मणाला "हें तूं सुज्ञ माणसाला न शोभण्यासारखें कृत्य करीत आहेस. सत्पुरूष कोणताहि प्रसंग आला असतां शोक करीत नाहींत. तुलादेखील आह्मी लहानपणी धैर्यशाली समजत होतों. पण या प्रसंगीं तूं शोकानें व्याकुल झालेला दिसतोस! तुझ्या आप्तवर्गाची किंवा पुत्रदारांची आठवण झाल्यामुळें तुला शोक झाला आहे काय?"

बोधिसत्व ह्मणाला "मी माझ्यासाठीं, माझ्या बायकोमुलांसाठीं, किंवा ज्ञातिवर्गासाठीं शोक करीत नाहीं; परंतु एका ब्राह्मणाला त्याचे श्लोक ऐकून घेईन असें वचन देऊन मी स्नानाला आलों, तें वचन माझ्याकडून पाळलें गेलें नाहीं, याबद्दल मला अत्यंत खेद होत आहे. जर तूं मला सोडून देशील, तर ब्राह्मणाचे श्लोक ऐकून व त्याला योग्य बिदागी देऊन मी परत येईन."

नरभक्षक ह्मणाला "असल्या गोष्टीवर विश्वास ठेवण्याइतका मी मूर्ख नाहीं! मृत्युमुखांतून सुटून सुखरूप जागीं पोहोंचलेला मनुष्य पुनः राजीखुषीनें आपल्या शत्रूच्या ताब्यांत जाईल, हें संभवनीय तरी आहे काय? हे कुरुश्रेष्ठ! तूं माझ्या हातून सुटल्याबरोबर आपल्या अंतःपुरांत जाऊन नानातऱ्हेच्या वस्तूंचा उपभोग घेत असतां अत्यंत मधुर आणि प्रिय जीविताचा लाभ झाल्याबद्दल तुला हर्ष होईल; आणि मग तूं कसचा बसला आहेस मजजवळ यावयाला!"

अनुक्रमणिका

बोधिसत्व ह्मणाला "हे नरभक्षक, असत्य भाषणाचें पाप जोडून जगण्यापेक्षां मी मोठ्या आनंदानें मरण पत्करीन. जो केवळ आपलें जीवित रक्षण करण्यासाठीं खोटें बोलतो, तो शत्रूपासून यदाकदाचित् बचेल; परंतु दुर्गतीपासून कधींहि मुक्त होणार नाहीं! हे पुरुषाद! चंद्र आणि सूर्य पृथ्वीवर पडतील, आणि सर्व नद्या उगमाकडे वाहूं लागतील, परंतु माझ्या तोंडांतून असत्य वचन कधींहि निघणार नाहीं! एवढें असून तुला जर माझा विश्वास वाटत नसला, तर या तुझ्या तलवारीची शपथ घेऊन मी असें ह्मणतों, कीं, ब्राह्मणाच्या ऋणांतून मुक्त होऊन मी लवकर तुजपाशीं येईन."

नरभक्षक मोठ्या बुचकळ्यांत पडला. क्षत्रियांनीं सहसा करूं नये अशा प्रकारची शपथ सुतसोम करीत आहे, तेव्हां त्याला सोडून द्यावें कीं न द्यावें, याची त्याला पंचाईत पडली. शेवटीं त्यानें असा निश्चय केला, कीं, सुतसोम जरी पळून गेला, तरी हरकत नाहीं. एकदां याची परीक्षा तरी पहावी. नंतर तो सुतसोमाला ह्मणाला "सुतसोम! क्षत्रियांनीं सहसा घेऊं नये अशा प्रकारची तलवारीची शपथ तूं घेतली आहेस, ह्मणून मी तुझ्यावर विश्वास ठेवून तुला सोडून देत आहें. ब्राम्हणाची रवानगी करून तूं परत येशीलच. तुझ्यावांचून माझा यज्ञ पुरा होणार नाहीं, हें लक्ष्यांत ठेव."

सुतसोम नरभक्षकाच्या हातून सुटल्यावर थेट आपल्या वाड्यांत गेला. त्याला पाहून सर्व लोकांनां आनंद झाला. राजपुत्र मोठ्या शहाणपणानें नरभक्षकाच्या हातून सुटला, असे जो तो ह्मणूं लागला. परंतु बोधिसत्वानें आपल्या परिजनांच्या ह्मणण्याकडे विशेष लक्ष्य न देतां प्रथमतः श्लोक घेऊन आलेल्या ब्राह्मणाची चौकशी केली, व त्याला ताबडतोब बोलावून आणून त्याचे श्लोक ह्मणून दाखविण्यास सांगितलें.

ब्राह्मण ह्मणाला "महाराज, माझे हे श्लोक कश्यप बुद्धाच्या तोंडून निघाले आहेत, तेव्हां तूं यांचें सादर श्रवण कर.

[१]
घडे सज्जन संगती एकवार,
तरी तारिल ती मानवास पार;
दुर्जनाची संगती सर्वकाळ,
नये कामा ती आलियास वेळ.

[२]
राहिं साधूंच्या सदा संगतींत,
करीं मैत्री सज्जनीं मानिं प्रीत;
धर्म साधूंचा जाणुनियां स्पष्ट,
सौख्य पावे नर, दुःख होइ नष्ट.

[३]
रथहि राजाचे चित्र [विचित्र.] होति जीर्ण,
देह मनुजांचे वृद्ध होति तूर्ण;
सज्जनांच्या धर्मास जरा नाहीं,
साधु सांगति साधूंस हेंच पाहीं.

अनुक्रमणिका

[४]
नभाहूनी ही भूमि असे दूर,
सागराचाही दूर तसा पार;
असे त्याहुनि तो धर्म सज्जनाचा,
असद्धर्माहुनि फार दूर साचा [मूळ श्लोक (गाथा) येणेंप्रमाणें आहेत:—
सकिदेव सुतसोम सब्भि होति समागमो ।
सा नं संगति पालेति नासब्भि बहु संगमो ॥
सब्भिरेव समासेथ सब्भि कुब्बेथ संथवं ।
सतं सद्धम्ममन्नाय सेय्यो होति न पापियो ॥
जीरन्ति वे राजरथा सुचित्ता अथो सरीरंऽपि जरं उपेति ।
सतंच धम्मो न जरं उपेति सन्तो हवे सब्भि पवेदयंति ॥
नभं च दूरे पठवी च दूरे पार समुद्दस्स तदाहु दूरे ।
ततो हवे दूरतरं वदन्ति सतं च धम्मो असतं च राजाऽति ॥]

हे ब्राह्मणाचे श्लोक ऐकून बोधिसत्व फार संतुष्ट झाला व त्यानें ब्राह्मणाला एकदम चार हजार कार्षापण बक्षीस दिले. हें वर्तमान कौरव्यराजाला समजलें, तेव्हां तो बोधिसत्वावर फारच रागावला. तो ह्मणाला “अरे, सुतसोम! पांचपन्नास, शंभर कार्षापण एकेका श्लोकाला दिले ह्मणजे कमाल झाली. तूं एकदम एका श्लोकाला एक हजार कार्षापण दिले, याला काय ह्मणावें?”

सुतसोम ह्मणाला “महाराज, विद्येची अभिवृद्धि व्हावी हाच माझा हेतु आहे. साधुसंतांचीं बोधवचनें ऐकून माझी तृप्ति कधींहि होत नाहीं. माझ्या दासापासून देखील हितोपदेश ऐकण्यास मी तयार असतों. तेव्हां इतक्या दुरून मुद्दाम आलेल्या ब्राह्मणाला मी विमुख कसा पाठवूं? ज्याअर्थी त्याचा उपदेश मीं ऐकून घेतला, त्याअर्थी त्याची योग्य बिदागी करणें रास्त होतें. आपण ह्मणतां त्याप्रमाणें पांच, पन्नास, किंवा शंभर कार्षापण दिले, तर ते त्याला वाटखर्चाला देखील पुरावयाचे नाहींत. आतां पैशाचा अपव्यय केल्याबद्दल आपण माझ्यावर रागावण्याचें कारण नाहीं. यापुढें माझ्या हातून असा अपव्यय होणार नाहीं. मी नरभक्षकाला वचन दिल्याप्रमाणें त्याच्यापाशीं जातों. तेथून जीवंत येण्याची आशाच नाहीं!”

कौरव्यराजा चकित होऊन ह्मणाला “हें तूं भलतेंच काय बोलत आहेस! एकदां तूं त्या दुष्टाच्या हातून सुटून आलास, आणि पुनः त्याच्या तोंडांत जाऊन पडतोस, याला काय ह्मणावें?”

बोधिसत्व ह्मणाला “महाराज! तो जरी अत्यंत क्रूर असला, तरी त्यानें माझ्यावर मोठा उपकार केला आहे. ब्राह्मणाच्या ऋणांतून मुक्त होण्यास त्यानें मला संधि दिली, हा त्याचा उपकार मी कसा विसरेन? त्याचा मीं विश्वासघात केला असतां माझ्यासारखा नीच आणि कृतघ्न मीच होईन!”

सुतसोम आपल्या पित्याचा आग्रहानें निरोप घेऊन नरभक्षक ब्रह्मदत्ताचा पत्ता काढीत तो ज्या ठिकाणीं रहात होता, त्या वडाच्या झाडापाशीं गेला. ब्रह्मदत्त मोठें थोरलें होमकुंड पेटवून महानरयज्ञाची तयारी करण्यांत गुंतला होता. सुतसोमाला पाहून त्याला अत्यंत आश्चर्य वाटलें. तो टक लावून त्याच्याकडे पहात राहिला.

सुतसोम जवळ जाऊन त्याला ह्मणाला “हे नरभक्षक! मी ब्राह्मणाला दिलेलें वचन पुरें करून आलों आहें. आतां तूं मला मारून यज्ञ कर किंवा माझें मांस खा. जें तुला वाटेल तें कर!”

अनुक्रमणिका

ब्रह्मदत्त ह्मणाला "होमकुंड नुकतेंच पेटविलें आहे, आणि तूं कांहीं कोठें पळून जात नाहींस; परंतु तूं ब्राह्मणापासून जे श्लोक ऐकिलेस, ते ऐकण्याची माझी फार इच्छा आहे. तेव्हां त्या तुझ्या बहुमोल गाथा (श्लोक) मला ह्मणून दाखीव."

बोधिसत्व ह्मणाला "जिव्हालंपट होऊन तूं आपलें राज्य घालविलेंस! त्या तुला या धार्मिक गाथांचा उपयोग काय? अत्यंत क्रूर कर्मे करणाऱ्या आणि रक्तानें हात माखलेल्या तुझ्यासारख्या अधार्मिक मनुष्यापाशीं सत्य कोठून सांपडणार? आणि ज्याच्यापाशीं सत्य नाहीं, त्याला सुभाषिताची काय चाड?"

ब्रह्मदत्त ह्मणाला "मी नरमांस खातों, हाच काय तो माझा मोठा गुन्हा आहे; आणि ह्मणूनच तूं मला अधार्मिक ह्मणत आहेस; परंतु मी तुला असें विचारतों, कीं, मृगयेला जाऊन गरीब बिचाऱ्या श्वापदांनां मारून खाणें आणि माणसाला मारून खाणें यांत भेद काय?"

बोधिसत्व ह्मणाला "ब्रह्मदत्त, पांच नखें असलेले पांचच प्राणी क्षत्रियानें भक्षण करावे, अशी शास्त्राची अनुज्ञा आहे; पण तुझें हें कर्म शास्त्रनिषिद्ध असल्यामुळें तूं अधार्मिक ठरतोस."

ब्रह्मदत्तानें हा संवाद तसाच सोडून दिला. कारण, आपला गुन्हा कबूल करण्याचें त्याला धाडस नव्हतें. तो बोधिसत्वाला ह्मणाला "मी धार्मिक आहें, कीं, अधार्मिक आहें, याबद्दल वाद नको आहे; परंतु मला तूं पुनः आलास कसा हें सांग. मला वाटतें, कीं, तूं क्षत्रियनीति विसरलास; नाहींतर शत्रूच्या हातांतून येन केन प्रकारें मुक्त झाल्यावर पुनः राजीखुषीनें तूं माझ्या ताब्यांत आला नसतास!"

बोधिसत्व ह्मणाला "राजनीतीपेक्षां सत्य श्रेष्ठ होय! सत्यासारखी दुसरी नीति या जगामध्यें नाहीं. त्या सत्याचा भंग होऊं नये, ह्मणून मी राजीखुषीनें या ठिकाणीं आलों आहें."

ब्रह्मदत्त ह्मणाला "राजवाड्यामध्यें षड्रस अन्नांचें सेवन करण्यास आणि श्रृंगाररसाचें आकंठ पान करण्यास मिळतें, असें असतां सत्यालाच धरून बसणें केवळ मूर्खपणा होय!"

बोधिसत्व ह्मणाला "या जगामध्यें सत्यासारखा दुसरा मधुर रस नाहीं. सत्यरसाचा ज्यांनीं आस्वाद घेतला, तेच साधुसंत संसारसमुद्र तरून जाण्यास समर्थ होतात."

ब्रह्मदत्त ह्मणाला "पण जीवितभय सर्वांत मोठें आहे! आपल्या जीविताचें रक्षण करण्यासाठीं खोटें बोलावें असें राजनीती सांगते. तथापि तूं आपल्या जीविताविषयीं अगदींच बेफिकीर दिसतोस; याचें कारण काय?"

बोधिसत्व ह्मणाला "मीं आजपर्यंत अनेक लोकांवर उपकार केला आहे, अनेक शुभ कर्मे केलीं आहेत, आईबापांची सेवा केली आहे, आप्तजनांला मदत केली आहे, थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे गृहस्थाचा जीं कर्तव्यें आहेत, त्यांत मीं कसूर पडूं दिली नाहीं. तेव्हां आतां मला पश्चाताप होण्याचें कांहीं एक कारण राहिलें नाहीं. अर्थात् मरणभयापासून मी मुक्त आहें, यांत नवल नाहीं."

अनुक्रमणिका

ब्रह्मदत्त बोधिसत्वाच्या भाषणानें अत्यंत संतुष्ट झाला. अशा थोर पुरुषाला मारून यज्ञ करणें ह्मणजे भरतखंडाची मोठीच हानि करणें होय, अशी त्याची पक्की खात्री झाली. तो ह्मणाला "तुझ्यासारख्या सत्पुरुषाला मारून यज्ञ करण्यापेक्षां हलाहल विष भक्षण करून प्राण द्यावा हें बरें! परंतु तुझ्या गाथा मला सांग. मी जरी अनधिकारी असलों, तरी तुझ्यासारख्या साधुपुरुषाकडून त्या ऐकिल्या ह्मणजे त्यांचा अर्थ मला कळेल."

त्याच्या आग्रहास्तव ब्राह्मणाकडून ऐकिलेल्या चारहि गाथा सुतसोमानें त्याला ह्मणून दाखविल्या. तेव्हां तो बोधिसत्वाला ह्मणाला "हे नरश्रेष्ठ! या तुझ्या अर्थपूर्ण सुंदर गाथा ऐकून मला अत्यंत आनंद झाला आहे. या चार गाथांबद्दल मी मोठ्या संतोषानें तुला चार वर देतों."

बोधिसत्व ह्मणाला "हे ब्रह्मदत्त! आपलें हिताहित न जाणतां केवळ जिव्हालौल्यानें तूं कुकर्मे करण्यास प्रवृत्त झालास. तुझ्या अंगीं वर देण्याचें सामर्थ्य कोठून असणार? समज, मीं तुझ्यापाशीं वर मागितला, आणि तुझ्या स्वभावाप्रमाणें तूं तो देत नाहीं असें ह्मटलेंस, मग अशा वेळीं भांडणाशिवाय दुसरें काय निष्पन्न होणार आहे? आणि कोणता शहाणा मनुष्य तुझ्यासारख्या माणसाशीं जाणूनबुजून भांडण उपस्थित करील?"

ब्रह्मदत्त ह्मणाला "हे कुरुश्रेष्ठ! सर्व शंका सोडून दे. माझ्या वचनाचा मी कधींहि भंग करणार नाहीं. माझा प्राण गेला, तरी तूं मागून घेतलेले वर फेडल्यावांचून मी रहाणार नाहीं!"

याप्रमाणें ब्रह्मदत्तानें वर मागण्यास फारच आग्रह केल्यावर बोधिसत्व त्याला ह्मणाला "ठीक आहे; पहिला वर मी असा मागतों, कीं, तुला शंभर वर्षेपर्यंत निरोगी आणि सुखी पहाण्यास मीं समर्थ व्हावें."

हें ऐकून ब्रह्मदत्ताला अत्यंत आनंद झाला. हा अलौकिक पुरुष वर मागतांना देखील दुसऱ्याच्याच कल्याणाकडे अधिक लक्ष्य देतो, असें वाटून मोठ्या हर्षानें तो बोधिसत्वाला ह्मणाला "हा वर मीं तुला दिला आहे. आतां दुसरा वर माग."

बोधिसत्व ह्मणाला "हे जे राजकुमार तूं धरून आणिले आहेत, त्यांनां जीवदान द्यावें, हा मी दुसरा वर मागतों."

ब्रह्मदत्तानें तोहि वर मोठ्या संतोषानें दिला. तेव्हां बोधिसत्वानें, त्या सर्व राजकुमारांनां मुक्त करून आपापल्या राजधानीला पोंहोंचवावें, असा तिसरा वर मागिंतला.

ब्रह्मदत्तानें मोठ्या आनंदानें तोहि वर दिला; आणि बोधिसत्वाला चौथा वर घेण्यास सांगितलें.

बोधिसत्व ह्मणाला "ज्या कृत्यामुळें तुझें राष्ट्र उपद्रव पावलें, व इतर राष्ट्रांतील लोकांनांहि ज्यामुळें अत्यंत ताप होत आहे, तें नरमांसभक्षणाचें कर्म तूं सोडून द्यावें, हा मी चौथा वर मागतों."

ब्रह्मदत्त ह्मणाला "याच्याबद्दल तूं दुसरा कोणताहि वर माग. ज्या नरमांसासाठीं मीं राज्याचा त्याग केला, तें खाण्याचें सोडून देणें मला कसें शक्य होईल?"

अनुक्रमणिका

बोधिसत्व ह्मणाला “मीं तुला पूर्वीच सांगितलें होतें, कीं, तूं या वर देण्याच्या भानगडींत पडूं नको म्हणून! कांकीं, मीं वर मागितला असतां तुझ्यानें तो देववणार नाहीं, व त्यामुळें विनाकरण भांडण मात्र होईल.”

हें बोधिसत्वाचें भाषण ऐकून ब्रम्हदत्ताला लाज वाटली, आणि तो म्हणाला “मनुष्यमांसासारखी मला दुसरी कोणतीहि वस्तु प्रिय नाहीं. तथापि मीं मनुष्यमांस सोडावें असाच जर तुझा हट्ट असेल, तर तोहि वर मी तुला देतों.”

बोधिसत्व आपण स्वतः जाऊन वडाच्या झाडाच्या पारंब्यांला बांधून घातलेल्या राजकुमारांनां म्हणाला “मी तुम्हांला मुक्त करण्यासाठीं येथें आलों आहें. परंतु तुह्मांला येथून सोडून देण्यापूर्वी तुह्मीं ‘कल्माषपादानें (ब्रह्मदत्ताच्या पायांत खैराचा सुळका भरून जखम झाल्यामुळें सुतसोमानें येथें त्याला कल्माषपाद ह्मटलें असावें.) आह्मांला अत्यंत त्रास दिला, आमचे तळहात फोडून त्यांत दोऱ्या घालून आह्मांला येथें बांधून टाकिलें,’ असें ह्मणून त्याचा सूड उगविण्याची बुद्धि मनांत वागवितां कामा नये. त्याचा कोणत्याहि प्रकारें सूड उगविणार नाही, अशी जर तुह्मी प्रतिज्ञा करीत असाल, तर मी तुह्मांला सोडून देतों.”

राजकुमारांनीं, ब्रह्मदत्ताचा सूड घेणार नाहीं, अशी प्रतिज्ञा केली. एवढेंच नव्हे, तर आपण त्याच्यावर आपल्या आईबापांप्रमाणेंच प्रेम करूं, असें अभिवचन दिलें. तेव्हां बोधिसत्वानें त्या सर्वांनां मुक्त करून आपापल्या ठिकाणीं पाठविलें, आणि कल्माषपादाला घेऊन तो वाराणसी नगरीला गेला. तेथें कल्माषपादाचा तरुण पुत्र, कालहस्ती सेनापतीच्या मदतीनें राज्य करीत होता. त्या दोघांनांहि चार उपदेशाच्या गोष्टी सांगून कल्माषपादाचें पालन करण्याविषयीं बोधिसत्वानें त्यांचें मन वळविलें.

ब्रह्मदत्त नरमांसापासून उपरत झाला आहे व यापुढें सद्धर्मानें वागण्याचा त्यानें निश्चय केला आहे, इत्यादि वर्तमान ऐकून त्याच्या मुलाला आणि सेनापतीला फार संतोष झाला. त्यानें ब्रह्मदत्ताला राजवाड्यांत आणिलें, आणि सर्व नागरिकांसमोर बोधिसत्वाचा मोठा गौरव केला. बोधिसत्व एक महिनापर्यंत वाराणसीमध्यें राहिला, व ब्रह्मदत्त पापकर्मापासून पूर्णपणें निवृत्त झाला अशी खात्री झाल्यावर स्वदेशीं परत गेला.

बोधिसत्वानें आपल्या सत्याचरणाच्या जोरावर कल्माषपादाचें दमन करून त्याला सन्मार्गाला लाविलें, ही गोष्ट सर्व भरतखंडांत पसरली. बोधिसत्व जेव्हां इंद्रप्रस्थ नगराला आला, तेव्हां कौरव्य राजानें आणि सर्व नागरिकांनीं सात दिवसपर्यंत उत्सव करून त्याचा मोठा गौरव केला. दूरदूरच्या देशांतून सुतसोम राजकुमाराची भेट घेण्यासाठीं अनेक भाविक लोक येऊं लागले.

इकडे ब्रह्मदत्तानें ज्या वडाच्या झाडाखालीं आपण वास केला होता, तेथें एक लहानसें शहर वसविलें, व त्या शहराला कल्माषदम्य असें नांव दिलें.

या जन्मीं बोधिसत्वानें आपलें वचन पाळून सत्यपारमितेचा अभ्यास केला.

अनुक्रमणिका

# भाग दुसरा बुद्धचरित्र

[१]

## जन्म आणि बालपण

**दी**पंकरबुद्धानंतर निरनिराळ्या कल्पांमध्ये कौंडिण्यादिक तेवीस बुद्ध झाले. या सर्वांच्या कारकीर्दीत आमचा बोधिसत्व दहा पारमितांपैकी एकादी पारमिता पूर्ण करण्यांत गुंतला होता. या पारमिता पूर्ण करण्यासाठीं बोधिसत्वानें अनेक जन्म घेतले, व त्या पूर्ण झाल्यावर शेवटल्या जन्मीं तो तुषित नांवाच्या देवलोकांत जन्मला.

त्या वेळीं जगतीतलावर बुद्ध उत्पन्न व्हावा, अशी सर्व देवांनां तळमळ लागून राहिली होती. अनेक चक्रवालांतून देव एकत्र जमून त्यांनीं बोधिसत्वाला मनुष्यलोकामध्यें जन्म घेण्यासाठीं फारच आग्रह केला. ते ह्मणाले "हे मित्रा! तूं आजपर्यंत ज्या दहा पारमितांचा अभ्यास केलास, ज्या पारमिता तूं पूर्णत्वाला नेल्यास, त्या जगामध्यें मोठी संपत्ति मिळावी ह्मणून नव्हे; इंद्रपद किंवा ब्रह्मपद मिळावें ह्मणून नव्हे; तर मनुष्यलोकीं जन्म घेऊन बुद्धपद मिळवावें आणि तद्द्वारा देवमनुष्यांचा उद्धार करावा, याचसाठीं अनेक जन्म घेऊन तूं दहाहि पारमितांमध्यें पारंगतता संपादन केली आहेस! आतां बुद्ध होण्याचा समय जवळ आला आहे, तेव्हां नंदनवनांतील सुखांत न रमतां मनुष्यलोकींचीं दुःखें भोगण्यास तयार हो!"

बोधिसत्व ह्मणाला "मित्रहो, मीं आजपर्यंत सर्व प्राणियोनींमध्यें जन्म घेऊन अनेक दुःखें सहन केलीं आहेत. लोकोद्धारासाठीं दुःख सहन करण्यांत मला जेवढा आनंद वाटतो, तेवढा या तुषितभवनांतील नंदनवनांतहि वाटत नाहीं! परंतु मनुष्यलोकीं जन्म घेण्यापूर्वी मला कांहीं गोष्टींचा विचार केला पाहिजे. अल्पावकाशांतच माझा बेत काय ठरला, हें मी तुह्मांला सांगेन."

सगळे देव आपापल्या ठिकाणीं गेल्यावर बोधिसत्व तुषितभवनांतील नंदनवनांत एकांतस्थळीं बसून विचारमग्न झाला. तो आपणाशींच ह्मणाला "मनुष्यलोकामध्यें जन्म घेण्यास सध्याचा काळ योग्य दिसतो, ज्या कालीं मनुष्याचें आयुष्य हजारों वर्षे असतें, त्या कालीं त्याला जातिजरादि दुःखांचा नीट बोध होत नसतो; पण आतां मनुष्याचें आयुष्य अवघें शंभर वर्षांचें आहे, तेव्हां सद्धर्मप्रसाराला हाच समय मला योग्य वाटतो; पण या अफाट पृथ्वीतलावर कोणत्या खंडांत जन्म घ्यावा? विचाराअंतीं मला असें वाटतें, कीं, भरतखंडच बुद्धोत्पत्तीला योग्य स्थान आहे. या भरतखंडामध्यें विंध्य आणि हिमालय या पर्वतांमधील प्रदेशांत-मध्यदेशांत-प्राचीनकालीं थोर साधुसंत आणि सर्व बुद्ध उत्पन्न झाले; पण या देशांतदेखील सद्धर्माचा प्रसार करण्यासाठीं मला उत्तम कुलांतच जन्म घेतला पाहिजे. हे हिमालयाच्या पायथ्याशीं रहाणारे शाक्यराजे मोठे स्वाभिमानी आहेत. प्रसिद्ध इक्ष्वाकु राजा यांचा पूर्वज असल्यामुळें सर्व लोकांत यांच्या कुलाला फार मान आहे. तेव्हां याच कुलामध्यें शेवटला जन्म घ्यावा, हें मला उचित आहे. आतां कोणत्या आईच्या उदरीं जन्माला यावें, हें ठरविण्याची पंचाईत राहिली नाहीं. शुद्धोदनराजाची साध्वी स्त्री माझी आई होण्यास योग्य आहे. तेव्हां देवांनीं केलेल्या विनंतीला मान देण्यास मला आतां उशीर लावण्याचें कारण उरलें नाहीं."

बोधिसत्वानें शाक्यकुलामध्यें शुद्धोदनराजाच्या पत्नीच्या उदरीं जन्म घेण्याचा आपला निश्चय देवांनां कळविला. तेव्हां त्यांतील ज्या देवांची आयुर्मर्यादा संपली होती, त्यांनींहि बुद्धाचे शिष्य होण्याची संधि दवडूं नये ह्मणून मध्यदेशामध्यें जन्म घेण्याचा बेत केला.

अनुक्रमणिका

आषाढी पौर्णिमेच्या पूर्वी सात दिवस कपिलवस्तु नगरामध्यें एका मोठ्या उत्सवाला सुरुवात होत असे. हा उत्सव सात दिवस चालून पौर्णिमेच्या दिवशीं समाप्त होत असे. मायादेवी सात दिवसपर्यंत पुष्पगंधादिकांनी शरीर श्रृंगारून मोठ्या आनंदानें उत्सवामध्यें मिसळत असे; परंतु तिच्या नियमाप्रमाणें तिनें दारूला कधींहि स्पर्श केला नाहीं. इतर क्षत्रिय स्त्रिया आणि पुरुष त्या काळच्या वहिवाटीप्रमाणें त्या उत्सवांत मद्यपान करीत असत. परंतु मायादेवी सर्व प्रकारच्या मादक पदार्थांपासून अलिप्त राही.

एका वर्षी या पौर्णिमेच्या दिवशीं मायादेवीनें अंध, पंगु इत्यादि अनाथ लोकांनां आणि श्रमणब्राह्मणांनां पुष्कळ दानधर्म केला, आणि रात्रीं बराच वेळ धर्मश्रवणांत घालवून ती निजावयाला गेली.

त्या रात्रीं तिनें पुढीलप्रमाणें एक स्वप्न पाहिलें:—

चारहि दिशांच्या रक्षक देवांनीं उचलून तिला हिमालयावर नेलें. तेथें रमणीय भूमिभागीं एका भव्य शालवृक्षाखालीं तिला ठेवण्यांत आलें. नंतर त्या चारहि देवांच्या स्त्रियांनीं येऊन मायादेवीला दिव्य गंधोदकानें स्नान घातलें, व दिव्य वस्त्रालंकारांनीं तिला शृंगारून एका कनकविमानामध्यें उत्तम पलंगावर पूर्वेला डोकें करून निजविलें. तेव्हां एक सफेत हत्ती जवळच्या सुवर्णपर्वतावरून खालीं उतरून मायादेवी निजली होती त्या ठिकाणीं आला, व आपल्या रजतवर्ण शुडेंत एक सफेत कमल घेऊन त्यानें मायादेवीला त्रिवार प्रदक्षिणा केली आणि तिच्या उजव्या कुशींतून तो हळूच उदरांत शिरला!

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मायादेवीनें प्रफुल्लित वदनानें आपलें स्वप्न शुद्धोदन राजाला सांगितलें. राजानें आपल्या राज्यांतील प्रमुख ब्राह्मणांनां आमंत्रण करून सभेमध्यें त्यांनां या स्वप्नाचा अर्थ विचारिला.

ब्राह्मण ह्मणाले “महाराज, हें स्वप्न अत्यंत शुभसूचक आहे. राज्ञीच्या उदरीं एक मोठा सत्पुरुष जन्माला येणार आहे. तो जर गृहस्थाश्रमामध्यें राहील, तर चक्रवर्ती राजा होईल. संन्यासी होईल, तर बुद्ध होऊन जगताचें अज्ञान दूर करील.”

राजानें ब्राह्मणाचें भाषण ऐकून संतुष्ट चित्तानें त्यांचा चांगला गौरव केला, आणि त्या दिवसापासून आपल्या पत्नीची तो विशेष काळजी घेऊं लागला.

मायादेवीचे डोहळे कांहीं विशेष नव्हते. सर्व प्राणिमात्रांविषयीं तिच्या अंतःकरणांत आधींच दया वास करीत होती. बोधिसत्व उदरांत आल्यापासून तर ती अधिकच वृद्धिंगत होत गेली. मायादेवीच्या मनांतून विषयवासना पार नष्ट झाली. शुद्धोदनराजावर तिचें प्रेम फारच होतें, व ते या स्थितींत अधिक वाढलें; परंतु पूर्वी त्या प्रेमांत विषयवासना मिसळली होती — या अभिनव प्रेमांत ती राहिली नाहीं. याप्रमाणे मायादेवीला नवमास पूर्ण झाले.

एके दिवशीं मायादेवी शुद्धोदनराजाला ह्मणाली “महाराज, आतां मी माहेरीं जाण्यास उत्कंठित झालें आहें. तेव्हां मला लवकर माझ्या आईच्या घरीं पाठविण्याची व्यवस्था करा.”

शुद्धोदनराजानें या नऊ महिन्यांत आपल्या पत्नीचें मन कधींहि दुखविलें नाहीं. तिच्या ह्मणण्याप्रमाणें वागण्यास तो सदोदित तत्पर असे, त्यानें ताबडतोब एक हजार सैन्य बरोबर देऊन देवदह

शहरांत मायादेवीचा पिता रहात असे, तेथें तिला पाठविण्याची व्यवस्था केली. कपिलवस्तूपासून देवदहापर्यंत सर्व रस्ता साफ करवून मायादेवीला एका सुंदर शिबिकेमध्यें बसवून रवाना करण्यांत आलें.

कपिलवस्तु आणि देवदह या दोन शहरांच्या दरम्यान लुंबिनी नांवाचें एक सुंदर उद्यान होतें. कपिलवस्तूचे शाक्य आणि देवदहाचे कोलिय यांनीं आपल्या सीमेवर उभयतांच्या करमणुकीसाठीं हें उद्यान तयार केलें होतें. मायादेवी कपिलवस्तुहून निघून जेव्हां या उद्यानाजवळ आली, तेव्हां तिला तेथें कांहीं वेळ विश्रांति घेण्याची उत्कट इच्छा उत्पन्न झाली. तिच्या हुकुमाप्रमाणें तिची शिबिका उद्यानांत नेण्यांत आल्यावर ती खालीं उतरली, व इकडेतिकडे फिरूं लागली. त्या उद्यानांत एक अत्यंत सुंदर शालवृक्ष त्या वेळीं खालपासून वरपर्यंत सारखा फुलून गेला होता. मायादेवी त्या वृक्षाखाली जाऊन उभी राहिली, तोंच एक शाखा वांकून तिच्या हातांत आली; इतक्यांत तिला गर्भवेदना होऊं लागल्या. तिच्या दासीगणानें चारी बाजूंला कनात लावून मायादेवीला आंत ठेविलें. तेथेंच आमच्या बोधिसत्वाचा जन्म झाला.

तेव्हां ब्रह्मलोकांतून चार ब्रम्हदेव [ब्रह्मलोकीं असंख्य ब्रह्मदेव आहेत, अशी कल्पना होती.] तेथें आले, आणि मायादेवीला ह्मणाले "देवि! तुझा हा पुत्र जगाचा उद्धार करणारा आहे. अशा पुत्राला जन्म दिल्याबद्दल तुला अत्यंत आनंद झाला पाहिजे."

बोधिसत्व इतर प्राण्यांप्रमाणें गर्भमलानें माखलेला जन्मला नाहीं. रेशमी वस्त्रावर ठेवलेल्या उंची मोत्याप्रमाणें तो निर्मळ होता. तथापि त्याचा बहुमान करण्यासाठीं आकाशांतून दोन उदकधारा खालीं आल्या व त्यांनीं बोधिसत्वाचें आणि मायादेवीचें अंग धुऊन टाकिलें.

बुद्धाचा जन्म झाल्याबरोबर जिकडेतिकडे आनंदी आनंद झाला. मुक्यांनां वाचा फुटली; अंध दिव्यरूपेंदेखील पाहूं लागले; पांगळे खडखडीत चालूं लागले; वायु मंजुल वाहूं लागला; लहानसान ओढ्यांचेंदेखील पाणी निर्मळ झालें; व्याघ्रादि हिंस्त्र श्वापदांनी आपला क्रूरपणा सोडून दिला; अशा प्रकारचे आणखीहि पुष्कळ चमत्कार घडून आले!

शुद्धोदनराजाला पुत्रजन्माची वार्ता समजल्याबरोबर त्यानें मोठ्या थाटानें मायादेवीला पुत्रासहवर्तमान कपिलवस्तूला नेलें.

त्या वेळीं कपिलवस्तूच्या जवळच्या अरण्यामध्यें असित देवल नांवाचा ऋषि रहात असे. त्यानें, अंतरिक्षांत ध्वजपताकादि उभारून देव मोठा उत्सव करीत आहेत, हें पाहिलें; व तो त्या देवांनां ह्मणाला "देवहो, आज तुह्मी हा एवढा मोठा उत्सव करीत आहां, याचें कारण काय? असुरांचा पराजय झाला व तुमचा जय झाला, त्या वेळीं देखील तुह्मीं अशा प्रकारचा उत्सव केला नाहीं!"

देव ह्मणाले "तूं इतक्या जवळ असून शुद्धोदनराजाला पुत्र झाला, हें वर्तमान तुला माहीत नाहीं काय? हा पुत्र जगताचा उद्धार करणारा बुद्ध होणार आहे, आणि ह्मणूनच आज आह्मी मोठ्या आनंदानें उत्सव करीत आहों!"

हें देवाचें भाषण ऐकून असित ऋषि अंतरिक्षांतून शुद्धोदन राजाच्या राजवाड्यांत उतरला, आणि तेथें जमलेल्या शाक्यांनां तो ह्मणाला "शुद्धोदनराजाच्या पुत्राला मी पाहूं इच्छित आहें."

अनुक्रमणिका

जेव्हां असितानें सर्वलक्षणसंपन्न अशा त्या बालकाला पाहिलें, तेव्हां त्याच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. तें पाहून शाक्यांनां आश्चर्य वाटलें. ते ह्मणाले “हे ऋषिश्रेष्ठ! या आमच्या राजाच्या मुलाला पाहून तपश्चर्येनें तेजस्वी झालेल्या तुझ्या डोळ्यांतून आसवें कां आलीं? या आमच्या राजपुत्राला कांहीं भय तर नाहींना?”

असित ह्मणाला “शाक्यहो! तुमच्या कुलांत हें रत्न जन्मल्याबद्दल तुह्मी आनंद करा. याच्या अंगावरील लक्षणांवरून हा बुद्ध होऊन अनेक प्राण्यांचा उद्धार करणार आहे, हें स्पष्ट दिसतें; पण माझी आयुर्मर्यादा अत्यल्प राहिली आहे. याचा अमृततुल्य धर्म श्रवण करण्यास मी जगणार नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटत आहे, आणि त्याचमुळें माझा शोक मला अनावर होऊन माझ्या डोळ्यांतून अश्रु निघाले! तुमच्यापैकीं जे कोणी याचा धर्म श्रवण करण्यास जगतील, ते धन्य होत!”

इतकें बोलून व बोधिसत्वाला नमस्कार करून असित ऋषि आपल्या आश्रमाला गेला.

त्या वेळीं शुद्धोदनराजाच्या दरबारामध्यें राम, ध्वज, लक्ष्मण, मंत्री, कौंडिण्य, भोज, सुयाम आणि सुदत्त हे षडंगवेदधारी आठ विद्वान् ब्राह्मण होते. त्यांनां बोलावून आणून राजानें वहिवाटीप्रमाणें आपल्या मुलाचें जातक वर्तविण्यास सांगितलें. त्यांपैकीं सात ब्राह्मणांनीं दोन बोटें पुढें करून द्विधा भविष्य कथन केलें. ते ह्मणाले “महाराज, हा मुलगा जर गृहस्थाश्रमांत राहिला, तर चक्रवर्ती होईल; संन्यासी झाला, तर सम्यक् संबुद्ध होऊन जगाचा उद्धार करील.”

परंतु कौंडिण्य ब्राह्मण एकच बोट पुढें करून ह्मणाला “महाराज, हा मुलगा खात्रीनें बुद्ध होणार आहे!”

नामकरणाच्या दिवशीं शुद्धोदनानें पुत्रलाभानें आपले मनोरथ परिपूर्ण झाले, ह्मणून आपल्या मुलाला सिद्धार्थ हें नांव ठेविलें.

सिद्धार्थ सात दिवसांचा असतांच मायादेवी परलोकवासी झाली! तेव्हां त्याचा सर्व भार त्याची सावत्रमाता आणि मावशी महाप्रजापती गौतमी इजवर पडला. गौतमीनें सिद्धार्थाचें आपल्या मुलापेक्षांहि अधिक लालन केलें. सिद्धार्थ तिचा जीव कीं प्राण होऊन राहिला.

कपिलवस्तूमध्यें प्रतिसंवत्सरी वप्रमंगल (शेत नांगरण्याचा उत्सव) होत असे. त्या दिवशीं शाक्यराजे स्वतः शेत नांगरीत असत. शुद्धोदनराजा सिद्धार्थाला बरोबर घेऊन मोठ्या लवाजम्यानिशीं उत्सवाच्या दिवशी शेतांत गेला. सिद्धार्थाला एका जंबु वृक्षाखालीं बसवून व त्याच्या रक्षणासाठीं दायांनां ठेवून शुद्धोदन आपल्या लोकांसहवर्तमान शेत नांगरण्याच्या कामांत गुंतला. इकडे त्या दाया सिद्धार्थाला त्याच्या सुंदर बिछान्यावर निजवून तेथून उत्सव पहाण्यासाठीं दुसऱ्या ठिकाणीं गेल्या. उत्सवाच्या ठिकाणीं पुष्कळ फेरीवाले आपला माल घेऊन विकण्यासाठी फिरत होते. कांहीं दुकानदारांनीं तंबू ताणून तेवढ्या वेळेपुरतीं दुकानें उघडलीं होती. सिद्धार्थाच्या दाया या दुकानांतून त्या दुकानांत फिरतफिरत व ज्या त्या नवीन जिनसाकडे पहात चालल्या होत्या. त्यांनां सिद्धार्थाची आठवण राहिली नाहीं. सिद्धार्थ जागा झाला, व आपणाजवळ कोणी नाहीं असें पाहून वज्रासन घालून ध्यानस्थ बसला.

दोनतीन तास उत्सवांत गुंतल्यानंतर एका दाईला सिद्धार्थाची आठवण झाली. ती धांवतधांवत त्या जंबुवृक्षाकडे येऊन पहाते, तों सिद्धार्थ ध्यानस्थ बसलेला तिच्या पहाण्यांत आला. माध्यान्हसमय होऊन गेल्यामुळें इतर वृक्षांची छाया पूर्वेकडे फिरली होती, परंतु त्या वृक्षाची छाया जशीच्या तशीच निश्चल होती. तें आश्चर्य पाहून दाई धांवतधांवत शुद्धोदनराजापाशीं गेली, आणि तिनें राजाला तें वर्तमान सांगितलें. राजा आपल्या अमात्यांसह ताबडतोब त्या ठिकाणीं आली, आणि तें आश्चर्य पाहून विस्मित झाला. असित ऋषीनें केलेलें भविष्य खरें होणार आहे, अशी त्याला बळकट शंका उत्पन्न झाली. सिद्धार्थ ध्यानांतून उठल्यावर शुद्धोदनानें त्याला मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें.

उत्सव आटपून शुद्धोदन आपल्या राजवाड्यांत आल्याबरोबर ज्या सात ब्राह्मणांनीं, सिद्धार्थ चक्रवर्ती किंवा बुद्ध होणार, असें द्विधा भविष्य कथन केलें होतें, त्यांनां बोलावून आणून तो ह्मणाला “ब्राह्मणहो! माझ्या मुलाची आतांपासूनच ध्यानधारणेकडे प्रवृत्ति दिसत आहे! परंतु योगमार्ग सोडून देऊन त्यानें चक्रवर्ती राजा व्हावें, अशी माझी फार इच्छा आहे.”

ब्राह्मण ह्मणाले “महाराज, सिद्धार्थासमोर वृद्ध, व्याधित आणि मृत मनुष्य आले, तर त्यांच्या दर्शनानें त्याला वैराग्य उत्पन्न होईल, आणि तो गृहत्याग करील. तेव्हां अशीं माणसें त्याच्यासमोर कदापि येऊं नयेत, असा बंदोबस्त करा.”

शुद्धोदनानें ब्राह्मणांच्या सांगण्याप्रमाणें सिद्धार्थाला रहाण्यासाठीं तीन मोठमोठाले प्रासाद बांधिले. यांतील एक पावसाळ्यांत रहाण्यासाठीं सोयीवार पडावा असा बांधला होता; दुसरा हिंवाळ्यासाठीं व तिसरा उन्हाळ्यासाठीं होता. सिद्धार्थाचे सर्व सोबती तरुण व सशक्त होते. कोणी आजारी पडला तर त्याला तेथून ताबडतोब दुसरीकडे नेण्यांत येत असे. या वाड्यांत सिद्धार्थाचें मन रमविण्यासाठीं पुष्कळ नृत्यांगणा ठेवण्यांत आल्या होत्या. त्या निरनिराळी वाद्यें वाजवून व नृत्य करून सिद्धार्थाला रंजवीत असत.

सिद्धार्थ युद्धकलेचा अभ्यास न करितां केवळ चैनीमध्यें दिवस घालवीत आहे; राज्यावर संकट आलें असतां हा शत्रूचा पराभव कसा करणार, असें जो तो ह्मणूं लागला. शुद्धोदनराजाच्या कानांवर ही बातमी आली, तेव्हां सिद्धार्थाला बोलावून तो त्याला ह्मणाला “कुमार, तूं युद्धकला न शिकतां आळसांत दिवस घालवितोस, असा आमच्या आप्तवर्गाचा तुझ्यावर आरोप आहे. तेव्हां केवळ नाचतमाशांत दिवस न घालवितां राजपुत्राला अनुरूप अशा कलांचाहि तूं अभ्यास केला पाहिजे.”

सिद्धार्थ ह्मणाला “महाराज, आपण आपल्या राज्यांतील सर्व युद्धकलानिष्णात योद्धयांनां एकत्र जमवा. मी त्यांच्यासमोर माझें धनुर्विद्यानैपुण्य दाखवूं इच्छीत आहें. आजपर्यंत मीं आळसांत दिवस घालविले किंवा कांहीं अभ्यास केला, याची परीक्षा याच समयीं होणार आहे.”

शुद्धोदनराजानें युवराज अमुक दिवशीं आपलें धनुर्विद्याकौशल्य दाखविणार आहे; तेव्हां त्या दिवशीं जे या कलेमध्यें निष्णात असतील, त्यानीं राजाच्या उद्यानांत एकत्र जमावें, असें जाहीर केलें. त्याप्रमाणें ठरलेल्या दिवशीं मोठमोठाले योद्धे सिद्धार्थाचें कौशल्य पहाण्यासाठीं दूरदूरच्या गांवांहून कपिलवस्तूला आले. सिद्धार्थानें त्या सर्वांसमोर आपलें कौशल्य दाखविलें. तें पाहून त्यांनां इतकें आश्चर्य वाटलें, कीं, युवराजानें एवढ्या अल्पावकाशांत युद्धकलेचीं सर्व अंगें आपलींशीं करून घेतलीं कशीं!

अनुक्रमणिका

ते राजाला ह्मणाले "महाराज, युवराज अद्वितीय आहेत! आह्मी आज धुनर्विद्येचा इतकी वर्षे अभ्यास करीत आहों, परंतु यांच्याइतकें पटुत्व आह्मांला साधलें नाहीं! यांनीं एवढ्या अल्पवयांत एवढें नैपुण्य कसें संपादिलें, याचें आह्मांला मोठे आश्चर्य वाटतें!"

[२]

## महाभिनिष्क्रमण

कांहीं दिवसांनीं शुद्धोदनराजानें सिद्धार्थाचें यशोधरा नांवाच्या रूपवती कन्येबरोबर लग्न केलें. सिद्धार्थाचें यशोधरादेवीवर अत्यंत प्रेम होतें. तिच्यासहवर्तमान आपल्यासाठीं बांधिलेल्या राजवाड्यांमध्यें सिद्धार्थानें मोठ्या आनंदानें तारुण्याचे दिवस घालविले. पण त्याच्या २९ साव्या वर्षी त्याला आपल्या पित्याची राजधानी पहावी व राजोद्यांनात फिरून यावें, अशी इच्छा उत्पन्न झाली.

सिद्धार्थ उद्यानांत फिरावयाला जाणार, हें वर्तमान शुद्धोदनराजाला समजल्याबरोबर त्यानें रस्ते वगैरे साफसूफ करून अंध, पंगु, वृद्ध, वगैरे दुर्बळ लोकांनीं त्या दिवशीं रस्त्यावर फिरतां कामा नये, असा हुकूम केला; परंतु सिद्धार्थ रथांत बसून उद्यानाकडे चालला असतांना वाटेंत त्याच्या पहाण्यांत ह्मातारपणानें खंगलेला एक माणूस आला. त्याला पाहून सिद्धार्थ आपल्या छन्न नांवाच्या सारथ्याला ह्मणाला "छन्न, हा जो समोरून प्राणी जात आहे, तो मनुष्य आहे कीं कोण आहे? तो जरी मनुष्यासारखा दिसत आहे, तरी मीं पाहिलेल्या मनुष्यांहून त्याची स्थिति फारच निराळी आहे! त्याचे केंस पांढरे दिसत आहेत; दांत तर मुळींच नाहींत; डोळे खोल गेले आहेत; तो हातामध्यें काठी घेऊन कांपतकांपत चालला आहे; आणि त्याची पाठ तर अगदीं वांकून गेली आहे!"

छन्न ह्मणाला "हे आर्यपुत्र! वृद्धपण ह्मणतात तें हें! हा कोणी निराळा प्राणी नसून तुमच्याआमच्याप्रमाणें मनुष्यप्राणीच आहे. तुमच्यासारखा हा जेंव्हा तरुण होता, तेव्हां याचे केंस तुमच्यासारखेच काळेभोर होते! तेव्हां तुमच्यासारखाच तारुण्यमद त्याच्या अंगामध्यें भरला होता. यानें कदाचित् पुष्कळ मल्लयुद्धें करून जय मिळविला असेल; कदाचित् संग्रामामध्यें शिरून मोठमोठ्या योध्यांचा पराभव केला असेल; आपल्या तारुण्यश्रीच्यायोगें पुष्कळ तरुण स्त्रियांचें चित्त आकर्षून घेतलें असेल; पण आतां त्यांतील कांहींएक राहिलें नाहीं! तो जर आपल्या पराक्रमाच्या गोष्टी सांगेल, तर लहान मुलेंदेखील त्याची थट्टा करतील! या अवस्थेमध्यें तरूणीचें चित्त आकर्षून घेणें राहूं द्या, उलट त्यांच्या अत्यंत तिरस्काराला मात्र तो पात्र होईल. हे राजपुत्र, आमचें तारुण्यदेखील असेंच चंचल आहे. जर आह्मी आणखी कांहीं वर्षे जगलों, तर आह्मांलाहि ही स्थिति प्राप्त झाल्यावांचून रहाणार नाहीं!"

सिद्धार्थ ह्मणाला "छन्न, येथूनच माझा रथ मागें फिरीव. मी पुनः माझ्या वाड्यांत जाऊं इच्छितों. आतां उद्यानांत क्रीडा करण्याची मला इच्छा राहिली नाहीं."

सिद्धार्थ उद्यानक्रीडेला न जातां माघारा फिरला, हें वर्तमान शुद्धोदनराजाला समजलें; तेव्हां छन्न सारथ्याला आणवून, तो मागें कां फिरला, याची त्यानें विचारपूस केली. जराजर्जरित मनुष्याला पाहून आपला पुत्र मागें फिरला, हें वर्तमान ऐकून राजाला फारच काळजी पडली. आपला मुलगा उदासीन होऊन गृहत्याग करील, या विवंचनेनें त्याचें मन घेरलें. तेव्हां त्यानें जिकडेतिकडे मुलाच्या रक्षणासाठीं पहारा ठेविला, व सिद्धार्थाच्या वाड्यामध्यें ज्या नृत्यांगणा ठेवण्यांत आल्या होत्या, त्यांत आणखी भर घातली. पण

अनुक्रमणिका

राजाच्या प्रयत्नांचा सिद्धार्थाच्या मनावर कांहींएक परिणाम झाला नाहीं. त्याच्या डोळ्यांसमोर त्या म्हाताऱ्या मनुष्याच्या रूपानें मूर्तिमंत जरा उभी राहूं लागली.

पुनः एके दिवशीं तो उद्यानामध्यें फिरावयाला निघाला असतां वाटेंत त्याला एक रोगी माणूस भेटला. त्याला पाहून सिद्धार्थ छन्न सा थ्याला ह्मणाली "हा माणूस कोण आहे? याला वृद्ध ह्मणावें, तर याचे केंस पांढरे झाले नाहींत, किंवा याचे दांतहि पडले नाहींत! तथापि हा त्या वृद्ध मनुष्यापेक्षांहि अधिक अशक्त झालेला आहे!"

छन्न ह्मणाला "आर्यपुत्र, व्याधि ह्मणतात ती ही! आह्मांला आज आह्मी बलवान् आहों असें वाटतें; परंतु वस्तुतः व्याधीच्यायोगें आमचें बल कधीं नष्ट होईल, याचा नेम नाहीं! दोन दिवसांमागें हा मनुष्य सशक्त होता, पण आज त्याची रोगानें काय स्थिति केली पहा! मनुष्यप्राण्याचें बळ किती चंचल आहे बरें!"

बोधिसत्व म्हणाला "छन्न, माझा रथ येथूनच माघारा घे. आजपर्यंत आरोग्याच्या मदानें मी धुंद झालों होतों, पण आतां तो मद राहिला नाहीं. आतां उद्यानक्रीडेची मला हौस राहिली नाहीं."

सिद्धार्थाच्या आज्ञेप्रमाणें छन्नानें तेथूनच रथ माघारा फिरविला. पण राजाला हें वर्तमान समजलें, तेव्हां त्याचें मन अत्यंत उद्विग्न झालें.

कांहीं दिवसांनीं सिद्धार्थ पुनः फिरावयाला निघाला. तेव्हां त्याला वाटेत एक प्रेत दिसलें. तें पाहून तो आपल्या सारथ्याला ह्मणाला "छन्न, या माणसाला येथें कां निजविलें आहे? आणि हे इतके लोक येथें जमून ही एक प्रकारची शिबिका कां तयार करीत आहेत?"

छन्न ह्मणाला "हे आर्यपुत्र! हा मनुष्य गतप्राण झाला आहे! आता हे लोक याला या यानांत घालून श्मशानांत नेऊन गाडून किंवा जाळून टाकतील. तुह्मांआह्मांला कधींना कधीं ही अवस्था प्राप्त होणारच आहे! या युगामध्यें मनुष्याचें आयुष्य फार झालें तर शंभर वर्षे आहे; पण सर्व मनुष्यें शंभर वर्षे जगतातच असें नाहीं. अनेक आधिव्याधींनीं खंगून जाऊन पुष्कळ माणसें पन्नाससाठीच्या आंतच मृत्युमुखीं पडतात!"

सिद्धार्थ ह्मणाला "छन्न, येथूनच माघारे जाऊं. मला उद्यानक्रीडेची हौस राहिली नाहीं!"

सिद्धार्थ मागें फिरला, हें वर्तमान ऐकून राजाचें चित्त अत्यंत अस्वस्थ झालें.

सिद्धार्थ आपल्या वाड्यामध्यें जाऊन आपल्या महालामध्यें एकटाच बसला. तेथें दुसऱ्या कोणालाहि हुकुमावांचून आंत येण्याची त्यानें मनाई केली, आणि तो आपणाशींच ह्मणाला "मीं जेव्हां म्हातारा मनुष्य पाहिला आणि त्यासंबंधानें माझ्या तरुण मित्रांशीं बोललों, तेव्हां त्यांनीं माझी केवळ अवहेलना केली; जणूं काय त्यांनां व मला कधींहि वृद्धावस्था येणार नाहीं! त्याचप्रमाणें व्याधिग्रस्त माणसाला पाहून माझें चित्त जेव्हां अस्वस्थ झालें, तेव्हां माझे मित्र माझी थट्टा करूं लागले. आतां जर मी त्यांनां मृत मनुष्याची गोष्ट सांगितली, तर पुनः एकवार ते माझी थट्टा करतील! जरा, व्याधि आणि मरण या तीन अवस्थांचें अवलोकन करण्यास त्यांच्या अंगीं जणूं काय सामर्थ्यच राहिलें नाहीं! पण या जरेचा विचार केला असतां मनुष्याचा तारुण्यमद पार नष्ट होतो; व्याधीच्या विचारानें बलमद निघून जातो; आणि मृत्यूच्या विचारानें आयुष्यमद

नाहींसा होतो. हे तीनहि मद नष्ट झाले ह्मणजे या प्रपंचामध्यें आह्मांला आनंद कसा वाटेल? प्रापंचिक जन आटलेल्या डबक्यांतील माशाप्रमाणें तृष्णेनें तडफडत आहेत. तथापि या तीन मदांमुळें ते परस्परांशीं भांडत आहेत! परस्परांचा मत्सर करीत आहेत! परस्परांचा विरोध करीत आहेत! पण माझे हे मद नष्ट झाल्यामुळें मी आतां या कलहपूर्ण प्रपंचांत रहाण्यास योग्य नाहीं; मला प्रपंचाची भीति वाटत आहे!"

राजपुत्राला राजवाड्यांतील सर्व सुखांनीं आनंद होईनासा झाला. पुनः एकवार तो उद्यानांत जाण्यास निघाला. तेथें गेल्यावर एका वृक्षाखालीं बसलेला एक काषायवस्त्रधारी भिक्षु त्याच्या पहाण्यांत आला. त्याला पाहून तो सारथ्याला ह्मणाला "छन्न, हा मनुष्य कोण आहे? यानें जरी काषायवस्त्रें धारण केलीं आहेत, तथापि याची मुद्रा अत्यंत गंभीर दिसत आहे!"

छन्न ह्मणाला "आर्यपुत्र, याला श्रमण किंवा भिक्षु असें ह्मणतात. यानें प्रपंचाचा त्याग केला आहे. तेव्हां तुमच्याआमच्याप्रमाणें प्रापंचिक दुःखाची याला वारंवार बाधा होत नसल्यामुळें याची मुद्रा शांत दिसत आहे!"

सिद्धार्थ कांहीं वेळ विचारमग्नस्थितींत उद्यानामध्यें फिरला. नंतर रथांत बसून आपल्या वाड्याकडे जाण्यास निघाला. त्या वेळीं कृशागौतमी नांवाची तरुण क्षत्रियकन्या आपल्या वाड्याच्या गच्चीवर बसली होती. तिनें सिद्धार्थ रथांत बसून जात असतांना त्याजकडे पाहिलें, आणि पुढील उद्गार काढिले:—

**सुखी माता याचीच असे पाहीं,**
**सुखी जगतीं याचाच तो पिताहि;**
**सुखी लोकीं स्त्री सत्य ती विलोकीं**
**जिला लाभे पति यासमान लोकीं** [मूळ गाथा अशी आहे:—
**निब्बुता नून सा माता निब्बुतो नून सो पिता**
**निब्बुता नून सा नारी यस्सायं ईदिसो पति** ]

शहरांत गर्दी असल्यामुळें सिद्धार्थाचा रथ मंदगतीनें चालला होता. तेव्हां कृशागौतमीचे उद्गार त्याच्या सहज कानीं आले. तो आपणाशींच ह्मणाला "माझ्यासारखा जिला पुत्र असेल, ती आई सुखी होते, तो बाप सुखी होतो, व जिला असा पति मिळेल ती भार्या सुखी होते, असें या क्षत्रियकुमारीचें ह्मणणें आहे; परंतु खरा सुखी कोण? मला वाटतें, कीं, ज्याच्या अंतःकरणांतून काम, क्रोध आणि मोह हे तीन प्रकारचे अग्नि विझून गेले, तोच खरा सुखी होय! आजच्या आज गृहत्याग करून आत्यंतिक सुखाचा मार्ग शोधून काढण्याचा मीं प्रयत्न केला पाहिजे. या कुमारीनें मला आत्यंतिक सुखाची (निर्वाणीची) आठवण दिल्यामुळें ती मला गुरुस्थानीं आहे. तेव्हां तिला कांहीं गुरुदक्षिणा देणें योग्य आहे."

त्यानें आपल्या गळ्यांतील मुक्ताहार काढून तो गौतमीकडे पाठविला. सिद्धार्थाचे मन आपणावर जडलें असावें असें वाटून कृशागौतमीला अत्यंत हर्ष झाला.

सिद्धार्थ आपल्या वाड्याशीं आल्याबरोबर त्याला यशोधरादेवी पुत्र प्रसवली हें वर्तमान समजलें. तो मोठ्यानें उद्गारला "हा राहु झाला!"

अनुक्रमणिका

राजपुत्राच्या वाड्यांतील दूतांनीं सिद्धार्थाला पुत्र झाल्याची बातमी ताबडतोब शुद्धोदनराजाला कळविली. तेव्हां राजा त्यांनां ह्मणाला “माझा मुलगा पुत्रजन्माची शुभवार्ता ऐकून काय ह्मणाला?”

ते ह्मणाले “महाराज, युवराज दुसरें कांहीं एक न बोलतां ‘हें बंधन झालें; हा राहु झाला,’ एवढेंच ह्मणाला.”

राजा मोठ्या हर्षानें ह्मणाला “माझ्या नातवाचें नांव राहूल हेंच ठेवा. माझ्या मुलाला हें बंधन झाल्यामुळें आतां तो गृहत्याग करूं शकणार नाहीं. हजारों पहारेकऱ्यांपेक्षां, किंवा लोहश्रुंखलादिक बंधनांपेक्षांहि हें पुत्रबंधन दृढतर आहे, याचा मला अनुभव आहे!”

राजानें या दूतांनां शुभवार्ता आणिल्याबद्दल मोठमोठालीं बक्षिसें दिलीं, व आपल्या राजवाड्यांत मोठा उत्सव केला. कपिलवस्तूंतील नागरिकांनींहि आपापल्या घरीं सिद्धार्थाला पुत्रलाभ झाल्याबद्दल उत्सव केला.

पण सिद्धार्थाचें मन मात्र दुसऱ्याच मार्गाकडे लागलें होतें. तो आपणाशींच ह्मणाला “जरा, व्याधि, मरण इत्यादि दुःखांपासून मुक्त होऊन आत्यंतिक सुखाचा मार्ग जर लाभला, तरच मला खरें समाधान होईल; तोंपर्यंत आईबापें, पुत्र आणि स्त्री हीं केवळ बंधनें होत. पुत्रजन्म झाला ह्मणजे लोक मोठा उत्सव करितात. पण त्या वेळीं आपण मनुष्यप्राणी नश्वर आहों, हें ते विसरतात! पुत्र, दारा, धन, दौलत इत्यादि अशाश्वत गोष्टींच्या पायावर जे आपल्या सुखाची इमारत बांधतात, ते लवकरच दुःखभागी होतात, यांत नवल नाहीं! मला असल्या क्षणभंगुर सुखाची चाड नाहीं. शाश्वत सुखाचा जर शोध लागला, तर त्यामुळें मलाच नव्हे, पण सर्व मनुष्यप्राण्यांनां फायदा होणार आहे.”

सिद्धार्थाच्या डोक्यामध्यें अशा प्रकारचे विचार घोळत असतां त्याच्या भोंवतीं राजवाड्यांतील नृत्यांगनांचा घोळका जमला. प्रत्येक नर्तकी आपापलें वाद्य घेऊन सिद्धार्थाचें यथाशक्ति रंजन करण्याचा प्रयत्न करूं लागली; परंतु सिद्धार्थाला त्यांच्या वाद्यांनीं करमणूक न होतां निद्रा आली! तेव्हां त्या स्त्रियाहि आपापलीं वाद्यें खालीं ठेवून तेथेंच निद्रिस्त झाल्या.

मध्यरात्रीच्या सुमाराला सिद्धार्थ जागा होऊन पद्मासन घालून आपल्या मंचकावर बसला. जन्म, जरा, व्याधि आणि मरण यांच्या विचारानें त्याचें चित्त व्यग्र होऊन गेलें होतें. त्यानें त्या इतस्ततः अव्यवस्थितपणें निजलेल्या नर्तकींकडे एकवार दृष्टि फेंकली. त्यांतील कांहींजणी निद्रेमध्यें बरळत होत्या; कांहींजणींच्या तोंडांतून लाळ वहात होती; कांहीं दात खात होत्या; कांहींची वस्त्रें जाग्यावर नसून त्या अस्ताव्यस्त पडल्या होत्या. सिद्धार्थ हा सर्व देखावा पाहून अतिशय कंटाळला. आपण जणूं काय जीवंत माणसांच्या श्मशानांत बसलों आहें, असा त्याला भास झाला. तो आपणाशींच ह्मणाला “या नर्तकी थोड्या वेळापूर्वी गायन, वादन, नृत्य आणि नानाप्रकारचे हावभाव करून जणूं काय आपण देवलोकींच्या अप्सराच आहोंत, असें मला भासवीत होत्या; पण हा नुसता भास होता! आतां यांचें खरें स्वरूप दिसून येत आहे. निद्रा हा इहलोकींचा लहानसा मृत्युच होय. या अवस्थेंत मनुष्याची मरणोत्तर काय वाट होणार, याचें अनुमान करतां येतें. हे सौंदर्या, तूं आतां मला भुलवूं शकणार नाहींस! तूं किती क्षणभंगुर आहेस, किती नश्वर आहेस, याची मला यथार्थ कल्पना झाली आहे!”

अनुक्रमणिका

सिद्धार्थ मंचकावरून उठला, आणि तडक दरवाज्याकडे गेला. तेथें त्याचा इमानी नोकर छन्न उंबऱ्यावर डोकें टेंकून निजला होता. सिद्धार्थानें "येथें कोण आहे?" अशी मोठ्यानें हांक मारल्यावर छन्न जागा होऊन ह्मणाला "आर्यपुत्र, मी आपला सेवक छन्न आहें."

सिद्धार्थ ह्मणाला "माझ्या आवडत्या छन्ना! याच क्षणीं तूं माझी एक कामगिरी बजावली पाहिजेस. आतांच्या आत्तां पागेंत जाऊन तूं माझ्यासाठीं एक घोडा तयार करून आण."

एवढ्या रात्रीं आपला धनी कोठें जाऊं इच्छितो, इत्यादि प्रश्न विचारण्याच्या भरीला न पडतां तो स्वामिभक्त सेवक तडक पागेंत गेला व कंथक नांवाच्या घोड्याला शृंगारून त्यानें सिद्धार्थाच्या वाड्याजवळ नेलें.

सिद्धार्थाला घोडा तयार आहे, असें समजल्याबरोबर तो आपल्या महालांतून पोषाख करून खालीं उतरला; पण इतक्यांत त्याला आपल्या पत्नीची आणि त्याच दिवशीं जन्मलेल्या पुत्राची आठवण झाली. तो तसाच माघारा फिरला, व यशोधरेच्या महालाकडे गेला. तेथें यशोधरादेवी नानातऱ्हेच्या पुष्पांनीं श्रृंगारलेल्या राजशय्येवर मुलाला कुशीला घेऊन स्वस्थ निजली होती. सिद्धार्थ तिच्याजवळ गेला. पलंगाजवळील गंधतैलप्रदीपांच्या प्रकाशानें तिचें मुखकमल सहज दिसण्याजोगें होतें; पण त्याला तिच्या कुशीला निजलेल्या आपल्या मुलाचें तोंड स्पष्ट दिसलें नाहीं. यशोधरेचा हात मुलावर असल्यामुळें त्याला तो दूर सारल्याविना राहुलाला पहातां येणें शक्य नव्हतें. तो आपणाशींच ह्मणाला "माझ्या मुलाला पाहून जावें ह्मणून मी येथें आलों; पण जर मीं यशोधरेचा हात बाजूला सारला, तर ती जागी होऊन माझ्या जाण्याला भयंकर अडथळा करील!"

सिद्धार्थाच्या मनांतून कितीदां तरी यशोधरेला उठवून तिचा शेवटला निरोप घ्यावा व पुत्रमुख पहावें, असा विचार आला; परंतु आपल्या गमनाला अंतराय होईल, हा विचार प्रबळ होऊन पहिल्या विचाराला ताबडतोब दाबून टाकीत असे. या दोन्ही विचारांचें जणूं काय मल्लयुद्धच चाललें होतें. शेवटीं यशोधरेला जागी न करतांच तेथून निघून जावें, याच विचाराचा जय झाला.

सिद्धार्थ आपणाशींच ह्मणाला "मला जर जन्मजरादि दुःखांतून मुक्त होण्याचा मार्ग सांपडला, तर माझ्या पुत्राचें आणि स्त्रीचें मला कल्याण करतां येईल; परंतु यशोधरेला आतांच जागी करून मी इच्या आणि माझ्या पुत्राच्या मोहांत सांपडलों, तर मोक्षमार्गाचा शोध लागण्याची आशा राहिली नाहीं. पुत्रमुख आणखी कांहीं वर्षांनीं पहातां येण्यासारखें आहे. यशोधरेचेंहि सांत्वन पुढें कधींतरी करितां येईल; परंतु मोक्षमार्ग शोधून काढण्याची जशी मला आजला संधि आहे, तशी पुढें कधींहि येणार नाहीं. तपश्चर्येचे तीव्र क्लेश सहन करण्यास माझ्या अंगीं आज सामर्थ्य आहे. पण हे तारुण्याचे दिवस निघून गेले ह्मणजे धर्मसाधनाला लागणारी चिकाटी माझ्या अंगीं रहाणार नाहीं. तेव्हां य़शोधरेला अशीच निद्रासुखामध्यें सोडून देऊन मीं येथून निघून जावें हें बरें." असा विचार करून तो मनांतल्यामनांत उद्गारला "हे यशोधरे! मी तुला नकळत अरण्यवास पत्करीत आहें, ह्मणून तुझ्यावर माझें प्रेम नाहीं असें तूं समजूं नकोस. प्राणिमात्राच्या दुःखानें माझें अंतःकरण कळवळून जात आहे; मग जिच्या सहवासांत मीं इतकीं वर्षे घालविलीं, त्या माझ्या प्रियपत्नीचा मला कळवळा येणार नाहीं, ही गोष्ट संभवेल तरी कशी! माझे आप्तहो! तुम्ही माझ्यावर क्रूरपणाचा आरोप खुशाल आणा. परंतु मी खात्रीनें सांगूं शकतों, कीं, माझें मन पूर्वीपेक्षांहि मृदु झालें आहे. पूर्वी माझ्या दुःखाचीच मला बाधा होत होती, पण आतां सर्व प्राण्यांच्या दुःखानें माझें मन दुखावत आहे.

अनुक्रमणिका

आप्त-इष्ट हे माझ्या सुखासाठीं आहेत असें मला वाटत असे; पण आतां जगाच्या कल्याणासाठींच जगावें असें मला वाटत आहे. माझ्यासंबंधानें वाटेल त्यानें वाटेल ती कल्पना खुशाल करावी. पण माझा गृहत्याग करण्याचा हेतु केवळ माझ्याच आत्म्याला मोक्ष मिळावा हा नसून, अनेक दुःखांनीं पीडिलेल्या मनुष्यजातीला सुखावह स्थिति प्राप्त होईल कीं नाहीं, याचा मला शोध लावावयाचा आहे. पण या कामीं माझ्या आप्तवर्गाकडून मोठें विघ्न येण्याचा संभव असल्यामुळें त्यांचा निरोप घेतल्यावांचून आज मी येथून प्रयाण करीत आहें!"

सिद्धार्थ आपल्या पत्नीच्या महालांतून खालीं उतरला, तेव्हां मध्यरात्र होऊन गेली होती. त्या दिवशीं आषाढी पौर्णिमा होती. आकाशांत तुरळक मेघ होते. तथापि चंद्रप्रकाशानें सर्व रस्ते साफ दिसत होते. शहरामध्यें जिकडेतिकडे सामसूम झालें होतें; जणूं काय तें समाधिसुखांत मग्न झालें असावें! मधुनमधून गस्तवाल्यांचें पुकारणें व कोल्ह्याकुत्र्यांचें ओरडणें एवढेंच काय तें ऐकूं येत होतें. तथापि त्यामुळें कपिलवस्तूच्या शांतीला कोणत्याहि प्रकारें विघ्न झाल्याचें चिन्ह दिसत नव्हतें.

सिद्धार्थ कंथकावर स्वार झाला आणि त्यानें छन्नाला आपल्यामागें बसण्यास सांगितलें. कंथक इतका बळकट होता, कीं, त्याला त्या दोघांचें ओझें कांहींच नव्हतें. लगामाला हिसका दिल्याबरोबर तो वायुवेगानें पळत सुटला. त्याच्या टापांनीं कपिलवस्तूंतील गाढनिद्रेंत मग्न झालेले नागरिक जागे झाले नाहींत यांत आश्चर्य नाहीं; परंतु गस्तवाल्यांनां देखील या उमद्या घोड्याला थांबविण्याची छाती झाली नाहीं. तो तडक शहराच्या दरवाज्याशीं येऊन उभा राहिला. त्या वेळीं दरवाजा बंद होता. पण आश्चर्याची गोष्ट ही, कीं, सिद्धार्थाला आणि छन्नाला घेऊन कंथक तेथें आल्याबरोबर देवतांच्या प्रभावानें दरवाजा आपोआप उघडला, व कंथक निघून गेल्यावर तो आपोआप बंद झाला!

कांहीं पावलें पुढें गेल्यावर सिद्धार्थाच्या मनांतून आपल्या आवडत्या कपिलवस्तूचें दर्शन घेण्याचा विचार आला. तेव्हां त्यानें कंथकाला वळवून एकवार कपिलवस्तूवर नजर फेंकली, व तो छन्नाला ह्मणाला "छन्न! माझ्या या आंवडत्या नगराचा मी आज शेवटला निरोप घेत आहें. आज जसें आकाशांतील ढगांनीं चंद्रदर्शन अस्पष्ट झालें आहे, तद्वत् परस्परविरोधी विचारांनीं माझ्या मानसिक शांतीचाहि लोप झाल्यासारखा दिसत आहे. पण तिचा अगदींच लोप झालेला नाहीं. चंद्रावरील अभ्रें जाऊन हा चंद्र लवकरच आपल्या शीतकिरणांनीं जगताला निववील, अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. त्याचप्रमाणें माझ्या मनांतील परस्परविरोधी विचारांचें निरसन होऊन माझा शांतिचंद्र पूर्णपणें प्रकाशूं लागेल व त्यामुळें सर्व लोकांनां सुख होईल, अशी मला बळकट आशा वाटत आहे; आणि असें झालें, तरच मी माझ्या या आवडत्या कपिलवस्तूची पुनः भेट घेईन. पण माझ्या प्रयत्नांत मला यश न आल्यास कपिलवस्तूचें हेंच शेवटलें दर्शन होणार आहे! छन्न, चल आपण आतां राजगृहनगराचा मार्ग धरूं. या नगराच्या आसपास पुष्कळ तपस्वी आहेत, असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. ते मला खरा मार्ग दाखवून माझ्या शंकांचे समाधान करितील, अशी मी आशा बाळगितों."

त्या दिवशीं सिद्धार्थानें घोड्यावरून खालीं न उतरतां तीन राज्यें आक्रमण केलीं, व तो दुसऱ्या दिवशीं अनोम नांवाच्या नदीच्या कांठीं आला. तेथें घोड्यावरून उतरून त्यानें त्याला छन्नाच्या स्वाधीन केलें आणि ह्मटलें "माझ्या आवडत्या छन्ना! आतां तूं कंथकाला घेऊन माघारा जा. येथून पुढें मी पायांनींच प्रवास करणार आहें. माझ्या या शूर कंथकानें मला फार मदत केली. याचा वियोग मला माझ्या आप्तांपेक्षांहि दुःसह होत आहे. तथापि भावि कर्तव्यावर नजर देऊन मला तो सहन केला पाहिजे."

अनुक्रमणिका

छन्न ह्मणाला “हे आर्यपुत्र! आपल्याला एकटे टाकून मी कोणत्या तोंडानें कपिलवस्तूला जाऊं? शुद्धोदनमहाराजांनीं आपली प्रवृत्ति विचारली असतां मी त्यांनां काय सांगूं? आपले व माझे आप्तइष्ट मला काय ह्मणतील?”

सिद्धार्थ ह्मणाला “छन्ना! तूं अशा विवंचनेंत पडूं नको. आजपर्यंत माझा शब्द तूं खाली ठेविला नाहींस. कंथकाला सज्ञ करून आण ह्मणून सांगितल्याबरोबर ‘तुह्मी कोठें जातां’ हा देखील प्रश्न तूं मला विचारला नाहींस; पण आतां मात्र तूं माझ्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तयार नाहींस. हे माझे अलंकार नेऊन माझ्या पित्यासमोर ठेव, आणि त्याला माझा असा निरोप सांग, कीं, तुमचा पुत्र राज्याच्या नश्वर सुखांत समाधान मानीत नाहीं. जगामध्यें शाश्वत सुख आहे कीं नाहीं, याचा शोध करण्याचा त्यानें निश्चय केला आहे; आणि जर त्याला अशा सुखाचा शोध लागला, तरच तो परत आपल्या दर्शनाला येईल; न लागला तर त्याचा हा शेवटला नमस्कार समजावा.”

सिद्धार्थाचें भाषण चाललें असतां छन्नाच्या डोळ्यांतून एकसारखा अश्रुप्रवाह चालला होता. तो मोठ्यानें सुस्कारून ह्मणाला “आर्यपुत्र आजपर्यंत मी आपला शब्द खालीं ठेविला नाहीं, ही गोष्ट खरी आहे; परंतु आपला माझा वियोग होण्याचा प्रसंगहि कधींच आला नाहीं. आपण माझ्याबरोबर असलां, तर वाटेल ती गोष्ट करण्यास मला कशाचीहि भीति वाटत नाहीं. पण आज आपण माझ्यापासून कायमचे दूर होऊं पहातां; जणूं काय माझा आत्मा माझ्या जड देहाला सोडून चालला आहे. राजपुत्र! माझी आपल्याला हीच विनंति आहे, कीं, आपण मला आपल्यापासून विभक्त करूं नये!”

सिद्धार्थ ह्मणाला “छन्न, तुझी स्वामिभक्ति वाखाणण्याजोगी आहे. पण लोकस्थितीची तुला अद्यापि नीट कल्पना झालेली नाहीं. मी आणि तूं जरी एकत्र राहिलों, तरी शेवटीं मृत्यु आह्मांला विभक्त करीलच करील. या निर्घृण मृत्यूच्या दाढेंतून सुटला, असा प्राणी कोण आहे? मृत्यु आईची आणि मुलाची, पित्याची आणि पुत्राची, पत्नीची आणि पतीची, मित्रामित्रांची आणि आप्ताआप्तांची ताटातूट करण्यास कधींहि मागें पुढें पहात नाहीं. तेव्हां हा कधींना कधीं होणारा वियोग जर आजच घडला, तर त्यामुळें तूं शोकाकूल कां व्हावेंस? आणखी दुसरें असें आहे, कीं, हा माझा वियोग कांहीं कायमचा नव्हे. जर मला सद्धर्मबोध झाला – आणि तो होईल अशी मला बळकट आशा आहे – तर माझी आणि तुझी पुनः भेट होणारच आहे. तेव्हां शोक आवरून तूं माझ्या सांगण्याप्रमाणें वाग.”

छन्नानें पुष्कळ आढेवेढे घेतले, पण सिद्धार्थापुढें त्याचें कांही चाललें नाहीं. सिद्धार्थाचे अलंकार घेऊन व कंथकाचा लगाम धरून तो कपिलवस्तूला जाणाऱ्या रस्त्याकडे वळला; पण शूर कंथकाला आपल्या धन्याचा वियोग बिलकूल सहन झाला नाहीं. त्यानें मोठ्यानें किंकाळी फोडून आपलें अंग जमिनीवर टाकलें, आणि तेथेंच प्राण सोडला! कंथकाच्या मरणानें छन्नाच्या शोकाला पारावार राहिला नाहीं. परंतु आपल्या धन्याच्या आज्ञेपुढें त्याचें कांहीं चालण्यासारखें नव्हतें. तो तसाच मोठ्या दुःखित अंतकरणानें कपिलवस्तूला गेला.

अनुक्रमणिका

[३]
## तपश्चर्या

सिद्धार्थानें आपला राजवेष टाकून भिक्षुवेष स्वीकारला, व पायी प्रवास करून एका आठवड्यानें राजगृह गांठलें. त्यानें वाटेंत निर्वाह कसा केला, ही गोष्ट ग्रंथान्तरी सांगितली नाहीं; परंतु त्यानें अरण्यांतून मिळणाऱ्या फलमूलांवर आपला चरितार्थ केला असावा, असा तर्क आहे. पण जेव्हां सिद्धार्थ राजगृहाला आला, तेव्हां चरितार्थाचें दुसरें साधन नसल्यामुळें त्याला शहरांत भिक्षा मागावयाला जाणें भाग पडलें. तो भिक्षापात्र घेऊन प्रसन्न मुद्रेनें राजगृह नगरांतील रस्त्यातूंन चालला असतां त्याला पाहून राजगृहवासी नागरिक चकित होऊन गेले. राजगृहाच्या आसपास पुष्कळ श्रमण रहात असत. पण भरतारुण्यांत असलेला सिद्धार्थासारखा तेजस्वी पुरुष त्यांच्यामध्यें कधींच आढळला नाहीं. सिद्धार्थाला दाराशीं पाहिल्याबरोबर प्रत्येक घरांतून बायका बाहेर येऊन यथाशक्ति शिजवलेलें अन्न त्याच्या पात्रांत टाकूं लागल्या. अल्पावकाशांतच सिद्धार्थाचें पात्र नानाविध अन्नानें भरून गेलें. तेव्हां तें आपल्या उपवस्त्रानें झांकून तो राजवाड्यावरून पांडवपर्वताकडे वळला.

मगधदेशाचा राजा बिंबिसार आपल्या प्रसादाच्या गच्चीवर बसला होता. सिद्धार्थ रस्त्यांतून जात असतांना त्यानें त्याला पाहिलें आणि तो आपल्या नोकरांनां ह्मणाला “हा विलक्षण पुरुष कोण आहे? याची शरीरकांति पाहिली असतां हा थोर कुलांत जन्मला असावा, असें स्पष्ट दिसत आहे. पण याच्या भिक्षुवेषाकडे पाहून मन साशंक होतें. तुह्मी याच्या मागोमाग जाऊन हा कोठें जातो व काय करितो, याचा तपास करा. मी याची सर्व प्रवृत्ति जाणण्यास अत्यंत उत्सुक झालों आहें.”

हें राजाचें भाषण ऐकल्याबरोबर राजदूत ताबडतोब सिद्धार्थाच्या मागें निघाले.

सिद्धार्थ पांडवपर्वतापाशीं येऊन एका टेंकडीच्या छायेखालीं दगडावर बसला, व त्यानें भिक्षापात्र खालीं ठेवून त्यांतील नानाविध अन्नाकडे दृष्टि फेंकली. महारचांभारांपासून तहत ब्राह्मणांपर्यंत सर्व जातींच्या मनुष्यांनीं दिलेलें अन्न त्या पात्रामध्यें होतें. तें पाहून सिद्धार्थाच्या पोटांत मळमळून आलें. पोटांतील आंतडीं तोंडांतून बाहेर निघतात कीं काय, असा त्याला भास झाला. तेव्हां तो आपणाशींच ह्मणाला “सिद्धार्था, तुला कोणीं जबरदस्तीनें प्रव्रज्या घेण्यास लाविलें नाहीं. राजीखुषीनें तूं हा वेष स्वीकारला आहेस. राजसंपत्तीचा तूं आनंदानें त्याग केलास; परंतु या घातक संस्कारांला तूं अद्यापि उराशीं घट्ट धरून बसला आहेस! माणसांमाणसांतील भेदभावानें तुझें चित्त कळवळून जात असे. पण आतां हीन जातीचें अन्न खाण्याचा प्रसंग आल्याबरोबर तुझ्या मनांत त्या लोकाविषयीं अनुकंपा न राहतां कंटाळा उत्पन्न झाला. सिद्धार्था! असला वेडेपणा सोडून दे. सुवासिक तांदळाच्या भातामध्यें आणि हीन लोकांनीं दिलेल्या या अन्नामध्यें तुला भेदभाव वाटतां कामा नये. ही स्थिति आली तरच तुझी प्रव्रज्या सफल होणार आहे.”

याप्रमाणें आपल्या मनाला बोध करून सिद्धार्थानें मोठ्या संयमानें अन्न खाण्यास सुरुवात केली. इतक्यांत बिंबिसारराजानें पाठविलेले चार दूत सिद्धार्थ बसला होता तेथें आले. त्यांतील एकजण ताबडतोब राजाला खबर देण्यासाठी माघारा पळत गेला, आणि बिंबिसाराला ह्मणाला “महाराज, आपण ज्या सत्पुरुषाचा शोध लावण्यासाठीं आह्मांला पाठविलें होतें, तो पांडवपर्वताच्या पायथ्याशीं एका टेंकडीच्या सांवलींत बसला आहे. सिंहासारखी त्याची गंभीर मुद्रा पाहून कोणत्याहि माणसाच्या मनांत त्याच्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न झाल्यांवाचून रहाणार नाहीं.”

अनुक्रमणिका

हें दूताचें भाषण ऐकून बिंबिसारानें आपला रथ सज्ज करविला, व ताबडतोब पांडवपर्वताच्या पायथ्याशीं जाऊन तेथून सिद्धार्थ बसला होता त्या ठिकाणीं तो पायींच गेला.

सिद्धार्थाचें भोजन नुकतेंच आटपलें होतें. आपलें भिक्षापात्र धुऊन एका बाजूला उन्हांत पालथें घालून तो आपल्या आसनावर शांतपणें बसला होता. बिंबिसार त्याच्याजवळच एका बाजूला बसला, आणि ह्मणाला "तुझ्या रूपकांतीवरून तूं मोठ्या क्षत्रियकुलांत जन्मला असावास, असें वाटतें. पण अशा तरुण वयांत राजश्रीचा त्याग करण्याला तुला काय कारण झालें, याचें मला अनुमान करतां येत नाहीं. तूं कोणत्या कुलामध्यें जन्मलास व येथें कां आलास, हें जाणण्याच्या इच्छेनें मी येथें आलों आहें. तुझी कोणतीहि जात असली, तरी मीं तुला माझ्या पदरीं ठेवून मोठ्या योग्यतेला चढविण्याचा विचार केला आहे. तूं माझ्या सैन्यामध्यें मोठी कामगिरी बजावशील, याबद्दल मला शंका नाहीं."

सिद्धार्थ ह्मणाला "महाराज, हिमालयाच्या पायथ्याशीं जें सुसमृद्ध शाक्यांचें राज्य आहे, त्याची कीर्ति आपल्या ऐकण्यांत आलीच असेल. तेथील राजाचा मी पुत्र आहें. मी संपत्ति मिळविण्याच्या आशेनें गृहत्याग केला नाहीं. कांकीं, माझ्या घरीं वीट येईपर्यंत मी संपत्तीचा उपभोग घेत होतों. मीं दुसऱ्या कोणत्याहि उद्देशानें गृहत्याग केला नसून केवळ दुःखोपशमाचा मार्ग शोधून काढण्यासाठीं येथवर येण्याचे श्रम सहन केले आहेत. यासाठीं आणखीहि पुष्कळ क्लेश सहन करण्यास मी तयार आहें. जगांतील सर्व संपत्ति जरी मला मिळाली, तरी त्यायोगें मला समाधान होणार नाहीं. मनुष्यजातीच्या दुःखाचा अंत कोठें होतो, व त्या स्थानाप्रत जाण्याचा मार्ग कोणता, हें जर मला समजलें नाहीं, तर माझें जीवित व्यर्थ आहे! तेव्हां आपण मला आपल्या राज्यांत रहाण्याचा आग्रह करूं नये."

बिंबिसारानें सिद्धार्थाचा निश्चय पाहून त्याचें मन वळविण्याची खटपट सोडून दिली, आणि तो ह्मणाला "हे राजकुमार! तुझ्या निश्चयाच्या आड मी येऊं इच्छीत नाहीं; परंतु जर तुला जगदुद्धाराचा मार्ग सांपडला, तर प्रथमतः तूं माझें विहारदान [विहार ह्मणजे भिक्षूला रहाण्यासाठीं बांधिलेला आश्रम.] स्वीकारलें पाहिजे."

सिद्धार्थानें ही गोष्ट कबूल केली, व तो तेथून आळारकालाम ऋषीच्या आश्रमांत गेला.

आळारकालाम हा मोठा नामांकित तपस्वी राजगृहाजवळ एका आश्रमांत रहात असे. योगशास्त्रांत तो पारंगत आहे, अशी त्याची फार ख्याति होती. या शास्त्राचीं तत्त्वें समजावून घेण्यासाठीं त्याच्यापाशीं दूरदूरच्या प्रांतांतून पुष्कळ भाविक लोक येत असत, व त्यांपैकीं कांहींजण त्याचे शिष्य होऊन योगाभ्यास करण्यासाठी तेथेंच रहात असत.

सिद्धार्थ कालामाच्या आश्रमांत शिरला, त्या वेळीं बरीच भाविक मंडळी तेथें जमली होती. कालामाच्या दर्शनासाठीं मी आलों आहें, असें सांगितल्यावर कांहीं तपस्व्यांनीं त्याला कालाम ऋषीच्या कुटींत नेलें. कालाम एका दर्भासनावर बसला होता. सिद्धार्थ त्याला नमस्कार करून एका बाजूला तेथें मांडलेल्या एका दर्भासनावर बसला, आणि कालामाला आपलें पूर्ववृत्त निवेदित करून ह्मणाला "भो कालाम, आपला शिष्य होऊन मोक्षमार्गाचा लाभ करून घेण्याच्या इच्छेनें मी आपणापाशीं आलों आहें."

कालाम ऋषीच्या पुष्कळशा शिष्यांत एवढ्या मोठ्या राजकुलांत जन्मलेला एकदेखील शिष्य नव्हता. तेव्हां सिद्धार्थ आपलें शिष्यत्व पत्करण्यासाठीं येथवर आला या गोष्टीनें त्याच्या मनाला संतोष

अनुक्रमणिका

झाला असला, तर त्यांत विशेष आश्चर्य मानण्याजोगें नाहीं. तो सिद्धार्थाला ह्मणाला "माझ्या पंथांत शिरून पुष्कळांचें समाधान झालें. तूं थोर कुलामध्यें जन्मला असल्यामुळें लहानपणांतच सर्व प्रकारचें शिक्षण तुला मिळालें असलें पाहिजे. तेव्हां तूं जर माझ्या मताचा अंगीकार करिशील, तर त्यांतील रहस्य समजण्यास तुला अवकाश लागणार नाहीं."

कालाम ऋषीच्या तत्त्वज्ञानामध्यें सिद्धार्थानें अल्पावधींतच पटुत्व संपादिलें. वाटेल त्या सिद्धांताची पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करून चर्चा करण्याची त्याची तयारी होती; पण ती सारी पोपटपंची होती. दुसरेहि कांहीं कालामाचे शिष्य सिद्धार्थाप्रमाणेंच पोपटपंचीत प्रवीण असून आपण मोठे तत्त्ववेत्ते आहों, असें समजत असत. पण सिद्धार्थाचें या पोपटपंचीनें समाधान झालें नाहीं. तो आपल्या मनाशींच ह्मणाला "केवळ श्रद्धापूर्वक सर्व सिद्धांत तोंडपाठ केल्यानें आमच्या गुरूला धर्मरहस्याचा साक्षात्कार झाला नसावा, आणि साक्षात्कारावांचून आपल्या धर्माचा सर्व लोकांनां त्यानें उपदेश केला नसता. तेव्हां मीं या पोपटपंचींत समाधान न मानतां कालाम ऋषीच्या धर्मरहस्याचा साक्षात्कार करून घेतला पाहिजे."

असा विचार करून सिद्धार्थ कालामाजवळ गेला आणि ह्मणाला "भो आचार्य, आपण शिकविलेले सर्व सिद्धांत मला तोंडपाठ येत आहेत. कोणत्याहि सिध्दांतासंबंधानें वादविवाद करण्यास मी तयार आहें; परंतु आपल्या धर्मरहस्याचा मला साक्षात्कार झाला नाहीं. तेव्हां आपल्या धर्माचें सारभूत अंग कोणतें व त्याच्या साक्षात्काराचा मार्ग कोणता, हें कृपा करून मला सांगा."

कालाम ह्मणाला "सिद्धार्था, माझ्या सर्व धर्मामध्यें मीं ज्या समाधीच्या सात पायऱ्या सांगितल्या, त्या श्रेष्ठ होत. त्यांचा जर लाभ झाला, तर तुला माझ्या धर्मरहस्याचें तेव्हांच ज्ञान होईल."

सिद्धार्थ ह्मणाला "या समाधीच्या सात पायऱ्या जरी मला तोंडपाठ येत आहेत, तरी त्यांचें मला यथार्थ ज्ञान झालें नाहीं. आपण माझ्यावर दया करून पुनः एकवार त्यांचें स्पष्टीकरण करावें."

कालाम ह्मणाला "सिद्धार्था, पहिल्या चार पायऱ्यांनां मी ध्यानें ह्मणतों. पहिल्या ध्यानामध्यें वितर्क, विचार, प्रीति, सुख आणि एकाग्रता या पांच मनोवृत्ति रहातात, व बाकी सर्व मनोवृत्ति नष्ट होतात. वितर्क म्हणजे इंद्रियगोचर विषयामध्यें चित्ताचा पहिला प्रवेश होय. विचार ध्यानविषयाचें सूक्ष्म निरीक्षण करतो. वितर्काहून विचार विशेष शांत असतो. प्रीति ह्मणजे ध्यानामध्यें योग्याला प्राप्त होणारा आनंद होय. सुख प्रीतीहूनहि शांत स्वभावाचें असतें. प्रीतीच्या लाटा जेव्हां शांत होतात, तेव्हां योग्याला समाधिसुख काय आहे हें समजतें. एकाग्रता ह्मणजे ध्यानविषयामध्यें तल्लीनता. एकाग्रतेवांचून मनुष्याला क्षणिक समाधि देखील साधावयाचा नाहीं. दुसऱ्या ध्यानामध्यें वितर्क आणि विचार या दोन मनोवृत्ति नष्ट होऊन प्रीति, सुख आणि एकाग्रता या तीनच मनोवृत्ति शिल्लक रहातात. तिसऱ्या ध्यानामध्यें प्रीतिदेखील निघून जाते. येथें योगी सुख आणि एकाग्रता यांचाच अनुभव घेत असतो. चवथ्या ध्यानामध्यें एकाग्रताच कायती शिल्लक रहाते, आणि तिला उपेक्षेचें पाठबळ मिळाल्यामुळें ती अत्यंत परिशुद्ध होते. हीं चार ध्यानें साध्य झाल्यावर योग्यानें अनंत आकाशाचें ध्यान करावें. आकाशावर ध्यान करून जो समाधि प्राप्त होतो, त्याला आपण आकाशानंत्यायतनसमाधि असें ह्मणतों. या समाधीचा पूर्ण लाभ झाल्यावर योग्यानें विज्ञानावर ध्यान करावें. विज्ञानाची व्याप्ति आकाशाच्याहि पलीकडे आहे. तेव्हां योगी आकाशाची पायरी सोडून या पायरीवर गेला, ह्मणजे सर्व विश्व त्याला विज्ञानमय दिसतें. विज्ञानांवाचून दुसरी कोणतीच गोष्ट त्याला दिसत नाहीं. या समाधीला आपण विज्ञानानंत्यायतनसमाधि असें ह्मणतो. त्याच्या पलीकडची आणि शेवटली पायरी

अनुक्रमणिका

ह्मटली, ह्मणजे योग्यानें अभावावर ध्यान करावें, ही होय. या जगामध्यें कोणत्याहि वस्तूचें अस्तित्व नाहीं, सर्व जग अभावरूपि आहे, असें ध्यान केलें असतां या समाधीचा लाभ होतो. हा समाधि अभावरूपी असल्यामुळें आपण याला आकिंचन्यायतनसमाधि असें ह्मणतों. श्रद्धा, वीर्य, स्मृति, समाधि आणि प्रज्ञा या पांच मनाच्या शक्ति आहेत. याला मी मानसिक इंद्रियें असें नांव दिलें आहे. योग्यानें या इंद्रियांनां विषम होऊं न देतां यांचें साम्य संपादन केलें पाहिजे. विशेषतः श्रद्धा आणि प्रज्ञा यांचें, आणि वीर्य व समाधि यांचें साम्य असलें पाहिजे. स्मृतीचा उपयोग सर्वत्र करावा लागतो. स्मृति म्हणजे मनाची जागृति. मी या प्रसंगीं काय करतों आहें, माझें मन स्वस्थ आहे कीं अस्वस्थ आहे, इत्यादि गोष्टीसंबंधानें जो विवेक, त्यालाच स्मृति असें ह्मणतात. या स्मृतीच्या द्वारें श्रद्धा आणि प्रज्ञा, वीर्य आणि समाधि यांची समता केली पाहिजे. हे सिद्धार्था! तूं जर या पांच इंद्रियांचें समत्व संपादून अनुक्रमें मीं सांगितलेल्या सर्व समाधींच्या पायऱ्यांचा अभ्यास करशील, तर तुला शेवटल्या पायरीचा—आकिंचन्यायतनसमाधीचा—लाभ झाल्यावर माझ्या धर्माच्या रहस्याचा तुला साक्षात्कार झाला, असें ह्मणतां येईल."

सिद्धार्थानें गुरूचा उपदेश श्रवण करून एकांतामध्यें चिंतन करण्याचा क्रम चालविला. तो आपल्या मनाशींच ह्मणाला "माझ्या आचार्यानें श्रद्धा, वीर्य, स्मृति, समाधि आणि प्रज्ञा या पांच मानसिक शक्तींचे समत्व संपादावयाला मला सांगितलें, हें ठीकच आहे. कांकीं, व्यवहारांत देखील या शक्तींचें साम्य असणें अत्यंत आवश्यक आहे. आमची श्रद्धाच जर वाढत गेली, आणि तिच्याबरोबर प्रज्ञेची वाढ झाली नाहीं, तर आह्मी भलत्याच वस्तूवर विश्वास ठेवितों. कोणीं कांहीं सांगितलें, तरी तें आह्मांला खरें वाटतें. उलटपक्षीं, आमची प्रज्ञा वाढत गेली, आणि तिला जर श्रद्धेचें बंधन नसलें, तर ती उच्छृंखल होऊन जाते. तिच्यामुळें आह्मी गर्वानें फुगून जातों, व दंभाच्या भक्ष्यस्थानीं पडतों. पण प्रज्ञेला जेव्हां श्रद्धेची जोड मिळते, तेव्हां या दोन्ही मानसिक शक्तींचा सुखकारक परिणाम घडतो. त्याचप्रमाणें आमचें वीर्य (उत्साह) जर वाढत गेलें, आणि त्याला समाधीचें बंधन नसलें, तर तें उच्छृंखल होऊन जातें. अतिशय उत्साहामुळें मनुष्याला आपण काय करितों याचे देखील भान रहात नाहीं. पण नुसता समाधिदेखील अपायकारक आहे. समाधीची शक्ति जर वाढत गेली, तर मनुष्य आळशी बनेल, व त्याच्या हातून कोणतेंहि लोकोपयोगी कृत्य व्हावयाचें नाहीं; परंतु वीर्य आणि समाधि या दोन शक्तींची समता केली असतां इष्ट परिणाम घडून येईल. स्मृतीचा उपयोग सर्वत्र करावा लागतो, हें आमच्या गुरूचें ह्मणणें बरोबर आहे. राजाचा मुख्य प्रधान जसा इतर प्रधानांचीं कामें तपासून पहातो, त्याप्रमाणें स्मृतीनें श्रद्धा आणि प्रज्ञा, वीर्य आणि समाधि यांच्या कार्यांवर देखरेख ठेविली पाहिजे. आतां आमच्या गुरूलाच या पांच शक्तींचें साम्य संपादितां आलें, आणि इतरांनां तें येणार नाहीं, असें नाहीं. माझ्या अंगींहि या पांच शक्ति आहेत, आणि मी देखील यांची समता संपादन करावयाला समर्थ आहें."

सतत परिश्रम करून आणि वर सांगितलेल्या पांच मानसिक शक्तींचें समत्व संपादून सिद्धार्थानें अल्पावकाशांतच आकिंचन्यसमाधि साध्य केला; आणि कालामाजवळ जाऊन तो त्याला ह्मणाला "भो आचार्य, आपण ज्या समाधीच्या सात पायऱ्या सांगितल्या, त्यांचा क्रमशः अभ्यास करून शेवटली पायरी मला साध्य झाली आहे. आतां यापुढें माझें कर्तव्य काय आहे, तें मला सांगा."

कालाम ह्मणाला "आतां यापुढें तुला कोणतीहि गोष्ट करावयाची राहिली नाही. माझ्या धर्मरहस्याचा जसा मला साक्षात्कार झाला आहे, तसाच तो तुलाहि झाला आहे. आतां तूं माझ्यासारखाच या धर्मपंथाचा प्रमुख पुढारी होऊन शिष्यशाखा वाढविण्याचा प्रयत्न कर."

अनुक्रमणिका

कालाम गुरु आणि सिद्धार्थ शिष्य असें नातें असतां, कालामानें सिद्धार्थाचा बहुमान केला. सिद्धार्थानें जेव्हां आकिंचन्यसमाधि साध्य केला, तेव्हां मोकळ्या मनानें कालामानें तो आपल्या योग्यतेला चढला ही गोष्ट कबूल केली. परंतु सिद्धार्थाचें कालामानें केलेल्या बहुमानानें समाधान झालें नाहीं. तो आपणाशींच ह्मणाला "आकिंचन्यसमाधीनें निर्वाणाची प्राप्ति व्हावयाची नाहीं. या समाधीनें दुर्वासनांचें कांहीं कालपर्यंत दमन करितां येईल; परंतु त्यांचा समूळ उच्छेद व्हावयाचा नाहीं. माझ्या आचार्यानें उपदेशिलेल्या या मार्गाहून निर्वाणाचा मार्ग भिन्न असला पाहिजे."

असा विचार करून सिद्धार्थ कालामऋषीचा आश्रम सोडून निघाला, आणि उद्रक रामपुत्र नांवाच्या दुसऱ्या एका प्रख्यात तपस्वी ऋषीच्या आश्रमाला गेला.

उद्रक ऋषीनें सिद्धार्थाचें आगतस्वागत चांगलें केलें. सिद्धार्थाने जेव्हां त्याला आपलें वृत्त निवेदित केलें, तेव्हां त्याला या राजपुत्रानें इतक्या अल्पावकाशांतच समाधीच्या सात पायऱ्या उल्लंघिल्याबद्दल फारच अचंबा वाटला. तो ह्मणाला "हे राजपुत्र, माझ्या शिष्यशाखेंत पुष्कळ तपोवृद्ध श्रमण आहेत; पण इतक्या अल्पावकाशांत समाधीच्या सात पायऱ्या चढलेला शिष्य मला एक देखील आढळला नाहीं! तूं थोर कुलांत जन्मला असून तुझें पूर्ववय ख्यालीखुशालींत गेलें आहे. असें असतां आम्हां तपस्व्यांनां जी गोष्ट मोठ्या कष्टानें साध्य होते, ती तूं आयासावाचूंन साध्य केलीस, याबद्दल तुझें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे! तुझ्या प्रज्ञादिक गुणांनीं आणि तपश्चर्येनें तूं या आश्रमाला शोभा आणशील, यांत मला शंका नाहीं. आतां तुला शिकवायचा असा एकच समाधि शिल्लक राहिला आहे. कालामानें ज्या तुला सात पायऱ्या शिकविल्या, त्यांच्यापलीकडे आणखी एक पायरी आहे. तिला आह्मी नैवसंज्ञानासंज्ञायतनसमाधि असें ह्मणतों. या समाधिमध्यें योगी तल्लीन झाला असतां त्याच्या मनांतून पदार्थमात्राची संज्ञा नष्टप्राय होऊन जाते. अभावाची संज्ञादेखील त्याच्या मनांत रहात नाहीं. ह्मणून या समाधीला नैवसंज्ञानासंज्ञायतनसमाधि असें नांव दिलें आहे. या समाधीचा जर तूं अभ्यास करशील, तर तुला माझ्या धर्माचें रहस्य तेव्हांच कळेल."

उद्रक ऋषीच्या उपदेशाला अनुसरून सिद्धार्थानें नैवसंज्ञानासंज्ञायतनसमाधीचा थोडक्याच दिवसांनीं पूर्ण अभ्यास केला, आणि उद्रक ऋषीजवळ जाऊन तो त्याला ह्मणाला "भो आचार्य! आपण उपदेशिलेला शेवटचा समाधि मला पूर्णपणें साध्य झाला आहे. आतां पुढें काय करावें तें शिकवा."

उद्रक ह्मणाला "सिद्धार्था! आतां तुला शिकावयाचें कांहीं राहिलें नाहीं. तूं माझ्यासारखाच माझ्या शिष्यशाखेचा प्रमुख आचार्य होऊन त्यांनां हा माझा धर्म शिकीव."

या दुसऱ्या गुरूनें केलेल्या बहुमानापासूनहि सिद्धार्थाचें समाधान झालें नाहीं. तो आपणाशींच ह्मणाला "नैवसंज्ञानासंज्ञासमाधि सर्व समाधींत श्रेष्ठ आहे, यांत संशय नाहीं; तथापि त्याच्यायोगें निर्वाणाची प्राप्ति होणार नाहीं. या सर्व समाधींमुळें आमच्या दुष्ट मनोवृत्तींचें कांहीं काळपर्यंत दमन होईल; परंतु त्यांचा समूळ नाश व्हावयाचा नाहीं. तेव्हां यापुढें ज्यात्या धर्मपंथांत शिरून कालाचा अपव्यय न करितां स्वतः प्रयत्न करून निर्वाणाचा मार्ग शोधून काढिला पाहिजे."

नंतर उद्रक ऋषीचा निरोप घेऊन सिद्धार्थ फिरतफिरत गयेजवळ उरुवेला या ठिकाणीं आला. हा प्रदेश फारच रमणीय होता. नैरंजरा नदी याच प्रदेशांतून वहात होती, आणि अंतराअंतरावर या नदीच्या कांठीं गांवें वसलीं होतीं. बोधिसत्वाचें मन या प्रदेशांतील रम्य वनशोभेकडे वेधून गेलें. तो आपणाशींच

म्हणाला “असा प्रदेश माझ्या पहाण्यांत क्वचित्च आला. काय ही वनशोभा! ही मंदमंद वाहणारी नदी तर जणूं काय मला उत्तेजनच देत आहे. येथील रहिवाशांनीं हें अरण्य तोडून हा प्रांत उध्वस्त केला नाहीं, हें एक तपस्विजनांचें भाग्यच समजलें पाहिजे.”

बोधिसत्वानें याच प्रदेशांत आपली तपश्चर्या पुढें चालविण्याचा निश्चय केला. आणखीहि पुष्कळ तपस्विलोक मगध देशाच्या या अरण्यभागामध्यें तपश्चर्या करीत असत. उरुवेलकाश्यप, गयाकाश्यप आणि नदीकाश्यप, या तीन बंधूंची येथील तपस्व्यांत प्रमुखत्वानें गणना होत असे. दुसरेहि कांहीं स्वतंत्रपणें योगाभ्यास करणारे तपस्वी या अरण्यांत वास करीत होते.

सिद्धार्थानेंहि कोणाचें शिष्यत्व न पत्करितां येथें स्वतंत्रपणें योगाभ्यासाला सुरुवात केली. समाधीच्या आठ पायऱ्यांचें त्यानें उल्लंघन केलेंच होतें. तथापि त्यांच्याहिपुढें आणखी कांहीं नवीन पायऱ्या असल्या तर पहाव्या, या उद्देशानें त्यानें खडतर योगाभ्यास चालविला. श्वासोच्छ्वास कोंडून तासांचे तास तो मृतवत् ध्यानस्थ बसत असे. त्यामुळें त्याच्या पोटांत भयंकर वेदना उठत आणि सर्व अंगाचा अत्यंत दाह होत असे. परंतु त्याचा उत्साह रतिमात्र ढळला नाहीं, व जागृतींत व्यत्यय आला नाहीं. या तीव्र योगाभ्यासानें सिद्धार्थाच्या चित्तावर जरी प्रथमतः अपायकारक परिणाम झाला नाहीं, तरी तो देहावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्याचा देह अत्यंत दुर्बळ झाला.

याप्रमाणें सिद्धार्थानें आपला योगाभ्यास चालविला असतां कौंडिण्य, वप्र, भद्रिय, महानाम आणि अश्वजित् हे पांच ब्राह्मण तपस्वी त्याला येऊन मिळाले. सिद्धार्थाची आणि त्यांची लहानपणची ओळख होती, व सिद्धार्थ पुढें बुद्ध होणार आहे, हें भविष्य बाळपणींच त्यांच्या ऐकण्यांत आलें होतें. सिद्धार्थाने चालविलेला खडतर योगाभ्यास पाहून तो लवकरच बुद्ध होईल, अशी त्यांनां आशा वाटूं लागली, व ते मोठ्या आस्थेनें सिद्धार्थाची सेवा करूं लागले.

पुष्कळ दिवसपर्यंत सिद्धार्थानें हटयोगाचा अभ्यास केला. हिंवाळ्यांत दिवसा अरण्यांत शिरून तेथें ध्यानस्थ बसावें व रात्रीं मोकळ्या मैदानांत बसावें, उन्हाळ्यांत दिवसा मैदानामध्यें बसावें आणि रात्रीं दाट झाडींत शिरून तेथें बसावें, अशा रीतीनें त्यानें तप चालविलें. पण त्यामुळें दुसरा कांहीं एक फायदा न होतां उत्तरोत्तर त्याचा देह मात्र दुर्बल होत चालला. तथापि त्यानें आपला निश्चय ढळूं दिला नाहीं. हटयोगानें आपणाला निर्वाणाचा लाभ होत नाहीं, असें पाहून त्यानें हळुहळू आपला आहार कमी करण्यास सुरुवात केली. आहार तोडला तर योगमार्गांत लवकर सिद्धि मिळते, अशी त्या काळीं समजूत होती.

सिद्धार्थानें क्रमशः अन्नाचा त्याग केला, आणि दिवसांतून मुगाचा किंवा कुळिथाचा चारपांच पळ्या काढा पिऊन तो आपला निर्वाह करूं लागला. त्याच्या देहदौर्बल्याची आतां सीमा झाली. हातापायांच्या काड्या झाल्या, पाठीचा कणा स्पष्ट दिसूं लागला, मोडक्या घराच्या वांशांप्रमाणें बरगड्या खिळखिळून गेल्या, पाण्यांत पडलेलीं नक्षत्रांचीं प्रतिबिंबें जशीं खोल गेलेलीं दिसतात, तशीं त्याच्या डोळ्यांचीं बुब्बुळें खोल गेलीं, कडू भोपळा कच्चा कापून उन्हांत टाकला असतां जसा कोमेजून जातो, तशी त्याची पूर्वीची सुंदर अंगकांति पार करपून गेली, आणि त्याचें पोट व पाठ एक झालीं.

एके दिवशीं सिद्धार्थाच्या मनांत असा विचार आला, कीं “या ज्या मी अत्यंत तीव्र वेदना अनुभवीत आहें, त्यांच्यापेक्षां तीव्रतर वेदना दुसऱ्या कोणत्याहि तपस्व्यानें अनुभविल्या नसतील! पण एवढें दुःख भोगून

अनुक्रमणिका

देखील परमशांतीचा मार्ग मला आढळत नाहीं, तेव्हां हा माझा प्रयत्न चुकीचा तर नसेल? मेरुमंडलामध्यें वाट चुकलेला वाटसरू जसा भलत्याच मार्गानें जातो, तशीच माझी स्थिति झाली नसेल कशावरून? लहानपणीं माझ्या पित्याबरोबर शेतांत गेलों असतां जंबुवृक्षाच्या छायेखालीं मी ध्यानस्थ बसलों होतों हें मला आठवतें. त्या वेळीं मी देहदंडन करीत नव्हतों. असें असतां मला समाधिसुखाचा लाभ झाला. तेव्हां सध्यांच्या माझ्या देहदंडनापासून मला कांहीं फायदा होईल असें दिसत नाहीं. लहानपणीं मी ज्या समाधिसुखाचा अनुभव घेत होतों, तें पापवासनांची तृप्ति केल्यानें मिळालेलें सुख नव्हतें, किंवा दुसऱ्याच्या घातपातानें मिळालेलें सुख नव्हतें. तेव्हां अशा सुखाला मीं कां आंचवावें, हें मला समज नाहीं. हा तपश्चर्येचा अत्यंत बिकट मार्ग सोडून मीं त्या साध्या मार्गाकडे कां वळूं नये? परंतु माझा देह इतका दुर्बल झाला आहे, कीं, माझ्याकडून कोणत्याहि मार्गांत एक देखील पाऊल पुढें पडणें शक्य नाहीं; तेव्हां प्रथमतः थोडेंथोडें अन्न खाण्याची सवय करून नष्टप्राय झालेली माझी शक्ति पुनः मी मिळविली पाहिजे.

त्या दिवसापासून आसपासच्या गांवांत भिक्षेला जाऊन सिद्धार्थ थोडेंथोडें अन्न ग्रहण करूं लागला. तेव्हां त्याच्या शुश्रूषेला असलेल्या पांच तपस्व्यांनां त्याचा अत्यंत तिटकारा आला. ते परस्परांनां ह्मणाले “आजपर्यंत आह्मांला अशी आशा होती, कीं, सिद्धार्थ तीव्र तपश्चर्येच्यायोगें बुद्ध होऊन आमचें अज्ञान दूर करील, व आह्मांला देखील आपल्या धर्माचा भागी करील; पण आज आमची आशा व्यर्थ झाली आहे. हा ढोंगी राजपुत्र मुक्तीचा खरा मार्ग सोडून पोटाच्या मागें लागला आहे! आतां याच्यापासून ब्रह्मज्ञानाची अपेक्षा करणें ह्मटलें ह्मणजे निंबाच्या झाडापासून मधुर फळांची अपेक्षा करणें होय!”

अशा रीतीनें आपसांत सिद्धार्थाविषयीं तिरस्कारव्यंजक उद्गार काढून ते पांच तपस्वी काशीला चालते झाले.

आपले साथीदार आपणाला सोडून गेले, या विचारानें सिद्धार्थाच्या मनावर कांहींएक अनिष्ट परिणाम न होतां त्यानें मोठ्या कळकळीनें धर्मचिंतनाचा क्रम पुढें चालविला. कांहीं दिवस नियमितपणें मिताहार सेवन केल्यानें सिद्धार्थाच्या अंगीं पूर्वीची शक्ति येत गेली, आणि निरामय समाधिसुखाचा तो अनुभव घेऊं लागला.

## [४]
## माराशीं युद्ध

उरुवेला प्रदेशांत सेनानी नांवाचा एक इनामदार रहात असे. तो ज्या गांवांत रहात असे, त्याला सेनानीग्राम असें नांव पडलें होतें. त्या इनामदाराची सुजाता नांवाची एक सुस्वरूप कन्या होती. आपणाला योग्य वर मिळून प्रथमतः पुत्रलाभ झाला, तर देवतेला दुधाच्या पायसाचा नैवेद्य करून मोठ्या सत्कारानें तिची पूजा करीन, असा सुजातेनें कौमारवयांत आपल्या गांवाशेजारच्या वनदेवतेला नवस केला होता.

सुजातेचा मनोरथ संपूर्ण झाला होता. तिला मोठ्या कुळांतील सद्गुणी नवऱ्याचा लाभ झाला होता, व त्याच्या सहवासांत कांहीं काल घालविल्यानंतर तिला एक देखणा आणि तरतरीत मुलगा झाला होता. तिची जशी आपल्या पतीवर निःसीम भक्ति होती, तसेंच तिच्या पतीचेंहि तिच्यावर निरतिशय प्रेम होतें, व तें पुत्रलाभामुळें द्विगुणित झालें होतें.

सुजाता या आनंदाच्या भरांत आपल्या देवतेला विसरली नाहीं. वैशाख पौर्णिमेच्या दिवशीं सकाळीं तिनें आपल्या दासीला वनामध्यें जाऊन तेथें ती देवता ज्या वडाच्या झाडावर रहात होती, त्या खालील जागा साफसूफ करून पूजेची तयारी करण्यास सांगितलें, व आपण स्वतः दुधाची उत्तम खीर करण्याच्या तयारीला लागली.

बोधिसत्वाला तपश्चर्येला आरंभ करून आज जवळजवळ सहा वर्षे होत आलीं होतीं. या दिवशीं सकाळीं, सुजातेची देवता रहात होती त्या झाडाखालीं तो ध्यानस्थ बसला होता. कांहीं कालपर्यंत परिमित अन्नाचें ग्रहण केल्यानें त्याच्या चेहऱ्यावर पूर्वीची टवटवी आली होती, आणि तीत तपश्चर्येनें आलेल्या तेजस्वितेची भर पडल्यामुळें त्याची मुखकांति अत्यंत प्रसन्न दिसत होती.

सुजातेच्या दासीनें जेव्हां आमच्या बोधिसत्वाची ध्यानस्थ बसलेली गंभीर मूर्ति पाहिली, तेव्हां तिला वाटलें, कीं, सुजातेची पूजा ग्रहण करण्यासाठीं साक्षात् देवताच त्या वृक्षाखालीं येऊन बसली आहे! ती तशीच धांवत सुजातेपाशीं गेली आणि ह्मणाली "आर्ये! तुझ्यावर अनुग्रह करण्यासाठीं वनदेवता वडाच्या झाडाखालीं येऊन बसली आहे. दुधाचा पायस आणि पूजेचें सामान घेऊन आपण लवकर तेथें जाऊं, आणि देवतेची पूजा करूं."

सुजातेनें आपल्या दासीजवळ पूजेचें सर्व सामान देऊन एका सोन्याच्या ताटांत दुधाचा पायस घातला, व तो दुसऱ्या सोन्याच्या ताटानें झांकून आपण स्वतः शिरावर घेतला. त्या दोघीजणी जेव्हां त्या वडाच्या झाडाजवळ आल्या, तेव्हां दुरूनच बोधिसत्वाची गंभीर मुद्रा पाहून अत्यंत चकित होऊन गेल्या. ही वनदेवता आहे, अशी दासीची तर पूर्वीच खात्री झाली होती; पण आतां सुजातेचा देखील संशय पार पळाला. तिनें थेट बोधिसत्वाजवळ तें खिरीनें भरलेलें ताट ठेविलें, व त्याला प्रदक्षिणा करून आणि नमस्कार करून ती बाजूला उभी राहिली. त्या भोळ्या दासीनें तर बोधिसत्वासमोर लोटांगणच घातलें. त्या मोठमोठ्यानें वनदेवतेची स्तुति करूं लागल्या. त्यांच्या त्या गडबडीमुळें बोधिसत्वाच्या ध्यानसुखांत व्यत्यय आला, व त्यानें डोळे उघडून त्यांजकडे पाहिलें.

तेव्हां ही देवता नसून हा कोणीतरी महान् तपस्वी असावा, ही गोष्ट सुजातेच्या लक्ष्यांत आली, व ती बोधिसत्वाला ह्मणाली "हे सत्पुरुषा! आह्मी वनदेवतेची पूजा करण्यासाठीं येथें आलों. आपणच वनदेवता आहां, अशा समजुतीनें मीं हा पायस आपणाला अर्पण केला आहे. त्याचा आपण स्वीकार करावा, अशी माझी विनंति आहे. आपल्यासारख्या साधुपुरुषांनीं जर या नैवेद्याचें ग्रहण केलें, तर माझी देवता माझ्यावर फार प्रसन्न होईल, यांत संशय नाहीं!"

बोधिसत्वानें आपल्या हातावर पाणी घेऊन तें अन्न स्वीकारलें, आणि मितभोजन करून आणि सुजातेला आशीर्वाद देऊन नदीच्या कांठानें फिरतफिरत संध्याकाळी तो एका पिंपळाच्या झाडाजवळ आला. तेथें सोत्थिय नांवाच्या तृणहारकानें त्याला आठ मुठी गवत दिलें. तें घेऊन तो त्या झाडाखालीं गेला, आणि त्यानें आपणाला बसण्यासाठीं त्या गवताचें आसन तयार करून झाडाच्या पूर्वेच्या बाजूला तो त्या आसनावर ध्यानस्थ बसला.

सिद्धार्थ राजकुमार बुद्ध होण्याच्या बेतांत आहे, हें पाहून माराला अतिशय वाईट वाटलें. तो आपल्या मनाशीं ह्मणाला "आजपर्यंत कोणत्याहि श्रमणानें किंवा ब्राह्मणानें माझा अतिक्रम केला नाहीं; पण

अनुक्रमणिका

हा तरुण राजकुमार मोठा दृढनिश्चयी दिसतो. यानें माझा अपमान करून माझ्यापासून स्वतंत्र होण्याचा मोठा खटाटोप चालविला आहे! याच वेळीं याचें दमन न केल्यास हा माझ्या हातून कायमचा सुटेल, व माझ्याविरुद्ध बंड करावयाला लोकांनां उत्तेजन देईल.”

असा विचार करून मारानें तत्क्षणीं आपली सर्व सेना सिद्ध केली, व सिद्धार्थाला चारी बाजूंनीं वेढून त्याजवर तुटून पडावयाला आपल्या योध्यांनां हुकूम केला.

सिद्धार्थ लवकरच बुद्ध होणार, या आशेनें ब्रह्मादिक देवगण छत्रचामरें, पुष्पमाला इत्यादि साहित्य घेऊन बुद्धपूजा करण्यासाठीं बोधिवृक्षाखालीं जमले होते; पण जेव्हां त्यांनीं चारी बाजूंनीं वातवेगानें धांवत येणारी ती मारसेना पाहिली, तेव्हां त्यांचें सर्व धैर्य गळून गेलें. एकदेखील देव त्या ठिकाणीं राहूं शकला नाहीं! देवांचा राजा शक्र आपला विजयशंख घेऊन पृथ्वीच्या अंताला जाऊन दडून बसला. ब्रह्मदेवानें बुद्धपूजा करण्यासाठीं श्वेतच्छत्र आणिलें होतें, तें सुमेरुपर्वताच्या पायथ्याशीं टाकून तो देखील ब्रह्मलोकीं जाऊन स्वस्थ बसला. इतर देव तर मालादिक पूजासामग्री जिकडेतिकडे फेंकून देऊन दशदिशा पळत सुटले! तात्पर्य, **‘कठिण समय येतां कोण कामास येतो!’** या ह्मणीप्रमाणें सिद्धार्थाच्या रक्षणाला त्याच्या पुण्यायीवांचून दुसरा कोणीहि उपयोगीं पडला नाहीं.

मारानें आपल्या सैन्याला पुढें पाठवून गिरिमेखल नांवाच्या हत्तीवर आरूढ होऊन तो मागोमाग निघाला. माराच्या फौजेनें सिद्धार्थाचा पराजय करण्याची पराकाष्ठा केली. आपल्या शस्त्रास्त्रांचा तिनें बोधिसत्वावर एकसारखा वर्षाव चालविला होता; पण त्या तीक्ष्ण शस्त्रास्त्रांची फुलें होऊन बोधिसत्वाच्या पायांपाशीं पडलीं!

माराला आपल्या सेनेला जय मिळण्याची आशा राहिली नाहीं; तेव्हां त्यानें आपल्या प्रभावानें भयंकर तुफान उठविलें. आसपासचे वृक्ष तटातट उपटून पडूं लागले; धुळीनें आकाश भरून गेलें; पशुपक्ष्यादिकांचा एकच आक्रोश सुरू झाला! परंतु बोधिसत्वाचा समाधि तिळमात्र ढळला नाहीं, आणि तो ज्या वृक्षाखाली बसला होता, त्याचें एक पान देखील हललें नाहीं.

तें पाहून मार अत्यंत संक्षुब्ध झाला, व त्यानें भयंकर पाऊस पाडावयाला सुरुवात केली. जिकडेतिकडे महापूर आला, परंतु बोधिसत्वाचें आसन कोरडें राहिल्यामुळें आणि पाण्याच्या एका थेंबानें देखील त्याच्या अंगाला स्पर्श न केल्यामुळें त्याच्या समाधींत मुळींच व्यत्यय आला नाहीं.

तदनंतर मारानें पाषाणवृष्टि, शस्त्रवृष्टि, अंगारवृष्टि, तापलेल्या राखेची वृष्टि, तापलेल्या वाळूची वृष्टि आणि तापलेल्या चिखलाची वृष्टि अशा अनुक्रमें निरनिराळ्या सहा वृष्ट्या उत्पन्न केल्या. परंतु त्यांपासूनहि बोधिसत्वाच्या समाधीला अंतराय झाला नाहीं.

तें पाहून मार फार खिन्न झाला. तथापि प्रयत्न न सोडतां शेवटीं त्यानें भयानक अंधकार उत्पन्न केला. ती वैशाखशुद्ध पौर्णिमेची रात्र होती. जिकडेतिकडे शुभ्र चांदणें पडलें होतें. परंतु बोधिवृक्षाच्या आसपास मारानें इतका दाट अंधकार पसरविला, कीं, माराचा गिरिमेखल हत्ती किंवा आसपासच्या पर्वतांचीं शिखरें घुबडांनां देखील दिसेनाशीं झालीं. पण बोधिसत्वाच्या ज्ञानरवीपुढें या मारनिर्मित अंधकाराचें कांहींच चाललें नाहीं. त्याच्या समाधीला मुळींच व्यत्यय आला नाहीं.

अनुक्रमणिका

आजपर्यंत त्या कडव्या माराला पराभव कसा तो मुळींच माहीत नव्हता. आपल्या स्वतःच्या प्रभावाचा उपयोग करण्याचा प्रसंग त्याला कधींच आला नाहीं. एकाद्या श्रमणानें किंवा ब्राह्मणानें त्याचें अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला असतां, तो आपल्या फौजेची एकादी लहानशी तुकडी पाठवून त्याला तेव्हांच चीत करून टाकीत असे. सिद्धार्थ साधारण तपस्वी नव्हता, हें जाणूनच मारानें आपल्या सर्व सैन्याला त्याच्यावर एकदम तुटून पडावयाला आज्ञा केली होती. परंतु आपल्या फौजेचा बोधिसत्वाकडून सपशेल पराभव होईल, हें त्याच्या ध्यानींमनींदेखील आलें नाहीं. आतां तर त्यानें जवळजवळ आपली सर्व शक्ति वेंचली; पण बोधिसत्व कांहीं केल्या त्याला दाद देईना. तेव्हां माराला या प्रसंगीं किती दुःख झालें असेल, याची कल्पनाच केली पाहिजे.

आतां आपलें काळें तोंड घेऊन परत जावें, किंवा आपल्या हत्तीवरून खालीं उतरून सिद्धार्थावर तुटून पडावें, या दोहोंपैकीं माराला एकच मार्ग खुला राहिला होता. आपल्या पराभवाची वार्ता घेऊन माघारें जाणें न आवडल्यामुळें बोधिसत्वावर स्वतः हल्ला करण्याचें धाडस करणेंच माराला इष्ट वाटलें. तो हत्तीवरून खालीं उतरला, आणि बोधिसत्वाजवळ येऊन त्याला ह्मणाला "सिद्धार्था, येथून मुकाट्यानें चालता हो. नाहीं तर मी तुझा एका क्षणार्धात माझ्या सैन्याकडून नाश करवून टाकितों!"

बोधिसत्व ह्मणाला "हे मार! तुझ्या सैन्याची मला चांगली पारख आहे. नाना प्रकारच्या चैनीच्या वस्तु ही तुझी सगळ्यांत पुढें जाणारी सैन्याची तुकडी होय. त्याच्या मागोमाग अरिरति, तहान आणि भूक, तृष्णा, आळस, कुशंका, गर्व, कीर्तीची आशा, आत्मस्तुति आणि परनिंदा या तुझ्या तुकड्या येत असतात. साधारण तपस्व्याकडून यांपैकीं एकाद्या तुकडीचा पराजय होणें शक्य नाहीं; पण मला तुझ्या या सर्व सेनेची मुळींच पर्वा वाटत नाहीं. कच्च्या मातीचें भांडें जसें दगडानें सहज फोडितां येतें, तसा माझ्या प्रज्ञेच्यायोगें तुझ्या सेनेचा मला पराभव करितां येईल!"

मार ह्मणाला "हें जाऊं दे. पण तूं ज्या आसनावर बसला आहेस, तें आसन माझें आहे. त्यावर बसण्याचा तुला अधिकार नाहीं, ह्मणून मी ह्मणतों, कीं, तूं येथून उठून ताबडतोब चालता हो!"

बोधिसत्व ह्मणाला "मारा! हें आसन तुझें आहे याला पुरावा काय?"

हा सिद्धार्थाचा प्रश्न ऐकून माराच्या फौजेंतील पुष्कळ योद्धे पुढें सरसावले, आणि "हें आसन माराचें आहे, याला आह्मी साक्षी आहों!" असें ह्मणूं लागले. तेव्हां मार बोधिसत्वाला ह्मणाला "हा पहा माझा पुरावा. हे सर्व लोक हें आसन माझें आहे, अशी साक्ष देत आहेत. आतां हे तुझें आहे याला काय पुरावा आहे, तो दाखीव; नाहींतर मुकाट्यानें येथून निघून जा."

बोधिसत्व ह्मणाला "हे मार! मीं अनेक जन्मीं दानपारमिता परिपूर्ण केल्यामुळें या आसनावर बसण्यास अधिकारी झालों आहें."

मार ह्मणाला "पण तूं दानपारमिता पूर्ण केलीस, याला साक्षी कोण?"

बोधिसत्व आपला उजवा हात पृथ्वीकडे करून ह्मणाला "हे मार! माझ्या पुण्यकर्माला दुसरा कोणी जीवंत साक्षी येथें मिळणें कठिण आहे. ही सर्वसहा सर्वव्यापी वसुंधरा माझ्या पुण्यकर्माबद्दल साक्ष देईल!"

अनुक्रमणिका

बोधिसत्वानें हे शब्द उच्चारल्याबरोबर भयंकर गर्जना होऊन पृथ्वी दुभंग झाली व तिच्या पोटांतून एक सुंदर देवता तेथें प्रकट झाली, आणि ती माराला ह्मणाली “मारा! सिद्धार्थकुमारानें पूर्वजन्मीं अनेक प्रसंगीं महादान दिल्याबद्दल मी साक्षी आहें. यानें याचकांच्या हातावर सोडलेल्या पाण्यानें भिजलेले हे माझे केंस अद्यापि वाळले नाहींत—”

असें बोलून पृथ्वीदेवतेनें आपले केश पिळून त्यांतून पाणी काढलें. त्याचा प्रवाह एवढा मोठा झाला, कीं, मार, त्याची सेना आणि त्याचा गिरिमेखल हत्तीदेखील कोठल्याकोठें वाहून गेला!

याप्रमाणें मारसेनेची दुर्दशा झाल्यावर ब्रह्मादि देवलोक बोधिवृक्षाभोंवतीं जमले, व सिद्धार्थावर दिव्यपुष्पवृष्टि करून त्यांनीं त्याचा जय जयकार केला. तेव्हां सिद्धार्थ आपणाशींच उद्गारला:—

**जन्मजन्मींची संसृती अपार,**
**धांवतां मी पावलों कष्ट फार;**
**कोण कर्ता या देहमंदिराचा,**
**श्रांत झालो लावितां शोध याचा.**
**बोध कर्त्याचा आज मला झाला,**
**पुनः घरटें बांधितां नये त्याला;**
**सर्व त्याचीं साधनें झालिं भिन्न,**
**देहगेहाचें कूट तसें छिन्न.**
**टाकुनीयां संस्कार चित्त माझें,**
**लोभ तृष्णेचें दूर करी ओझें;**
**मारसेनेची नसे भीति आतां,**
**ज्ञानलाभें होईन जगत्त्राता.**

[हे शेवटचे दोन चरण वृत्त पुरें करण्यासाठीं पदरचे घातले आहेत. मूळ गाथा अशा आहेत:—
अनेकजातिसंसारं संधाविस्सं अनब्बिसं
गहकारकं गवेसन्तो दुक्खा जाति पुनप्पुनं ।
गहकारकं दिट्ठोऽसि पुन गेहं न काहसि
सब्बा ते फासुका भग्गा गहकूटं विसंखितं
विसंखारगतं चितं तण्हानं स्वयमज्झगा ।]

[५]

## बुद्धपदाचा लाभ आणि पहिला धर्मोपदेश

सिद्धार्थाचा जयजयकार करून आणि दिव्यपुष्पवृष्टीनें त्याची पूजा करून ब्रह्मादिक देवगण आपापल्या ठिकाणीं गेल्यावर सिद्धार्थ ध्यानस्थ बसला, आणि रात्रीचा पहिला प्रहर संपण्यापूर्वी त्यानें दुःखाच्या कारणपरंपरेचा शोध लाविला.

अविद्येपासून संस्कार होतात, संस्कारांपासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामरूपापासून षडायतन (पंचेंद्रियें आणि मन), षडायतनापासून स्पर्श, स्पर्शापासून सुखदुःखादिक वेदना, वेदनेपासून तृष्णा, तृष्णेपासून उपादान, उपादानापासून भव, भवापासून जन्म आणि जन्मापासून जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य आणि उपायास उद्भवतात. याप्रमाणें इहलोकींच्या दुःखाचा उगम होतो; पण

अनुक्रमणिका

अविद्येचा पूर्ण वैराग्यानें निरोध केला असतां संस्काराचा निरोध होतो. संस्काराच्या निरोधानें विज्ञानाचा, विज्ञानाच्या निरोधानें नामरूपांचा, नामरूपांच्या निरोधानें षडायतनाचा, षडायतनाच्या निरोधानें स्पर्शाचा, स्पर्शाच्या निरोधानें वेदनेचा, वेदनेच्या निरोधानें तृष्णेचा, तृष्णेच्या निरोधानें उपादानाचा, उपादानाच्या निरोधानें भवाचा, भवाच्या निरोधानें जन्माचा, आणि जन्माच्या निरोधानें जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य, उपायास यांचा निरोध होतो. याप्रमाणें या ऐहिक दुःखांचा निरोध होत असतो. अविद्येपासून जरामरणापर्यंत जी कार्यकारणपरंपरा, तिला बौद्धग्रंथांमध्यें प्रतीत्यसमुत्पाद असें ह्मणतात.

वर सांगितल्याप्रमाणें दुःखाचा उगम कसा होतो आणि निरोध कसा होतो, हें जेव्हां सिद्धार्थाला समजलें, तेव्हां तो बुद्ध झाला. आपल्या ज्ञानदृष्टीनें चार आर्यसत्यें आणि तदंतर्गत आर्य अष्टांगिक मार्ग त्यानें पाहिला. मनुष्यप्राण्याचें हिताहित कशांत आहे, याचें आतां त्याला स्पष्ट ज्ञान झालें. तेव्हां तो आपणाशींच उद्गारला “ध्यानस्थ ब्राह्मणाला मोठ्या प्रयत्नानें जेव्हां सद्धर्माचा साक्षात्कार होतो, तेव्हां त्याच्या सर्व कुशंका विलयाला जातात. कांकीं, कार्यकारणपरंपरेचें त्याला नीट ज्ञान झालेलें असतें.”

रात्रीच्या दुसऱ्या प्रहरीं बुद्धानें प्रतीत्यसमुत्पादाचें पुनः समालोचन केलें. दुःखाचा उगम कसा होतो आणि निरोध कसा होतो, याचा नीट विचार करून तो उद्गारला “ध्यानस्थ ब्राह्मणाला प्रयत्नानें जेव्हां सद्धर्माचा साक्षात्कार होतो, तेव्हां त्याच्या सर्व कुशंका विलयाला जातात. कांकीं, दुःखाच्या कारणांचा निरोध कसा करावा हें तो जाणतो!”

पुनः रात्रीच्या तिसऱ्या प्रहरीं बुद्धानें प्रतीत्यसमुत्पादाचें समालोचन करून उद्गार काढले, कीं, “ध्यानस्थ ब्राह्मणाला मोठ्या प्रयत्नानें जेव्हां सद्धर्माचा साक्षात्कार होतो, तेव्हां त्याच्या सर्व कुशंका विलयाला जातात, आणि अंतरिक्षांत प्रकाशणाऱ्या सूर्याप्रमाणें मारसेनेचा विध्वंस करून तो प्रकाशित होतो!”

बुद्ध त्याच आसनावर सात दिवसपर्यंत विमुक्तिसुखाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसला. आठव्या दिवशीं त्या आसनावरून उठून तो न्यग्रोधवृक्षाखालीं गेला, व तेथेंहि तो सात दिवसपर्यंत विमुक्तिसुखाचा अनुभव घेत ध्यानस्थ बसला.

तेथें एक मोठा गर्विष्ठ ब्राह्मण येऊन त्याला ह्मणाला “हे गौतम, कोणत्या गोष्टीमुळें मनुष्याला ब्राह्मण म्हणतां येईल? ब्राह्मणाचें कर्तव्य काय?”

हें ऐकून बुद्धानें हे उद्गार काढिले “ज्यानें पापाला आपल्या अंतःकरणांतून टाकून दिलें आहे, गर्वमल ज्याच्या अंतःकरणाला शिवूं शकत नाहीं, ज्याचें ब्रह्मचर्य परिपूर्ण आहे, ज्याला इहलोकींच्या कोणत्याहि गोष्टीविषयीं तृष्णा नाहीं, ज्यानें अंतर्दृष्टीनें ज्ञानाचा अंत पाहिला आहे, तोच आपणाला सत्यत्वानें ब्राह्मण ह्मणूं शकेल!”

तो आठवडा न्यग्रोधवृक्षाखालीं घालवून पुढल्या आठवड्यांत बुद्ध मुचिलिंदवृक्षाखालीं गेला, व तेथेंहि एक आठवडापर्यंत विमुक्तिसुखाचा अनुभव घेता झाला. त्या वेळीं अकालिक मेघ उत्पन्न होऊन मोठी वृष्टि झाली. तेव्हां बुद्धाला वृष्टीची बाधा होऊं नये ह्मणून मुचिलिंद नागराजा आपल्या नागलोकांतून बाहेर निघाला, आणि बुद्धाच्या मस्तकावर फणा करून उभा राहिला. एका आठवड्यानंतर जेव्हां पाऊस थांबून

आकाश स्वच्छ झालें, तेव्हां मुचिलिंद आपले स्वरूप पालटून कुमारवेषानें हात जोडून बुद्धासमोर उभा राहिला. त्याला पाहून बुद्धगुरु उद्गारला "धर्माचें शिक्षण संपादून जो त्यांतील रहस्य पाहून संतुष्ट होतो, त्याला एकांतवास सुखावह होतो; आणि प्राणिमात्रावर मैत्री केल्यानें सुख कसें होतें, हें त्याला समजतें! इहलोकीं कामवासनेचें उल्लंघन करून वैराग्याचा लाभ होणें सुखकारक आहे; पण याच्याहि पलीकडे अहंकार नष्ट होणें ही खरोखर सुखाची परमावधि समजली पाहिजे!"

त्यानंतर बुद्ध मुचिलिंदवृक्षाखालून राजायतनवृक्षाखालीं गेला, आणि तेथें विमुक्तिसुखाचा अनुभव घेत बसला. त्या वेळीं तपुस्स आणि भल्लिक नांवाचे दोन व्यापारी उत्कलदेशाहून त्या मार्गानें व्यापार करण्यासाठीं चालले होते. त्यांच्या आप्तइष्टांनी त्यांनां बुद्धगुरु जवळ आहे, हें वर्तमान सांगितलें. तेव्हां ते बुद्धाच्या दर्शनाला आले, व त्याची ती गंभीर मुद्रा पाहून त्या दिवसापासून त्याचे शिष्य झाले. बुद्धाच्या उपासकांत (गृहस्थ शिष्यांत) हेच दोघे पहिले उपासक होत.

एका आठवड्यानंतर बुद्ध न्यग्रोधवृक्षाखालीं जाऊन बसला. तेथें त्याच्या मनांत असा विचार आला, कीं, "मला जें धर्मज्ञान झालें आहे, त्याचा बोध प्रपंचामध्यें गढून गेलेल्या माणसांनां होणें शक्य नाहीं. मीं जर धर्माचा उपदेश केला, आणि लोकांनां माझ्या धर्माचें ज्ञान नीटपणें झालें नाहीं, तर त्यायोगें मला विनाकारण त्रास मात्र होणार आहे! तेव्हां आतां धर्मोपदेशाच्या खटपटीला न लागतां एकांतामध्येंच कालक्रमण करावें हें बरें!"

हा बुद्धाचा मानसिक विचार तत्क्षणींच ब्रह्मदेवानें जाणला, आणि तो मोठ्यानें आपणाशींच उद्गारला "अरेरे! जगाची मोठी हानि होत आहे! सम्यक्संबुद्धाचें मन धर्मोपदेशाकडे न वळतां एकांतवासाच्या सुखाकडे वळत आहे!"

तेव्हां ब्रह्मदेव ताबडतोब ब्रह्मलोकामध्यें अंतर्धान पावला आणि बुद्धासमोर प्रगट झाला; व बुद्धाला हात जोडून ह्मणाला "हे बुद्धगुरो, तुझ्या अमृततुल्य धर्माचा लोकांनां उपदेश कर. या जगामध्यें ज्यांच्या ज्ञानावर अज्ञानमलाचें पटल घट्ट बसलें नाहीं, असे पुष्कळ प्राणी आहेत. केवळ तुझें धर्मवाक्य त्यांच्या कानीं न पडल्यामुळें त्यांची हानि होत आहे. जर तूं उपदेश करशील, तर त्यांतील रहस्य जाणणारे पुष्कळ लोक या जगांत सांपडतील. हे बुद्धगुरो! आजपर्यंत या मगधदेशांत जे धर्म प्रचलित झाले, ते परिशुद्ध नव्हते. कांकीं, ज्यांच्या अंतःकरणाचा पापमल सर्वथैव धुऊन गेला नाहीं, अशा माणसांकडून त्यांचा प्रसार झाला होता. ह्मणून मलरहित अंतःकरणानें जाणलेला हा तुझा धर्म लोकांनां ऐकूं दे! हें अमृताचें द्वार लोकांसाठीं उघडें कर! पर्वतशिखरावर राहून जसे आपण खालच्या प्रदेशांतील लोकांकडे पहातों, तसा प्रज्ञेच्या शिखरावर चढून तूं या जन्मजरादिक दुःखांनीं पीडित झालेल्या लोकांकडे निर्भयपणें पहा! हे शूरवीर! माराशीं युद्ध करून तूं विजय मिळविला आहेस. हे लोकनायक! तूं सर्व ऋणांतून मुक्त झाला आहेस. आतां लोकांमध्यें संचार करून तुझ्या धर्माचा प्रसार कर. तुझा धर्म जाणणारे पुष्कळ लोक तुला भेटल्यावांचून रहाणार नाहींत."

बुद्धानें ब्रह्मदेवाची विनंति मान्य केली; व आपल्या सद्धर्माचा प्रथमतः कोणाला उपदेश करावा याचा तो विचार करूं लागला. आळारकालामानें जर या धर्माचें श्रवण केलें, तर त्याला तेव्हांच याचें रहस्य समजेल, असा विचार बुद्धाच्या मनामध्यें आला.

अनुक्रमणिका

पण कालाम एका आठवड्यापूर्वी निधन पावला होता. ही गोष्ट अंतर्ज्ञानानें जाणून बुद्ध उद्गारला "अरेरे! कालाम मोठा तपस्वी होता. तो आज जर जीवंत असता तर माझ्या उपदेशाचें तत्त्व त्याला आयासा-वांचून समजलें असतें. पण आतां दुसरा कोणता मनुष्य माझा धर्म जाणावयाला समर्थ आहे? उद्रक रामपुत्र हा कालामाप्रमाणेंच मोठा तपस्वी आहे. तो माझा धर्ममार्ग लवकर जाणूं शकेल."

पण उद्रक रामपुत्राचा पूर्वदिवशींच अंत झाला होता. ही गोष्टहि जेव्हां बुद्धानें अंतर्ज्ञानानें जाणिली, तेव्हां तो आपणाशींच ह्मणाला "आतां माझ्याबरोबर जे पांच तपस्वी रहात होते, तेच माझा धर्म प्रथमतः श्रवण करावयाला योग्य आहेत. मी जेव्हां तपश्चर्या करीत होतों, तेव्हां त्यांनीं पुष्कळ मदत करून मला आभारांत ठेविलें आहे. पण ते या वेळीं कोठें राहत असतील?"

ते पांच तपस्वी वाराणसीजवळ ऋषिपतन नांवाच्या उपवनामध्यें रहात होते. हे बुद्धानें दिव्यदृष्टीनें जाणून काशीला जाण्याचा बेत करून तो उरुवेलेहून निघाला.

वाटेंत आजीवकपंथाचा उपक नांवाचा श्रमण त्याला भेटला, आणि ह्मणाला "आयुष्मन् गौतम! तुझें मुख अत्यंत प्रसन्न दिसत आहे, आणि तुझी अंगकांति तेजस्वी दिसत आहे! तूं कोणत्या आचार्याचा शिष्य आहेस?"

बुद्ध ह्मणाला "माझा धर्ममार्ग मीं स्वतःच शोधून काढला आहे. तेव्हां मी कोणाचा शिष्य आहें असें सांगूं?"

उपक ह्मणाला "पण तूं अर्हन् झाला आहेस काय? तुला जिन ह्मणता येईल काय?"

बुद्ध ह्मणाला "होय, मीं सर्व पापकारक मनोवृत्तींनां जिंकलें आहे, ह्मणून, हे उपक! मी जिन आहें."

हें बुद्धाचें भाषण ऐकून उपक 'असेलहि कदाचित्' असें ह्मणाला; आणि मान हलवीत आडरस्त्यानें तेथून निघून गेला.

बुद्ध हळुहळू प्रवास करीतकरीत ऋषिपतनाला आला. त्याला पाहून त्या पांच तपस्व्यांनीं आपसांमध्यें असा बेत केला, कीं, "हा योगभ्रष्ट श्रमण येत आहे. तो आमच्या आश्रमांत आला, तर त्याचा आह्मीं कोणत्याहि रीतीनें आदरसत्कार करूं नये. पण येथें एक आसन मांडून ठेवावें. त्याची इच्छा असेल, तर तो त्यावर बसेल" परंतु बुद्ध जेव्हां आश्रमाच्या दाराशीं आला, तेव्हां त्यांचा बेत आपोआप ढांसळला. त्यांतील एकजणानें बुद्धाचें पात्र व चीवर (कंथा) ग्रहण केलें; दुसऱ्यानें आसन सज्ज केलें; इतरांनीं पाय धुण्यासाठीं पाणी वगैरे आणून ठेविलें. बुद्ध पाय धुऊन त्याच्यासाठीं मांडलेल्या आसनावर बसला. त्या तपस्व्यांनीं त्याला सिद्धार्थ याच नांवानें हाक मारून त्याचा कुशल समाचार विचारिला.

तेव्हां बुद्ध ह्मणाला "भिक्षुहो! मला तुह्मी पूर्वीच्या नांवानें हांक मारूं नका! मी अर्हन्, तथागत आणि सम्यक्संबुद्ध या नामाभिधानाला योग्य झालों आहें. भिक्षुहो! माझा धर्म लक्ष्यपूर्वक ऐका. जरा माझ्या या अमृततुल्य धर्माचें तुह्मी एकाग्रतेनें मनन करून मी सांगतों त्या रीतीनें वागाल, तर याचें रहस्य समजून तुमच्या ब्रह्मचर्याचें सार्थक होईल."

अनुक्रमणिका

तपस्वी ह्मणाले “हे गौतम! आह्मी जेव्हां तुजपाशीं होतों, तेव्हां तीव्रतपश्चर्येनें देखील तुला मोक्षमार्गाचें ज्ञान झालें नाहीं. आतां तर तू योगभ्रष्ट झाला आहेस! तपश्चर्येचा त्याग करून जो तूं पोटाच्या मागें लागलास, त्या तुला अमृततुल्य धर्माचें ज्ञान होईल कसें?”

बुद्ध ह्मणाला “भिक्षुहो! यापूर्वी मीं अशा प्रकारचे उद्गार कधींहि काढले होते काय?”

‘नाहीं,’ असे तपस्व्यांनीं उत्तर दिलें.

“तर मग मी जें कांहीं सांगत आहें, त्याजवर तुमचा विश्वास बसला पाहिजे. तुह्मी एकवार अवधान देऊन माझा उपदेश ऐकून घ्या. या धर्माप्रमाणें जर तुह्मी वागाल, तर तुमच्या ब्रह्मचर्याचें सार्थक होईल!”

हळुहळू त्या पांच तपस्व्यांचा विश्वास बुद्धाच्या ह्मणण्यावर जडला, व ते त्याचा धर्मोपदेश ऐकावयाला तयार झाले.

तेव्हां बुद्ध त्यांनां ह्मणाला “भिक्षुहो! कामोपभोगामध्यें सुख मानणें हा एक अंत आहे. पण हा हीन, ग्राम्य, अज्ञजनसेवित, अनार्य, आणि अनर्थावह आहे. देहदंडन करणें हा दुसरा अंत आहे. हा देखील दुःखकारक, अनार्य आणि अनर्थावह आहे. तपस्व्यानें या दोन अंतांचें सेवन करूं नये. तथागतानें या दोन अंतांच्या मधला मार्ग शोधून काढला आहे.

“भिक्षुहो! जन्म, जरा, व्याधि, मरण, अप्रिय वस्तूचा समागम, आणि प्रिय वस्तूचा वियोग इत्यादि गोष्टींमुळें मनुष्याला इहलोकीं दुःख होतें. हें जें रावापासून रंकापर्यंत सर्वसाधारण दुःख, त्याला मी दुःख नांवाचें पहिलें आर्यसत्य ह्मणतों.

“या सर्व दुःखांचा उगम तृष्णेमध्यें होत असतो. इहलोकींच्या उपभोगांची तृष्णा, स्वर्गलोकीं उत्पन्न होण्याची तृष्णा, आणि यथेच्छ सुख भोगून आत्महत्या करून जगांतून नाहीसें होऊन जाण्याची तृष्णा, या तीन तृष्णांमुळें मनुष्यप्राणी अनेक पापें आचरतो; आणि दुःखभागी होतो. ह्मणून तृष्णेला दुःखाचें मूळ समजलें पाहिजे. या दुसऱ्या सिद्धांताला मी दुःखसमुदय आर्यसत्य असें ह्मणतों.

“तृष्णेचा निरोध केला तरच निर्वाणाचा लाभ होईल. देहदंडनानें किंवा कामोपभोगानें मोक्षप्राप्ति होणार नाहीं, हा तिसरा सिद्धांत होय. याला मी दुःखनिरोध आर्यसत्य असें ह्मणतों.

“सम्यक् दृष्टि, सम्यक् संकल्प, सम्यक् वाचा, सम्यक् कर्मान्त (कर्म), सम्यक् आजीव, सम्यक् व्यायाम, सम्यक् स्मृति, आणि सम्यक् समाधि, हा तो मीं नवीन शोधून काढिलेला मधला मार्ग होय. दुःखाचा निरोध याच मार्गानें होणार आहे. व्रतें आणि उपोषणें करून दुःखाचा निरोध व्हावयाचा नाहीं. हा चौथा सिद्धांत होय. याला मी दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा आर्यसत्य असें ह्मणतों.

“या चार आर्यसत्यांचें आणि तदंतर्गत आर्यअष्टांगिक मार्गाचें ज्ञान झाल्यामुळेंच मी सम्यक्संबुद्ध या पदाला पोहोंचलों आहें.”

अनुक्रमणिका

त्या पांच ब्राह्मण तपस्व्यांपैकीं कौंडिन्य ब्राह्मणाला प्रथमतः बुद्धाच्या धर्मोपदेशाचें रहस्य समजलें, ह्मणून त्याला आज्ञात कौंडिन्य (जाणणारा कौंडिन्य) असें टोपण नांव पडलें. अनुक्रमें इतरांनांहि धर्मबोध होऊन ते पांचहि तपस्वी अर्हंत झाले; व आपणाला बौद्धधर्माची दीक्षा देण्यासाठीं तथागताला त्यांनीं विनंति केली.

तेव्हां बुद्ध ह्मणाला "भिक्षुहो! या माझ्या धर्माचा अंगिकार करा, व ब्रह्मचर्येचें पालन करून भवदुःखाचा अंत करा!"

हे बुद्धानें उच्चारलेले शब्दच त्या पांच तपस्व्यांचा प्रव्रज्याविधि झाला.

[६]

## काशी आणि उरुवेला येथील कामगिरी

त्या कालीं वाराणसी नगरींत एका धनाढ्य व्यापाऱ्याला यश नांवाचा अत्यंत सुकुमार पुत्र होता. त्याला रहावयासाठीं तीन प्रासाद होते. एक पावसाळ्यांत, दुसरा हिंवाळ्यांत, व तिसरा उन्हाळ्यांत रहाण्यासाठीं सोयीवार पडावे, अशा बेतानें त्यांची रचना केली होती. यशाला प्रपंचामध्यें कोणत्याहि गोष्टीची वाण नव्हती; परंतु यशाचें मन संसारांत रमेनासें झालें. त्याला सर्व प्रापंचिक सुखें विषतुल्य वाटूं लागलीं.

एके दिवशीं त्यांचे परिचारक झोंपीं गेले असतां तो जागा झाला, आणि आपल्या मृतप्राय परिजनांकडे पाहून आपणाशींच उद्गारला "काय हा उपद्रव! आणि काय हा उपसर्ग!"

आपल्या परिजनाला सोडून आपल्या वाड्यांतून यश एकाकी बाहेर पडला, आणि थेट नगरद्वाराकडे चालता झाला. मोठ्या आश्चर्याची गोष्ट ही, कीं, यशाला एवढ्या रात्रीं नगरद्वार उघडें सांपडलें. कांहींएक प्रतिबंध न होतां तो नगरांतून बाहेर पडला, व "काय हा उपद्रव, आणि काय हा उपसर्ग!" असें ह्मणत थेट ऋषिपतनाकडे गेला.

त्या वेळीं पहांट झाली असून भगवान् बुद्ध पर्णशालेच्या बाहेरच्या बाजूला मोकळ्या जागेंत फिरत होता. तो यशाला पाहून आपल्या आसनावर येऊन बसला. भगवंताच्या जवळ आल्यावर यश "काय हा उपद्रव, आणि काय हा उपसर्ग!" हे शब्द पुनः उद्गारला.

बुद्ध ह्मणाला "येथें उपद्रव नाहीं आणि येथें उपसर्गहि नाहीं. हे श्रेष्ठिपुत्र, या आसनावर बैस. तुला मी धर्मोपदेश करितों."

तेव्हां यश बुद्धाजवळ जाऊन त्याला नमस्कार करून एक बाजूला तेथें असलेल्या एका आसनावर बसला.

बुद्धानें क्रमाक्रमानें दानापासून फायदे, शीलरक्षण केल्यापासून फायदे, स्वर्गलोकप्राप्ति, कामासक्तींत दोष आणि एकांतवासांत गुण, इत्यादि गोष्टींसंबंधानें उपदेश केला; व जेव्हां यशाचें चित्त मृदू,

अनुक्रमणिका

अज्ञानाच्या आवरणापासून मुक्त आणि मुदित झालेलें पाहिलें, तेव्हां त्याला त्यानें दुःख, दुःखसमुदय, दुःखनिरोध आणि, दुःखनिरोधगामी मार्ग या चार आर्यसत्यांचा उपदेश केला.

तो ऐकून यशाला त्याच आसनावर ज्ञानदृष्टि प्राप्त झाली. ज्या दुःखाचा समुदय होत असतो त्याचा निरोधहि करतां येतो, या गोष्टीचा त्याला स्पष्ट बोध झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं यशाच्या घरीं मोठी गडबड उडून गेली. पूर्वरात्रीं यश घरांतून एकाकी निघून गेला, हें वर्तमान त्याच्या आईबापांनां समजतांच त्यांनीं यशाच्या शोधासाठी चोहोंकडे स्वार पाठविले; आणि यशाचा पिता स्वतः ऋषिपतनाच्या बाजूला त्याचा थांग लावण्यासाठीं गेला. पांच तपस्व्यांच्या पर्णशालेजवळ आल्यावर यशाच्या सुवर्णपादुकाचीं चिन्हें धुळीवर उमटलेलीं त्याच्या पहाण्यांत आलीं. तेव्हां त्या चिन्हांच्या अनुरोधानें जाऊन तो बुद्धाजवळ आला आणि ह्मणाला “भगवन्! माझ्या यशाला तुह्मीं पाहिलें आहे काय?”

बुद्ध ह्मणाला “हे गृहपति, तूं खालीं बस. तुझी व तुझ्या पुत्राची येथेंच भेट होईल.”

हे बुद्धाचे शब्द ऐकून यशाच्या पित्याला फार आनंद झाला व बुद्धाला नमस्कार करून तो एका बाजूला बसला. बुद्धानें त्याला क्रमशः दान, शील, इत्यादि गोष्टींचा उपदेश केल्यावर तो ह्मणाला “भगवन्, आपला धर्म अत्यंत सुंदर आहे. अंधकारामध्यें जसा प्रद्योत, तसा या प्रपंचतिमिरामध्यें आपला धर्म आहे! आजपासून मी आपल्याला, आपल्या धर्माला आणि आपल्या भिक्षुसंघाला शरण जातों. माझ्या कुडींत प्राण असेपर्यंत मी आपला उपासक झालों आहें, त्या माझा आपण अंगीकार करा.”

तेव्हां आपल्या प्रभावानें बुद्धानें यशाची आणि त्याच्या पित्याची तेथल्या तेथेंच भेट व्हावी, असा योगायोग जुळवून आणिला. यशाच्या पित्यानें जेव्हां जवळ बसलेल्या आपल्या मुलाला पाहिलें, तेव्हां तो त्याला ह्मणाला “मुला, तुझ्या आईला अत्यंत शोक झाला आहे. तेव्हां एकवार तिची भेट घेऊन तिला जीवदान दे.”

यशानें आपल्या पित्याला उत्तर न देतां बुद्धाच्या तोंडाकडे पाहिलें.

बुद्ध ह्मणाला “हे गृहपति, तूं ज्या धर्माचें श्रवण केलेंस, त्या धर्माचें पूर्ण ज्ञान झाल्यामुळें ज्याचें चित्त विमुक्त झालें आहे, तो पुनरपि कामोपभोगामध्यें सुख मानील काय?”

“नाहीं भगवन्.” यशाचा पिता ह्मणाला.

बुद्ध ह्मणाला “तर मग यशाला आतां संसारबद्ध करण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे!”

श्रेष्ठी ह्मणाला “माझ्या मुलाला आपल्या धर्मरहस्याचें पूर्ण ज्ञान झालें, हा त्याला मोठाच लाभ झाला असें मी समजतों.”

अनुक्रमणिका

यशाच्या पित्यानें बुद्धाला दुसऱ्या दिवशीं आपल्या घरीं भोजनासाठीं आमंत्रण केलें; तें बुद्धानें मान्य केल्यावर घरीं जाऊन त्यानें दुसऱ्या दिवशींची सर्व सिद्धता केली.

बुद्ध यशाला बरोबर घेऊन दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्याच्या घरीं गेला. जेवण आटोपल्यावर त्यानें यशाच्या आईबापांनां आणि बायकोला धर्मोपदेश केला. त्यायोगें यशाची आई व बायको या दोघीहि यशाच्या बापाप्रमाणेंच बुद्धाच्या उपासिका झाल्या, व यशाला गृहस्थाश्रमांत येण्यासाठीं त्यांनीं आग्रह केला नाहीं.

वाराणसी नगरीमध्यें यशाचे पुष्कळ मित्र होते. त्यांपैकीं चौपन तरुणांनीं गृहत्याग करून बुद्धाच्या भिक्षुसंघांत प्रवेश केला. बुद्धाचे पूर्वीचे पांच साथीदार, यश आणि यशाचे चौपन सोबती मिळून बुद्धाजवळ आतां साठ भिक्षु जमले.

कार्तिकी पौर्णिमा होऊन गेल्यावर बुद्धानें एके दिवशीं त्या सर्व भिक्षूंनां एकत्र जमविलें, आणि तो त्यांनां ह्मणाला “भिक्षुहो! मी इहलोकींच्या आणि स्वर्गलोकींच्या सर्व बंधनापासून मुक्त झालों आहें. त्याचप्रमाणें तुह्मीदेखील या सर्व बंधनांपासून मुक्त झालां आहां. आतां तुह्मी जनतेच्या कल्याणासाठीं चारी दिशांनां संचार करा. आरंभीं कल्याणप्रद, मध्याला कल्याणप्रद व परिणामीं कल्याणप्रद अशा माझ्या धर्माचा सर्व लोकांनां उपदेश करा, आणि शुद्ध ब्रह्मचर्याचें सर्वांनां ज्ञान करून द्या. एका मार्गानें दोघे जाऊं नका. भिक्षुहो! या जगामध्यें ज्यांची बुद्धि सर्वथैव मलिन झाली नाहीं, असे पुष्कळ प्राणी आहेत; पण धर्मवाक्य कानीं न पडल्यामुळें त्यांची हानि होऊं पहात आहे. तेव्हां माझा धर्म जाणणारे तुह्मांला पुष्कळ लोक सांपडतील. मीदेखील धर्मप्रचारासाठीं पुनः उरुवेलेला जातों.”

बुद्धाचें हें भाषण संपतें न संपतें तोंच दुष्ट मार तेथें प्रगट होऊन ह्मणाला “इहलोकींच्या आणि स्वर्गलोकींच्या सर्व बंधनांनीं तूं बांधला गेला आहेस! हे श्रमण, तूं या माझ्या महाबंधनांतून कदापि मुक्त होणार नाहींस.!”

बुद्ध ह्मणाला “रूप, शब्द, रस, गंध आणि स्पर्श हे पंचेंद्रियांचे विषय तुझीं बंधनें आहेत; पण ते मला मोह पाडूं शकत नाहींत. तेव्हां तुझा प्रयत्न व्यर्थ आहे!”

बुद्धानें आपणाला ओळखलें, असें पाहून मार अत्यंत दुःखी होऊन तेथेंच अंतर्धान पावला.

त्या समयीं नाना राष्ट्रांतून बुद्धाच्या संघांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या मनुष्यांला घेऊन हे साठ भिक्षु बुद्धाजवळ जात; पण त्यामुळें त्यांनां फार त्रास होत असे. तेव्हां बुद्धानें त्यांनां अशी परवानगी दिली, कीं, ज्या होतकरू मनुष्याची संघांत प्रवेश करण्याची इच्छा असेल, त्याला आपणाजवळ न आणतां भिक्षूंनींच परस्पर दीक्षा द्यावी.

आपल्या प्रमुख साठ शिष्यांनां सर्वत्र धर्मप्रचारासाठीं पाठविल्यावर, व परस्पर श्रमणदीक्षा देण्याची त्यांनां अनुज्ञा दिल्यावर बुद्धगुरु एकटाच उरुवेलेच्या अरण्यांत आला.

मागें एका ठिकाणीं सांगितलेंच आहे, कीं, या अरण्यामध्यें रहाणाऱ्या तपस्वी लोकांत उरुवेलकाश्यप, नदीकाश्यप आणि गयाकाश्यप यांची प्रमुखत्वानें गणना होत होती. या तिघां भावांमध्यें

अनुक्रमणिका

उरुवेलकाश्यप वडील असल्यामुळें इतर दोघे त्याला आपला गुरू समजत असत. उरुवेलकाश्यपाचे पांचशें जटाधारी शिष्य होते. नदीकश्यपाचे तीनशें व गयाकाश्यपाचे दोनशें शिष्य होते.

बुद्धगुरु प्रथमतः उरुवेलकाश्यपाच्या आश्रमामध्यें जाऊन त्याला ह्मणाला "भो काश्यप, जर तुला माझ्यापासून अडचण होण्यासारखी नसेल, तर मी तुझ्या अग्निशाळेमध्यें एक रात्र राहीन."

काश्यप ह्मणाला "हे महाश्रमणा, तुझ्या रहाण्यापासून माझी कोणतीच अडचण होण्यासारखी नाहीं; पण माझ्या अग्निशाळेमध्यें भयंकर नाग रहात असतो; तो तुला त्रास देईल अशी मला भीति वाटते."

बुद्ध ह्मणाला "त्याबद्दल तूं काळजी करूं नकोस. तूं मला एक रात्र येथें रहावयाला परवानगी दे."

काश्यप ह्मणाला "असें आहे, तर तूं खुशाल येथें रहा."

त्या रात्रीं बुद्धगुरु काश्यपाच्या अग्निशाळेंत ध्यानस्थ बसला असतां तो महासर्प तेथें आला, व आपल्या तेजानें बुद्धाचा पराभव करण्याचा प्रयत्न करूं लागला. त्याचे फूत्कार ऐकून व त्याच्या तेजानें अग्निशाला प्रकाशित झालेली पाहून, काश्यपाच्या आश्रमांतील जटिल अग्निशालेभोंवतीं जमले, व आपापसांत बोलूं लागले, कीं, "अरेरे! गरीब बिचारा श्रमण या महासर्पाच्या तावडींत सांपडला आहे!"

परंतु बुद्धाच्या प्रभावापुढें त्या नागाचें कांहींएक चाललें नाहीं. शेवटीं बुद्धानें आपल्या सामर्थ्यानें त्याचें तेज हरण करून त्याला आपल्या भिक्षापात्रांत झांकून ठेविलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बुद्ध आपलें भिक्षापात्र उघडें करून तो नाग काश्यपाला दाखवून ह्मणाला "भो काश्यप! हा पहा तुझा घोर महासर्प निस्तेज होऊन कसा पडला आहे तो!"

तो चमत्कार पाहून काश्यपाच्या मनांत असा विचार आला, कीं, "हा महाश्रमण मोठा बुद्धिमान् आहे; तथापि तो माझ्यासारखा अर्हत्पदाला पोहोंचला नसावा."

दुसऱ्या दिवशीं बुद्धगुरु काश्यपाच्या आश्रमाजवळ अरण्यांत रहात होता. त्या रात्रीं चार दिक्पाल त्याचा धर्म ऐकावयासाठीं तेथें आले. त्यांच्या तेजानें ती सर्व वनभूमि प्रकाशित झालेली काश्यपानें पाहिली, व दुसऱ्या दिवशीं सकाळीं तो बुद्धाला जेवणाचें आमंत्रण करण्यासाठीं गेला असतां ह्मणाला "हे महाश्रमण, रात्रीं या प्रदेशांत मोठा प्रकाश दिसत होता, तो कशाचा?"

बुद्धानें 'रात्रीं चार दिक्पाल आपला धर्म श्रवण करण्यास आले होते' असें सांगितल्यावर काश्यप मनांतल्यामनांत ह्मणाला "हा महाश्रमण मोठा ऋद्धिमान् आहे खरा! तथापि तो माझ्यासारखा अर्हत्पदाला पोहोंचला नसावा."

त्या दिवशीं काश्यपाच्या आश्रमांत भोजन करून बुद्ध त्याच अरण्यप्रदेशांत राहिला. रात्रीं इंद्र त्याचा धर्मोपदेश श्रवण करण्यासाठीं तेथें आला. त्याच्या तेजानें काश्यपाच्या आश्रमाच्या आसपासचा प्रदेश अत्यंत प्रकाशित झालेला पाहून काश्यप चकित होऊन गेला. दुसऱ्या दिवशीं इंद्र बुद्धाचा धर्मोपदेश श्रवण

अनुक्रमणिका

करावयाला आला होता, हें वर्तमान त्याला समजलें. तेव्हां पूर्वीचाच विचार पुनः एकवार त्याच्या मनामध्यें आला.

नंतर एके दिवशीं रात्रीं बुद्धाच्या दर्शनाला ब्रह्मदेव आला होता, हें वर्तमान काश्यपाला समजलें. तथापि बुद्ध अर्हत्पदाला पोंचला होता, याजबद्दल त्याची खात्री झाली नाहीं.

एके दिवशीं काश्यपाच्या आश्रमांत मोठा यज्ञसमारंभ होणार होता, त्यासाठीं अंग आणि मगध देशांतील पुष्कळ लोक खाण्यापिण्याचे जिन्नस घेऊन तेथें येणार होते. तेव्हां उरुवेलकाश्यपाच्या मनांत असा विचार आला, कीं, "उद्यां माझ्या आश्रमांत अंग आणि मगध देशांतील पुष्कळ लोक जमणार आहेत. जर हा महाश्रमण त्यांनां आपल्या ऋद्धीचा चमत्कार दाखवील, तर याचा लाभसत्कार वाढेल, व माझा लाभसत्कार कमी होईल. हा जर उद्यां येथें आला नाहीं, तर बरें होईल."

काश्यपाच्या मनांतील हा विचार जाणून बुद्ध यज्ञाच्या दिवशीं त्याच्या आश्रमांत गेला नाहीं.

यज्ञ संपून लोक आपापल्या घरीं गेल्यावर दुसऱ्या दिवशीं काश्यप बुद्धाला आमंत्रण करण्यासाठीं तो बसला होता त्या अरण्यांत गेला, आणि त्याला ह्मणाला "हे महाश्रमण, भोजनाची सर्व सिद्धता आहे. पण तूं काल कां आला नाहींस?"

बुद्ध ह्मणाला "भो काश्यप, काल तुझ्या आश्रमांत यज्ञ होणार होता, व त्यासाठीं अंग आणि मगध देशांतील पुष्कळ लोक येणार होते. तेव्हां त्यांनां मी कांहींतरी ऋद्धिचमत्कार दाखवून त्यांचें मन वळवीन व त्यायोगें तुझ्या लौकिकाला बाध येईल, असें तुला वाटलें; आणि मी त्या समयीं आश्रमांत हजर नसलों तर बरें होईल, असा विचार तुझ्या मनामध्यें आला; ह्मणून मी काल तुझ्या आश्रमांत आलों नाहीं."

बुद्धाच्या ऋद्धिमत्तेबद्दल काश्यपाची उत्तरोत्तर खात्री होत चालली; परंतु त्याला अद्यापि बुद्धाला अर्हत्पद लाभलें नसावें असें त्याला वाटत होतें.

बुद्धानें आणखीहि कांहीं ऋद्धिचे चमत्कार काश्यपाला दाखविले, पण बुद्ध अर्हन् झाला अशी त्याची खात्री होईना. एके दिवशीं उरुवेलेच्या प्रदेशांत अकालमेघाची भयंकर वृष्टि झाली, व त्यायोगें सर्वत्र पाणीच पाणी होऊन गेलें. काश्यपाला वाटलें, कीं, बुद्ध महापुरांत सांपडून वाहून जाण्याचा संभव आहे. तेव्हां कांहीं जटिलांसहवर्तमान एका नावेंत बसून तो बुद्ध गुरु रहात होता त्या ठिकाणीं गेला. तेथें बुद्ध पाण्याचा प्रवाह आपल्या ऋद्धिबलानें दोन्ही बाजूंला सारून मध्यें कोरड्या जागेंत खुशाल इकडून तिकडे फिरत होता. त्याला पाहून काश्यप मोठ्यानें ह्मणाला "तूंच तो महाश्रमण आहेस काय?"

बुद्ध 'होय' असें उत्तर देऊन अंतरिक्षांतून त्या नावेंत जाऊन उभा राहिला. तेव्हां काश्यपाच्या मनांत पुनः एकवार पूर्वीचाच विचार उभा राहिला, कीं, "हा महाश्रमण मोठा ऋद्धिमान् आहे. पण माझ्यासारखा अर्हत्पदाला पोहोंचलेला नाहीं."

तेव्हां बुद्ध त्याला ह्मणाला "भो काश्यप! तूं अर्हन् नाहींस, आणि अर्हत्पदलाभाच्या मार्गालादेखील लागला नाहींस!"

अनुक्रमणिका

हे बुद्धाचे शब्द ऐकून काश्यपाचा अभिमान तत्काळ गळाला, आणि तो बुद्धाच्या पायां पडून ह्मणाला "भगवन्, मला तुझ्या शिष्यशाखेंत सामील कर."

बुद्ध ह्मणाला "काश्यप, तूं पांचशें जटिलांचा गुरु आहेस. त्यांनां भेटल्यावांचून तूं माझा शिष्य होण्याची घाई करूं नको."

तेव्हां काश्यपानें आपल्या शिष्यांनां एकत्र जमवून बुद्धाचा शिष्य होण्याचा आपला बेत त्यांनां कळविला. ते सर्व काश्यपाबरोबरच बुद्धाचे शिष्य होण्यास तयार झाले, व त्यांनीं आपल्या जटा कापून अग्निहोत्राच्या साहित्यासहवर्तमान नदीच्या प्रवाहांत टाकल्या. बुद्धानें यांनां आपल्या भिक्षुसंघांत घेतलें.

नदीच्या प्रवाहांतून वहात आलेले ते जटाभार आणि अग्निहोत्राचें तें साहित्य पाहून आपल्या वडील भावावर आणि त्याच्या शिष्यशाखेवर मोठाच प्रसंग गुदरला असावा, असें नदीकाश्यपाला वाटलें, व खरी माहिती मिळविण्यासाठीं आपल्या कांहीं शिष्यांनां त्यानें उरुवेलकाश्यपाच्या आश्रमाला पाठविलें. आपला भाऊ शिष्यशाखेसहवर्तमान. बुद्धाचा अनुयायी झाला, ही बातमी समजतांच नदीकाश्यपहि आपल्या तीनशें शिष्यांसह बुद्धाजवळ जाऊन त्याचा अनुयायी झाला.

त्याचप्रमाणें गयाकाश्यपाच्या कानांवर आपले दोघे बंधु बुद्धानुयायी झाल्याची वार्ता आल्याबरोबर तोहि उरुवेलकाश्यपाच्या आश्रमांत जाऊन आपल्या दोनशें शिष्यांसहवर्तमान बुद्धाचा अनुयायी झाला. याप्रमाणें थोडक्याच अवधींत एक हजार जटिलांनीं बुद्धाच्या भिक्षुसंघांत प्रवेश केला.

एके दिवशीं बुद्ध या एक हजार भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो! जगामध्यें सर्वच वस्तु प्रदीप्त झाल्या आहेत! कोणत्या सर्व वस्तु? पंचेंद्रियें आणि मन या वस्तु प्रदीप्त झाल्या आहेत! कशानें प्रदीप्त झाल्या? कामाग्नीनें, क्रोधाग्नीनें आणि मोहाग्नीनें या वस्तू प्रदीप्त झाल्या आहेत; जरा, मरण, शोक, परिदेव, दुःख, दौर्मनस्य, आणि उपायास यांयोगें प्रदीप्त झाल्या आहेत! पण भिक्षुहो! जो हें यथार्थतः पाहतो, तो पंचेद्रियें आणि मन यांच्याविषयीं विरक्त होतो; आणि जो सर्व इंद्रियें आणि त्यांचे विषय यांच्या ठायीं विरक्त होतो, तोच मुक्त समजावा."

## [७]
## राजगृहाला आगमन

उरुवेलेच्या प्रदेशांत कांहीं काल घालवून बुद्धगुरु आपल्या एक हजार शिष्यांसह राजगृहाला आला. तेथें भगवान् यष्टिवनामध्यें रहात होता. बुद्ध आपल्या नगरासमीप आला आहे, हें वर्तमान बिंबिसार राजाला समजतांच तो मोठ्या लवाजम्यानिशीं त्याच्या भेटीला गेला. त्याच्याबरोबर मगध देशांतील पुष्कळ ब्राह्मणहि होते. त्यांनां अशी शंका आली, कीं, बुद्ध काश्यपाचा शिष्य आहे किंवा काश्यप बुद्धाचा शिष्य आहे.

त्यांच्या मनांतील विचार बुद्धानें जाणला आणि तो काश्यपाला ह्मणाला "काश्यपा, तूं आपलें अग्निहोत्र कां सोडलेंस?"

अनुक्रमणिका

काश्यप ह्मणाला “भगवान्, स्वर्गलोकीं सर्वप्रकारें कामसुख मिळणें हेंच यज्ञाचें फळ असें समजतात. पण इहलोकींचें आणि स्वर्गलोकींचें कामसुख पापकारक आहे, असें जाणून मी अग्निहोत्रामध्यें किंवा यज्ञामध्यें रत झालों नाहीं!”

“पण हे काश्यपा, जर कामसुखांत तुला आनंद वाटत नाहीं, तर तुझें मन कोणत्या ठिकाणीं रत झालें आहे, हें सांग.”

“भगवन्! अत्यंत शांत निर्वाणपद पाहून माझें मन यज्ञयागाविषयीं विरक्त झालें. या निर्वाणपदीं मी रत झालों. भगवन्, आपण माझे गुरु आहां आणि मी आपला शिष्य आहें.”

हें काश्यपाचें भाषण ऐकून त्या ब्राह्मणांचा संशय निरस्त झाला.

बुद्धानें बिंबिसारराजाला, त्याच्या सरदारांनां आणि त्याजबरोबर आलेल्या ब्राह्मणांनां दानापासून फायदे, शीलाचें महत्त्व, स्वर्गलोकींचें सुख, कामसुखामध्यें दोष, आणि एकांतवासामुळें घडणारा सुपरिणाम इत्यादि गोष्टी समजावून सांगितल्या, व जेव्हां त्या सर्वांचें चित्त अज्ञानावरणापासून मुक्त होऊन मृदु आणि मुदित झालेलें पाहिलें, तेव्हां त्यानें त्यांनां चार आर्यसत्यें समजावून सांगितलीं. त्याच्या उपदेशामुळें सर्वांची ज्ञानदृष्टि खुली झाली, व ते सर्व त्या दिवसापासून बुद्धोपासक झाले.

राजा बिंबिसार ह्मणाला “भगवन्, आपण बुद्ध होऊन माझ्या राज्यांत धर्मप्रसारार्थ प्रथमतः यावें अशी माझी उत्कट इच्छा होती; ती आज सफल झाली. आपल्या धर्मामृतपानानें माझी प्रजा सुखी होईल यांत संशय नाहीं. भगवन्, उद्यां आपण आपल्या भिक्षुसंघासह माझ्या घरीं भिक्षा ग्रहण करावी.”

बुद्धानें कांहींएक उत्तर न देतां मुकाट्यानेंच राजाचें आमंत्रण स्वीकारल्याचें चिन्ह दाखविलें. राजानें त्या रात्रीं सर्व व्यवस्था करून दुसऱ्या दिवशीं बुद्धाला निरोप पाठविला. माध्यान्हकालाच्या पूर्वी बुद्ध आणि त्याचे काश्यपादिक एक हजार भिक्षु राजवाड्यांत येऊन मांडलेल्या आसनावर बसले. बिंबिसार राजानें आपण स्वतः बुद्धाची आणि भिक्षुसंघाची भोजनाची व्यवस्था ठेविली. भोजनोत्तर बुद्धाला एका मोठ्या दिवाणखान्यांत बसवून राजा त्याच्या एका बाजूला बसला.

तेव्हां राजाच्या मनांत असा विचार आला, कीं, “माझें वेणुवन उद्यान बुद्धाला आणि भिक्षुसंघाला रहाण्याला योग्य आहे. कांकीं, तें शहरापासून फार दूर नाहीं, व फार जवळहि नाहीं. तेथें जाण्यायेण्याचा रस्ता चांगला असून भाविक मनुष्याला जाण्यायेण्याला तें सोयीवार आहे. तेथें दिवसाची फारशी गडबड नसते, व रात्रीं विशेष गलबला नसतो. एकांतवासाला तें योग्य आहे. तें बुद्धाला दान केलें, तर फार चांगलें होईल.”

बिंबिसारराजा आपल्या आसनावरून उठला, आणि हातांत पाण्यानें भरलेली सोन्याची झारी घेऊन बुद्धाजवळ जाऊन ह्मणाला “भगवन्, माझें वेणुवन उद्यान मी आपणाला आणि आपल्या भिक्षुसंघाला दान देत आहें; त्याचा आपण स्वीकार करावा.”

अनुक्रमणिका

बुद्धानें वेणुवनाचा स्वीकार केला; आणि भिक्षूंनां उद्देशून तो ह्मणाला “भिक्षुहो, आजपासून लोकांनीं दान दिलेला आराम (विहार) स्वीकारण्याविषयीं मी तुह्मांला परवानगी देतों.”

त्या काळीं राजगृहाजवळ संजय नांवाचा सुप्रसिद्ध परिव्राजकाचार्य रहात असे. त्याची मोठी शिष्यशाखा होती. सारिपुत्त आणि मोग्गल्लान या दोन ब्राह्मण परिव्राजकांची त्याच्या प्रमुख शिष्यांत गणना होत असे. पण संजयाच्या तत्त्वज्ञानानें त्या दोघांचें समाधान झालें नसल्यामुळें त्यांनीं असा बेत ठरविला होता, कीं, दोघांपैकीं एकाला जर निर्वाणाचा खरा मार्ग सांपडला, तर त्यानें तो दुसऱ्याला सांगावा.

एके दिवशीं अस्सजि (अश्वजित्) नांवाचा भिक्षु राजगृहांत पिंडपातासाठीं (भिक्षेसाठीं) फिरत असतां त्याला सारिपुत्तानें पाहिलें. त्याची शांत मुद्रा आणि गंभीरपणाची चालचालणूक पाहून सारिपुत्राला वाटलें, कीं, जे कोणी निर्वाणमार्गाला लागलेले असतील त्यांपैकीं हा एक असावा. तेव्हां सारिपुत्त त्याच्या मागोमाग राजगृहांतून बाहेर पडला.

अस्सजि आपल्या पात्रांत पडलेलें अन्न वस्त्रानें झांकून वेणूवनांत जात असतां वाटेंत सारिपुत्तानें त्याला गांठले; आणि कुशलप्रश्नादि विचारून झाल्यावर सारिपुत्त ह्मणाला “आयुष्मन्, तुझी चर्या अत्यंत प्रसन्न दिसत आहे. तूं कोणत्या धर्माचा अनुयायी आहेस? तुझा गुरु कोण? आणि त्याचें मत काय?”

अस्सजि ह्मणाला “मी नुकताच भिक्षु झालों आहें. मला विस्तारानें गुरुचें मत सांगतां येणार नाहीं; पण तें मी संक्षेपानें सांगूं शकेन.”

सारिपुत्त ह्मणाला “हरकत नाहीं. संक्षेपानें किंवा विस्तारानें जें कांहीं सांगण्यासारखें असेल तें सांग. मला सारांशच पाहिजे आहे. शब्दपांडित्य घेऊन काय करावयाचें आहे?”

अस्सजि ह्मणाला “जीं दुःखें कारणापासून उत्पन्न होतात, त्यांचें कारण तथागतानें सांगितलें आहे; आणि त्या कारणांचा निरोध कसा करावा, हेंहि सांगितलें आहे. आमच्या गुरूचें हेंच मत आहे [मूळ गाथा अशी आहे –

ये धम्मा हेतुप्पभवा हेतुं तेसं तथागतो आह
तेसं च यो निरोधो एवं वादी महासमणो ।].”

या अस्सजीच्या धर्मवाक्यानें सारिपुत्ताला बुद्धाचा धर्म निर्वाणाचा खरा मार्ग आहे, अशी खात्री वाटली; आणि तो अस्सजीला ह्मणाला “आजकाल जर खरा धर्म असेल तर तो हाच आहे!”

सारिपुत्त तेथून मोग्गल्लानाजवळ गेला आणि त्यानें घडलेली सर्व गोष्ट त्याला सांगितली. तेव्हां मोग्गल्लान ह्मणाला “आह्मी याच क्षणी बुद्धाच्या दर्शनाला जाऊं.”

सारिपुत्त ह्मणाला “आयुष्मन्! संजयाच्या शिष्यांपैकीं अडीचशें परिव्राजक आह्मां दोघांवर अवलंबून आहेत. तेव्हां प्रथमतः त्यांनां भेटून त्यांची सल्ला घेऊन मग बुद्धदर्शनाला जाऊं.”

हें संभाषण पुरें झाल्यावर ते दोघे आपल्यावर अवलंबून राहणाऱ्या परिव्राजकांनां भेटले, व यापुढें बुद्धाचे शिष्य होण्याचा आपला निश्चय त्यांनीं त्यांनां कळविला; तेव्हां ते अडीचशें परिव्राजक सारिपुत्त –

अनुक्रमणिका

मोग्गल्लानांबरोबर बुद्धाचे अनुयायी होण्यास सिद्ध झाले. त्यांजसहवर्तमान सारिपुत्त आणि मोग्गल्लान संजयाजवळ जाऊन त्याला ह्मणाले "आयुष्मन्, आह्मी बुद्ध गुरूजवळ जात आहोंत. आजपासून तो आमचा गुरु आहे."

संजयानें न जाण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. पण तो सारिपुत्ता-मोग्गल्लानांचें मन वळवूं शकला नाहीं. त्याला आपली एवढी मोठी शिष्यशाखा नष्ट झाल्याबद्दल अत्यंत खेद झाला.

सारिपुत्तमोग्गल्लान आपल्या अडीचशें सतीर्थ्यांसह वेणुवन उद्यानांत आले. बऱ्याच अंतरावर असतांना त्यांनां पाहून बुद्ध आपल्या भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो! हे जे दोघे परिव्राजक येथें येत आहेत, ते माझे अग्रश्रावक (अग्रशिष्य) होणार आहेत!"

ते जवळ येऊन बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसले; आणि बौद्धसंघांत आपला समावेश करण्यासाठीं त्यांनीं बुद्धाला विनंति केली. बुद्धानें त्यांनां व त्यांच्या अडीचशें सतीर्थ्यांनां संघांत घेतलें.

संजयाचे एवढे शिष्य एकदम बौद्धभिक्षु झाले, तेव्हां राजगृहामध्यें फारच गडबड उडून गेली. कांही दिवस एकादा बौद्धभिक्षु रस्त्यांत दिसला ह्मणजे लोक ह्मणत "हा महाश्रमण आमच्या शहरांत आला, आणि सगळ्या संजयाच्या शिष्यांनां घेऊन गेला! आतां हा कोणाला नेणार बरें? **[आगतो खो महासमणो मागधानं गिरिब्बजे सब्बे संजये नेत्वान कस्स दानि नथिस्सति ।]**"

भिक्षूंनां राजगृहवासी लोकांच्या या ह्मणण्याला काय उत्तर द्यावें, हें सुचेना. त्यांनीं ही गोष्ट बुद्धाला कळविली. बुद्ध ह्मणाला "भिक्षुहो! हा लोकापवाद फार दिवस टिकावयाचा नाहीं. सातआठ दिवस लोक असें बोलतील, आणि चूप रहातील. तथापि पुनः जर तुमच्या कानीं हे शब्द आले, तर तुह्मी त्या मनुष्यांनां असें स्पष्ट उत्तर द्या, कीं "शूर तथागत शिष्यांनां सद्धर्मानें नेत असतात. मग त्यांची लोकांनीं ईर्षा कां करावी? **[नयंति वे महावीरा सद्धम्मेन तथा गता धम्मेन नीयमानानं का उस्सुय्या बिजानतं ।]**"

राजगृहांत वेणुवनविहारामध्यें रहात असतां बुद्धानें आपल्या संघाला शिस्त लावून दिली. यापूर्वी कौंडिन्यापासून तहत सारिपुत्त-मोग्गल्लानांपर्यंत ज्यांनां बुद्धानें स्वतः आपल्या भिक्षुसंघांत घेतलें, त्यांचा प्रव्रज्याविधि अगदींच साधा होता. बुद्धानें 'भिक्षु, इकडे ये,' (एहि भिक्खु) असें ह्मणावें; म्हणजे कोणताहि माणूस भिक्षु होत असे. पण याच्यायोगें संघामध्यें सर्वसाधारणता राहिली नाहीं. ह्मणजे एकाचीं वस्त्रें एका तऱ्हेचीं, तर दुसऱ्याचीं दुसऱ्या तऱ्हेचीं; एकाचा आचार एका तऱ्हेचा, तर दुसऱ्याचा दुसऱ्या तऱ्हेचा, असा प्रकार होऊं लागला. तेव्हां बुद्धानें आपल्या भिक्षुसंघाचे आचार एकाच धर्तीवर होण्यासाठीं निरनिराळे नियम घालून दिले. त्या सर्वांचा विस्तार विनयग्रंथामध्यें केला आहे.

[८]

## शुद्धोदनराजाची भेट

सिद्धार्थ आपल्या वयाच्या छत्तीसाव्या वर्षी वैशाखी पौर्णिमेला बुद्ध झाला. त्यानंतर आषाढी पौर्णिमेला ऋषिपतनामध्यें पांच तपस्व्यांनां बुद्धानें प्रथमतः धर्मोपदेश केला. चातुर्मास ऋषिपतनांत राहून धर्मोपदेश करीतकरीत उरुवेलकाश्यपादिक एक हजार जटिलांनां आपले शिष्य करून पौष महिन्यांत बुद्ध

अनुक्रमणिका

राजगृहाला परत आला, व महिनापंधरादिवसांच्या आंतच सारिपुत्तमोग्गल्लानादिक परिव्राजकांनां त्यानें आपल्या संघांत घेतलें. येथें बुद्धाभोंवतीं मोठा भिक्षुसंघ जमला, व त्यामुळें त्याची कीर्ति विंध्य आणि हिमालय या दोन पर्वतांमधील प्रदेशांत सर्वत्र पसरली.

सहा वर्षेपर्यंत शुद्धोदनराजाला आपल्या मुलाचें वर्तमान नीटसें समजलें नव्हतें; पण आतां तो मोठ्या संघाचा शास्ता झाला आहे, व राजगृहामध्यें बिंबिसारराजानें दिलेल्या वेणुवनविहारांत रहात आहे, ही वार्ता शुद्धोदनाच्या कानीं यावयाला उशीर लागला नाहीं. राजानें एका विश्वासु दूताला बुद्धाला कपिलवस्तूस आणण्यासाठीं पाठविलें. पण तो माघारा न येतां वेणुवनामध्यें बुद्धाचा धर्म श्रवण करून तेथेंच भिक्षु होऊन राहिला. राजानें आणखी दोनतीन दूत पाठविले; पण त्या सर्वांचीहि तीच गत झाली.

शेवटी कालुदायी नांवाच्या सिद्धार्थाच्या बालमित्राला राजानें बुद्धाला घेऊन येण्यासाठीं राजगृहास पाठविलें. तो वेणुवनामध्यें येऊन बुद्धाचा शिष्य झाला. तथापि इतर दूतांप्रमाणें आपलें कर्तव्य विसरला नाहीं. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशीं तो बुद्धाला ह्मणाला “भगवन्, आपला पिता आपल्या दर्शनाला अत्यंत उत्सुक झाला आहे. तेव्हां आपण कपिलवस्तूला जाऊन एकवार त्याला व इतर आप्तांनां भेट द्यावी, अशी माझी विनंति आहे. भगवन्, हा वसंतकाल आपल्या गमनाला अत्यंत योग्य आहे.”

कालुदायीच्या विनंतीला मान देऊन बुद्धगुरु राजगृहांतून निघाला; आणि अनुक्रमें धर्मोपदेश करीतकरीत कपिलवस्तूला आला. तेथें शाक्यांनीं तयार केलेल्या न्यग्रोध नांवाच्या विहारांत राहून बुद्धानें आपल्या ज्ञातकांनां अनेकवार धर्मोपदेश केला.

एके दिवशीं भिक्षाग्रहणासाठीं तो शुद्धोदनाच्या वाड्यांत गेला असतां त्याला यशोधरादेवीनें पाहिलें, आणि ती आपल्या मुलाला ह्मणाली “राहुला, तो तेथें बसलेला श्रमण तूं पाहिला आहेस काय? तो तुझा पिता आहे. त्याच्यापाशी जाऊन तूं आपला दायभाग माग!”

आपल्या मातेचें भाषण ऐकून राहुल धांवतधांवत बुद्धासमोर येऊन उभा राहिला. बुद्धगुरु आसनावरून उठून, न्यग्रोधारामाकडे चालता झाला. राहुलहि त्याच्या मागोमाग “बाबा, मला माझा दायभाग द्या, बाबा मला माझा दायभाग द्या,” असे ह्मणतह्मणत चालला. विहारांत पोहोंचल्यावर बुद्धानें सारिपुत्ताला बोलावून आणून सांगितलें, कीं, हा राहुल कुमार माझ्याकडून दायभाग मागत आहे, तेव्हां तूं याला प्रव्रज्या देऊन श्रामणेर [ज्याच्या वयाला वीस वर्षे पुरीं झालीं नसतील, त्याला भिक्षुसंघांत घेतां येत नाहीं; परंतु त्याला श्रामणेर करून एकाद्या भिक्षूपाशीं धर्मपठनार्थ ठेवितां येतें. भिक्षूला पुष्कळ नियम पाळावे लागतात. पण श्रामणेराला खालील दहाच नियम पाळावयाचे असतात:—

(१) प्राणघातापासून निवृत्ति; (२) अदत्तदानापासून, चोरीपासून निवृत्ति; (३) अब्रम्हचर्यापासून निवृत्ति; (३) असत्य भाषणापासून निवृत्ति; (५) मादकपदार्थापासून निवृत्ति; (६) मध्यान्हानंतर न जेवणें; (७) मनोविकार उद्दीपित करणारें नृत्य, गीत आणि वाद्य यांपासून निवृत्त होणें; (८) माला, गंध, अलंकार इत्यादिकांपासून निवृत्त होणें; (९) उंच आणि मौल्यवान बिछान्यांवर न निजणें; आणि (१०) सोनें व रुपें यांचें ग्रहण न करणें. या दहा नियमांनां श्रमणेराचीं शिक्षापदें ह्मणतात.] कर.”

सारिपुत्तानें बुद्धानें सांगितलेल्या विधीप्रमाणें राहुलाला श्रामणेर करून आपल्याजवळ ठेवून घेतलें. हें वर्तमान शुद्धोदनराजाला समजलें, तेव्हां तो न्यग्रोधविहारांत येऊन बुद्धाला ह्मणाला “भगवन्, तूं जेव्हां

अनुक्रमणिका

गृहत्याग केलास, तेव्हां मला अत्यंत दुःख झालें; पण माझ्या लहानग्या राहुलाला तूं प्रव्रज्या दिलीस, तेव्हां तर माझ्या दुःखाचा परमावधिच झाली असें मी समजतों! आतां तूं मला असा एक वर दे, कीं, कोणत्याहि तरुण मनुष्याला त्याच्या आईबापांच्या परवानगीवांचून भिक्षुसंघांत घेऊन नये किंवा श्रामणेर करूं नये."

तेव्हांपासून बुद्धानें आईबापांच्या परवानगीवांचून कोणत्याहि मुलाला भिक्षु किंवा श्रामणेर करूं नये, असा नियम केला.

[९]

## सुदत्त ऊर्फ अनाथपिंडिक श्रेष्ठी.

शाक्यांनां यथावकाश उपदेश करून बुद्धगुरु कपिलवस्तू हून मोठ्या भिक्षुसमुदायासहवर्तमान पुनः राजगृहाला आला. तेथें तो सीतवनामध्यें रहात होता. त्या वेळीं अनाथपिंडिक नांवानें प्रसिद्ध असलेला श्रावस्ति येथील श्रेष्ठी कांहीं कामानिमित्त राजगृहाला आपल्या मेहुण्याच्या (बायकोच्या भावाच्या) घरीं आला होता.

यावेळीं अनाथपिंडिकाचा मेहुणा मोठ्या गडबडींत होता. त्याच्या घरीं भोजनसमारंभाची तयारी चालली होती. तें पाहून अनाथपिंडिक त्याला ह्मणाला "मी तुमच्याकडे आलों असतां तुह्मी सर्व कामें टाकून माझें आदरातिथ्य प्रथमतः करीत होतां; पण आज मी पहातों, कीं, मोठ्या भोजनसमारंभाच्या तयारींत तुमचें चित्त गढून गेलें आहे. उद्यां तुमच्या घरीं लग्नसमारंभ होणार आहे, किंवा मोठा यज्ञ होणार आहे, किंवा बिंबिसारराजाला आणि त्याच्या सरदारांनां उद्यां तुह्मी आपल्या घरीं मेजवानी देणार आहां?"

तो ह्मणाला "तुह्मी ह्मणतां यांपैकीं कांहीं नाहीं. उद्यां मी माझ्या घरीं बुद्धाला आणि त्याच्या भिक्षुसंघाला आमंत्रण केलें आहे."

"बुद्ध ह्मणतां!" अनाथपिंडिक मोठ्यानें उद्गारला.

"होय बुद्ध ह्मणतों." अनाथपिंडिकाच्या मेहुण्यानें उत्तर दिलें.

अनाथपिंडिक ह्मणाला "बुद्ध हा शब्ददेखील या लोकीं दुर्लभ आहे! या वेळीं त्या भगवंताचें दर्शन घेणें शक्य आहे काय?"

अनाथपिंडिकाचा मेहुणा ह्मणाला "बुद्धाच्या दर्शनाला जावयाची ही वेळ नव्हे. उद्यां सकाळीं योग्य वेळीं तूं त्या भगवंताची भेट घे."

अनाथपिंडिकाला त्या रात्रीं निद्रा कशी ती आली नाहीं. पहांट होईपर्यंत तो बिछान्यावरून सकाळ झाली असें समजून तीनदां उठला. शेवटीं अरुणोदयाच्या पूर्वी उठून तो सीतवनाकडे चालता झाला. वाटेंत एकाएकीं मोठा अंधकार उद्भवला. अनाथपिंडिक घाबरून मागें सरण्याच्या बेतांत होता; इतक्यांत त्या प्रदेशांत रहाणारा सीवक नांवाचा यक्ष त्याला ह्मणाला "हे गृहपति, सीतवनाच्या बाजूला तुझें प्रत्येक पाऊल मोठें पुण्य प्रसवत आहे. ह्मणून मागें न सरतां पुढें हो!"

अनुक्रमणिका

हें यक्षाचें भाषण ऐकून अनाथपिंडिकाच्या मनाला धीर आला आणि त्याच्या दृष्टीसमोर आलेला अंधकार नष्ट झाला. अनाथपिंडिक सीतवनामध्यें पोहोंचला त्या वेळीं बुद्धगुरु पहांटेला उठून मोकळ्या जागेंत चंक्रमण करीत होता. अनाथपिंडिकाला पाहून तो एका आसनावर जाऊन बसला आणि 'सुदत्ता, इकडे ये,' असें ह्मणाला.

हें ऐकून अनाथपिंडिक चकित झाला. कांकीं, जरी त्याचें खरें नांव सुदत्त हें होतें, तरी त्याच्या आप्तइष्टांशिवाय इतरांनां तें क्वचित्‌च माहीत होतें. 'अनाथपिंडिक' या टोपणनांवानेंच तो प्रसिद्ध होता.

अनाथपिंडिक बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसला आणि ह्मणाला "भगवन्, आपण रात्रीं सुखानें झोंपलांत ना?"

बुद्ध ह्मणाला "जो ब्राह्मण कामसुखांत बद्ध होत नाहीं, ज्याच्या सर्व तृष्णा नष्ट झाल्या आहेत, व येणेंकरून ज्याचें मन शांत झालें आहे, तो सर्व काळ सुखानें झोंपतो."

तदनंतर बुद्धानें दानापासून फायदे, शीलापासून फायदे, स्वर्गलोकांतील सुख, कामोपभोगांत दोष आणि एकांतवासापासून फायदे इत्यादि गोष्टीसंबंधानें उपदेश केला, व जेव्हां अनाथपिंडिकाचें चित्त मृदु, मुदित आणि प्रसन्न झालेलें पाहिले, तेव्हां त्याला त्यानें चार आर्य सत्यांचा उपदेश केला.

तो ऐकून बौद्धधर्माच्या सत्यतेबद्दल अनाथपिंडिकाची खात्री झाली. तो बुद्धाला ह्मणाला "भगवन्! हा आपला धर्म अत्यंत सुंदर आहे. एकाद्या मनुष्यानें झांकलेली वस्तु उघड करून दाखवावी, किंवा डोळसांनां अंधारांत दिसावें ह्मणून मशाल धरावी, त्याप्रमाणें आपण आपल्या धर्माचें उत्तम स्पष्टीकरण केलें आहे. मी आजपासून माझ्या कुडींत प्राण असेपर्यंत आपणाला, आपल्या धर्माला आणि भिक्षुसंघाला शरण जात आहें. आपला उपासक आहें, या नात्यानें माझा आपण अंगीकार करावा. आतां उद्यां आपण भिक्षुसंघासहवर्तमान माझ्या अन्नदानाचें ग्रहण करावें."

बुद्धानें कांहींएक न बोलतांच आमंत्रण पत्करल्याचें चिन्ह दाखविलें. तें जाणून अनाथपिंडिक आसनावरून उठला आणि बुद्धाला वंदन करून आपल्या मेहुण्याच्या घरीं गेला.

अनाथपिंडिकाचा मेहुणा (हा राजगृहक श्रेष्ठी या नांवानें प्रसिद्ध होता.) अनाथपिंडिकानें बुद्धाला आमंत्रण दिल्याचें वर्तमान ऐकून त्याला ह्मणाला "तुह्मी या शहरांत परकी आहां, तेव्हां तुमच्यातर्फे उद्यांची सर्व सिद्धता मीच करितों."

दुसरेहि पुष्कळ शेटसावकार अनाथपिंडिकाचे मित्र होते. त्यांनीं देखील अनाथपिंडिकाला असाच आग्रह केला. खुद्द बिंबिसारराजानें अनाथपिंडिकाला बोलावून सांगितलें, कीं, "तुह्मी आमच्या शहरांत पाहुणे आहां, तेव्हां तुमच्यातर्फे उद्यां बुद्धाला आणि भिक्षुसंघाला आह्मीच अन्नदान देतों."

परंतु अनाथपिंडिकानें मोठ्या नम्रपणें कोणाचीहि मदत न स्वीकारतां मेहुण्याच्या घरीं आपल्या नोकरचाकरांच्या साहाय्यानें सर्व तयारी स्वतः केली, व दुसऱ्या दिवशीं मध्यान्हकालापूर्वी बुद्धाला आणि भिक्षुसंघाला बोलावून आणून आपल्या हातानें त्यांचें संतर्पण केलें.

अनुक्रमणिका

भोजनोत्तर बुद्धाजवळ एका कमी दर्ज्याच्या आसनावर बसून अनाथपिंडिक ह्मणाला "भगवन्, यंदांच्या चातुर्मास्यासाठीं आपण श्रावस्तीला यावें अशी माझी विनंति आहे."

बुद्ध ह्मणाला "हे गृहपति, तथागताला एकांतवासाचीच आवड असते."

अनाथपिंडिक ह्मणाला "होय, तें मी जाणत आहें!"

अनाथपिंडिकाचे राजगृह आणि श्रावस्ति या दोन शहरांच्या दरम्यान वाटेंतील गांवांत आणि लहानसान शहरांत पुष्कळ मित्र होते. श्रावस्तीला जात असतां ज्याज्या ठिकाणीं त्यानें मुक्काम केला, त्यात्या ठिकाणीं आपल्या मित्रांनां बुद्धासाठीं रम्य प्रदेशांत विहार वगैरे बांधून बुद्धाच्या रहाण्याची सोय करण्याविषयीं त्यानें उपदेश केला; व श्रावस्तीला पोहोंचल्यावर बुद्धाला रहाण्याला योग्य स्थल तो पाहूं लागला.

कोसलदेशाच्या राजवंशांतील जेत नांवाच्या राजकुमाराचें श्रावस्तीजवळ एक रमणीय उद्यान होतें. अनाथपिंडिकाला या उद्यानाशिवाय दुसरी प्रशस्त जागा श्रावस्तीच्या आसपास सांपडली नाहीं. तेव्हां तो जेत राजकुमाराजवळ जाऊन त्याला ह्मणाला "बुद्ध आमच्या शहरांत चातुर्मास्यासाठीं येणार आहेत. त्यांनां रहाण्याकरितां शहराच्या आसपास मीं पुष्कळ जागा पाहिल्या; परंतु आपल्या उद्यानाशिवाय मला एकहि जागा पसंत पडली नाहीं. तेव्हां आपण मेहरबानी करून विहार बांधण्यासाठीं मला आपलें उद्यान द्यावें."

जेत ह्मणाला "हे गृहपति, सोन्याचें नाणें माझ्या उद्यानांत पसरलें, तर तेवढी किंमत घेऊन मी तुह्माला माझें उद्यान देईन; एरवीं तें तुह्माला मिळण्यासारखें नाहीं."

जेताच्या ह्मणण्याचा रोख असा होता, कीं, कितीहि किंमत दिली, तरी आपलें उद्यान विकण्याचा आपला उद्देश नाहीं; पण अनाथपिंडिकानें त्याचा शब्दशः अर्थ केला.

आपल्या घरीं येऊन दोनचार सोन्याच्या नाण्यांच्या गाड्या भरून अनाथपिंडिकानें आपल्या नोकरांनां जेताच्या उद्यानांत न्यावयाला लाविल्या व तें नाणें तेथें जमिनीवर पसरावयाला आरंभ केला. हें वर्तमान जेताला समजलें, तेव्हां तो तेथें आला व अनाथपिंडिकाला ह्मणाला "तुह्मीं कितीहि द्रव्य दिलें, तरी हें उद्यान मी तुह्माला देणार नाहीं!"

अनाथपिंडिक ह्मणाला "आपण राजकुलामध्यें जन्मलां आहां. तेव्हां आपले वचन माघारें घेणें आपणाला लज्जास्पद होईल."

जेत ह्मणाला "माझ्या ह्मणण्याचा उद्देश हा होता, कीं, जर तुह्मीं सोनें पसरलें, तर देखील तेवढी किंमत घेऊन माझें उद्यान विकण्यास मी तयार नाहीं!"

त्या दोघांचाहि विवाद आपसांमध्यें तुटण्यासारखा नव्हता. तेव्हां त्यांनीं आपलें ह्मणणें श्रावस्तींतील न्यायाधीशमंडलासमोर मांडलें. सर्व न्यायाधीशांनीं एकमतानें अनाथपिंडिकाच्याच तर्फे न्याय दिला. राजकुमारानें ज्याअर्थी सोन्याचें नाणें जमिनीवर पसरलें तर तेवढी जमीन मिळेल असें ह्मटलें, त्याअर्थी

अनुक्रमणिका

त्यानें आपल्या जमिनीची किंमत ठरविली असें ह्मटलें पाहिजे, व ही किंमत घेऊन त्यानें आपलें उद्यान अनाथपिंडिकाला दिलें पाहिजे, असा त्या न्यायाधीशांनीं निवाडा केला.

इकडे सोन्याचें नाणें जेतवनामध्यें पसरण्याचें काम अनाथपिंडिकाच्या विश्वासु नोकरांनीं पुढें चालविलेंच होतें. त्यांनीं बराच भाग नाण्यानें आच्छादिला. इतक्यांत जेत अनाथपिंडिकासह तेथें आला, आणि अनाथपिंडिकाला ह्मणाला "एवढीच जमीन मी तुह्माला विकत देतों, राहिलेली मी विहार बांधण्यासाठीं दान देतों."

अनाथपिंडिकानें असा विचार केला, कीं, जेतासारख्या राजकुमाराची बौद्धधर्माच्या प्रसाराला फार मदत होणार आहे. तेव्हां त्याच्या या देणगीचा अव्हेर करतां कामा नये. तो जेताला ह्मणाला "ठीक आहे. या राहिलेल्या जमिनीमध्यें आपणाला बुद्धासाठी जें कांहीं करावयाचें असेल तें खुशाल करा."

जेतानें राहिलेल्या जागेंत एक कोठडी बांधिली व अनाथपिंडिकानें पुष्कळ कोठड्या, पुष्कळ चंक्रमण, पुष्कळ भोजनशाळा, पुष्कळ विहार, व पुष्कळ स्नानशाळा बांधिल्या.

बुद्धगुरु राजगृहांतून निघून भिक्षुसंघासह संचार करीतकरीत श्रावस्तीला आला. तेथें तो जेतवनामध्यें अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात असतां अनाथपिंडिकानें येऊन त्याला भिक्षुसंघासहवर्तमान आपल्या घरीं आमंत्रण केलें.

दुसऱ्या दिवशीं स्वतः बुद्धाला आणि भिक्षुसंघाला संतृप्त केल्यावर अनाथपिंडिकानें जेतवनविहाराची पुढें व्यवस्था काय करावी, असा बुद्धाला प्रश्न केला. बुद्ध ह्मणाला "हे गृहपति, हा विहार तूं आगतानागत भिक्षुसंघाला दान दे."

अनाथपिंडिकानें जेतवनाचें यथाविधि दान केलें; तेव्हां बुद्धानें त्याचें याप्रमाणें अभिनंदन केलें:— "विहारदान हें सर्वांत श्रेष्ठ आहे. कांकीं, त्याच्यायोगें भिक्षूच्या ध्यानाला पाऊस, पाणी, ऊन, हिंसक पशु, वादळ इत्यादिकांपासून अंतराय होत नाहीं. ह्मणून सुज्ञ उपासकानें यथाशक्ति विहार करवून तेथें विद्वान् भिक्षूंनां राहण्याची सोय करावी, व त्यांनां यथाशक्ति अन्नदान द्यावें."

## [१०]
## विशाखा मिगारमाता.

श्रावस्तीपासून सात योजनांच्या अंतरावर साकेत नांवाचें एक मोठें शहर वसलें होतें. तें ज्यानें वसविलें, त्या धनंजयश्रेष्ठीची त्या काळच्या नवकोटनारायणांमध्यें गणना होत असे. विशाखा नांवाची त्याला एक अत्यंत सुस्वरूप कन्या होती. ती वयांत आल्यावर श्रावस्ति येथील मिगारश्रेष्ठीच्या पूर्णवर्धन नांवाच्या पुत्राशीं तिचा विवाह ठरला. साकेत व श्रावस्ति या दोन्ही शहरांमध्यें उभय पक्षांकडून हा विवाहसमारंभ मोठ्या थाटानें पार पडला.

विवाहविधि आटोपून धनंजयश्रेष्ठी आपल्या कन्येबरोबर श्रावस्तीला आला, तेव्हां त्यानें आपल्या ज्ञातींतील आठ कुलीन गृहस्थांनां बोलावून आणून व्याह्यांसमोर असें सांगितलें, कीं, जर माझ्या मुलीचा कांहीं दोष दिसून आला, तर त्याची तुह्मी नीट चौकशी करावी."

अनुक्रमणिका

धनंजयश्रेष्ठी मुलीला सासरीं ठेवून साकेताला गेल्यावर एके दिवशी मिगारश्रेष्ठीनें निर्ग्रंथ श्रमणांला (नग्न संन्याशांला) आपल्या घरीं मुलाच्या लग्नसमारंभानिमित्त भोजनाला आमंत्रण केलें. (मिगारश्रेष्ठी निर्ग्रंथांचा उपासक होता.) त्यांच्यासाठीं त्यानें पाणी न घालतां दुधाची खीर करविली होती. निर्ग्रंथ येऊन आपापल्या आसनावर बसल्यावर मिगारश्रेष्ठीनें स्वतः आदरातिथ्य करून त्यांचें संतर्पण केलें, व त्यांचें भोजन झाल्यावर आपल्या सुनेला निरोप पाठविला, कीं, आपल्या घरीं अर्हन्त आले आहेत, त्यांनां नमस्कार करण्यास यावें.

अर्हन्त हा शब्द कानीं पडतांच विशाखेला फार आनंद झाला. कारण, लहानपणापासून ती बुद्धाची उपासिका होती, व बुद्ध आणि बौद्धभिक्षु यांशिवाय इतरांनां अर्हन्त ह्मणतात, हें तिला माहीत नव्हतें. घाईघाईनें पोशाख करून ती अंतःपुरांतून आपला सासरा व त्याचे ते अर्हन्त ज्या दिवाणखान्यांत बसले होते, तेथें गेली. पण त्या नग्न श्रमणांला पाहून ती फारच कंटाळली व आपल्या सासऱ्याला ह्मणाली "मला आपण येथें कशाला बोलाविलें? असले नागडे उघडे लोक कधीं अर्हन्त होत असतात काय? अशा निर्लज्ज्ञांनां आह्मी अर्हन्त ह्मणत नसतों!" असे उद्गार काढून विशाखा तेथून चालती झाली.

इकडे त्या श्रमणांला या नववधूनें आपला अपमान केल्याबद्दल अतिशय वाईट वाटलें, व ते एकदम मिगारश्रेष्ठीला ह्मणाले "हे गृहपति, ही अवदसा तूं कोठून आणलीस? जणूं काय तुझ्या मुलाला जगामध्यें दुसरी मुलगी मिळालीच नसती!"

मिगार ह्मणाला "अजून तिचा पोरस्वभाव आहे. आतां हळुहळू सुधारत जाईल. तिच्या या उद्धट आचरणाबद्दल आपण तिला क्षमा करावी."

मिगारानें कशीबशी निर्ग्रंथांची समजूत घालून त्यांना वाटेला लावलें, व स्वतः दुधाच्या खिरीनें भरलेलें ताट घेऊन तो जेवावयाला बसला. विशाखा त्याला पंख्यानें वारा घालीत एका बाजूला उभी राहिली होती. इतक्यांत दरवाज्यात एक बौद्धभिक्षु येऊन उभा राहिला. मिगार बसलेल्या ठिकाणाहून त्या भिक्षूला पहात होता. तथापि त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष्य करून तो आपल्या भोजनांत गढून गेला होता. तेव्हां विशाखा तेथूनच त्या भिक्षूला ह्मणाली "आर्य, माझा सासरा जुनेंपुराणें खात आहे. तुह्मी येथें तिष्ठत न रहातां पुढें व्हा!"

विशाखेचे हे शब्द कानी पडतांच मिगार अतिशय संतापानें आपल्या नोकरांनां ह्मणाला "हा पायस येथून घेऊन जा, व या पोरीला माझ्या घरांतून याच क्षणीं हांकून द्या. ही इतकी उन्मत्त झाली आहे, कीं, माझ्यासमोर माझा उपमर्द करण्याला हिला लाज वाटत नाहीं!"

मिगार जरी संतापला होता, तरी विशाखेच्या अंगाला हात लावण्याची त्याला किंवा त्याच्या नोकरांनां छाती झाली नाहीं. ती शांतपणें आपल्या सासऱ्याला ह्मणाली "आपण माझ्यावर इतके रागावूं नये. मी कांहीं विकत आणलेली दासी नाहीं. मी आपल्यासारख्याच थोर कुलांत जन्मलेली आहें. प्रथमतः माझा अपराध माझ्या पदरांत घाला, आणि मग मला येथून जावयाला सांगा. माझ्यावर विनाकारण तोहमत येऊं नये ह्मणून माझ्या पित्यानें येथें आठ कुलीन गृहस्थांनां माझ्या अपराधाची नीट चौकशी करण्याविषयीं सांगून ठेविलें आहे. तेव्हां त्यांच्यासमोर माझा दोष काय आहे, हें मला सांगा. जर माझा अपराध आहे असें ठरलें, तर मी खुषीनें येथून निघून जाईन."

अनुक्रमणिका

हें सुनेचें स्पष्ट बोलणें ऐकून मिगाराचा भडकलेला राग जरा दबला गेला. त्यानें त्या आठ कुलीन गृहस्थांनां ताबडतोब बोलावून आणलें, आणि आपल्या सुनेचा गुन्हा त्यांनां सांगून तो ह्मणाला "हिला माझ्या घरांतून आजच्या आज घालवून द्या."

ते गृहस्थ ह्मणाले "काय गे विशाखे! आपला सासरा घाणेरडें अन्न खातो असें तूं ह्मटलें आहेस काय?"

विशाखा ह्मणाली "माझा सासरा जुन्या पुण्यावर निर्वाह करतो, नवीन पुण्य संपादन करीत नाहीं, असा माझ्या ह्मणण्याचा अर्थ होता, ह्मणून मी तो जुनें खातो असें ह्मटलें आहे."

ते गृहस्थ मिगाराला ह्मणाले "हें ह्मणणे मोठ्या शहाणपणाचें दिसतें. एवढ्यानें विशाखेला घरांतून हांकून देणें तुह्माला उचित नाहीं."

आणखीहि विशाखेचे कांहीं बारीकसारीक दोष मिगारानें त्या गृहस्थांनां सांगितले, पण चौकशीअंतीं ते दोष नसून मिगाराचा केवळ गैरसमज झाला होता असें दिसून आलें. तेव्हां मिगार ह्मणाला "पण इचा बाप जेव्हां येथें आला तेव्हां आमच्यासमोर त्यानें हिला दहा नियम शिकविले. आह्मांला तर ते निवळ वेडेपणाचे दिसतात. मग हिला त्यांचा अर्थ काय समजला असेल तो असो!"

ते गृहस्थ ह्मणाले "काय गे विशाखे! धनंजयश्रेष्ठीनें तुला कोणते नियम शिकविले, व त्यांचा अर्थ काय?"

विशाखा ह्मणाली "आंतली आग बाहेर नेऊं नये, हा पहिला नियम माझ्या पित्यानें मला शिकविला. त्याचा अर्थ असा आहे, कीं, घरांत कांहीं भांडणें वगैरे झालीं, तर त्यांची वार्ता बाहेर पसरूं नये. बाहेरची आग आंत आणूं नये, हा दुसरा नियम. ह्मणजे शेजारीपाजारी, सासुसासऱ्यांचे किंवा जावानणदांचे अवगुण बोलत असले, तर तें वर्तमान आणून घरांत सोडूं नये, देणारालाच द्यावें, हा तिसरा नियम; व न देणाराला देऊं नये, हा चवथा नियम. यांचा अर्थ हा, कीं, जो कोणी घरांतील वस्तु उसनी दिली असतां परत करतो त्यालाच ती द्यावी; जो परत देत नाहीं त्याला देऊं नये. देणारा किंवा न देणारा असला तरी द्यावें, हा पांचवा नियम आपल्या जवळच्या आप्ताला लागू आहे. ह्मणजे आपल्या आप्तवर्गांत कोणी दरिद्री असला, व उसना घेतलेला जिन्नस परत करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं नसलें, तरी देखील तो त्याला द्यावा. सुखानें बसावें हा सहावा नियम, व सुखानें जेवावें हा सातवा नियम, आणि सुखानें निजावें हा आठवा नियम. यांचा अर्थ असा, कीं, वडील माणसें ज्या ठिकाणीं वारंवार येतात त्या ठिकाणीं बसूं नये; त्यांचें जेवण होण्यापूर्वी आपण जेवूं नये; नोकरांचाकरांचा समाचार घेऊन मग जेवावें; वडील माणसें निजण्यापूर्वी आपण निजूं नये, त्यांची व्यवस्था लावून मग निजावें. अग्नीची पूजा करावी, हा नववा नियम. पतिव्रता स्त्रीला पति अग्नीसारखा पूज्य असावा, व ब्राह्मण जसे अग्नीची परिचर्या करतात तशी तिनें आपल्या पतीची शुश्रूषा करावी, हा या नियमाचा अर्थ आहे. गृहदेवतांची पूजा करावी, हा दहावा नियम. ह्मणजे सासूसासरे इत्यादि वडील माणसांनां गृहदेवता समजून त्यांची सेवा करावी."

विशाखेनें आपल्या पित्यानें घालून दिलेल्या दहा नियमांची याप्रमाणें फोड केल्यावर त्या आठ कुलीन गृहस्थांनीं तिची फारच स्तुति केली, व ते मिगारश्रेष्ठीला ह्मणाले "आपण रागाच्या भरांत या शहाण्या

अनुक्रमणिका

मुलीला घरांतून घालवून देण्यास तयार झालां आहां; पण आह्मी ही आपल्या घरीं लक्ष्मीच आहे असें समजतों."

मिगारानें आपली चूक कबूल केली व विशाखेची क्षमा मागितली.

विशाखा ह्मणाली "आपण वडीलच आहांत, तेव्हां क्षमा करण्यासारखा आपला मोठा अपराध आहे असें मी समजत नाहीं; परंतु एका गोष्टीमध्यें मात्र आपलें व माझें पटावयाचें नाहीं, असें वाटतें. मी बुद्धाची उपासिका आहें, व आपण निर्ग्रंथांचे उपासक आहांत. तेव्हां बौद्धभिक्षु आमच्या घरीं भिक्षेला आले असतां तें आपणाला खपावयाचें नाहीं, व निर्ग्रंथ आले असतां त्यांनां मी नमस्कार करणार नाहीं. या बाबतींत कांहीं तडजोड निघाल्याशिवाय माझ्या येथें राहण्यानें आपणाला किंवा मला सुख होणार नाहीं."

मिगार ह्मणाला "तुझ्या इच्छेप्रमाणें वागण्याला कोणतीच हरकत नाहीं. माझ्या घरीं पुष्कळ धनदौलत आहे. बौद्धभिक्षूंनां आमंत्रण करून तूं जेवावयाला घातलेंस तर त्याच्यायोगें मी दरिद्री होईन, असा प्रकार मुळींच नाहीं. मी माझ्या निर्ग्रंथांनां अन्नदान करीन, व तूं यथावकाश बौद्धभिक्षूंनां अन्नवस्त्रादिकांचें दान कर."

विशाखेनें दुसऱ्याच दिवशीं बुद्धाला आणि भिक्षुसंघाला निमंत्रण केलें. हें वर्तमान निर्ग्रंथांनां समजतांच त्यांनीं ताबडतोब मिगारश्रेष्ठीला गांठलें, आणि या गोष्टीचा खुलासा विचारला.

मिगार ह्मणाला "माझी सून कांहीं लहानसान कुळांतली नव्हे. तिला दासीप्रमाणें वागवितां येणें शक्य नाहीं. माझ्या घरांत जर सुख नांदावयाचें असेल, तर माझ्या सुनेला मीं योग्य स्वातंत्र्य दिलेंच पाहिजे."

निर्ग्रंथ ह्मणाले "बौद्धभिक्षूंनां तुझ्या घरीं यावयाला जर तुला मनाई करतां येण्यासारखी नसेल, तर निदान तूं त्यांच्या दर्शनाला तरी जाऊं नकोस. बुद्ध मोठा मायावी आहे; तो लोकांनां मोह पाडून आपल्या पंथांत ओढून नेतो, असें आह्मीं ऐकिलें आहे. तेव्हां विशाखेनें कितीहि आग्रह केला तरी तूं त्याच्या दर्शनाला जाऊं नकोस."

मिगारानें बुद्धाची किंवा भिक्षूंची भेट न घेण्याचें अभिवचन दिल्यावर निर्ग्रंथ आपल्या आश्रमांत गेले.

दुसऱ्या दिवशीं विशाखेनें जेवणाची सर्व तयारी करून बुद्धाला आणि भिक्षूंनां बोलावून मोठ्या आदरानें त्यांचें संतर्पण केलें. भोजनोत्तर बुद्धगुरूला विशाखेनें आपणाला व आपल्या घरांतील मंडळीला धर्मोपदेश करावयाची विनंति केली. पण हा उपदेश ऐकावयाला मिगार येईना. विशाखेनें फारच आग्रह केल्यावर पडद्याच्या आड बसून धर्मोपदेश ऐकण्याला तो कबूल झाला. बुद्धाचें तोंड मात्र त्याला पहावयाचें नव्हतें! विशाखेनें एका बाजूला पडदा बांधून आपल्या सासऱ्याला बसण्याची सोय केली.

सर्व मंडळी जमल्यावर बुद्धानें आपल्या अमृततुल्य वाणीनें त्यांनां उपदेश केला. दान, शील, भावना इत्यादि गोष्टींसंबंधानें बुद्धानें केलेला बोध ऐकून मिगारश्रेष्ठीचा कंठ दाटून आला. असा थोर सत्पुरुष आपणापाशीं असतां आपण मूर्खपणानें त्याचें दर्शन घेण्याला तयार नाहीं याचा त्याला अत्यंत पश्चाताप

झाला, व एकदम पडदा दूर सारून धांवत येऊन त्यानें बुद्धाच्या पायांवर डोकें ठेविलें. तो ह्मणाला “भगवन्! माझ्या अपराधांची क्षमा करा. आजपासून मी आपला उपासक झालों आहें. या बाबतींत विशाखा मला मातेसमान आहे. ती जर माझ्या घरीं आली नसती, तर आपली अमृतवाणी माझ्या कानीं पडली नसती. ह्मणून आजपासून तिला मी माझी आईच ह्मणत जाईन.”

तेव्हांपासून विशाखेला मिगारमाता हे नांव पडलें. श्रावस्तींतील बहुतेक लोक मिगारमाता या नांवानेंच तिला ओळखीत असत. तिनें बुद्धाला, व भिक्षुसंघाला रहाण्यासाठीं पूर्वाराम नांवाच्या उद्यानामध्यें एक प्रासाद बांधला होता. त्याला ‘मिगारमातेचा प्रासाद’ असें ह्मणत असत. श्रावस्तीमध्यें विशाखेच्या शहाणपणाची आणि नीतिमत्तेची कीर्ति तेव्हांच पसरली; आणि रावापासून रंकापर्यंत तिचा बहुमान होऊं लागला. मंगलकार्यांत आणि उत्सवांत विशाखेला पहिल्यानें आमंत्रण देण्याची वहिवाट पडली. श्रावस्तींतील बौद्ध उपासिकांत ती प्रमुख होती. आगन्तुक व आजारी भिक्षूंच्या सोईकडे ती फार लक्ष्य पुरवीत असे.

[११]

## देवदत्त

शाक्यांचें राज्य महाजनसत्ताक होतें. निरनिराळ्या गांवच्या महाजन लोकांनां राजे असें ह्मणत असत. अशा प्रकारचे सरासरीं सातशें राजे शाक्यांच्या राज्यांत होते. ते आपसांमध्यें एक अध्यक्ष निवडीत असत, व त्याला महाराजा असें ह्मणत. या महाराजाच्या हातीं अंतर्गत व्यवस्थेसंबंधानें कांहीं अधिकार असत; परंतु परराष्ट्रांशीं लढाई करणें किंवा तह करणें हें काम महाजनमंडल बहुमतानें करीत असे. शाक्यराजाच्या सभागृहाला ‘संथागार’ असें ह्मणत असत. याच धर्तीवर चाललेलीं आणखीहि कांहीं राज्यें बुद्धकालीं मध्यदेशांत होतीं.

एका वेळीं शाक्यांचें अध्यक्षस्थान भद्दिय नांवाच्या तरुण शाक्याला मिळालें होतें. त्या वेळीं शाक्यराजांच्या कुळांतील बऱ्याच तरुणांनीं बुद्धाच्या भिक्षुसंघांत प्रवेश केला; परंतु महानाम शाक्याच्या कुळांतील कोणीच भिक्षु झाला नव्हता. तेव्हां तो आपला धाकटा भाऊ अनुरुद्ध याला ह्मणाला “सिद्धार्थानें बुद्ध होऊन सद्धर्माची पताका जिकडे तिकडे फडकाविली आहे, व त्यायोगें शाक्यकुलाची मोठीच कीर्ति झाली आहे. आजला इतर देशांतील थोर कुळांतील लोक भिक्षु होऊन शाक्यपुत्रीय श्रमण ह्मणवून घेण्यांत धन्यता मानीत आहेत; पण आमच्याच शाक्यांपैकीं कांहीं थोडी मंडळी तथागताच्या धर्माची उपेक्षा करीत आहे, हें आह्मांला उचित नाहीं. आतां आमच्या कुळांत आह्मी दोघेच कायते भिक्षु होण्याला योग्य आहों. जर प्रपंचाचा भार तूं आपल्या शिरावर घ्यावयाला तयार असशील, तर मी भिक्षु होऊन बौद्धधर्माचा प्रसार करीन.”

अनुरुद्धाला प्रपंचाच्या भानगडी काय होत्या, हें मुळींच माहीत नव्हतें. लहानपणींच वडील वारल्यामुळें आईनें त्याचे फार लाड केले, आणि त्याला व्यावहारिक शिक्षण जसें मिळावयाला पाहिजे होतें तसें मिळालें नाहीं. त्यानें आपल्या वडील भावाला प्रपंचाच्या भानगडी काय आहेत, असा प्रश्न केल्यावर महानामानें त्याला सर्व सविस्तर माहिती सांगितली, व तो ह्मणाला “शीत आणि उष्ण, ऊन आणि वारा यांची परवा न करितां गृहस्थानें आपल्या कामांत दक्ष असलें पाहिजे. जो गृहस्थ विषयसुखाच्या नादीं लागून आपल्या गृहकृत्याची उपेक्षा करील त्यावर दारिद्र्यपंकांत लोळण्याची पाळी आल्यावांचून रहाणार नाहीं.”

अनुक्रमणिका

अनुरुद्ध ह्मणाला “माझ्यानें या भानगडी व्हावयाच्या नाहींत. लहानपणापासून मी कधींहि शेतांत गेलों नाहीं. तेव्हां शेत पेरतात कसें आणि तें कापतात कसें, हें देखील मला माहीत नाहीं. घोड्यावर बसणें, शिकार खेळणें किंवा तिरंदाजी करणें हीं कामें सोडून इतर कामांत मीं कधींहि मन घातलें नाहीं, व यापुढें माझ्यानें घरगुती कामें होतील असें मला वाटत नाहीं. असलीं कामें करण्यापेक्षां भिक्षु होणेंच मला अधिक इष्ट वाटतें.”

अनुरुद्धाचा भिक्षु होण्याचा बेत—नव्हे निश्चय—ठरला. पण त्याला त्याच्या आईची परवानगी मिळेना. अनुरुद्धानें जेव्हां अतिशय हट्ट धरला, तेव्हां ती त्याला ह्मणाली “सध्यांचा आमचा महाराजा भद्दिय हा तुझा बालमित्र आहे. जर तो तुझ्याबरोबर भिक्षु होण्याला तयार असेल, तर मी तुला परवानगी देतें.”

भद्दिय एवढा मोठा अधिकार सोडून भिक्षु होणार नाही अशी अनुरुद्धाच्या आईला खात्री वाटत होती. ह्मणून तिनें आपल्या मुलाची समजूत घालण्यासाठीं ही युक्ति योजिली.

अनुरुद्ध भद्दियाजवळ जाऊन ह्मणाला “मित्रा, बुद्धाच्या भिक्षुसंघांत प्रवेश करण्याची मला उत्कंठा लागली आहे. पण माझ्या आईची मला परवानगी मिळत नाहीं. तूं जर माझ्या बरोबर भिक्षु होशील, तरच माझी आई मला परवानगी द्यावयाला तयार आहे.”

भद्दिय ह्मणाला “अनुरुद्धा! तूं आणखी सात वर्षे थांब. या अवधींत मला ज्या कांहीं आमच्या राज्यांत सुधारणा करणें इष्ट वाटत आहे, त्या करून मी मोकळा होतो. मग आपण दोघेहि भिक्षु होऊं.”

परंतु अनुरुद्धाला सात दिवस देखील सात वर्षांसारखे वाटत होते. इतका तो भिक्षु होण्यासाठीं उत्सुक झाला होता. त्याच्या अत्यंत आग्रहामुळें एका आठवड्याच्या आंत राज्यकारभार दुसऱ्यावर सोंपवून भिक्षु होण्याला भद्दिय कबूल झाला. एका आठवड्यानंतर राज्यकारभार आपल्या बंधूंवर सोंपवून तो कोणाला नकळत अनुरुद्धाबरोबर बुद्धाच्या भेटीला जाण्यास तयार झाला.

त्यावेळीं बुद्धगुरु अनुप्रिया नांवाच्या मल्लाच्या गांवीं रहात होता. भद्दिय आपल्या सेनेसहवर्तमान उद्यानांत गेला असतां सेनेला तेथेंच ठेवून अनुरुद्धाबरोबर अनुप्रियेला जाण्याचा त्यानें बेत केला. आनंद, भृगु, किंबिल, देवदत्त आणि उपालि न्हावी, हे पांचजण भद्दियाबरोबर जावयाला तयार झाले. कांहीं अंतरावर गेल्यावर त्या शाक्यकुमारांनीं आपले अलंकार एका उत्तरीय वस्त्रांत बांधून उपालीच्या स्वाधीन केले आणि ते त्याला ह्मणाले “उपालि, आतां यापुढें तूं आमच्याबरोबर येऊं नकोस. हे अलंकार विकून सुखानें आपली उपजीविका कर.”

उपालींनें विचार केला, कीं, “जर मी हे अलंकार घेऊन माघारा फिरलों, तर यानेंच भद्दियादिकांचा घात केला, अशा समजुतीनें शाक्य राजे आपणाला फांशी देतील. तेव्हां घरी न जातां यांच्याबरोबरच पुढें जाणें चांगलें.” त्यानें शाक्यकुमारांनीं दिलेले अलंकार एका झाडाला टांगले व ‘जो पाहील तो घेऊन जावो’ असे उद्गार काढून तो शाक्यकुमारांबरोबर अनुप्रिया गांवाला आला.

भद्दियादिक शाक्यांनीं बुद्धाची भेट घेऊन आपणांला भिक्षुसंघांत घेण्याची विनंति केली व ती बुद्धानें मान्य केल्यावर ते ह्मणाले “भगवन्, प्रथमतः आमच्या या उपालि न्हाव्याला प्रव्रज्या द्या. तो आमचा

अनुक्रमणिका

हितकर्ता मित्र असून मोठा बुद्धिमान् आहे. त्याला आपण प्रथम भिक्षु केलें ह्मणजे त्याच्यामागून झालेले भिक्षु या नात्यानें आह्मांला त्याला वंदन करावें लागेल, व आह्मी थोर कुलांत जन्मलों याबद्दल आह्मांला गर्व वाटणार नाहीं."

बुद्धानें त्यांची विनंति मान्य करून प्रथमतः उपालीला प्रव्रज्या दिली. उपाली पुढें मोठा विनयधर (विनय ग्रंथांमध्यें कुशल) झाला. अनुरुद्धाला दिव्य दृष्टीचा लाभ झाला. आनंद बुद्धाची शुश्रूषा करणाऱ्या भिक्षूंत प्रमुख झाला. पण देवदत्त लौकिकसिद्धीच्या मागें लागला.

बुद्धगुरु एका कालीं कौशांबी नगरीमध्यें घोषितारामांत रहात होता. तेथें देवदत्ताच्या मनांत असा विकल्प आला, कीं, "मी एकाद्या राजकुमाराला प्रसन्न करून मोठें नांव मिळवीन."

तो कौशांबीहून एकटाच राजगृहाला आला, व तेथें बिंबिसारराजाच्या अजातशत्रु कुमाराला योगसिद्धीचा चमत्कार दाखवून त्यानें वश केलें. राजगृहाला आल्यावर बुद्धगुरूला असें वर्तमान समजलें, कीं, "देवदत्त अजातशत्रूपासून पुष्कळ लाभसत्कार मिळवित आहे." तेव्हां तो ह्मणाला "भिक्षुहो, देवदत्त खोट्या मार्गाला लागला आहे. केळीचें फळ केळीचा नाश करतें; वेळूचें फळ वेळूचा नाश करतें; आणि लौकिकसिद्धीच्या योगें मिळविलेला लाभ मूर्ख मनुष्याचा नाश करतो."

एके दिवशीं बुद्धगुरु मोठ्या सभेंत धर्मोपदेश करीत होता. त्या वेळीं देवदत्त बुद्धाला वंदन करून ह्मणाला "भगवन्, आतां आपण वृद्ध झालां आहां, तेव्हां भिक्षुसंघाचें नायकत्व माझ्याकडे देऊन आपण शांतपणें कालक्रमणा करावी."

बुद्धानें ही गोष्ट नाकबूल केली. तो ह्मणाला "देवदत्ता, सारिपुत्तमोग्गल्लानांसारख्या समर्थ श्रावकांच्या हातीं देखील मीं भिक्षुसंघाचा भार सोंपविलां नाहीं. तूं तर या कामीं अगदींच नालायक आहेस; तेव्हां तुला भिक्षुसंघाचा पुढारी कसें करतां येईल?"

बुद्धानें आपणाला पुढारी होण्यास नालायक ठरविलें, याजबद्दल देवदत्ताला अत्यंत विषाद वाटला. आतां बुद्धाचा सूड उगवण्यापलीकडे दुसरा विचार त्याच्या मनामध्यें राहिला नाहीं.

एके दिवशीं अजातशत्रूला भेटून तो त्याला ह्मणाला "हे राजपुत्र, पूर्वीप्रमाणें आजकालचीं माणसें दीर्घायुषी होत नसतात. कधीं कोणाला मरण येईल, याचा नेम नसतो. तेव्हां बापाच्या पूर्वीच राज्यसुखाचा उपभोग घेतल्यावांचून तुला मरण येण्याचा संभव आहे. ह्मणून मी ह्मणतों, कीं, बिंबिसाराला मारून तूं राजा हो, व बुद्धाला मारून मी बुद्ध होतों."

अजातशत्रूला आपल्या गुरूची ही युक्ति पसंत पडली, व नागवी तलवार हातांत घेऊन तो आपल्या पित्याला मारण्यासाठीं अंतःपुरांत शिरला. तेथें बिंबिसाराच्या शिपायांनीं त्याला पकडलें, व आपल्या धन्यासमोर नेऊन उभें केलें. बिंबिसार ह्मणाला "मुला, तूं हें अघोर कृत्य करावयाला कां सज्ञ झालास?"

अजातशत्रु ह्मणाला "मी राज्य करावयाला उत्सुक झाल्यामुळे आपणावर तलवार उगारावयाला सिद्ध झालों, याची मला क्षमा असावी."

अनुक्रमणिका

बिंबिसारराजानें ताबडतोब आपल्या मंत्रिमंडळाला बोलावून आणून त्यांच्यासमक्ष राज्यकारभार अजातशत्रूच्या हवालीं केला. अजातशत्रूनें कांहीं दिवसानंतर आपल्या पित्याला कैदेंत टाकून उपवासानें ठार मारिलें.

याप्रमाणें अजातशत्रूला राज्याचा संपूर्ण अधिकार मिळाल्यावर देवदत्त त्याला ह्मणाला "आतां तूं मला मदत केली पाहिजेस. मारेकऱ्यांनां पाठवून तूं जर बुद्धाचा प्राण घेशील, तर मी लवकरच बुद्ध होईन."

अजातशत्रूनें देवदत्ताच्या सांगण्याप्रमाणें कांहीं मारेकरी पाठविले; पण बुद्धाला न मारतां उलट ते त्याचे शिष्य होऊन राहिले. तेव्हां देवदत्ताला अतिशय चीड आली व स्वतः बुद्धाला मारण्याचा त्यानें निश्चय केला.

एके दिवशीं बुद्धगुरु गृध्रकूट पर्वताच्या सावलींत चंक्रमण करीत होता. ही संधि पाहून देवदत्त जवळच्या टेंकडीवर चढला, व तेथून त्यानें एक मोठा दगड बुद्धावर ढकलून दिला. खडकावर आदळून वाटेंत त्या दगडाचे तुकडेतुकडे होऊन गेले, पण त्याची एक चीप बुद्धाच्या पायांत शिरली, व मोठी जखम झाली. बुद्धगुरु वरती देवदत्ताकडे पाहून ह्मणाला "खून करण्याच्या विचारानें, मुर्खा! तूं जें हें दुष्टकृत्य केलेंस, त्याच्यायोगें तूं मोठ्या पापाचा वांटेकरी झाला आहेस!"

बुद्धाला देवदत्तानें जखम केली हें वर्तमान सर्वत्र पसरलें. देवदत्त बुद्धाचा खून करील अशी कांहीं भिक्षूंनां भीति वाटून त्यांनीं बुद्ध ज्या विहारांत रहात होता, त्याच्या आसपास पहारा करण्यास सुरुवात केली. त्यांची हालचाल पाहून व स्वाध्यायाचें पठन ऐकून बुद्ध आनंदाला ह्मणाला "हे भिक्षु येथें रात्रंदिवस कां फिरत आहेत?"

आनंद ह्मणाला "भगवन्! देवदत्ताकडून आपल्या जीवाला धक्का पोहोंचूं नये ह्मणून हे येथें पहारा करीत आहेत. "

बुद्धानें आनंदाकडून त्या भिक्षूंनां बोलावून आणिलें, व तो त्यांनां ह्मणाला "भिक्षुहो, माझ्या देहाची इतकी काळजी घेण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या शिष्यांपासून माझें रक्षण व्हावें अशी माझी इच्छा नाहीं. तेव्हां तुह्मी येथें पहारा न करतां आपापल्या कामाला लागा."

बुद्धगुरूच्या पायांची जखम कांहीं कालानें बरी झाली, व तो हिंडूं फिरूं लागला. एके दिवशीं राजगृहांत पिंडपाताला जात असतां त्याला पाहून देवदत्त हस्तिशाळेंत गेला, आणि तेथील मुख्य माहुताला ह्मणाला "मी राजाचा गुरु आहें, हें तूं जाणत आहेस. तुला मोठ्या योग्यतेला चढविणें किंवा या अधिकारावरून काढून टाकणें माझ्या हातीं आहे. जर तूं मीं सांगितलेलें काम ऐकशील, तर मी राजाकडून तुला मोठें बक्षीस देववीन. पण जर माझ्या कामांत कसूर करशील, तर या नोकरीवरून तुला दूर करण्यांत येऊन शिक्षा करण्यांत येईल."

माहुत ह्मणाला "गुरुमहाराज, आम्ही आपल्या आज्ञेबाहेर कधीहि जाणार नाहीं. आमच्या महाराजांप्रमाणेंच आपणहि आम्हांला वंद्य आहां."

देवदत्त ह्मणाला "तर मग जेव्हां या गल्लींतून बुद्ध जाईल, तेव्हां त्याजवर नालागिरि हत्ती सोड."

अनुक्रमणिका

"ठीक आहे!" माहुतानें उत्तर दिलें.

नालागिरि हत्ती अत्यंत मस्त होता अशी त्याची ख्याति होती. यदाकदाचित् हस्तिशाळेंतून मोकळा झाला, तर तो माणसांना ठार मारीत असे. बुद्ध त्या रस्त्यानें जात असतां त्याच्या माहुतानें बंधनें तोडून त्याला मोकळें सोडलें. तेव्हां आसपासच्या घरांतून रहाणारी मनुष्यें कोणी घराच्या छपरावर तर कोणी माडीवर जाऊन दडून बसलीं.

नालागिरि हत्ती बुद्धाच्या अंगावर चालत येत असलेला पाहून भिक्षु ह्मणाले "भगवन्, हा मनुष्यघातक भयंकर नालागिरी हत्ती या बाजूनें येत आहे. तेव्हां आपण लवकर दुसऱ्या बाजूला वळावें."

पण भिक्षूंच्या बोलण्याकडे लक्ष्य न देतां बुद्धगुरु तसाच पुढें निघाला. तेव्हां आजूबाजूच्या लोकांनीं "अरेरे! बिचाऱ्या या चांगल्या श्रमणाला नालागिरि ठार मारील!" असे दुःखोद्गार काढिले. बुद्धानें आपल्या विश्वमैत्रीचें एकीकरण करून मनोबलानें तिचा प्रवाह त्या हत्तीवर सोडला. नालागिरि सोंड खालीं घालून बुद्धाजवळ येऊन उभा राहिला. त्याच्या कुंभस्थळावर हात फिरवून बुद्ध ह्मणाला "नागानें [येथें श्लेष आहे. नाग म्हणजे हत्ती किंवा ज्याला पाप नाहीं असा मनुष्य (न+आगः).] नागाला मारणें हें चांगलें नाहीं! कांकीं, नागाचा जो घात करतो, त्याला सुगति प्राप्त होत नाहीं. हे कुंजर, तूं मदोन्मत्त होऊन दुर्गतीला जाऊं नकोस. पण असें कृत्य कर, कीं, ज्याच्या योगें सुगतीला जाशील."

हा उपदेश ऐकून नालागिरीनें शुंडादंडानें बुद्धाची पादधूलि आपल्या मस्तकावर घेतली; आणि पुढले दोन्ही पाय वांकवून बुद्धाला वंदन करून हस्तिशालेंत तो आपल्या ठिकाणावर जाऊन उभा राहिला!

ही गोष्ट घडल्यावर राजगृहांतील आबालवृध्द ही गाथा गात होतेः—

**दंडनेके दमयन्ति अंकुसेहि कसाहि च**
**अदंण्डेन असत्थेन नागो दंतो महेसिना**

[दण्डेंच कोणी शिकवी पशूला,
कोणी कशेला धरि अंकुशाला;
दंण्डदिकांवांचुनि शाक्यसिंहें
आश्चर्य नालागिरि वारिला हें!]

याप्रमाणें देवदत्ताच्या बुद्धाला मारण्याच्या सर्व मसलती फसल्यावर संघामध्यें फूट पाडण्याची त्यानें एक युक्ति योजिली. तो आपला साथीदार समुद्रदत्त भिक्षु याच्याबरोबर बुद्धाजवळ आला, आणि बुद्धाला वंदन करून ह्मणाला "भगवन्, भिक्षूंनीं ऐहिक विषयांपासून पूर्णपणें अलिप्त रहाण्यासाठीं मीं हे पांच नियम तयार केले आहेत. ते सर्व भिक्षूंनीं पाळलेच पाहिजेत अशी आपण आज्ञा करावी. (१) सर्वकाल भिक्षूंनीं अरण्यामध्येंच रहावें; (२) आजन्म भिक्षेवरच निर्वाह करावा, कोणीं आमंत्रण केलें असतां त्याच्या घरीं भोजनाला जाऊं नये; (३) यावज्जीव रस्त्यांतील चिंध्या गोळा करून त्यांचीं वस्त्रें तयार करावीं, गृहस्थाकडून वस्त्र घेऊं नये; (४) आजन्म झाडाखालींच रहावें, झोंपडीमध्यें किंवा घरामध्यें राहूं नये; (५) मत्समांसाचें ग्रहण करूं नये. हे पांच नियम पाळण्यांत जो कसूर करील, त्याला दोषी ठरवावें."

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला “या पांच नियमांपासून आध्यात्मिक उन्नतीला कांहीं मदत होईल असें वाटत नाहीं. परंतु ज्याची इच्छा असेल, त्यानें हे पांच नियम खुशाल पाळावे; त्याला माझी हरकत नाहीं.”

बुद्ध संघाला हे नियम सक्तीनें लागू करावयाला तयार नाहीं, या गोष्टीचा राजगृहामध्यें जिकडेतिकडे मोठा बभ्रा करून देवदत्तानें आपल्या मताला कांहीं भिक्षु मिळविले, व तो त्यांनां घेऊन गयेला चालता झाला. तें वर्तमान ऐकून बुद्धानें सारिपुत्त व मोग्गल्लान यांनां त्या भिक्षूंनां बोध करून परत आणण्यासाठीं गयेला पाठविलें.

देवदत्त आपल्या अनुयायांनां धर्मोपदेश करीत बसला असतांना सारिपुत्त आणि मोग्गल्लान त्या ठिकाणीं पोहोंचले. त्यांनां पाहून समुद्रदत्त देवदत्ताला हळूच ह्मणाला “हे दोघे त्या गौतमाचे दुष्ट अग्रशिष्य आपणांपाशीं येत आहेत त्यांनां आपण येथें थारा देऊं नका.”

देवदत्त ह्मणाला “आपल्या गुरूला कंटाळून ते मजपाशीं आले असतील. तेव्हां त्यांचा मला योग्य आदरसत्कार केलाच पाहिजे.”

देवदत्तानें सारिपुत्त–मोग्गल्लानांचें फारच आतिथ्य केलें. बराच वेळ उपदेश केल्यानें देवदत्ताला थकवा आला होता. तेव्हां तो सारिपुत्ताला ह्मणाला “आयुष्मन्, आतां जरी बरीच रात्र झाली आहे, तरी भिक्षुसंघाची धर्मश्रमणाची आस्था कमी झालेली दिसत नाहीं. पण मला बरेच श्रम झाले आहेत. आतां तुझ्या तोंडचे उपदेशपर शब्द माझ्या संघाला ऐकूं दे. मी विश्रांति घेण्यासाठीं जातों.”

देवदत्ताला लवकरच गाढ निद्रा लागली. इकडे सारिपुत्तानें त्या भिक्षूंनां उपदेश करून त्यांचीं मनें वळविलीं. तेव्हां ते सर्वजण सारिपुत्ताबरोबर बुद्धदर्शनाला जाण्यास सिद्ध झाले, व देवदत्त उठण्यापूर्वी गयेहून राजगृहाला जाण्यासाठीं निघाले.

तेव्हां समुद्रदत्त घाबऱ्याघाबऱ्या देवदत्ताला उठवून ह्मणाला “या सारिपुत्त–मोग्गल्लानांला येथें येऊं देऊं नका, असें मीं तुह्माला सांगितलें नाहीं काय? आतां ते तुमच्या सर्व अनुयायांनां घेऊन राजगृहाला गेले!”

हें ऐकून देवदत्ताला वज्रप्रहार झाल्यासारखें दुःख झालें!

अनुक्रमणिका

[१२]

## मागन्दिया ब्राह्मणकन्या

कुरुदेशामध्यें मागन्दिय नांवाचा एक ब्राह्मण रहात असे. त्याला एक सर्वलक्षणसंपन्न सुस्वरूप कन्या होती. पुष्कळ कुलीन ब्राह्मणांनीं तिला मागणी घातली; परंतु मागन्दियानें ते योग्य वर नाहींत असें ह्मणून त्यांनां आपली कन्या दिली नाहीं. धर्मप्रसाराला आरंभ केल्यावर कांहीं वर्षांनीं बुद्धगुरु कुरुदेशाला गेला. तेथें गांवोगांवीं उपदेश करीत फिरत असतां त्याला मागन्दिय ब्राह्मणानें पाहिलें, व त्याच्या अंगावरील लक्षणें पाहून हाच आपल्या मुलीला योग्य वर आहे अशी त्याची खात्री झाली. तेव्हां तो बुद्धाला ह्मणाला "हे श्रमण! आज कित्येक वर्षे मी माझ्या मुलीला योग्य वर पहात आहें; परंतु तुझ्यासारखा सर्वलक्षणसंपन्न कोणी आढळला नाहीं. आतां माझी मुलगी मी तुला अर्पण करतों; तिचा तूं अंगीकार कर."

बुद्ध ह्मणाला "हे ब्राह्मण, या नाशवंत मनुष्यशरीराचा वीट आल्यामुळें मीं गृहत्याग केला. कामसुखांत मला आतां आनंद वाटत नाहीं; तेव्हां माझ्यासाठीं तुझ्या मुलीचा मीं परिग्रह कसा करावा?"

बुद्धाची निस्पृहता पाहून मागन्दिय ब्राह्मण आपल्या पत्नीसह बौद्ध उपासक झाला. पण त्याच्या कन्येला मात्र बुद्धाचा फार राग आला. "माझ्यासारखी सुस्वरूप स्त्री या मुंडकाच्या पदरीं पडत असतां त्यानें माझी अवहेलना करावी व माझा अंगीकार करूं नये, हा मोठा चमत्कारच ह्मटला पाहिजे! जर मागेंपुढें मला संधि सांपडली, तर मी याचा सूड उगवीनच उगवीन," असे आपल्या मनाशींच उद्गार काढून तिनें एकवार बुद्धाकडे तिरस्कारयुक्त दृष्टींने पाहिलें, व मान खालीं घालून ती चूप बसली.

मागन्दिय ब्राह्मणानें मुलीला भावाच्या स्वाधीन करून आपण प्रव्रज्या घेतली. तिच्या चुलत्यानें तिला दुसरा योग्य वर न मिळाल्यामुळें कौशांबी येथील उदयन राजाला दिलें. उदयनराजाला पुष्कळ राण्या होत्या; परंतु आपल्या सौंदर्यानें आणि शहाणपणानें मागन्दिया त्या सर्वांत पट्टराणी होऊन बसली.

पुढें कांहीं वर्षांनीं बुद्धगुरु कौशांबीला आला असतां तिनें त्याचा सूड उगविण्याचा बेत अमलांत आणिला. शहरांतील धूर्त लोकांनां तिनें लांच देऊन जेथेंजेथें बुद्ध भेटेल, तेथेंतेथें त्याला शिव्या देण्यास लाविलें.

आनंद आणि बुद्ध भिक्षेसाठीं कौशांबीमध्यें फिरत असतां त्यांजवर प्रत्येक गल्लींतून शिव्यांचा वर्षाव होऊं लागला. तेव्हां आनंद ह्मणाला "भगवन्, या लोकांच्या शिव्याशापांपुढें आपण येथें रहाण्याची सोय राहिली नाहीं. चला आपण दुसरीकडे जाऊं."

बुद्ध ह्मणाला "आनंदा, जर तेथेंहि लोक आह्मांला शिव्या देऊं लागले, तर मग कोठें जाऊं या?"

आनंद ह्मणाला "दुसऱ्या कोठें तरी."

"पण आनंदा, आपण असें करूं गेलों, तर विनाकारण क्लेशभागी होऊं. येथल्यायेथेंच जर आह्मीं या लोकांचे शिव्याशाप सहन केले, तर आह्मांला यांच्या भीतीनें दुसऱ्या ठिकाणीं जाण्याचें प्रयोजन राहिलें

अनुक्रमणिका

नाहीं. हे लोक चारआठ दिवस आमच्यामागें लागतील, आणि आह्मी त्यांजकडे पूर्ण दुर्लक्ष्य करितों, असें पाहून आपोआप या शिवागाळीच्या व्यवसायापासून विरत होतील!"

बुद्धाच्या ह्मणण्याचा आनंदाला सातआठ दिवसांतच अनुभव आला.

[१३]

## सुंदरी परिव्राजिका

श्रावस्तीमध्यें बुद्धाचा उपासकसमुदाय वाढत गेल्यामुळें भिक्षुसंघाला अन्नवस्त्राचा मोठा लाभ होऊं लागला. तें पाहून कांहीं परिव्राजकांच्या पोटांत दुखूं लागलें. 'येन केन प्रकारेण' बुद्धाची बेअब्रू करण्याचा त्यांनीं एक कट उभारिला. त्यांच्या पंथामध्यें सुंदरी नांवाची एक परिव्राजिका होती. बुद्धावर खोटा आरोप आणण्याच्या कामीं त्यांनीं तिची योजना केली. त्यांच्या शिकवणीप्रमाणें ती रोज रात्रीं जेतवनाच्या बाजूला जाऊन शेजारच्या परिव्राजकाच्या आश्रमांत रात्र घालवून पहांटेला शहरांत येत असे. वाटेंत कोणीं प्रश्न केला असतां 'आपण बुद्धाबरोबर एकाच ठिकाणीं रहात असतें,' असें उत्तर देत असे.

एके दिवशीं परिव्राजकांनीं मारेकरी घालून सुंदरीला ठार मारिलें, व जेतवनाच्या एका कोपऱ्यामध्यें केरकचऱ्यांत तिचें प्रेत लपवून ठेविलें. सुंदरी परिव्राजिका नाहींशी झाल्याचा बोभाटा सर्वत्र झाल्यावर परिव्राजिकांनीं पसेनदिराजाला अर्ज केला, कीं, "आमच्यापैकीं एक परिव्राजिका नाहींशी झाली आहे, तिचा शोध करावा." राजानें आपले शिपाई बरोबर देऊन शंकास्थानें असतील तीं शोधून पहावीं, असा त्यांनां हुकूम केला.

परिव्राजक ह्मणाले "आह्मांला शाक्यपुत्रीय भिक्षूंची बळकट शंका येते. कांकीं, अलीकडे सुंदरी रोज रात्रीं बुद्धाच्या विहारांत जात असे, व बुद्धाचें आणि तिचें निराळ्या प्रकारचें नातें होतें अशी बातमी आमच्या कानीं आली आहे. कदाचित् आपल्या गुरूचें कुकृत्य झांकण्यासाठीं शाक्यपुत्रीयांनीं बिचाऱ्या सुंदरीला ठार मारून कोठें तरी गाडून टाकिलें असावें!"

राजाच्या परवानगीनें परिव्राजकांनीं नगररक्षकांच्या (पोलीसांच्या) मदतीनें प्रथमतः जेतवनाची झडती घेतली, व कचऱ्याच्या राशींत लपविलेलें सुंदरीचें प्रेत शोधून काढिलें. राजाला जेतवनामध्यें सुंदरीचें प्रेत सांपडल्याचें वर्तमान समजल्यावर त्यानें तें सगळ्या शहरांत फिरवून लोकांनां दाखविण्याची आज्ञा केली. परिव्राजकांनीं सर्व शहरभर सुंदरीचें प्रेत फिरवून बौद्धभिक्षूंची नालस्ती केली. जिकडेतिकडे सुंदरीचें प्रेत दाखवून "हें पहा शाक्यपुत्रीय श्रमणाचें कृत्य!" असें ते मोठमोठ्यानें ओरडत असत. यायोगें कांहीं श्रद्धावंत उपासक खेरीजकरून श्रावस्तींतील इतर लोकांत बुद्धाविषयी आणि बौद्ध भिक्षूंविषयीं अत्यंत तिटकारा पसरला. भिक्षूंनां भिक्षा मिळण्याची मारामार झाली.

पण एवढ्यानें बुद्ध डगमगला नाहीं. तो ह्मणाला "खोटे आरोप करणाऱ्या मनुष्याची मी कांहींच किंमत समजत नाहीं. जो खोटें बोलतो, व आपण केलेलें पापकृत्य दुसऱ्याच्या माथीं मारूं पहातो, त्याला नरकावांचून दुसरी गति नाहीं!"

अनुक्रमणिका

कांहीं दिवसांनीं ज्या मारेकऱ्यांनीं सुंदरीला मारिलें होतें, त्यांचें एका दारूच्या गुत्त्यांत परिव्राजकांकडून मिळालेल्या पैशाच्या वांटणीसंबंधानें भांडण जुंपलें. त्यांतील एकजण ह्मणाला "सुंदरीला मारणारा मी. तेव्हां मोठा वांटा मला मिळाला पाहिजे."

दुसरा ह्मणाला "मीं जर तिचा गळा दाबला नसता, तर तिने आरडाओरड केली असती, व आमचें कृत्य तेव्हांच उघडकीला आलें असतें."

हें त्या मारेकऱ्यांचें भांडण राजाच्या गुप्त हेरांनीं ऐकिलें, व नगररक्षकाच्या मदतीनें त्यांनां पकडून राजसभेंत नेलें. तेथें त्यांनीं राजाला इत्थंभूत वर्तमान सांगून आपला गुन्हा कबूल केला. बुद्धावर आळ घालण्यासाठीं उभारलेला कट याप्रमाणें उघडकीला आला, व परिव्राजकांची फजीती झालीं. लोकांची बुद्धाविषयीं पूज्यबुद्धि द्विगुणित झाली.

[१४]

## महाप्रजापति गौतमी
## आणि भिक्षुणीसंघाची स्थापना

बुद्ध आपल्या उतारवयांत एकदां कपिलवस्तूमध्यें रहात असतां त्याला महाप्रजापति गौतमीनें भिक्षुणींचा संघ स्थापन करण्यास विनंति केली; पण भिक्षुणींचा संघ स्थापन केला असतां भिक्षूंच्या आणि भिक्षुणींच्या संघांत तंटे उपस्थित होण्याचा संभव असल्यामुळें बुद्धानें गौतमीची विनंति मान्य केली नाहीं. नंतर बुद्ध कपिलवस्तूहून धर्मोपदेश करीतकरीत वैशालीला आला.

महाप्रजापति गौतमीहि आपलें केशवपन करून पुष्कळ शाक्य स्त्रियांबरोबर वैशालीला आली. चालण्याच्या श्रमानें तिचे पाय सुजले होते. तिला पाहून आनंद ह्मणाला "काय ही तुझी स्थिति! तूं इतकी विपद्ग्रस्त कां दिसतेस?"

महाप्रजापति ह्मणाली "आनंदा, बुद्धगुरु स्त्रियांनां प्रव्रज्या देण्यास तयार नाहींत, याजबद्दल मला अत्यंत खेद होतो!"

"असें जर आहे, तर तूं जरा येथेंच बस. मी भगवंतांनां पुनः एकदां विनंति करून पहातों."

असें ह्मणून आनंद बुद्धाजवळ गेला आणि ह्मणाला "भगवन्! महाप्रजापति गौतमी पायींपायीं कपिलवस्तूहून येथवर आली आहे. चालण्याच्या श्रमानें तिचे पाय सुजले आहेत. आपण स्त्रियांनां भिक्षुणी होण्याचा अधिकार देत नाहीं, याजबद्दल तिला अत्यंत दुःख वाटत आहे. तेव्हां भगवन्! आपण आपल्या या पंथामध्यें स्त्रियांनां प्रव्रज्या घ्यावयाला अनुज्ञा द्या."

बुद्ध ह्मणाला "आनंदा, या भानगडींत तूं पडूं नकोस."

आनंद ह्मणाला "भगवन्, आपल्या धर्माचा साक्षात्कार होणें स्त्रियांनां शक्य आहे कीं नाहीं?"

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला “माझ्या धर्माचें रहस्य समजणें पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांनांहि शक्य आहे.”

“असें जर आहे, तर आपण महाप्रजापतीच्या विनंतीला मान कां देत नाहीं? लहानपणीं आपणाला तिनेंच वाढविलें आहे. मायादेवी निर्वतल्यावर तिनेंच आपणाला दूध पाजलें आहे. तेव्हां तिच्या मनाचें समाधान करण्यासाठीं स्त्रियांनां प्रव्रज्या घेतां येईल, असा आपण नियम करा.”

आनंदाच्या ह्मणण्याला मान देऊन बुद्धानें महाप्रजापतीला आणि तिच्याबरोबर आलेल्या स्त्रियांनां प्रव्रज्या दिली, व त्यांचा एक निराळा भिक्षुणीसंघ स्थापन केला. या भिक्षुणीसंघांत खेमा आणि उप्पलवण्णा या दोघी प्रमुख भिक्षुणी होत्या. याशिवाय आणखीहि पुष्कळ प्रसिद्ध भिक्षुणी होऊन गेल्या. त्यांनां थेरी (स्थविरी) ह्मणत असत. त्यांचे कांहीं उद्गार थेरीगाथा या पालिग्रंथामध्यें संग्रहित केले आहेत.

इसवी सनाच्या चौथ्या शतकांत भिक्षुणीसंघाचा लोप झाला असावा. आजकाल ब्रह्मदेशामध्यें अशाच प्रकारची एक संस्था आहे. पण त्या संस्थेंतील स्त्रियांनां भिक्षुणी न ह्मणतां दशशीलधारिणी उपासिका ह्मणतात.

[१५]

## विडूडभ (विदुर्दभ)

पसेनदि राजाची बुद्धावर फारच भक्ति जडली होती. तो वारंवार जेतवनांत धर्मश्रवणासाठीं जात असे, व भिक्षुसंघाला वस्त्रान्नादिक देत असे. आपल्या आणि बुद्धाच्या कुळाचा निकट संबंध व्हावा, या हेतूनें त्यानें शाक्याच्या कुळांतील एका कन्येला आपली पट्टराणी करण्याचा बेत केला.

पण, शाक्यराजे मोठे अभिमानी असत. ते कोसलराजाच्या कुलापेक्षां आपलें कुल श्रेष्ठ समजत. पसेनदीनें जेव्हां कन्येची मागणी केली, तेव्हां शाक्यांनां मोठी पंचाईत पडली. पसेनदीचें सामर्थ्य शाक्यांपेक्षां पुष्कळ पटींनीं मोठें होतें. अर्थात् शाक्यांनां कोसलराजाची मागणी उघडपणें नाकबूल करतां येईना. त्यांनीं सर्वानुमतें अशी युक्ति योजिली, कीं, महानामा शाक्याची दासीकन्या वासभक्षत्रिया हिला महानामानें आपली कन्या ह्मणून कोसलराजाला द्यावी.

कोसलराजाच्या अमात्यांनां ती मुलगी पसंत पडली. पण पसेनदीला शाक्यराजे आपणाला ठकवितील, अशी शंका आल्यामुळें त्यानें आपल्या अमात्यांनां असा निरोप पाठविला, कीं, “तुह्मीं जी कन्या पसंत केली, ती जर महानामा शाक्याच्या पंक्तीला बसून जेवीत असेल, तर ती वधू निश्चित करावी.”

कोसलराजाचा हा निरोप महानामाला समजला, तेव्हां शाक्यकुलाच्या रक्षणासाठीं त्यानें आपल्या दासीच्या कन्येबरोबर एका पंक्तीला बसून भोजन केलें. या प्रसंगीं कोसलराजाचे आमात्यहि हजर होते.

याप्रमाणें कोसलराजाचें शंकासमाधान झाल्यावर शुभमुहूर्तावर वासभक्षत्रियेशीं त्याचा विवाह झाला. राजानें तिला पट्टराणी केलें. कांहीं कालानें वासभक्षत्रिया गर्भवती होऊन नवमासान्तीं पुत्र प्रसवली. त्याचें नांव विडूडभ (विदुर्दभ) असें ठेवण्यांत आलें. बाळपणीं विडूडभ आपल्या आईला वारंवार ह्मणे, कीं,

अनुक्रमणिका

“साधारण लोक देखील आपल्या भाच्यांनां उत्सवाच्या दिवशीं खेळणीं पाठवितात; पण माझे मामा किंवा आजोबा मला कांहींच पाठवीत नाहींत!”

“बाळ, तुझे मामा, आजोबा वगैरे मंडळी येथून फार दूर राहतात. तेव्हां तुला खेळणीं, खाऊ वगैरे पाठवितां येणें त्यांनां शक्य नाहीं,” असें ह्मणून वासभक्षत्रिया आपल्या मुलाचें समाधान करीत असे.

विडूडभ सोळा वर्षांचा झाल्यावर आपल्या आईला ह्मणाला “मी एकदां आजोळीं जाऊन सगळ्या नातेवाईकांनां भेटणार आहें.”

वासभक्षत्रियेनें पुष्कळ अडचणी पुढें आणिल्या; पण त्यांनां न जुमानतां विडूडभानें बापाची आज्ञा घेऊन कपिलवस्तूला जाण्याचा आपला बेत निश्चित केला.

वासभक्षत्रियेनें महानामाला गुप्त निरोप पाठविला, कीं, “माझा मुलगा तिकडे जात आहे, त्याला कोणत्याहि प्रकारें कमीपणानें वागवूं नये. आपण त्याला नीट रीतीनें वागविलें नाहीं, तर कोसलराजाची माझ्यावरच केवळ नव्हे, तर आपणावरहि फार इतराजी होईल.”

विडूडभ कपिलवस्तूला गेल्यावर शाक्यांनीं त्याचें यथायोग्य आदरातिथ्य केलें. “हा तुझा मामा, हा तुझा आजोबा, हा तुझा चुलतमामा,” असें ह्मणून त्याला महानाम वगैरे वडील माणसांनां नमस्कार करावयाला लाविलें. पण विडूडभानें “आपल्यापेक्षां वयानें लहान मंडळी कोणीच नाहीं कीं काय?” असा जेव्हां प्रश्न केला, तेव्हां ते शिकारीसाठीं बाहेर गांवीं गेले आहेत, असें त्याला उत्तर मिळालें.

आपल्या आजोबाच्या घरीं कांहीं दिवस राहून विडूडभ जेव्हां श्रावस्तीला परत जाण्यास निघाला, तेव्हां शाक्यांनीं आपल्या संथागारांत (नगरमंदिरांत) जमून त्याचा योग्य सन्मान केला. विडूडभ कांहीं अंतरावर गेल्यावर त्याचा एक नोकर, कांहीं सामान विसरलें होतें तें नेण्यासाठीं ह्मणून माघारा आला असतां संथागाराजवळ पुढील संवाद त्याच्या कानीं आला.

एक दासी ह्मणते “अग ए! तो दासीपुत्र बसलेला पाट निराळा काढून ठेव बरं!”

यावर दुसरी दासी ह्मणते “अग, तो दासीपुत्र तो कोण?”

“वाः! तूं तर अगदींच वेडी दिसतेस. अग, तो आपला विडूडभ दासीचा मुलगा आहे, हें तुला माहीत नाहीं काय? अग, त्याचा तो पाट घेऊन पाण्यानें साफ धुऊन टाक!”

त्या नोकरानें हें वर्तमान विडूडभाच्या सवंगड्यानां सांगितलें, व त्यांनीं तें विडूडभाला सांगितलें. तें ऐकून विडूडभ अत्यंत त्वेषानें आपल्या मनाशींच ह्मणाला “मी बसलों होतों तो पाट शाक्यराजे पाण्यानें धुवावयाला लावतात काय! मला जर दैवयोगानें राज्यपद मिळालें, तर तोच पाट मी शाक्यांच्या रक्तानें धुवावयाला लावीन!”

अनुक्रमणिका

पसेनदिराजाला देखील वासभक्षत्रिया शाक्यकुलांतील नसून दासीकन्या आहे ही बातमी समजली, आणि त्यानें तिला पट्टराणीच्या पदावरून दूर केलें.

कांहीं दिवसांनीं बुद्धगुरु राजवाड्यांत गेला असतां राजानें घडलेली गोष्ट त्याला सांगितली. तेव्हां तो ह्मणाला "महाराज, शाक्यांनीं अयुक्त आचरण केलें, यांत संशय नाहीं. परंतु वासभक्षत्रियेचा आपण स्वीकार केलात, त्याअर्थी तिला एवढ्याच गोष्टीवरून पट्टराणीपदावरून दूर करणें चांगलें नाहीं. तिची आई जरी दासी असली, तरी बाप क्षत्रियच आहे, व आपल्याबरोबर ती अभिषिक्त झाली आहे, हें आपण विसरतां कामा नये."

बुद्धाचें ह्मणणें राजाला पटलें, व वासभक्षत्रियेला पूर्वीचाच मान पुनः देण्यास त्यानें हुकूम केला.

कांहीं कालानें राजाचें आणि सेनापतीचें वितुष्ट आलें. विडूडभानें त्या संधीचा फायदा घेऊन आपणाला राज्याभिषेक करविला, व वृद्ध बापाला श्रावस्तींतून हांकून दिलें.

मगधदेशाचा राजा अजातशत्रु हा पसेनदीचा भाचा होता. त्याच्या मदतीनें विडूडभापासून राज्य हिसकावून घेण्याचा विचार करून पसेनदि एका दासीबरोबर अज्ञातवेषानें राजगृहाला गेला. पण तेथें पोहोंचण्यापूर्वीच राजगृहाबाहेरील एका धर्मशाळेंत मार्गातील परिश्रमानें तो मरण पावला. अजातशत्रूला आपल्या मामाचा असा दुःखकारक शेवट झाला ही बातमी समजली, तेव्हां त्यानें पसेनदीच्या दर्ज्याला शोभण्यासारखी त्याची उत्तरक्रिया केली.

राज्यकारभार हातीं आल्याबरोबर विडूडभानें शाक्यांवर स्वारी करण्याचा बेत केला. बुद्धानें त्याची समजूत करून त्याचा हा बेत दोन वार रहित करविला; परंतु तिसऱ्यांदां बुद्धाला मध्यस्ती करण्यास सवड न सांपडल्यामुळें विडूडभाला आपला बेत निःशंकपणें पार पाडतां आला. त्यानें शाक्यांवर स्वारी करून त्यांची दाणादाण करून सोडिली. जे शरण आले किंवा पळून गेले, त्यांनां सोडून इतरांनां– लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनां–त्यानें कंठस्नान घातलें, व त्यांच्या रक्तानें आपलें आसन धुवावयाला लाविलें. याप्रमाणें शाक्यांचा निःपात करून विडूडभ श्रावस्तीला आला.

तेथें श्रावस्तीबाहेर अचिरवती (राप्ती) नदीच्या वाळवंटांत त्यानें आपल्या सैन्याचा तळ दिला. आसपासच्या प्रदेशांत अकालमेघाची भयंकर वृष्टि होऊन अचिरवतीला महापूर आला, व विडूडभ आणि त्याच्या सैन्यांतील कांहीं लोक वाहून गेले.

[१६]

## उपसंहार

शाक्यांचें राज्य मगधदेशाच्या राज्यापेक्षां लहान होतें. तथापि शाक्यराजे इक्ष्वाकुकुलांतील असल्यामुळें त्यांनां आसपासच्या देशांत फार मानीत असत. शाक्यांनांहि आपल्या कुलाचा मोठा अभिमान वाटत असे. त्यांचा मुख्य व्यवसाय शेतीचा असे. या धंद्याला ते फारच महत्त्व देत असत. शुद्धोदन हा शाक्यराजांपैकीं एक राजा होता. परंतु त्याला कांहीं काळपर्यंत शाक्यांनीं आपला महाराजा केलें होतें असें वाटतें.

अनुक्रमणिका

सिद्धार्थाचें बाळपण मोठ्या सुखांत गेलें असावें, यांत शंका नाहीं. तथापि मधुनमधून व्याधि, जरा आणि मरण यासंबंधानें तो विचार करीत असे. याला सुत्तपिटकामध्यें आधार सांपडतो. आपल्या वयाच्या एकोणतिसाव्या वर्षी सिद्धार्थानें गृहत्याग केला, व सहासात वर्षे उरुवेलेच्या आसपास घोर तपश्चर्या केली. आपल्या वयाच्या तिसाव्या वर्षी सिद्धार्थ बुद्ध झाला.

प्रथमतः बुद्धानें पांच ब्राह्मणतपस्व्यांनां काशीजवळ ऋषिपतन नांवाच्या उद्यानांत आषाढी पौर्णिमेच्या दिवशीं उपदेश केला. हा चातुर्मास संपण्यापूर्वीच बुद्धानें साठ भिक्षु आपल्या संघांत घेतले, व चातुर्मास संपल्यावर त्यांनां धर्मोपदेश करण्यासाठीं सर्व दिशांनां पाठविलें. तदनंतर बुद्धाची मोठी कामगिरी ह्मटली ह्मणजे त्यानें उरुवेलकाश्यप, नदीकाश्यप आणि गयाकाश्यप, या तिघां सुप्रसिद्ध जटिल बंधूनां त्यांच्या एक हजार शिष्यांसहवर्तमान आपल्या भिक्षुसंघांत घेतलें ही होय. काश्यपबंधु शिष्य झाल्यामुळें राजगृहांतील श्रमणब्राह्मणांवर बुद्धाचें तेज पडावयाला उशीर लागला नाहीं. राजगृहामध्यें बुद्धानें पुष्कळ शिष्य मिळविले; परंतु त्या सर्वांत सारिपुत्त आणि मोग्गल्लान हे दोन प्रमुख होत. राजगृहाहून बुद्ध आपल्या भिक्षुसंघासह शुद्धोदनराजाला भेटण्यासाठीं कपिलवस्तूला गेला. तेथें घडलेली मुख्य गोष्ट ही, कीं, त्यानें आपल्या पूर्वाश्रमांतील एकुलत्या मुलाला प्रव्रज्या देऊन श्रामणेर केलें.

कपिलवस्तूहून बुद्ध पुनः राजगृहाला आला. तेथें अनाथपिंडिक (सुदत्त) श्रेष्ठीनें त्याची भेट घेऊन त्याला श्रावस्तीला येण्याविषयीं आग्रह केला. पुढें जेव्हां बिंबिसाराला मारून अजातशत्रु सिंहासनावर आला, तेव्हां बुद्धानें आपलें मुख्य ठाणें श्रावस्तीलाच केलें. बुद्धाचे जे अनेक उपदेश त्रिपिटकामध्यें संग्रहित केले आहेत, त्यांतील पुष्कळसे बुद्धानें जेतवनांतील अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात असतां केले. श्रावस्ति हें जरी बुद्धाचें मुख्य ठिकाण झालें होतें, तथापि चातुर्मासखेरीज करून बाकी आठ महिने तो भिक्षुसंघासह धर्मोपदेश करण्यासाठीं मध्यदेशांत सर्वत्र फिरत असे.

बुद्धाला विरोध करणारे जे शत्रु उद्भवले, त्यांत देवदत्ताला अग्रस्थान दिलें पाहिजे. देवदत्त शाक्यांपैकींच असून बुद्धाचा जवळचा नातेवाईक होता. तथापि त्यानें जितकें बुद्धाचें वैर केलें, तितकें दुसऱ्या कोणींहि केलें नसेल. उदयनराजाच्या पट्टराणीनेंहि बुद्धाची फजीती करण्याचा प्रयत्न केला. परिव्राजकांनीं बुद्धावर सुंदरीला मारल्याचा आळ घालून श्रावस्तीमध्यें त्याची बेअब्रू करण्याची खटपट केली. परंतु कोणताहि वैरी बुद्धाचें यश मलिन करूं शकला नाहीं. देवदत्तानें आणि इतरांनीं बुद्धावर आणिलेले प्रसंग ह्मणजे बुद्धाच्या शीलाची एक प्रकारची कसोटीच होती. त्या कसोटीला बुद्ध कसा उतरला, हें मागील कांहीं प्रकरणांवरून निदर्शनाला आलेंच आहे. सोनें जसें आगीतून तावून सुलाखून शुद्ध होऊन बाहेर पडतें, तद्वत् वरील प्रसंगांनीं बुद्धाचें यश निर्मल होऊन बाहेर पडलें.

यज्ञयागादिकांनां महत्त्व देणाऱ्या वैदिक ब्राह्मणांनीं बुद्धाचा फार छल केला, अशी समजूत आहे; पण ती निराधार आहे. बुद्धकालीं मध्यदेशामध्यें यज्ञयागाला फारसें महत्त्व राहिलें नव्हतें. आणि जे कांहीं थोडेबहुत यज्ञ होत असत, त्यांनां अतिशय खर्च येत असल्यामुळें ते सामान्य लोकांच्या आटोक्याबाहेरचे होते. बुद्ध चारी वर्णांला समान मानतो, हाच काय तो त्याच्यावर ब्राह्मणांचा मुख्य आरोप होता. तो वाटेल तेथें भिक्षा ग्रहण करितो, चांडाल आणि ब्राह्मण या सर्वांनां आपल्या संघांत समानत्वानें वागवितो, व येणेंकरून परंपरागत आलेला वर्णभेद मोडूं पहातो, याबद्दल कित्येक वर्णाभिमानी ब्राह्मणांच्या पोटांत दुखत असे. पण त्यांच्याकडून शिव्याशापांखेरीज बुद्धाचें ह्मणण्यासारखें अहित झालें नाहीं. बुद्धाला चांडाल वगैरे

शब्दांनीं संबोधून त्याच्याशीं भांडण करावयाला सिद्ध झालेले कित्येक ब्राह्मण त्याचे शिष्य झाले, हें पुढील भागांतील कांहीं गोष्टींवरून दिसून येईल.

बुद्धावर आलेलें शेवटलें मोठें संकट ह्मटलें ह्मणजे विडूडभानें पसेनदीला पदभ्रष्ट करून शाक्यांचा संहार केला हें असावें. बौद्धधर्माचा पहिला पुरस्कर्ता राजा बिंबिसार याला त्याच्या मुलानें ठार मारिलें; दुसरा राजा पसेनदिकोसल याला त्याच्या मुलानें हांकून दिलें, आणि सर्व शाक्यराजांचा नाश केला. पण या ऐहिक संकटांनीं बुद्ध डगमगून गेला नाहीं. त्यानें आपलें धर्मोपदेशाचें काम तहत देहावसानापर्यंत चालविलें होतें. त्याच्या उपदेशाचा थोडासा मासला आणि शेवटल्या दिवसांची हकीगत पुढील भागांत दिली आहे.

अनुक्रमणिका

# भाग तिसरा बुद्धाचा : उपदेश आणि परिनिर्वाण

[१]

## गृहस्थाचीं कर्तव्यें

**को**णे एके समयीं बुद्धगुरु राजगृहांतील वेणुवनामध्यें रहात होता.

त्या कालीं सिगाल (शृगाल) नांवाचा एक तरुण कुलपुत्र शहरांतून सकाळींच बाहेर येऊन स्नान करून पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर, खालची आणि वरची या सहा दिशांनां नमस्कार करीत होता.

बुद्ध राजगृहामध्यें पिंडपातासाठीं (भिक्षेसाठीं) जात असतां त्याला पाहून ह्मणाला "हे ग्रहपतिपुत्र, तूं हें काय चालविलें आहेस?"

सिगाल ह्मणाला "भदन्त, बापानें मरतेवेळीं सहाहि दिशांची पूजा करीत जा, असें मला सांगितल्यावरून मी या दिशांनां नमस्कार करीत आहें."

बुद्ध ह्मणाला "परंतु हा तुझा नमस्कारविधि आर्यांच्या पद्धतीला अनुसरून नाहीं."

तेव्हां सिगालानें आर्यांच्या रीतीप्रमाणें सहा दिशांचा नमस्कारविधि कोणता, हें सांगण्याविषयीं बुद्धाला विनंति केली.

बुद्ध ह्मणाला "ज्या आर्यश्रावकाला सहा दिशांची पूजा कर्तव्य असेल, त्यानें चार कर्मक्लेशांपासून मुक्त झालें पाहिजे, चार कारणांमुळें पापकर्म करितां कामा नये, आणि संपत्तिनाशाच्या सहा द्वारांचा त्यानें अंगीकार करतां कामा नये. या चवदा गोष्टी जर त्यानें संभाळल्या, तर सहा दिशांची पूजा करावयाला तो योग्य होईल. प्राणघात, चोरी, व्यभिचार, आणि असत्य भाषण हे चार कर्मक्लेश समजावे. यापासून आर्यश्रावकानें दूर राहिलें पाहिजे. छंदामुळें, द्वेषामुळें, भयामुळें आणि मोहामुळें अज्ञजन पाप करितात; परंतु आर्यश्रावकानें यांपैकीं कोणत्याहि कारणानें पापाला प्रवृत्त होतां कामा नये. जो या कारणामुळें पापाला प्रवृत्त होतो, त्याची कृष्णपक्षांतील चंद्राप्रमाणें कीर्ति क्षीण होत जाते. पण यांपैकीं कोणत्याहि कारणानें जो पापाला वश होत नाहीं, त्याची कीर्ति शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें वृद्धिंगत होत जाते.

"हे गृहपतिपुत्र! मद्यपान, रात्रीचें बाहेर हिंडणें, नाटकांतमाशांचें व्यसन, जुगार, दुष्टांची संगति आणि आळस, हीं सहा संपत्तिनाशाचीं द्वारें होत.

"दारूच्या योगें संपत्तीचा क्षय होतो हें सांगावयाला नकोच. याशिवाय दारूमुळें कलह आणि रोग वाढत असतात. दारु दुष्कीर्तीची जननीच आहे. ती लज्जेला ठार मारिते आणि बुद्धीला दुर्बळ करिते. हे गृहपतिपुत्र, ज्याला रात्रीचें बाहेर हिंडण्याचें व्यसन लागतें, त्याचा स्वतःचा देह सुरक्षित रहात नाहीं; त्याची बायको व मुलें हीं देखील सुरक्षित रहात नाहींत; त्याची संपत्ति त्याला संभाळतां येत नाहीं; आपणाला कोणी ओळखील या भयानें तो ग्रस्त होतो; खोटें बोलण्याची त्याला सवय लागते, आणि अनेक पीडा त्याच्यामागें लागत असतात. ज्याला नाटकांचें आणि तमाशांचें व्यसन लागतें, तो कोठें नाच, कोठें गायन, कोठें तमाशा, यांच्याच शोधांत असतो. (आपल्या कामाचें त्याला स्मरण रहात नाहीं.) जुगारी मनुष्याचा जुगारांत जर जय

झाला, तर त्यामुळें त्याचा इतर जुगारी लोक मत्सर करितात; पराजय झाला तर तो शोकाभिभूत होतो. त्याच्या संपत्तीचा नाश होतो, हें निराळें सांगावयाला नकोच. त्याचे आप्तमित्र त्यांच्या वचनावर विश्वास ठेवीत नाहींत; त्यांच्याकडून त्याचा वारंवार अपमान होतो; व त्याच्याशीं कोणी नवीन नातें जोडूं इच्छीत नाहीं. कांकी, हा मनुष्य कुटुंबाची काळजी घेण्यास समर्थ नाहीं, असें त्याला वाटत असतें. एकाद्या मनुष्याला दुष्ट संगति लागली म्हणजे धूर्त, दारुबाज, लबाड, चोर, वगैरे सर्व प्रकारच्या हलकट लोकांचा त्याला सहवास घडतो व त्यामुळें दिवसेंदिवस तो निकृष्ट स्थितीला जातो. आळशी मनुष्य आज फार थंडी ह्मणून आपलें काम करीत नाहीं; आज अतिशय ऊष्मा ह्मणून काम करीत नाहीं; आज फार सांज झाली ह्मणून काम करीत नाहीं; तर तर आज फारच सकाळ ह्मणून काम करीत नाहीं! अशा तीनें आजचें काम उद्यांवर टाकिल्यामुळें त्याला नवीन संपत्ति मिळवितां येत नाहीं; आणि त्याच्या पूर्वार्जित संपत्तीचा मात्र नाश होत असतो.

"चार कर्मक्लेशांचा, चार पापांच्या कारणांचा आणि विपत्तीच्या सहा द्वारांचा त्याग केल्यावर गृहस्थानें सहा दिशांच्या पूजेला आरंभ करावा; पण त्या सहा दिशा कोणत्या? आईबाप पूर्वदिशा समजावी; गुरु दक्षिणदिशा समजावी; बायकोमुलें पश्चिमदिशा, सखसोयरे उत्तरदिशा, दास आणि मजूर खालची दिशा व श्रमण आणि ब्राह्मण वरची दिशा समजावी.

"हे गृहपतिपुत्र, पूर्वदिशा जे आईबाप, त्यांच्या पूजेचीं हीं पांच अंगें आहेत:— (१) त्यांचें काम करणें; (२) त्यांचें पोषण करणें; (३) कुलांत चालत आलेलें सत्कार्य चालू ठेवणें; (४) त्यांच्या संपत्तीचे वांटेकरी होणें; आणि (५) जर कोणी त्यांपैकीं जीवंत नसेल तर त्यांच्या नांवें दानधर्म करणें. या पांच अंगानीं जर आईबापांची पूजा केली, तर ते पांच प्रकारांनीं आपल्या मुलावर अनुग्रह करितात:— (१) पापापासून त्याचें निवारण करितात; (२) त्याला कल्याणकारक मार्गाला लावितात; (३) त्याला कलाकौशल्य शिकवितात; (४) योग्य स्त्रीशीं त्याचें लग्न करून देतात; व (५) योग्य वेळीं आपली मिळकत त्याच्या स्वाधीन करितात.

"दक्षिणदिशा जे गुरु त्यांच्या पूजेचीं हीं पांच अंगें होत:— (९) गुरु जवळ आले तर उठून उभें रहाणें; (२) ते आजारी असले त्यांची सेवा करणें; (३) ते शिकवतील तें श्रद्धापूर्वक समजून घेणें (४) त्यांचें कांहीं काम पडल्यास तें करणें; आणि (५) ते जी विद्या शिकवितील तिचें उत्तम रीतीनें ग्रहण करणें. या पांच अंगांनीं गुरूची पूजा केली असतां ते शिष्यावर पांच प्रकारांनीं अनुग्रह करितात:— (१) चांगला आचार शिकवितात; (२) उत्तम रीतीनें विद्या शिकवितात; (३) आपणाला येत असलेली सर्व विद्या ते शिष्याला शिकवितात; (४) आपल्या आप्तमित्रांमध्यें त्याचे गुण वर्णन करितात; आणि (५) कोठें गेला तरी आपल्या शिष्याला पोटापाण्याची अडचण पडूं नये अशी व्यवस्था करितात.

"हे गृहपतिपुत्र, पश्चिमदिशा जी पत्नी तिच्या पूजेचीं हीं पांच अंगें होत:— (१) तिला मान देणें; (२) तिचा अपमान होऊं न देणें; (३) एक पत्नीव्रत आचरणें; (४) घरचा कारभार तिच्यावर सोंपविणें; आणि (५) वस्त्रालंकारांची तिला उणीव पडूं न देणें. या पांच अंगांनीं जर पतीनें पत्नीची पूजा केली, तर ती आपल्या पतीवर पांच प्रकारांनीं अनुग्रह करिते:— (१) घरांत चांगली व्यवस्था ठेविते; (२) नोकरचाकरांनां प्रेमानें संभाळते; (३) पतिव्रता होते; (४) पतीनें मिळविलेल्या संपत्तीचें रक्षण करिते, उधळेपणा करीत नाहीं; आणि (५) सगळ्या गृहकृत्यांत दक्ष होते.

अनुक्रमणिका

"हे गृहपतिपुत्र, उत्तरदिशा जे सखेसोयरे त्यांच्या पूजेचीं हीं पांच अंगें होत:— (१) त्यांनां देण्याजोग्या वस्तु देणें; (२) त्यांच्याशीं प्रिय भाषण करणें; (३) त्यांच्या उपयोगीं पडणें; (४) त्यांनां समान भावानें वागविणें; आणि (५) त्यांच्याशीं निष्कपट वर्तन ठेवणें. या पांच अंगांनीं जर गृहस्थानें सख्यासोयऱ्यांची पूजा केली, तर ते त्या गृहस्थावर पांच प्रकारांनीं अनुग्रह करितात:— (१) बेसावध असतां एकाएकीं कांहीं संकट आलें, तर त्या वेळीं ते याचें रक्षण करितात; (२) अशा प्रसंगीं याच्या संपत्तीचेंहि ते रक्षण करितात; (३) संकटामुळें घाबरून गेला असतां ते धीर देतात; (४) विपत्कालीं सोडून जात नाहींत; आणि (५) त्याच्यामागें त्याच्या संततीवरहि उपकार करितात.

"हे गृहपतिपुत्र, खालची दिशा जे सेवक, त्यांच्या पूजेचीं हीं पांच अंगें होत:— (१) त्यांचें सामर्थ्य पाहून त्यांनां काम सांगणें; (२) त्यांनां योग्य वेतन देणें; (३) आजारी पडले तर त्यांची शुश्रूषा करणें; (४) वारंवार त्यांनां उत्तम भोजन देणें; आणि (५) वेळोवेळीं उत्तम कामगिरीबद्दल त्यांनां बक्षीस देणें. या पांच अंगांनीं धन्यानें नोकरांची पूजा केली असतां ते आपल्या धन्यावर पांच प्रकारांनीं अनुग्रह करितात. (१) धनी उठण्यापूर्वी ते उठतात; (२) धनी निजल्यावर निजतात; (३) धन्याच्या मालाची चोरी करीत नाहींत; (४) उत्तम तऱ्हेनें काम करितात; आणि (५) धन्याचें यश गातात.

"हे गृहपतिपुत्र, वरची दिशा जे श्रमणब्राह्मण (साधुसंत) त्यांच्या पूजेचीं ही पांच अंगें होत:— (१) कायेनें त्यांचा आदर करणें; (२) वाचेनें त्यांचा आदर करणें; (३) मनानें त्यांचा आदर करणें; (४) भिक्षेला आले असतां त्यांनां आडकाठी न करणें; आणि (५) त्यांच्या उपयोगी वस्तु त्यांनां देणें. या पांच अंगांनीं गृहस्थानें जर साधुसंतांची पूजा केली तर ते त्यावर सहा प्रकारांनीं अनुग्रह करितात:— (१) पापापासून त्याचें निवारण करितात; (२) त्याला कल्याणकारक मार्गाला लावितात; (६) प्रेमपुरस्सर त्यावर अनुकंपा करितात; (४) त्याला उत्तम धर्म शिकवितात; (५) शंकानिवारण करून त्याच्या मनाचें समाधान करितात; आणि (६) त्याला स्वर्गाचा मार्ग दाखवितात.

"हे गृहपतिपुत्र, दान, प्रियवचन, अर्थचर्या ह्मणजे उपयोगी पडणें आणि समानात्मता ह्मणजे दुसऱ्याला आपणासारखें वागविणें ही चार लोकसंग्रहाचीं साधनें आहेत. आईबापांनीं जर या साधनांचा उपयोग केला नसता, तर केवळ जन्म दिला ह्मणून मुलांनीं त्यांचा गौरव केला नसता. सुज्ञ मनुष्य या चार साधनांचा यथायोग्य उपयोग करून जगामध्यें योग्यतेला चढतात."

हा बुद्धाचा उपदेश ऐकून सिगाल ह्मणाला "भगवन्! हा आपला उपदेश कितीतरी सुंदर आहे. एकाद्या मनुष्यानें झांकलेली वस्तु उघड करून दाखवावी, किंवा डोळसाला अंधारांत दिसावें या हेतूनें मशाल धरावी, अथवा वाट चुकलेल्या मनुष्याला सरळ मार्गाला लावावें, त्याप्रमाणें भगवंतानें आपल्या धर्माचें उत्तम स्पष्टीकरण केलें. मी भगवंताला, धर्माला आणि भिक्षुसंघाला शरण जातों. यावज्जीव मी आपला उपासक आहें, या नात्यानें माझा अंगीकार करा."

## [२]
## **धार्मिक व अधार्मिक चर्या**

कोणे एके समयीं बुद्धगुरु कोसल देशांत धर्मोपदेश करीत फिरत असतां शाला नांवाच्या ब्राह्मणांच्या गांवीं आला. बुद्ध तेथें पोहोंचण्यापूर्वीच त्याची कीर्ति सर्व गांवभर पसरली होती. शालेंतील ब्राह्मणांनां बुद्ध

अनुक्रमणिका

आपल्या गांवीं आला, हें वर्तमान समजल्याबरोबर ते सर्व बुद्धदर्शनाला गेले. त्यांपैकीं कांहींजण बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसले, व कांहींजण बुद्धाला कुशलप्रश्न विचारून आणि आपलें नामगोत्र सांगून एका बाजूला बसले.

ते ब्राह्मण आपापल्या आसनावर बसल्यावर बुद्धाला ह्मणाले “भो गौतम, कांहीं प्राणी मरणोत्तर नरकाला जातात व कांहीं स्वर्गाला जातात, याचें कारण काय?”

बुद्ध ह्मणाला “ब्राह्मणहो, अधार्मिक चर्येमुळें मनुष्य मरणोत्तर नरकाला जातो आणि धार्मिक आचरणामुळें स्वर्गाला जातो.”

ब्राह्मण ह्मणाले “भो गौतम, आपल्या या संक्षिप्त भाषणाचा आह्मांला बरोबर अर्थ समजला नाहीं. तेव्हां विस्तारानें याचा अर्थ सांगाल तर फार उपकार होतील.”

बुद्ध ह्मणाला “गृहस्थहो, कायेनें घडणारें अधर्माचरण तीन प्रकारचें आहे, वाचेनें घडणारें चार प्रकारचें आहे, व मनानें घडणारें तीन प्रकारचें आहे. प्राण्याचा घात करणें, परधनाचा अपहार करणें, आणि परदाराभिलाष करणें, हीं तीन कायेनें घडणारी पापकर्मे होत. असत्य बोलणें, चहाडी करणें, शिवीगाळ करणें, आणि वृथा बडबड करणें, ही चार वाचेनें घडणारीं पापकर्मे होत. परद्रव्याचा लोभ धरणें, दुसऱ्याच्या नाशाची इच्छा असणें, आणि नास्तिकदृष्टि असणें, हीं तीन मानसिक पापें होत. गृहस्थहो, या दहा प्रकारच्या अधार्मिक आचरणामुळें मनुष्यप्राणी मरणोत्तर दुर्गतीला जातो.

“पण गृहस्थहो, एकादा मनुष्य प्राणघातापासून निवृत्त होतो; सर्व भूतमात्राविषयीं त्याच्या अंतःकरणांत दया वास करते; तो दुसऱ्याच्या वस्तूंचा अपहार करीत नाहीं; व परदाराभिलाष करीत नाहीं. याप्रमाणें त्याचें कायकर्म धार्मिक होत असतें. तो कधींहि खोटें बोलत नाहीं; न्यायासनासमोर साक्षी देण्यास बोलाविलें असतां पाहिलेली गोष्ट पाहिली आहे असें सांगतो, व न पाहिलेली गोष्ट पाहिली नाहीं असें सांगतो, तो चहाडी करीत नाहीं, एवढेंच नव्हे, तर होतां होईल तों इतर लोकांचीं भांडणें मिटविण्याची खटपट करितो; व ज्यांचीं भांडणें मिटलीं असतील त्यांचीं तीं पुनः होऊं नयेत असा प्रयत्न करितो; त्याला लोकांच्या एकीनें आनंद होतो, आणि त्याच्या वचनामध्यें इतकें माधुर्य असतें, कीं, त्यामुळें भिन्न झालेलीं मनें मिलाफ पावतात. तो कधीं शिवीगाळ करीत नाहीं; कोणाला कर्कश शब्द बोलत नाहीं; त्याचें हृदयंगम भाषण लोकांनां फार आवडतें. तो वायफळ भाषण करीत नाहीं; योग्यवेळीं मितभाषण करितो. याप्रमाणें तो वाचेनें पुण्याचरण करितो. तो मनानें दुसऱ्याच्या धनाचा लोभ करीत नाहीं. परघात त्याच्या मनाला शिवत नाहीं, एवढेंच नव्हे, रात्रंदिवस सर्व प्राणी सुखी असावे, अशी वासना त्याच्या मनामध्यें जागृत असते. नास्तिक दृष्टि त्याच्या मनाला शिवत देखील नाहीं; सत्कर्मावर आणि सद्धर्मावर त्याचा पूर्ण विश्वास असतो. याप्रमाणें तो मनानें पुण्याचरण करितो. गृहस्थहो, असा पुण्यशील प्राणी देहावसानानंतर सुगतीला जातो.”

[३]

## आर्य उपोसथ [१८२ पानावरील टीप पहा.]

एके समयीं बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें विशाखेनें भिक्षुसंघासाठीं बांधिलेल्या प्रासादांत रहात होता. एका उपोसथाच्या दिवशीं विशाखा मिगारमाता तेथें आली, आणि भगवंताला नमस्कार करून एका बाजूला बसली. तेव्हां बुद्ध ह्मणाला "विशाखे, आज सकाळींच कोणीकडे चालली आहेस?"

विशाखा ह्मणाली "भगवन्, आज उपोसथव्रत पाळण्यासाठीं मी येथें आलें आहें."

बुद्ध ह्मणाला "विशाखे, गोपालक उपोसथ, निर्ग्रंथ उपोसथ, आणि आर्य उपोसथ, असे उपोसथांचे तीन प्रकार आहेत. लोकांच्या गाई राखणारा गवळी संध्याकाळीं सर्व गाई मालकाच्या स्वाधीन करून उद्यांचा विचार करीत बसतो, कीं 'उद्यां मी अमुक ठिकाणीं गाईला चारीन व अमुक ठिकाणीं पाणी देईन.' त्याचप्रमाणें विशाखे, एकादा उपासक उपोसथाच्या दिवशी असा विचार करीत बसतो, कीं 'आज मीं अमुक अमुक खाल्लें; उद्यां याच वेळीं मी अमुक अमुक खाईन.' तो सर्व दिवस जेवणाच्या किंवा इतर पदार्थांच्या चिंतनांत घालवितो. अशा माणसाच्या उपोसथाला मी गोपालक उपोसथ असें ह्मणतों.

"विशाखे, निर्ग्रंथ नांवाचे श्रमण आहेत, हें तुला माहीतच आहे. ते उपोसथाच्या दिवशीं श्रावकांनां असा उपदेश करितात, कीं, पूर्वेच्या दिशेला शंभर योजनेंपर्यंत प्राण्यांचा वध करणार नाहीं असा निश्चय करा; पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या दिशांलाहि शंभर योजनेंपर्यंत प्राण्याचा वध करणार नाहीं, असा निश्चय करा. याप्रमाणें ते कांहीं प्राण्यांवर दया करण्याविषयीं सांगतात, व कांहीं प्राण्यांवर दया करण्याविषयी सांगत नाहींत. आणखी ते आपल्या उपासकांला असा उपदेश करितात, कीं, तूं सर्व वैर टाकून देईन असें बोल — 'मी कोठेंहि नसून कोणाचाहि कांहींच होत नाहीं; माझें कोठेंहि कांहींच नाहीं.' हा जरी असें बोलत असतो, तरी तो आपल्या आईबापांनां आईबाप ह्मणावयाचें सोडीत नाहीं. त्यालाहि त्याचे आईबाप आपला मुलगा ह्मणावयाचें सोडून देत नाहींत. तो आपल्या बायकोला बायको असें जाणतो, व त्याची बायको त्याला पूर्वीप्रमाणेंच आपला पति समजते. त्याचे नोकर त्याला आपला स्वामी असें समजतात, व तो देखील आपल्या नोकरांनां आपले सेवक असेंच समजतो. तेव्हां उपोसथाच्या दिवशींची 'मी कोठेंहि नसून कोणाचाहि नाहीं' इत्यादिक त्याची प्रतिज्ञा खोटी ठरते. ज्या दिवशीं खरें बोलण्याचा अभ्यास करावा, त्याच दिवशीं खोटें बोलण्याला शिकवल्यासारखें होतें. तोच निर्ग्रंथाचा उपासक दुसऱ्या दिवशीं कोणीं न दिलेल्या वस्तूंचेंदेखील ग्रहण करितो. ह्मणजे दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करण्यांत त्याला दोष दिसत नाहींत. विशाखे, अशा माणसानें केलेल्या उपोसथाला निर्ग्रंथ उपोसथ असें ह्मणतात. पण हा उपोसथ महत्फलदायक होत नाहीं.

"आतां आर्य उपोसथ कसा असतो हें सांगतों. आर्य उपासक उपोसथाच्या दिवशीं बुद्धाचें स्मरण करितो. 'याप्रमाणें तो भगवान् सम्यक् संबुद्ध, सुगत, सर्व लोकांचें अंतःकरण जाणणारा, विद्या आणि आचरणानें युक्त, दमन करण्याला योग्य अशा माणसाचा सारथी, आणि देव व मनुष्यांचा गुरु होय.' अशा तऱ्हेनें तथागताचें अनुस्मरण केलें असतां चित्त प्रसन्न होतें आणि चित्ताचा मल नष्ट होतो.

"त्याचप्रमाणें आर्यश्रावक धर्माचें अनुस्मरण करितोः— 'भगवंतानें धर्म उत्तम प्रकारें उपदेशिला आहे; साधूंनीं त्याचा अनुभव घेण्याला तो योग्य आहे; तो अकालफल देणारा आहे; त्याचा प्रत्यक्ष अनुभव

अनुक्रमणिका

येण्यासारखा आहे; तो जवळ बाळगण्यालायक आहे; आणि सुज्ञांनीं अंतःकरणामध्यें त्याचा साक्षात्कार करून घेणें योग्य आहे.' याप्रमाणें धर्माचें स्मरण केलें असतां आर्यश्रावकाचें मन प्रसन्न होतें; आणि चित्ताचा मल नष्ट होतो.

"आणखी आर्यश्रावक संघाचें अनुकरण करितो:— 'भगवंताचा श्रावकसंघ सरळ मार्गानें चालतो, ऋजुमार्गानें चालतो, न्यायमार्गानें चालतो. सम्यक्मार्गानें चालतो. या संघामध्यें आठ प्रकारच्या सत्पुरुषांचा [सोतापत्तिमग्ग, सोतापत्तिफल, सकदागामिमग्ग, सकदागामिफल, अनागाभिमग्ग, अनागामिफल, अरहत्तमग्ग आणि अरहत्तफल अशा निर्वाण मार्गाच्या आठ पायऱ्या आहेत. त्यांनां अनुसरून निर्वाणमार्गाला लागलेल्या साधूंचे आठ भेद होतात. यासंबंधानें थोडी माहिती बुद्ध, धर्म आणि संघ या पुस्तकांत (पा. ९९) दिली आहे. विशेष माहिती पालिग्रंथांत पहा.] समावेश होतो. हा जो भगवंताचा श्रावकसंघ आहे, तो दक्षिणेला आणि नमस्काराला योग्य आहे. हें एक लोकांनां उत्तम पुण्यक्षेत्रच आहे.' याप्रमाणें संघाचें अनुस्मरण केलें असतां श्रावकाचें चित्त प्रसन्न होतें, व चित्ताचा मल नष्ट होतो.

"आणखी विशाखे, आर्यश्रावक आपल्या शीलाचें अनुस्मरण करितो. ज्याज्या प्रसंगीं आपल्या शीलाला खंड पडूं न देतां, भंग होऊं न देतां, श्रावकानें त्याचें (शीलाचें) पालन केलें असेल, त्या त्या प्रसंगाचें अनुस्मरण केलें असतां श्रावकाचें चित्त प्रसन्न होतें. त्याचप्रमाणें महानुभाव देवतांचें अनुस्मरण केलें असतां, आणि आपण दिलेल्या दानाचें अनुस्मरण केलें असतां चित्त प्रसन्न होतें.

"आणखी विशाखे, उपोसथाच्या दिवशीं आर्यश्रावक असा विचार करितो, कीं 'आज मी प्राणातिपातापासून विरत झालों आहें; भूतमात्रांविषयीं माझ्या मनांत दया उत्पन्न झाली आहे, प्रेम उत्पन्न झालें आहे. मी अदत्तादानापासून (चोरीपासून) विरत झालों आहें; दिलेल्याच वस्तूचा प्रतिग्रह करण्याचा मीं निश्चय केला आहे, व येणेंकरून माझा आत्मा पवित्र झाला आहे. मी अब्रह्मचर्यापासून विरत झालों आहें; ग्राम्य धर्मापासून विरत होऊन मी आज श्रेष्ठ ब्रम्हचर्य पाळीत आहें. मी असत्य भाषणापासून विरत झालों आहें; आजपासून मीं सत्य बोलण्याचा निश्चय केला आहे; जेणेंकरून माझ्या वचनावर लोकांचा विश्वास बसेल, लोकांनां माझ्या बोलण्याचा प्रत्यय येईल. मी सर्व प्रकारच्या मादक पदार्थांपासून विरत झालों आहें; मी विकालभोजनापासून विरत झालों आहें; मी दुपार होण्यापूर्वी एकच जेवण जेवणार आहें. मनोविकार उद्दीप्त करणाऱ्या नृत्यगीतवाद्यापासून आणि माला, गंध, मंडनविभूषण इत्यादिकांपासून मी विरत झालों आहें. उंची शय्येपासून मी विरत झालों आहें; आजचा दिवस मी अगदीं साध्या शय्येवर निजणार आहें. हे आठ नियम पाळल्यानें मी महानुभाव अर्हन्तांचें अनुकरण करीत आहें.' विशाखे, याप्रमाणें आर्यश्रावकानें उपोसथव्रत पालन केलें असतां तें महत्फलद होतें."

[४]

## आर्यश्रावकानें सात पापकर्मे वर्ज्य केलीं पाहिजेत

एके वेळीं बुद्धगुरु कोसल देशामध्यें धर्मोपदेश करीत फिरत असतां वेणुद्वार नांवाच्या ब्राह्मणांच्या गांवीं आला. वेणुद्वारवासी ब्राह्मणांनीं बुद्धाची कीर्ति पूर्वीच ऐकिली होती. ते सर्व एकत्र जमून बुद्धाच्या दर्शनाला आले. त्यांतील कांहींजण बुद्धाला नमस्कार करून बाजूला बसले, कांहींजण आपलें नामगोत्र कळवून एका बाजूला बसले, व कांहींजण बुद्धाचा कुशलसमाचार विचारून एका बाजूला बसले, आणि ते बुद्धाला ह्मणाले "भगवन्, आह्मी आमच्या बायकामुलांसहवर्तमान राहून सुगंधी चंदन वगैरे उपभोग्य पदार्थांचा उपभोग घेऊन आणि द्रव्यसंचय करून सगतीला जाऊं, असा आह्मांला धर्मोपदेश करा."

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला “गृहस्थहो, आपल्यासारखेंच परक्याला लेखावें यासंबंधांनें मी तुह्मांला उपदेश करितों, त्याचें सावधानपणें श्रवण करा.”

“गृहस्थहो, आर्यश्रावक असा विचार करितो, कीं, मला जगण्याची इच्छा असून मरणाची इच्छा नाहीं; सुखाची इच्छा असून दुःखाची इच्छा नाहीं; असें असतां मीं जर माझ्याप्रमाणेंच सुखाची इच्छा करणाऱ्या प्राण्याला ठार मारिलें तर तें त्याला कसें आवडेल?’ ह्मणून आर्यश्रावकानें स्वतः प्राणघातापासून विरत झालें पाहिजे, आणि दुसऱ्यालाहि प्राणघातापासून विरत करण्याची खटपट केली पाहिजे.

“गृहस्थहो, आपलें द्रव्य चोरलें गेलें, तर त्यापासून आपणाला दुःख होतें. ह्मणून आर्यश्रावक चोरी करीत नाहीं, व दुसऱ्यालाहि चोरीपासून परावृत्त होण्यासाठीं उपदेश करितो.

“गृहस्थहो, ‘आपल्या स्त्रीशीं परक्यानें व्यभिचार केला असतां आपणाला खपत नाहीं; तेव्हां आपण परदारागमन केलें तर तें दुसऱ्याला कसें खपेल?’ असा विचार करून आर्यश्रावक परदारागमनापासून विरत होतो; व्यभिचारकर्म न करण्याविषयीं तो इतरांनां उपदेश करितो, व अव्यभिचारी आचरणाची स्तुति करितो.

“गृहस्थहो, ‘परक्यानें खोटी साक्ष देऊन आपलें केलेलें नुकसान आपणाला आवडत नाहीं; तेव्हां असत्य भाषणानें मीं दुसऱ्याची हानि केली असतां त्याला ती कशी आवडेल?’ असा विचार करून आर्यश्रावक असत्य भाषणापासून परावृत्त होतो, दुसऱ्यालाहि खरे बोलण्याविषयीं उपदेश करितो, आणि प्रामाणिकपणाची प्रशंसा करितो.

“गृहस्थहो, ‘परक्यानें चहाडी करून आपणामध्यें आणि आपल्या मित्रांमध्यें वितुष्ट पाडिलें असतां तें आपणास खपत नाहीं. तेव्हां मी जर चहाडीच्या योगें इतर लोकांमध्यें फूट पाडूं लागलों, तर तें त्यांनां कसें आवडेल?’ असा विचार करून आर्यश्रावक चहाडी करीत नाहीं, चहाडी न करण्याविषयीं तो इतरांनां उपदेश करितो, व तडजोड करणाऱ्या माणसांची स्तुति करितो.

“गृहस्थहो, ‘परक्यानें शिवीगाळ केली असतां ती आपणाला आवडत नाहीं; त्याचप्रमाणें आपण केलेली शिवीगाळ दुसऱ्याला आवडणार नाहीं.’ असा विचार करून आर्यश्रावक वाईट शब्द बोलण्याचें सोडून देतो, सभ्य भाषण करण्याविषयीं इतरांनां उपदेश करितो, आणि संभावित भाषणाची स्तुति करितो.

“गृहस्थहो, ‘परका मनुष्य आपणापाशीं येऊन वृथा बडबड करूं लागला, तर त्याचा आपणाला कंटाळा येतो; तेव्हां आपण निरुपयोगी संभाषण करून दुसऱ्याचा वेळ घेतला असतां तें त्याला कसें आवडेल?’ असा विचार करून आर्यश्रावक वृथा भाषणापासून विरत होतो, निरुपयोगी भाषण न करण्याविषयीं लोकांनां उपदेश करितो, व मितभाषणाची स्तुति करितो.

“गृहस्थहो, अशा आर्यश्रावकाची बुद्धावर, धर्मावर, आणि संघावर श्रद्धा जडते. त्याचें शील अत्यंत परिशुद्ध होतें. कांकीं, प्राणघात, चोरी, व्यभिचार, असत्य भाषण, चहाडी, वाईट शब्द आणि वृथा भाषण या सात पापकर्मांपासून मुक्त होऊन तो सदाचरणानें वागतो.”

अनुक्रमणिका

[५]

## सात प्रकारची भार्या

भगवान् बुद्ध श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात असतां एके दिवशीं सकाळीं आपलें पात्र आणि चीवर घेऊन अनाथपिंडिकाच्या घरीं गेला, व त्यानें मांडलेल्या आसनावर बसला. त्या वेळीं अनाथपिंडिकाच्या घरांत मोठा गलबला चालला होता. तो ऐकून बुद्धगुरु अनाथपिंडिकाला ह्मणाला "हे गृहपति, तुझ्या घरच्या माणसांची कोण ही गडबड! जणूं काय धीवर मासे लुबाडीत आहेत!"

अनाथपिंडिक ह्मणाला "भगवन्, ही माझी सून सुजाता मोठ्या घराण्यांतील मुलगी आहे. ती कोणाचीच पर्वा करीत नाहीं. ज्याच्या-त्याच्यावर संतापते."

बुद्धानें सुजातेला बोलावून आणलें, आणि तिला विचारलें "सुजाते, वधकासारखी, चोरासारखी, धन्यासारखी, आईसारखी, बहिणीसारखी, मित्रासारखी, आणि दासीसारखी अशा या सात प्रकारच्या भार्या सांगितल्या आहेत; त्यापैकीं तूं कोणत्या प्रकारची आहेस बरें?"

सुजाता ह्मणाली "भगवन्, आपल्या या संक्षिप्त भाषणाचा मला अर्थ समजला नाहीं. मला तें नीट समजावून द्या."

बुद्ध ह्मणाला "नवऱ्याविषयीं जिच्या अंतःकरणांत प्रेमाचा लेश नाहीं, जिला केवळ पैशानेंच विकत घेतलें, अशी व्यभिचारिणी स्त्री मारेकऱ्यासारखी आहे, असें समजावें. नवऱ्यानें मिळवलेल्या धनांतून थोडेंबहुत चोरून ठेवण्याची इच्छा करिते, ती चोरासारखी आहे, असें समजावें. जी काम करीत नाहीं पण पुष्कळ खाते, नवऱ्याला शिव्या देण्यांत कसूर करीत नाहीं, आणि नवऱ्याची चांगली कामगिरी कस्पटाप्रमाणें लेखते, ती धन्यासारखी होय. जी आपल्या नवऱ्याची एकुलत्या एक पुत्राप्रमाणें काळजी घेते, आणि नवऱ्यानें मिळविलेल्या संपत्तीचा संभाळ करते, त्या स्त्रीला आईची उपमा देण्यांत येते. जशी धाकटी बहीण वडील भावाला मान देत असते, तशी जी स्त्री आपल्या नवऱ्याला मान देते व त्याच्या वचनांत वागते, तिला भगिनीची उपमा देत असतात. जी पतीला पाहिल्याबरोबर अत्यंत हर्षभरित होते, जणूं काय एकादा मित्र आपल्या मित्राला चिरकाळानें भेटत आहे, अशा कुलीन आणि शीलवती भार्येला मित्राची उपमा देत असतात. नवरा संतापला तरी जी संतापत नाहीं, एवढेंच नव्हे, तर जिच्या अंतःकरणांत नवऱ्याविषयीं वाईट विचार कधींहि येऊं शकत नाहीं, तिला दासीसारखी भार्या असें ह्मणतात. सुजाते, या सातांपैकीं तूं कोणत्या प्रकारची भार्या होऊं इच्छितेस?"

सुजाता ह्मणाली "भगवन्! आजपासून मी माझ्या पतीची दासीसारखी भार्या होईन."

[६]

## चित्ताचेंच रक्षण केलें पाहिजे

बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें रहात असतां अनाथपिंडिकाला ह्मणाला "हे गृहपति, मनुष्यानें चित्ताचें जर रक्षण केलें नाहीं, तर त्याचें कायकर्म, वाक्कर्म, आणि मानसिक कर्म अरक्षित होत असतें; आणि त्यामुळें त्याचीं हीं तिन्ही कर्मे विकारवश होतात. एवढेच नव्हे, तर हळुहळू त्याची काया, वाचा, आणि मन हीं तिन्ही

अनुक्रमणिका

बिघडत जातात, आणि त्याला मरणदेखील सुखानें येत नाहीं. एकाद्या घराचें छप्पर जर वाईट असलें, तर त्या घराच्या भिंती वगैरे सर्व कांहीं अरक्षित होतें, व हळुहळू सर्व घर विकृत होऊन नष्ट होतें. याप्रमाणें हे गृहपति, जर एक चित्त संभाळलें नाहीं, तर त्यामुळें माणसाचीं सर्व कर्मे विकृत होऊन त्याचा अत्यंत अनिष्ट परिणाम होतो. तेंच जर चित्त संभाळलें गेलें, तर सर्व कर्मे सुरक्षित होत असतात, व त्यामुळें मनुष्याला सुखानें मरण येतें. घराचें छप्पर जर सुरक्षित असलें तर भिंती वगैरे सर्व कांहीं सुरक्षित रहातें. त्याप्रमाणें मनुष्याचें चित्त सुरक्षित असलें, तरच त्याची सर्व कर्मे सुरक्षित रहातात.

**यथागारं दुच्छन्नं वुट्ठि समतिविज्झति**
**"एवं अभावितं चित्तं रागो समतिविज्झति ।"**
**यथागारं सुच्छन्नं वुट्ठि न समतिविज्झति**
**"एवं सुभावितं चित्तं रागो न समतिविज्झति ।"**

**—धम्मपद.**

[७]

## सात धनें

भगवान् बुद्ध श्रावस्तीमध्यें रहात असतां उग्र नांवाचा राजाचा मंत्री त्याजवळ आला, आणि नमस्कार करून एका बाजूला बसल्यावर ह्मणाला "भगवन्, हा आमचा मिगार सावकार कितीतरी श्रीमंत आहे ह्मणून सांगूं! त्याच्याजवळ केवळ सोन्याचेंच नाणें लाखांनीं निघेल, मग रुप्याची गोष्ट काय सांगावी!"

बुद्ध ह्मणाला "हे उग्र, अशा प्रकारच्या धनाला महत्त्व नाहीं असें मी ह्मणत नाहीं; तथापि त्याला अग्नि, उदक, राजेलोक, चोर, लुटारू, आणि आपले दायाद यांच्यापासून भीति असतेच. ह्मणून त्याला श्रेष्ठ धन ह्मणता येत नाहीं. पण हे उग्र, श्रद्धा, शील, लज्ञा, अवत्रप्य, श्रुत, त्याग, आणि प्रज्ञा, हीं सात धनें सोन्यारुप्यासारखीं चंचल नाहींत. त्यांचा अग्नीनें किंवा उदकानें नाश होण्यासारखा नाहीं; दुष्ट राजे, दरोडेखोर किंवा आपले अहितचिंतक दायाद या धनांचा अपहार करूं शकणार नाहींत.

आतां या सातांचा अर्थ सांगतों. श्रद्धा ह्मणजे आर्यश्रावकाचा तथागतावर पूर्ण विश्वास असणें. शील पांच प्रकारचें आहे. आर्यश्रावक प्राणघातापासून निवृत्त होतो, अदत्तादानापासून निवृत्त होतो, व्यभिचारकर्मापासून निवृत्त होतो, असत्यभाषणापासून निवृत्त होतो, आणि मादक पदार्थांपासून निवृत्त होतो. या पांच नियमांचें यथार्थतया पालन करणें हेच शीलधनाचें रक्षण होय. लज्ञा ह्मणजे पापकर्म करण्याविषयीं लाजणें. 'आपण चांगल्या कुलांत जन्मलों असून, सद्धर्माचें आपणाला ज्ञान झालें असून पापकर्माला प्रवृत्त होणें हें आपणाला शोभेल तरी कसें!' अशा विचारानें पापकर्माचा कंटाळा करणें यालाच लज्ञा ह्मणतात. अवत्रप्य ह्मणजे लोकापवादाचें भय. आपण पापाचरण केलें असतां लोक आपल्याला काय ह्मणतील, याची मनांत भीति बाळगणें, यालाच अवत्रप्य असें ह्मणतात. ज्यांपासून जगाचें कल्याण होईल अशा गोष्टींचें श्रवण करणें, व अशा गोष्टी चांगल्या माहीत असणें, याला श्रुतधन असें ह्मणतात. यथाशक्ति दानधर्म करणें, याला त्यागधन ह्मणतात. चार आर्यसत्यांचें व इतर सद्धर्माचें अप्रतिहत ज्ञान असणें, याला प्रज्ञाधन असें ह्मणतात. ज्या स्त्रीजवळ किंवा पुरुषाजवळ हीं सात धनें आहेत, तीच स्त्री अथवा तोच पुरुष खरा श्रीमंत असें मी समजतों. कांकीं, इहपरलोकीं त्यांच्या या धनाचा कोणीच अपहार करूं शकत नाहीं.

अनुक्रमणिका

**सद्धाधनं सीलधनं हिरिओत्तपियं धनं**
**सुतधनं च चागो च पत्त्रा वे सत्तमं धनं ।**
**यस्स एते धना अत्थि इत्थिया पुरिसस्सवा**
**अदळिद्दोऽति तं आहु अमोघं तस्स जीवितं ।**

—अंगुत्तर — सत्तनिपात.

[८]

## पांच गोष्टींचें सतत चिंतन करावें

श्रावस्तीमध्यें रहात असतां बुद्धगुरु भिक्षूंना ह्मणाला “भिक्षुहो, मी जराधर्मी आहें, व्याधिधर्मी आहें, मरणधर्मी आहें, सर्व प्रिय वस्तूंचा आणि मनुष्यांचा मला वियोग घडणार आहे, व मी जें वाईट किंवा बरें कर्म करीन त्याचा दायाद होईन, कर्म हेंच माझें धन आहे आणि कर्मच माझा बांधव आहे,” या पांच गोष्टींचें प्रत्येकानें — मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो, प्रव्रजित असो किंवा गृहस्थ असो — वारंवार स्मरण करावें.

“भिक्षुहो, ‘मी जराधर्मी आहें’ असा विचार केला असतां मनुष्याचा तारुण्यमद नष्ट होतो. या तारुण्यमदाच्या योगें मनुष्य कायेनें, वाचेनें आणि मनानें पाप करीत असतो; पण जो आपण जराधर्मी आहों याची आठवण ठेवतो, त्याचा हा मद नाश पावतो किंवा निदान कमी तरी होतो. हा या गोष्टीच्या चिंतनापासून फायदा आहे. ‘मी व्याधिधर्मी आहें’ या चिंतनापासून असा फायदा आहे, कीं, ज्याच्या योगें मनुष्य त्रिविध पापें आचरितो, तो आरोग्यमद नष्ट होतो. निदान कमी तरी होतो. ‘मी मरणधर्मी आहें’ या गोष्टीचें चिंतन केलें असतां मनुष्याचा जीवितमद नष्ट होतो. हा या चिंतनापासून फायदा आहे. ‘सर्व प्रिय वस्तूंचा आणि मनुष्यांचा मला वियोग होणार आहे’ या गोष्टीचें स्मरण ठेविलें असतां मनुष्य प्रियवस्तूसाठीं किंवा मनुष्यांसाठीं पापाचरणाला प्रवृत्त होत नाहीं, व वियोगदुःखाला बळी पडत नाहीं. ‘बऱ्या वाईट कर्माचा मी वांटेकरी होईन, कर्म हेंच माझें धन आणि कर्म हाच बांधव,’ या गोष्टीचें चिंतन केलें असतां मनुष्य पापकर्मापासून निवृत्त होतो. हा या गोष्टीच्या चिंतनापासून फायदा आहे.”

[९]

## गेल्याचा शोक वृथा!

कोणे एके समयीं बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें जेतवनांत अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात होता. एके दिवशीं राजा पसेनदिकोसल जेतवनामध्यें येऊन बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसला. इतक्यांत राजवाड्यांतून राजाची आवडती राणी मल्लिका परलोकवासी झाल्याचें वर्तमान आलें. तें ऐकून राजा शोकाकुल झाला. तेव्हां बुद्ध ह्मणाला “महाराज, जराधर्मी पदार्थाला जरा न यावी, मरणधर्मी पदार्थाला मरण न यावें, व्ययधर्मी पदार्थाचा व्यय न व्हावा, आणि नाशवंत पदार्थाचा नाश न घडावा, असें ब्रह्मदेव देखील करूं शकणार नाहीं! पण महाराज, अशा प्रसंगीं अज्ञजन असा विचार करीत नाहीं, कीं, ‘माझ्याच आवडत्या मनुष्याला जरा, मरण, व्याधि येतात असें नाहीं; हा सर्व जगाचा धर्म आहे. प्राणीमात्र जरामरणानें ग्रासिले आहेत. ’ आणि महाराज, अज्ञ मनुष्याला याप्रमाणें यथार्थतया विचार करितां न आल्यामुळें शोक उत्पन्न होतो, त्याला व्यवसाय सुचत नाहीं, अन्न रुचत नाहीं, त्याची अंगकांति नष्ट होते, कामकाज बंद पडतें, आणि त्याचे शत्रु आनंदित होत असतात. पण महाराज, आर्यश्रावकाची गोष्ट याहून भिन्न आहे. तो जराधर्मी जीर्ण झाला असतां, व्याधिधर्मी व्याधित झाला असतां, मरणधर्मी मरण पावला असतां, क्षयधर्मी

अनुक्रमणिका

क्षीण झाला असतां, किंवा नाशधर्मी नाश पावला असतां यथार्थतया विचार करतो. प्राणिमात्र या विकारांनीं बद्ध झाले आहेत असें पाहून तो शोक करीत नाहीं. तो आपल्या अंतःकरणांतील विषारी शोकशल्य काढून टाकतो – ज्या शल्यानें विद्ध झाला असतां मूर्ख मनुष्य आपलीच हानि करून घेतो – पण अशा वेळीं आर्यश्रावक शोकरहित होऊन निर्वाणमार्गाचा लाभ करून घेतो."

[१०]

## बुद्धीचीं पांच आवरणें

बुद्धगुरु श्रावस्ति येथें जेतवनउद्यानांत अनाथपिंडिकाच्या आश्रमांत रहात असतां, संगारव ब्राह्मण त्याजपाशीं आला, आणि कुशलप्रश्नादिक विचारून एका बाजूला बसल्यावर त्याला ह्मणाला "भो गौतम, एकाद्या वेळीं पुष्कळ काळपर्यंत परिचित असलेले देखील वेदमंत्र मला आठवत नाहींत; मग तोंडपाठ येत नसलेल्या मंत्रांची गोष्ट काय सांगावी! पण असें होण्याचें कारण कोणतें, तें आपण सांगाल काय?"

बुद्ध ह्मणाला "हे ब्राह्मण, ज्या वेळीं कामविकारानें मनुष्याचें चित्त व्यग्र होऊन जातें, व कामविकाराच्या उपशमाचा मार्ग त्याला माहीत नसतो, त्या वेळीं त्याला आत्मार्थ काय हें समजत नाहीं, परार्थ काय हें समजत नाहीं, आणि पुष्कळ दिवस परिचत असलेले मंत्रदेखील त्याला आठवत नाहींत. ज्या वेळीं त्याचें चित्त क्रोधानें पराभूत झालें असतें किंवा आळसानें मंदावलें असतें, अथवा इतस्ततः भ्रांत झालें असतें, किंवा संशयग्रस्त झालें असतें, तेव्हां आपलें किंवा परक्याचें हित कशांत आहे हें तो यथार्थतया जाणत नाहीं, आणि चिरकाल परिचित असलेले मंत्रदेखील त्याला आठवत नाहींत.

"हे ब्राह्मणा, भांड्यांतील पाण्यामध्यें निळा किंवा काळा रंग टाकला असतां त्यांत आपली पडछाया दिसत नाहीं, त्याचप्रमाणें ज्याचें चित्त कामविकारानें व्यग्र झालें असेल, त्याला आपल्या हिताहिताचें ज्ञान होत नाहीं. तेंच पाण्याचें भांडे संतप्त झालें असतां त्यांतून वाफा निघतील, व पाणी उकळूं लागेल. अशा वेळी मनुष्याला आपलें प्रतिबिंब त्या पाण्यामध्यें दिसणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्य क्रोधाभिभूत झाला असतां त्याला आत्महित कशांत आहे हें समजणें शक्य नाहीं. त्या भांड्यांतील पाणी जर शेवाळानें भरलें असलें, तर देखील माणसांनां आपलें प्रतिबिंब त्यांत दिसणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्याच्या मनाला आळसानें ग्रासलें, त्याला आपलें हित समजण्यासारखें नाहीं, मग परक्याचें हित समजणें तर बाजूलाच राहिलें! तें पाणी जरी वाऱ्यानें हालूं लागलें, तरी देखील त्यांत आपलें प्रतिबिंब दिसणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्याचें चित्त भ्रांत झालें असेल, त्याला आत्मपरहित कशांत आहे हें समजणार नाहीं. तेंच पाणी जर गढूळ झालें असलें, तरी त्यांत देखील आपलें प्रतिबिंब नीट दिसणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्याचें चित्त संशयग्रस्त झालें असेल, त्याला आपलें किंवा परक्याचें हिताहित समजणार नाहीं. तेंच पाणी जर स्वच्छ व शांत असलें, तर त्यांत मनुष्याला आपलें प्रतिबिंब स्पष्टपणें पहातां येतें. त्याचप्रमाणें ज्याचें चित्त कामच्छंद, व्यापाद (क्रोध), आळस, भ्रांतता आणि संशयग्रस्तता या पांच आवरणांपासून विमुक्त झालें असेल, त्यालाच आत्मपरहित यथार्थतया समजतें.

"हे ब्राह्मण, या पांच आवरणांच्या परिहाराचा उपाय ह्मटला ह्मणजे सात बोध्यंगांची (ज्ञानाच्या अंगांची) भावना होय. (१) स्मृति, [जागृति किंवा विवेक.] (२) धर्मप्रविचय, [मनोवृत्तींचें पृथक्करण करण्याचें सामर्थ्य किंवा प्रज्ञा.] (३) वीर्य, [सत्कर्मे करण्याविषयीं मानसिक उत्साह.] (४) प्रीति, [सत्कर्मांमुळें प्राप्त होणारा आनंद.] (५) प्रश्नब्धि, [चित्ताची शांतता, किंवा चित्तसुख.] (६) समाधि, [चित्ताची एकाग्रता.] आणि (७) उपेक्षा. [चित्ताची मध्यस्थावस्था.] ही सात ज्ञानाची अंगें होत. या सात बोध्यंगांची भावना केली असतां मनुष्याचें चित्त सर्व आवरणांपासून मुक्त होतें."

अनुक्रमणिका

[११]

## बोध्यंगांची भावना

बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें रहात असतां भिक्षूंनां उद्देशून ह्मणाला “भिक्षुहो, ज्या वेळीं चित्त जड झालेलें असतें, त्या वेळीं प्रश्रब्धि, समाधि आणि उपेक्षा या तीन बोध्यंगांची भावना करणें योग्य होणार नाहीं. एकाद्या माणसाला आग पेटवावयाची असेल, आणि तो जर ओलीं लांकडें, गोंवऱ्या व ओलें गवत घालून आग फुंकूं लागला, तर ती पेटेल काय? त्याचप्रमाणें ज्याचें चित्त जड झालें असेल, तो जर प्रश्रब्धि, समाधि आणि उपेक्षा या तीन संबोध्यंगांची भावना करूं लागला, तर त्याच्या चित्ताला उत्तेजन मिळणार नाहीं. आधींच चित्त जड झालेलें असतें, व तें या तीन बोध्यंगांच्या योगें आवरतां येणे शक्य नसतें. पण त्या वेळीं धर्मप्रविचय, वीर्य, आणि प्रीति या तीन संबोध्यंगांची भावना फारच उपयोगी आहे. कांकीं, यांमुळें जड झालेल्या चित्ताला उत्तेजन मिळतें. एकाद्या माणसाला आग पेटवावयाची असेल, व जर त्यानें सुकीं लांकडें, गोवऱ्या व सुकें गवत घालून तें पेटविण्याचा प्रयत्न केला, तर ती पेटण्यास विलंब लागणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्याचें चित्त जड झालें असेल, त्यानें धर्मप्रविचय, वीर्य आणि प्रीति या तीन संबोध्यंगांची भावना केली, तर त्याचें जाड्य निघून जाऊन त्याच्या चित्ताला उत्तेजन मिळाल्यावांचून रहाणार नाहीं.

“पण भिक्षुहो! ज्या वेळीं चित्त भ्रांत झालें असेल, त्या वेळीं धर्मप्रविचय, वीर्य आणि प्रीति, या तीन संबोध्यंगांची भावना करणें योग्य नाहीं. कांकीं, यांच्या भावनेमुळें चित्ताच्या भ्रांततेचा उपशम न होता, तें विशेष भ्रांत होईल. एकाद्या माणसाला पेटलेली आग विझवावयाची असली, व ती विझविण्यासाठीं जर त्यानें वाळलेल्या लांकडांचा, गोवऱ्यांचा आणि गवताचा उपयोग केला, तर ती आग न विझतां अधिकच भडकेल. त्याप्रमाणें ज्याचें चित्त भ्रांत झालें असेल, त्यानें धर्मप्रविचय, वीर्य आणि प्रीति, या तीन संबोध्यंगांची भावना केली असतां ते प्रशांत न होतां अधिकच भडकेल. अशा वेळीं प्रश्रब्धि, समाधि आणि उपेक्षा, या तीन संबोध्यंगांची भावना करणें योग्य आहे. कांकीं, या बोध्यंगांमुळें भडकलेलें चित्त प्रशांत होत असतें. एकाद्या माणसाला पेटलेली आग कमी करावयाची असेल व त्यानें जर ओलीं लांकडें, ओल्या गोंवऱ्या व ओलें गवत यांचा उपयोग केला, तर ती खात्रीनें कमी होईल. त्याचप्रमाणें ज्याचें चित्त भडकलें असेल, त्यानें जर प्रश्रब्धि, समाधि आणि उपेक्षा, या तीन संबोध्यंगांची भावना केली, तर तें खात्रीनें प्रशांत होईल.

“आतां राहिलें स्मृतिसंबोध्यंग. भिक्षुहो, या संबोध्यगांचा आपण सर्वत्र उपयोग केला पाहिजे.”

[१२]

## सत्कर्माचें प्रत्यक्ष फळ

दुसऱ्या एका प्रसंगीं शालाग्रामांतील ब्राह्मणांनां उद्देशून बुद्धगुरु ह्मणाला “गृहस्थहो, कांहीं श्रमणब्राह्मण दान नाहीं, धर्म नाहीं, सत्कर्माचें किंवा कुकर्माचें फळ नाहीं, आई नाहीं आणि बाप नाहीं, नरकाला जाणारा कोणी नाहीं किंवा स्वर्गाला जाणारा कोणी नाहीं, असें ह्मणणारे आहेत. पण याच्या उलट दुसरे श्रमणब्राह्मण असें ह्मणतात, कीं, दानधर्म आहे, दानधर्माचें फळ आहे, सत्कर्माचें आणि असत्कर्माचेंहि फळ आहे, आई आहे, बाप आहे, नरक आहे आणि स्वर्ग आहे.

अनुक्रमणिका

“गृहस्थहो, जे श्रमणब्राह्मण नास्तिकवादी असतात, त्यांजकडून कायावाचामनें पापकर्मे घडावीं हें साहजिक आहे; परंतु जे आस्तिक असतात, त्यांनां पापकर्मांचें भय असावें, व पुण्यकर्माकडे त्यांची प्रवृत्ति व्हावी, हेंहि साहजिक आहे. आतां येथें एकादा सुज्ञ मनुष्य असा विचार करितो, कीं, जर नास्तिकाच्या ह्मणण्याप्रमाणें परलोक नसेल, तर मरणानंतर प्राण्याला दुःखाची भीति नाहीं; परंतु जर परलोक असेल, आणि तो नाहीं असें गृहीत धरून प्राण्यानें इहलोकी अधर्माचरण केलें असेल, तर परलोकीं त्याची काय गति होईल? त्याला दुर्गतीलाच जावें लागणार नाहीं काय? आतां परलोक नाहीं असें गृहीत धरिलें, तर धार्मिक आचरणापासून मरणोत्तर कोणतेंहि दुःख होण्यासारखे नाहीं; एवढेंच नव्हे, तर एकाद्या वाईट मनुष्याप्रमाणें धर्माचरण करणाऱ्या गृहस्थाची इहलोकीं अपकीर्ति होत नाहीं. सुज्ञ लोकांनां तो प्रशंसनीय होत असतो.

“गृहस्थहो, दुसरे कांहीं श्रमणब्राह्मण अक्रियावादी आहेत; ते कोणत्याहि क्रियेचें मनुष्याला फल भोगावें लागत नाहीं असें प्रतिपादन करितात. मनुष्यानें हजारों प्राण्यांनां ठार मारिलें, किंवा परद्रव्याचा अपहार केला, तरी त्यापासून त्याच्या आत्म्यावर कांहींच परिणाम होत नसतो, असें या श्रमणब्राह्मणांचें मत आहे. परंतु दुसरे श्रमणब्राह्मण प्रत्येक पापकर्माचा मनुष्यावर परिणाम घडतो, असें ह्मणणारे आहेत. गृहस्थहो, या दोन पंथांच्या श्रमणब्राह्मणांचीं मतें परस्परविरोधि नाहींत काय?”

“होय भदंत,” ब्राह्मणांनी उत्तर दिलें.

बुद्ध ह्मणाला “गृहस्थहो, अशा समयीं शहाणा मनुष्य असा विचार करितो, कीं, जर क्रियेचा परिणाम आत्म्यावर घडत नसला, तर आत्मा परलोकीं सुखी होईल हें ठीक आहे; पण जर आत्म्यावर क्रियेचा परिणाम घडत असला, तर दुराचरणामुळें तो दुर्गतीलाच जाईल! बरें, आत्म्यावर क्रियेचा परिणाम घडत नाहीं, असें जरी गृहीत धरलें, तरी सदाचरणापासून कांहींच नुकसान होण्यासारखें नाहीं. सदाचारी माणसाची सुज्ञ लोक प्रशंसाच करितात.

“गृहस्थहो, दुसरे कांहीं श्रमण ब्राह्मण अहेतुवादी आहेत; मोक्षाला कोणतींहि कर्मे कारण होत नाहींत, अमुक एक योनींतून प्राणी गेला ह्मणजे तो आपोआप मोक्षाला जातो, त्याला मोक्ष मिळविण्यासाठी

खटपट करावी लागत नाहीं, असें त्यांचें मत आहे. परंतु दुसरे श्रमणब्राह्मण मोक्ष सहेतुक आहे असें ह्मणणारे आहेत. स्वतःच्या प्रयत्नानें मोक्ष मिळवितां येतो असें त्यांचें मत आहे. गृहस्थहो, या दोन पंथांच्या श्रमणब्राह्मणांचीं मते परस्परविरोधि नाहींत काय?”

“होय भदंत. या श्रमणब्राह्मणांचीं मतें परस्परविरोधि आहेत.” असें शालाग्रामवासी ब्राह्मणांनीं उत्तर दिलें.

बुद्ध ह्मणाला “गृहस्थहो, शहाणा माणूस असा विचार करितो, कीं, अमक्यातमक्या योनींत दुःख भोगल्यावांचून केवळ सदाचरणामुळें मोक्ष मिळणार नाहीं, ही गोष्ट जर खरी असली, तर इहलोकीं धार्मिक आचरणापासून कोणतेंहि नुकसान होण्यासारखें नाहीं. उलट सुज्ञ लोकांत आपली प्रशंसाच होणार आहे. आणि जर प्रयत्नांपासून सुगति प्राप्त होत असली, तर माझा सत्कर्माविषयीं उत्साह मला फारच उपयोगीं पडेल.”

अनुक्रमणिका

[१३]

## विचार करून विश्वास ठेवा

एकदां बुद्धगुरु धर्मप्रचारासाठीं कोसल देशामध्यें फिरत असतां कालाम नांवाच्या क्षत्रियांच्या गांवीं आला. भगवंताच्या आगमनाची वार्ता ऐकून कालामाचा मोठा समुदाय त्याच्या दर्शनाला गेला. कांहींजण बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसले; कांहींजणांनीं आपलें नामगोत्र सांगितलें; कांहीं जण मुकाट्यानेंच एका बाजूस बसले; व कांहीं बुद्धाला कुशलप्रश्नादिक विचारून झाल्यावर बाजूला बसले.

हा सर्व विधि आटोपल्यावर कालामापैकीं जाणते लोक बुद्धाला ह्मणाले "भगवन्, आमच्या गावीं पुष्कळ श्रमणब्राह्मण येत असतात. ते आपल्या मताची वाखाणणी करितात, व दुसऱ्याच्या मताची निंदा करितात. दुसरेहि कांहीं श्रमणब्राह्मण येतात, आणि आपल्या मताची प्रौढि सांगून त्यांच्यापूर्वी आलेल्या श्रमणब्राह्मणांच्या मताची निंदा करितात. अशा वेळीं आह्मांला अशी शंका येते, कीं, या सर्वांत कोणाचें मत खरें, व कोणाचे खोटें? या श्रमणब्राह्मणांत सत्यवादी कोण व असत्यवादी कोण?"

बुद्धगुरु ह्मणाला "कालामहो, मी जें कांहीं सांगणार आहें, तें परंपरेनें ऐकत आलों आहों ह्मणून खरें मानूं नका; आपली पूर्वपरंपरा अशी आहे ह्मणून खरें मानूं नका; हें असें असेल म्हणून खरें मानूं नका; हें आपल्या पवित्र ग्रंथांतहि आहे ह्मणून खरें मानूं नका; हें अनुमानानें सिद्ध करितां येतें ह्मणून खरें मानूं नका; असा हा लौकिक न्याय आहे ह्मणून खरें मानूं नका; हें सुंदर दिसतें ह्मणून खरें मानूं नका; आपल्या श्रद्धेला हें जुळतें ह्मणून याजवर विश्वास ठेवूं नका; हा श्रमण प्रसिद्ध आहे अथवा हा आपणांला पूज्य आहे ह्मणून माझ्या या भाषणावर विश्वास ठेवूं नका. पण कालामहो, जेव्हां तुमच्याच विवेकी बुद्धीनें माझा उपदेश तुह्मांला खरा वाटेल, तेव्हांच तुह्मी त्याचें ग्रहण करा. आतां मी तुह्मांला विचारतों, कीं, ज्या वेळीं मनुष्याच्या अंतःकरणावर लोभाचा पगडा बसतो, ज्या वेळीं द्वेषाचा पगडा बसतो, आणि ज्या वेळीं मोहाचा पगडा बसतो, त्या वेळीं त्याला आत्महित किंवा परहित समजणें शक्य आहे काय?"

"नाहीं भगवन्." असें कालामांनीं उत्तर दिलें.

बुद्ध पुढें ह्मणाला "आतां कालामहो, मी तुह्मांला असें विचारतों, कीं, मनुष्याचें अंतःकरण जर अलोभानें (परोपकारबुद्धीनें) भरून गेलें, अद्वेषानें (मैत्रीनें) भरून गेलें, आणि अमोहानें (ज्ञानानें) भरून गेलें, तर त्यापासून हित होईल कीं अहित होईल?"

"हित होईल," असें कालामांनीं उत्तर दिल्यावर बुद्धगुरु ह्मणाला "कालामहो, ज्याचें अंतःकरण लोभाभिभूत झालें नसेल, तो निर्लोभी मनुष्य लोभामुळें प्राणघात करीत नाहीं; चोरी करीत नाहीं; व्यभिचार करीत नाहीं; खोटें बोलत नाहीं, आणि हीं पापें करण्यास दुसऱ्यालाहि उत्तेजन देत नाहीं. तसाच अद्वेष्टा आणि ज्ञानी मनुष्य द्वेषामुळें किंवा अज्ञानामुळें पापाचरण करीत नाहीं, व इतरांनां पापाचरणासाठीं उत्तेजन देत नाहीं. लोभ, द्वेष आणि मोह, हीं पापाचीं मूलें आहेत; अलोभ, अद्वेष आणि अमोह हीं पुण्यांचीं मूलें आहेत. कालामहो, लोभादिकांपासून हानि होते किंवा नाहीं, हीं तीन पापाचीं मूलें आत्मपर घाताला कारण होतात किंवा नाहीं, व यांमुळें जगामध्यें दुःख वाढतें किंवा नाहीं, याचा तुह्मीं नीट विचार करून जेव्हां तुमच्या बुद्धीला हे मनोधर्म त्याज्य आहेत असें वाटेल, तेव्हांच तुह्मी त्यांचा त्याग करा. केवळ हा उपदेश तुमच्या परंपरागत आलेल्या दृष्टीला पटतो इत्यादि कारणांनीं या माझ्या उपदेशाचा तुह्मी स्वीकार करूं

अनुक्रमणिका

नका. अलोभ, अद्वेष आणि अमोह हे तीन मनोधर्म पुण्याचीं मूलें आहेत असें मीं सांगितले, याचाहि नीट विचार करून, कालामहो, जेव्हां तुमच्या बुद्धीला हे मनोधर्म आत्मपरहितकारक आहेत, जगामध्यें यांजमुळें सुखाची अभिवृद्धि होते, असें खात्रीनें वाटेल, तेव्हांच हे मनोधर्म पूर्णतेला जातील असा प्रयत्न करा.

"कालामहो, ज्या आर्यश्रावकाच्या मनांतून लोभ, द्वेष आणि मोह या तीन मनोवृत्ति नष्ट झाल्या, तो चारी दिशांतील प्राणीमात्रावर मैत्रीभावना करावयाला समर्थ होतो; आपल्या मैत्रचित्तानें चोहोंदिशांमधील प्राण्यांवर तो प्रेम करितो, त्याचप्रमाणें करुणा, मुदिता आणि उपेक्षा या भावनांचाहि त्याला सहज लाभ होतो. कालामहो, या चार भावनांच्या योगें ज्याचें चित्त सर्व प्रकारच्या वैरांपासून मुक्त झालें असेल, त्याच्या मनाला चार तऱ्हांनीं धैर्य येतें. तो असा विचार करितो, कीं, (१) जर परलोक असेल तर माझ्या या सुकर्मामुळें मला सुगतिच मिळाली पाहिजे; (२) जर परलोक नसेल तर मी याच जगामध्यें कोणत्याहि प्राण्याचें वैर न करतां मोठ्या आनंदानें रहातों; (३) जर पापी मनुष्याला पापाबद्दल शिक्षा भोगावी लागते, हा सिद्धांत खरा असेल, तर मी कधींहि पाप करीत नसल्यामुळें शिक्षाहि भोगण्याचा मजवर प्रसंग येणार नाहीं; (४) जर आपल्या पापाचें फल आपणाला मिळतेंच असें नसून तें दुसऱ्या कोणाला तरी भोगावें लागतें, हा सिद्धान्त खरा असेल, तर माझ्या सदाचरणामुळें मी माझेंच नव्हे, तर इतर जनाचेंहि कल्याण करितों!"

बुद्धाचा उपदेश श्रवण करून कालामांनां अत्यंत आनंद झाला, व त्या दिवसापासून ते बुद्धाचे उपासक झाले.

[१४]

## आश्वलायन ब्राह्मणकुमार व ब्राह्मणवर्णाची थोरवी

एके समयीं बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात होता. त्या वेळीं निरनिराळ्या देशांतून पांचशें ब्राह्मण कांहीं कारणास्तव श्रावस्तीला आले होते. त्या ब्राह्मणांमध्यें असा एक प्रश्न उपस्थित झाला, कीं, "हा श्रमणगौतम चारहि वर्णांला मोक्ष आहे असें प्रतिपादन करितो. त्याजबरोबर या मुद्यासंबंधानें वाद करण्यास कोण समर्थ आहे?" शेवटीं आश्वलायन कुमाराला बुद्धाशीं वाद करावयाला पुढें करावें, असा बेत ठरला.

आश्वलायन कुमाराचें अध्ययन नुकतेंच पुरें झालें होतें. निघंटु, छंदःशास्त्र इत्यादि वेदांगांसहवर्तमान त्याला चारहि वेद तोंडपाठ येत असत; तथापि बुद्धाशीं वाद करणें कठिण आहे, हें तो जाणून होता. त्याला जेव्हां आपला पुढारी होण्यास त्या ब्राह्मणांनीं विनंति केली, तेव्हां तो त्यांनां ह्मणाला "भो, श्रमणगौतम हा धर्मवादी आहे. धर्मवादी लोकांशीं वाद करणें सामान्य कर्म नव्हे. मी जरी वेदांमध्यें पारंगत असलों, तरी गौतमाबरोबर वाद करावयाला समर्थ नाहीं."

बराच वेळ भवति न भवति झाल्यावर ते ब्राह्मण आश्वलायनाला ह्मणाले "भो आश्वलायन, तूं परिव्राजकधर्माचा अभ्यास केला आहेस; आणि युद्धावांचून पराजित होणें तुला योग्य नाहीं."

आश्वलायन ह्मणाला "गौतमाशीं वाद करणें जरी कठिण काम आहे, तरी तुमच्या आग्रहास्तव मी तुमच्याबरोबर येतों."

अनुक्रमणिका

नंतर त्या ब्राह्मणसमुदायासह आश्वलायन बुद्धगूरूजवळ गेला; आणि कुशलसमाचारादि विचारून झाल्यावर तो एका बाजूला बसला. नंतर तो बुद्धाला ह्मणाला "भो गौतम, ब्राह्मणांचें ह्मणणें असें आहे, कीं, 'ब्राह्मणवर्णच श्रेष्ठ आहे, इतर वर्ण हीन आहेत; ब्राह्मणवर्णच शुक्ल आहे, इतर वर्ण कृष्ण आहेत; ब्राह्मणांनांच मोक्ष मिळतो, इतरांनां नाहीं; ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखापासून झालेले त्याचे औरस पुत्र होत; अर्थात् तेच ब्रह्मदेवाचे दायाद होत. भो गौतम, या मुद्द्यासंबंधानें आपलें ह्मणणें काय आहे?"

बुद्ध ह्मणाला "हे आश्वलायन, ब्राह्मणांच्या बायका ऋतुमती होतात, गरोदर होतात, प्रसूत होतात, आणि मुलांनां दूध पाजतात. याप्रमाणें ब्राह्मणांची संतति इतर वर्णांप्रमाणेंच मातेच्या उदरांतून जन्मली असतां, ब्राह्मणांनीं आपण ब्रह्मदेवाच्या मुखापासून उत्पन्न झालों असें ह्मणावें, हें आश्चर्य नव्हे काय?"

आश्वलायन ह्मणाला "भो गौतम, आपलें ह्मणणें कांहीं असूं द्या; तरी आपण ब्रह्मदेवाचे दायाद आहोंत याजवर ब्राह्मणाचा पूर्ण विश्वास आहे!"

बुद्ध ह्मणाला "हे आश्वलायन, यौन, कांबोज व इतर सरहद्दीवरील प्रदेशांत आर्य आणि दास असे दोनच वर्ग असून कधींकधीं आर्याचा दास होतो, आणि दासाचा आर्य होतो; ही गोष्ट तुझ्या ऐकण्यांत आली आहे काय?"

"होय, असें मीं ऐकलें आहे." आश्वलायनानें उत्तर दिलें.

बुद्ध ह्मणाला "असें जर आहे, तर ब्रह्मदेवानें ब्राह्मणांनांच उत्पन्न केलें व ते सर्व वर्णांत श्रेष्ठ आहेत, या ह्मणण्याला आधार काय?"

आश्वलायन ह्मणाला "आपलें ह्मणणे कांहीं असो; परंतु ब्राह्मणांची अशी बळकट समजूत आहे कीं, ब्राह्मणवर्णच काय तो श्रेष्ठ आहे आणि इतर वर्ण हीन आहेत."

बुद्ध ह्मणाला "क्षत्रियानें, वैश्यानें किंवा शूद्रानें चोरी केली, व्यभिचार केला, खोटें भाषण केलें, चहाडी केली, वृथा बडबड केली, लोकांच्या धनावर दृष्टि ठेविली, द्वेषबुद्धि वाढविली, नास्तिकपणा अंगीकारिला, तर तोच काय तो नरकाला जाईल; पण ब्राह्मणानें हीं कर्मे केलीं असतां देहत्यागानंतर तो नरकाला जाणार नाहीं, असें तुला वाटतें काय?"

आश्वलायन ह्मणाला "भो गौतम, कोणत्याहि वर्णाच्या मनुष्यानें हीं पापें केलीं असतां तो नरकाला जाईल. ब्राह्मण काय अथवा अब्राह्मण काय, सर्वांनां आपल्या पापाचें प्रायश्चित भोगावेंच लागणार."

बुद्ध ह्मणाला "एकादा ब्राह्मण जर प्राणघातापासून निवृत्त झाला, चौर्यकर्मापासून निवृत्त झाला, व्यभिचारापासून निवृत्त झाला, असत्यभाषणापासून निवृत्त झाला, शिवीगाळीपासून निवृत्त झाला, वृथालापापासून निवृत्त झाला, परधनाच्या लोभापासून निवृत्त झाला, द्वेषापासून निवृत्त झाला आणि नास्तिकत्वापासून निवृत्त झाला, तर तोच काय तो देहावसानानंतर स्वर्गलोकाला जाईल; पण इतर वर्णांचे लोक या पापकर्मांपासून निवृत्त झाले, तर ते स्वर्गलोकाला जाणार नाहींत, असे तुला वाटतें काय?"

अनुक्रमणिका

आश्वलायन ह्मणाला "कोणत्याहि वर्णाचा मनुष्य या पापाकर्मांपासून निवृत्त झाला असतां स्वर्गाला जाईल. पुण्याचरणाचें फल ब्राह्मणाला आणि ब्राह्मणेतराला सारखेंच मिळणार आहे."

बुद्ध ह्मणाला "या प्रदेशांत ब्राह्मणच काय तो द्वेषवैरविरहित मैत्रीभावना करूं शकतो; क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे करूं शकणार नाहींत, असें तुला वाटतें काय?"

आश्वलायन ह्मणाला "चारहि वर्णाला मैत्रीभावना करतां येणें शक्य आहे."

बुद्ध ह्मणाला "तर मग ब्राह्मणच श्रेष्ठवर्ण आणि इतर वर्ण हीन आहेत, या ह्मणण्याला आधार काय?"

आश्वलायन ह्मणाला "आपण कांहीं ह्मणा, पण ब्राह्मण आपणाला श्रेष्ठ समजतात व इतरांनां हीन समजतात, ही गोष्ट खरी आहे."

बुद्ध ह्मणाला "हे आश्वलायन, एकादा मूर्धाभिषिक्त राजा सर्व जातींच्या शंभर पुरुषांनां एकत्र करील. त्यांपैकीं क्षत्रिय, ब्राह्मण आणि राजकुलांत जन्मले असतील, त्यांनां तो असें ह्मणेल, कीं, 'अहो, इकडे या, व शाल किंवा चंदनवृक्षांसारख्या उत्तम वृक्षांची उत्तरारणी घेऊन अग्नि उत्पन्न करा.' परंतु त्यांपैकीं चांडाळ, नैषाद इत्यादि हीन कुलांमध्यें जन्मले असतील, त्यांनां तो असें ह्मणेल, कीं, 'अहो, इकडे या, व कुत्र्याला खावयाला घालण्याच्या डोणींत, डुकराला खावयाला घालण्याच्या डोणींत, किंवा रंग देण्याच्या डोणींत एरंडाची उत्तरारणी घेऊन अग्नि उत्पन्न करा.' हे आश्वलायन, जो ब्राह्मणादिक उच्च वर्णाच्या मनुष्यानें अग्नि उत्पन्न केला, तोच भास्वर आणि तेजस्वी होईल, आणि चांडालादिक हीन वर्णाच्या मनुष्यानें उत्पन्न केलेला अग्नि होणार नाहीं, व त्यापासून अग्नीची कार्यें होणार नाहींत, असें तुला वाटतें काय?"

आश्वलायन ह्मणाला "भो गौतम, कोणत्याहि जातीच्या माणसांनीं वाईट किंवा बऱ्या लांकडाची उत्तरारणी करून कोणत्याहि ठिकाणीं अग्नि उत्पन्न केला, तरी तो सारखाच तेजस्वी होईल; व त्यापासून सारखींच अग्निकार्यें घडतील."

बुद्ध ह्मणाला "एकाद्या क्षत्रिय कुमारानें ब्राह्मणकन्येबरोबर शरीरसंबंध केला व त्या संबंधापासून जर त्याला पुत्र झाला, तर तो पुत्र आईसारखा आणि बापासारखा मनुष्य होईल, असें तुला वाटत नाहीं काय? त्याचप्रमाणें एकाद्या ब्राह्मणकुमारानें क्षत्रियकन्येशीं शरीरसंबंध केला, तर त्या संबंधापासून होणारा पुत्र त्या दोघांसारखा न होतां भलत्याच जातीचा होईल असें तुला वाटतें काय?"

आश्वलायन ह्मणाला "अशा मिश्रविवाहानें जो मुलगा होईल, तो त्याच्या आईबापांप्रमाणें मनुष्यच होईल. त्याला ब्राह्मण म्हणतां येईल किंवा क्षत्रियहि ह्मणता येईल."

बुद्ध ह्मणाला "पण आश्वलायन, एकाद्या घोडीच्या आणि गाढवाच्या संबंधापासून जे शिंगरूं होईल, त्याला त्याच्या आईसारखें किंवा बापासारखें ह्मणता येईल काय? त्याला घोडाहि ह्मणता येईल किंवा गाढवहि ह्मणतां येईल काय?"

अनुक्रमणिका

आश्वलायन ह्मणाला "भो गौतम, त्याला घोडा किंवा गाढव ह्मणतां येणार नाहीं. तो एक तिसऱ्याच जातीचा प्राणी होतो. त्याला आपण खेचर असें ह्मणतो. परंतु ब्राम्हण आणि क्षत्रिय यांच्या संबंधापासून झालेल्या मुलामध्यें असा प्रकार आढळून येत नाहीं."

बुद्ध ह्मणाला "हे आश्वलायन, दोघां ब्राह्मण बंधूंपैकीं एक वेदपठन केलेला चांगला सुशिक्षित असेल, व दुसरा अशिक्षित असेल, तर त्यांत ब्राह्मण कोणत्या भावाला श्राद्धामध्यें किंवा यज्ञामध्यें प्रथम आमंत्रण करितील?"

आश्वलायन ह्मणाला "जो सुशिक्षित असेल, तो जरी वयानें लहान असला, तरी त्यालाच यज्ञयागांत प्रथम आमंत्रण केलें जाईल."

बुद्ध ह्मणाला "आतां असे समज, कीं, त्या दोघां भावांपैकीं एकजण मोठा विद्वान् आहे, पण अत्यंत दुराचारी आहे; दुसरा फारसा विद्वान् नाहीं, पण अत्यंत सुशील आहे. तेव्हां त्यांत प्रथमतः कोणाला आमंत्रण दिलें जाईल?"

आश्वलायन ह्मणाला "भो गौतम, जो शीलवान् असेल त्यालाच प्रथमतः आमंत्रण दिलें जाईल. दुराचारी मनुष्याला दिलेल्या दानापासून काय फल मिळणार आहे?"

बुद्ध ह्मणाला "हे आश्वलायन, प्रथमतः तूं जातीला महत्त्व दिलेंस; नंतर वेदपठणाला महत्त्व दिलेंस, आणि आतां तर तूं शीलाला महत्त्व देत आहेस. अर्थात् मी जी चातुर्वर्णी शुद्धि सांगत असतों, तिचाच तूंहि अंगीकार केला आहेस!"

हें बुद्धाचे भाषण ऐकून आश्वलायन मान खालीं घालून उगाच बसला. पुढें काय बोलावें हें त्याला सुचेना!

तेव्हां बुद्ध ह्मणाला "हे आश्वलायन, प्राचीन कालीं सात ब्रह्मर्षि अरण्यामध्यें पर्णकुटिकेंत रहात असतां त्यांची अशी एक पापी समजूत झाली होती, कीं, 'ब्राह्मणवर्णच श्रेष्ठ आहे, आणि इतर वर्ण हीन आहेत; ब्राह्मणच काय ते ब्रह्मदेवाचे खरे दायाद आहेत.' असितदेवल ऋषीला ही बातमी जेव्हां समजली, तेव्हां आपली हजामत करून घेऊन मंजिष्ठवर्णाचीं वस्त्रें परिधान करून चांगल्या वहाणा पायांत घालून आणि हातांत सोन्याची काठी घेऊन तो त्या सात ब्राह्मणऋषींच्या स्थंडिलावर आला; व तेथें चंक्रमण करीत असतां ह्मणाला 'वाहवा! हे ब्रह्मर्षि कोठें दिसत नाहींत ते!'

"हें त्याचें उद्धटपणाचें वर्तन पाहून त्या सात ब्रह्मर्षींनां फार राग आला, व 'हे चांडाला, तूं भस्म हो!' असा त्यांनीं देवलाला शाप दिला. पण त्याच्या शापाचा देवलावर वाईट परिणाम न होतां तो अधिक सुंदर आणि अधिक तेजस्वी दिसूं लागला!

"तेव्हां ते ब्राह्मणऋषी परस्परांनां ह्मणाले 'अरेरे! आमचें तप व्यर्थ आहे, आमचें ब्रह्मचर्य निष्फल आहे; पूर्वी ज्याला आह्मी शाप देत असूं, त्याचें ताबडतोब भस्म होत असे; पण याला जसजसा शाप देत जातों, तसतसा हा अधिकाधिक सुंदर होत आहे!'

अनुक्रमणिका

“असितऋषि ह्मणाला ‘तुमचें तप व्यर्थ नाहीं किंवा तुमचें ब्रम्हचर्यहि निष्फल नाहीं; परंतु माझ्यावर विनाकारण रागावण्याचें तुह्मीं सोडून दिलें पाहिजे.’

“‘तूं कोण आहेस?’ त्या सात ब्राह्मणऋषींनीं विचारलें.

“असितानें ‘मी असितदेवलऋषि आहें’ असें सांगितल्यावर त्या सात ब्राह्मणऋषींनीं त्याला नमस्कार केला. तेव्हां तो ह्मणाला ‘ब्राह्मणवर्णच श्रेष्ठ आहे व इतर वर्ण हीन आहेत, ब्राह्मणच काय ते ब्रह्मदेवाचे दायाद आहेत, अशी तुमची खरी समजूत झाली आहे, असें मी ऐकतों. पण तुमच्या सर्व पूर्वजांनीं ब्राह्मणस्त्रीशींच विवाह केला होता, याची तुह्मांला खात्री आहे काय? तुमच्या आज्यापणज्या वगैरे पूर्वजस्त्रियांनीं ब्राह्मणपुरुषांशींच संबंध ठेवला होता, याजबद्दल तुह्मांला खात्री आहे काय?’

“‘भो, आह्मांला यासंबंधानें कांहींच सांगतां येणार नाहीं.’ त्या सात ऋषींनीं उत्तर दिलें.

“असित ह्मणाला ‘तर मग ब्राह्मणवर्णच श्रेष्ठ,’ व इतर वर्ण हीन आहेत, या ह्मणण्यामध्यें अर्थ काय राहिला?”

“हें आश्वलायन, त्या सात ब्रह्मर्षीनां देखील असितानें निरुत्तर केलें. मग त्याच जातिवादासंबंधानें तूं माझ्याशीं कसा बोलूं शकशील?”

हें भाषण ऐकून आश्वलायन बुद्धाचा उपासक झाला.

## [१५]
## **मनुष्यांतील जातिभेद नैसर्गिक आहेत काय**?

एके समयीं बुद्धगुरु इच्छानंगल नांवाच्या गावांजवळ इच्छानंगल नांवाच्या उपवनांत रहात होता. त्या कालीं पुष्कळ प्रसिद्ध ब्राह्मण इच्छानंगल गावीं रहात होते. एके दिवशीं वासिष्ठ आणि भारद्वाज या दोन तरुण ब्राह्मणांमध्यें असा वाद उपस्थित झाला, कीं, मनुष्य जन्मानें श्रेष्ठ होतो किंवा कर्मानें श्रेष्ठ होतो?

भारद्वाज आपल्या मित्राला ह्मणाला “भो वासिष्ठ, ज्याच्या आईच्या बाजूला आणि बापाच्या बाजूला सात पिढ्या शुद्ध असतील, ज्याच्या कुलांत सात पिढ्यांपर्यंत वर्णसंकर झाला नसेल, तोच ब्राह्मण श्रेष्ठ होय.”

वासिष्ठ ह्मणाला “भो भारद्वाज, जो मनुष्य शीलसंपन्न आणि कर्तव्यदक्ष असेल, त्यालाच मी ब्राह्मण ह्मणतों.”

पुष्कळ वादविवाद झाला; तथापि ते दोघे पस्परांचें समाधान करूं शकले नाहींत. तेव्हां वासिष्ठ ह्मणाला “भो भारद्वाज, आमचा हा वाद येथें येथे तुटावयाचा नाहीं. हा श्रमणगौतम आमच्या गांवाजवळ राहत आहे. तो बुद्ध आहे, पुज्य आहे आणि सर्व लोकांचा गुरु आहे अशी त्याची कीर्ति सर्वत्र पसरली आहे. आपण त्याजपाशीं जाऊन त्याला आपला मतभेद कळवूं, व तो जें सांगेल तें मत मान्य करूं.”

अनुक्रमणिका

तेव्हां ते दोघे बुद्धापाशी गेले व बुद्धाला कुशलप्रश्नादि विचारून एका बाजूला बसले. वासिष्ठ ह्मणाला “भो गौतम, आह्मी दोघे सुशिक्षित ब्राह्मणकुमार आहोंत. हा तारुक्ष्याचा शिष्य आहे, आणि मी पौष्करसादीचा शिष्य आहें. त्या आमचा जातिभेदासंबंधानें विवाद आहे. हा ह्मणतो ‘जन्मामुळें ब्राह्मण होतो,’ आणि मी ह्मणतों ‘कर्मामुळें ब्राह्मण होतो.’ आपली कीर्ति ऐकून आह्मी येथें आलों आहों. आतां आमच्यापैकीं कोणाचें ह्मणणें खरें आहे, आणि कोणाचें खोटें आहे, हें आपण आह्मांला समजावून द्यावें.”

बुद्ध ह्मणाला “वासिष्ठ, तृण, वृक्ष इत्यादि वनस्पतींमध्यें निरनिराळ्या जाति आढळतात, तशाच त्या किडे, मुंग्या इत्यादि बारीकसारीक प्राण्यांमध्येंहि अढळतात. सर्पाच्या जाति अनेक आहेत. श्वापदांच्या जातिहि अनेक आहेत. पाण्यांत रहाणाऱ्या मत्स्यांमध्यें आणि आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांमध्यें देखील अनेक जाति अढळून येतात. निरनिराळ्या जातीचें चिन्ह या सर्व प्राण्यांमध्यें स्पष्ट दिसून येतें; पण तें मनुष्यांमध्यें अढळून येत नाहीं. केंस, कान, डोळे, तोंड, नाक, ओंठ, भिवया, मान, पोट, पाठ, हात, पाय, इत्यादि सर्व अवयवांनीं एक मनुष्य दुसऱ्या माणसाहून अगदींच भिन्न होऊं शकत नाहीं. अर्थात् पशुपक्ष्यादिकांत जशा आकारादिकांनीं निरनिराळ्या जाति आढळून येतात, तशा त्या मनुष्यप्राण्यांत आढळून येत नाहींत. सर्व मनुष्यांचे अवयव जवळजवळ सारख्याच आकाराचे असल्यामुळें मनुष्यामध्यें आकारावरून जातिभेद ठरविणें शक्य नाहीं. परंतु कर्मावरून मनुष्याची जाति ठरवितां येणें शक्य आहे. एकादा ब्राह्मण गाईचें पालन करून निर्वाह करीत असेल, तर त्याला गवळीच ह्मटलें पाहिजे, ब्राह्मण म्हणतां कामा नये. जो कोणी शिल्पकलेनें उपजीविका करितो त्याला कारागीर समजलें पाहिजे. जो व्यापार करितो तो वाणी होय; जो दूताचें काम करितो तो दूत होय; जो चोरीवर उपजीविका करितो तो चोर होय; जो युद्धकलेवर उपजीविका करितो तो योद्धा होय; जो यज्ञयाग करून उपजीविका करितो तो याजक होय, आणि जो राष्ट्रावर स्वामित्व चालवितो तो राजा होय. परंतु या सर्वांनां केवळ जन्मामुळें ब्राह्मण ह्मणतां यावयाचें नाहीं.

“सगळीं संसारबंधनें छेदून जो कोणत्याहि प्रापंचिक दुःखाला भीत नाहीं, कोणत्याहि गोष्टीची ज्याला आसक्ति नाहीं, त्याला मी ब्राह्मण ह्मणतों. दुसऱ्यांनीं दिलेल्या शिव्यागाळी, वध, बंध, इत्यादि जो सहन करितो, क्षमा हेंच ज्याचें बळ आहे, त्याला मी ब्राह्मण ह्मणतों. कमलपत्रांवरील उदकबिंदूंप्रमाणें जो इहलोकींच्या विषयसुखापासून अलिप्त रहातो, त्यालाच मी ब्राह्मण ह्मणतों.

“जन्मामुळें ब्राह्मण होत नाहीं किंवा अब्राह्मण होत नाहीं. कर्मानेंच ब्राह्मण होतो आणि कर्मानेंच अब्राह्मण होतो. शेतकरी कर्मानें होतो, कारागीर कर्मानें होतो, चोर कर्मानें होतो, शिपाई कर्मानें होतो, याजक कर्मानें होतो, आणि राजादेखील कर्मानेंच होतो. कर्मानेंच हें सगळें जग चालत आहे. अणीवर अवलंबून जसा रथ असतो, तसे सर्व प्राणी आपल्या कर्मावर अवलंबून असतात.”

हा बुद्धाचा उपदेश ऐकिल्यावर वासिष्ठ आणि भारद्वाज बौद्धोपासक झाले.

[१६]

## चांडाळ कसा होतो?

भगवान् बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात असतां एके दिवशीं श्रावस्तींत अनुक्रमें भिक्षाग्रहण करीतकरीत अग्निहोत्री भारद्वाज ब्राह्मणाच्या दाराशीं येऊन भिक्षेसाठीं उभा राहिला.

अनुक्रमणिका

भारद्वाजाचें अग्निहोत्र पेटलें होतें, व त्यांत तो आहुति टाकीत होता. बुद्धाला पाहिल्याबरोबर तो मोठ्यानें ओरडला "अरे श्रमणा! मुंडका! चांडाळा! तेथेंच उभा रहा."

बुद्ध ह्मणाला "हे ब्राह्मणा, तूं चांडाळ किंवा चांडाळाचे धर्म कोणते, हें जाणतोस काय?"

ब्राह्मण ह्मणाला "भो गौतम, मला याची कांहीं माहिती नाहीं. चांडाळ कोण आणि त्याचे धर्म कोणते हें आपण मला सांगाल तर बरें होईल."

बुद्ध ह्मणाला "वारंवार रागावणारा, दुसऱ्याचा सूड उगवूं पहाणारा, पापानें माखलेला, आणि नास्तिकदृष्टि असा जो मनुष्य असतो, तो चांडाळ आहे असें जाणावें. जो प्राण्याचा घात करितो, ज्याच्या अंतःकरणामध्यें दया वास करीत नाहीं, जो लुटालूट आणि चोरी करितो, त्याला चांडाळ ह्मणावें. जो दुसऱ्याचें ऋण घेऊन तें परत मागितलें असतां पळून जातो, किंवा मीं तुला कांहींच देणें नाहीं असें खोटेंच सांगतो, तो चांडाळ आहे असें जाणावें. जो आपल्यासाठीं, परक्यासाठीं किंवा पैशासाठीं खोटी साक्ष देतो, तो चांडाळ होय. जो परदारागमन करितो, वृद्ध आईबांपाची शुश्रूषा करीत नाहीं, आई, बाप, भाऊ, बहीण इत्यादि आप्तलोकांनां शिवीगाळी देतो किंवा मारतो, तो चांडाळ होय. आपण केलेलें पापकर्म झांकून ठेवण्याची जो खटपट करितो, तो चांडाळ होय.

"जन्मानें चांडाळ होत नाहीं, किंवा ब्राह्मण होत नाहीं. कर्मानेंच चांडाळ होतो, आणि कर्मानेंच ब्राह्मण होतो. याला एक उदाहरण आहे. मातंग या नांवानें प्रसिद्ध असलेला ऋषि श्वपाक (कुत्र्याचें मांस खाणारा) चांडालपुत्र होता. परंतु त्याची कीर्ति इतकी झाली होती, कीं, मोठमोठे ब्राह्मण आणि क्षत्रिय त्याची सेवा करीत असत. असें सांगतात, कीं, देहावसानानंतर विमानांत बसून तो ब्रह्मलोकीं गेला. ब्रह्मलोकीं जाण्याला त्याची जाति त्याच्या आड आली नाहीं. आतां चांगल्या कुळांत जन्मलेले पुष्कळ ब्राह्मण नानाविध पापें करीत असलेले आह्मी पहातों. इहलोकीं त्यांची निंदा होतेच, आणि परलोकीं ते दुर्गतीला जातात. त्यांची जाति दुर्गतीपासून किंवा निंदेपासून त्यांचें रक्षण करूं शकत नाहीं. ह्मणून मी ह्मणतों, कीं, जन्मानें चांडाल होत नाहीं किंवा जन्मानें ब्राह्मण होत नाहीं. कर्मानेंच चांडाल होतो आणि कर्मानेंच ब्राह्मण होतो."

हा बुद्धाचा उपदेश ऐकून भारद्वाज फारच संतुष्ट झाला आणि ह्मणाला "भो गौतम, आपला हा उपदेश फारच गोड आहे. एकाद्या मनुष्यानें झांकलेली वस्तु उघड करून दाखवावी, किंवा डोळसांनां अंधारांत दिसावें ह्मणून मशाल धरावी, त्याप्रमाणें आपण आपल्या धर्माचें उत्तम स्पष्टीकरण केलें आहे. मी आजपासून माझ्या कुडींत प्राण असेपर्यंत आपणाला, आपल्या धर्माला आणि भिक्षुसंघाला शरण जात आहें. मी आपला उपासक आहें, या नात्यानें माझा आपण अंगीकार करा."

[१७]

## त्रैविद्य ब्राह्मण आणि ब्रह्मसायुज्यता

एकदां बुद्धगुरु कोसल देशांत संचार करीत असतां मनसाकट नांवाच्या ब्राह्मणग्रामाला पोहोंचला. तेथें मनसाकटाच्या उत्तरेला अचिरवती नदीच्या तीरीं एका आंबराईंत तो रहात होता.

अनुक्रमणिका

त्या वेळीं मनसाकट गांवांत कांहीं निमित्तानें प्रसिद्ध ब्राह्मण रहात असत. त्यांपैकीं वासिष्ठ आणि भारद्वाज हे दोघे तरुण ब्राह्मण संध्याकाळीं फिरावयाला निघाले असतां मार्गामार्गासंबंधानें वाद करूं लागले. वासिष्ठाचें ह्मणणे असें होतें, कीं, आपल्या गुरूनें – पौष्करसादि ब्राह्मणानें – उपदेशिलेला मार्गच काय तो ब्रह्मसायुज्यता मिळविण्याचा सरळ मार्ग आहे.' पण भारद्वाजाचें ह्मणणें असें होतें, कीं, 'आपल्या गुरूनें-तारुक्ष्य ब्राह्मणानें – उपदेशिलेला मार्गच ब्रह्मसायुज्यतेचा खरा मार्ग आहे.' ते दोघे परस्परांचें समाधान करूं शकले नाहींत. तेव्हां ते बुद्धाजवळ आले आणि त्यांनीं बुद्धाला आपला मतभेद कळविला.

तेव्हां बुद्ध ह्मणाला "वासिष्ठ, पण तुमचा मतभेद कां असावा, हें मला समजत नाहीं. तुमच्या आचार्यांचे मार्ग इतके भिन्न कां असावे?"

वासिष्ठ ह्मणाला "सरळ मार्ग कोणता आणि दूरचा मार्ग कोणता, एवढ्याचसंबंधानें आमचा वाद आहे. आध्वर्य ब्राह्मण, तैत्तिरिय ब्राह्मण, छांदोग्य ब्राह्मण, आणि ब्राह्मचर्य ब्राह्मण, हे सर्व भिन्नभिन्न मार्ग उपदेशीत असतात. तथापि जशा एकाद्या गांवाला जाण्याच्या लांबच्या किंवा जवळच्या वाटा त्या गांवाला जातात, त्याचप्रमाणें निरनिराळ्या ब्राह्मणांनीं उपदेशिलेले दूरचे किंवा जवळचे मार्ग शेवटीं ब्रह्मसायुज्यतेलाच जाऊन मिळतात."

बुद्ध ह्मणाला "वासिष्ठ, तूं हे सर्व मार्ग ब्रह्मसायुज्यतेलाच जाऊन मिळतात असें ह्मणतोस. परंतु या सर्व ब्राह्मणांपैकीं ब्रह्मदेवाला ज्यानें साक्षात् पाहिलें असा एकादा तरी ब्राह्मण आहे काय?"

"नाही, भो गौतम." वासिष्ठानें उत्तर दिलें.

बुद्ध ह्मणाला "ब्राह्मणाच्या सात आचार्यपरंपरांपर्यंत एकाद्या तरी आचार्यानें ब्रह्मदेवाला साक्षात् पाहिलें आहे काय?"

"नाहीं, भो गौतम."

बुद्ध ह्मणाला "वामदेव, विश्वामित्र, वसिष्ठ, अंगीरस, भृगु, इत्यादि जे वेदमंत्रकर्ते, वेदमंत्रांचे प्रवर्तक, त्या ऋषींनीं देखील ब्रह्मदेवाला साक्षात् पाहिलें होतें काय?"

"नाहीं, भो गौतम."

"वासिष्ठ, याप्रमाणें ब्राह्मणांनीं, ब्राह्मणांच्या आचार्यांनीं आणि ब्राह्मणांनां पूज्य असलेल्या ऋषींनीं देखील ब्रह्मदेवाला साक्षात् पाहिलें नाहीं. असें असतां आजकालचे ब्राह्मण त्या ब्रह्मदेवाशीं सायुज्यता मिळविण्याचा रस्ता सांगत आहेत, हे विलक्षण नव्हे काय?"

"होय – हें विलक्षण दिसतें खरें." वासिष्ठ ह्मणाला.

अनुक्रमणिका

"तर मग वासिष्ठ, ब्राह्मणांच्या या मार्गोपदेशाला अंधपरंपरा ह्मटलें पाहिजे. हे वासिष्ठ, हे जे चंद्रसूर्य आकाशामध्ये प्रकाशत आहेत, व ब्राह्मण रोज ज्यांचीं स्त्रोत्रें गातात आणि पूजा करितात, त्या चंद्रसूर्यांप्रत जाण्याचा मार्ग कोणता, हें ब्राह्मण सांगूं शकतील काय?"

"नाहीं, भो गौतम."

"हे वासिष्ठ, ज्यांनां ब्राह्मण पहातात आणि ज्यांची पूजा करितात, त्या चंद्रसूर्यांप्रत जाण्याचा मार्गदेखील ब्राह्मणांनां दाखवितां येत नाहीं. तर मग ज्याला त्यांनीं पाहिलें नाहीं, ज्याला त्यांच्या आचार्यांनी किंवा ऋषींनीं पाहिलें नाहीं, त्या ब्रह्माच्या सायुज्यतेचा मार्ग ब्राह्मण उपदेशीत आहेत, हें विलक्षण नव्हे काय?"

"विलक्षण दिसतें खरें." वासिष्ठ ह्मणाला.

बुद्ध ह्मणाला "एकादा मनुष्य ह्मणेल, कीं, 'या प्रदेशामध्यें जी अत्यंत सुंदर स्त्री, तिला मी शोधीत आहें.' त्याला दुसरे लोक विचारतील 'कायरे बुवा, तूं ज्या स्त्रीला शोधीत आहेस, ती स्त्री ब्राह्मण कन्या आहे, कीं, क्षत्रियकन्या आहे? ती उंच आहे, कीं, ठेंगणी आहे? तिचे केंस सरळ आहेत, कीं, कुरळ आहेत?' असा प्रश्न विचारला असतां तो ह्मणेल, कीं, 'मला यांपैकीं कांहीं माहीत नाहीं. मी तिला कधींहि पाहिलें नाहीं; तथापि मी तिला शोधीत आहें.' हे वासिष्ठ, त्या मनुष्याप्रमाणेंच ब्राह्मणांचे ह्मणणें विलक्षण दिसत नाहीं काय?"

"होय, विलक्षण दिसतें खरें."

"हे वासिष्ठ, दुसरा एकादा मनुष्य चव्हाट्यावर पायऱ्या बांधण्याला आरंभ करील. त्याला इतर लोक विचारतील, कीं, 'कायरे बुवा, या ज्या तूं पायऱ्या बांधीत आहेस, त्या कोणत्या प्रासादाच्या माडीवर जाण्यासाठीं आहेत?' तो ह्मणेल 'तो प्रासाद कोणता हें मला माहीत नाहीं; तथापि त्याच्या माडीवर चढण्यासाठीं या मी पायऱ्या बांधीत आहें.' या मनुष्याच्या ह्मणण्याप्रमाणें ब्रह्मदेवाला पाहिलें नसतां, त्याच्याशीं सायुज्यता पावण्याचा मार्ग दर्शविणाऱ्या ब्राह्मणाचें बोलणें विलक्षण दिसत नाहीं काय?"

"होय भो गौतम, हें विलक्षण दिसतें खरें."

"हे वासिष्ठ, एकादा मनुष्य ही अचिरवती नदी पाण्यानें तुडुंब भरली असतां, तिच्या पार जाण्यासाठीं या तिरावर येऊन परतीराची प्रार्थना करील, कीं, 'हे तीर, तूं इकडे ये! तूं इकडे ये!' आतां या मनुष्याच्या प्रार्थनेनें किंवा याचनेनें अचिरवतीचें पलीकडील तीर अलीकडे येईल काय?"

"नाहीं भो गौतम."

"त्याचप्रमाणें हे वसिष्ठ, ब्राह्मणांच्या नानाविध प्रार्थनांनीं ब्रम्ह्माशी ते सायुज्यता पावतील, हें संभवत नाहीं.

“हे वासिष्ठ, दुसरा एकादा मनुष्य या अचिरवतीच्या पार जाण्यासाठीं या कांठावर येऊन आपणाला दोऱ्यांनीं घट्ट बांधून घेईल. तो पलीकडच्या तीराला जाऊं शकेल असें तुला वाटतें काय?”

“नाहीं, भो गौतम.”

“हे वासिष्ठ, पंचेंद्रियांच्या विषयामध्यें जी अत्यासक्ति तिला मी इहलोकींचें बंधन असें ह्मणतों. या बंधनानें त्रैविद्यब्राह्मण बद्ध झालेले दिसत आहेत. तेव्हां ते देहावसानानंतर ब्रह्मसायुज्यता पावतील, हें मुळींच संभवत नाहीं.

“हे वासिष्ठ, दुसरा एकादा मनुष्य अचिरवती उतरून पार जाण्यासाठीं या तीरावर येईल आणि डोक्यावरून पांघरूण घेऊन निजेल. हा मनुष्य पार जाऊं शकेल असें तुला वाटतें काय?”

“नाही भो गौतम.”

“हे वासिष्ठ, कामविकार, क्रोध, आळस, भ्रांति, संशयग्रस्तता, या पांच निर्वरणांला मी बुद्धीचीं आवरणें ह्मणतों. या आवरणांनीं आवृत झालेले त्रैविद्यब्राह्मण मरणोत्तर ब्रह्मसायुज्यता पावतील, हें मुळींच संभवत नाहीं.

“आतां मी तुला असें विचारतों, कीं, तुझ्या आचार्यप्राचार्यांकडून ब्रह्मासंबंधानें तुला काय माहिती मिळाली आहे? ब्रह्मदेव सपरिग्रह आहे, कीं, अपरिग्रह आहे?”

“भो गौतम, ब्रह्मा अपरिग्रह आहे.”
“त्याच्या चित्तांत वैर आहे किंवा नाहीं?”
“नाहीं, भो गौतम.”
“तो द्वेषबुद्धीपासून मुक्त आहे किंवा नाही?”
“मुक्त आहे.”
“त्याचें चित्त पापमलानें माखलेलें आहे किंवा नाहीं?”
“भो गौतम, त्याचें चित्त पापमलविरहित आहे.”
“तो स्वतंत्र आहे किंवा परतंत्र आहे?”
“तो स्वतंत्र आहे.”
“हे वासिष्ठ, त्रैविद्यब्राह्मण सपरिग्रह आहेत किंवा अपरिग्रह आहेत?”
“सपरिग्रह, भो गौतम.”
“त्यांच्या चित्तांत वैर आहे किंवा नाहीं?”
“आहे.”
“ते द्वेषबुद्धि आहेत किंवा अद्वेषबुद्धि आहेत?”
“द्वेषबुद्धि, भो गौतम.”
“त्यांचें चित्त पापमलविरहित आहे किंवा पापमलयुक्त आहे?”
“पापमलयुक्त आहे.”
“ते स्वतंत्र आहेत किंवा परतंत्र आहेत?”

अनुक्रमणिका

“हे वासिष्ठ, ब्रह्मदेवाचे आणि त्रैविद्यब्राह्मणांचे गुण याप्रमाणें परस्परविरुद्ध आहेत. तेव्हां ब्रह्मदेवाचें आणि त्यांचें जुळेल कसें? ते मरणोत्तर ब्रह्मसायुज्यता पावतील हें तर मुळींच संभवत नाहीं. ह्मणून हे वासिष्ठ, त्रैविद्यब्राह्मण ब्रह्मसायुज्यतेसाठीं जे मार्ग सांगतात, ते मार्ग नसून कुमार्ग आहेत. या त्यांच्या मताला त्रैविद्यारण्य किंवा त्रैविद्यकांतार असें ह्मणतां येईल.”

[१८]

**यज्ञयाग**

एके समयीं बुद्धगुरु मगधदेशांत संचार करीत असतां खाणुमत नांवाच्या ब्राह्मणग्रामीं आला. हा गांव मगधदेशाच्या बिंबिसारराजानें कूटदंत नांवाच्या ब्राह्मणाला दान दिला होता. बुद्ध तेथें पोहोंचला त्या वेळीं कूटदंत ब्राह्मणाच्या घरीं एक मोठा यज्ञ होणार होता. सातशें बैल, सातशें गोऱ्हे, सातशें कालवडी, सातशें बकरे आणि सातशें मेंढे यज्ञांत मारण्यासाठीं आणिले होते.

बुद्ध आपल्या गांवांत आल्याचें वर्तमान ऐकतांच खाणुमत गांवांतील ब्राह्मण एकत्र जमून बुद्धदर्शनाला निघाले. ते कूटदंतब्राह्मणाच्या वाड्यावरून चालले असतां, कूटदंतानें ते कोठें जातात याची चौकशी केली. कूटदंताच्या हुजऱ्यानें त्याला इत्यंभूत वर्तमान सांगितल्यावर तो त्या हुजऱ्याला ह्मणाला “तूं या ब्राह्मणांनां सांग, कीं, कूटदंतदेखील बुद्धाच्या दर्शनाला जाऊं इच्छीत आहे. तेव्हां त्याच्यासाठीं तुह्मीं जरा थांबा.”

कूटदंताच्या यज्ञासाठीं पुष्कळ ब्राह्मण खाणुमत गांवाला आले होते. त्यांनां कूटदंत बुद्धदर्शनाला जाणार आहे हें वर्तमान समजल्यावर ते त्याच्यापाशीं येऊन ह्मणाले “भो कूटदंत, गौतमाच्या दर्शनाला तूं जात आहेस, ही गोष्ट खरी आहे काय?”

कूटदंत ह्मणाला “होय, मला देखील गौतमाच्या दर्शनाला जावें असें वाटतें.”

ब्राह्मण ह्मणाले “भो कूटदंत, गौतमाच्या दर्शनाला जाणें तुला योग्य नाहीं. जर तूं त्याच्या दर्शनाला जाशील, तर त्याच्या यशाची अभिवृद्धि होईल; आणि तुझ्या यशाची हानि होईल! यासाठीं गौतमानेंच तुझ्या भेटीला यावें, आणि तूं त्याच्या भेटीला जाऊं नये, हें चांगलें. तूं उत्तम कुलांत जन्मला आहेस, धनाढ्य आहेस, विद्वान् आहेस, सुशील आहेस, पुष्कळांचा आचार्य आणि प्राचार्य आहेस, वेदमंत्र शिकण्यासाठीं चोहोंकडून तुजपाशीं अनेक शिष्य येत आहेत; तूं गौतमापेक्षां वयानें मोठा आहेस, आणि मगधराजानें तुझा बहुमान करून हा गांव तुला इनाम दिला आहे. तेव्हां, गौतमानें तुझ्या भेटीला यावें, आणि तूं त्याच्या भेटीला जाऊं नये, हेंच योग्य आहे.”

कूटदंत ह्मणाला “आतां माझें ह्मणणें काय आहे तें ऐका. श्रमणगौतम थोर कुलांत जन्मलेला आहे; तो मोठ्या संपत्तीचा त्याग करून श्रमण झाला आहे; तरुण वयांतच त्यानें संन्यास घेतला आहे; तो तेजस्वी आहे; तो सुशील आहे; मधुर बोलणारा आहे; त्याचें वचन कल्याणप्रद आहे; तो पुष्कळांचा आचार्य आणि प्राचार्य आहे; कामासक्तीपासून मुक्त होऊन तो शांत झाला आहे; तो कर्मवादी आणि क्रियावादी आहे; सर्व राष्ट्रांतील लोक त्याचें धर्मवाक्य श्रवण करण्यासाठीं येत असतात. तो सम्यक्संबुद्ध, विद्याचरणसंपन्न, लोकविद् दम्यपुरुषांचा सारथि व देवमनुष्यांचा शास्ता आहे, अशी त्याची सर्वत्र कीर्ति पसरली आहे.

अनुक्रमणिका

बिंबिसारराजा आपल्या अमात्यांसह त्याचा शिष्य झाला आहे. तसाच कोसलदेशचा पसेनदिराजा देखील त्याचा शिष्य झाला आहे. या राजांनां जसा तो पूज्य आहे, तसाच तो पौष्करसादि ब्राह्मणांनां पूज्य आहे. एवढी त्याची योग्यता असून सध्या तो आमच्या गांवीं आला आहे. त्याला आह्मीं आमचा अतिथि समजलें पाहिजे, आणि अतिथि या नात्यानें त्याच्या दर्शनाला जाऊन त्याचा सत्कार करणें, हें आह्मांला योग्य आहे."

ब्राह्मण ह्मणाले "भो कूटदंत, तूं जी गौतमाची ही स्तुति केलीस, तिजमुळें आह्मांला असें वाटतें, कीं, सद्गृहस्थानें शंभर योजनें जाऊन देखील त्याचें दर्शन घेणें योग्य होईल. चला, आपण सर्वच त्याच्या दर्शनाला जाऊं."

तेव्हां कूटदंत त्या सर्व ब्राह्मणसमुदायासह आम्रयष्टि नांवाच्या वनामध्यें बुद्ध रहात होता तेथें आला, व बुद्धाला कुशलप्रश्नादिक विचारून एका बाजूला बसला. त्या ब्राह्मणांपैकीं कांहीं बुद्धाला नमस्कार करून, कांहीं आपलें नामगोत्र कळवून, व कांहीं कुशलप्रश्नादि विचारून एका बाजूला बसले.

नंतर कूटदंत बुद्धाला ह्मणाला "आपणाला उत्तम यज्ञविधि माहीत आहे असें मीं ऐकिलें आहे. तो जर आपण आह्मांला समजावून सांगाल, तर चांगलें होईल."

बुद्ध ह्मणाला "प्राचीनकालीं महाविजित नांवाचा एक मोठा राजा होऊन गेला. एके दिवशीं एकांतामध्यें बसला असतां त्या राजाच्या मनांत असा विचार आला, कीं, 'आपल्याजवळ पुष्कळ संपत्ति आहे. तिचा जर आपण महायज्ञांत व्यय केला तर आपल्याला चिरकाल फायदा होईल.' हा विचार त्यानें आपल्या पुरोहिताला कळविला; आणि तो ह्मणाला 'हे ब्राह्मण, महायज्ञ करावयाची माझी फार इच्छा आहे. तो कोणत्या रीतीनें केला असतां माझें हित होईल तें मला सांग.'

"पुरोहित ह्मणाला 'सध्या आपल्या राज्यांत शांतता नाहीं. गांव आणि शहरें लुटली जात आहेत; लोकांनां चोरांपासून फार उपद्रव होत आहे. अशा स्थितींत जर आपण लोकांवर कर बसवाल, तर कर्तव्यापासून विमुख व्हाल. आतां आपणाला असें वाटेल, कीं, फांशीं देण्यानें, तुरुंगांत घालण्यानें, छीःथू करून किंवा राज्यांतून हांकून लावून या चोरांचा बंदोबस्त करतां येईल; परंतु अशा उपायानें राज्यांतील अंदाधुंदीचा पूर्णपणें निकाल व्हावयाचा नाहीं. कांकीं, अशा उपायांनीं जे वठणीला येणार नाहींत, ते पुनः बंडें उपस्थित करितील.

"आतां ही बंडाळी मोडण्याला खरा उपाय ह्मटला ह्मणजे हा आहे- जे आपल्या राज्यांत शेतकी करूं इच्छितात त्यांनां आपण बीं-बियाणें द्या; जे व्यापार करूं इच्छितात, त्यांनां भांडवल द्या; जे सरकारी नोकरी करूं इच्छितात, त्यांनां योग्य वेतन देऊन त्यांचा योग्य कामाकडे उपयोग करा. अशा रीतीनें सर्व माणसें आपणाला आवडणाऱ्या कामांत दक्ष झाल्यावर आपल्या राज्यांत बंडाळी माजण्याचा संभव रहाणार नाहीं. वेळोवेळीं कर वसूल झाल्यामुळें आपल्या तिजोरीची अभिवृद्धि होईल. बंडवाल्यांचा उपद्रव नसल्यामुळें लोक मुलांबाळांचें कोडकौतुक पुरवीत दरवाजे उघडे ठेवून निर्भयपणें मोठ्या आनंदानें कालक्रमणा करितील.'

"पुरोहितब्राह्मणानें सांगितलेला बंडाळीचा बंदोबस्त करावयाचा उपाय महाविजितराजाला पसंत पडला. आपल्या राज्यांत शेती करण्याला समर्थ अशा लोकांनां बी-बियाणें देऊन त्यानें शेती करावयाला

अनुक्रमणिका

लाविलें; लहानसहान व्यापाऱ्यांनां भांडवल देऊन त्यांचा व्यापार वाढविला; आणि योग्य माणसांची निवड करून त्यांची सरकारी कामावर यथायोग्य स्थलीं योजना केली. या उपायानें महाविजिताचें राष्ट्र अल्पावकाशांतच समृद्ध झालें. राज्यांतील लोक इतके सुखी झाले, कीं, चोऱ्या, दरोडे नामशेष होऊन दरवाजे उघडे टाकून आपल्या मुलांनां खेळवीत ते मोठ्या आनंदानें काल कंठूं लागले.

"एके दिवशीं महाविजितराजा पुरोहिताला ह्मणाला 'भो पुरोहित! तुह्मीं सांगितलेल्या उपायानें मीं माझ्या राज्यांतील बंडाळी मोडून टाकिली आहे; माझ्या तिजोरीची सांपत्तिक स्थिति फारच समाधानकारक आहे; व राष्ट्रांतील सर्व लोक निर्भयपणें आणि आनंदानें रहात आहेत. आतां महायज्ञ करावयाची माझी इच्छा आहे. तेव्हां तो यज्ञ कशा प्रकारें करावा याचा मला उपदेश करावा.'

"पुरोहित ह्मणाला 'महायज्ञ करण्याचा जर आपला विचार आहे, तर आपण या कामीं आपल्या प्रजेची अनुमति घेतली पाहिजे. तेव्हां प्रथमतः सर्व राज्यांतील लोकांनां जाहिरनाम्याच्याद्वारें आपली इच्छा कळवून सर्व लोकांची या कामीं संमति मिळवा.'

"पुरोहिताच्या सांगण्याप्रमाणें राजानें 'आपण यज्ञ करणार आहों. याला आपल्या लोकांची अनुमति आहे किंवा नाहीं हें सर्वांनीं निर्भयपणें आणि स्पष्टपणें आपणाला कळवावें,' असा जाहिरनामा लाविला, व त्याप्रमाणें लहानमोठ्या सर्व लोकांनीं यज्ञ करण्याविषयीं आपलें अनुकूल मत दिलें.

"तेव्हां पुरोहितानें यज्ञाची सर्व सिद्धता केली, व तो राजाला ह्मणाला 'यज्ञाला आरंभ केला असतां आपली पुष्कळ संपत्ति या यज्ञांत जाणार आहे, असा विचार तुह्मीं मनांत आणतां कामा नये. यज्ञ चालला असतां, आपली संपत्ति नाश पावत आहे, व यज्ञ झाल्यावर आपली संपत्ति नाश पावली, असा विचार मनांत आणतां कामा नये. आपल्या यज्ञांत बरेवाईट लोक येतील. पण त्यांत जे सत्पुरुष असतील, त्यांवर दृष्टि देऊन आपण यज्ञ करावा, व आपलें चित्त आनंदित ठेवावें.'

"महाविजिताच्या यज्ञामध्यें गाई, बकरे, मेंढे इत्यादि प्राणी मारण्यांत आले नाहींत; झाडें तोडून त्याचे यूप करण्यांत आले नाहींत; दर्भांचा उपयोग करण्यांत आला नाहीं; दासांनां आणि मजुरांनां जबरदस्तीनें कामावर लावण्यांत आलें नाहीं. ज्यांची इच्छा होती त्यांनींच काम केलें, व ज्यांची इच्छा नव्हती त्यांनीं तें केलें नाहीं. तूप, तेल, लोणी, दहीं, मध आणि गूळ, एवढ्या पदार्थांनींच तो यज्ञ परिपूर्ण करण्यांत आला.

"तदनंतर राष्ट्रांतील श्रीमंत लोक मोठमोठाले नजराणे घेऊन, महाविजितराजाच्या दर्शनाला आले. त्यांनां राजा ह्मणाला 'गृहस्थ हो, मला तुमच्या नजराण्यांची मुळींच गरज नाहीं. धार्मिक कराच्या रूपानें माझ्याजवळ पुष्कळ द्रव्य सांठलें आहे. यापैकीं तुह्मांला जर कांहीं पाहिजे असेल, तर तें खुशाल घेऊन जा.'

"याप्रमाणें राजानें त्या धनाढ्य लोकांचे नजराणे घेण्याचें नाकारल्यावर त्यांनीं तें द्रव्य खर्चून अंध, पंगु वगैरे अनाथ लोकांसाठीं महाविजितराजाच्या यज्ञशालेच्या चारी दिशांनां धर्मशाळा बांधून तेथें गोरगरिबांनां दानधर्म केला."

अनुक्रमणिका

ही बुद्धानें सांगितलेली यज्ञाची गोष्ट ऐकून कूटदंताबरोबर आलेले ब्राह्मण उद्गारले “फारच चांगला यज्ञ! फारच चांगला यज्ञ!”

नंतर बुद्धानें कूटदंतब्राह्मणाला आपल्या धर्माचा विस्तारानें उपदेश केला. त्याचें श्रवण करून कूटदंत बुद्धाचा उपासक झाला आणि ह्मणाला “भो गौतम, सातशें बैल, सातशें गोऱ्हे, सातशें कालवडी, सातशें बकरे व सातशें मेंढे, या सर्व प्राण्यांनां यूपापासून मोकळें करितों; त्यांनां मी जीवदान देतों. ताजें गवत खाऊन आणि थंड पाणी पिऊन ते शीतल हवेमध्यें आनंदानें राहोत!”

कूटदंतब्राह्मणानें दुसऱ्या दिवशीं बुद्धाला आपल्या घरीं भिक्षुसंघासह आमंत्रण केलें, व आपण स्वतः सर्व व्यवस्था ठेवून बुद्धाला आणि भिक्षुसंघाला संतृप्त केलें.

[१९]

## शेतकरी भारद्वाज

एके समयीं बुद्धगुरु मगधराष्ट्रामध्यें एकनाळा नांवाच्या ब्राह्मणग्रामांत रहात होता. त्या वेळीं भारद्वाजब्राह्मणाच्या शेतांत नांगरण्याचें काम चाललें होतें. त्यानें पांचशें नांगर या कामावर लाविले होते. एके दिवशीं शेत नांगरणाऱ्या लोकांनां भारद्वाजब्राह्मणानें मेजवानी दिली. ती चालली असतां बुद्धगुरु चीवर परिधान करून व आपलें भिक्षापात्र घेऊन तेथें जाऊन एका बाजूला उभा राहिला.

बुद्धाला भिक्षेसाठीं उभा राहिलेला पाहून भारद्वाज ह्मणाला “हे श्रमण, मी नांगरतों, पेरतों, आणि माझा निर्वाह करितों. त्याप्रमाणे तूंहि शेती करून तुझा निर्वाह कर. भिक्षा मागण्यांत काय अर्थ आहे?”

बुद्ध ह्मणाला “मी देखील शेतीवरच माझा निर्वाह करीत आहें.”

ब्राह्मण ह्मणाला “वाः! तूं आपणाला शेतकरी ह्मणवितोस, पण आऊतें कोठें दिसत नाहींत तीं? तुझी शेती कशा प्रकारची आहे तें तरी सांग पाहूं.”

बुद्ध ह्मणाला “श्रद्धा हें बीं आहे. त्यावर सदाचरणाची वृष्टि होते. प्रज्ञा हा माझा नांगर आहे, व पापाची लाज हा त्या नांगराचा मधला दांडा होय. मनोरूपी रज्जूनें हा नांगर जखडलेला असतो. स्मृति हा माझ्या नांगराचा फाळ, आणि हाच माझा चाबूक होय. सत्य हेंच माझें बेणणें होय; आणि शांति ही माझी विश्रांति होय. माझा उत्साह हेच माझे बैल होत. माझें हें नांगरणें निर्वाणाच्या दिशेला जात असतें. याप्रमाणें केलेली शेती, हे भारद्वाज, अमृतफलद होत असते. अशा प्रकारची शेती केली असतां मनुष्य सर्व दुःखांपासून मुक्त होतो.”

हें भाषण ऐकून भारद्वाजब्राह्मणानें मोठ्या ताटांतून दुधाची खीर आणिली आणि तो ह्मणाला “भो गौतम, या पायसाचें आपण ग्रहण करा. महत्फलदायक शेती करणारे आपण शेतकरी आहां!”

बुद्ध ह्मणाला "मीं आज तुझ्याशीं मला भिक्षा देण्यासंबंधानें ज्याअर्थी संवाद केला आहे, त्याअर्थी आज ही भिक्षा ग्रहण करणें मला योग्य नाहीं. तूं दुसऱ्या कोणातरी सत्पुरुषाला अन्नदानादिकानें संतुष्ट कर. कांकीं, साधुसंत हे पुण्याचीं शेतेंच आहेत."

[२०]

**संतापणारा भारद्वाज**

एके समयीं बुद्धगुरु राजगृहांतील वेणुवनविहारांत रहात होता. आपल्या गोत्रांतील एक ब्राह्मण बुद्धाचा शिष्य झाला, हें वर्तमान ऐकून आक्रोशक भारद्वाजाला फार राग आला; आणि वेणुवनांत येऊन बुद्धावर त्यानें शिव्यांची लाखोली वाहिली. बुद्धानें कांहीच प्रत्युत्तर न दिल्यामुळें आक्रोशक भारद्वाज कांहीं वेळानें शांत झाला. तेव्हां बुद्ध त्याला ह्मणाला "हे ब्राह्मण, तुझ्या घरीं कधींकधीं पाहुणे येत असतात काय?"

आक्रोशक भारद्वाज ह्मणाला "होय. माझे सगेसोयरे कधींकधीं माझ्या घरीं येत असतात."

"आणि त्यांनां तूं खाण्यापिण्याचे जिन्नस देतोस ना?"

"होय. माझ्या घरीं पाहुणे आल्यावर मी त्यांचा योग्य आदरसत्कार करून खाण्यापिण्याचे जिन्नस त्यांनां देत असतों."

"पण हे ब्राह्मण, जर तुझ्या पाहुण्यांनीं तूं दिलेल्या जिनसांचा स्वीकार केला नाहीं, तर त्यांची काय वाट होते?"

"हे गौतम, हें तूं काय विचारतोस? मीं दिलेल्या जिनसा माझ्या पाहुण्यांनां आवडल्या नाहींत, तर त्या माझ्या मला परत मिळतात, हें उघडच आहे."

"हे ब्राह्मण, त्याचप्रमाणें तूं जी ही शिव्यांची भेट मजसाठीं आणिलीस, तिचा मीं स्वीकार केला नाहीं. मी जर तुझ्यावर रागावलों असतों, किंवा तुला उलट शिव्या दिल्या असत्या, तर तुझ्या भेटीचा मीं अंगीकार केला असें ह्मणावें लागलें असतें. पण ज्याअर्थी मी स्वस्थ बसलों, त्याअर्थी त्यांचा अंगीकार मीं केला नाहीं. आतां तुझी ही भेट तुजपाशींच राहिली."

ब्राह्मण ह्मणाला "आपण मोठे संत आहां अशी आपली कीर्ति सर्वत्र पसरली आहे; पण आपण रागावतां हें कसें?"

बुद्ध ह्मणाला "हे ब्राह्मणा, मी रागावलों नाहीं, हें उघडच आहे. रागावणारावर जो उलट रागावतो, त्याचेंच त्यायोगें उलट अहित होतें. पण जो कोणी परका मनुष्य रागावला असतां स्वतः संतापत नाहीं, तो मोठीच लढाई जिंकतो, असें ह्मटले पाहिजे. प्रतिपक्षी रागावला आहे असें पाहून जो मोठ्या विवेकानें शांत होतो, तो आपलें आणि परक्याचें हित साधितो. आपला आणि दुसऱ्याचा रोग बरा करणाऱ्या या मनुष्याला, सद्धर्माचें ज्यांनां ज्ञान नाहीं असे लोक मूर्ख समजतात!"

अनुक्रमणिका

हें भाषण ऐकून आक्रोशक भारद्वाज बुद्धाला शरण गेला, आणि भिक्षु होऊन पुढें कांहीं कालानें अर्हत्पदाला पोहोंचला.

[२१]

## खोटें न बोलण्याविषयीं राहुलाला उपदेश

कोणे ऐके समयीं बुद्ध भगवान् राजगृहांतील वेणुवनांत रहात होता. त्या वेळीं आयुष्मान् राहुल राजगृहाजवळ अम्बलट्ठिका या ठिकाणीं रहात होता. एके दिवशीं संध्याकाळीं बुद्धगुरु राहुल होता त्या ठिकाणीं गेला. राहुलानें भगवंताला दुरून पाहून आसन मांडिलें, व पाय धुण्यासाठीं पाणी आणून ठेविलें. बुद्धगुरूनें आसनावर बसून पाय धुतले. राहुल त्याला नमस्कार करून एका बाजूला बसला.

बुद्धानें पाय धुण्याच्या पात्रांत थोडें पाणी शिल्लक ठेविलें, आणि तो राहुलाला ह्मणाला "राहुल, हें अत्यल्प उदक तूं पहात आहेस काय?"

"होय भंदत," राहुलानें उत्तर दिलें.

"राहुल, ज्याला खोटें बोलण्याविषयीं लाज वाटत नाहीं, त्या माणसाचें श्रामण्य या पाण्याप्रमाणें क्षुल्लक समजावयाला पाहिजे."

नंतर बुद्धानें तें पाणी फेंकून दिलें आणि तो ह्मणाला "राहुल, ज्याला खोटें बोलण्याची लाज वाटत नाहीं, त्याचें श्रामण्य या पाण्याप्रमाणें त्याज्य होय!"

पुनः बुद्ध तें भांडें पालथें घालून राहुलाला ह्मणाला "ज्याला खोटें बोलण्याची लाज वाटत नाहीं, त्या माणसाचें श्रामण्य या भांड्याप्रमाणें पालथें पडलेलें आहे, असें समजावें!"

तें भांडें पुनः सारखें ठेवून बुद्ध ह्मणाला "राहुल, हें रिकामें झालेलें भाडें तूं पहात आहेसना? ज्याला खोटें बोलण्याची लाज वाटत नाहीं, त्याचें श्रामण्य या भांड्याप्रमाणें रिकामें होय!

"राहुल! लढाईसाठीं सज्ज केलेला एकादा राजहस्ती आपल्या सर्व अवयवांनीं लढाई करील, पण सोंड तेवढी राखून ठेवील, तेव्हां असें ह्मणतां येईल, कीं, या हत्तीनें आपलें जीवित धन्याच्या कार्यासाठीं वाहिलें नाहीं. परंतु तोच हत्ती जर लढाईमध्यें सोंडेचा पूर्णपणें उपयोग करूं लागला, तर राजकार्याला त्यानें आपलें सर्व जीवित अर्पण केलें आहे असें ह्मटलें पाहिजे. त्याचप्रमाणें ज्याला खोटें बोलण्याची लाज वाटत नाही, त्याला कोणत्याहि पापाची लाज वाटणार नाही असें मी ह्मणतों. ह्मणून हे राहुल, थट्टामस्करीसाठीं देखील खोटें बोलूं नये, असा तूं निश्चय कर.

"राहुल, आरशाचा उपयोग काय?"
"प्रत्यवेक्षण करण्यासाठीं आरशाचा उपयोग होतो," राहुलानें उत्तर दिलें.

अनुक्रमणिका

“त्याचप्रमाणें राहुल, आपल्या मनाशीं प्रथमतः प्रत्यवेक्षण करून मग कायावाचामनानें तूं कर्मे करीत जा. कायेनें, वाचेनें आणि मनानें एकादें कर्म करावयाला जेव्हां तूं आरंभ करशील, तेव्हां प्रथमतः तूं त्या कर्माचें प्रत्यवेक्षण कर; आणि प्रत्यवेक्षणामुळें जर तें कर्म आत्मपरहिताच्या आड येणार आहे असें तुला आढळून आलें, तर त्याचा तूं एकदम त्याग कर! पण तेंच कर्म आत्मपरहित साधणारें आहे, त्याचा सुखकारक परिणाम होणार आहे, असें दिसून आल्यास त्याचा अंगीकार कर. करीत असतांनां देखील एकाद्या कर्माचें तूं प्रत्यवेक्षण करावें, आणि तें कर्म आत्मपरहिताला बाधक आहे असें आढळून आल्यास अर्ध्यावरच टाकून द्यावें. पण तेंच कर्म चांगलें आहे असें आढळून आल्यास पुढें चालू ठेवावें. आणखी राहुल, कोणतेंहि कर्म केल्यावर देखील त्याचें तूं प्रत्यवेक्षण करावें. तें कर्म वाईट होतें, आत्मपरहिताला विघ्न करणारें होतें, आणि दुःखविपाक होतें, असें आढळून आल्यास तथागतापाशीं किंवा विद्वान् भिक्षूपाशीं त्याचा तूं आविष्कार करावा, व त्या दिवसापासून पुनः तें कर्म करूं नये. पण आपल्याकडून घडलेलें कर्म आत्मपरहितसाधक असून सुखविपाक आहे असें आढळून आल्यास, मुदित अंतःकरणानें त्या कर्माचा तूं पुनःपुनः अभ्यास करावा.

“हे राहुल, अतीत कालीं ज्या साधुसंतांनीं आपलीं कायिक, वाचिक, आणि मानसिक कर्मे परिशुद्ध केलीं, तीं त्यांनीं या प्रत्यवेक्षणाच्या योगेंच केलीं, भविष्यत्कालीं साधुसंत आपलीं कर्मे परिशुद्ध करितील, ते या प्रत्यवेक्षणाच्याच योगें करितील; आणि सांप्रत जे साधुसंत आपलीं कर्मे परिशुद्ध करितात, ते देखील याच प्रत्यवेक्षणानें करितात. ह्मणून, हे राहुल, पुनःपुनः प्रत्यवेक्षण करून कायिक, वाचिक आणि मानसिक कर्मे शुद्ध करण्यास शीक.”

भगवान् असें बोलल्यावर राहुलानें त्याच्या बोलण्याचें अभिनंदन केलें.

[२२]

## भिक्षूनें कधींहि रागावतां कामा नये

मोलिय फल्गुन नांवाच्या एका भिक्षूची आणि कांहीं भिक्षुणींची मैत्री होती. त्या भिक्षुणींसंबंधानें जर कोणी वाईट शब्द बोलला, तर फल्गुनाला फार राग येत असे; व तो तेव्हांच हातघाईवर येत असे. हें वर्तमान बुद्धाला समजतांच फल्गुनाला बोलावून आणून बुद्ध ह्मणाला “हे फल्गुन, तूं कांहीं भिक्षुणींसंबंधानें कोणी वाईट शब्द बोलला असतां त्यावर रागावतोस आणि भांडणाला तयार होतोस, ही गोष्ट खरी आहे काय?”

“होय भदंत,” फल्गुनानें उत्तर दिलें.

बुद्ध ह्मणाला “हे फल्गुन, तूं कुलीन मनुष्य असून श्रद्धापूर्वक भिक्षु झाला आहेस. असें असतां अद्यापि तुझे प्रापंचिक संस्कार गेले नाहींत, हें आश्चर्य नव्हे काय? हे फल्गुन, त्या भिक्षुणींलाच नव्हे, तर तुला देखील कोणीं शिवीगाळी दिली असतां, त्यांच्याच नव्हे, तुझ्या स्वतःच्या देखील थोबाडांत मारली असतां, किंवा दगडानें आणि शस्त्रानें त्यांच्यावरच नव्हे, तुझ्यावर देखील प्रहार केला असतांना तुझें चित्त विकारवश होणार नाहीं, तुझ्या तोंडांतून वाईट शब्द निघणार नाहीं, तुझ्या मनामध्यें त्या वेळीं तुझ्या शत्रूवर अनुकंपा आणि मैत्री राहील, त्याचा त्वेष येणार नाहीं, याजबद्दल तूं खबरदारी घेतली पाहिजे.”

अनुक्रमणिका

तदनंतर बुद्धगुरु भिक्षूंनां उद्देशून ह्मणाला “भिक्षुहो, असा एक समय होता, कीं, त्या समयीं भिक्षु माझ्या सांगण्याप्राणें चालण्याला कसूर करीत नसत. मी त्यांनां ह्मणत असें, कीं, मी दिवसांतून एकच वेळ जेवतों, व त्यामुळें मला फार करून रोगाची बाधा होत नाहीं, माझ्या अंगीं हुषारी असते, बल असतें, व मी सुखानें रहातों. त्याप्रमाणें तुह्मीहि दिवसांतून एकदांच जेवीत चला, व त्यामुळें निरोगी, हुषार, आणि बलवान् होऊन सुखानें रहा. त्या भिक्षूंनां मला पुष्कळ उपदेश करावा लागत नसे; केवळ त्यांच्या कर्तव्याची आठवण द्यावी लागत असे- जसे शिकविलेले उत्तम घोडे सरळ मार्गावर रथ ओढीत असतां चाबकावांचून चालतात, त्याप्रमाणें त्या भिक्षूंनां अनुशासन करावें लागत नसे.

“भिक्षुहो, तुह्मीदेखील त्या भिक्षूंप्रमाणें अकुशल धर्म सोडून कुशल धर्माचा अभ्यास करा. गांवाच्या किंवा नगराच्या बाहेर एकादें शालवृक्षाचें जंगल मातलेलें असेल, त्याची सुधारणा करावयासाठीं एकादा मनुष्य त्यांत वाढलेली कांटेरी झाडें तोडून टाकील, व सरळ शालवृक्ष कायम ठेवून वांकडेतिकडे शालवृक्ष कापून टाकून तें जंगल साफ करील. कांहीं कालानें त्या शालवनाची फारच अभिवृद्धि होईल. त्याचप्रमाणें भिक्षुहो, तुमच्या अंतःकरणांतील अकुशल मनोवृत्तीचें निर्मूलन करा, व कुशल मनोवृत्तींची अभिवृद्धि करा. येणेंकरून या माझ्या धर्मांत तुमची अभ्युन्नति होईल.

“भिक्षुहो, प्राचीनकालीं या श्रावस्तीमध्यें वैदेहिका नांवाची एक कुलीन स्त्री होती. ती अत्यंत शांत आणि नम्र असल्याबद्दल तिची ख्याति होती. तिची काली नांवाची एक दासी होती. तिला असा प्रश्न पडला, कीं, ‘आपली धनीण खरोखरच शांत आहे, किंवा मी सर्व कामें वेळच्यावेळीं करीत असल्यामुळें तिला मजवर रागावण्याचा कधींच प्रसंग येत नाहीं?’

“एके दिवशीं आपल्या धनिणीची परीक्षा पहाण्यासाठीं काली दासी जरा उशिरां उठली. तेव्हां वैदेहिका रागानें कपाळाला आंठ्या घालून कालीला ह्मणाली ‘कायग काली! उशिरां उठलीस हें काय?’

“‘कांहीं नाहीं बाईसाहेब, सहज उशीर झाला,’ कालीनें उत्तर दिलें.

“‘कांहीं नाहीं! उगाच उशिरां उठलीस? मोठी द्वाड दासी आहेस!’ वैदेहिका कालीच्या अंगावर ओरडली.

“‘हं हं! आमच्या धनिणीला घुस्सा फार येतो. पण शेजाऱ्या-पाजाऱ्यांनां मात्र ती आपलें खरें स्वरूप दाखवीत नाहीं!’ काली आपल्या मनाशींच उद्गारली.

“आणखी कांहीं दिवसांनीं आपल्या धनिणीची पुरी परीक्षा करण्यासाठीं काली दासी बऱ्याच उशिरां उठली. तेव्हां वैदेहिकेनें संतापून जाऊन दरवाज्याची खीळ तिच्या कपाळांत घातली. कालीच्या डोक्यांतून रक्तप्रवाह चालला असतां रस्त्यांत जाऊन तिनें आरडाओरड केली. तेव्हां शेजारीपाजारी तिच्याभोंवती गोळा झाले, व तिचें डोकें कसें फुटलें याची त्यांनीं चौकशी केली.

“काली ह्मणाली ‘आमच्या शांत आणि नम्र मालकिणीचें हें कर्म आहे. घरामध्यें मी एकटीच दासी असतां जरा उठण्यास उशीर झाला, ह्मणून दाराच्या खिळीनें तिनें माझें डोकें फोडलें!’

“त्या दिवसापासून वैदेहिका मोठी तापट आणि दुष्ट आहे, अशी तिची अपकीर्ति झाली.

“याप्रमाणें भिक्षुहो, एकादा भिक्षु जोंपर्यंत त्याच्याविरुद्ध वाईट शब्द त्याच्या कानीं पडत नाहींत, तोंपर्यंत शांत आणि नम्र असतो. पण जेव्हां वाईट शब्द ऐकण्याचा त्याला प्रसंग येतो, तेव्हां तो शांत आणि नम्र आहे किंवा नाहीं याची परीक्षा करितां येते. जो अन्नवस्त्रासाठीं शांत किंवा नम्र होतो, त्याला मी शांत किंवा नम्र ह्मणत नाहीं. परंतु जो धर्माच्या गौरवानें धर्माला पूज्य मानून शांत होतो, नम्र होतो, तोच खरा शांत होय, आणि तोच खरा नम्र होय.

“भिक्षुहो, कोणी योग्य वेळीं बोलतो, किंवा कोणी अयोग्य वेळीं बोलतो; कोणी घडलेली गोष्ट बोलतो, तर कोणी न घडलेली गोष्ट बोलतो; कोणी गोड बोलतो, किंवा कोणी वर्मी बोलतो; कोणी आपल्या हितासाठी बोलतो, तर कोणी अहितासाठीं बोलतो; कोणी मित्रभावानें बोलतो, तर दुसरा कोणी द्वेषबुद्धीनें बोलतो. या सर्व प्रसंगीं, भिक्षुहो, तुमचें चित्त विकारवश होणार नाहीं, तुमच्या तोंडांतून वाईट शब्द निघणार नाहीं, तुमच्या अंतःकरणांत दया आणि मैत्री राहील, द्वेष रहाणार नाहीं, व जो मनुष्य आपल्याविरुद्ध बोलला असेल त्याला आधार करून सर्व जगावर तुह्मांला मैत्रीची भावना करितां येईल, असा तुह्मीं अभ्यास केला पाहिजे.

“भिक्षुहो, एकादा मनुष्य टोपली आणि कुदळ घेऊन ह्मणेल, कीं, ही सर्व पृथ्वी मी खणून टाकीन! दुसरा एकादा लाक्षारस, हरिद्रारस, किंवा मंजिष्ठारस घेऊन ह्मणेल, कीं, हें आकाश मी रंगवून टाकीन! तिसरा एकादा गवताची चूड पेटवून ह्मणेल, कीं, मी या गंगानदीला संतप्त करून सोडीन! या सर्व मनुष्यांच्या प्रयत्नांचा पृथ्वीवर, आकाशावर आणि गंगानदीवर जसा कांहींच परिणाम होणार नाहीं, तद्वत् इतर लोकांच्या बोलण्याचा तुमच्या अंतःकरणावर कांहींच वाईट परिणाम होतां कामा नये.

“भिक्षुहो, जर दरोडेखोरांनीं मोठ्या करवतीनें एकाद्या भिक्षूचे अवयव कापावयाला आरंभ केला, आणि जर तो त्या प्रसंगी रागावला, तर त्याला माझा खरा अनुयायी ह्मणतां यावयाचें नाहीं! अशा प्रसंगीं देखील, भिक्षुहो, तुह्माला राग येणार नाहीं, तुमच्या तोंडांतून वाईट शब्द निघणार नाहीं, तुमच्या अंतःकरणांत दया आणि मैत्री राहील, व तुमच्या शत्रूला आधारभूत करून तुह्मी सर्व जगावर निस्सीम मैत्रीची भावना करूं शकाल, याजबद्दल खबरदारी घ्या.

“भिक्षुहो, या माझ्या उपदेशाला तुह्मी क्रकचोपम उपदेश असें ह्मणा, व त्याचें पुनःपुन मनन करा. असा कोणताहि मोठा किंवा लहान वाईट शब्द आहे काय, कीं, जो तुह्मांला सहन करतां येणार नाहीं?”

या बुद्धगुरूच्या उपदेशाचें भिक्षूंनीं मुद्रित मनानें अभिनंदन केलें.

अनुक्रमणिका

[२३]

## चार स्मृत्युपस्थानें (जागृतीचीं साधनें)

एके समयीं बुद्धगुरु कुरुराष्ट्रामध्यें कम्मासदम्म (कल्माषदम्य) नांवाच्या शहरीं रहात असतां, भिक्षूंनां उद्देशून ह्मणाला "भिक्षुहो, मनुष्यप्राण्यांची शुद्धि होण्यासाठीं, शोक आणि खेद यांचा अतिक्रम करण्यासाठीं, दुःख आणि दौर्मनस्य यांचा नाश करण्यासाठीं, सन्मार्गाचा लाभ करण्यासाठीं, आणि निर्वाणाचा अनुभव घेण्यासाठीं चार स्मृत्युपस्थानें हाच काय तो मार्ग आहे. आपल्या देहाचें यथार्थतया अवलोकन करणें, वेदनांचें यथार्थतया अवलोकन करणें, चित्ताचें यथार्थतया अवलोकन करणें, आणि मनोवृत्तीचें यथार्थतया अवलोकन करणें, हीं चार स्मृत्युपस्थानें होत.

"भिक्षुहो एकादा भिक्षु अरण्यांत झाडाच्या खालीं, किंवा एकांतांत मांडी घालून आणि मानेपासून कंबरेपर्यंत आपला देह सरळ ठेवून, बसतो. तो जागृत अंतःकरणानें श्वास आंत घेतो, व जागृत अंतःकरणानें श्वास बाहेर सोडितो. आपले आश्वास आणि प्रश्वास दीर्घ आहेत कीं ऱ्हस्व आहेत, याची त्याला पूर्ण स्मृति असते. सर्व देहाविषयीं जागृति ठेवून आश्वासप्रश्वास करावयाचा तो अभ्यास करितो. कायसंस्कार शांत करून आश्वासप्रश्वास करण्याचा तो अभ्यास करितो. जसा एकादा हुषार कांतारी किंवा त्याचा हुषार चेला आपण दोरी जोरानें ओढतों किंवा हळू ओढतों हें पक्कें जाणतो, तसाच हा भिक्षु आपण दीर्घ किंवा ऱ्हस्व आश्वासप्रश्वास करीत आहों, हें पक्केपणीं जाणतो. याप्रमाणें तो आपल्या देहाचें यथार्थतया अवलोकन करितो.

"तो जात असतांना आपण जात आहों याचें स्मरण ठेवितो; उभा असतांना उभे आहों याचें स्मरण ठेवितो; बसला असतांना बसलों आहों याचें स्मरण ठेवितो; व अंथरुणावर पडल्यावर आपण अंथरुणावर पडलों आहों याचें स्मरण ठेवितो. देहाच्या सर्व क्रियांचे त्याला ज्ञान असतें. याप्रमाणें तो आपल्या देहाचें यथार्थतया अवलोकन करितो.

"तो जाण्यायेण्यांत, इकडेतिकडे पहाण्यांत, बसण्याउठण्यांत, पात्रचीवर धारण करण्यांत, जेवण्यांत, खाण्यांतपिण्यांत, शौचमुखमार्जनादि करण्यांत, बोलण्याचालण्यांत स्मृति ठेवितो. (त्याच्या सर्व क्रिया स्मृतिपूर्वक होत असतात.) याप्रमाणें तो आपल्या देहाचें यथार्थतया अवलोकन करितो.

"आणखी तो आपल्या देहाचें पायांपासून केसांपर्यंत अवलोकन करितो. या देहामध्यें केश, लोम, नख, दंत, त्वचा, मांस, स्नायु, अस्थि, अस्थिमज्ञा, वृक्क, हृद्य, यकृत्, क्लोम, प्लीहा, फुफ्फुस, आंतडें, आंतड्याची दोरी, कोठ्यांतील पदार्थ, करीष, पित्त, श्लेष्म, पू, रक्त, स्वेद, मेद, अश्रु, वसा, थुंकी, शेंबूड, लस आणि मूत्र हे पदार्थ आहेत. एकाद्या टोपलींत निरनिराळीं धान्यें भरलेलीं असलीं, तर ती टोपली सोडून एकादा डोळस मनुष्य तीं निराळीं काढूं शकेल – हे मूग आहेत, हे तांदूळ आहेत, हे उडीद आहेत, आणि हे तीळ आहेत, हें तो दाखवूं शकेल. त्याचप्रमाणें हा (योगी) केश, लोम इत्यादि आपल्या देहांत वसत असलेल्या अशुचि पदार्थांचें यथार्थतया अवलोकन करितो.

"तो स्मशानांत जाऊन तेथें पडलेलीं निरनिराळ्या तऱ्हेचीं प्रेतें पहातो. एकादें प्रेत सुजून मोठें झालेलें असतें, एकादें कावळेकुत्रीं, इत्यादि प्राण्यांनीं खाऊन छिन्नविच्छिन्न केलेलें असतें, तर एकाद्याच्या अस्थिच शिल्लक राहिलेल्या असतात. अशा प्रेतांकडे पाहून तो असा विचार करितो, कीं 'माझा देहदेखील

अनुक्रमणिका

अशाच स्थितीला पोहोंचणार आहे! या स्थितीपासून माझा देह मुक्त होणें शक्य नाहीं.' हा देह उत्पन्न होऊन नाश पावतो याचें तो स्मरण ठेवितो; देह अशा प्रकारचा आहे याचें तो स्मरण ठेवितो. तो अनासक्त होतो; जगामध्यें कोणत्याहि वस्तूची तो आसक्ति ठेवीत नाहीं. याप्रमाणें तो आपल्या देहाचें यथार्थतया अवलोकन करितो.

भिक्षुहो, एकादा भिक्षु आपल्या वेदनांचें अवलोकन करितो. तो सुखकारक वेदना अनुभवीत असला, तर आपण सुखकारक वेदना अनुभवीत आहों हें तो जाणतो; दुःखकारक वेदना अनुभवीत असला तर आपण दुःखकारक वेदना अनुभवीत आहों हें तो जाणतो; सुखदुःखविरहित वेदना अनुभवीत असला, तर सुखदुःखविरहित वेदना अनुभवीत आहों हें जाणतो. तो या वेदना लोभानें अनुभवितो किंवा अलोभानें अनुभवितो, याचें त्याला स्मरण असतें. अशाप्रकारें तो आध्यात्मिक किंवा बाह्य वेदनांचें यथार्थतया अवलोकन करितो. वेदना उत्पन्न होऊन विनाश पावतात, हें तो पहातो. आपल्या अंगीं वेदना आहेत, याची त्याला स्मृति असते. स्मृति आणि ज्ञान मिळविण्यासाठीं तो अनासक्त होतो. इहलोकीं कशाचीहि आसक्ति ठेवीत नाहीं. याप्रमाणें भिक्षु वेदनांचें यथार्थतया अवलोकन करितो.

"भिक्षुहो, एकादा भिक्षु आपल्या चित्ताचें यथार्थतया अवलोन करितो. आपलें चित्त सकाम आहे किंवा निष्काम आहे; सद्वेष आहे किंवा विगतद्वेष आहे; समोह आहे किंवा वीतमोह आहे; संक्षिप्त आहे किंवा विक्षिप्त आहे; समाहित आहे किंवा असमाहित आहे; विमुक्त किंवा अविमुक्त आहे, इत्यादि सर्व तो जाणतो. अशा प्रकारें आपल्या किंवा परक्याच्या चित्ताचें त्याला ज्ञान होतें. चित्त चंचल आहे, हें तो जाणतो. चित्त ह्मणून कांहीं आहे याची त्याला स्मृति असते. केवळ स्मृति आणि ज्ञान मिळविण्यासाठीं तो कोणत्याहि पदार्थावर आसक्ति न ठेवतां वागतो. याप्रमाणें भिक्षु चित्ताचें यथार्थतया अवलोकन करितो.

"भिक्षुहो, एकादा भिक्षु आपल्या मनोवृत्तीचें यथार्थतया अवलोकन करितो. तो कामविकार, द्वेषबुद्धि, आळस, अस्वस्थता आणि संशय हीं पांच ज्ञानाचीं आवरणें आपल्या अंतःकरणांत आहेत किंवा नाहींत, हें नीट पहातो. या आवरणांची उत्पत्ति कशी होते, हीं उत्पन्न झालीं असतां त्यांचा विनाश कसा करतां येतो, आणि पुनः त्यांचा उत्पाद न होण्याविषयीं उपाय कोणता, हें सर्व तो जाणतो. याप्रमाणें या पांच मनोवृत्तींचें तो यथार्थतया अवलोकन करितो.

"आणखी तो पंचस्कंधांचें यथार्थतया अवलोकन करितो. रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान या पांच स्कंधांचा उदय कसा होतो आणि अस्त कसा होतो, हें तो जाणतो. याप्रमाणें आभ्यंतर किंवा बाह्यस्कंधाचें तो यथार्थतया अवलोकन करितो.

"आणखी तो चक्षु, रूप इत्यादि आभ्यंतर आणि बाह्य आयतनांचें यथार्थतया अवलोकन करितो. चक्षु आणि रूप, कर्ण आणि शब्द, नासा आणि गंध, त्वचा आणि स्पर्श, मन आणि मनोवृत्ति, यांच्या संयोगानें कोणकोणतीं संयोजनें उत्पन्न होतात, यांजपासून उत्पन्न झालेल्या संयोजनांचा विनाश कसा होतो, व पुनः हीं संयोजनें उत्पन्न न होण्यास उपाय कोणता, हें तो जाणतो.

"आणखी तो सात बोध्यंगांचें यथार्थतया अवलोकन करितो. स्मृति, धर्मप्रविचय, वीर्य, प्रीति, प्रश्रब्धि, समाधि आणि उपेक्षा, हे सात धर्म आपल्या अंतःकरणांत आहेत किंवा नाहींत, हें तो जाणतो. नसलेल्या संबोध्यंगांचा उत्पाद कसा करितां येईल, व उत्पन्न झालेल्या संबोध्यंगाला भावनेच्या योगें

पूर्णतेला कसें नेतां येईल, हेंहि तो जाणतो. याप्रमाणें आभ्यंतर आणि बाह्यमनोवृत्तींचे तो यथार्थतया अवलोकन करितो.

"आणखी तो चार आर्यसत्यांचें यथार्थतया अवलोकन करितो. हें दुःख आहे, हा दुःखाचा समुदय आहे, हा दुःखाचा निरोध आहे, आणि हा दुःखनिरोधाचा मार्ग आहे, हें तो यथाभूततया जाणतो. याप्रमाणें तो आभ्यंतर आणि बाह्यवृत्तीचें यथार्थतया अवलोकन करितो.

"भिक्षुहो, या चार स्मृत्युपस्थानांची वर सागितल्याप्रमाणें सात वर्षे भावना केली असतां भिक्षूला अरहत्पदाचा लाभ होईल; निदान तो अनागामी होईल. (इहलोकीं त्याला जन्म घ्यावा लागणार नाहीं.) भिक्षुहो, सात वर्षे राहूं द्या; पण जर कोणी या स्मृत्युपस्थानांचें मोठ्या कळकळीनें पांच–चार–तीन–दोन–एक वर्ष–सात महिने–सात दिवस यथार्थतया चिंतन करील, तर त्याला अरहत्पदाचा लाभ होईल; निदान तो अनागामी होईल."

या बुद्धगुरूच्या उपदेशाचें भिक्षूंनीं मुद्रित अंतःकरणानें अभिनंदन केलें.

## [२४]
## विषयांची गोडी, विषयांपासून दुःख आणि त्यांपासून मुक्तता

एके समयीं बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें रहात असतां भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो, विषयांची गोडी कोणती? डोळ्याला आवडणारीं रूपें, कानाला आवडणारे शब्द, नाकाला आवडणारे सुगंध, जिव्हेला आवडणारे रस, आणि त्वचेला आवडणारे मृदुस्पर्श, या पंचेंद्रियांच्या विषयांपासून मनुष्याला जें सुख होतें, त्यालाच मी विषयांची गोडी असें ह्मणतों.

"पण भिक्षुहो, या विषयामध्यें दोष कोणता? एकादा तरुण होतकरू कारकुनी करून, व्यापारधंदा करून, शेतकी करून, किंवा सरकारी नोकरी करून, आपला निर्वाह करितो. आपल्या धंद्यामुळें त्याला अत्यंत ताप होतो, तथापि विषयोपभोगाच्या वस्तु मिळविण्यासाठीं तो रात्रंदिवस खटपट करीत असतो. एवढी मेहनत करून जर या वस्तूंचा त्याला लाभ झाला नाहीं, तर तो शोकाकुल होऊन आपला प्रयत्न व्यर्थ गेला, या विवंचनेनें विचारमूढ होतो. बरें, यदाकदाचित् त्याच्या उद्योगांत त्याला यश आलें, आणि इच्छिलेल्या वस्तु त्याला मिळाल्या, तर त्यांचें दुष्ट राजांनीं आणि चोरांनीं हरण करूं नये, अग्नि आणि उदक यांपासून त्यांचा नाश होऊं नये, आणि अप्रिय दायादांपासून त्यांनां अपाय होऊं नये, म्हणून तो रात्रंदिवस त्या वस्तूंचा संभाळ करण्यांत गढून जातो, व त्यामुळें त्याच्या मनाला फार त्रास होतो. पण एवढा बंदोबस्त केला असतां देखील राजेलोक किंवा दरोडेखोर त्याची संपत्ति लुटतात; आगीनें किंवा उदकानें त्या संपत्तीचा नाश होतो; अथवा अप्रिय दायाद तिचें हरण करितात. अशा प्रसंगीं त्या गृहस्थाला अत्यंत दुःख होतें.

"आणखी भिक्षुहो, या विषयासाठींच राजेलोक राजांबरोबर भांडतात, क्षत्रिय क्षत्रियांबरोबर भांडतात, ब्राह्मण ब्राह्मणांबरोबर भांडतात, वैश्य वैश्यांबरोबर भांडतात, आई मुलाबरोबर भांडते, मुलगा आईबरोबर भांडतो, बाप मुलाशीं भांडतो, बहीण भावाबरोबर भांडते, भाऊ बहिणीबरोबर भांडतो, आणि

मित्र मित्रांबरोबर भांडतात! त्यांच्या या कलहाचा परिणाम कधींकधीं असा होतो, कीं, ते हातांनीं, दगडांनीं, दांड्यांनीं, किंवा शस्त्रांनीं एकमेकांवर प्रहार करितात, व त्यामुळें मरण पावतात, अथवा मरणांतिक दुःख भोगतात.

“आणखी भिक्षुहो, या विषयांच्या प्राप्तीसाठींच लोक लढाईला सज्ज होतात, व भयंकर संग्रामांत प्रवेश करितात. तेथें शस्त्रास्त्रांनी त्यांनां मरण येतें, किंवा जखमा वगैरे होऊन ते मरणांतिक दुःख भोगतात. दुसरे कांहीं लोक विषयोपभोगासाठीं चोऱ्या करितात, दरोडे घालतात, पांथस्थ लोकांनां लुटतात, किंवा परस्त्रीगमन करितात. त्यांनां पकडून राजेलोक नानाप्रकारें दंड करीत असतात. राजपुरुष त्यांनां फटके मारितात; त्यांचे हातपाय तोडितात; त्यांचे नाककान कापितात; किंवा त्यांचा शिरच्छेद करितात. अशा रीतीनें विषयलोभामुळें ते मरण पावतात, किंवा मरणांतिक वेदना भोगीत असतात.

“आणखी भिक्षुहो, याच विषयभोगासाठीं मनुष्यप्राणी कायेनें, वाचेनें आणि मनानें इहलोकीं दुष्कर्माचरण करून मरणोत्तर दुर्गतीला जातात.

“भिक्षुहो, विषयांची आसक्ति सोडून देण्यामुळेंच मनुष्याची त्यांपासून मुक्तता होते. (केवळ बाह्यात्कारी विषयाचा त्याग केला तर त्यांपासून मनुष्य मुक्त होतो असें नाहीं.)

“भिक्षुहो, याप्रमाणें जे श्रमणब्राह्मण विषयाची गोडी, विषयांतील दोष आणि विषयांपासून मुक्तता यथार्थतया जाणतात, ते स्वतः विषयाचा त्याग करितील, व दुसऱ्याला तसें करण्याविषयीं उपदेश करतील, हें संभवनीय आहे.

“भिक्षुहो, सौंदर्याची गोडी कोणती? एकादी अत्यंत सुस्वरूप तरुण ब्राह्मणकन्या, क्षत्रियकन्या, अथवा वैश्यकन्या पाहून जें सुख उत्पन्न होतें, तीच सौंदर्याची गोडी होय.

“पण या सौंदर्यात दोष कोणता? भिक्षुहो, तीच तरुणी जेव्हां वृद्ध होते, तिची पाठ वांकते, हातांत काठी घेतल्याशिवाय तिला चालतां येत नाहीं, तिचे सर्व अवयव लटलट कांपत असतात, दांत निघून जातात, केश पांढरे होतात, मान हालत असते, तोंडाला सुरकुत्या पडलेल्या असतात, तेव्हां तें तिचें पूर्वीचें सौंदर्य नष्ट होऊन विकृत होतें कीं नाहीं?”

“होतें भदंत,” भिक्षु ह्मणाले.

“हाच त्या सौंदर्याचा दोष आहे, असें मी ह्मणतों. भिक्षुहो, त्याच सुंदर स्त्रीचें प्रेत स्मशानांत पडलेलें कावळ्यांनीं किंवा कुत्र्यांनीं अर्धवट खाल्लेलें अथवा अन्य रीतीनें विकृत झालेलें जर तुमच्या पहाण्यांत आलें, तर तें पूर्वीचें सौंदर्य नष्ट होऊन त्याच्या जागीं विकार उत्पन्न झाला, असें तुह्मांला वाटणार नाहीं काय?”

“होय भदंत,” भिक्षूंनीं उत्तर दिलें.

“भिक्षुहो, सौंदर्याविषयीं आसक्ति सोडून देणें हाच सौंदर्यापासून उत्पन्न होणाऱ्या भयांतून मुक्त होण्याचा खरा मार्ग होय. सौंदर्याची गोडी कोणती, त्यांत दोष कोणता, व त्यापासून मुक्तता कशी होते, हें

ज्या श्रमणब्राह्मणांला यथार्थतया समजलें, ते स्वतः सौंदर्यापासून मुक्त होतील, व त्यापासून मुक्त होण्याचा मार्ग इतरांनां शिकवतील, हें संभवनीय आहे."

[२५]

## सारग्रहण केलें पाहिजे

बुद्धगुरु राजगृहामध्यें गृध्रकूटपर्वतावर रहात होता. देवदत्तासंबंधानें बोलत असतां तो भिक्षूंला ह्मणाला "भिक्षुहो, एकादा कुलपुत्र श्रद्धापूर्वक गृहत्याग करून प्रव्रज्या घेतो. आपण संसारदुःखापासून मुक्त व्हावें, अशी त्याची इच्छा असते. परंतु भिक्षु झाल्यामुळें त्याला लोकांकडून लाभसत्कार मिळतो, व त्यायोगें तो आत्मस्तुति आणि परनिंदा करितो. जसा एकादा माणूस मोठ्या वृक्षाचें सार ग्रहण करण्यासाठीं जातो, व त्याच्या फांद्या आणि पाचोळा घेऊन तेंच सार आहे असें समजतो, त्याप्रमाणें, हा मनुष्य केवळ प्रव्रज्येलाच श्रामण्याचें सार असें समजून मोहित होतो.

"भिक्षुहो, दुसरा एकादा कुलपुत्र प्रव्रज्येनेंच संतुष्ट न होतां शीलवान् होतो; पण आपल्या शीलाचा गर्व वाटून तो आत्मस्तुति आणि परनिंदा करितो. मीच कायतो शीलवान्, दुसरे भिक्षु दुःशील, असें तो ह्मणत असतो. जसा एकादा मनुष्य मोठ्या वृक्षाचें सार आणण्यासाठीं जातो, व त्या वृक्षाच्या सालीचा वरचा भाग घेऊन तेंच सार आहे असें समजून संतुष्ट होतो, त्याचप्रमाणें हा भिक्षु शीलच श्रामण्याचें सार आहे असें समजून मोहित होतो.

"तिसरा एकादा कुलपुत्र श्रद्धापूर्वक प्रव्रज्या घेऊन तेवढ्यानें संतुष्ट न होतां शीलवान् होतो, व समाधीचा अभ्यास करितो; पण समाधीचा लाभ झाल्यावर त्याला आपण कृतार्थ झालों असें वाटतें, आणि त्यामुळें तो आत्मस्तुति आणि परनिंदा करितो. जसा एकादा माणूस मोठ्या वृक्षाचें सार आणण्यासाठीं जातो आणि त्या वृक्षाची साल काढून तिलाच सार समजून संतुष्ट होतो, त्याप्रमाणें हा भिक्षु समाधिसुखालाच श्रामण्याचें सार समजून मोहित होतो.

"चवथा एकाद्या कुलपुत्र श्रद्धापूर्वक भिक्षु होऊन शील आणि समाधि यांहींकरून संतुष्ट न होतां प्रज्ञेचा अभ्यास करितो; परंतु प्रज्ञेंतच श्रामण्याचें सर्वस्व आहे असें वाटून तो आत्मस्तुति आणि परनिंदा करितो. मी प्रज्ञावान् आहें, व इतर भिक्षु दुष्प्रज्ञ आहेत, असें तो ह्मणत असतो. जसा एकादा मनुष्य मोठ्या वृक्षाचें सार आणण्यासाठीं जातो, आणि त्या वृक्षाची साल काढून तिच्या आंतील मऊ लांकडालाच सार समजून तें घेऊन संतुष्ट होतो, याप्रमाणें हा भिक्षु प्रज्ञेलाच श्रामण्याचें सार समजून मोहित होतो!

"पण पांचवा एकादा कुलपुत्र श्रद्धापूर्वक भिक्षु होऊन, शील, समाधि आणि प्रज्ञा यांच्या लाभानें संतुष्ट न होतां निर्वाणाचा साक्षात्कार करून घेतो. तो या गुणांमुळें आत्मस्तुति किंवा परनिंदा करीत नाहीं. जसा एकादा मनुष्य मोठ्या वृक्षाचें सार आणण्यासाठीं जातो व त्या वृक्षाची साल काढून आणि त्याचें मऊ लांकूड फोडून टाकून आंतील खरेंखुरें सार घेऊन जातो, त्याप्रमाणें हा भिक्षु श्रामण्याचें खरें सार जें निर्वाण तें मिळवितो.

"भिक्षुहो, हें ब्रह्मचर्य लाभसत्काराच्या फायद्यासाठीं नव्हे, शीलसंपत्तीच्या फायद्यासाठीं नव्हे, समाधिसंपत्तीच्या फायद्यासाठीं नव्हे, किंवा प्रज्ञेच्या फायद्यासाठींहि नव्हे. हें ब्रह्मचर्य आत्यंतिक

चित्तविमुक्तीसाठीं आहे, आत्यंतिक चित्तविमुक्ति (निर्वाण) हें ब्रह्मचर्याचें सार आहे, आणि हें ब्रह्मचर्याचें पर्यवसान आहे.

[२६]
## माराचें कुरण

बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आश्रमांत रहात असतां भिक्षूंनां उद्देशून ह्मणाला "भिक्षुहो, कुरण लावणारा मनुष्य मृगांच्या कल्याणासाठीं कुरण लावीत नाहीं. त्याचा हेतु असा असतो, कीं, या कुरणांतील गवत खाऊन मृग प्रमत्त होतील, व त्यामुळें सर्वस्वीं आपल्या ताब्यांत येतील!

"भिक्षुहो, अशा एका कुरणामध्यें एका जातीचे मृग येऊन यथास्थित गवत खाऊन प्रमत्त झाले, व त्यामुळें सर्वस्वीं कुरण लावणाऱ्या मनुष्याच्या ताब्यांत गेले. तें पाहून दुसऱ्या कांहीं मृगांनीं असा विचार केला, कीं, या कुरणांत शिरणें सर्वथैव अनिष्ट आहे. त्यांनीं तें कुरण सोडून दिलें, आणि ते ओसाड अरण्यांत शिरले. परंतु उन्हाळ्याचे दिवस आल्यावर त्यांनां तेथें चारापाणी मिळेनासें झालें. त्यामुळें त्यांच्या शरीरांत बळ राहिलें नाहीं. ते उदरपीडेनें त्रस्त होऊन पुनः त्या कुरणांत शिरले, आणि प्रमत्त होऊन त्या मनुष्याच्या ताब्यांत गेले. तिसऱ्या कांहीं मृगांनीं हे दोन्ही मार्ग सोडून देऊन कुरणाच्या जवळच जंगलाचा आश्रय केला, व ते मोठ्या सावधगिरीनें कुरणांतील गवत खाऊं लागले. बराच कालपर्यंत ते त्या मनुष्याच्या ताब्यांत गेले नाहींत; पण त्या मनुष्याला जेव्हां त्यांचें आश्रयस्थान समजलें, तेव्हां त्यानें त्याभोंवतीं जाळीं पसरून त्या मृगांनां आपल्या हस्तगत केलें. पण चौथे मृग इतके हुषार होते, कीं, त्यांनीं कुरणापासून दूर अंतरावर गहन अरण्यांत वस्ती केली, व तेथून ते मोठ्या सावधगिरीनें कुरणांतील गवत खाऊं लागले. त्यांचें आश्रयस्थानइतकें बिकट होतें, कीं, त्याचा पत्ता कुरणाच्या मालकाला मुळींच लागला नाहीं.

"भिक्षुहो, हें मीं रूपक केलें आहे. कुरण लावणारा मनुष्य दुसरा कोणी नसून मार हा आहे. ज्या श्रमणब्राह्मणांनीं विषयसुखामध्येंच आनंद मानिला ते पहिले मृग होत; पण ज्यांनीं विषयोपभोगाचें अत्यंत भय वाटल्यामुळें अरण्यवास पत्करिला आणि जे सर्व जगापासून एकाएकीं वेगळे झाले ते दुसरे मृग होत. जे श्रमणब्राह्मण विषयाचा उपभोग मोठ्या काळजीनें घेऊन जग हें शाश्वत आहे कीं अशाश्वत आहे, आत्मा अमर आहे कीं नाशवंत आहे, इत्यादि प्रश्नांविषयीं वादविवाद करून आपला वेळ फुकट घालवितात, ते तिसरे मृग होत. पण जे असल्या भानगडींत न पडता आपलें अंतःकरण निष्कलंक राहील अशी काळजी घेतात, ते चवथे मृग होत."

[२७]
## सुखाचा दिवस

बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आश्रमांत रहात असतां भिक्षूंनां उद्देशून ह्मणाला "गेल्या गोष्टीचा अधिक विचार करूं नये, आणि भावी गोष्टीची आशा धरूं नये. कांकीं, गेलेली गोष्ट नष्ट झाली आहे, आणि घडणारी गोष्ट अद्यापि घडावयाची आहे. परंतु प्रस्तुत गोष्टीचाच नीट विचार करावा; आजच जें कांहीं करावयाचें असेल तें करावें; उद्यांचें मरण कोणाला ठाऊक आहे? ज्याचें अफाट सैन्य आहे, त्या मृत्यूबरोबर युद्ध करणें आह्मांला शक्य आहे काय? असा विचार करून जो सावधगिरीनें आणि हुषारीनें वागतो, त्याचाच दिवस सुखानें जातो, असें मुनिवर्य ह्मणतात.

अनुक्रमणिका

"भिक्षुहो, अतीतकाळीं माझें रूप असें होतें, माझ्या वेदना अशा होत्या, माझी संज्ञा, माझे संस्कार आणि माझें विज्ञान हीं अशीं होतीं, असें ह्मणून एकादा मनुष्य त्यांचा लोभ धरितो. हा मनुष्य गेलेल्या गोष्टींच्या मागें लागला आहे असें ह्मटलें पाहिजे. दुसरा एकादा भविष्यत्काळी माझें रूप, वेदना, हीं अशाअशा प्रकारचीं व्हावीं या विचारांत मग्न होऊन जातो, व या गोष्टीसंबंधानें अत्यंत लोभ धरितो. हा मनुष्य भावी गोष्टीची आशा करितो असें ह्मटलें पाहिजे. पण आर्यश्रावक आर्यधर्माचें ज्ञान करून घेऊन आणि सत्पुरुषांशीं सहवास करून रूप आत्मा नाहीं, किंवा रूपांत आत्मा नाहीं, वेदना आत्मा नाहीं, संज्ञा आत्मा नाहीं, संस्कार आत्मा नाहीं, विज्ञान आत्मा नाहीं, विज्ञानवान् आत्मा नाहीं, विज्ञानामध्यें आत्मा नाहीं किंवा आत्म्यामध्यें विज्ञान नाहीं, हें यथार्थतया जाणतो. हा मनुष्य प्रस्तुत गोष्टीचा नीट विचार करितो, असें ह्मटलें पाहिजे."

[२८]

## मालुंक्यपुत्राची दृष्टि

बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आरामांत रहात असतां मालुंक्यपुत्र नांवाचा भिक्षु त्याजपाशीं आला आणि त्याला नमस्कार करून एका बाजूला आसनावर बसला. नंतर मालुंक्यपुत्र भगवंताला ह्मणाला "भदंत, एकांतांत बसलों असतां माझ्या मनांत असा विचार आला, कीं, हें जग शाश्वत आहे कीं अशाश्वत आहे? शरीर आणि आत्मा एक आहेत की भिन्न आहेत? मरणोत्तर तथागताला पुनर्जन्म आहे किंवा नाहीं? इत्यादि मुद्दयांचें भगवंतानें विवरण केलें नाहीं. तेव्हां मी आपणाजवळ येऊन या मुद्दयांसंबंधानें प्रश्न विचारीन. जर आपणाला या मुद्यांचा निकाल लावतां येईल, तरच मी आपला शिष्य होईन. जर आपणाला या गोष्टी माहीत नसतील, तर त्या माहीत नाहींत असें ह्मणणें हाच सरळ मार्ग होय!"

बुद्ध ह्मणाला "मालुंक्यपुत्र, तूं माझा शिष्य होशील तर या मुद्दयांचें स्पष्टीकरण करून सांगेन, असें मीं तुला कधीं सांगितलें होतें काय?"

"नाही भदंत," मालुंक्यपुत्रानें उत्तर दिलें.

"बरें, तूं तरी मला ह्मणालास काय, कीं, जर मला तुह्मी या सर्व मुद्दयांचें स्पष्टीकरण करून सांगाल, तरच मी तुमच्या भिक्षुसंघांत येईन?"

"नाहीं भदंत," मालुंक्यपुत्र ह्मणाला.

बुद्ध ह्मणाला "तर मग आतां हे मुद्दे स्पष्ट करून सांगितल्याशिवाय मी तुमचा शिष्य होणार नाहीं, या ह्मणण्यांत अर्थ कोणता?

"मालुंक्यपुत्र, एकाद्या मनुष्याच्या अंगामध्यें बाणाचें विषारी शल्य शिरून तो तळमळत असतां त्याचे आप्त-इष्ट शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्याला बोलावून आणतील; परंतु तो रोगी त्या वैद्याला ह्मणेल, कीं, 'हा बाण कोणी मारला? तो ब्राह्मण होता कीं क्षत्रिय होता, वैश्य होता कीं शूद्र होता, काळा होता कीं गोरा होता, त्याचें धनुष्य कोणत्या प्रकारचें होतें, धनुष्याची दोरी कशाची केली होती, इत्यादि सर्व गोष्टी जोंपर्यंत तुह्मी मला समजावून देणार नाहीं, तोंपर्यंत मी या शस्त्राला हात लावूं देणार नाहीं!' मालुंक्यपुत्र, अशा प्रसंगीं त्या

अनुक्रमणिका

माणसाला या सर्व गोष्टी न समजतांच मरण येईल. त्याचप्रमाणें जो असा हट्ट धरील, कीं, मला हें जग शाश्वत आहे कीं अशाश्वत आहे इत्यादि सर्व मुद्दे समजल्यावांचून मी ब्रह्मचर्याचा अभ्यास करणार नाहीं. तर त्याला हे मुद्दे समजल्यावांचूनच मरण येईल.

“हे मालुंक्यपुत्र, जग शाश्वत आहे किंवा अशाश्वत आहे, अशी दृष्टि असली आणि असा विश्वास असला, तथापि धार्मिक आचरणाला त्यापासून मदत होईल असें नाहीं. हें जग शाश्वत आहे असा विश्वास ठेविला, तरी जरा, मरण, शोक, परिदेव यांजपासून मुक्तता होत आहे, असें नाहीं. त्याचप्रमाणें शरीर आणि आत्मा एक आहे, शरीर आणि आत्मा भिन्न आहे, मरणोत्तर तथागताचा पुनर्जन्म होतो, मरणोत्तर तथागताचा पुनर्जन्म होत नाहीं, इत्यादि गोष्टींवर विश्वास ठेविला काय किंवा न ठेविला काय, जाति, जरा, मरण, शोक, परिदेव, आहेतच आहेत! ह्मणून, हे मालुंक्यपुत्र, जग शाश्वत आहे, इत्यादि गोष्टींचें विवरण करण्याच्या भरीला मी पडलों नाहीं. कांकीं, या गोष्टींच्या वादविवादानें ब्रह्मचर्याला कोणत्याहि प्रकारें स्थैर्य येण्याचा संभव नाहीं. अशा वादानें वैराग्य उत्पन्न होणार नाहीं, पापाचा निरोध व्हावयाचा नाहीं, शांति, प्रज्ञा, संबोध आणि निर्वाण यांचा लाभ व्हावयाचा नाहीं.

“पण मालुंक्यपुत्र, हें दुःख आहे, हा दुःखाचा समुदय आहे, हा दुःखाचा निरोध आहे, आणि हा दुःखनिरोधाचा मार्ग आहे, हें मीं स्पष्ट करून दाखविलें आहे. कांकीं, हीं चार आर्यसत्यें ब्रह्मचर्याला स्थैर्य आणणारीं आहेत. यांजमुळें वैराग्य येतें, पापाचा निरोध होतो, शांतीचा, प्रज्ञेचा, संबोधाचा आणि निर्वाणाचा लाभ होतो. ह्मणून, हे मालुंक्यपुत्र, ज्या गोष्टींची मीं चर्चा केली नाहीं त्या गोष्टींची चर्चा करूं नका, व ज्या गोष्टींचें मीं स्पष्टीकरण केलें आहे त्या गोष्टी स्पष्टीकरणाला योग्य आहेत, असें समजा.”

बुद्धगुरु असें बोलल्यावर मालुंक्यपुत्रानें त्याच्या भाषणाचें अभिनंदन केलें.

[२९]

## वत्सगोत्र परिव्राजक

बुद्ध भगवान् श्रावस्तीमध्यें रहात असतां वत्सगोत्र नांवाचा परिव्राजक त्याजवळ आला आणि ह्मणाला “भो गौतम, आत्मा आहे काय?”

बुद्धानें उत्तर दिलें नाहीं.
वत्सगोत्र ह्मणाला “भो गौतम, आत्मा नाहीं काय?”
बुद्ध कांहीं बोलला नाहीं, व वत्सगोत्र उठून चालता झाला.
तेव्हां आनंद बुद्धाला ह्मणाला “भगवंतानें वत्सगोत्राच्या प्रश्नाचें उत्तर कां दिलें नाहीं?”

बुद्ध ह्मणाला “आनंद, मी जर आत्मा आहे काय? या प्रश्नाला आत्मा आहे असें उत्तर दिलें असतें, तर आत्मा नित्य मानणाऱ्या श्रमणब्राह्मणाहून माझें मत भिन्न झालें नसतें; जर आत्मा नाहीं असें उत्तर दिलें असतें, तर जे श्रमणब्राह्मण देहात्मावादी आहेत, त्यांच्या मताहून माझें मत भिन्न झालें नसतें. रूपादि पंचस्कंध आत्मा नाहीं, सगळे धर्म अनात्मा आहेत असें मीं सांगितलें असतें, तर तें माझ्या मताला अनुरूप झालें असतें; परंतु त्यामुळें वत्सगोत्र घोटाळ्यांत पडला असता. त्याला असें वाटलें असतें, कीं, पूर्वी माझ्या शरीरांत आत्मा ह्मणून कांहीं पदार्थ होता. तो या बुद्धाच्या सांगण्याप्रमाणें नाहींसा झाला!”

अनुक्रमणिका

[३०]

## अंधांचें हस्तिवर्णन

एके वेळीं श्रावस्तीमध्यें नानामतांचे श्रमण ब्राह्मण एकत्र जमून आपापल्या मतासंबंधानें जोरानें भांडत होते. कोणी ह्मणत होता, आत्मा शाश्वत आहे; पण त्याला दुसरा ह्मणे, कीं, आत्मा अशाश्वत आहे. कोणी ह्मणे, जगाचा अंत होणार; तर कोणी ह्मणे, जगाचा अंत होणार नाहीं!

त्यांचें हें भांडण कांहीं भिक्षूंनीं ऐकिलें, आणि जेतवनांत येऊन हें वर्तमान त्यांनीं बुद्धाला सांगितलें.

बुद्ध ह्मणाला “भिक्षुहो, प्राचीनकाळीं या श्रावस्ति नगरींत एक राजा होऊन गेला. त्यानें आपल्या राजधानींत जेवढे जन्मांध होते तेवढे गोळा केले, व त्यांनां हत्ती दाखववावयाला सांगितलें. माहुतानें त्या जन्मांधांच्या झुंडींत हत्तीला आणून उभें केलें. त्यांनीं हत्तीचा जो जो अवयव हाताला लागला, तो तो चांचपडून पाहिला. तेव्हां राजा त्यांनां ह्मणाला ‘कायहो, हत्ती तुह्मीं पाहिलात काय?’

“‘होय महाराज,’ त्या जन्मांधांनीं उत्तर दिलें.
“‘तर मग आंधळेबुवा, हत्ती कसा आहे हें सांगाल काय?’

“ज्यानें हत्तीचें डोकें चांचपडून पाहिलें होतें, तो आंधळा पुढें सरसावला, आणि ह्मणाला ‘महाराज, मी सांगतों हत्ती कसा आहे तो. पाण्याचा घडा असतो नाहीं, तसा आहे पहा!’

“इतक्यात दुसरा आंधळा पुढें सरसावून ह्मणाला ‘महाराज, हा कांहीं तरी भलतेंच सांगतो! खरें ह्मणाल तर हत्ती सुपासारखा आहे.’ यानें आणि याच्या साथीदारांनीं हत्तीचे कानच चांचपडून पाहिले होते.

“पण ज्या आंधळ्यांनीं हत्तीचे पाय चांचपडून पाहिले होते ते ह्मणाले ‘महाराज, यांच्या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं! हे भलतेंच कांहीं तरी सांगत आहेत. खरें ह्मणाल, तर हत्ती झाडाच्या बुंध्यासारखा आहे!’

“याप्रमाणे भिक्षुहो, ते आंधळे हत्तीच्या स्वरूपाचें भिन्नभिन्न प्रकारें वर्णन करून आपसांमध्यें भांडण करूं लागले, व परस्परांवर मुष्टीप्रहार करूं लागले. तें पाहून त्या राजाला मौज वाटली. त्या आंधळ्यांप्रमाणें सध्या हे श्रमणब्राह्मण धर्माचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें माझाच धर्म खरा, तुझा धर्म खोटा, असें ह्मणून भांडत आहेत!

## अंगुलिमाल दरोडेखोर

बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें अनाथपिंडिकाच्या आरामांत राहत होता. त्या समयीं अंगुलिमाल नांवानें प्रसिद्धीला आलेल्या दरोडेखोरानें श्रावस्तीच्या आसपास पुष्कळ गांवें ओसाड पाडलीं होतीं. त्याला खून करण्याचें व्यसन इतकें लागलें होतें, कीं, कोणत्याहि माणसाला ठार मारून त्याच्या अंगुलि कापून मोठ्या प्रौढीनें त्या तो आपल्या गळ्यांतील अंगुलींच्या माळेंत गोंवीत असे. या अंगुलींच्या माळेवरूनच त्याला अंगुलिमाल हें नांव पडलें होतें.

एके दिवशीं बुद्धगुरु श्रावस्तीमध्यें भिक्षा ग्रहण करून ज्या दिशेला अंगुलिमाल होता त्या दिशेला गेला. वाटेंत त्याला गवळ्यांनीं आणि शेतकऱ्यांनीं पाहिलें, व त्या मार्गानें न जाण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. ते ह्मणाले "हे श्रमण! या मार्गानें जाऊं नकोस. पलीकडे जंगलांत अंगुलिमाल नांवाचा भयंकर दरोडेखोर रहात आहे, तो तुला केवळ मजेखातर मारून तुझ्या अंगुलि आपल्या माळेंत घालील."

बुद्धगुरु त्यांच्या बोलण्याला कांहींएक उत्तर न देतां, तसाच पुढें गेला. त्याला पाहून अंगुलिमालाला मोठें आश्चर्य वाटलें! तो आपणाशींच उद्गारला "या मार्गानें चाळीसपन्नास माणसें एकत्र जमून जात असतात. त्यांच्यावर देखील हल्ला करून मी त्यांनां लुबाडतो; परंतु हा श्रमण एकाकी मोठ्या धाडसानें या मार्गानें चालला आहे, ही अत्यंत आश्चर्याची गोष्ट होय! याच्या धाडसाचें प्रायश्चित ह्मटलें ह्मणजे याला देहान्तशासन करणें हें होय."

हे उद्गार काढून आपली ढालतलवार घेऊन अंगुलिमाल वेगानें बुद्धाच्या अंगावर धांवला; परंतु त्या वेळीं बुद्धानें योगसिद्धीचा असा एक चमत्कार दाखविला, कीं, अंगुलिमाल आपलें सर्व सामर्थ्य एकवटून धांवत होता तरी बुद्धाजवळ येऊं शकला नाहीं!

तेव्हां अंगुलिमाल आपणाशींच ह्मणाला "हें महदाश्चर्य होय! मीं हत्ती, घोडे, रथ, मृग, इत्यादिकांचा देखील पाठलाग केला आहे; पण हा श्रमण साधारणपणें चालला असतां याचा पाठलाग मला करतां येत नाहीं!"

तो तेथेंच उभा राहून मोठ्यानें ओरडला "श्रमणा! तेथेंच उभा रहा."

"अंगुलिमाल! मी उभा आहें, आणि तूंहि पण उभा रहा!" बुद्धानें उत्तर दिलें.

अंगुलिमालाला बुद्धाचें ह्मणणें नीट समजलें नाहीं. हा श्रमण चालत असतां उभा आहें असें ह्मणतो, व मी उभा असतां मला उभा रहा असें ह्मणतो, याचा अर्थ काय, हें विचारण्यासाठीं तो बुद्धाला ह्मणाला "हे श्रमण, तूं चालत असतांना उभा आहें असें ह्मणतोस, आणि मी उभा असतांना मला उभा नाहींस असें ह्मणतोस, तेव्हां मी तुला असें विचारतों, कीं, तूं कोणत्या अर्थानें स्थित आहेस आणि मी कोणत्या अर्थानें अस्थित आहें?"

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला "अंगुलिमाल! प्राणीमात्राविषयीं पूर्ण दया असल्यामुळें मी स्थिर झालों आहें, या अर्थानें मी स्थित आहें; आणि प्राण्यांविषयीं तुझ्या अंतःकरणामध्यें दया वास करीत नसल्यामुळें तूं अस्थिर आहेस, आणि ह्मणूनच तुला मी अस्थित ह्मणतों."

या बुद्धवाक्यानें अंगुलिमालाला तात्काल संवेग उत्पन्न झाला. तो ह्मणाला "बुद्धाची कीर्ति मी पुष्कळ दिवस ऐकत होतों; परंतु आज त्या सत्यवादी महर्षीच्या दर्शनाची अमोलिक संधि आली आहे. हे मुनिश्रेष्ठ! तुझें हें यथार्थ वाक्य श्रवण करून आजपासून पापाचरणाचा मी त्याग करितों."

असें बोलून अंगुलिमालानें एका कड्याच्याखालीं आपली ढालतलवार फेंकून दिली, बुद्धाचे पाय धरिले व बुद्धाला आपल्या भिक्षुसंघांत घेण्यास त्यानें विनंति केली. तेव्हां तो अत्यंत कारुणिक, सर्व जगाचा गुरु महर्षि बुद्ध अंगुलिमालाला 'भिक्षु इकडे ये,' असें ह्मणाला. हाच अंगुलिमालाचा प्रव्रज्याविधि झाला.

तदनंतर अंगुलिमाल बुद्धाबरोबर बुद्धाचें पात्रचीवर घेऊन अनाथपिंडिकाच्या आरामांत आला.

अंगुलिमालाच्या उपद्रवानें त्रासलेले पुष्कळ लोक पसेनदिकोसल राजाच्या वाड्यासमोर जाऊन त्यांनीं अंगुलिमालाला शिक्षा करण्याविषयीं अर्ज केला. तेव्हां राजा मोठें सैन्य बरोबर घेऊन अंगुलिमालाला पकडण्यासाठीं स्वतः निघाला. वाटेंत जेतवनामध्यें बुद्ध रहात आहे, असें वर्तमान समजल्यावरून तो बुद्धदर्शनाला गेला. आपलें सैन्य आरामाबाहेर ठेवून राजा एकटाच आंत गेला, व बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसला.

त्याला बुद्ध ह्मणाला "महाराज, तुझी मोठीच तयारी दिसत आहे. मगधदेशाच्या बिंबिसारराजाशीं किंवा वैशालींतील लिच्छवींशीं [पाटलीपुत्राच्या उत्तरेला वज्जी किंवा लिच्छवी यांचें एक बलाढ्य राज्य होतें; तें शाक्यांच्या राज्याच्या धर्तीवरच चाललें होतें. बुद्धानें वज्जींनां अभिवृद्धीचे सात नियम घालून दिल्याचा उल्लेख महापरिनिर्वाण सूत्राच्या आरंभींच सांपडतो. आमच्या वाचकांनां तो या पुस्तकाच्या शेवटीं आढळेल.] (वज्जींशीं) तुझें वितुष्ट आलें आहे काय? किंवा दुसरा कोणी राजा तुझ्यावर चाल करून येत आहे कीं काय?"

पसेनदिकोसल ह्मणाला "भगवन्, मला बाहेरचा कोणताहि शत्रु उपस्थित झाला नाहीं. परंतु अंगुलिमाल नांवाच्या दरोडेखोरानें माझ्या राज्यांत फारच बंडाळी माजविली आहे. त्यानें मोठमोठालीं गांवें ओसाड पाडलीं आहेत. तो इतका क्रूर आहे, कीं, तो लोकांच्या अंगुलि कापून त्यांची माळ गळ्यांत घालीत असतो."

बुद्ध ह्मणाला "महाराज, जर अंगुलिमाल मुंडन करून आणि काषायवस्त्र परिधान करून भिक्षु बनला, त्यानें प्राणघात करण्याचें सोडून दिलें, अदत्तादानापासून तो विरत झाला, खोटें बोलण्याचें त्यानें सोडून दिलें; तो ब्रह्मचर्याचें पालन करूं लागला, सर्व प्रकारें तो शीलवान् झाला, तर तूं त्याला काय करशील?"

राजा ह्मणाला "भगवन्, अंगुलिमाल अशा प्रकारें शीलसंपन्न भिक्षु झाला, तर मी त्याला नमस्कार करीन, त्याला बसण्याला आसन देईन, वस्त्रान्नाचें त्याला दान करीन. आणि त्याचें राजधर्माला अनुसरून

अनुक्रमणिका

रक्षण करीन. पण भगवन्, अशा प्रकारच्या अत्यंत पापी मनुष्याला आपण ह्मणतां तसला शीलसंयम कोठून असणार!”

अंगुलिमाल बुद्धाच्या जवळच बसला होता. उजवा हात पुढें करून बुद्ध राजाला ह्मणाला “महाराज, हा येथें अंगुलिमाल बसला आहे.”

तें ऐकून पसेनदिराजाच्या अंगावर कांटा उभा राहिला. तो भयचकित होऊन कावराबावरा झाला. तेव्हां बुद्ध ह्मणाला “महाराज, घाबरण्याचें कांहीं एक कारण नाहीं. अंगुलिमालापासून तुला मुळींच धोका पोहोंचण्याचा संभव नाहीं.”

राजाचें भय शमन पावलें, आणि तो अंगुलिमालाला ह्मणाला “भदंत, तूं आर्य आहेसना?”
“होय महाराज,” अंगुलिमालानें उत्तर दिलें.
“तुझ्या आईबापांचें नांव व गोत्र कोणतें?”
“माझ्या आईचें नांव मन्तानी व बापाचें गोत्र भर्ग.”

“भो भर्ग मन्तानिपुत्र! या बौद्धधर्मामध्यें तूं सुखानें रहा. मी देखील वस्त्रान्न देऊन तुझी यथायोग्य शुश्रूषा करीन.”

परंतु अंगुलिमाल दुसऱ्याचें अन्न ग्रहण करीत नसे. तो अरण्यांतच रहात असे, भिक्षेवरच आपला निर्वाह करीत असे, आणि रस्त्यांतील चिंध्या गोळा करून त्यांचीं तीनच चीवरें धारण करीत असे. तो राजाला ह्मणाला “महाराज, मजजवळ सर्व कांहीं आहे. माझ्याबद्दल आपण काळजी करूं नका.”

पसेनदिकोसल बुद्धाला ह्मणाला “भगवन्, आह्मी दंडानें आणि शस्त्रानें देखील अंगुलिमालासारख्या माणसाचें दमन करूं शकत नाहीं. पण ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे, कीं, भगवान् दंडावांचून आणि शस्त्रांवांचून मदमत्त माणसांचें दमन करितो; भ्रांत मनुष्याला शांत करितो; आणि सामान्य माणसाला निर्वाणाला पोहोंचवितो! भगवन्, आमच्यामागें पुष्कळ कामें लागलेलीं आहेत, तेव्हां आह्मी आतां जातों.”

बुद्ध ह्मणाला “जसें तुला योग्य वाटेल तसें कर.”
पसेनदिकोसल बुद्धाला नमस्कार आणि प्रदक्षिणा करून जेतवनांतून निघाला.

एके दिवशीं अंगुलिमालानें श्रावस्तीमध्यें भिक्षाटन करीत असतां गर्भवेदनेनें विव्हल झालेल्या एका स्त्रीला पाहिलें. तिची त्याला अत्यंत दया आली, व भिक्षेचें ग्रहण केल्यावर बुद्धाजवळ येऊन त्यानें ती गोष्ट सांगितली.

बुद्ध ह्मणाला “तूं त्या स्त्रीजवळ जाऊन असें ह्मण, कीं, माझ्या जन्मापासून मीं जाणूनबुजून प्राण्याची हिंसा केली नाहीं. या सत्यवचनानें तुला आणि तुझ्या गर्भाला सुख होवो.”

“पण भगवन्, मी जर असें ह्मणालों, तर माझ्यावर खोटें बोलल्याचा आरोप येणार नाहीं काय? भगवन्, मीं जन्मल्यापासून बुद्धिपुरस्सर पुष्कळ प्राण्यांची हिंसा केली आहे.”

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला “असें जर तुला वाटत असेल, तर तूं असें ह्मण, कीं, जोंपासून आर्यजातीमध्यें उत्पन्न झालों, तोंपासून मीं जाणूनबुजून कोणत्याहि प्राण्याची हिंसा केली नाहीं. या सत्यवचनानें तुला आणि तुझ्या गर्भाला स्वस्ति असो.”

बुद्धाच्या ह्मणण्याचा मथितार्थ काय होता हें आतां अंगुलिमालाच्या लक्ष्यांत आलें. आपण आर्यजातीमध्यें जन्मल्यापासून (भिक्षु झाल्यापासून) बुद्धिपुरस्सर कोणत्याहि प्राण्याचा वध केला नाहीं, याजबद्दल त्याला खात्री होती. अंगुलिमाल ताबडतोब ती स्त्री होती तेथें गेला, व त्यानें बुद्धानें सांगितलेले शब्द उच्चारले. तेव्हां ती स्त्री प्रसूतिवेदनांतून सुखानें पार पडली.

अंगुलिमाल मोठ्या सावधगिरीनें आणि शांतपणानें एकाकी राहून अर्हत्पदाला पोहोंचला. तो भिक्षु झाल्याचें वर्तमान श्रावस्तिनगरांत सगळ्यांनां समजलें होतें. एके दिवशीं भिक्षेला जात असतां लोकांनीं त्याच्यावर दगडांचा, काठ्यांचा आणि वाळूचा वर्षाव केला. त्यामुळें अंगुलिमालाचें डोकें फुटून रक्त वाहूं लागलें व संघाटी (कंथा) फाटून गेली. तसाच तो बुद्धापाशीं आला.

त्याला पाहून बुद्ध ह्मणाला “हे ब्राह्मण! सहन कर – सहन कर! ज्या क्रूरकर्माचा विपाक नरकामध्यें हजारों वर्षे तुला भोगावा लागला असता, त्याचेंच फल तूं इहलोकीं थोडक्यांत भोगीत आहेस!”

लोकांकडून झालेल्या अपमानानें किंवा शरीराला झालेल्या वेदनेनें अंगुलिमालाचें चित्त यत्किंचित् विचलित झालें नाहीं. एकांतांत बसला असतां तो आपणाशींच उद्गारला “जो पूर्ववयांत प्रमत्त होऊन उत्तरवयांत सावध होतो, तो ढगांतून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणें प्रकाशत असतो! ज्याचें पापकर्म कुशलकर्मानें बुजून जातें, तो ढगांतून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणें प्रकाशत असतो! जो भिक्षु तरुणपणीं बुद्धधर्माचा अभ्यास करितो, तो ढगांतून मुक्त झालेल्या चंद्राप्रमाणें प्रकाशत असतो! माझे शत्रुदेखील बुद्धाचा धर्म ऐकोत, माझे शत्रुदेखील बौद्धधर्माचा अभ्यास करोत! माझें नांव अहिंसक ठेवण्यांत आलें होतें, पण त्या नांवाप्रमाणें माझी करणी नव्हती! मी सदोदित हिंसा करीत असें; परंतु आज माझें तें नांव खरें झालें आहे. कांकीं, मी सर्व हिंसेपासून निवृत्त झालों आहें.”

## [३२]
## **शेतकरी कोणत्या शेतांत प्रथम बीं पेरील**?

एके वेळीं बुद्धगुरु नालंदा नांवाच्या गांवी रहात होता. तेथें असिबंधक ग्रामणीचा पुत्र त्याजपाशीं येऊन त्याला नमस्कार करून एका बाजूला बसल्यावर त्याला ह्मणाला “भगवन्, आपण प्राणीमात्रावर दया करितां, हें खरें नव्हे काय?”

“होय ग्रामणी, तथागत सर्व प्राण्यांवर दया करितो.”

“तर मग भगवन्, कित्येकांनां आपण आस्थापूर्वक धर्मोपदेश करितां व कित्येकांबद्दल इतकी काळजी घेत नाहीं, हें कसें?”

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला “हे ग्रामणी, एकाद्या शेतकऱ्याचीं उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशीं तीन प्रकारचीं शेतें असलीं, तर तो कोणत्या शेतांत प्रथम बीं पेरील?”

“भगवन्, प्रथमतः तो शेतकरी उत्तम शेतांत बीं पेरील, नंतर मध्यम शेतांत बीं पेरील, पण तो कनिष्ठ शेतांत बीं पेरील किंवा पेरणारहि नाहीं. कांहीं मिळालें नाहीं तरी गुरांनां चारा मिळेल, अशा हिशेबानें कदाचित् तो तें शेत पेरील.”

बुद्ध ह्मणाला “भिक्षु आणि भिक्षुणी उत्तम शेतांप्रमाणें आहेत. सर्वस्वाचा त्याग करून तीं मला शरण आलीं आहेत. तेव्हां त्यांनां मीं प्रथमतः धर्मोपदेश करावा, हें योग्य नव्हे काय? उपासक आणि उपासिका या मध्यम शेताप्रमाणें आहेत. त्यांनां मी तदनंतर उपदेश करीत असतों. पण इतर पंथांचे परिव्राजक वगैरे लोक हे कनिष्ठ शेतासारखे आहेत. त्यांनां देखील मी उपदेश करितों. कांकीं, एकाद्या दुसऱ्या वाक्याचा ते अर्थ समजले, तर तेवढ्यानें देखील त्यांचें कल्याण होईल!”

[३३]

## सिंह सेनापति

एके समयीं बुद्धगुरु वैशालीमध्यें महावनांत रहात होता. त्या वेळीं कांहीं प्रख्यात लिच्छवी राजे संथागारांत (नगरमंदिरांत) कांहीं कारणाकरितां जमले असतां बुद्धासंबंधानें गोष्टी निघाल्या. त्यांतील बहुतेकांनीं बुद्धाची फार स्तुति केली. ती ऐकून सिंहसेनापतीला बुद्धदर्शनाची इच्छा झाली. पण तो निर्ग्रंथाचा उपासक असल्यामुळें निर्ग्रंथाच्या मुख्य गुरूला—नाथपुत्राला—भेटल्यावांचून एकाएकीं बुद्धाची भेट घेणें त्याला प्रशस्त वाटेना. तो नाथपुत्राजवळ जाऊन त्याला ह्मणाला “भदंत, मी बुद्धाची भेट घेऊं इच्छीत आहें.”

नाथपुत्र ह्मणाला “सिंहा! तूं अक्रियावादी आहेस काय? गौतम हा पक्का अक्रियावादी आहे, आणि तूं क्रियावादी असतां त्याची भेट घेऊं इच्छितोस हें योग्य नाहीं.”

हें आपल्या गुरूचें भाषण ऐकून सिंहानें बुद्धदर्शनाला जाण्याचा विचार रहित केला. पुनः एकदोनदां संथागारांत त्यानें बुद्धाची स्तुति ऐकिली; परंतु नाथपुत्राच्या आग्रहामुळें बुद्धदर्शनाला जाण्याचा आपला बेत त्याला पुनः तहकूब करावा लागला. शेवटीं सिंहानें नाथपुत्राला विचारल्यावांचूनच बुद्धाची भेट घ्यावयाचा निश्चय केला, व मोठ्या लवाजम्यानिशीं महावनांत येऊन बुद्धाला नमस्कार करून तो एका बाजूला आसनावर बसला. नंतर सिंह बुद्धाला ह्मणाला “भदंत, पुष्कळ लोक आपणाला अक्रियावादी ह्मणत आहेत. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें आपण खरोखरच अक्रियावादी आहांत काय?”

बुद्ध ह्मणाला “सिंहा, एका अंशीं मला अक्रियावादी ह्मणतां येण्याजोगें आहे. पापविचारांची क्रिया करूं नये, पापविचारांचा नाश करावा, पापविचार मनामध्यें देखील येऊं देऊं नयेत, असा मी उपदेश करीत असतों. या दृष्टीनें पाहिलें असतां मी अक्रियावादी आहें.

“पण दुसरा एकादा जर मला क्रियावादी ह्मणूं लागला, तर त्याचें ह्मणणें देखील खोटें ह्मणतां यावयाचें नाहीं. कांकीं, पुण्यप्रद विचारांची क्रिया करावी, कुशल मनोवृत्तींची अभिवृद्धि करावी, सदिच्छेला अनुसरून वर्तन करावें, असा मी उपदेश करीत असतों. या दृष्टीनें पाहिलें असतां मी क्रियावादी आहें.

“सिंहा, दुसरा एकादा मनुष्य मला उच्छेदवादी ह्मणूं शकेल. कांकीं, अकुशल मनोवृत्तींचा उच्छेद करण्यासाठीं मी उपदेश करीत असतों. या दृष्टीनें पाहिलें असतां मी उच्छेदवादी आहें.”

सिंह ह्मणाला “भगवन्, आपल्यासंबंधानें माझा अत्यंत गैरसमज झाला होता; पण हा आपला गोड उपदेश ऐकून तो दूर झाला. आजपासून मी आपणाला, आपल्या धर्माला आणि संघाला शरण जातों. उपासक या नात्यानें आपण माझा अंगीकार करा.”

बुद्ध ह्मणाला “सिंहा, तुला जें कांहीं करावयाचें असेल, तें विचार करून कर. कांकीं, तुझ्यासारख्या प्रसिद्ध मनुष्याला विचारपूर्वक वर्तन करणें योग्य आहे.”

सिंह ह्मणाला “भदंत, दुसऱ्या पंथांच्या प्रवर्तकांचा जर मी शिष्य झालों असतों, तर त्यांनीं या वैशालीमध्यें जणूं काय विजयपताकाच लाविली असती! पण ज्या अर्थी आपण विचार करून वाग असें मला सांगतां, त्या अर्थी माझी आपणावर अधिकच श्रद्धा जडली आहे.”

बुद्ध ह्मणाला “सिंहा, आजपर्यंत तूं निर्ग्रंथांचा श्रावक होतास; तेव्हां ते जर तुझ्या घरीं भिक्षेला आले, तर त्यांनां देखील तूं विन्मुख पाठवितां कामा नये.”

“भगवन्, आपण दुसऱ्या पंथांच्या श्रमणांनां दान देऊं नये, आपल्याच भिक्षूंनां दान द्यावें, असा उपदेश करितां, असें मी ऐकत होतों; पण आज मला याच्या उलट अनुभव आला. भगवन्, या आपल्या औदार्याच्या योगें आपल्या ठायीं माझी भक्ति दृढतर झाली आहे.”

सिंहानें दुसऱ्या दिवशीं बुद्धाला व भिक्षुसंघाला आपल्या घरीं आमंत्रण करून मोठ्या आदरानें त्यांचें संतर्पण केलें. पण निर्ग्रंथांनां ही गोष्ट रुचली नाहीं. वैशालीमध्यें त्यांनीं अशी वदंता उठविली, कीं, ‘सिंहानें मोठा पशु [हा बकरा होता कीं मेंढा होता, याचा खुलासा मूलग्रंथावरून होत नाहीं.] मारून बुद्धाला आणि भिक्षुसंघाला मेजवानी केली आहे, आणि बुद्धाला ही गोष्ट माहीत असतां त्यानें सिंहानें दिलेल्या भोजनाचा स्वीकार केला!’ ही वदंता एका गृहस्थानें हळूच सिंहाच्या कानांत येऊन सांगितली. तेव्हां तो ह्मणाला “यांत कांहीं अर्थ नाहीं. बुद्धाची नालस्ती करण्यांतच निर्ग्रंथांनां आनंद वाटतो. परंतु मी जाणूनबुजून मेजवानीसाठीं प्राण्याची हिंसा करीन, हें निखालस असंभवनीय आहे.”

अनुक्रमणिका

[३४]

## पसेनदिकोसल राजाला उपदेश

### (क) मिताहारापासून फायदे

पसेनदिराजा फार जेवीत असे. एके दिवशीं जेवल्याबरोबर तो जेतवनविहारांत आला, व बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसला. जास्ती अन्न खाल्यामुळें राजाचा श्वास जोरानें चालला होता. तें पाहून बुद्धानें पुढील गाथा ह्मटली—

**मनुजस्स सदा सतीमतो**
**मत्तं जानतो लद्धभोजने ।**
**तनु तस्स भवन्ति वेदना**
**सणिकं जीरति आयु पालयं**

[प्रमाण समजे जया सतत आपुल्या भोजनीं,
विवेक दृढ मानसीं स्वहित जो बुजे या जनीं,
अजीर्णजनिता तया नसति दुःखदा वेदना,
चिरायु नर होइ, त्या त्वरित वृद्धता येइना.॥]

त्या वेळीं पसेनदीजवळ सुदर्शन नांवाचा तरुण मनुष्य होता; त्याला राजा ह्मणाला "सुदर्शना, तूं ही गाथा पाठ कर, व माझ्या भोजनाच्या वेळीं ह्मणत जा. याजबद्दल मी तुला रोज शंभर कार्षापण देत जाईन."

सुदर्शनानें ती गाथा पाठ केली, व राजाच्या आज्ञेप्रमाणें रोज भोजनसमयीं तो ती गाऊं लागला. तिचा राजाच्या मनावर सुपरिणाम होऊन त्यानें जास्ती अन्न खाण्याचें सोडून दिलें, व त्यायोगें त्याच्या देहाची जडता नष्ट होऊन अंग हलकें झालें. तेव्हां तो उद्गारला "तो भगवान् किती तरी दयाळु आहे! तो मला पारमार्थिक गोष्टींचाच उपदेश करितो असें नाहीं, माझ्या ऐहिक हिताची देखील त्याला काळजी आहे!"

### (ख) मुलगी झाली ह्मणून विषाद मानूं नये

एकदां पसेनदिकोसल राजा जेतवनविहारांत बुद्धदर्शनाला आला असतां राजवाड्यातूंन एक दूत येऊन त्यानें राजाच्या आवडत्या राणीला – मल्लिकादेवीला मुलगी झाल्याचें वर्तमान त्याला कळविलें. ते ऐकून राजाला फार वाईट वाटलें.

तेव्हां बुद्ध ह्मणाला "महाराज, एकादी स्त्री देखील पुरुषांपेक्षां चांगली असते. ती जर बुद्धिमती, सुशील, आणि वडील माणसांचा मान राखणारी पतिव्रता निघाली, तर तिला दोष कोण देऊं शकेल? आणखी तिच्या पोटीं जो पुत्र होतो, तो मोठा शूर होतो. अशा सौभाग्यवती स्त्रीच्या पोटीं जन्मलेला पुत्र राज्य चालविण्यास देखील समर्थ असतो. ह्मणून, हे जनाधिप, तूं तुझ्या मुलीचा प्रेमानें सांभाळ कर."

अनुक्रमणिका

## (ग) कृपणपणा आणि औदार्य यांचा परिणाम.

एके दिवशीं पसेनदिराजा भरदुपारींच जेतवनांत आला, व बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसला. तेव्हां बुद्ध ह्मणाला “महाराज, तूं एवढ्या दुपारीं कोणीकडे चालला आहेस?”

राजा ह्मणाला “भगवन्, या श्रावस्तीमध्यें नुकताच एक धनाढ्य सावकार मरण पावला. तो निपुत्रिक असल्यामुळें त्याची दौलत ताब्यांत घेण्यासाठीं मी गेलों होतों. आतांच सर्व मालमत्ता राजवाड्यांत पाठवून देऊन मी इकडे आलों आहें. भदंत, या सावकाराची केवढी संपत्ति ह्मणून सांगूं! ऐशीं लाख सोन्याचें नाणेंच निघालें. रूप्याची तर गणनाच नाहीं! पण भदंत, या गृहस्थाचें जेवण ह्मटलें ह्मणजे कण्याचा भात आणि आंबील, एवढेंच काय तें होतें! खादीशिवाय दुसरें वस्त्र कांहीं बिचाऱ्यानें वापरलें नाहीं, आणि त्याचें यान ह्मटले ह्मणजे एक जर्जरित रथ! त्या रथाला देखील वर आच्छादन नव्हतें. तो एक डोक्यावर पर्णछत्र (ताडपत्राची छत्री) धरून त्या मोडक्या रथांत बसून फिरत असे!”

बुद्ध ह्मणाला “महाराज, कृपणाच्या दौलतीची हीच गति होते! तो जीवंतपणीं आपल्या जीवाला सुख देत नाहीं. आपल्या आईबापांनां, बायकोमुलांनां किंवा आप्तइष्टांनांदेखील सुख देत नाहीं; तो श्रमणब्राम्हणांनां दानधर्म करीत नाहीं. अशा रीतीनें पैसा सांठवून शेवटीं त्याचें धन राजेलोक घेऊन जातात, चोर लुटतात किंवा त्याचे प्रतिपक्षी दायाद तें घेऊन जातात, अथवा अग्नि आणि उदक यांपासून त्या धनाचा नाश होतो. गांवापासून फार दूर अंतरावर जंगलांत एकादा तलाव असावा, पण त्याचा उपभोग कोणींहि न घेतल्यामुळें तो तेथल्यातेथें आटून जावा, अशी स्थिति कृपण मनुष्याच्या धनदौलतीची होत असते.

“पण महाराज, जो आपल्या दौलतीचा सद्व्यय करितो—आपल्या जीवाला, आपल्या आईबापांनां, बायकोमुलांनां, आणि आप्तइष्टांनां सुख देतो, श्रमणब्राह्मणांनां दान देतो, त्याच्या संपत्तीची अशी नासाडी होत नाहीं. गांवाजवळ असलेल्या सुंदर तलावाचा जसा लोकांनां उपयोग होतो, व त्या तलावाचें पाणी फुकट जात नाहीं, तें लोकांनीं वापरल्यामुळें स्वच्छ रहातें, तद्वत् या उदार मनुष्याच्या संपत्तीचा सद्विनियोग झाल्यामुळें तिंचा नाश होत नाहीं.”

## (घ) चार तऱ्हेचे मनुष्य

पसेनदिकोसल राजा जेतवनांत आला असतां बुद्ध त्याला ह्मणाला “महाराज, इहलोकीं चार प्रकारचे मनुष्य आहेत. ते कोणते? तर तमापासून तमाप्रत जाणारा, तमापासून ज्योतीप्रत जाणारा, ज्योतीपासून तमाप्रत जाणारा, आणि ज्योतीपासून ज्योतीप्रत जाणारा.

“महाराज, एकादा मनुष्य चांडाळ, नैषाध वगैरे हीन कुलामध्यें जन्मतो, आणि सारा जन्म दुष्कृत्यें करण्यांत घालवितो. हा मनुष्य तमापासून तमाप्रत जाणारा, असें मीं ह्मणतों. दुसरा एकादा हीन कुलांत जन्मतो, खाण्यापिण्याची त्याला टंचाई असते, पण कायावाचामनेंकरून तो सत्कर्माचरण करितो; अशा माणसाला मी तमापासून ज्योतीप्रत जाणारा असें ह्मणतों. तिसरा एकादा थोर कुलांत जन्मतो, त्याला खाण्यापिण्याची पंचाईत नसते, तो चांगला गोजिरवाणा दिसतो; परंतु कायेनें, वाचेनें आणि मनानें दुराचरण करितो; त्याला मी ज्योतीपासून तमाप्रत जाणारा मनुष्य असें ह्मणतों, पण जो चांगल्या कुळामध्यें जन्म घेऊन सर्वकाळ सदाचरण करितो, तो ज्योतीपासून ज्योतीप्रत जाणारा मनुष्य होय.”

अनुक्रमणिका

### (ङ) जरामरणाला सैन्यानें जिंकतां येईल काय?

एके दिवशीं पसेनदिकोसल राजा भरदुपारींच जेतवनांत आला. बुद्धाला नमस्कार करून एका बाजूला बसल्यावर बुद्ध त्याला ह्मणाला “महाराज, आज दुपारींच कोणीकडे निघालास?”

राजा ह्मणाला “भदंत, माझें राज्य विस्तृत झालें आहे, त्याचा मला चिरकाळ उपभोग घेतां यावा, यासाठीं मी सध्यां खटपट करीत आहें.”

बुद्ध ह्मणाला “महाराज, आपल्या शत्रूचा सर्व प्रकारें तूं बंदोबस्त करीत आहेस हें ठीक आहे; परंतु समज, एकादा मनुष्य धांवत येऊन तुला सांगेल, कीं, ‘महाराज, चारी दिशांकडून मोठमोठाले पर्वत तुझ्यावर चाल करून येत आहेत; त्यांनीं सर्व प्राण्यांचा संहार चालविला आहे; आतां या वेळीं तुला जें कर्तव्य असेल तें कर.’ अशा वेळीं तूं काय बरें करशील?”

राजा ह्मणाला “भदंत, अशा प्रसंगीं माझ्या सैन्याचें काय चालणार आहे? सद्धर्माचरणावांचून दुसरें मी काय करूं शकणार आहें? त्या वेळीं माझें पुण्याचरणच मला उपयोगीं पडेल.”

बुद्ध ह्मणाला “महाराज, जरा आणि मृत्यु, त्या मोठाल्या पर्वतांपेक्षांहि भयंकर आहेत! हत्ती, घोडे, रथ पादाति इत्यादि सर्व सैन्याकडून जरा आणि मृत्यु यांचा पराजय होण्यासारखा नाहीं. ब्राह्मण किंवा चांडाल हा भेद जरामरण ठेवीत नाहीं; ह्मणून सुज्ञ मनुष्यानें सावधानपणें सद्धर्माचें आचरण करावें. सदाचरण करणाऱ्या मनुष्याची इहलोकीं प्रशंसा होते, आणि परलोकीं तो सद्गतीला जातो.”

[३५]

## राजा अजातशत्रु आणि श्रामण्याच्या फलाविषयीं प्रश्न

पौर्णिमेच्या उपोसथाच्या दिवशीं रात्रिसमयीं राजा अजातशत्रु आपल्या अमात्यांसह राजवाड्याच्या गच्चीवर बसला होता. त्या वेळीं चंद्रप्रकाशानें सर्व प्रदेशाला अत्यंत रमणीयता आली होती. राजा आपल्या अमात्यांकडे पाहून उद्गारला “आजची रात्र कितीतरी रमणीय आहे! किती तरी सुंदर आहे! या वेळीं एकाद्या प्रसिद्ध श्रमणाची किंवा ब्राह्मणाची भेट घेतली असतां आमचें मन प्रसन्न होईल. असा श्रमण किंवा ब्राह्मण या राजगृहामध्यें सध्या कोण आहे?”

त्या अमात्यांतील एकजण ह्मणाला “महाराज, पूरण काश्यप हा सध्या येथें रहात आहे. पुष्कळ लोकांचा तो गुरु आहे, हें आपण जाणतच आहां.”

दुसरा अमात्य ह्मणाला “मक्खलि गोसाल हा फार प्रसिद्ध धर्मप्रवर्तक सध्या येथें आहे. त्याच्या दर्शनाला महाराज गेले असतां तो महाराजांच्या चित्ताचें समाधान करील, असें मला वाटतें!”

तिसऱ्या अमात्यानें अजित केसकंबलाच्या दर्शनाला जाण्याविषयीं अजातशत्रूला विनंति केली. चौथ्यानें पकुध कात्यायनाची स्तुति करून राजानें त्याच्या दर्शनाला जावें, अशी सूचना पुढें आणिली. पांचव्यानें संजय बेलट्ठपुत्राची थोरवी गाऊन त्याच्या भेटीला जाण्याविषयीं राजाचें मन वळविण्याचा प्रयत्न

अनुक्रमणिका

केला. सहाव्यानें निर्ग्रंथ नाथपुत्राच्या दर्शनाला जाण्याविषयीं राजाला विनंति केली. परंतु अजातशत्रु यांपैकीं एकाला देखील कांहींच उत्तर न देतां उगाच राहिला.

जीवक कौभारभृत्य नांवाचा प्रसिद्ध वैद्य मगधराजाच्या दरबारीं होता. तो या वेळीं अजातशत्रूच्याजवळ बसला होता. अजातशत्रु त्याला ह्मणाला “सौम्य जीवक, यासंबंधानें तूं कांहींच बोलत नाहींस, हें काय?”

जीवक ह्मणाला “महाराज, सध्यां बुद्ध भगवान् माझ्या आम्रवनांत रहात आहे. जर आपली मर्जी असेल तर आपण त्या भगवंताच्या दर्शनाला जाऊं.”

अजातशत्रु ह्मणाला “तर मग हत्ती सज्ज करावयाला सांग.”

राजाच्या हुकुमाप्रमाणें जीवकानें पुष्कळ हत्ती आणि हत्तिणी सज्ज करून सगळी तयारी असल्याची राजाला वर्दी दिली. राजा प्रत्येक हत्तिणीवर आपल्या अंतःपुरांतील एकेका स्त्रीला बसवून आपण एका उत्तम गजावर आरूढ होऊन आपल्या जीवकादि अमात्यांसहवर्तमान मोठ्या थाटानें बुद्धदर्शनाला निघाला.

आम्रवनाच्या जवळ आल्यावर अजातशत्रु घाबरून गेला, आणि जीवकाला ह्मणाला “सौम्य जीवक! मला तूं फसवीत तर नाहींसना? माझ्या शत्रूच्या हातीं देण्यासाठीं मला येथें आणिलें नाहींसना? साडेबाराशें भिक्षूंचा संघ येथें रहात असतां एकाचा देखील बोलण्या-चालण्याचा शब्द ऐकूं येत नाहीं, हें मोठें आश्चर्य नव्हे काय?”

जीवक ह्मणाला “महाराज! भिऊं नका. तुह्माला फसवून शत्रुच्या ताब्यांत देण्यासाठीं मीं येथें आणिलें नाहीं. आपण पुढें व्हा. हे समोरच्या ओसरीवर दिवे जळत आहेत.”

जीवकाच्या आम्रवनाबाहेर आपले हत्ती उभे करून राजा सर्व मंडळीसह पायींच बुद्धगुरु बसला होता त्याठिकाणीं गेला. जीवकानें राजाला बुद्धाची ओळख करून दिली. परंतु त्याची भेट घेण्यापूर्वीच भिक्षुसंघाची शांत आणि गंभीर चर्या पाहून तो उद्गारला “माझा उदायिभद्र कुमार अशा प्रकारच्या शांतीनें संपन्न होवो!”

हे राजाचे उद्गार ऐकून बुद्ध ह्मणाला “महाराज! तूं आपल्या प्रेमाला अनुसरूनच बोललास.”

“होय भगवन्, उदायिभद्र माझा आवडता मुलगा आहे,” अजातशत्रूनें उत्तर दिलें, व बुद्धाला आणि भिक्षुसंघाला नमस्कार करून तो एका बाजूला बसला.

एका बाजूला बसल्यावर अजातशत्रु ह्मणाला “भगवन्, निरनिराळे योद्धे, न्हावी, स्वयंपाकी, माळी, धोबी, बुरूड, कुंभार, कारकून वगैरे लोक आपापल्या कलेचें इहलोकींच फळ मिळवीत असतात. आपल्या कलेच्या बळावर द्रव्यार्जन करून ते आपला उदरनिर्वाह करितात, आपल्या आईबापांचा संभाळ करितात, आणि श्रमणब्राह्मणांनां दक्षिणा देऊन परलोकीं स्वर्गाचा मार्ग खुला करितात. पण भगवन्, या लोकांच्या शिल्पाचें जसें प्रत्यक्ष फळ दाखवितां येतें, तसें श्रामण्याचें प्रत्यक्ष फळ दाखवितां येईल काय?”

अनुक्रमणिका

बुद्ध ह्मणाला “हा प्रश्न तूं दुसऱ्या श्रमणब्राह्मणांनां विचारून पाहिला आहेस काय?”

राजा ह्मणाला “होय. एकदां मी पूरणकश्यपाला भेटून हा प्रश्न विचारला. तेव्हां पूरण मला ह्मणाला ‘करणाराला किंवा करविणाराला, मारणाराला किंवा मारविणाराला, परदारागमन करणाराला, खोटें बोलणाराला, किंवा अन्य कोणतेंहि कर्म करणाराला त्या कर्मापासून पाप जडत नाहीं. त्याचप्रमाणें कोणतेंहि चांगलें कृत्य केलें असतां पुण्यप्राप्ति होते, ही दृष्टिदेखील खोटी आहे.’ याप्रमाणे भगवन्, पूरणकश्यपाला श्रामण्याचें प्रत्यक्ष फळ विचारलें असतां त्यानें आपला अक्रियावाद सांगितला.

“पुनः एकदां मीं हा प्रश्न मक्खलिगोसालाला विचारला होता. तेव्हां तो मला ह्मणाला ‘प्राण्याच्या शुद्धीला किंवा संक्लेशाला कांहीं कारण लागत नाहीं. आपल्या प्रयत्नानें मनुष्य मोक्ष मिळवील ही गोष्ट खोटी आहे. सगळ्या योनींतून प्राणी गेल्याशिवाय त्याला मोक्ष मिळत नसतो. मूर्ख किंवा शहाण्या मनुष्याला सर्व योनींत जन्म घेतल्यावर आपोआप मोक्ष मिळणार आहे.’ याप्रमाणें मक्खलिगोसालाला मीं श्रामण्यफळासंबंधानें प्रश्न विचारला असतां त्यानें आपला संसारशुद्धिवाद पुढें केला.

“दुसऱ्या एका प्रसंगीं अजित केसकंबलाला मीं हा प्रश्न विचारला असतां तो मला ह्मणाला ‘बऱ्या वाईट कर्माचें फळ भोगावें लागतें, ही गोष्ट खोटी आहे. चार महाभूतांपासून हा देह बनलेला आहे. मनुष्य मृत्यु पावल्यावर पृथ्वीचा अंश पृथ्वींत जातो, वायूचा अंश वायूंत, उदकाचा अंश उदकांत, आणि अग्नीचा अंश अग्नींत जातो; मनुष्याच्या मरणोत्तर कांहींएक शिल्लक रहात नाहीं. दानाची प्रशंसा केवळ मूर्ख मनुष्यें करीत असतात; त्यांच्या बोलण्यांत कांहींच अर्थ नसतो.’ याप्रमाणें अजित केसकंबलाला मी श्रामण्यफलासंबंधानें प्रश्न केला असतां त्यानें आपला उच्छेदवाद प्रतिपादिला.

“भगवन्, एकदां पकुध कात्यायनाला मी हा प्रश्न विचारला असतां तो मला ह्मणाला ‘पृथ्वि, उदक, तेज, वायु, सुख, दुःख आणि जीव, हे सात पदार्थ नित्य आहेत. ते कोणींच उत्पन्न केले नाहींत, अर्थात् एकाला दुसरा मारतो किंवा मारवितो, ही गोष्ट खोटी आहे.’ याप्रमाणें पकुध कात्यायनाला मीं श्रामण्यासंबंधानें प्रश्न केला असतां त्यानें आपला सप्तपदार्थवाद किंवा अन्योन्यवाद सांगितला.

“नंतर एकदां मी निर्ग्रंथ नाथपुत्राला भेटलों व त्याला प्रश्न विचारला, तेव्हां तो मला ह्मणाला ‘निर्ग्रंथ कोणत्याच प्रकारच्या पापाला शिवत नसतो; सगळ्या पापाचा नाश करण्याचा तो प्रयत्न करितो; सर्व पाप धुऊन टाकितो आणि पापावरणापासून मुक्त राहतो. याला मी चातुर्यामसंवरसंवृत असें ह्मणतों.’ याप्रमाणें निर्ग्रंथ नाथपुत्राला मीं श्रामण्यफलासंबंधानें प्रश्न विचारिला असतां त्यानें आपला चातुर्यामसंवर सांगितला.

“संजय बेलट्ठपुत्राला जेव्हां मीं हा प्रश्न विचारला, तेव्हां तो मला ह्मणाला ‘तुह्मी जर परलोक आहे काय असें विचाराल, तर तें मला ठाऊक नाहीं. परलोक नाहीं हें देखील मला ठाऊक नाहीं. प्राण्याला कर्माप्रमाणें फळ मिळतें किंवा नाहीं, हें मला सांगता येत नाहीं. तथागत मरणानंतर उत्पन्न होतो किंवा नाहीं, हेंहि मी सांगूं शकणार नाहीं’ याप्रमाणें बेलट्ठपुत्राला श्रामण्यफलासंबंधानें प्रश्न विचारला असतां त्यानें आपला विक्षेपवाद (अज्ञेयवाद) सांगितला.

अनुक्रमणिका

"भगवन्, यांपैकीं एकादा देखील माझ्या मनाचें समाधान करूं शकला नाहीं; पण माझ्यासारख्या राजाला श्रमणांचा कोणत्याहि रीतीनें अपमान करणें प्रशस्त नाहीं, असा विचार करून या आचार्यांविरूद्ध कांहींएक न बोलतां मी मुकाट्यानें माघारा आलों."

बुद्ध ह्मणाला "महाराज, तुझा एकादा दास आपल्या दुर्गत स्थितीला कंटाळून भिक्षु होईल, व मोठ्या साधुत्वानें वागेल. अशा मनुष्याला तूं पकडून पुनः दासकर्म करावयाला लावशील काय?"

अजातशत्रू ह्मणाला "नाहीं. अशा मनुष्याला मी माझ्यासमोर आसन देईन; आणि वस्त्रान्नाची त्याला ददात पडूं नये, असी व्यवस्था करीन."

"तरमग महाराज, श्रामण्याचें हे प्रत्यक्ष फल ह्मणतां येणार नाहीं काय?"

"भगवन्, निःसंशय याला श्रामण्याचें प्रत्यक्ष फल ह्मणतां येईल."

बुद्ध ह्मणाला "एकादा दरिद्री मनुष्य आपल्या अल्प संपत्तीचा त्याग करून भिक्षु होईल, व भिक्षूला पाळावयाचे जे नियम असतात ते सर्व पाळील. पोटापुरत्या अन्नानें आणि देहआच्छादनापुरत्या वस्त्रानें तो संतुष्ट होईल, व लोभ, क्रोध, आळस, चंचलता आणि कुशंका या पांच आवरणांपासून आपलें चित्त मुक्त करून तो सावधगिरीनें वागेल. जसा एकादा मनुष्य ऋणांतून मुक्त व्हावा, किंवा भयंकर व्याधींतून मुक्त व्हावा, बंधनागारांतून मुक्त व्हावा, दास्यांतून मुक्त व्हावा, अथवा जंगलांतून सुरक्षितपणें पार पडावा, तसा हा भिक्षु या चित्ताच्या पांच आवरणांपासून मुक्त होऊन सर्व ध्यानाचा लाभ करून घेईल; तेव्हां त्याला प्रत्यक्ष श्रामण्यफल मिळालें, असें ह्मणण्यास हरकत राहील काय?"

अजातशत्रु ह्मणाला "भगवन्, त्याला निःसंशय श्रामण्याचें फल मिळतें, असें ह्मणावें लागेल."

आणखीहि निरनिराळ्या मार्गानें बुद्धानें श्रामण्याचें प्रत्यक्ष फल कसें मिळतें हें सांगितल्यावर अजातशत्रु बुद्धाला, धर्माला आणि संघाला शरण जाऊन बुद्धोपासक झाला, व ह्मणाला "भगवन्, मी मोठा अपराध केला आहे. मी अत्यंत मूर्खपणानें माझ्या धार्मिक पित्याच्या मरणाला कारण झालों, याजबद्दल मला पश्चाताप होत आहे. भगवन्, या अपराधाची मला क्षमा करा."

बुद्ध ह्मणाला "महाराज, हा तुझा अपराध झाला. यांत संशय नाहीं; पण या अपराधाबद्दल तुला पश्चाताप होत आहे, ही समाधानची गोष्ट आहे. आपल्या हातून घडलेल्या अपराधाबद्दल पश्चाताप होणें, आणि पुनः तसा अपराध होऊं न देणें, हे आर्यश्रावकाचें कर्तव्य होय."

अजातशत्रु ह्मणाला "भगवन्, मी आतां जातों. माझ्यामागें पुष्कळ कामें आहेत."

"ठीक आहे," बुद्धानें उत्तर दिलें.

अजातशत्रु निघून गेल्यावर बुद्ध भिक्षूंनां ह्मणाला "या राजाच्या हातून जर पितृहत्येचें पाप घडलें नसतें, तर येथल्या येथेंच याला सोतापत्तिफलाचा लाभ झाला असता!"

अनुक्रमणिका

# परिनिर्वाण

**म**गधदेशाच्या उत्तरेला वज्जी नांवांच्या महाजनांचें बलाढ्य राज्य होतें. यांनां लिच्छवी असेंहि ह्मणत असत. हें राज्य महाजनसत्ताक असून शाक्यांच्या राज्याच्या धर्तीवरच चाललें होतें. अजातशत्रु वज्जींचा फार मत्सर करीत असे. वज्जींच्या नाशाला तो फार उत्सुक झाला होता. एके दिवशीं तो आपल्या वस्सकार नांवाच्या ब्राह्मण अमात्याला ह्मणाला "हे ब्राह्मण, तूं बुद्धाजवळ जाऊन असें सांग, कीं, 'मगधराजा वज्जींचा उच्छेद करूं इच्छीत आहे.' यासंबंधानें बुद्धाचें मत काय आहे, हें मला समजलें पाहिजे."

अजातशत्रूच्या आज्ञेप्रमाणें वस्सकारब्राह्मण गृध्रकूटपर्वतावर बुद्ध रहात होता तेथें गेला, व आपल्या राजाचा मनोरथ त्यानें बुद्धाला कळविला. त्या वेळीं आनंद बुद्धाला वारा घालीत होता; त्याजकडे वळून बुद्ध ह्मणाला "आनंद, आजपर्यंत वज्जी वारंवार एकत्र जमून राजकारणाचा खल करीत आहेत काय?"

"होय भगवन्," आनंदानें उत्तर दिलें.

"आनंद, वज्जी जेव्हां एकत्र होतात आणि जेव्हां घरीं जातात, तेव्हां त्यांच्यांत एकसारखी एकी असते काय?"

"होय भगवन्, असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे."

"आपण केलेल्या कायद्यांचा [वज्जींच्या कायद्याचा थोडा नमुना महापरिंनिब्बानसुताच्या अट्ठकथेंत सांपडतो; पण त्यावरून सर्व कायद्यांचें नीट अनुमान होत नाहीं.] वज्जी भंग करीत नाहींतना? किंवा कायद्याचा भलताच अर्थ करीत नाहींतना? ते कायद्याला अनुसरून वागत आहेत काय?"

"होय भगवन्, वज्जी कायदेशीरपणें वागतात, असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे."

"वृद्ध राजकारणी पुरुषांनां वज्जी मान देऊन त्यांची सल्ला वारंवार घेत असतात काय?"

"होय भगवन्, वज्जींच्या राज्यांत वृद्ध राजकारणी पुरुषांनां फार मान आहे, असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे."

"ते आपल्या राज्यांतील विवाहित किंवा अविवाहित स्त्रियांवर बळजबरी करीत नाहींतना?"

"भगवन्, वज्जींच्या राज्यांत स्त्रीजातीचा मान चांगला राखला जातो, असें माझ्या ऐकण्यांत आहे."

"वज्जींचीं शहरांतील किंवा शहराबाहेरील जीं देवस्थानें असतील, त्यांची ते योग्य काळजी घेत आहेतना?"

"होय भगवन्, ते आपल्या देवस्थानांची योग्य काळजी घेतात, असें मीं ऐकिलें आहे."

अनुक्रमणिका

“आनंद, आपल्या राज्यांत आलेले अर्हन्त सुखानें रहावे, व न आलेल्या अर्हन्तांनां आपल्या राज्यांत येण्यास उत्तेजन मिळावें, यासाठीं वज्जी अर्हन्तांनां कोणत्याहि प्रकारें ताप पोहोंचूं देत नाहींतना?”

“भगवन्, वज्जी साधुसंतांसंबंधानें फार आदर ठेवीत असतात, व त्यांचें योग्य संगोपन करीत असतात, असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे.”

बुद्ध वस्सकारब्राह्मणाला ह्मणाला “हे ब्राह्मण, मीं एकदां वैशालीमध्यें रहात असतां अभ्युन्नतीचे हे सात नियम वज्जींनां घालून दिले होते. या सात नियमांनां अनुसरून जोंपर्यंत वज्जी वागतील, तोंपर्यंत त्यांची भरभराटच होणार आहे, अवनति होणार नाहीं.”

वस्सकारब्राह्मण ह्मणाला “भगवन्, यांपैकीं एका नियमाला जरी वज्जी अनुसरले, करी त्यांची हानि होण्याचा संभव नाहीं. सर्व नियम पाळण्यांत आले तर त्यांची अभ्युन्नति होईल, हें सांगावयालाच नको! आमच्या राजानें वज्जींवर स्वारी करूं नये, हें चांगलें!”

वस्सकारब्राह्मण निघून गेल्यावर बुद्धानें आनंदाला पाठवून राजगृहाच्या आसपास रहाणाऱ्या सर्व भिक्षूंनां एकत्र जमविलें, व तो त्यांनां ह्मणाला “भिक्षुहो, मी तुह्मांला अभ्युन्नतीचे सात नियम घालून देतों, त्यांचें सावधानपणें श्रवण करा. जोंपर्यंत तुह्मी वारंवार एकत्र जमून संघकृत्यें कराल; जोंपर्यंत तुमच्यामध्यें एकी राहील, एकीनें तुह्मी सर्व संघकृत्यें कराल; जोंपर्यंत तुह्मी संघाचे नियम मोडणार नाहींत; जोंपर्यंत तुह्मी आपल्यापैकीं वृद्ध विद्वान् भिक्षूंनां मान द्याल; जोंपर्यंत तुह्मी आपल्या तृष्णेच्या ताब्यांत जाणार नाहीं; जोंपर्यंत तुह्मी एकांतवासाची आवड धराल; आणि जोंपर्यंत आपल्या साथीदारांनां सुख व्हावें याजबद्दल काळजी वागवाल, तोपर्यंत तुमची अभ्युन्नतिच होणार आहे, हानि होणार नाहीं.

“भिक्षुहो, आणखीहि अभ्युन्नतीचे सात नियम मी घालून देतों, त्यांचें सावधानपणें श्रवण करा. (१) घरगुती कामांत आनंद मानूं नका; (२) बोलण्यामध्यें सर्व काळ घालविण्यांत आनंद मानूं नका; (३) निद्रेंत वेळ घालविण्यांत आनंद मानूं नका; (४) आपल्या साथीदारांबरोबर सर्व वेळ घालविण्यांत आनंद मानूं नका; (५) दुर्वासनांला वश होऊं नका; (६) दुष्टांच्या संगतीला लागूं नका; आणि (७) अल्पसमाधिलाभानें कृतकृत्य होऊं नका. जोंपर्यंत मनोभावानें हे सात नियम तुह्मी पाळाल, तोंपर्यंत तुमची अभ्युन्नतिच होणार आहे, हानि होणार नाहीं.

“भिक्षुहो, आणखीहि अभ्युन्नतीचे सात नियम मी सांगतों, त्यांचें श्रवण करा. (१) तुह्मी श्रद्धाळु व्हा; (२) पापकर्माला लाजा; (३) लोकापवादाचें भय ठेवा; (४) विद्वान् व्हा; (५) सत्कर्मे करण्याविषयीं उत्साह असूं द्या; (६) स्मृति जागृत ठेवा; आणि (७) प्रज्ञावान् व्हा. जोंपर्यंत तुह्मी या सात नियमांचें पालन कराल, तोंपर्यंत तुमची अभ्युन्नतिच होणार आहे, हानि होणार नाहीं.

“भिक्षुहो, आणखीहि अभ्युन्नतीचे सात नियम मी सांगतों, त्यांचें सावधानपणें श्रवण करा; (१) स्मृतिसंबोध्यंगाची भावना करा; (२) धर्मप्रविचयसंबोध्यंगाची भावना करा; (३) वीर्यसंबोध्यंगाची भावना करा; (४) प्रीतिसंबोध्यंगाची भावना करा; (५) प्रश्रब्धिसंबोध्यंगाची भावना करा; (६) समाधिसंबोध्यंगाची भावना करा; आणि (७) उपेक्षासंबोध्यंगाची भावना करा. जोंपर्यंत तुह्मी हे सात नियम पाळाल, तोंपर्यंत तुमची अभ्युन्नतिच होणार आहे, अवनति होणार नाहीं.”

अनुक्रमणिका

राजगृहांतील भिक्षूंनां शील ['बुद्ध धर्म आणि संघ,' पान २७–५२ पहा.], समाधि, प्रज्ञा इत्यादि मुद्दयांसंबंधानें वारंवार उपदेश करून बुद्धगुरु आपल्या भिक्षुसंघासह अंबलट्ठिका गांवीं आला, व तेथून नालंदा गांवाला गेला. तेथें सारिपुत्त बुद्धाला वंदन करून ह्मणाला "भगवन्, माझा आपणावर एवढा विश्वास आहे, कीं, तशा प्रकारचा विश्वास कोणत्याहि श्रमणब्राह्मणांचा असूं शकणार नाहीं!"

बुद्ध ह्मणाला "तूं ही गोष्ट निःशंकपणें सांगत आहेस; परंतु तुला प्राचीन बुद्धांसंबंधानें सर्व माहिती आहे काय? आणि जे पुढें होणारे बुद्ध आहेत, त्यांच्या स्वभावासंबंधानें तुला कल्पना करतां येईल काय?"

सारिपुत्त ह्मणाला "भगवन्! मला प्राचीन बुद्धांची माहिती नाहीं, किंवा भविष्यत्कालीन बुद्धांच्या स्वभावाची देखील कल्पना करितां येत नाहीं."

बुद्ध ह्मणाला "बरें, सारिपुत्त, माझ्यातरी स्वभावाची तुला यथार्थतया कल्पना झाली आहे काय?"

"नाहीं भगवन्," सारिपुत्तानें उत्तर दिलें.

"तर मग सारिपुत्त, माझ्यावर तुझी अत्यंत श्रद्धा आहे तशी दुसऱ्या कोणाचीहि नाहीं, असें कसें ह्मणतां येईल?"

सारिपुत्त ह्मणाला "भगवन्, जरी मला प्राचीन बुद्धांची माहिती नाहीं, पुढें होणाऱ्या बुद्धांच्या स्वभावाची मला कल्पना करितां येत नाहीं, व आपल्या गंभीर स्वभावाचीहि यथार्थतया मला कल्पना झालेली नाहीं, तथापि आपल्या बुद्धत्वाबद्दल मला शंका राहिली नाहीं. आपण जो धर्मोपदेश केला, तद्द्वारा आपल्या थोरवीबद्दल माझी खात्री झाली आहे. जे कोणी प्राचीन काळीं बुद्ध झाले असतील, ते चित्ताचीं पांच आवरणें दूर सारून सात बोध्यंगांची भावना केल्यानेंच झाले असावे, पुढें होणारे बुद्ध देखील याच मार्गानें होतील, व आपण देखील अशाच तऱ्हेनें बुद्ध झालां आहां, अशी माझी खात्री झाली आहे."

नालंदा गांवीं कांहीं दिवस राहिल्यावर बुद्धगुरु पाटलिग्रामाला गेला. बुद्ध आपल्या गांवीं आला आहे ही बातमी ऐकून पाटलिग्रामवासी उपासक त्याच्या दर्शनाला आले, व त्यांनीं आपल्या आवसथागारांत (धर्मशाळेंत) येऊन रहाण्याची बुद्धाला विनंति केली. बुद्धगुरु उपासकांच्या विनंतीला मान देऊन आवसथागारांत गेला, व तेथें पादप्रक्षालन करून मधल्या खांबाला टेंकून पूर्वेला तोंड करून बसला. भिक्षुसंघहि पादप्रक्षालन करून बुद्धाच्या दोहीं बाजूंला बसला, आणि ते उपासकहि पादप्रक्षालन करून त्या आवसथागारामध्यें येऊन बसले.

तेव्हां बुद्ध त्यांनां ह्मणाला "गृहस्थहो, शीलभ्रष्ट मनुष्याची पांच प्रकारें हानि होत असते. (१) दुराचरणामुळें त्याच्या संपत्तीचा नाश होतो; (२) त्याची अपकीर्ती होते; (३) कोणत्याहि सभेमध्यें त्याचें तेज पडत नाहीं; (४) त्याला शांतपणें मरण येत नाहीं; आणि (५) मरणोत्तर तो दुर्गतीप्रत जातो.

"गृहस्थहो, सदाचरणी मनुष्याला त्याच्या सदाचरणापासून पांच फायदे होत असतात. (१) सदाचरणामुळें त्याच्या संपत्तीची अभिवृद्धि होते; (२) लोकांमध्यें त्याची कीर्ती होते; (३) कोणत्याहि सभेमध्यें त्याचें तेज पडतें; (४) त्याला शांतपणें मरण येतें; (५) मरणोत्तर तो सुगतीप्रत जातो."

अनुक्रमणिका

त्या वेळीं पाटलि गांवाजवळ पाटलिपुत्र नांवाचें शहर बांधण्याचें काम चाललें होतें. अजातशत्रूनें सुनीध आमि वस्सकार या दोन अमात्यांनां पाटलिपुत्र बांधण्याच्या कामावर योजिलें होतें. वज्जींच्या स्वाऱ्या मगधदेशावर होऊं नयेत, या उद्देशानें गंगेच्या कांठीं हें नवीन शहर बांधण्यांत येत होतें.

सुनीध आणि वस्सकार यांनां बुद्ध पाटलिग्रामाला आल्याचें वर्तमान समजल्यावर त्याजपाशीं जाऊन नवीन आवसथामध्यें त्याला व भिक्षुसंघाला त्यांनीं आमंत्रण केलें. त्याप्रमाणें बुद्ध भिक्षुसंघासह तेथें गेला. सुनीध आणि वस्सकार यांनीं स्वतः सर्व संघाचें संतर्पण केल्यावर बुद्धानें त्या दोघांच्या दानाचें अनुमोदन केलें, व तो पाटलिग्रामांतून कोटिग्रामाला जाण्यास निघाला. ज्या नगरद्वारानें बुद्ध बाहेर पडला, त्या नगरद्वाराला सुनीध आणि वस्सकार यांनीं गौतमद्वार असें नांव दिलें.

त्या वेळीं गंगा तुडुंब भरून वहात होती. बुद्ध गंगेच्या कांठीं येऊन पहातो, तर तेथें मोठी गडबड चालली होती. पार जाण्यासाठीं कोणी नौका शोधीत होते, तर कोणी होडी शोधीत होते, आणि कोणी ताफा बांधीत होते. बुद्ध या गर्दीत न शिरतां आणि ताफाबिफा बांधण्याच्या भानगडीत न पडतां आपल्या संघासह सुरक्षितपणें नदी पार उतरला, व परतीराला उभा राहून उद्गारला:—

[जे आर्याष्टांगिक मार्गाचा सेतु करून भवसमुद्र तरून जातात, त्यांनां पापकर्दमांत पडण्याची भीति नसते. हा भवसागर तरून जाण्यासाठीं पृथग्जन ह्मणजे सामान्य माणूस भलभलते प्रयत्न करितो. तो यज्ञयागादिक ताफ्यांचें किंवा देहदंडनादिक नावांचें स्तोम माजवितो; परंतु आर्यजन या मार्गांचें अवलंबन न करितां मध्यममार्गरूपी सेतूवरून सुखरूपपणें पार जातो, असा या श्लोकाचा भावार्थ आहे. त्याचें पद्यात्मक रूपांतर असें होईल:—

**समुद्रसरितादिकां तरति सेतु बांधोनियां**
**अलिप्त जगतीं, नसे उदककर्दमें हानि यां;**
**पृथग्जन झटे, करी विविध नाव ताफा तरी,**
**भवाब्धि तरण्या, परी बुध न या पथां आदरी.**]

**ये तरन्ति अण्णवं सरं सेतुं कत्वा विसज्ज पल्ललानि ।**
**कुल्लं हि जनो पबंधति तिण्णा मेधाविनो जना ॥**

बुद्ध कोटिग्रामाला आल्यावर भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो, दुःख आर्यसत्य, दुःखसमुदय आर्यसत्य, दुःखनिरोध आर्यसत्य, आणि दुःखनिरोधगामिमार्ग आर्यसत्य, या चार आर्यसत्यांचा बोध न झाल्यामुळें पुष्कळ काळपर्यंत आह्मी सर्वजण संसृतिपाशांत सांपडलों होतों; परंतु आतां या आर्यसत्यांचा बोध झाल्यामुळें आह्मीं दुःखाचें मूळ खणून टाकिलें आहे, आणि आपण पुनर्जन्मापासून मुक्त झालों आहों."

कोटिग्रामाहून बुद्धगुरु अनुक्रमें वैशालीला जाऊन पोहोंचला. वैशालींतील प्रसिद्ध गणिका आम्रपाली इनें बुद्धाच्या आगगनाचें वर्तमान ऐकिलें, व मोठ्या लवाजम्यासह ती ताबडतोब बुद्धदर्शनाला गेली. बुद्धाची भेट घेऊन तिने दुसऱ्या दिवशीं भिक्षुसंघासह त्याला आपल्या घरीं भोजनाला आमंत्रण करून ती निघून गेली.

बुद्ध आपल्या शहरांत आल्याचें वर्तमान ऐकून लिच्छवी देखील बुद्धदर्शनाला निघाले. वाटेंत त्यांनां आम्रपाली भेटली. त्यांनीं विचारिलें "कायगे आम्रपाली, तूं आज घाईघाईनें कोठून येत आहेस?"

अनुक्रमणिका

"आर्यपुत्रहो, मीं उद्यां माझ्या घरीं बुद्धाला आणि भिक्षुसंघाला निमंत्रण केलें आहे. तेव्हां उद्यांची सिद्धता करण्यासाठीं मी घाईनें जात आहें." आम्रपालीनें उत्तर दिलें.

लिच्छवी ह्मणाले "आम्रपाली, उद्यां तुझ्या ऐवजीं बुद्धाला आह्मीच भोजन देतों, व तूं केलेल्या आमंत्रणाबद्दल आह्मी तुला एक लाख कार्षापण देतो."

"आर्यपुत्र, तुह्मीं जरी मला सर्व वैशाली दिली, तरी मीं बुद्धाला आणि भिक्षुसंघाला दिलेलें आमंत्रण माघारें घेणार नाहीं." आम्रपालीनें उत्तर दिलें.

लिच्छवी कांहीं न बोलता बुद्धाजवळ गेले. त्यांनां दुरून पाहून बुद्ध भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो, ज्यांनीं तावत्त्रिंशत् देव पाहिले नसतील, त्यांनीं या लिच्छवींच्या समुदायाकडे पहावें!"

लिच्छवीराजांनीं बुद्धाची भेट घेऊन आपल्याकडे दुसऱ्या दिवशीं भोजनास येण्याविषयीं त्याला आमंत्रण केलें; पण बुद्ध ह्मणाला "लिच्छवीहो, उद्यां मीं आम्रपालीचें आमंत्रण स्वीकारलें आहे, तेव्हां तुमचें आमंत्रण मला स्वीकारतां येत नाहीं."

दुसऱ्या दिवशीं बुद्धगुरु भिक्षुसंघासह माध्यान्ह होण्यापूर्वी आम्रपालीच्या घरीं गेला. आम्रपालीनें स्वतः बुद्धाचें आणि भिक्षुसंघाचें संतर्पण केलें, व भोजनोत्तर आपलें उद्यान संघाला दान दिलें. तेव्हां आम्रपालीच्या दानाचें अनुमोदन करून व तिला धर्मोपदेश करून बुद्ध तेथून भिक्षुसंघासह निघून गेला.

वैशालीमध्यें आम्रपालीच्या उद्यानांत कांहीं काल राहून बुद्धगुरु भिक्षुसंघासह बिल्वग्रामाला गेला. तेथें तो भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो, तुमच्या सोईप्रमाणें या चातुर्मास्यांत तुह्मी वैशालीच्या आसपास वस्ती करा. मी हें चातुर्मास्य येथेंच घालविणार आहें."

त्या चातुर्मास्यांत बुद्धाला भयंकर दुखणें आलें; पण त्यानें आपली जागृति ढळूं दिली नाहीं. तो आपणाशींच ह्मणाला "भिक्षुसंघाला पाहिल्याशिवाय माझें परिनिर्वाण व्हावें, हे मला उचित नाहीं. तेव्हां माझ्या मानसिक उत्साहानें हें दुखणें दाबून टाकून मला माझ्या आयुष्याचे आणखी कांहीं दिवस वाढविले पाहिजेत."

बुद्ध या दुखण्यांतून बरा झाला. तेव्हां आनंद त्याला ह्मणाला "भगवन्, आपण या दुखण्यांतून बरे झालां, हें पाहून मला समाधान वाटत आहे. आपल्या या दुखण्यांत माझ्या जीवाला अगदीं चैन पडलें नाहीं, मला कोणतेंहि काम सुचलें नाहीं, आणि माझा देह दुर्बळ झाला. पण भगवन्, आपण भिक्षुसंघाला शेवटच्या कांहीं गोष्टी सांगितल्यावांचून निर्वाणाप्रत जाणार नाहीं, अशी मला आशा असल्यामुळें माझ्या मनाला जरा धीर आला."

बुद्ध ह्मणाला "आनंद, भिक्षुसंघ मजपासून आणखी कोणती गोष्ट समजावून घेण्याची इच्छा करीत आहे? माझा धर्म मीं उघड करून सांगितला आहे, त्यांत मीं गुरुकिल्ली ठेविली नाहीं. आनंद! ज्याला आपण भिक्षुसंघाचा नायक व्हावें, भिक्षुसंघ आपल्यावरच अवलंबून रहावा असें वाटत असेल, तोच शेवटीं भिक्षुसंघाला सांगण्यासाठीं कांहीं गोष्टी गुप्त ठेवील; पण आनंद, तथागताची भिक्षुसंघाचा नायक होण्याची,

किंवा भिक्षुसंघ आपणावरच अवलंबून रहावा अशी इच्छा नाहीं. तेव्हां तथागताजवळ अशी कोणतीच गोष्ट नाहीं, कीं, ती त्यानें भिक्षुसंघाला स्पष्टपणें सांगितली नाहीं. आनंद! मी आतां वृद्ध झालों आहें; मोडक्या खटाऱ्यासारखा माझा देह जर्जरित झाला आहे. ज्या वेळीं मी निरोधसमाधीची भावना करितों, त्याच वेळीं माझ्या देहाला सुख होत असतें. ह्मणून आनंद, आतां तुह्मी स्वतःवरच अवलंबून रहा. या संसारसमुद्रामध्यें आपल्या मनालाच द्वीप बनवा, धर्माला द्वीप बनवा, आपल्या आत्म्याला शरण जा, आणि धर्माला शरण जा. आनंद, जे चार स्मृत्युपस्थानांची भावना करितात, ते आत्मद्वीप होत, ते धर्मद्वीप होत, ते आत्मशरण होत, आणि तेच धर्मशरण होत."

चातुर्मास्य संपल्यावर बुद्धगुरु चापालचैत्य या ठिकाणीं येऊन राहिला. तेथें मार त्याला ह्मणाला "भगवन्, आतां आपण परिनिर्वृत्त व्हा! मागें आपण ह्मणालांत, कीं, भिक्षु, भिक्षुणी, उपासक आणि उपासिका यां सर्वांनां माझा धर्म नीट समजल्यावांचून मी निर्वाणाला जाणार नाहीं; पण भगवन्, आतां आपले भिक्षु, भिक्षुणी, उपासक आणि उपासिका

१ पान २५६-६१ पहा.

हे सर्व शिष्य धर्मविचारांत तरबेंज झाले आहेत; आपल्या धर्माचा प्रसार सर्वत्र झाला आहे. आतां आपणाला इहलोक सोडून जाण्याला कोणतीच अडचण राहिली नाहीं!"

बुद्ध ह्मणाला "हे मार, तूं निष्काळजी हो. मी लवकरच इहलोक सोडून जाणार आहें. आणखी तीन महिन्यांनीं माझें परिनिर्वाण होणार आहे!"

मार निघून गेल्यावर बुद्धानें आपल्या सामर्थ्यानें दाबून ठेविलेले जीवितसंस्कार सोडून दिले. त्या वेळीं भयंकर धरणीकंप झाला!

भगवान् आनंदाला बरोबर घेऊन चापालचैत्याहून वैशाली येथील महावनांत कूटागारशालेंत आला, व आनंदाला पाठवून वैशालीच्या आसपास असलेल्या सर्व भिक्षूंनां त्यानें कूटागारशालेंत गोळा करविलें. सगळे भिक्षु एकत्र जमल्यावर बुद्ध ह्मणाला "भिक्षुहो, तुमचें ब्रह्मचर्य चिरस्थायि व्हावें व त्यायोगें पुष्कळ लोकांचें कल्याण व्हावें, पुष्कळ लोकांनां सुख व्हावें, असें जर तुह्मांला वाटत असेल, तर मीं शिकविलेल्या कुशल धर्माचें चांगलें अध्ययन करा, व त्याची चांगली भावना करा. भिक्षुहो, चार स्मृत्युपस्थानें, [पान २५६ – ६१ पहा.] चार सम्यक् प्रयत्न, [जे पापविचार उत्पन्न झाले नसतील ते उत्पन्न होऊं न देण्याविषयीं प्रयत्न; जे पापविचार उद्भवले असतील त्यांच्या नाशाविषयीं प्रयत्न; जे पुण्यविचार उत्पन्न झाले नसतील ते उत्पन्न करण्याविषयीं प्रयत्न; आणि जे पुण्यविचार उद्भवले असतील त्यांची अभ्युन्नति करून पूर्तता करण्याचा प्रयत्न; या चार मानसिक प्रयत्नांनां सम्यक् प्रयत्न असें ह्मणतात.] चार ऋद्धिपाद, [क्रियासातत्य, चित्ताची एकाग्रता, मानसिक उत्साह आणि सत्यान्वेषणबुद्धि (मीमांसा), या चार मनोधर्मांला ऋद्धिपाद ह्मणजे योगसिद्धीचे पाये असें ह्मणतात.] पांच [इंद्रियें आणि बळें एकच आहेत. इंद्रियांसंबंधानें विशेष माहिती १२९–३० पानांवर आलीच आहे.] इंद्रियें, पांच बळें, सात बोध्यंगें [सात बोध्यंगांची भावना कशी करावी, यासंबंधानें माहिती २२१–२२ पानांवर पहावी.] आणि आर्य अष्टांगिक [पान १५०–५१ पहा] मार्ग, या कुशल धर्माचा बोध करून घेऊन मीं तुह्मांला उपदेश केला आहे; याचें चांगलें मनन करून भावना करा.

"भिक्षुहो, सावध व्हा! सावध व्हा! सगळे संस्कार व्ययधर्मी आहेत, हें लक्ष्यांत ठेवा, व सावधपणें वागा. तीन महिन्यांनीं माझें परिनिर्वाण होणार आहे! भिक्षुहो, मी अत्यंत वृद्ध झालों आहें, आणि माझें आयुष्य थोडें राहिलें आहे. माझें कर्तव्य मीं केलें आहे, व लवकरच मी तुह्मांला सोडून जाणार आहें. भिक्षुहो, सावध

आणि जागृत व्हा, शील आणि समाधि या गुणांनीं युक्त व्हा, व स्वतःच्या चित्ताचें दमन करा. जो माझ्या उपदेशाला अनुसरून सावधानपणें वागेल, तो पुनर्जन्मापासून मुक्त होऊन दुःखाचा नाश करील."

दुसऱ्या दिवशीं बुद्ध आनंदाला बरोबर घेऊन वैशालींत भिक्षेला गेला. तेथें तो आनंदाला ह्मणाला "आनंद, तथागताला वैशालीचें हें शेवटलें दर्शन आहे. चल – आतां आपण भांडग्रामाला जाऊं."

तदनंतर बुद्ध आपल्या भिक्षुसंघासह भांडग्रामाला आला, व तेथें भिक्षूंनां ह्मणाला "भिक्षुहो, आर्यशील, आर्यसमाधि, आर्यप्रज्ञा, आणि आर्यविमुक्ति, या चार गोष्टींचा यथार्थ बोध न झाल्यामुळें आह्मी अनादिकालापासून संसृतीच्या पाशांत सांपडलों होतो; पण ज्या अर्थी आह्मांला या चार धर्मांचें यथार्थ ज्ञान झालें आहे, त्या अर्थी आतां आह्मांला पुनर्जन्म राहिला नाहीं."

भांडग्रामाहून हस्तिग्राम, आम्रग्राम, जंबुग्राम, भोगनगर इत्यादि ठिकाणीं प्रवास करीतकरीत बुद्धगुरु भिक्षुसंघासह पावा नांवाच्या नगराला आला, व तेथें चुंद नांवाच्या लोहाराच्या आम्रवनांत राहिला. चुंदाला बुद्धगुरु आल्याची बातमी समजल्याबरोबर तो त्याच्या दर्शनाला गेला, आणि दुसऱ्या दिवशीं त्यानें आपल्या घरीं बुद्धाला आणि भिक्षुसंघाला निमंत्रण केलें.

दुसऱ्या दिवशीं माध्याह्नकालापूर्वी बुद्ध भिक्षुसंघासह चुंदाच्या घरीं गेला. चुंदानें नानातऱ्हेचीं पक्वान्नें तयार करविलीं होतीं, त्यांत सूकरमद्दव [हा पदार्थ कोणत्या वस्तूचा बनविला होता, यासंबंधानें टीकाकारांचा मतभेद आहे. या वादग्रस्त प्रश्नांत येथें शिरण्याची आवश्यकता न वाटल्यामुळें मूळ शब्द तसाच कायम ठेवण्यांत आला आहे.] नांवाचा एक पदार्थ होता. तो जेव्हां वाढण्यांत आला, तेव्हां बुद्ध चुंदाला ह्मणाला "हा पदार्थ तूं दुसऱ्या कोणाला वाढूं नकोस; हा पदार्थ ज्याला जिरेल असा मनुष्य मला या जगामध्यें दिसत नाहीं, ह्मणून यांतील जो भाग शिल्लक राहिला असेल, तो जमिनींत गाडून टाक."

बुद्धाच्या सांगण्याप्रमाणें चुंदानें तो पदार्थ एका खड्ड्यांत पुरून टाकिला.

त्या दिवशीं भोजनोत्तर बुद्धाला अतिसाराचा विकार उत्पन्न झाला. परंतु मरणांतिक वेदना होत असतांना देखील त्या सहन करून बुद्ध शांतपणें तसाच पुढल्या प्रवासाला निघाला. पावेहून कुसिनारा येथें जाण्याचा त्याचा बेत होता. पण वाटेंत ककुत्था नांवाच्या नदीजवळ आल्यावर त्याला फारच थकवा आला, व तो आनंदाला ह्मणाला "आनंद, मला थोडें पाणी आणून दे."

आनंद ह्मणाला "भगवन्, आह्मी ककुत्था नदीच्या अगदीं जवळ आलों आहों, तेथें जाऊन आपण पाणी प्यावें, आणि आपले हातपाय धुवावे."

बुद्धानें आणखी दोनवार पाणी आणण्यास सांगितल्यावर आनंद जवळच्या एका ओढ्यावर पाणी आणण्यासाठीं गेला. त्या ओढ्यांतून पुष्कळ गाड्या गेल्यामुळें त्याचें पाणी अत्यंत गढूळ झालें होतें; परंतु आनंद तेथें पोहोंचल्याबरोबर तें पराकाष्ठेचें स्वच्छ झालें, व त्यामुळें आनंद आश्चर्यानें चकित झाला. पाणी घेऊन आल्यावर त्यानें ती गोष्ट बुद्धाला सांगितली, आणि तो ह्मणाला "भगवन्, तथागताच्या महानुभावामुळें हें पाणी देखील स्वच्छ झालें!"

अनुक्रमणिका

बुद्ध तें पाणी प्याला. इतक्यांत पुक्कुस नांवाचा मल्ल [कुसिनारेंतील आणि पावेंतील महाजनांला मल्ल ह्मणत असत. हे वासिष्ठगोत्री क्षत्रिय होते.] कुसिनारा येथून पावेला जात होता. तो बुद्धाला पाहून त्याच्याजवळ आला. बुद्धानें त्याला कांहीं वेळ उपदेश केल्यावर त्यानें आपल्याजवळची एक अत्यंत सुंदर सुवर्णवर्ण वस्त्रांची जोडी बुद्धाला अर्पण केली, व नमस्कार करून तो तेथून निघून गेला.

त्या वस्त्रांनीं आपला देह आच्छादून बुद्धगुरु भिक्षुसंघासह ककुत्था नदीवर गेला, व तेथें स्नान करून जवळच्या आमराईंत शिरला, आणि चुंदक नांवाच्या भिक्षूला ह्मणाला "हे चुंदक, मला जरा विश्रांति घेऊ दे. माझी कंथा तूं येथें पसर."

बुद्धाच्या आज्ञेप्रमाणें चुंदकानें ती कंथा चौघडी करून खालीं पसरली. बुद्धगुरु तीवर निजला, आणि आनंदाला ह्मणाला "आनंद, मला जेवण दिल्याबद्दल चुंद लोहाराला वाईट वाटण्याचा संभव आहे; पण तुह्मी त्याला असें सांगा, कीं, 'चुंद, तुझें मोठें भाग्य समजलें पाहिजे! कांकी, तथागताला शेवटली भिक्षा देण्याची दुर्मिळ संधि तुलाच मिळाली. ज्या दिवशीं तथागत संबोधिज्ञान मिळवितो, आणि ज्या दिवशीं तो परिनिर्वाण पावतो, त्या दोन दिवशीं त्याला दिलेली भिक्षा महत्फलदायक आणि महागुणकारी होय.' याप्रमाणें उपदेश करून चुंदाच्या मनांतील शंकेचें तुह्मी निरसन करा."

ककुत्थानदीवरून बुद्धगुरु भिक्षुसंघासह हिरण्यवती नदी ओलांडून तिच्या परतीरीं कुसिनारेंतील मल्लांच्या शालवनांत गेला. तेथें आनंदानें एका जुळ्या शालवृक्षाखालीं बुद्धाचा बिछाना तयार केला. बुद्धगुरु उत्तरेला डोकें करून उजव्या कुशीवर निजला. त्या वेळीं ते शालवृक्ष फुलून गेले होते व आपल्या पुष्पवृष्टीनें जणूं काय बुद्धाची पूजाच करीत होते. अंतरिक्षांतून देखील बुद्धगुरूवर पुष्पवृष्टि होत होती, व बुद्धपूजेसाठीं दिव्य वाद्यें वाजत होती. तें पाहून बुद्ध आनंदाला ह्मणाला "आनंद, तथागताच्या पूजेसाठीं जरी पुष्कळ फुलें खर्च केली, किंवा दिव्य वाद्यें वाजविलीं, तरी तेवढ्यानें तथागताची पूजा होणार नाहीं. तथागताच्या पूजेचा मार्ग ह्मटला ह्मणजे त्यानें उपदेशिलेल्या धर्माला यथार्थतया अनुसरणें हा होय. ह्मणून आनंद, तुह्मी माझ्या धर्माला अनुसरून वागा."

आनंद ह्मणाला "भगवन्, चारी दिशांनां चातुर्मास्य घालविल्यावर भिक्षु आपल्या दर्शनाला येत असत. तेथें दुसऱ्या सज्जन भिक्षूंच्या ओळखी होत असत; पण आतां आह्मांला सज्जन भिक्षूंचें दर्शन कसें होईल?"

बुद्ध ह्मणाला "आनंद, तुझ्यासारख्या श्रद्धावान् मनुष्याला माझ्या परिनिर्वाणानंतर या चार स्थानांचें दर्शन घेण्यालायक आहे. जेथें तथागत जन्मला, [हें स्थान नेपाळी तराईंत भगवानपुर नांवाच्या जिल्ह्याच्या मुख्य शहरापासून दीड मैलाच्या अंतरावर आहे. याला सध्या लुंबिनदेई असें ह्मणतात. बुद्ध धर्म आणि संघ, पान २ पहा.] जेथें तथागत संबुद्ध झाला, [हें स्थान गयेच्या दक्षिणेस सात मैलांवर आहे. याला बुद्धगया ह्मणतात. येथें प्राचीनकाळीं बांधलेलें एक मंदिर असून बुद्धाच्या पुष्कळ मूर्ति, स्तूप वगैरे पहावयाला सांपडतात.] जेथें तथागतानें पहिला धर्मोपदेश केला, [काशीजवळ सारनाथ या ठिकाणीं बुद्धानें पहिला उपदेश केला. बुद्धकालीं याला ऋषिपत्तन मृगदाव असें ह्मणत.] व जेथें तथागत परिनिर्वाणाला [हें स्थानं गोरखपुर जिल्ह्यांत आहे. कसया म्हणून एक तालुक्याचें गांव आहे, तेथून हें एका मैलाच्या अंतरावर आहे. याला माथाकुंवरका कोट असें तेथील शेतकरी ह्मणतात.] गेला, हीं तीं चार स्थानें होत. या चार स्थानांची यात्रा केली असतां मनुष्याला पुष्कळ पुण्य मिळेल."

आनंद ह्मणाला "भगवन्, स्त्रियांशी आह्मीं कसें वागावें?"
बुद्ध ह्मणाला "होतां होईल तों स्त्रियांचें दर्शन वर्ज्य करा."

अनुक्रमणिका

“पण भगवन्, दर्शनाचा प्रसंगच आला तर काय करावें?”
“आनंद, असा प्रसंग आला असतां त्यांच्याशीं भाषण करूं नका”
“आणि भगवन्, संभाषणाचा प्रसंग आला असतां काय करावें?”
“आनंद, असा प्रसंग आला असतां स्मृति जागृत ठेवा.”
“भगवन्, परिनिर्वाणानंतर आपल्या देहाची काय व्यवस्था करावी?”

बुद्ध ह्मणाला “आनंद, माझ्या परिनिर्वाणानंतर माझ्या देहाची पूजा करावयाच्या भानगडींत तुह्मी पडूं नका. मीं जो तुह्मांला सन्मार्ग शिकविला आहे, त्याला अनुसरून चालण्याचा प्रयत्न करा. सावधान व्हा,उद्योगी व्हा, आणि शांत व्हा. पुष्कळ गृहस्थ माझे शिष्य आहेत, ते माझ्या शरीराची यथायोग्य व्यवस्था लावितील.”

तदनंतर आनंद विहारामध्यें जाऊन अश्रु गाळूं लागला. आपण सोतापन्न [सोतापन्न, सकदागामी, अनागामी आणि अरहा अशा निर्वाणमार्गाला लागलेल्या मनुष्यांच्या चार पायऱ्या आहेत. बुद्ध, धर्म आणि संघ, पान ९९ पहा.] असतांनाच भगवंताचें परिनिर्वाण होत आहे, याबद्दल त्याला अत्यंत दुःख झालें. तेव्हां बुद्ध त्याला बोलावून आणून ह्मणाला “आनंद! असा शोकाकुल होऊं नकोस. सर्व प्रिय वस्तूंपासून आह्मांला विभक्त व्हावें लागणार, हें मीं आगाऊच सांगितलें नाहीं काय? जी वस्तु जन्माला आली, त्या वस्तूचा नाश होऊं न देणें शक्य आहे काय? आनंद, तूं तथागताची मनोभावें सेवा केली आहेस, तूं पुण्यवान् आहेस; जर प्रयत्न करिशील, तर तूं लवकर अर्हन् होशील.”

आनंद ह्मणाला “भगवन्, या लहानशा शहरांत आपलें परिनिर्वाण होणें मला इष्ट वाटत नाहीं. चंपा, राजगृह, श्रावस्ति, साकेत, कौशांबी, आणि वाराणसी, या मोठ्या शहरांपैकीं एकाद्या शहरीं तथागताचें परिनिर्वाण व्हावें, अशी माझी इच्छा आहे.”

बुद्ध ह्मणाला “आनंद, हें लहान शहर आहे, असें समजूं नको. सध्यां जरी याची लहान शहरांत गणना होते, तरी पूर्वी एका काळीं सुदर्शन नांवाच्या प्रख्यात राजाची ही राजधानी होती. त्या वेळीं याला कुशावती असें ह्मणत, व देवांच्या राजधानींची तिला उपमा देण्यांत येत असे.

“आनंद, आतां तूं कुसिनारा शहरांत जाऊन मल्लांनां सांग, कीं, तथागत तुमच्या राज्यांत राजधानीच्या शेजारीं परिनिर्वृत होणार आहे; जर त्याचें शेवटचें दर्शन घेण्याची तुमची इच्छा असेल, तर चला. मागाहून आह्मांला ही बातमी समजली नाहीं, याजबद्दल पश्चात्ताप करूं नका.”

त्या वेळीं कुसिनारेंतील मल्ल कांहीं कारणासाठीं आपल्या संथागारांत जमले होते. आनंदानें त्यांनां बुद्धाचा निरोप कळविला, तेव्हां ते आपल्या मुलांबाळांसह शोकसागरांत बुडून गेले. ‘बुद्धगुरु लवकर परिनिर्वृत होत आहे! धर्मसूर्य लवकर मावळत आहे!’ असें जो तो ह्मणूं लागला.

नंतर ते सर्व मल्ल आपल्या बायकांमुलांसह बुद्धाचें शेवटलें दर्शन घेण्यासाठीं शालवनांत गेले. प्रत्येक मल्लानें बुद्धाला क्रमशः नमस्कार केला असता, तर ती सारी रात्र त्यांच्या नमस्कारविधींतच गेली असती! तेव्हां आनंदानें मल्लाच्या कुळांतील जे मुख्य मुख्य होते, त्यांनां पुढें आणून नमस्कार करावयाला

लाविलें व 'भगवन्, हा अमुक मल्ल आपल्या मुलांबाळांसह आणि चाकरनोकरांसह आपणाला नमस्कार करीत आहे,' अशा शब्दानें त्यांची बुद्धाला ओळख करून दिली.

त्या वेळीं सुभद्र नांवाचा एक परिव्राजक कुसिनारेंत रहात होता. त्या दिवशीं पहांटेला बुद्धाचें परिनिर्वाण होणार आहे, हें वर्तमान जेव्हां त्याला समजलें, तेव्हां तो तसाच शालवनांत आला, आणि आनंदाला ह्मणाला "आनंद, तथागताचा उत्पाद इहलोकीं क्वचित् होत असतो, असें मीं ऐकिलें आहे; आणि आजची रात्र संपण्यापूर्वी आपल्या गुरूचें देहावसान होणार, ही गोष्ट देखील माझ्या कानीं पडली आहे. तेव्हां थोडक्यांत जें काय सांगावयाचें तें सांगून गौतम माझी शंका निवारण करील काय?"

आनंद ह्मणाला "हे सुभद्र, या वेळीं तूं तथागताला त्रास देऊं नकोस. तथागत पार थकला आहे."

हा सुभद्राचा आणि आनंदाचा संवाद ऐकून बुद्ध ह्मणाला "आनंद, सुभद्राला प्रतिबंध करूं नकोस; त्याला तथागताचें दर्शन घेऊं दे. तो जिज्ञासु आहे. तो जे मला प्रश्न विचारणार आहे, ते मला त्रास देण्यासाठीं नसून आपणाला तत्त्वबोध व्हावा याच इच्छेनें विचारणार आहे; आणि माझ्या भाषणाचा इत्यर्थ तो ताबडतोब समजणार आहे."

आनंदानें सुभद्राला बुद्धाजवळ जाण्यास मोकळीक दिली. तेव्हां बुद्धानें त्याला थोडक्यांत उपदेश केला. तो ऐकून सुभद्र बुद्धाला, धर्माला आणि संघाला शरण गेला, व आपणाला भिक्षुसंघांत घेण्यास त्यानें विनंति केली.

बुद्ध ह्मणाला "हे सुभद्र, जो दुसऱ्या पंथाचा श्रमण असेल, त्याला चार महिनेपर्यंत आह्मी आमच्या संघांत न घेतां एकाद्या भिक्षूच्या स्वाधीन करितों, आणि त्याचें वर्तन जर समाधानकारक आहे असें वाटलें, तर चार महिन्यांनंतर भिक्षु त्याला प्रव्रज्या देऊन संघांत घेतात."

सुभद्र ह्मणाला "भगवन्, जर इतर पंथांच्या श्रमणाला चार महिने वाट पहावी लागते, तर मी चार वर्षेपर्यंत प्रव्रज्या न घेतां भिक्षुपाशीं रहावयाला तयार आहें. माझें आचरण योग्य आहे, असें आढळून आल्यास चार वर्षांनंतर भिक्षु मला आपल्या संघांत घेवोत."

तेव्हां सुभद्राला बुद्धानें आनंदाच्या स्वाधीन केलें, व यथाविधि त्याला प्रव्रज्या वगैरे देण्यास सांगितलें.

तदनंतर बुद्ध आनंदाला ह्मणाला "आनंद, या धर्मपंथाला माझ्या देहावसानानंतर कोणी शास्ता राहिला नाहीं, असें तुह्मांला वाटण्याचा संभव आहे; पण आनंद, माझ्या अभावीं मीं जो धर्म आणि विनय तुह्मांला शिकविला आहे, तोच तुमचा शास्ता होय."

नंतर बुद्ध भिक्षूंनां उद्देशून ह्मणाला "भिक्षुहो, माझ्या धर्ममार्गासंबंधानें ज्याला शंका असेल, त्यानें ती या वेळीं विचारावी."

अनुक्रमणिका

पण त्या भिक्षूंमध्यें सर्व सोतापन्नाच्या वरच्या पायरीचेच होते; सोतापन्न झाला नाहीं, असा एक देखील नव्हता. अर्थात् बुद्धाच्या धर्ममार्गाविषयीं कोणाच्याहि मनांत शंका आली नाहीं. तेव्हां बुद्ध ह्मणाला “भिक्षुहो, आतां मी तुह्मांला सांगतों, कीं, सर्व संस्कार व्ययधर्मी आहेत, ह्मणून सावधगिरीनें वागा!”

हेच तथागताचे शेवटले शब्द होत!

नंतर बुद्धगुरु ध्यानस्थ झाला. पहिल्या ध्यानापासून अनुक्रमें नैवसंज्ञानासंज्ञासमाधीपर्यंत सर्व समाधींच्या पायऱ्यांचें उल्लंघन केल्यावर पुनः नैवसंज्ञानासंज्ञासमाधीपासून अनुक्रमें तो पहिल्या ध्यानावर आला, आणि तेथून चवथ्या ध्यानावर येऊन परिनिर्वाण पावता झाला! त्याबरोबर भयंकर भूमिकंप झाला, आणि आकाशांत देवांच्या दुंदुभि फुटून गेल्याचा आवाज झाला! तेव्हां ब्रह्मदेव म्हणाला “सर्व प्राणी आपला देह टाकून जाणार आहेत. असा हा लोकोत्तर शास्ता सम्यक्संबुद्ध तथागत श्रद्धादिक बलांनीं संपन्न असून देखील परिनिर्वाण पावता झाला!”

इंद्र ह्मणाला “अरेरे! सर्व संस्कार अनित्य आहेत. ते उत्पादव्ययधर्मी असल्यामुळें उत्पन्न होऊन नाश पावतात. त्यांचा उपशमच सुखावह होतो!”

अनुरुद्ध ह्मणाला “या शांतचित्त मुनीचा आश्वासप्रश्वास देखील कळूं आला नाहीं! मोठ्या धीरानें त्यानें सर्व वेदना सहन केल्या, आणि न डगमगतां तो निर्वाणाला गेला! तेल संपल्यामुळें मशाल जशी आपोआप विझते, तसें याचें चित्त ठायींच्या ठायींच विमुक्त झालें!”

आनंद ह्मणाला “सर्वगुणसंपन्न संबुद्धाचें परिनिर्वाण झाल्याबरोबर माझ्या अंगावर कांटा उभा राहिला! मी घाबरून गेलों!”

जे भिक्षु अद्यापि अर्हत्पदाला पोहोंचले नव्हते, ते बुद्धाच्य परिनिर्वाणानंतर शोकाकुल होऊन गेले; पण जे अर्हत्पदाला पोहोंचले होते त्यांनीं, सर्व संस्कार अनित्य आहेत, त्यांचा कायमचा समागम होणें शक्य नाहीं, असा विचार करून बुद्धाचा वियोग मोठ्या विवेकानें सहन केला.

शोकनिमग्न झालेल्या भिक्षूंनां अनुरुद्ध ह्मणाला “बंधुहो, शोक करूं नका, आणि रडूं नका. सर्व प्रियवस्तूंचा आपणाला वियोग होणार आहे, ही गोष्ट भगवंतानें आह्मांला पूर्वीच सांगितली नाहीं काय?”

त्या रात्रीचा अवशिष्ट भाग अनुरुद्धानें आणि आनंदानें भिक्षूंनां धर्मोपदेश करण्यांत घालविला.

दुसऱ्या दिवशीं मल्लांनां बुद्धाच्या परिनिर्वाणाची खबर देण्यांत आली. त्यांनीं गंधमालादिकांनीं बुद्धाच्या शरीराची पूजा करून चक्रवर्ती राजाच्या शरीरासारखा बुद्धाच्या शरीराचा गौरव केला. याप्रमाणें सात दिवसपर्यंत मोठा उत्सव करून कुसिनाराच्या पूर्वेला त्यांनीं चंदन कांष्ठांची एक मोठी चिता रचली, व बुद्धाचें शरीर नवीन वस्त्रांनीं वेष्टून तेलाच्या कढईत टाकिलें, आणि तें त्या चितेवर नेऊन ठेवण्यांत आलें; पण ती चितां कांहीं पेट घेईना. तेव्हां मल्ल अनुरुद्धाला ह्मणाले “भदंत, चिता पेट घेत नाहीं, याचें कारण काय?

अनुक्रमणिका

अनुरुद्ध ह्मणाला “गृहस्थहो, देवांच्या प्रभावानें ही चिता पेटत नाहीं. महाकाश्यप पावा नगराहून तथागताच्या शरीराचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं मोठ्या भिक्षुसमुदायासहवर्तमान येथें येत आहे. तो येथें येऊन पोहोंचल्यावांचून ही चिता पेटतां कामा नये, असा देवांचा अभिप्राय आहे.”

इतक्यांत महाकाश्यप तथागताच्या चितेजवळ येऊन पोहोंचला. त्यानें त्या चितेला त्रिवार प्रदक्षिणा केली आणि बुद्धाचे पाय उघडून त्यांवर आपलें मस्तक ठेविलें. महाकाश्यपाबरोबर आलेले भिक्षूहि त्या चितेला त्रिवार प्रदक्षिणा करून तथागताच्या पायां पडले. तेव्हां चिता आपोआप पेटली!

तथागताचें शरीर दग्ध झाल्यावर आकाशांतून एक उदकधारा खालीं येऊन तिनें ती चिता विझविली. मल्लांनींहि गंधोदकानें ती चिता विझविली. बुद्धाच्या अस्थि आपल्या संथागारांत गोळा करून मल्लांनीं त्यांच्या रक्षणासाठीं नागव्या तलवारींचा खडा पहारा ठेविला, व नृत्य, गीत, वाद्य इत्यादिकांनीं त्या अस्थींची पूजा करण्यास सुरुवात केली.

तथागत कुसिनारा येथें परिनिर्वृत झाला, ही वार्ता लवकरच सर्वत्र पसरली. तेव्हां मगधदेशाच्या अजातशत्रुराजानें, वैशालींतील लिच्छवींनीं, कपिलवस्तूंतील शाक्यांनीं, अल्लकप्प येथील बुलींनीं, रामग्रामांतील कोलियांनीं, वेठ्ठद्वीपांतील एका प्रसिद्ध ब्राह्मणानें, आणि पावा येथील मल्लांनीं बुद्धाच्या शरीरावशेषांचा हिस्सा आणण्यासाठीं आपापले दूत कुसिनारेला पाठविले; पण मल्ल त्यांनां हिस्सा देण्यास कबूल होईनात. तेव्हां द्रोण नांवाचा एक विद्वान् ब्राह्मण कुसिनारेंतील मल्लांनां ह्मणाला “महाजनहो, मी काय बोलतों याजकडे लक्ष्य द्या. आमचा बुद्ध क्षमावादी होता. त्या थोर पुरुषाच्या शरीरावशेषाच्या हिश्श्यासाठीं भांडत बसणें योग्य होणार नाहीं. ह्मणून सर्वांनीं एकमतानें आठ भाग करावे, हें चांगलें. सर्व दिशांनां बुद्धाचे स्तूप होणें इष्ट आहे. कांकीं, पुष्कळ लोकांची बुद्धावर भक्ति आहे.”

नंतर त्या ब्राह्मणानें सर्वांची समजाविशी करून तथागताच्या अस्थींचे बरोबर आठ भाग केले, व ते त्या दूतांनां वांटून देऊन तो ह्मणाला “आतां हा जो घडा राहिला आहे, तो तुह्मी मला द्या. बुद्धाच्या स्मारकासाठीं मी या घड्यावर एक स्तूप बांधणार आहें.”

त्या सर्वांनीं तो घडा मोठ्या आनंदानें द्रोण ब्राह्मणाला दिला. इतक्यांत पिप्फलिव्न येथील मौर्यांचा दूत बुद्धाच्या अस्थींचा हिस्सा मागण्यासाठीं कुसिनारेला येऊन पोहोंचला. पण आतां हिस्सा मिळणें शक्य नसल्यामुळें बुद्धाच्या चितेचे कोळसे त्या दूताच्या स्वाधीन करण्यांत आले.

अजातशत्रूनें राजगृहामध्यें आपल्या वांट्याला आलेल्या बुद्धाच्या अस्थींवर एक मोठा स्तूप बांधला. लिच्छवींनीं वैशालीमध्यें, शाक्यांनीं कपिलवस्तूमध्यें, बुलींनीं अल्लकप्प येथें, कोलियांनीं रामग्रामांत, वेठ्ठद्वीपक ब्राह्मणानें वेठ्ठद्वीपांत, पावेंतील मल्लांनीं पावा येथें आणि कुसिनारेंतील मल्लांनीं कुसिनारा येथें आपापल्या वांट्याला आलेल्या बुद्धास्थींच्या हिश्श्यांवर स्तूप बांधिले. द्रोण ब्राह्मणानें देखील आपणाला मिळालेल्या घड्यावर स्तूप बांधिला, आणि पिप्फलिवनांतील मौर्यांनीं आपल्या शहरांत आपणाला मिळालेल्या बुद्धाच्या चितेच्या कोळशांवर स्तूप बांधला. याप्रमाणें बुद्धास्थींवर आठ स्तूप बांधले गेले. एक घड्यावर बांधला गेला, आणि एक चितेच्या कोळशांवर बांधला गेला.

अनुक्रमणिका

# विषयसूची

**अ**


अक्रियावाद
अक्रियावादी
अकुशल धर्म
अकुशल मनोवृत्ति
अग्नि
अग्निकुंड
अग्निशाळा
अग्निहोत्र
अग्रश्रावक (अग्रशिष्य)
अचिरवती (राप्ती) नदी
अजातशत्रु राजा
अजित केसकंबल
अत्यासक्ति
अद्वेष (मैत्री)
अधर्म
अधार्मिक आचरण व त्याचे दहा प्रकार
अधार्मिक चर्या
अधिष्ठान
अधिष्ठान पारमिता
अनागामी
अनाथपिंडिक (सुदत) श्रेष्ठी
अनीति
अनुकेवट्ट (महौषधाचा मित्र)
अनुप्रिया गांव
अनुरुद्ध
अनोम नदी
अन्नदान
अन्नत्याग
अन्योन्यवाद
अपराध
अपहार
अप्रिय वस्तु समागम
अब्राह्मण
अभाव
अभ्यास
अभ्युन्नति – अभ्युन्नतीचे सात नियम
अमर नगर
अमात्य
अमित्रतापना
अमेरिका
अमोह (ज्ञान)
अरण्यवास
अरियपरियेसन सुत
अरिरति
अरहा
अरिष्टजनक राजपुत्र
अर्हत्पद
अर्हन्
अर्हन्त
अलोभ
अल्लकप्प
अश्वजित् ब्राह्मण
असज्जि (अश्वजित)
असत्य भाषण
असद्धर्म
असितदेवल
असिबंधक ग्रामणीचा पुत्र
असुर
अहित
अहंकार
अज्ञेयवाद
अंगदेश
अंगीरस ब्राह्मण
अंगुतर सत्तनिपात
अंगुलिमाल दरोडेखोर
अंत – दोन प्रकारचे अंत
अंतःपूर
अंतर्ज्ञान
अंध – अंधांचे हस्तिवर्णन
अंबलट्ठीका गाव


**आ**

**इ**

अनुक्रमणिका

आईबाप
आकाश — आकाशावर ध्यान
आकिंचन्य समाधि
आकिंचन्यायतन समाधि
आजीवक पंथ
आत्मपर घात
आत्मपरहित
आत्मस्तुति
आत्महित
आत्मा
आनंद (व्यक्ति)
आभ्यंतर आयतने
आभ्यंतर स्कंध
आम्रपाली गणिका
आम्रयष्टि वन
आयुष्य
आयुष्यमद
आराम (विहार)
आरोग्यमद
आर्य
आर्य अष्टांगिक मार्ग
आर्य उपोसथ
आर्यधर्म
आर्यप्रज्ञा
आर्यविमुक्ति
आर्यशील
आर्यश्रावक
आर्य सत्ये — चार आर्य सत्ये
आवरणे — पाच आवरणे
आवसथ
आवसथागार
आश्वलायन ब्राह्मणकुमार
आहुति
आळस
आळारकालाम (तसेच कालाम ऋषि)
आज्ञातकौंडिण्य
इहलोक
इहलोकीची धनदौलत
इहलोकीचे बंधन
इच्छानंगल उपवन
इच्छानंगल गांव
इक्ष्वाकुकुल
इक्ष्वाकु राजा
इंद्र
इंद्रपद
इंद्रप्रस्थनगर (नगरी)
इंद्रिये — पाच इंद्रिये
—त्यांचे विषय
**ई**
ईश्वर
**उ**
उग्र राजा
उच्छेदवाद
उच्छेदवादी
उत्कलदेश
उत्तरवय
उत्साह
उदक
उदयन राजा
उदासीन
उद्रक रामपुत्र ऋषि
उन्मार्ग (बोगदा)
उपक श्रमण
उपादान
उपायास
उपालि न्हावी
उपासक
उपासिका
उपेक्षा
उपेक्षापारमिता
उपेक्षासंबोध्यंग
उपोषण
उपोसथ
उपोसथव्रत
उप्पलवण्णा नामक भिक्षुणी
कामच्छंद
कामवासना

अनुक्रमणिका

उरुवेलकाश्यप
**ऋ**
ऋद्धिचमत्कार
ऋद्धिपाद – चार ऋद्धिपाद
ऋद्धिबल
ऋषि
ऋषिपतन उद्यान
ऋषिपतन उपवन
ऋषिमुनि
**ए**
एकनाळा ब्राह्मणगाव
एकांतवास
एकांतवास सुख
एकांतवासातील गुण
एकांतवासाचा सुपरिणाम
एकांतवासाचे फायदे
**औ**
औदार्य
औदिच्य ब्राह्मण
**क**
ककुत्था नदी
कण्हाजिनाकुमारी
कपिलवस्तुनगर किंवा नगरी
कम्मासदम्म (कल्माष दम्य) शहर
करुणा
कर्ण
कर्तव्य
कर्म
कर्म विपाक
कलिंग देश
कल्प
कल्माषपाद
कसया
कंथक घोडा
कंथा
काम (कामाग्नि)
कोसलदेश
कौसल राजा
कौरव्य राजा
कामविकार
कामसुख
कामासक्तीतील दोष
कामोपभोग
कामोपभोगातील दोष
कार्यकारणपरंपरा
कार्षापण
कालाम क्षत्रिय
कालहस्ती (राजसेनापति)
काली दासी
कालुदायी (सिद्धार्थ मित्र)
काविंद अमात्य
काशी
काशीराष्ट्र
काशी विद्यापीठ
काश्यप बुद्ध
कांबोज प्रदेश
किंबिल (व्यक्ति)
कीर्तीची आशा
कुरुदेश
कुरुराष्ट्र
कुलपुत्र शहर
कुशलधर्म
कुशल मनोवृत्ति
कुशावती
कुसिनारा गाव
कूटदंत ब्राह्मण
कूटागारशाला (महावन)
कृपणता
कृशागौतमी (क्षत्रिय कन्या)
केवट्ट ब्राह्मण
केसकंबल व्यक्ती
कोटिग्राम
कोलंबो शहर
कोलिय
कोलिय गण
गौतमी महाप्रजापति
गृध्रकूट पर्वत
गृहस्थ – गृहस्थाची कर्तव्ये

कौशांबी नगरी
कौंडिण्य ब्राह्मण
क्रकचोपम उपदेश
क्रियावादी
क्रियासातत्य
क्रीडामंडळ
क्रीडाशाळा
क्रोध (क्रोधाग्नि)
क्रोधरिपु
**ख**
खाणुमत गाव
खाणुमत ब्राह्मण
खेद
खेमा भिक्षुणी
खोटे न बोलण्याविषयी उपदेश
**ग**
गणराज्ये
गया
गयाकाश्यप
गर्व
गर्वमल
गंगा नदी
गंध
गंधर्व
गाथा
गांधीवाद
गिरिमेखल हत्ती
गुजरात
गुजरात विद्यापीठ
गुरु
गुरुदक्षिणा
गोपालक उपोसथ
गोरखपूर
गौतम
गौतमद्वार (नगरद्वार)
**छ**
छन्न सारथि
**ज**
गृहस्थाश्रम
ग्रहयोग
ग्रहशांति
ग्रहांना दान
ग्रामभोजक
**घ**
घोषिताराम
**च**
चमत्कार
चक्षु
चंक्रम
चंक्रमण
चंचलता
चंदादेवी
चंपा
चंपानगर
चातुर्यामसंवर
चातुर्यामसंवर संवृत
चापालचैत्य
चावडी
चांडाळ
चांडाळ कुल
चित्त
चित्ताची एकाग्रता
चित्ताची पाच आवरणे
चित्ताची रक्षणीयता
चित्त विमुक्ती
चीवर (कंथा)
चुल्लबोधि
चूलनि ब्रह्मदत्त (तसेच ब्रह्मदत्त किंवा ब्रह्मदत्त राजा) (पांचाल देशचा राजा)
चुंद लोहार
चुंदक भिक्षु
तपश्चर्या – तीन प्रकारची
तपुस्स व्यापारी
तपोवन
तहान

जग
जगाचा अंत
जटिल (जटाधारी लोक)
जनक राजा
जन्म
जरा
जराजर्जरित मनुष्य
जरामरण
जंबुग्राम
जंबुद्वीप
जंबुवृक्ष
जातक
जाति
जाति (जन्म)
जातिभेद
जालिकुमार
जिन
जीव
जीवक कौमारभृत्य नामक वैद्य
जीवितभय
जीवितमद
जीवितसंस्कार
जूजक ब्राह्मण
जेत राजकुमार
जेतवन (विहार किंवा उद्यान)
जैन साहित्य
जैन तीर्थंकर
जोशी, चिंतामणराव
ज्योतिःशास्त्र
ज्योतिषी ब्राह्मण
**त**
तथागत
तप
तपश्चर्या
दास आणि दासी
दासदासी
दिक्पाल – चार दिक्पाल
दिव्यदृष्टि
दीपंकर बुद्ध
तळमळ
तक्षशिला नगरी
तंटेबखेडे
तंत्र
तारुण्य
तारुण्यमद
तारुक्ष्य
तारुक्ष्य ब्राह्मण
तुषित देवलोक
तुषित भवन
तूप
तेज
तेमियकुमार
तृष्णा
त्रैविद्यकांतार
त्रैविद्यारण्य
त्रैविद्यब्राह्मण
त्वचा
**थ**
थेरी (स्थविरी)
थेरीगाथा
**द**
दया
दशशीलधारिणी
दान
दानधर्म
दानपारमिता
दानापासून फायदे
दायभाग
दारा
दारूचा गुत्ता
दारूचे दुकान
दारूचे व्यसन
दास
धम्मक टेकडी
धर्म
धर्म (गुणधर्म)
धर्मचिंतन
धर्मप्रविचय

अनुक्रमणिका

दीर्घायु नामक राजपुत्र
दुःख
दुःख आर्यसत्य
दुःखनिरोध
दुःखनिरोध आर्यसत्य
दुःखनिरोध मार्ग
दुःखनिरोधगामी मार्ग
दुःखनिरोध गामिनी प्रतिपदा आर्यसत्य
दुःखविपाक
दुःखसमुदाय
दुःखसमुदय आर्यसत्य
दुर्वासना
देव
देवदत्त
देवदह शहर
देवता
देवलोक
देविंद अमात्य
देह
देहदंडन
देहविसर्जन
देहात्मवादी
दैत्य
दौर्मनस्य
दौलत
दौलतीचा सद्व्यय
द्वेष
द्रोण ब्राह्मण

**ध**

धन
धनंजय श्रेष्ठी
धनुर्विद्यानैपुण्य
धने – सात प्रकारची धने
नालंदाग्राम
नालागिरि हत्ती
नाश
नासा
नित्य पदार्थ – सात नित्य पदार्थ
निदानकथा
धर्मप्रविचय संबोध्यंग
धर्ममार्ग
धर्मरहस्याचा साक्षात्कार
धर्मरहस्याचे ज्ञान
धर्मशाळा
धर्मश्रमण
धर्मज्ञान
धर्मानंद कोसंबी
धर्मोपदेश
धर्मोपदेशगृह
धार्मिक आचरण
धार्मिक कायकर्म
धार्मिक चर्या
धि गोवा हिंदु असोसिएशन
ध्यान
ध्यानधारणा
ध्यानधारणादि
ध्यानमार्ग
ध्यानस्थ
ध्यानसुख
ध्याने – चार प्रकारची ध्याने
ध्वज नामक ब्राह्मण

**न**

नगरप्रदक्षिणा
नदीकाश्यप
नरक
नरमांस
नरमांसभक्षण
नरयज्ञ
नंदनवन
नाग
नागलोक
नाथपुत्र (निर्ग्रथांचा मुख्यगुरू)
परिव्राजकवेष
परिव्राजिका
पर्णकुटिका
पर्णशाला
पश्चाताप
पसेनदी तसेच पसेनदी

निद्रा
नियतिवादी संप्रदाय
नियम – दहा नियम
निर्ग्रंथ
निर्ग्रंथ उपोसथ
निर्ग्रंथ नाथपुत्र
निर्ग्रंथ श्रमण
निर्वाण
निर्वाणपत्र
निर्वाणमार्ग
‘निवेदन’ (आत्मचरित्र)
नीति
नैरंजरा नदी
नैवसंज्ञानासंज्ञासमाधि
नैवसंज्ञानासंज्ञायतन समाधि
नैषाद (ध) कुल
नैष्कर्म्य
नैष्कर्म्यपारमिता
न्यग्रोधाराम (विहार)
न्यायाधीश
न्यायाधीश मंडळ
न्यायसभा

**प**

पकुध कात्यायन
पति
पत्नी
परनिंदा
परमशांति
परमेश्वर
परलोक
परिदेव (न)
परिव्राजक
पुत्रमोह
पुनर्जन्म
पुरुष
पुरोहित
पूरण काश्यप
पूर्णवर्धन पुत्र
पूर्वजन्म
पंचशील (पाच नियम)
पंचस्कंध – रूपादि पंचस्कंध
पंचेद्रियांचे विषय
पाटलिग्राम
पाटलिपुत्र शहर
पाप
पापकर्म
पापकर्म – पापकर्माची चार कारणे
पापकर्मे – सात प्रकारची पापकर्मे
पापनिरोध
पापविचार
पापाचरण
पापाची लाज
पापी माणूस
पापे – त्रिविध पापे
पारमिता – दहा पारमिता
पावा नगर
पांचाल
पांचालदेश
पांडवपर्वत
पितर
पिप्फलिवन
पिंडपात
पुक्कुस अमात्य
पुक्कुस मल्ल (महाजन)
पुण्य
पुण्यकर्म
पुण्यप्रद विचार
पुण्यप्राप्ती
पुण्याचरण
पुत्र
पुत्रबंधन
प्रीतिसंबोध्यंग

**फ**

फर्ग्युसन कॉलेज
फिर्यादीअर्यादी

**ब**

बडोदे
बलभद्र

अनुक्रमणिका

पूर्वपक्ष-उत्तरपक्ष
पूर्वाराम उद्यान
पौलजनक
पौष्करसादी ब्राह्मण
पृथ्वि
प्रकाश नामक नियतकालिक
प्रजा
प्रतीत्यसमुत्पाद
प्रत्यवेक्षण
प्रधान
प्रधान मंडळ
प्रपंच
प्रपंचरत लोक
प्रयत्न
प्रव्रज्या
प्रव्रज्याविधि
प्रव्रज्या वेष
प्रश्रब्धि
प्रश्रब्धिसंबोध्यंग
प्रसूतिगृह
प्रज्ञा
प्रज्ञापारमिता
प्राकार
प्राचीनयवमध्यक शहर
प्रापंचिक जन
प्रापंचिक दुःख
प्रियवचन
प्रिय वस्तू
प्रिय वस्तू आणि मनुष्य यांचा वियोग
प्रियंगु वल्ली
प्रीति
ब्रह्मदेव
ब्रह्मदेश
ब्रह्मपद
ब्रह्मलोक
ब्रह्मसायुज्यता
ब्रह्मादिक देवगण
ब्रह्मादिक देवलोक
ब्रह्मर्षि (सात ब्रह्मर्षि किंवा ब्राह्मण ऋषि)
बळे – पाच बळे
बंधुत्व
बापट, डॉ. पु. वि.
बायका
बाह्य आयतने
बाह्यस्कंध
बिल्वग्राम
बिंबिसारराजा
बुद्ध
बुद्धगया
‘बुद्धचरित काव्य’
बुद्धचरित्र
बुद्ध धर्म
‘बुद्ध धर्म आणि संघ’
बुद्धपद
बुद्धसंघ
बुद्धीची पाच आवरणे
बुली
बोधिवृक्ष
बोधिसत्त्व
बो बौध्यंगे – सात बोध्यंगे
बौद्ध क्रांति
बौद्ध चित्रकला
बौद्ध धर्म
बौद्ध भिक्षु
बौद्ध विद्या
बौद्ध संघ
‘बौद्ध संघाचा परिचय’
बौद्ध साहित्य
ब्रह्मचर्य
ब्रह्मदत्त (काशीचा राजकुमार किंवा राजा)
भिक्षुवर्ग
भिक्षुसंघ
भूक
भृगु ब्राह्मण
भोगनगर
भोज
भोजनशाळा
भौतिकवादी संप्रदाय

ब्राह्मण
ब्राह्मण परिव्राजक
ब्राह्मणवर्ण
ब्राह्मणाचार्य
ब्राह्मणांचे प्रकार
**भ**
‘भगवानबुद्ध’
भद्दिय नामक शाक्य
भद्रिय ब्राह्मण
भरतखंड
भर्ग गोत्र
भर्ग मन्तानिपुत्र
भल्लिक व्यापारी
भव
भवदुःख
भागवत, प्रा. ना. के.
भारतीय विद्याभवन (मुंबई)
भारतीय संस्कृती
भारद्वाज ब्राह्मण
भार्या — सात प्रकारची भार्या
भावना
भांडग्राम
भिगार तसेच भिगार श्रेष्ठी
भिगारमाता विशाखा
भिगार सावकार
भिक्षा
भिक्षापात्र
भिक्षु
भिक्षुणी
भिक्षुणीसंघ
महाजनकराजा
महाजनमंडळ
महाजन लोक
महाजनसत्ता
महानाम ब्राह्मण
महानरयज्ञ
महानामा शाक्य
महानुभाव देवता
महाभूते — चार महाभूते
भ्रांतता
भ्रांति
**म**
मक्खलि गोसाल
मगधदेश
मगधराजा
मगधराष्ट्र
मचलगाव
मणिमेखला देवता
मत्स्यमांस
मद्दी तसेच मद्दीदेवी
मद्यादिसेवन
मध
मध्यदेश
मध्यम मार्ग
मध्यमा प्रतिपद
मन
मनसाकट नामक ब्राह्मणगाव
मनाच्या पाच शक्ती
मनुष्य — चार तऱ्हेचे मनुष्य
मनुष्यमांस सेवन
मनुष्यलोक
मनोवृत्ति
मनोवृत्ती
—पाच मनोवृत्ती
मरण
मरणोत्तर गती
मल्ल (महाजन)
मल्लिकाराणी (देवी)
महाकाश्यप
मुक्ति
मुचिलिंद राजा
मुचिलिंदवृक्ष
मुदिता
मुलगी
मृत्यु
मेरुमंडळ
मैत्री
मैत्रीपारमिता

अनुक्रमणिका

महायज्ञ
महार चांभार
महाराजा
महाराष्ट्र
महाश्रमण
महासच्चक सुत
महौणध
मन्तानिपुत्र
मन्तानी माता
मंत्र
मंत्रतंत्र
मंत्रिमंडळ
मंत्री
मागन्दिया ब्राह्मणकन्या
मातलि सारथि
माथाकुंवरका कोट
मानसिक उत्साह
मायादेवी
मार
मार्क्सवाद
मालुंक्यपुत्र नामक भिक्षु
माहुत
मांत्रिक
मांसभक्षण
मिताहार
मिताहारापासून फायदे
मित्र
मिथिला
मिश्रविवाह
यौन प्रदेश
**र**
रक्तस्नान
रम्मनगर
रस
रसक (स्वयंपाकी)
राजकुमार
राजगृह नगर
राजगृहक श्रेष्ठी
राजधानी
मैत्रीभावना
मोग्गलान
मोलिय फल्गुन
मोह
मोहाग्नि
मोक्ष
मोक्षप्राप्ति
मोक्षमार्ग
मौर्य
मौर्य साम्राज्य
य
यश (व्यापारी पुत्र)
यशोधरा
यष्टिवन
यक्ष
यक्षिणी
यज्ञ
यज्ञफल
यज्ञयाग
यज्ञयागादि कर्मकांड
यज्ञविधि
युवराजपद
योग
योगबल
योगमार्ग
योगशास्त्र
योगाभ्यास
योनि
योनि – हीन योनि
वप्र ब्राह्मण
वप्रमंगल (शेत नांगरण्याचा उत्सव)
वर्तन
वर्ण – चार वर्ण
वर्णसंकर
वसिष्ठ
वस्सकार ब्राह्मण अमात्य
वंक पर्वत
वादविवाद
वामदेव

अनुक्रमणिका

राजनीति
राजपुरुष
राजवाडे, चि. वै.
राजसंपत्ति
राजा
राजायतन वृक्ष
राजाज्ञा
राजांगण
राज्यसुख
राम नामक ब्राह्मण
रामग्राम
रामनगर
राष्ट्र
राहुल
रूप
**ल**
‘ललितविस्तार’
लक्ष्मण नामक ब्राह्मण
लिच्छवी
लिच्छवी राजे
लुंबिनदेई (तथागताचे जन्मस्थान)
लोकसंग्रह —लोकसंग्रहाची चार साधने
लोभ
**व**
वज्जी
वज्रासन
वत्सगोत्र परिव्राजक
वनदेवता
विंध्य पर्वत
वीर्य
वीर्यपारमिता
वीर्यसंबोध्यंग
वेट्ठद्वीप
वेट्ठद्वीपक ब्राह्मण
वेणुद्वार नामक ग्राम
वेणुवन
वेणुवन उद्यान
वेणुवनविहार
वेद
वायू
वाराणसी
वासभक्षत्रिया
वासिष्ठ
विडूडभ
विदेह (विदेह देशातील जन)
विदेह देश
विदेह राज्य
विदेह राष्ट्र
विद्योदय विद्यालय
विनय
विनयग्रंथ
विनयघर (विनयग्रंथांमध्ये कुशल)
विनयसंघ
विमुक्तिसुख
वियोग
वियोग दुःख
विशाखा तसेच विशाखा भिगारमाता
विश्वामित्र
विषयसुख
विषयांची गोडी
विषयांपासून मुक्तता
विषयोपभोग
विसुद्धिमग्ग
विहार
विहारदान
विक्षेपवाद
विज्ञान
शाक्यराज्य
शालवन
शालवृक्ष
शाला नामक गाव
शालाग्राम
शाश्वतसुख
शास्त्र
शास्त्रे
शांति
शिबि
शिबिका

वेदना
वेदपठण
वेस्संतर
वेस्संतरबोधिसत्व
वैदिक आर्यसंप्रदाय
वैदिक मार्ग
वैदेह राजा
वैदेह राज्य
वैदेहिका
वैराग्य
वैशाली
वैश्य
व्यय
व्याधि
व्रते
**श**
शक्र
शत्रु
शब्द
शरीर
शाक्य
शाक्यकुमार
शाक्यकुल
शाक्यगण
शाक्यपुत्रीय
शाक्यपुत्रीय भिक्षु
शाक्यराजे
श्राद्ध
श्रामणेर
श्रामण्य
श्रामण्यफल
श्रावकसंघ
श्रावस्ति
श्रीलंका
श्रीवर्धन नामक गृहस्थ
**ष**
षडायतन (पंचेद्रिये आणि मन)
**स**
सकदागामी
शिबिदेश
शिबिराजधानी
शिबिराजवंश
शिबिराज्य
शिबिराष्ट्रवासी
शिष्य
शिष्यत्व
शिक्षा
शील
शीलपारमिता
शीलभ्रष्ट मनुष्य
शील रक्षणापासूनचे फायदे
शीलाचे महत्त्व
शीलापासून फायदे
शुद्धोदनराजा (बुद्धपिता)
शुद्धि
शूद्र
शोक
श्वपाक चांडालपुत्र
श्वेतगज
श्रद्धा
श्रमण
श्रमणगौतम
श्रमणदीक्षा
श्रमणब्राह्मण
श्रमणमार्ग
श्रमणसंप्रदाय
समाधीचे तीन प्रकार
समानात्मता
समुद्रदत्त भिक्षु
सम्यक् आजीव
सम्यक् कर्मात (कर्म)
सम्यक् दृष्टि
सम्यक् प्रयत्न – चार प्रकारचे
सम्यक् वाचा
सम्यक् व्यायाम
सम्यक् समाधि
सम्यक् संकल्प
सम्यक् संबुद्ध

अनुक्रमणिका

सखेसोयरे
सज्जनांचा धर्म
सज्जनांची संगती
सतीर्थ्य
सत्कर्म
सत्पुरुष
सत्य
सत्यपारमिता
सत्यान्वेषणबुद्धि (मीमांसा)
सदाचरण
सदाचरणापासून फायदे
सदाचरणी मनुष्य
सदिच्छा
सद्धर्म
सद्धर्म प्रसार
सद्धर्मबोध
सद्धर्माचरण
सन्मार्ग
सप्तपदार्थवाद
समाजसत्तावाद
समाधि
‘समाधिमार्ग’ (ग्रंथ)
समाधिसंबोध्यंग
समाधिसुख
समाधीच्या आठ पायऱ्या
समाधीच्या सात पायऱ्या
सिद्धार्थ
सिंह सेनापति
सीवक यक्ष
सीतवन
सीवली कन्या किंवा देवी
सुख
सुखटणकर, ज. स.
सुखविपाक
सुगति
सुजाता
सुतसोम
सुतपिटक
सुदत्त ब्राह्मण
सम्यक् स्मृति
सम्राट अशोक
सयाजीराव महाराज गायकवाड
संक्लेश
संगारव ब्राह्मण
संजय परिव्राजकाचार्य
संजय बेलट्ठपुत्र
संजयराजा
संथागार
संपत्ति
संपत्तिनाशाची सहा द्वारे
संबोध
संबोधिज्ञान
संयोजने
संवेग
संशयग्रस्तता
संसारशुद्धिवाद
संसृतिपाश
संस्कार
साकेत शहर
साधुसंत
साधुचा धर्म
साधुंची संगती
सारनाथ
सारिपुत्त
सिगाल (शृगाल) कुलपुत्र
स्मृति
स्मृतिसंबोध्यंग
स्मृत्युपस्थाने – चार स्मृत्युपस्थाने
स्वर्ग
स्वर्गलोक
स्वर्गलोकातील सुखात दोष
स्त्रीबुद्धि
स्त्रिया
**ह**
हटयोग
हत्ती
हत्ती – अंधांचे हत्तीवर्णन
हस्तिग्राम

अनुक्रमणिका

सुदत्त श्रेष्ठी
सुदर्शन नामक व्यक्ति
सुदर्शन राजा
सुनीध अमात्य
सुनंद सारथि
सुभद्र परिव्राजक
सुभाषित
सुमंगलाचार्य महास्थविर
सुमेध ब्राह्मण किंवा तापस
सुमेरु पर्वत
सुयाम ब्राह्मण
सुवर्णभूमि (ब्रह्मदेश)
सुंदरी परिव्राजिका
सूकरमद्दव पदार्थ
सेवक
सेवक नामक अमात्य
सेनानी नामक इनामदार
सेनानीग्राम
सेवा
सोतापत्ति फल
सोतापन्न
सोत्थिय तृणहारक
स्नानशाळा
स्पर्श
स्पर्श — एका इंद्रियाचा विषय
हस्तिशाळा
हस्ती
हिमालय पर्वत
हिरण्यवती नदी
‘हिंदी संस्कृति आणि अहिंसा’
हिंसात्मक क्रांतिवाद
हीन योनी
होमकुंड
होमहवनादी

**क्ष**

क्षत्ता
क्षत्रिय
क्षत्रियकुल
क्षत्रिय नीति
क्षत्रिय स्त्रिया
क्षमा
क्षांति
क्षांतिपारमिता

**ज्ञ**

ज्ञातिवर्ग
ज्ञान
ज्ञानाची पाच आवरणे

अनुक्रमणिका